
# लक्षदीप

## निवडक लक्ष्मीकांत देशमुख




संपादक : डॉ. रणधीर शिंदे

# लक्षदीप

निवडक लक्ष्मीकांत देशमुख

TM

दिलीपराज प्रकाशनाची सर्व पुस्तके आता आपण Online खरेदी करू शकता.
आमच्या Website ला कृपया एकदा अवश्य भेट द्या. अथवा Email करा.
www.diliprajprakashan.in
Email - diliprajprakashan@yahoo.in

# लक्षदीप

## निवडक लक्ष्मीकांत देशमुख

संपादक : डॉ. रणधीर शिंदे

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.™
२५१ क, शनिवार पेठ, पुणे -४११०३०

# लक्षदीप / LAKSHADEEP

(निवडक लक्ष्मीकांत देशमुख )

संपादक : डॉ. रणधीर शिंदे

---

◆ **प्रकाशक**

राजीव दत्तात्रय बर्वे,
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.,
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी क्रमांक (फॅक्ससहित)
२४४७१७२३। २४४८३९९५ । २४४९५३१४

© **लक्ष्मीकांत देशमुख**

◆ **प्रथमावृत्ती** - १४ फेब्रुवारी २०१५

◆ **प्रकाशन क्रमांक** - २२०४

◆ **ISBN** - 978 – 93 – 5117 – 042 – 6

◆ **मुद्रक**

मधुराज प्रिंटर्स अॅण्ड पब्लिकेशन्स् प्रा. लि.
स. नं. २९/८-९, पारी कंपनीजवळ, धायरी, पुणे - ४११ ०४१

◆ **टाईपसेटिंग**

का. वि. शिगवण,
अक्षरवेल
दत्तवाडी, पुणे ४११ ०३०

◆ **मुद्रित शोधन** : एस. एम. जोशी

◆ **मुखपृष्ठ** : सुहास चांडक

◆ **मूल्य** - ₹ पाचशे मात्र

---

**या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनःप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक व प्रकाशकाची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.**

# प्रस्तावना

लक्षदीप हा लक्ष्मीकांत देशमुख यांच्या निवडक साहित्याचा संपादित संग्रह. देशमुख यांनी १९८० नंतर विविधस्वरूपी लेखन केलेले आहे. सनदी अधिकारी म्हणून ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. कथा, कादंबरी, ललित व वैचारिक असे त्यांच्या लेखनाचे स्वरूप आहे. देशमुख यांनी लिहिलेल्या विविध प्रकारातील प्रातिनिधिक स्वरूपात लेखनाचा समावेश या संपादनात केला आहे. कथा, नाटक, ललित व प्रवासवर्णन व वैचारिक लेखांचा अंतर्भाव या संपादनात आहे. कादंबरीचा अंश देण्यामुळे तिची एकात्मता नाहीशी होईल म्हणून कादंबरी संहिता दिलेली नाही. त्यामुळे या संपादनात कादंबरीलेखनाचा समावेश पृष्ठसंख्येमुळे केलेला नाही. मात्र प्रस्तावनेत त्यांच्या कादंबरीलेखनाचे वेगळेपण नोंदविले आहे.

एक लेखक म्हणून लक्ष्मीकांत देशमुख यांच्या घडणीमागे विविध ठिकाणचे प्रदेश व अनुभवक्षेत्र साहाय्यभूत ठरले आहेत. तसेच त्या घडणीच्या मागे असणाऱ्या कालधर्माचाही संबंध आहे. साधारणत: स्वातंत्र्यानंतरच्या तीनेक दशकाच्या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व लेखकपणाची घडण झालेली आहे. स्वातंत्र्यानंतर समूहजीवनात आलेली नवी स्वप्नकांक्षा, या स्वप्नकांक्षेला सांस्कृतिक जगाने दिलेला प्रतिसाद त्या काळात देशमुख घडत होते. तसेच १९६० नंतरच्या मराठी साहित्यविश्वात अनुभवविश्वाचे काही उद्रेक घडत होते. त्याचेही सादपडसाद या काळातील व्यक्तींवर-लेखकांवर घडणे स्वाभाविक होते. मुरुम (जि. उस्मानाबाद) हे लक्ष्मीकांत देशमुख यांचे जन्मगाव. वडील शिक्षक होते. त्यांच्या विविध ठिकाणी बदल्यांमुळे त्यांचे शिक्षण वेगवेगळ्या गावी घडले. निजामी राजवटीच्या खाणाखुणा असणाऱ्या प्रदेशाचे संस्कार त्यांच्यावर झाले. वाचनाचा पहिला संस्कार त्यांना त्यांच्या आईकडून झाला. उस्मानाबाद, नांदेड येथे त्यांचे शिक्षण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी रसायनशास्त्र विषयात एम.एसस्सी. पदवी मिळवली. संशोधनाची आवड असल्यामुळे त्यांनी पीएच.डी.साठी नाव नोंदविले. मात्र विद्यापीठीय संशोधनाचा काच त्यांना सहन

झाला नाही त्यामुळे ते तेथे रमले नाहीत. दरम्यान स्टेट बँक रिक्रूटमेंटद्वारे त्यांना नोकरी मिळाली. मात्र त्यांच्या मनात आयएएस अधिकाऱ्यांचे स्वप्न होते. बँकेत असताना स्पर्धापरीक्षेचा ते अभ्यास करू लागले व लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांना यश मिळाले. १९८३ मध्ये ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सर्वप्रथम आले लवकरच ते प्रशासन सेवेत दाखल झाले. आणि १९९६ साली त्यांना आय.ए.एस.चा दर्जा मिळाला. प्रशिक्षण कालावधीसाठी त्यांचे पोस्टिंग दहीवडी (जि. सातारा) येथे झाले. या प्रशिक्षण कालावधीत त्यांना व्ही.पी.राजा नावाचे आय.एस. अधिकारी लाभले. राजा यांच्या कार्यशैलीचा व श्रेष्ठ अशा उच्चतर नैतिक गुणांचा प्रभाव पडला, याचा ते वारंवार कृतज्ञतेने उल्लेख करतात. साधारणत: या काळातील सामाजिक अवकाश, देशमुख यांच्या घरातील वातावरण, संस्कार व वाचन याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या लेखनावर आहे.

त्यानंतर त्यांची भूम (जि. उस्मानाबाद) येथे प्रांत म्हणून बदली झाली. भूम हे तसे आडवळणाचे दुष्काळी गाव. भूममध्ये त्यांनी अनेक लोकाभिमुख कामे केली. त्यानंतर त्यांनी अकोला, नांदेड, परभणी, सांगली, पुणे व कोल्हापूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी म्हणून काम केले. सप्टेंबर २०१४ साली मुंबई येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीचे कार्यकारी संचालक म्हणून ते निवृत्त झाले. त्यांच्या प्रशासकीय कामाचा तपशील मुद्दाम दिला आहे. याचे कारण देशमुख यांच्या लेखनाचे विषय या प्रदेशांनी व तिथल्या अनुभवांनी पुरविलेले आहेत. परभणी, कोल्हापूर गावामध्ये त्यांच्या अनेक साहित्यकृतींची निर्मिती झालेली आहे. दीर्घकाळ त्यांनी ज्या प्रशासकीय व्यवस्थेत काम केले तेथील अनुभवाधारित चित्रणविषय आलेले आहेत. प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांनी अनेक लोकोपयोगी कामांची आखणी करून त्याची परिपूर्ती केली. विविध ठिकाणच्या त्यांच्या कार्यकाळात सेव्ह द बेबी गर्ल, स्वस्त धान्य दुकानांचा काळाबाजार रोखण्यासाठी सुरू केलेली एम. डिस्ट्रीब्युशन व व्हीटीएस सेवा, प्रौढ साक्षरता अभियान प्रकल्प, ई-चावडी, अकोल्यातील बालमजुरांसाठीचा नवजीवन प्रकल्प व पुणे येथील शिवछत्रपती क्रीडानगरीतील अद्ययावत संकुल ही त्यांची काही लक्षणीय प्रशासकीय स्वरूपाची कामे होत. त्यांच्या लेखनाचे मुख्य केंद्र या जीवनातून उद्भवलेले आहे. एक सकारात्मक रचनात्मक दृष्टिकोनातून प्रशासन व्यवस्थेकडे पाहणारा अधिकारी आणि व्यक्तिमत्त्वातील संस्कार या दुहेरी गोफातून त्यांचे वाङ्मयविश्व अवतरलेले आहे. या विविध तऱ्हेच्या अनुभवांचा उपयोग त्यांनी लेखनासाठी केला. प्रशासकीय जीवनातील विविध रंगचित्रे त्याच्या भल्याबुऱ्यासह ललित साहित्यातून मांडली.

मराठवाडा हा त्यांच्या घडणीचा व प्रशासकीय सेवेचा दीर्घकाळ कालावधी राहिला. या परिसराशी ते आंतरिकरीत्या जोडले गेलेले आहेत. या प्रदेशाने व तिथल्या

लोकजीवनाने त्यांना लेखनाचे अनेक विषय दिले आहेत. लेखक म्हणून परिसराशी त्यांची जैव स्वरूपाची गुंतवणूक आहे.

२.

देशमुख यांनी विविधस्वरूपी वाङ्मयाची निर्मिती केली आहे. कथांजली (१९८७), अंतरीच्या गूढगर्भी (१९९५), उदक (१९९७) (पुढील आवृत्तीचे शीर्षक - पाणी! पाणी! पाणी!), नंबर वन (२००८), अग्निपथ (२०१०) व सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी (२०१३) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. सलोमी (१९९३), ऑक्टोपस (२००६), अंधेरनगरी (१९९४), होते कुरूप वेडे (१९९७), इन्किलाब विरुद्ध जिहाद (२००४) व हरवलेलं बालपण (२०१४) या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. दूरदर्शन हाजीर हो (बालनाट्य, १९९७) व अखेरची रात्र (२०१४) ही त्यांची नाटके प्रकाशित आहेत. याशिवाय प्रशासननामा (२०१३) व बखर प्रशासनाची (२०११) ही त्यांची प्रशासनविषयावरील दोन पुस्तके प्रकाशित आहेत. शिवाय विविध नियतकालिकांतून त्यांनी वैचारिक, सामाजिक व प्रवासवर्णनपर लेखनही केले आहे. त्यांच्या काही कथांवर चित्रपटनिर्मिती होते आहे.

३.

१९६५-६६ दरम्यान बालवयात साधना साप्ताहिकातील एका बालकथेने त्यांच्या लिखाणाला सुरुवात झाली. पुढे काही रहस्यकथाही त्यांनी लिहिल्या. कथासाहित्यप्रकारात देशमुख यांनी विविधस्वरूपी लेखन केले आहे. 'अंतरीच्या गूढगर्भी'पासून 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' असे त्यांचे सहा कथासंग्रह प्रकाशित आहेत. आरंभीच्या कथालेखनावर रोमँटिक आदर्शवादाची छाया आहे. कथांजली व अंतरीच्या गूढगर्भी या संग्रहातील कथाविश्व मध्यमवर्गीय भावविश्वाशी संबंधित आहे. स्त्रीपुरुष नात्यांचा शोध, मानवी वर्तनातील काही तणावांचे चित्र या कथाचित्रणात आहे. पुढे मात्र समस्याकेंद्री कथामालिका त्यांनी लिहिल्या. समकाळात भेडसावणाऱ्या काही महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. एका आशयसूत्राच्या विविध परी चित्रित करण्याचा हा प्रयत्न केला आहे. पाणीसमस्या, खेळाडूंचे भावविश्व व स्त्रीभ्रूणहत्येचा प्रश्न या जीवनाधारित कथांचे संग्रह पुढील काळात प्रसिद्ध झाले. एकेक प्रश्न घेऊन त्या प्रश्नांचे विविध कंगोरे धुंडाळण्याची ही रीत आहे. 'थीमबेस्ड कथा' असे त्यांना म्हटले आहे. सामाजिक समस्यांचे चित्रण करणाऱ्या या महत्त्वाच्या कथामाला आहेत.

या संग्रहात 'मर्सी किलिंग' ही वेगळ्या विषयावरची कथा आहे. प्रियू नावाच्या कुटुंबवत्सल स्त्रीला मुलगा होतो. तो केवळ शरीराने वाढतो. मेंदू व बुद्धीने वाढ न होणारा तो मांसाचा गोळा होता. आपल्यानंतर त्याचे कसे होईल या भावनेने ती

अनिच्छेने मर्सी किलिंग करते. जगणे हे जेव्हा मरणाहून दु:सह होते. तेव्हा रुग्णाच्या नातेवाईकांच्या परवानगीने त्याचा मृत्यू घडविला जातो. त्याप्रमाणे कथानायिका आपल्या मुलाला नाहीसे करते. पुढे ती मनाला विरंगुळा वाटावा म्हणून बालवीरांच्या साहसकथा लिहिते. त्या कथा लोकप्रिय होतात. अनेक बालवाचकांची तिला पत्रे येतात. तिच्या लेखनाची वाचकप्रियता एका बाजूला उंचीवर आलेली असता तिच्या कथेतील मानसपुत्र नंदूचा ती शेवट करते. याचा तिला त्रास होतो. प्रत्यक्षातील जगणे आणि कलानिर्मिती यातला हा ताण आहे. कलानिर्मितीतील जीवनानुभवावर प्रत्यक्षातल्या जगण्यातले दाब असतात. या द्वंद्वातून या कथेची निर्मिती झाली आहे. 'अंतरीच्या गूढगर्भी' कथेत मानवी मनातील भावस्पंदनाचा विचार आकारला आहे. आत्मपर निवेदनातून उलगडलेली ही कथा आहे. कथेतील मी मानसशास्त्रज्ञ आहे. औरंगाबादला जया नावाच्या मुलीशी त्याचा विवाह झालेला. तिचे आधी मकरंद नावाच्या तरुणाशी लग्न ठरलेले; परंतु लग्नापूर्वीच एका अपघाताने तो मरण पावलेला. तिच्या मनात मकरंदविषयी एक घर असते. मात्र हळूहळू ती ते विसरते. मात्र लग्नापूर्वी नवऱ्याला हा विषय कधी न काढायच्या अटीवर ती लग्नास तयार होते. पुढे त्यांना मुलगा होतो. तो तिला अनाहूतपणे पत्राने मुलाचे नाव मकरंद ठेवायला सांगतो. त्याच्या मनातील मकरंदविषयीची मत्सरभावना वा त्याची अदृश्य छाया त्याला सतावत होती. स्वत:च्या सुखाला कुरतडणाऱ्या व्यथेमुळे कळत न कळत तो पत्रात उच्चार करतो. आपण केलेल्या उच्चाराबद्दल त्याच्या मनात कमालीचा अपराधभाव आहे. मात्र कथेचा शेवट सुखान्त स्वरूपाचा आहे. मानवी वर्तनात सुप्तपणे वसत असलेल्या अंतरीच्या भावनांचा आविष्कार या कथेत आहे.

'पाणी! पाणी! पाणी!' या कथासंग्रहात महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनातील पाणी या विषयसूत्राभोवतीच्या कथा आहेत. मराठीतील अशा विषयावरच्या या लक्षणीय स्वरूपाच्या कथा आहेत. 'भूकबळी' ही उल्लेखनीय कथा या संग्रहात आहे. महाराष्ट्राच्या अवर्षणग्रस्त परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या कथा या संग्रहात आहेत. मराठवाड्यातील एका दुष्काळी गावी रोजगार हमीवर काम न मिळाल्यामुळे ठकूबाई या स्त्रीचा उपासमार होऊन बळी जातो. त्या घटनेचे तहसीलदार शिंदे या संवेदनशील अधिकाऱ्याच्या नजरेतून हे वास्तव कथन केले आहे. तहसील कचेरीतील क्लार्क, तलाठी, मुकादम, मुनीम, कृषी सहायक व रेशनदुकानदार मालक; गरीब माणसांना कसे नाडतात, शोषण करतात याचे विदारक असे चित्र या कथेत आहे. काळगाव दिघी या मराठवाड्यातील एका छोट्या गावी गाडीलोहार कुटुंबातील स्त्रीच्या मृत्यूचे केविलवाणे व करुणास्पद चित्र या कथेत रेखाटले आहे. प्रशासनातील यंत्रणा सामान्याच्या शोषणाला व मरणाला कशी कारणीभूत ठरते याचे बारकाईने चित्रण या कथेत आहे. 'दौरा' या कथेतही दुष्काळी अवर्षणग्रस्ताची पार्श्वभूमी आहे. मराठवाड्यातील रोटेगाव वैजापूर भागातील

दुष्काळी परिसरात पत्रकारांचा पाहणी दौरा आयोजित केला आहे. या पत्रकारांच्या गटात प्रदीप नावाचा संवेदनशील पत्रकार आहे. त्याच्या नजरेतून हा पाहणी दौरा टिपला आहे. सलगच्या दुष्काळाने हा परिसर काळवंडून गेलेला आहे. पत्रकारांचे एक जग या कथेत आहे. जे जग या पाहणी दौऱ्याकडे केवळ सहल म्हणून पाहते. मौजमजा व साइट सीइंग म्हणून ते याकडे पाहतात. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी व सद्य:स्थितीशी त्यांचे काहीही देणेघेणे नसते. न पिकलेली शेती, पिण्याच्या पाण्याची समस्या, रोजगार हमीची तुटपुंजी कामे, रेशन दुकानदाराची मनमानी यातून एका कडवट काळ्या, करड्या रंगाचे चित्र उभे केले आहे. एका बाजूला हिरवा सुपीक समृद्ध प्रदेश व दुसऱ्या बाजूला कोरडा भणंग प्रदेश या विषयीच्या भौगोलिक परिसराचे चित्र या कथेत आहे. प्रदीप आपला जुना कॉलेजचा मित्र तहसीलदार पाटील यांच्या बरोबर दुष्काळातील विविध ठिकाणची पाहणी करतो. या पाहणीदरम्यान चांगल्या शासकीय योजनांचा भ्रष्टाचार व लालफितीच्या कारभारामुळे कसा फज्जा उडतो याचे दृश्य प्रदीपला दिसते. प्रदीप मुंबईला आल्यानंतर या दुष्काळी भागावर फार चांगली स्टोरी करतो. मात्र ती वृत्तपत्रात छापली जात नाही.

'उदक' कथेत सामाजिक संदर्भाची अनेक परिमाणे आहेत. पाण्याविनाची तीव्रता किती खोलवरची असू शकते, पाणी हे बहिष्काराचे व शोषणाचे हत्यार असू शकते, आणि सत्ताधारी वर्ग त्याचा मुजोरपणे वापर करू शकतो याची जाणीव ही कथा देते. दलितांमधील नवजागृतीमुळे गावातील सवर्णांचा पोकळ स्वाभिमान दुखावला जातो व नवबौद्धांवर गाव बहिष्कार टाकतो. एका तांड्यावर त्यांना आश्रय घ्यावा लागतो. तो चढणीवर असल्यामुळे तिथे पाण्याची सोय नसते. बी.डी.ओ. नी तिथे एका टँकरची सोय केलेली असते. या बौद्धवाड्यातील दहावी झालेल्या विचारी प्रज्ञाची ही शोकान्त कथा आहे. प्रज्ञाची रमावहिनी गर्भवती आहे. ती तापाने फणफणलेली आहे. दवाखान्याची सोय नाही. ताप कमी व्हावा म्हणून अंग पाण्याने पुसून घ्यावे लागते. तेही नीट मिळत नाही. पाणी आणण्यासाठी ती टँकरकडे जाते, त्या वेळी इब्राहिम ड्रायव्हर तिच्यावर अत्याचार करतो. ती पाणी घेऊन येते त्यावेळी रमावहिनी व तिचे बाळ मरण पावलेले असते. एकाच वेळी जात आणि स्त्रीच्या लैंगिक शोषणाची जाणीव ही कथा करून देते. पाणी माणसाला बहिष्कृत करते. अनेक माणसे, स्त्रिया यात पिचतात. या जाणिवेचे सूचन करणारी ही महत्त्वाची कथा आहे.

थीम बेस्ड कथेचा आणखी एक आविष्कार म्हणजे 'नंबर वन' (२००८) हा कथासंग्रह. खेळाडूंमधील माणसांच्या कथा असे शीर्षकात त्यांनी म्हटले आहे. खेळाडूंमधील माणूसपण शोधण्याचा हा प्रयत्न आहे. देशमुख यांच्या लेखक म्हणून संवेदनशीलतेचे वेगळेपण म्हणजे त्यांनी ज्या ज्या ठिकाणी प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केले; त्या त्या अनुभवक्षेत्राचा उपयोग त्यांनी आपल्या ललित लेखनात

केला आहे. पुण्यातील क्रीडा व युवक सेवा विभागाचे संचालक म्हणून काही वर्षे ते कार्यरत होते. या काळातील खेळाडूंचे विश्व त्यांनी जवळून पाहिलेले असणार. त्यांच्या भावविश्वाच्या कथा 'नंबर वन' मध्ये समाविष्ट आहेत. समाजजीवनात खेळाडूंच्या विशिष्ट प्रतिमा तयार झालेल्या असतात. या स्व-स्वप्नप्रेमात खेळाडू मश्गूल असतात. या खेळाडूंचे खाजगी आयुष्य कोणत्या प्रकारचे असते, स्वप्रतिमेच्या आहारी गेल्यामुळे बऱ्याच वेळेला त्यांचे व्यक्तिगत आयुष्य कोलमडून पडते. माणूसपण आणि कलावंत-खेळाडू यांच्यातील झगडा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वसत असतो. या पेचाला देशमुखांच्या कथेने साकार केले आहे. समाजाचे रिअल हिरो असणाऱ्या खेळाडूंच्या भावविश्वाच्या या कथा आहेत. खेळाडूंच्या संघर्षाच्या विजिगीषा वृत्तीच्या या कथा आहेत. विजयासाठी झुंजणाऱ्या खेळाडूंच्या या कथा आहेत. जीवनातील अडथळे पार करून यशस्वी ठरलेल्या खेळाडूंच्या कथा या संग्रहात आहेत, पाथरवट समाजातील मीना आशियाई स्पर्धेत दुसरी येते. गुन्हेगारी जगतातील एका शार्प शूटरचे राष्ट्रीय खेळाडूत रूपांतर होते. तर मधुमेहासारख्या आजाराने त्रस्त असणारा बॅडमिंटनपटू यश संपादन करतो. पिचलेल्या समाजातील उपजत गुणवत्तेचा अन्वयार्थ या संग्रहातून प्रकटला आहे.

याबरोबरच या कथांमधून खेळाडूंच्या जीवनातील दुसऱ्या बाजूचेही चित्रण आहे. जिंकण्यासाठी ते वाट्टेल ते करत राहतात. असूया, जीवघेणी स्पर्धा आणि अपेक्षित यश ज्यावेळी मिळत नाही त्यावेळी ते प्रत्यक्ष कोलमडून पडतात. आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्षातले आपले सौंदर्य आणि खेळ यांच्या काचात अडकलेल्या प्रतिमा आहेत. तर 'बंद लिफ्ट' सारख्या कथेत नजीकच्या काळातील भारतातील दोन महान खेळाडूंच्या विश्वावर आधारित कथा आहेत. या संग्रहातील कथासूत्रांना आणखी एक पदर आहे. तो म्हणजे महिला खेळाडूंच्या भावविश्वाच्या कथा. महिला खेळाडूंकडेही समाज भेददृष्टीने पाहतो. क्रीडाजगतातील 'रन बेबी रन' या कथेतील महिला ॲथलेटिक खेळाडू व तिच्या प्रशिक्षकाच्या अनोख्या विश्वाची, शोकात्म संवेदनेची कथा आहे. तिला मिळणाऱ्या दुय्यमत्वाची वागणूकच या कथांमधून साकारली आहे. या खेळाडू यशस्वी झाल्या तरी समाज त्यांच्याकडे मादी, पत्नी, प्रेयसी रूपातच पाहतो. या जाणीवविश्वाच्या या कथा आहेत.

'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' (२०१३) हा देशमुख यांचा वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार करणारा कथासंग्रह. स्त्रीभ्रूणहत्येविषयक जाणिवेचे सूत्र या संग्रहामध्ये आहे. समकालीन वास्तवातील एका महत्त्वाच्या गंभीर स्वरूपाच्या भयकारक विषयाकडे लक्ष वेधले आहे. सामाजिक जीवनातील या प्रश्नास कथांमधून सजीव केले आहे. भारतीय समाजात स्त्रीकडे नेहमीच गौणत्वाने पाहिले गेले आहे. आधुनिकीकरणाच्या टप्प्यावर या समाजाने एक विचित्र असे समाजवास्तव आकाराला आणले. समाजाने चुकीच्या धारणा तयार केल्या आहेत. मुलगा हा वंशाचा दिवा, कुलदीपक, म्हातारपणाची

काठी असे निरर्थक समज तयार झाले आहेत. लिंग-चाचणी ही चांगल्या कामासाठी निष्पन्न झालेली वैज्ञानिक गोष्ट. मात्र त्याआधारे असंख्य निरपराध मुलींची हत्या राजरोस सुरू आहे. अशा विचित्र आकाराला आलेल्या समाजशास्त्र वास्तवाची कैफियत या कथांमधून मांडली आहे. पुरुषी श्रेष्ठत्वाच्या भावनेने हे आधुनिक ज्ञानाच्या आधारे हत्यासत्र चालू आहे. या विविध मालाकथांमधून स्त्रीभ्रूणहत्येविषयीचे चित्र केले आहे. वर्तमानात आणि भविष्यात अमानवी स्वरूपाचा विषम समाज आपण रचत आहोत याचे गंभीर भान या कथा देतात.

गर्भातच मारल्या गेलेल्या अनेक अनाम कळ्यांचे व त्यांच्या मातांचे आक्रोश या कथांमध्ये आहेत. 'लंगडा बाळकृष्ण' या कथेत प्रतीकात्मक स्वरूपात या स्त्रीभ्रूणहत्येच्या क्रौर्याची परिसीमा काय असू शकते याचे खोलवरचे भेदक असे चित्रण आहे. या कथाचित्रणाला समकाळातील सत्यघटनेचे संदर्भ आहेत. चिमण्या गर्भाला नाहीसे करण्यासाठी डॉक्टर पतीने दवाखान्यात दोन कुत्री बाळगलेली असतात. मात्र प्रत्यक्ष स्वत:च्याच मुलाचा लचका ही कुत्री तोडतात त्यावेळी डॉक्टर कुत्र्यांवर गोळ्या झाडतात. 'केस स्टडीज' या अनोख्या कथेत भविष्यात येऊ घातलेल्या सामाजिक समस्येचे चित्रण आहे.

१९९१ - कांद्यापोह्याची सेंचुरी, २०११ - नकाराचा सिक्सर पण मुलीकडून व २०३१ - किंवा नंतरचं दशक गे-वरवधू सूचक मेळावा या क्रमाने विषम समाजरचना तयार होते आहे. विवाहसंस्थेचा प्रश्न किती बिकट होईल याची सूचना या कथेत आहे. भारतभूमी ही लँड विदाऊट डॉटर्स होते आहे याची जाणीव या सर्व कथा देतात. 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' कथेत पोटातल्या मुलीचा आपल्या आईबरोबरचा संवाद आहे. ती मुलगी आईला म्हणते, ममा, तू सावित्रीची लेक होतीस. आहेस, पण तुझा नवरा - माझा बाप-पपा ते कुठे ज्योतीरावाचे वारस आहेत? विचारानं ते तर जुन्या काळातले सरंजामवादी व आजच्या काळातले भांडवलदार आहेत. ज्यांच्या लेखी स्त्री ही एक क्रयवस्तू आहे आणि तिचं मूल्य नगण्य आहे. ती पुरुषांना हवी तेवढीच, तेवढ्या प्रमाणात, मालकी हक्कानं हवी बस. या विचारदृष्टीचा प्रभाव त्यांच्या या सबंध कथांवर आहे. या कथेतील मुलगी शेवटी म्हणते, 'ही कथा वाचून काही पुरुषांच्या डोळ्यात अंजन पडलं तरी माझ्या न जगलेल्या जन्माचं सार्थक होईल.' असा या सर्व कथेचा हेतू आहे. या समस्याप्रधान विचारकथा आहेत. देशमुख हे कोल्हापूरला जिल्हाधिकारी असताना 'सेव्ह द बेबी गर्ल' हे अभियान राबविले होते. या उपक्रमाद्वारे समाजात जाणीवजागृती होण्यास मदत झाली होती. या थीमबेस्ड कथांमधून स्त्रीभ्रूणहत्येची यंत्रणा, त्यातील बारकावे व समाजाची मानसिकता याचे बारकाईने चित्रण आले आहे. बदलत्या मानसिकतेतून व विकृत हव्यासाचा भयावह आलेख या कथांत आहे.

## ४.

लक्ष्मीकांत देशमुख यांचे कादंबरीवाङ्मय हे विविधस्वरूपी आहे. गेल्या दोन-एक दशकात त्यांच्या सहा कादंबऱ्या प्रकाशित आहेत. समस्याचित्रण, राजकीय जाणिवा ते आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे चित्रण असे विविध विषय त्यांच्या कादंबऱ्यातून चित्रित झाले आहेत. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या सलोमी, अंधेरनगरी, होते कुरूप वेडे, ऑक्टोपस, इन्किलाब विरुद्ध जिहाद आणि हरवलेले बालपण या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. या कादंबऱ्यांतून विविध प्रकारची आशयसूत्रे व्यक्त झाली आहेत. दीर्घकाळ प्रशासकीय क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे. आपल्या अवतीभोवतीच्या जगातून आपल्या कादंबऱ्यांचे विषय त्यांनी निवडले आहेत. 'मी माणसं वाचणारा लेखक आहे' असे त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. तद्वत आपल्या दीर्घकाळाच्या प्रशासकीय सेवाकार्यकाळात त्यांना जे अनुभव आले त्या अनुभवाधारित या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातून प्रशासनातील व राजकारणातील महत्त्वाच्या जाणिवांचे प्रकटीकरण झाले आहे.

त्यांच्या या कादंबऱ्यांच्या आशयसूत्रांचे तीन सूत्रात विवरण करता येईल. सलोमी व हरवलेलं बालपण या कादंबऱ्यातून सामाजिक समस्येचे चित्रण मांडले आहे. ऑक्टोपस व अंधेरनगरी या दोन कादंबऱ्या समकालीन प्रशासन विषयावरच्या आहेत. तर एक वेगळ्या आणि अनोख्या विषयाची मांडणी करणाऱ्या बृहद कादंबरीत वेगळा विषय 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' मध्ये मांडला आहे. मराठी कादंबरीत राजकीय जीवनाचे चित्रण फारसे प्रभावीपणे आलेले नाही. वास्तविक पाहता राजकीय जाणिवा ह्या मानवी जीवनातील एक महत्त्वाचा भाग आहेत. सामाजिक जीवनातील राजकारणाचे ताणेबाणे, त्यातील सूक्ष्मता कादंबरीत मराठी लेखकांना फारशी आणता आलेली नाही आणि आली तरी ती पृष्ठस्तरावरून कादंबरीचे नेपथ्य वा पार्श्वभूमी म्हणून आलेली आहे. राजकारणाचा खोलवरचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्या मराठीत अपवादानेच आढळतात.

सलोमी आणि दौलत (१९९०) या त्यांच्या दोन लघुकादंबऱ्या. या दोनही कादंबऱ्यांतून देशमुख यांनी वेगळे विषय मांडले आहेत. सलोमी या साठेक पृष्ठांच्या लघुकादंबरीत एका मुस्लीम बंडखोर तरुण स्त्रीच्या वाताहतीची कहाणी सांगितली आहे. मराठीतील लोकप्रिय लेखक बाबा कदम यांची छोटेखानी स्वरूपाची प्रस्तावना या कादंबरीस आहे. सलोमीची शोकान्त करुण अशी ही कहाणी आहे. आधुनिक काळातही मुस्लीम स्त्रियांना स्वातंत्र्याचा अवकाश उपलब्ध नाही. स्वत:च्या मनासारखे निर्णय त्यांना घेता येत नाहीत. अशा वेळी त्यांच्या मनाची होणारी पराकोटीची कुचंबणा हा या कादंबरीचा विषय आहे. सलोमीच्या २८ वर्षातील पूर्वकाळातील नोंदी या कादंबरीत आहेत. धर्मांध, रूढी रिवाजांचे चित्रण आहे. तर त्याच काळातील नव्या सामाजिक जागरणाच्या अवकाशाचेही चित्रण तीमध्ये आहे. पितृसत्तेची दहशत आणि

सामाजिक नियमनात स्त्री अंतिमत: बळी पडते. तिच्या शारीर व मानसिक बळी पडण्याचे संवेदन या कादंबरीत आहे. अन्वर बरोबर अनिच्छेनेच सलोमीला लग्न करावे लागते. त्याच्याकडून तिचा छळ होतो आणि तिला तलाकही दिला जातो. पुढे ती काही स्त्रियांच्यासाठी जागृतीचे काम करते. परंतु पुढे तिचा अरब राष्ट्रातील एक वृद्धाशी निका लावला जातो. मुस्लीम कुटुंबातील स्त्रीच्या केविलवाण्या जगाची कैफियत या कादंबरीत आहे. समकालीन जीवनातील रझिया पटेल यांच्या सिनेमाबंदी चळवळीची पार्श्वभूमी या कादंबरीत आहे. सलोनीचे हे आत्मनिवेदन आहे. पत्रात्मक तंत्राचा वापर या कादंबरीत आहे. मुस्लीम जीवनाचा, संस्कृतीचा व भाषेचा चांगला वापर या कादंबरीत आहे.

'दौलत' या कादंबरीत महाराष्ट्रातील दलित तरुण व मारिया या निग्रो तरुणीच्या प्रेमकहाणीचे चित्रण आहे. मात्र या प्रेमकहाणीस वर्णभेदाची व रंगभेदाची पार्श्वभूमी आहे. पत्रशैलीचा प्रभाव या कादंबरीवर आहे. माणूसपण नाकारणाऱ्या भारतातील जातवास्तवाची पार्श्वभूमी या चित्रणास आहे. मारिया ही समाजशास्त्राच्या संशोधनासाठी भारतात सहा महिन्यासाठी आलेली आहे. या काळात तिची दलित चळवळीतील अभ्यासू कार्यकर्ता दौलत कांबळेशी ओळख होते व ओळखीचे रूपांतर प्रेमात होते. दौलतच्या मनात अंतर्द्वंद्व आहे. तिच्यासोबत जाण्याचा निर्णय काय घ्यावा याबद्दलचा. एका बाजूला वडिलांनी समाजासाठी काम करण्याचा दिलेला सल्ला, आपला अभावग्रस्त समाज आणि दुसऱ्या बाजूला प्रेम याच्या काचात तो अडकलेला आहे. जातमुक्तसमाजाच्या तो प्रतिक्षेत आहे. पत्रसंवादात दोन देशातील सामाजिक विषमतेचे सूत्र ते ऐकमेकांना सांगतात. दौलत भारतातील गुंतागुंतीच्या तीव्र दुखऱ्या जातवास्तवाची माहिती तिला देतो. मनातील या जाणिवेमुळे तो प्रेमाचा त्याग करतो आणि भारतातच बाबासाहेबांच्या तिसऱ्या पिढीचा कार्यकर्ता म्हणून राहण्याचा तो निर्णय घेतो. 'छोड दे सारी दुनिया किसी की लिए। ये मुनासिब नही आदमी के लिए। प्यार से भी जरुरी कई काम है। प्यार सबकुछ नही आदमी के लिए। हे गाणं तो ऐकतो आणि त्यांच्या मनातील द्वंद्वाला नवी दिशा मिळते. समाजबदलासाठी आणि जातमुक्तीसाठी तो इथेच राहण्याचा निर्णय घेतो.

देशमुख यांना प्रेमापेक्षा देश व समाजकार्य महत्त्वाचे वाटते, या विचारसूत्राचा आविष्कार करणारी ही कादंबरी आहे. ती एकरेषीय स्वरूपाची आहे. दोन व्यक्तींच्या परस्परसंबंधातून ती उलगडते. जातीय वास्तवाचे तीव्र स्वरूपाचे ताण तीमध्ये नाहीत. पृष्ठस्तरावरच ते राहातात. वाचकाचे लक्ष दौलत आणि मारिया यांच्या प्रेमकथेकडेच वेधून राहातात. कादंबरीत पत्रतंत्राचा व हिंदी गाण्यांचा प्रभावी असा उपयोग केला आहे.

'हरवलेले दिवस' (२०१४) ही देशमुख यांची वेगळ्या विषयावरची कादंबरी.

कादंबरीलेखनात त्यांनी सतत नवेनवे विषय प्रवेशित केले आहेत. मराठी बालमजुरांच्या समस्याग्रस्त जीवनाचे चित्रण या कादंबरीत आहे. बालमजुरांच्या जगाची दाहकता किती तीव्र व भयकारक आहे यांची प्रचिती या कादंबरीत आहे. अरुण पालीमकर या मिशनरीवृत्तीच्या लढाऊ कार्यकर्त्याच्या नजरेतून बालमजुरांचे विश्व न्याहाळले आहे. बालमजुरीच्या प्रश्नाला किती कंगोरे आहेत याचे समाजशास्त्रीय संवेदन या कादंबरीत आहे. साधारणत: चारेक वर्षाच्या कालावकाशाचे चित्रण या कादंबरीत आहे. स्वत: अरुण बालमजूर होता. कुटुंबातील टोकाच्या भांडणामुळे तो परागंदा होतो. तो शिवकाशीच्या एका फटाके फॅक्टरीत काम करतो. तिथूनही कसाबसा जीव वाचवून पुन्हा आपल्या शहरात येतो. तो 'स्वप्नभूमी' ही बालहक्कासाठी लढणारी संस्था स्थापन करतो. यासाठी शहरातील या प्रश्नासाठी व मुलांसाठी तो झटत राहतो. दुकाने, कारखाने, वीटभट्टी, हॉटेलमधून काम करणारी मुले व त्यांचे विश्व या कादंबरीत आहे. शारीरिक व मानसिक पातळीवर त्यांचे पराकोटीचे शोषण होते. समाजाच्या अत्याचाराचे ते बळी होतात. त्यांचे बालपण व जीवनातील आनंदमयता हरवून जाते. वेठबिगार म्हणून त्यांना वागविले जाते. राज्यकर्ते, प्रशासन व मुजोर मालकवर्ग यामध्ये सहभागी असतो. त्यांचे हितसंबंध असतात. अनेक अनाम मुलांचे मूक आक्रोश संवेदनहीन समाजाला ऐकू येत नाहीत. एक तर तो केवळ निर्ढावलेला आहे. याप्रकारची व्यवस्था ही जणू काही मुलांची यातनागृहेच आहेत. या साऱ्या प्रश्नासाठी अरुण काही मित्रांना बरोबर घेऊन बालमजुरांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम घेतो. त्यात त्याला यशही येते. सतत आपल्यातला लढाऊपणा जिवंत ठेवतो. बालमजुरांच्या कळवळ्यापोटी सहानुभावाने तो हे करत राहातो. त्याची कहाणी 'हरवलेले दिवस' मध्ये आहे.

अरुण या मध्यवर्ती पात्राच्या चित्रणातून कादंबरीची संहिता घडते. विविध घटनाप्रसंगातून व त्यांच्यातील चर्चेतून कादंबरीचे कथन आकाराला आलेले आहे. बालमजूर, झोपडपट्टी, बूटपॉलिश करणारी मुले, कारखान्यात, हॉटेलात काम करणारी मुले यांचे बारकाईने चित्रण या कादंबरीत आले आहे. त्याचबरोबर प्रशासनव्यवस्थेचेही या जीवनाकडे पाहण्याचे सूक्ष्मतऱ्हेचे चित्रण आहे. एका अलक्षित शोषित समूहाचे चित्रण या कादंबरीत आहे. भूत आणि वर्तमान यांच्या कालसंदर्भात ते केले आहे. बालहक्कासंदर्भात जे विविध कायदे झाले, त्यासंबंधी जाणीवजागृती झाली, त्या माहितीचा उपयोग कादंबरीत केला आहे.

जिल्हा प्रशासन व न्यायपालिकेतील राजकारणाचे चित्रण व त्यांच्या कादंबरीवाङ्मयाचा महत्त्वाचा संदर्भबिंदू आहे. 'ऑक्टोपस' ही महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे चित्रण करणारी कादंबरी आहे. आनंद पाटील या प्रामाणिक काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याच्या नजरेतून किडलेल्या भ्रष्टाचारी जगाचे विश्व या कादंबरीतून मांडले आहे. आनंद पाटील व भगवान काकडे यांच्या समांतर कथेतून या कादंबरीचे

आशयसूत्र अभिव्यक्त झाले आहे. कादंबरीत या दोन अनुभवसूत्रांच्या ताणांतून त्यास आकार प्राप्त झाला आहे. लेखकाने या कादंबरी रचितामध्ये एक मुख्य विचारसूत्र गृहीत धरलेले आहे. गेल्या तीस चाळीस वर्षात प्रशासनात भ्रष्टाचाराने प्रचंड थैमान घातले आहे. भ्रष्टाचारानं चहूबाजू व्यापणे हे लोकशाही कल्याणकारी व्यवस्थेला बाधा आणते आहे. संवेदनशील अधिकाऱ्यांची या व्यवस्थेत प्रचंड घुसमट होते आहे. या कादंबरी शीर्षकात 'ऑक्टोपस' हे एक रूपक योजिले आहे. ऑक्टोपस - समुद्रजीवांचे भक्ष्य सापडताच तो त्याला चहूबाजूंनी वेढून टाकते. ऑक्टोपस बाह्यरूपाने नाजूक आणि मृदू दिसतो. मात्र आपले भक्ष्य पायांनी पकडून तो त्या जीवाला गिळंकृत करतो. तद्वत भ्रष्टाचारात गुंतलेल्यांना भ्रष्टाचाराचे हे जग वरून मोहक वाटते. मात्र आतून त्याची सर्वव्यापक गिळकृंतता लक्षात येत नाही. तसेच या भ्रष्टाचाररूपी ऑक्टोपसने भारतीय समाजाला चहूबाजूने वेढून टाकले आहे. या मूल्यभानाचा आविष्कार ही कादंबरी करते.

या विचारसूत्राचा आविष्कार करण्यासाठी लेखकाने प्रशासनातले हे जग सरळ दोन रंगात न्याहाळले आहे. आपल्या म्हणण्याच्या प्रतिपादनासाठी काळ्या आणि पांढऱ्या रंगात त्या जगाची निर्मिती केली आहे. कादंबरी संरचनेतील कथासृष्टीपासून ते पात्रे, घटना, प्रसंग यावर निवेदकाने कल्पिलेल्या मूल्यभावाचा गडद प्रभाव आहे. एका आदर्शवादी भूमिकेतून या साऱ्या कथासृष्टीकडे पाहिले गेले आहे. या आदर्शवादी भूमिकेचा वारंवार उच्चार कादंबरीभर आहे. उपभोगतावादी मूल्यऱ्हासाच्या राजकारणाची व प्रशासनातील संगनमताच्या जुटीची ही कहाणी आहे. आजच्या भ्रष्टाचारी काळाचा युगधर्मच यातून सांगितला गेला आहे. या कादंबरीत या भ्रष्टाचारी जगाच्या चित्रणांबरोबर कुटुंबजीवनातील व प्रशासनातील अनेक ताण आहेत. तरुण मुलांच्या शिक्षणाचे व त्यांच्या करिअरचे जग आहे. यात तडजोडवादी भूमिकांचे चित्रण आहे. भगवान काकडे आपल्या मुलाच्या वैद्यकीय शिक्षणासाठी व त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या डोनेशनसाठी तो पालकमंत्र्याशी तडजोड करतो. नोकरीत गैरमार्गाने मिळणाऱ्या पैशाची जागा पत्करतो.

सिनेमॅटिक वर्णनाच्या अंगाने या कादंबरीचे रूप घडले आहे. विशेषत: भगवान काकडेची कथा ही या कादंबरीत महत्त्वाचा संदर्भबिंदू आहे. त्याच्या या काळातील आयुष्यक्रमात ज्या घटना घडतात त्या योगायोगाच्या व आकस्मिक नाट्य निर्माण करणाऱ्या आहेत. त्याची पत्नी भ्रष्टाचाराचा आरोप आल्यामुळे भगवान काकडेला सोडून निघून जाते. तेही ज्याने भगवानला या प्रकरणात गुंतवले त्याच्याकडे. तो उस्मानाबादला येतो त्यावेळी त्याला आधार देते ती रुक्मी. त्याच्या गावातीलच आयुष्यातील दुर्दैवी घटनेमुळे वेश्या म्हणून जगत असलेली. भगवानचा मुलगा आनंद हुशार, दहावीला पहिला नंबर आलेला. रस्त्यात एका गाडीकडून त्याला अपघात.

गाडीत त्याची पूर्वीची आई असणे, तिच्यातला वात्सल्यभाव जागृत होणे आणि त्याचे तिला परतवून लावणे अशा अनेक योगायोगाच्या घटना कादंबरीत घडतात. तसेच कादंबरीतील घटना, प्रसंगांना फार वेग आहे, गती आहे. या कादंबरीत घटना - प्रसंगातील धावती दृश्यमिती मोठ्या प्रमाणात आहे. एकूणच भ्रष्टाचाररूपी प्रशासनातील व्यवस्थेचा पट या कादंबरीतून साकार झाला आहे. तडजोडवादी भ्रष्ट व्यवस्थेचा विजय यात होतो. भ्रष्टाचाररूपी किडलेल्या व्यवस्थेला शरणागती पत्करणाऱ्या समूहजाणिवेचा आविष्कार या कादंबरीत आहे. तसेच आनंद पाटलाच्या कृतीतून नव्या पर्यायाचा शोधही आहे.

'अंधेरनगरी' (१९९४) ही त्यांची दुसरी कादंबरी. राजकारण व प्रशासनातील एका वेगळ्या पैलूवर प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे. नगरपालिकेच्या सत्ताकेंद्राच्या प्राप्तीचा संघर्ष या कादंबरीत आहे. सर्वतऱ्हेच्या कपटनीतीचा अवलंब सत्तासोपानासाठी कसा केला जातो त्याचे तीव्रतर चित्रण या कादंबरीत आहे. राजकारणातील सूक्ष्म तपशीलातून सत्तासंघर्षाचे विश्व या कादंबरीतून साकार झाले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या तीनेक दशकात जे ध्येयवादाचे, साधनशुचितेचे राजकारण, समाजकारण धुळीला मिळाले आहे. त्याची जागा आता केवळ स्वार्थप्रेरित राजकारणाने घेतली आहे. कादंबरीची सबंध सूत्र हे नगराध्यक्षपदाच्या सत्ताकेंद्रावर खिळलेले आहे. त्याच्या भोवतीचे विविध सूत्रे समांतरपणे व्यक्त होतात. मात्र अंतिमत: ते सत्तेच्या खुर्चीभोवती पिंगा घालून तिथेच विराम पावतात. सत्ताप्राप्तीसाठी साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब केला जातो. उद्या पुन्हा हाच खेळ याप्रमाणे पुन्हा एकदा राजकारणाचा नवा खेळ आकाराला येतो. त्या कपटनीतीच्या अंधेरनगरीचा शोध या कादंबरीत आहे. नगरपालिकेतील सत्तासंघर्षाला किती विविध तऱ्हेचे कंगोरे असतात याची प्रचिती या कथनसूत्रात आहे. राजकीय गणिते, समाजकारण, जातकारण, प्रदेश अस्मिता ते सूडनाट्याची व्यूहरचना या कादंबरीत आहेत. वरवर हा लालाणी व पाटील यांच्यातील सत्तासंघर्ष दिसत असला तरी यामध्ये अनेक घटक सक्रीय असतात. समान हितसंबंधाचे धागे गुंतलेले असतात. सत्ताप्राप्तीच्या आंतरिक वास्तवाचा वेध या कादंबरीत आहे.

Every thing is fair in love, war and politics या विचारसूत्राचा आविष्कार या कादंबरीत आहे. राजकारण माणसाला निर्घृण व कठोर बनविते या जाणिवेचा आविष्कार कादंबरीतून घडला आहे. या कादंबरीचा लक्षणीय विशेष म्हणजे नगराध्यक्षपदाचे सत्तापद केंद्रस्थानी ठेवून त्याच्या प्राप्तीचे राज्यकर्त्यांमध्ये चाललेले विविध मार्ग ध्वनित झाले आहेत. राजकीय जाणिवांचे फार बारकाईचे संदर्भ या कादंबरीत आहेत. यासाठी अनेक पात्रांची निर्मिती केली आहे. ही पात्रे या सत्तासंघर्ष नाट्यात विविध भूमिका बजावतात. सहभागी होतात. राजकीय चर्चित विश्वाचा भाग त्यामध्ये आहे.

तीन वर्षांच्या राजकीय कार्यकाळाचे त्यातील घडमोडींचे वेगवान चित्रांकन या कादंबरीत आहे.

'इन्किलाब विरुद्ध जिहाद' (२००४) ही लक्ष्मीकांत देशमुख यांची वेगळ्या विषयावरची कादंबरी. मराठीत दीर्घ अशा कालावकाशाचे चित्रण असणाऱ्या कादंबऱ्या फारशा नाहीत. वास्तविक कादंबरीसारख्या साहित्यप्रकारात मानवी जीवनाचे त्याच्या दीर्घ अशा कालावकाशाचे चित्रण करण्यास फार मोठा अवसर असतो. मात्र अशा दीर्घ पल्ल्याच्या कादंबऱ्या मराठीत फारशा नाहीत. 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या जवळपास साडेनऊशे पृष्ठांच्या कादंबरीत प्रदीर्घ अशा अफगाणिस्थानमधील धर्मयुद्धाचे चित्रण आले आहे. अफगाणिस्थानमधील विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील अर्धशतकाचा पट तीमधून चित्रित झाला आहे. भारतालगत वसलेल्या अफगाणिस्थानातील पन्नास वर्षांची राजकीय वाटचाल या कादंबरीत आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या आंतरराष्ट्रीय दहशतवादाने अधिक भयावह रूप धारण केले आहे त्या वास्तवाचे मराठी कादंबरीत प्रथमत:च आंतरराष्ट्रीय राजकारणाचे, तेथील सत्तासंघर्षाचे, बदलत्या समाजजीवनाचे व राजकारणाचे चित्र अभिव्यक्त झाले आहे.

कादंबरीतला प्रमुख संघर्ष आहे तो क्रांती विरुद्ध धर्मयुद्ध यांच्यातील. विशिष्ट प्रदेशातील सामूहिक मनाला व जीवनरीतीला विशिष्ट आकार प्राप्त झालेले असतात. अफगाणिस्थानात समूहजीवनावर व संस्कृतीवर धर्मभावनेचा मोठा प्रभाव आहे. आधुनिकीकरणाच्या एका टप्प्यावर अफगाणमधील बदलाला सामोरे जाताना मुळातल्या जिहादचा उद्रेक होतो आणि वणव्याप्रमाणे तो सर्वत्र पसरतो. या राष्ट्राचा काही काळ सोव्हियत युनियनशी संबंध येतो आणि मार्क्सवादी आधुनिकतावादी राजकीय विचारसरणीशी अफगाणमधील लोकांचा संबंध येतो. ही विचारसरणी रुजताना मूळच्या परंपरेतील मूळ आकारांना तडे बसतात. ते दुभंग होतात. मात्र चिवट अशा धर्मप्रेरणेमुळे ही सर्व माणसे धर्मसंस्काराला जवळ करतात व जिहादच्या वाटेने राज्यसंस्थेला आपलेसे करतात.

या कादंबरीतील जीवनचित्रणास बदलत्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संदर्भ आहे. अफगाणिस्थानातील समूहदर्शन आहे. संस्कृतिचित्रण आहे. कौटुंबिक स्थितीची वर्णने आहेत. लोभस आणि मोहक निसर्ग आहे. परंपरा आणि आधुनिकता यातील संघर्ष आहे. स्त्रियांच्या हालाखीच्या दु:खभऱ्या करुण कहाण्या आहेत.

या प्रकारच्या जीवनचित्रणासाठी देशमुख यांनी अनेकविध पात्रांची निर्मिती केली आहे. मुस्लीम पुश्तू कुटुंबातील समाजदर्शन तीमध्ये आहे. एकाच वेळी वास्तव आणि कल्पित यांच्यातील बेमालूम मिश्रण या कादंबरीत आहे. ही कादंबरी त्यांनी मोठ्या कष्टपूर्वक व व्यासंगपूर्वक रीतीने लिहिली आहे. विशेषत: दहशतवादासारख्या संवेदनशील विषयावर लिहिणे ही अवघड अशी बाब असते आणि तो विषय जबाबदारीच्या

भानातूनही लिहिला गेला पाहिजे. अशा प्रसंगी लेखकावर बाहेरचे अनेक दाब असतात. जवळपास आठेक वर्षाच्या कष्टसाध्य व्यासंगाने ही कादंबरी आकाराला आलेली आहे. यासाठी त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, संस्कृती व समकालीन घडामोडींवरील विपुल संदर्भसाधने वापरली आहेत. विशेषत: या कादंबरीत अफगाणिस्थानातील समूहदर्शन आणि तेथील जीवनरीतीचे फार बारकाईने चित्रण आले आहे. एका अपरिचित अशा मुस्लीम जगाला सजीव करण्यासाठी लेखकाने फार मेहनत घेतलेली आहे. एका विशिष्ट संस्कृतीच्या जीवनचित्रणासाठी धर्म व संस्कृतीचा मोठा पट उभा केला आहे. तेथील वातावरण-निर्मितीसाठी व समूहदर्शनासाठी उर्दू-फारसी-पुश्तू भाषाचिन्हांचा मोठा वापर यामध्ये आहे. ओघवत्या व प्रवाही अशा गद्यलयीत कादंबरीतील कथन पुढे सरकते. एक धगधगता राजकीय दहशतवादाचा इतिहास इथे जिवंत केला आहे.

एकूणच लक्ष्मीकांत देशमुख यांचे कादंबरीविश्व हे विविधस्वरूपी आहे. तीमधून नवी आशयसूत्रे प्रकटली आहेत. प्रशासन जीवनातील जीवनचित्रण व राजकीय जाणिवांचे चित्रण ही त्यांच्या कादंबऱ्यांची महत्त्वाची उपलब्धी आहे. स्वत:च्या मूल्यविषयक धारणेतून या कादंबरीतील जाणीवसूत्रे आकाराला आली आहेत. तसेच 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या सुदीर्घ अशा बृहद कादंबरीत आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा हाताळलेला विषय हा मराठी कादंबरीला नवा आहे.

५.

देशमुख यांची दोन नाटके प्रकाशित आहेत. 'दूरदर्शन हाजीर हो' हे देशमुखांचे १९९९ साली प्रकाशित झालेले बालनाट्य. समकाळातील एका भेडसावणाऱ्या प्रश्नाधारित हे नाटक आहे. लहान मुले इडियट बॉक्स नामक टी.व्ही.च्या आहारी गेल्यामुळे किती गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत ते या नाटकातून सांगितले आहे. मराठवाड्यातील सेलू गावात या नाटकाचे कथानक घडते. या शतकातल्या लहान मुलांच्या जीवनातील टी.व्ही.रूपी सर्वात मोठ्या शत्रूने कसा धुमाकूळ घातला आहे. त्यासाठी नाटकात एक अभिनव अभिरूप न्यायालयात टी.व्ही. विरोधात खटला चालू ठेवला. तमाशातील बादशाह व दिवाणजी वकिलांची भूमिका धारण करून हा प्रश्न चर्चिला आहे. टी.व्ही. व सिनेमांच्या आहारी गेलेल्या मुलांची व त्यांच्या पालकांची मानसिकता, त्याचबरोबर समांतर काही अल्पशी मुले ज्ञान मनारंजनासाठी आवश्यक तेवढा टी.व्ही. पाहणारी मुले आहेत. सर्वांनी एकत्र येऊन संस्कारक्षम तरुण पिढी घडविण्यासाठी एकसूत्री काम करायला हवे असा संदेश दिला आहे. एका आदर्शवादी भूमिकेतून या प्रश्नाकडे या नाटकाद्वारे पाहिले आहे.

देशमुख यांचे 'अखेरची रात्र' हे नाटक २०१४ साली प्रकाशित झाले. दोन अंकी या नाटकात पडद्यावरील एका कलावंताची शोकात्मकथा सांगितली आहे.

देशमुख यांच्या एकूण लेखनविषयात चंदेरी दुनियेतले विषय बऱ्याच वेळा आवृत्त झाले आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीतील गुरूदत्तच्या जीवनाधारित हे नाटक बेतलेले आहे. गुरू आणि प्रतिभेच्या असफल प्रेमाची ही शोकात्म कथा आहे. गुरू, प्रेरणा, प्रतिभा व अब्बास यांच्या जगण्यातून नाटकाचे आशयसूत्र उलगडते. गुरू या दिग्दर्शकाच्या आयुष्यातील चढउतार तीमध्ये आहेत. वैयक्तिक आयुष्य आणि कला यांच्या द्वंद्वात अडकलेल्या कलावंताची ही कैफियत आहे. पत्नी आणि ती यांच्या परस्परसंबंधातून दुभंग झालेल्या व्यक्तीची ही कैफियत आहे. सामाजिक नियमनांमुळे व्यक्तिमनातील उत्कट प्रेमापासून रहाव्या लागणाऱ्या अलिप्ततेतून येणारी परात्मता तीमध्ये आहे. क्रमश: गुरू या गर्तेत कोसळत जातो व अखेरीस मद्याच्या धुंदीत कांपोजच्या गोळ्या खाऊन मरणाला सामोरा जातो. देशमुखांनी या नाटकास 'अखेरची रात्र' असे अर्थपूर्ण नाव दिले आहे. एका कलावंताची प्रेमाअभावीची तीव्र, खोलवरची घुसमट, आंतरिक वेदना प्रभावीरीत्या आविष्कृत केली आहे. चित्रपटाच्या मायानगरीतील कलावंताच्या परस्परसंबंधाच्या माहोलाचे चांगले चित्र या नाटकात उभे केले आहे. चंदेरी दुनियेतील हिंदी गाण्यांचा, संवादांचा व काव्यात्मतेचा प्रभावी वापर या नाटकात आहे.

६.

या संग्रहात देशमुख यांनी लिहिलेल्या काही प्रवासवर्णनपर चार लेखांचा समावेश केला आहे. मेघालयातील चेरापुंजी या जगातल्या सर्वांत जास्त पाऊस पडणाऱ्या ठिकाणी भेट दिल्याचे कथन 'चिंब चिंब चेरापुंजी' या लेखात आहे. देशमुख यांच्या प्रवासकथनातील हा एक आगळा वेगळा असा ललित अनुभव आहे. भारतीय प्रशासन सेवेत प्रशिक्षण कालावधीत त्यांनी या स्थळाला भेट दिली त्याचा अनुभव या लेखात आहे. एका बाजूला चेरापुंजीबद्दल मनात वसत असलेल्या रोमँटिक भावना आणि प्रत्यक्षातले चेरापुंजी याचे विहंग दर्शन या लेखात आहे. या प्रदेशातील समूह, प्रदेश, भाषा व जीवनशैलीबद्दलची निरीक्षणे आहेत. तिथल्या सामाजिक स्थितीबद्दलची वर्णने आहेत. मातृसत्ताक कुटुंबव्यवस्थेची माहिती आहे. त्याचबरोबर निसर्ग, विविध मनोहरी रमणीय स्थळे यांचे वर्णन आहे. निसर्गनिर्मित लेणी, धबधबे, गुहांच्या सुंदरतेची वर्णने आहेत. शुभ्र नितळ पाण्याचा नोहकली-काई नावाच्या धबधब्याचे वर्णन आहे. या धबधब्याला नोहकली-काई हे नाव का पडले याची माहिती देणारी करुण भयकारक अशी मेघालयी दंतकथा दिली आहे. मराठीतल्या चांगुणेच्या कथेशी नाते सांगणारी ही कथा आहे. कांचनगंगेचे अपूर्व दर्शन मात्र घेता आले नाही याची खंतही त्यांच्या प्रवासी मनाला आहे.

श्रीलंकेतील-रामबुख्ख्याना रेल्वे स्टेशनजवळील माओया नदीकिनाऱ्यावरील पिनावाल एलफंट ऑर्फनेज या हत्तीच्या अनाथ आश्रमास दिलेल्या भेटीचे कथन एका

लेखात आहे. मानवी सेवाभावीवृत्तीला कृतज्ञतापूर्वक दिलेली भावांजली या ललित लेखात आहे. पर्यटक म्हणून या आश्रमाला दिलेल्या भेटीचा वृत्तांत आहे. तो कोरडा, रूक्ष स्वरूपाचा नाही. प्राण्यांविषयीच्या सहानुभावाने लिहिला गेलेला आहे. त्या आश्रमातील शिस्त, देखभाल पाहून लेखकाचे मन भरून येते. तो त्यांचा होऊन जातो. सोंडेतून लहान हत्तींना दूध पाजताना पाहून, त्यांच्या डोळ्यातील तृप्ती पाहून मातृत्वाची वात्सल्यमूर्ती लेखकाच्या डोळ्यासमोर झळकते. हिरव्याकंच वृक्षराजीच्या पार्श्वभूमीवरील चमकत्या सूर्यप्रकाशात खळाळणाऱ्या लाटेत एका वेळी साठ सत्तर हत्ती जलक्रीडा करताना पाहून निवेदकाच्या डोळ्यांचं पारणं फिटतं. अशी अनुभूती तीमध्ये आहे. आश्रमातील दिवसभराची अनाथ हत्तीची देखभाल पाहून निवेदकाला मानवी भूतदयेबद्दल व करुणेबद्दल कृतज्ञता वाटते. प्रवासातील एका अनोख्या ठिकाणाबद्दलची भावस्थिती व त्यावरचे भाष्य या लेखात आहे.

'नायगारा-दि व्हाईस ऑफ गॉड' या लेखात अमेरिकेतील नायगारा या ठिकाणास भेट दिल्याचा वृत्तांत आहे. निसर्गाच्या अपूर्व आणि अद्भूत किमयेचे वर्णन आहे. या परिसराचा निवेदकाच्या मनावर जो ठसा उमटतो त्याचे हे निवेदन आहे. धबधबा, नदी व भवतालाचे काव्यात्म निवेदन आहे. जोडीने निवेदकाच्या मनातील कुतूहल, तौलनिक विचार यांचे प्रकटीकरण आहे. नायगाऱ्याच्या भव्यतेच्या व त्याच्या सौंदर्याच्या सूक्ष्म अशा नोंदी आहेत. गाईडने पुरविलेली माहिती आहे. तो परिसर पाहून निवेदकाला सर्वांगाला डोळे फुटल्याचा प्रत्यय येतो. संपृक्त भरलेपणाची प्रचिती येते. 'मेड ऑफ दि मिस्ट' नावाच्या बोटीत बसल्यानंतर गाईडने सांगितलेल्या थंडर जमातीची चित्तवेधक मिथककथाही सांगितली आहे. सामूहिक श्रद्धामनाने जोपासलेल्या या कथेने या प्रवासकथनाला एक वेगळे रूप प्राप्त करून दिले आहे. देशमुख यांच्या ललितलेखनाचा एक वेगळा आविष्कार म्हणून या ललितलेखनाकडे पाहता येते. वेगवेगळ्या निमित्ताने त्यांचा जो प्रवास घडला त्याची स्मरणचित्रे या लेखनात आहेत. स्थलवैशिष्ट्ये व त्यांचा मनावर जो ठसा उमटला त्याचे प्रत्ययकारी वर्णन या लेखनात आहे.

न्यूयॉर्क शहरातील हडसन नदीकाठी असणाऱ्या स्वातंत्र्य देवतेचे तेजस्वी शिल्प पाहिल्यानंतर निवेदकाच्या मनात जे विचार येतात ते 'स्वतंत्रते भगवती' या लेखात प्रकटले आहेत. एका अर्थाने या स्वातंत्र्य देवतेच्या शिल्पाशी केलेला हा संवाद आहे. स्वतंत्रता देवतेला उद्देशून व्यक्त केलेले हे मनोगत आहे. या तेजस्वी, पवित्र शिल्पासमोर नतमस्तक होताना निवेदकाच्या मनात तिचे काजळलेपणही लक्षात येते. जगातील वर्ण आणि रंगभेदाच्या भावनेने निवेदक चिंतेत आहे. मात्र २००४ साली बराक ओबामांच्या निवडीने हे काजळलेपण नाहीसे झाल्याची भावना आहे. तसेच अमेरिकेची विश्वात्मकता आणि समकाळातील तिचे दुटप्पी वागणे याबद्दलची खंतही व्यक्त केली आहे.

७.

देशमुख यांनी काही ललितगद्य लेखनही केले आहे. 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया' या ललितलेखनात देशमुख यांनी जीवनातील आनंदमयता व जगण्यावरचे प्रेम व्यक्त केले आहे. स्वत:च्या आयुष्यातील सुख-दु:खाचे प्रसंग सांगून अंतिमत: जीवनावरचे प्रेम व्यक्त केले आहे. पुस्तके, गाणी, कविता, साहित्य, निसर्ग आणि माणसे हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू राहिला असे या लेखात त्यांनी म्हटले आहे. हिंदी चित्रपटातील काही गाण्यांचे मुखडे घेऊन त्यांनी जीवनातली आनंदमयता व्यक्त केली आहे. 'कलरफुल' या ललितलेखात निवेदकाच्या मनात जी रंगांची दुनिया वसलेली आहे त्याचे निवेदन आहे. विशेषत: रूपेरी पडद्यावरील रंगप्रतिमांनी लेखकमनाचा पाठलाग केला आहे. या रंगप्रतिमांनी त्याला खिळवून ठेवले आहे. या मनातील रंगीबेरंगी दुनियेची ही सफर आहे. मनात दाटून आलेल्या रंगायन उत्सवाची शब्दरूपी उधळण या ललितलेखात आहे.

८.

या संपादनात देशमुख यांच्या 'झपाटलेपण ते जाणतेपण' व 'परभणी-कोल्हापूरचे दिवस' या दोन आत्मपर लेखांचा समावेश केला आहे. परभणी-कोल्हापूरचे दिवस या लेखात प्रशासकीय अधिकारी म्हणून या शहराची स्मरणचित्रे रेखाटली आहेत. त्यांच्यातील सर्जनशील आविष्काराला व समृद्ध व्यक्तित्वघडणीला परभणी महत्त्वाचे ठरले. प्रौढ साक्षरता अभियानाचा समन्वय प्रमुख म्हणून त्यांना आलेले विविध अनुभव कथन केले आहेत. यामागे आपण काही एक प्रमाणात देशऋण फेडल्याची भावना आहे. तसेच कोल्हापूरला कलेक्टर असताना केलेल्या विविध कामांचे निवेदन केले आहे. या दोन शहरांचे त्यांच्यातील रुजलेपण व गुंतलेपण त्यामधून व्यक्त झाले आहे. देशमुख यांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या या दोन शहरांविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे तर 'झपाटलेपण ते जाणतेपण' या आत्मपर लेखात स्वत:च्या जडणघडणीवर झालेले संस्कार आपल्या वाङ्मयनिर्मितीचे प्रेरणास्त्रोत व जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रांजळपणे सांगितला आहे.

९.

देशमुख यांनी काही वेगळ्या विषयावरील लेखन केले आहे. प्रशासन अधिकारी म्हणून वावरत असताना भोवतालच्या सामाजिक क्षेत्रांसंबंधीचे हे रिपोर्ताज शैलीतले लेखन आहे. निवडलेल्या विषयाचा सर्वांगाने वेध घेणे हा त्याचा हेतू आहे. २००० च्या 'साधना' दिवाळी अंकात त्यांनी 'देवबंदचं दारूल उलुम' हा लेख लिहिला. २००४ साली उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीवेळी सहाराणपूर जिल्ह्यातील

देवबंद येथे तीनेक दिवस त्यांचे वास्तव्य घडले. या काळात त्यांनी देवबंद येथील पूर्व आशियातील सर्वात मोठ्या मदरशाला भेट दिली. त्या भेटीचा वृत्तांत या लेखात आहे. दरवर्षी ७००० पेक्षा जास्त विद्यार्थी इस्लाम धर्मशास्त्र शिक्षणासाठी या मदरशात येतात. पारंपरिक धर्माचे शिक्षण या मदरशात दिले जाते. भारत व भारताबाहेरील अनेक मशिदीमधील अनेक मौलवी व उलेमा या मदरशातून प्रशिक्षित झालेले आहेत. या मदरशाची कार्यपद्धती व व्यवस्थापन त्यांनी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे व त्या निमित्ताने आपल्या मनातले विचार सांगितले आहेत. या मशिदीतील दिनक्रम व पारंपरिक शिक्षणाबद्दल लेखकाच्या मनात उद्‌भवलेले प्रश्नही त्यांनी मांडले आहेत. काही प्रमाणात नवे होत असलेले बदलही नोंदविले आहेत. मदरशातील पारंपरिक शिक्षण व आधुनिकीकरणाने जे पेच निर्माण झाले आहेत तो दृष्टिकोणही त्यांनी नोंदविला आहे. भारतातील एका मुस्लीम धर्मशिक्षणाचा, चळवळीचा ओघवता वेध या लेखात आहे. एका समाजाच्या धर्मशिक्षणाच्या स्थिती, कार्यपद्धती व त्यावरचे लेखकाचे चिंतन या लेखात आहे.

काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली या लेखात देशमुख यांनी एका राजकीय व सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषयाची मांडणी केली आहे. काश्मीरमधील एका प्रवासाच्या निमित्ताने या प्रदेशाविषयी त्यांच्या मनात जे विचार आले ते या लेखात मांडले आहेत. काश्मीरियतची संकल्पना इतिहास, संस्कृती व तत्त्वज्ञानाच्या आधारे त्यांनी मांडली आहे. काश्मीर लोकांची एतद्देशीय राष्ट्रवादी जाणीव सामाईक स्वरूपाचं भान आणि सांस्कृतिक मूल्यांची प्रखर जाणीव असलेली सहअस्तित्वाची जीवनशैली यात ते काश्मीरियतची संकल्पना पाहतात. काश्मीरियतच्या विकासक्रमात ज्या ऐतिहासिक घडामोडी घडल्या त्याचाही विचार ते करतात. ती सोळाव्या शतकापासून निर्माण झाली. त्याची पायाभरणी प्राचीन काळापासून होत आलेली आहे. देशभक्ती, बंधुभाव, देशीय संस्कृतीचा अभिमान व धार्मिक सहिष्णूता यातून काश्मीरी तत्त्वज्ञान व जीवनशैली निष्पन्न झाली. मुस्लिम राज्यकर्त्यांचा उदारमतवादी दृष्टिकोण आणि काश्मीरी भाषेतील तत्त्वज्ञान यातून ही संस्कृती आकाराला आली असे ते मानतात. काश्मीरमधील राजकीय, सामाजिक स्थित्यंतरे व सुफी परंपरेचा विस्ताराने निर्देश त्यांनी केला आहे. बाराव्या शतकातील संतकवयित्री लाल देड व नंद ऋषी यांच्या भक्तितत्त्वकवितेने काश्मीर जनभावनेचे भरणपोषण केल्याचे ते नोंदवतात. त्यांच्या वाङ्‌मयाचा परिचय करून देतात. मुस्लिम व पंडित यांच्यात असलेल्या कमालीच्या साम्यस्थळांचा ते निर्देश करतात. काश्मीरमधील भक्तिपरंपरा व जैनुद्दिन अबिदेन व सम्राट अकबराच्या सहिष्णू राजवटीने या संस्कृतीचा विकास केला. एकूणच आजच्या संवेदनशील प्रदेशाचा संस्कृतीचा विकास होऊन ती कशी आकाराला आली ते या लेखात त्यांनी मांडले आहे. काश्मीरी भाषा व वाङ्‌मय याविषयींची सूक्ष्म निरीक्षणे

तीमध्ये आहेत. काश्मीरियत संकल्पनेचा काहीसा ललित अंगाने वेध घेतला आहे. यासाठी नामवंत संस्कृती अभ्यासकांची मतेही नोंदविली आहेत.

या संग्रहात देशमुख यांनी शासकीय कर्मचारी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षणीय भाषण दिले आहे. मध्यमवर्गीय मराठी साहित्याच्या मर्यादा सांगून प्रशासकीय कर्मचाऱ्याच्या लेखनाचे वेगळेपण सांगितले आहे. मराठीतील प्रशासकीय अनुभवाधारित लेखनपरंपरा सांगून स्वत:च्या निर्मितीचा धांडोळा घेतला आहे. तसेच वाचनसंस्कृतीबद्दलचा विचार मांडला आहे.

१०.

प्रशासनविषयक लेखन हा देशमुख यांच्या एकूण लेखनाचा एक महत्त्वाचा आविष्कार आहे. ललित साहित्यातून तर त्यांनी याप्रकारचे चित्रणक्षेत्र मोठ्या प्रमाणात आणले. शिवाय इतरही प्रशासनविषयक वैचारिक स्वरूपाचेही लेखन त्यांनी केले आहे. याविषयावरची त्यांची 'प्रशासननामा' व 'बखर प्रशासनाची' ही दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. २००० साली दै. लोकमतमधून त्यांनी रविवार आवृत्तीसाठी 'इनसायडर' नावाने एक सदर लिहिले होते. तो पुढे 'प्रशासननामा' या नावाने प्रकाशित झाला. निबंध व कथा असा संमिश्र प्रकार असणाऱ्या लेखनातून देशमुखांनी प्रशासनातले विविध अनुभव सांगितले आहेत. चांगला लेखक प्रशासनातले अनुभवप्रदेश किती बारकाईने मांडू शकतो ते वैशिष्ट्य या लेखनात आढळते. जिल्हाप्रशासन हा या लेखनाचा केंद्रवर्ती विषय आहे. गावपातळी ते जिल्हा पातळीवरील प्रशासनाचे संदर्भक्षेत्र या लेखनात आहे. वास्तवदृश्य हे लेखन असल्यामुळे राजकारणातील, प्रशासनातील अनोळखी चेहरा वाचकांबरोबर आणण्यासाठी चंद्रकांत या कल्पित पात्राची निर्मिती केली आहे. चंद्रकांत हा संवेदनशील अधिकारी आहे. त्याच्या नजरेतून प्रशासनाचे जग न्याहाळले आहे. हे लेखकाचे मानसपात्र आहे. तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक समाजशील तो इनसायडरशी सतत संवाद साधतो. लेखकाने यात प्रशासकांना पगारी समाजसेवक (Paid Social Worker) म्हटले आहे. कल्याणकारी राज्यासाठी प्रशासक सकारात्मक दृष्टिकोनातून कसे काम करू शकतो याचे एक चित्र या लेखनात आहे. भारतीय प्रशासनाची ब्लू प्रिंट या लेखनात आहे. राज्यकर्ते व प्रशासन यातील गुंतागुंतीचे ताण या लेखनात आहेत, भ्रष्टता आहे, प्रशासनातील विविध गुंत्यांचे खोलवरचे दर्शन तीमध्ये आहे.

तसेच चांगले अधिकारी राज्यसंस्था व जनता यातील दुवे कसे होऊ शकतात, चांगले निर्णय घेऊन समाजशील कामे कसे करू शकतात याचे कथन आहे. संवेदनशील प्रसंगी जनमानस व समूहमानसशास्त्र माहीत असल्यामुळे निर्णय घेण्यातील तत्परता ते कसे दाखवतात, तसेच भारतीय जनमानसाचा प्रशासनाकडे बघण्याचा

दृष्टिकोण हा एकरंगी स्वरूपाचा आहे. त्या प्रशासनाचा सकारात्मक चेहराही या लेखनातून प्रकट झालेला आहे. प्रशिक्षण कालावधीतील राजांसारखे कर्तव्यनिष्ठ अधिकारी व वारकरी सहकारी अधिकारी यांच्या नैतिकतेच्या धाकाचे विवरण त्यामध्ये आहे. देशमुख यांच्या या ललित लेखनातून आणखी एका अंगाकडे लक्ष वेधले आहे, ते म्हणजे प्रशासनातील विषम उतरंडीकडे. प्रशासनातील भेदाची बाजूही त्यांनी सांगितली आहे. वरिष्ठ अधिकारी आणि कनिष्ठ अधिकारी यांच्यातले संबंध हे श्रेष्ठ कनिष्ठत्वाचे असतात. विशेषत: प्रशासनातही स्त्री कर्मचाऱ्यांकडे दुय्यमत्त्वाने, कनिष्ठत्त्वाने पाहिले जाते.

'बखर भारतीय प्रशासनाची' या ग्रंथात देशमुख यांचे भारतीयल प्रशासनावर आधारलेले लेखन आहे. भारतीय प्रशासनाचा पूर्वोत्तर वारसा ते समकालीन भारतीय प्रशासनव्यवस्था यावरचे विवरण आहे. क्रमश: प्रशासनव्यवस्थेत होत आलेले स्थित्यंतर, त्यातील गुंते, सामर्थ्य व तिसरा स्तंभ म्हणून तिने बजावलेली भूमिका यांचे दर्शन आहे. एका सनदी अधिकाऱ्याने प्रशासन व्यवस्थेकडे आतून पाहिलेले हे चित्र आहे. त्यामुळे त्याची विश्वासार्हता वाढली आहे.

एका ठिकाणी इनसायडर चंद्रकांतला म्हणतो, विवेकाची सुरी धारदार बनविली पाहिजे. आपण आपल्यापुरतं विकारी न होता विवेकी रहावं, वागावं या हेतूने प्रशासननामामधील लेखन घडलेलं आहे.

## ११.

वैचारिक गद्य लेखनाबरोबरच देशमुखांच्या मन:पिंडात नाटक व चित्रपट या कलांविषयीची एक स्वतंत्र जागा आहे. या कलांचा ते सातत्याने विचार करीत आले आहेत. देशमुख यांनी नाटक व चित्रपट यांच्याविषयी काही लेखन केले आहे. त्यापैकी काही लेखांचा समावेश या ग्रंथात आहे. त्यांनी काही चित्रपटाच्या पटकथाही लिहिल्या आहेत. त्यांच्या काही कथांवर आधारित चित्रपटनिर्मिती होते आहे. नाटक व चित्रपट हे देशमुख यांच्या विचारविश्वाचा, आस्थेचा भाग आहे. वेळोवेळी त्यांनी या विषयावर लेखन केले आहे. त्यांच्या ललितलेखनातून या क्षेत्राशी विषय ध्वनित झाले.

गिरीश कार्नाडांच्या भारतीय रंगभूमीवरील कामगिरीचा परामर्श घेणारा, 'गिरीश कर्नाड : भारतीय रंगभूचा एक जायंट' नावाचा दीर्घ लेख या संग्रहात आहे. जवळपास अर्धशतकभर भारतीय रंगभूमीवर वैशिष्ट्यपूर्ण नाटके लिहिणाऱ्या नाटककाराच्या सामर्थ्यस्थानाचा व वेगळेपणाचा विचार या लेखात आहे. गिरीश कार्नाडांवरील पुण्यातील तीन दिवसाच्या महोत्सवावरून त्यांना उपरोक्त विचार सुचले. कार्नाडांनी एकूण तेरा नाटके लिहिली. ती भारतभर प्रसारित झाली. देशमुख यांनी कार्नाड यांच्या नाटकाच्या वाङ्मयीन गुणवत्ता व प्रयोगरूपाबद्दलचे काही विचार मांडले आहेत.

कार्नाड यांच्या एकूण नाट्यक्षेत्रातील कामगिरीचे त्यांनी तीन सूत्रांमध्ये दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या नाटकातील आशयसूत्रे व विकासक्रम यांचा तीन टप्प्यांमध्ये विचार केला आहे. पुराणकथांचा नवा अन्वयार्थ मांडणारी नाटके, ऐतिहासिक नाटकातून उलगडणारे आजचे वास्तव आणि एकविसाव्या शतकातील आजच्या काळाची नाटके - या तीन परिप्रेक्ष्यातून कार्नाडांच्या नाटकांचे आकलन मांडले आहे. 'ययाति'पासून ते 'उणे पुरे एक शहर' या नाटकांबद्दलचे हे विवेचन आहे. नाट्यवाचनाची सूक्ष्म स्वरूपाची रीत त्यांनी इथे अवलंबिली आहे. या नाटकांबद्दलच्या काही नवे अन्वयार्थांचेही त्यांनी सूचन केले आहे. कर्नाडांच्या नाटकातील विविधस्वरूपी आशयसूत्रे, नाटककार म्हणून कर्नाडांनी पुराणकथांचा, इतिहासाचा व समकालीन वास्तवाचा लावलेला अन्वयार्थ देशमुखांनी नोंदविला आहे.

'परफेक्ट शॉट विरुद्ध इनपरफेक्ट लाईफ' या लेखात त्यांनी गुरुदत्तचा जीवनालेख मांडला आहे. गुरुदत्तच्या जीवनाविषयी व अखेरच्या काळाविषयी लोकांना एकप्रकारचे कुतूहल आहे. या कुतूहलापोटी अनेकांनी या विषयावर लिहिले आहे. देशमुख त्यांनी या लेखात गुरुदत्तच्या असफल शोकान्त जीवनाचा वेध घेतला आहे. द्वंद्वात कातरत गेलेला कलावंत असे त्यांनी त्याचे वर्णन केले आहे. गुरुदत्तच्या चित्रपट कारकीर्दीतील व खाजगी आयुष्यातील घटना समोर ठेवून त्याचा अन्वयार्थ लावला आहे. कलावंताच्या प्रेमाचा पेच तो सोडवू शकला नाही. अखेरीस तो मद्य व झोपेच्या गोळ्यांनी मरणाला सामोरा गेला. या त्याच्या शोकात्म आयुष्याचा पट उलगडण्याचा प्रयत्न देशमुखांनी केला आहे.

'मला प्रभावित करून गेलेला सिनेमा' या साधना साप्ताहिकाच्या विशेषांकात देशमुख यांनी 'धग' या चित्रपटाचा सामाजिक समस्याप्रधान चित्रपट म्हणून त्यांच्या मनावर जो ठसा उमटला तो या लेखात नोंदविला आहे. स्मशानात काम करणाऱ्या एका कुटुंबाची कथा 'धग'मध्ये आहे. उपजातीतल्या विषम भेदांची तीव्रतर जाणीव त्यामध्ये आहे. राष्ट्रपती पारितोषिकाने हा चित्रपट गौरविण्यात आला आहे. 'धग' ने का प्रभावित केले याची ते तीन कारणे सांगतात. अस्सल देशी सकस पटकथा, दिग्दर्शकानं मांडलेला जळजळता अनुभव आणि कलावंतांचा प्रभावी अभिनय. यात त्यांनी या चित्रपटाच्या प्रभावाच्या खुणा शोधल्या आहेत. भारतातल्या एका गंभीर सामाजिक प्रश्नाच्या मांडणीमुळे तो त्यांना भावला. मानवी जगणं व दु:ख याचे अनेक पैलू तीमधून चित्रित झाले आहेत. मनोरंजनप्रधान भारतीय चित्रपटापेक्षा सामाजिक व विचारप्रधान चित्रपटाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे.

१२.

एकंदरीत देशमुख यांच्या वाङ्मयीन कामगिरीचे स्वरूप वरीलप्रमाणे आहे.

कथात्म साहित्य, नाट्यलेखन, वैचारिक व ललित स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या एकूण साहित्याचे प्रातिनिधिक स्वरूपाचे हे संकलन आहे. त्यांचा लेखक म्हणून असणारा संवेदनस्वभाव व या काळाचा जवळचा संबंध आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उत्तम असा प्रशासक आणि संवेदनशील असा लेखक अशी दुहेरी भूमिका आहे. संस्कारशील व्यक्तिमनाचा उभयान्वय त्यांच्या ठायी आहे. तळागाळातल्या शेवटच्या माणसाच्या विकासासाठी ध्येयधोरणे राबविणे या रचनात्मक कार्यासाठी जास्तीतजास्त उपयोग करून घेणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी ते आहेत. प्रशासकीय सेवेत असताना तिथल्या विविधस्वरूपी अनुभवांचा अतिशय चांगला उपयोग देशमुख यांनी करून घेतला आहे. मराठीत इतक्या विपुलपणाने प्रशासकीय जीवनातले विषय क्वचितच आले असतील. त्यांच्या लेखनाची अनेक कथाबीजे त्यांच्या अनुभवसृष्टीत आहेत. या कथाबीजांचा विस्तार वेळोवेळी एक लेखक म्हणून देशमुख यांनी केला आहे. जिल्हा प्रशासन, न्यायपालिका ते प्रशासनयंत्रणेतील अनेक अनुभव त्यांच्या लेखनाचे विषय झालेले आहेत. पाणी टंचाई, महापूर, रोजगार हमी योजना, नागरी प्रशासन, ग्रामीण विकास, स्त्रीभ्रूणहत्या असे प्रश्न त्यांच्या कथात्म साहित्यात आहेत. या यंत्रणेतील बारकावे त्यामध्ये आहेत. 'लेखकाला हे अनुभव टिपकागदाप्रमाणे टिपून घेता आले पाहिजेत' असे त्यांनी म्हटले आहे.

जिल्हाधिकारी म्हणून जिल्हा प्रशासनातील विविध क्षेत्रांशी त्यांचा जवळून संबंध येतो. या पाहणीतून देशमुख अनेक विषय त्यांच्या कथा-कादंबऱ्याचे झाले आहेत. पृष्ठस्तरावरून सर्व काही आबादीआबाद असणाऱ्या या व्यवस्थेच्या तळाशी अनेकविध प्रकारचे गुंते असतात. समाजपयोगी अशा सेवाक्षेत्रातील अनेक गुंते देशमुख यांचे लेखनविषय झाले आहेत. सामाजिक दस्ताऐवजाचे स्वरूप या लेखनास आहे. तसेच रिपोर्ताज पद्धतीची प्रचिती या लेखनास आहे.

मुस्लीम जीवनसंस्कृतीचे चित्रण हा देशमुख यांच्या एकूण लेखनाचा आस्थेचा विषय आहे. त्यांच्या कथात्म व वैचारिक लेखनातून मुस्लीम जीवनासंबंधीचे विषय पुन्हा-पुन्हा आवृत्त झाले आहेत. भारतीय लोकजीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या या संस्कृतीबद्दलचे कुतूहल त्यांना आहे. ते जीवन समजून घ्यावे अशी भावना तीमध्ये आहे. आधुनिक काळात भारतीय समाजाचा एकजीव भाग असणाऱ्या समूहाकडे काहीसे विपरीतपणे पाहिले जाते. ते टाळून वस्तुनिष्ठपणे व सहिष्णुतादृष्टीने या जगाकडे त्यांनी पाहिले आहे. सलोमी, इन्किलाब विरुद्ध जिहाद या कादंबऱ्यात व अनेक कथांमध्ये या जीवनाचे चित्रण आले आहे. देशमुखांच्या या संस्कृतिप्रेमामागे मराठवाड्यातील निजाम राजवटीतील लोकजीवनाचा भाग असावा. बालपणीच्या घडणकाळातील व पुढेही सेवाकाळात निजाम राजवटीतील मुस्लीम संस्कृतीच्या खाणाखुणा, त्यांच्यावरील उर्दू वाङ्मयाची सावली, भाषेची जानपेहचान त्यामुळे

त्यांना समूहजीवनाच्या अंतरंगात डोकावता आले. त्याविषयीच्या आकर्षणामुळे ते सतत त्याकडे वळले असावेत, मुरूड, हैद्राबाद, सहारणपूर (उ. प्र.) व्हाया कारगिल, श्रीनगर, काबूल, कंदहार अशी भौगोलिक प्रदेशातील लेखन परिक्रमा आहे. स्थानिक मुस्लीम संस्कृतीपासून ते अफगाणमधील मुस्लीम जगाचा नकाशा तीमध्ये आहे.

सामाजिक जीवनाची समस्याचित्रणे हा एक त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. पाणी टंचाई, स्त्रीभ्रूणहत्या, बालमजुरी ते मुस्लीम स्त्रियांची दु:खे अशा समस्यांना तीमध्ये स्थान आहे. या प्रश्नांचा विविधांगी शोध त्यांनी ललित साहित्यातून घेतला आहे. एक जागृत लेखक म्हणून त्यांच्यात आजच्या काळाचा, समाजजीवनाचा निरीक्षक दडलेला आहे. स्वत: त्यांनी 'बखर लिहिणाऱ्या बखरकाराचा वारसा' आपल्यात असल्याचे म्हटले आहे. देशमुख यांच्या साहित्यातील विविध अनोख्या समाजजीवनाची समस्यांची ही दर्शने आहेत. अर्धशतकातील महाराष्ट्रातील काही जीवनक्षेत्राची ही समाजवृत्ते आहेत. वार्तांकने आहेत. प्रशासनातील काही सामाजिक अहवाल आहेत. ते कथात्मसाहित्यातून मांडले आहेत. ही समाजचित्रे त्यांनी रिपोर्ताज लेखनशैलीत मांडली आहेत. त्यामुळे समाजचित्रणाच्या दृष्टीने त्यास महत्त्व आहे.

'थीमबेस्ड कथा' हा देशमुख यांच्या कथासाहित्याचा एक वेगळा, अभिनव असा महत्त्वाचा पैलू आहे. एखादे मुख्य सूत्र घेऊन त्यासंबंधीच्या सलग कथामाला लिहिल्या आहेत. पाणी, स्त्रीभ्रूणहत्या व खेळाडूंच्या कथा या विषयावर त्यांच्या कथा प्रसिद्ध आहेत. एका विषयाची अनेक परिमाणे, कंगोरे शोधण्याचा हा प्रयत्न आहे. समकालीन समस्याचित्रणाच्या या विविधस्वरूपी कथामाला आहेत. या समस्यावरील उपायही लोकशिक्षकाच्या भूमिकेतून त्यांनी या लेखनातून मांडला आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांचे कांदबरीविश्वही विविध स्वरूपी आहे. विविध समाजसमस्येचे चित्रण ते राजकारण व आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे विषय तीमधून अभिव्यक्त झाले आहेत. मुस्लीम जगाची संवेदना, बालमजुरांचा प्रश्न, वर्णभेद ते देहनिष्ठ जाणिवांचे सूचन त्यांच्या कादंबऱ्यात आहे. जिल्हा प्रशासन ते नगरपालिका यांच्यातील सत्तासंघर्षाचा वेध त्यांच्या कादंबऱ्यात आहे. तर 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या बृहद परिसंस्कृतीतील जीवनानुभवाला साद घालण्याची रीत आहे.

प्रवासवर्णनपर व ललितगद्य या प्रकारातही त्यांनी लेखन केले. चेरापुंजी ते नायगारा अशा विविध प्रदेशांतील त्यांच्या मनावर उमटवलेला ठसा, तेथील समाजनिरीक्षणांच्या नोंदी तीमध्ये आहेत. नाटक, चित्रपट व कलाक्षेत्र ही काही त्यांच्या आवडीची क्षेत्रे. या विषयावरही त्यांनी सतत लिहिले आहे. प्रशासनविषयक लेखन हा देशमुख यांच्या लेखनाचा एक महत्त्वाचा अविष्कार आहे. ललितेतर स्वरूपाच्या या लेखनातून त्यांना जे विविध स्वरूपाचे अनुभव आले ते या लेखनातून मांडले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून प्रशासनातील विविध अनुभवप्रदेशांचे हे चित्रण आहे.

भारतीय प्रशासनाची, इतिहासाची, तिच्या स्थित्यंतरासह त्यांनी मांडणी केली आहे.

देशमुख यांच्या साहित्यभाषेचे स्वरूपही वैविध्यपूर्ण आहे. मात्र जीवनानुभवाच्या आशयसूत्राच्या प्रभावी ठशामुळे काही प्रमाणात साहित्यकृतीच्या रूपाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. अभिनव अशा प्रकारची भाषारूपे आहेत. 'थीमबेस्ड'सारख्या कथारूपाचा प्रयोग आहे. कथा-कादंबरीत पत्रात्मक लेखनतंत्र आहे. बृहद कादंबरीचा आकृतिबंध 'इन्किलाब विरुद्ध जिहाद'मध्ये वैशिष्ट्यपूर्ण आहे. काव्यात्मता व यथोजित भाषेचा रूपबंध तीमध्ये आहे. देशमुख यांच्या कथात्मक सृष्टीत व ललित लेखनातील पात्ररचना ही दुहेरी स्वरूपाची आहे. समस्याकेंद्री अनुभवविश्वाचे चित्रण करताना त्यांच्या साहित्यात बरीचशी पात्रे खलप्रवृत्तीची असतात. मात्र त्याचवेळी त्या संहितेत सत्शील, आदर्शवादी किंवा सकारात्मतेचा ध्यास असणारी पात्रे वा निवेदक सुप्तपणे नांदत असतो. समांतरपणाने या दुहेरी स्वरूपाच्या पात्ररचनेतील आशावादाचे व आदर्शाचे सूचन केलेले आहे. मानवी वर्तनाचे अतर्क्य रूपही आहे. चित्रदर्शी आणि नाट्यात्मक अभिव्यक्ती आहे.

## १३.

१९८० नंतरच्या मराठी साहित्याचे स्वरूप हे विविधस्वरूपी आहे. साठच्या दशकातील चैतन्यशील अशा साहित्याचे अविष्कार ऐंशीच्या दशकात स्थिरावले होते. भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, नारायण सुर्वे व नामदेव ढसाळ यांच्या खुल्या शक्यतांचा शोध घेणारी नवनैतिकतावादी साहित्याची उपस्थिती या काळात होती. मराठी मध्यमवर्गीयांच्या दृष्टीपल्याडच्या नव्या साहित्याचा हा आविष्कार होता. लघुनियतकालिकाच्या चळवळीचे व दलित साहित्याचे जोरकस आविष्कार या काळात प्रकट होत होते. तसेच ऐंशीच्या दशकातही इतरही अस्मिताकेंद्री साहित्यप्रवाह मराठी लेखन परंपरेत निर्माण झाले. मराठी सांस्कृतिक जगताच्या व अभिरुचीच्या कक्षा विस्तारणारे हे साहित्य होते. एक लेखक म्हणून देशमुखांची जडणघडण या सांस्कृतिक पर्यावरणात झाली. स्वत:च्या साहित्याचे आस्थाकेंद्र व विषयकेंद्र निवडण्याचे दोन पर्याय समकाळात त्यांच्या समोर होते. एक आधुनिकतावादी दृष्टीचा प्रभाव असणारा साहित्यप्रवाह आणि दुसरा मानवकेंद्री जीवनदृष्टी प्रभावित साहित्यप्रवाह. स्वाभाविक देशमुख यांचा लेखन संवेदनस्वभाव हा मानवकेंद्री विचार विश्वाकडे झुकणारा होता. या प्रभावी घटकांमुळे त्यांचा कल स्वाभाविकपणे समाजशील विषयाकडे झुकला, तसे विषय त्यांच्या लेखनातून मोठ्या प्रमाणात आविष्कृत झाले. अवतीभवतीच्या वेगवान उलाढालीला मराठी साहित्याने दिलेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर देशमुख यांनी आपल्या अनुभव प्रदेशातील विषयांना केंद्र बनविले आणि त्या अनुभवांचा, सामाजिक वास्तवाचा प्रामाणिकपणे शोध घेतला. प्रशासनिक अनुभवाचे क्षेत्र व त्याच्या विविध परी लेखनातून मांडल्या. एकेक प्रश्न,

समस्या घेऊन त्या वास्तवाचे विविध लक्ष्यी अक्ष शोधले.

गेल्या स्वातंत्र्योत्तर काळात ज्या महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय समाजाची वाटचाल झाली त्या वाटचालीच्या समाजशास्त्राचा आणि देशमुख यांच्या जीवनदृष्टीचा जवळचा संबंध आहे. या काळातील सुशिक्षित मध्यमवर्गीयांचे आदर्श, स्वप्नांकाक्षा, तीमधून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ध्वनित झाली आहे. देशमुख स्वत:ला स्वातंत्र्यानंतरच्या व नव्वदीआधीच्या मधल्या काळातले प्रतिनिधी मानतात. या काळातील सामाजिक व वाङ्मयीन वातावरणाचा त्यांचा व्यक्ती व लेखक म्हणून असण्यावर परिणाम झालेला आहे. जीवनविषयीच्या या मध्यमवर्गीयांच्या कल्पना, व्यक्तिमत्त्व रचण्यातली कल्पना व स्वत:ला घडविण्यात ज्या गोष्टींचा सहभाग होता, त्याबद्दलचा आदर्शवत दृष्टिकोन तीमध्ये आहे. तसेच या काळातील शिक्षितवर्गाच्या आवडी-निवडी त्यांच्या खास अशा कल्पनांमधून साकार होत होत्या. ज्या भावगीतांनी व भावसंगीताने व हिंदी चित्रसृष्टीने या काळातील शिक्षित मनाचे पोषण केले त्याचा आविष्कार लेखनभाषेतून झाला आहे. हिंदी गाण्यांचे, चित्रपटाचे व मराठी भावगीतांचे अनेक तपशील देशमुखांच्या लेखनात आहेत. तसेच या काळातील या समाजाची घडण ज्या माध्यमांनी, साहित्यांनी केली त्याचाच हा आविष्कार आहे.

सामाजिक प्रश्नांची मांडणी करण्यासाठी देशमुख यांच्या साहित्यदृष्टीमध्ये नेहमी एका लोकशिक्षकाची आदर्शवादी भूमिका वसत आलेली आहे. समस्यामुक्त समाज निर्माण व्हावा या आदर्शवादी भूमिकेतून त्यांच्या साहित्याचे कथन नियंत्रित झाले आहे. या भूमिकेचा पगडा त्यांच्या जीवनचित्रणावर, पात्रसृष्टीवर व भाषेवर आहे. आदर्शवादी नायकाच्या निर्मितीतून या समाजव्यवस्थेचे निरीक्षण केलेले आहे. अंतिमत: ज्या प्रश्नांचे सूतोवाच प्रारंभिच केले आहे. त्याची दाहक वास्तवता, विविध कंगोरे प्रत्ययास आणून देऊन शेवट सकारात्मक असा केलेला असतो. तो बऱ्याच वेळेला सुखान्त स्वरूपाचा असतो. 'आदर्शाची व मांगल्याची आस असलेली नजर मला प्राप्त झाली आहे' असे स्वत: त्यांनी म्हटले आहे. या आदर्शवादी मूल्यविवेकाची जागती नजर त्यांच्या एकूण लेखनावर आहे. म्हणून त्यांच्या साहित्यदृष्टीत आदर्शवादी युटोपियाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे लेखनाचे अनेक विषय या जाणीवकेंद्राने नियंत्रित झाले आहेत. निराशावादी सिनिकल वृत्ती अव्हेरून मानवी जीवनातील साफल्याचे व आशावादीपणाचे सूचन त्यांच्या वाङ्मयात आहे. मराठी वाचक त्यांच्या नव्या अनुभवक्षेत्राच्या साहित्यकृतीच्या प्रतीक्षेत असेल.

**डॉ. रणधीर शिंदे**

# अनुक्रमणिका

## कथा

१. जोकर ........ ३५
२. मर्सी किलिंग ........ ४३
३. अंतरीच्या गूढ गर्भी ........ ५१
४. बांधा ........ ५८
५. भूकबळी ........ ६८
६. उदक ........ ८४
७. फिरुनी नवी जन्मेन मी! ........ ९५
८. बंद लिफ्ट ........ १११
९. रन बेबी रन ........ १२४
१०. 'लाईफ' 'टाईम'चा 'फॉर्च्यून' ........ १३९
११. भव शून्य नादे ........ १५२
१२. स्वत:लाच रचित गेलो ........ १६८
१३. सारांश ........ १७९
१४. माधुरी व मधुबाला ........ १९५
१५. लंगडा बाळकृष्ण ........ २०६
१६. केस स्टडीज ........ २१९

## नाटक

१. अखेरची रात्र ........ २३७

# अनुक्रमणिका

### प्रवासवर्णन

१. चिंब चिंब चेरापुंजी ........ २६९
२. नायगरा : दि व्हॉईस ऑफ गॉड ........ २७७
३. हत्तींचा अनाथ आश्रम ........ २८९
४. हे स्वतंत्रते भगवती! ........ २९२

### आत्मपर

१. झपाटलेपण ते जाणतेपण ........ २९७
२. परभणी व कोल्हापूरचे दिवस ........ ३१३

### प्रशासनपर लेख

१. एका सेक्युलर रोडची अजीब दास्तान! ........ ३२६
२. हेचि फल काय मम तपाला? ........ ३३२
३. सामाजिक प्रबोधन व बहिष्कार समाज परिवर्तनाचे दुहेरी शस्त्र! ........ ३३९
४. भ्रष्टाचाराचा बकासुर ........ ३४६
५. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय नोकरशाही पांढरा हत्ती, की वेगवान अश्व? ........ ३५३
६. स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासनाची ६० वर्षे 'सिक्स थिंकिंग हॅट'च्या तंत्राद्वारे ........ ३६१
७. भारतीय प्रशासनाचे बदलते रूप! ........ ३७१

# अनुक्रमणिका

## ललित

१. कलरफुल ........ ३८०
२. मैं जिंदगी का साथ निभाता चला गया ........ ३८४

## वैचारिक

१. देवबंदचं दारुल उलुम ........ ३९०
२. काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली! ........ ४०१
३. लिंग असमानतेची विविध रूपे अर्थात लिंगभेदावर आधारित
भारताची सामाजिक फाळणी ........ ४१८

## आस्वाद (चित्रपट / नाटक)

१. गिरीश कार्नाड - भारतीय रंगभूमीचा एक 'जायंट' ........ ४३०
२. 'धग' - सुन्न करणारा प्रभाव! ........ ४५४
३. गुरुदत्त ........ ४५९
* पूर्व प्रसिद्धी ........ ४६६
* लेखक परिचय ........ ४६७

# कथा



# १. जोकर

ट्रपीजवर काम करणाऱ्या लीनाने सर्कसच्या त्या विशाल तंबूत आपल्या मैत्रिणीसह प्रवेश केल्यावर जेव्हा तिची नजर छोटूवर पडली, तेव्हा तिनं मानेला नापसंतीदर्शक झटका दिला आणि तीव्र तिटकाऱ्याचा कटाक्ष त्याच्यावर टाकला. आणि त्या क्षणी छोटूला जाणवलं की, सर्कसमधील तीन घंट्याच्या खेळापलीकडे तो कुणाच्याही जमेस नाही. तो सर्वत्र 'अनवाँटेड' आहे. तो फक्त ठेंगू - बुटका जोकर आहे, ज्याच्याकडे पाहून प्रेक्षक मनमुराद हसतात! बस्!

तंबूच्या मध्यभागी जेथे खेळ चालतात, तिथे एरिना सर्कसमधील सर्व कलाकार व कर्मचारी जमा झाले होते. तेथेच सर्कसचे मालक वेंकटस्वामी कोचामध्ये आरामात बसले होते. समोर एका टेबलवर टी. व्ही. सेट आणि व्ही. सी. आर. ठेवला होता. सर्कसचा एक कर्मचारी राजन व्ही. सी. आर. लावायची खटपट करीत होता.

आज सर्वांना राज कपूरचा 'मेरा नाम जोकर' हा सिनेमा वेंकटस्वामी दाखवणार होते.

आज सर्कसला सुट्टी होती!

वेंकटस्वामी राज कपूरचे जबरदस्त फॅन होते. त्याच्या निधनानिमित्त सर्कसचे खेळ त्यांनी तोटा सोसून बंद ठेवले होते. तसे स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे प्रसिद्धही केले होते. कारण त्यांच्या सर्कसचा राज कपूरशी ऋणानुबंध होता. राजनं त्याचा 'जोकर' काढताना प्रामुख्याने जरी रशियन सर्कस वापरली होती, तरी काही दृश्यांमध्ये एरिना सर्कसचाही त्याने उपयोग केला होता. त्यातही प्रामुख्यानं काही हास्य प्रसंगांसाठी राजनं छोटूला घेतलं होतं. अर्थात चित्रपटाची लांबी वाढल्यामुळे या प्रसंगावर कात्री चालवली गेली होती. परंतु या प्रसंगामुळे वंकटस्वामी आणि छोटू दोघेही त्या महान कलाकारांच्या जवळ गेले होते. विशेषत: राजला छोटू फार आवडला होता. त्याची सर्कशीमधील विदूषकी आवडली होती.

वेंकटस्वामींनी म्हणूनच आज सर्कसला सुट्टी जाहीर करून दुपारच्या वेळी व्ही. सी. आर. द्वारे सर्व कलाकार व कर्मचाऱ्यांना 'जोकर' दाखवायचं ठरवलं होतं!

त्या सर्वात असूनही छोटू एकटा होता - अस्वस्थ होता.

काल रात्री घडलेला तो प्रसंग आणि आज कानी आलेली राज कपूरच्या दु:खद निधनाची वार्ता -

राजनच्या खटपटीला यश आलं आणि सिनेमा सुरू झाला. छोटू पाहता पाहता राज कपूर या महान कलावंतांच्या 'जोकर'शी एकरूप झाला. काल घडले त्या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर तर त्याला राजचं दु:ख आणि प्रेमजीवनात आलेलं वैफल्य अधिकच भिडून गेलं!

सिनेमा संपला, सर्व जण पांगले तरी छोटू तसाच बसून होता. डोळ्यातून मुक्तपणे वाहणारी आसवंही आटली, तरी त्याची विमनस्कता कमी होत नव्हती!

आकाशाचा वेध घेणारे सर्कसच्या तंबूचे भव्य कळस - तो विशाल परीघ - मध्यभागी कलावंत व जनावरांचे खेळ दाखवणारे रिंगण - वर वाऱ्याच्या झुळकीसरशी मंदपणे हेलकावे घेणारे पाळणे - ज्यावर प्रयोगाच्या वेळी तंग, आकर्षक कपड्यात लीनाचं चवळीच्या शेंगेसारखं चपळ शरीर लवलवायचं - सारंच भव्य, उत्तुंग आणि विशाल!

अशा भव्य, उत्तुंग व विशाल सर्कसच्या तंबूत एकटाच मध्यभागी बसलेला साडेतीन फुटांचा 'वनपीस' छोटू -

त्या भव्यतेच्या पार्श्वभूमीवर छोटूला आपली शारीरिक उंची तीव्रतेनं खुपत होती! स्वत:चा कमालीचा तिरस्कार आणि वांझोटा संताप वाटत होता.

दहा वर्षापूर्वी जेव्हा छोटूनं पोटाची आग विझवण्यासाठी म्हणून सर्कसच्या दुनियेत प्रवेश केला, तोवरच्या जीवनात त्याच्या वाटेला सदैव कुचेष्टा व अवहेलनाच आली होती! पण सर्कसचे मालक वेंकटस्वामीसाठी त्याची साडेतीन फूट उंची - हा बुटकेपणा ही जमेची बाजू ठरली. प्रत्येक सर्कशीमध्ये दोन तीन बुटके जोकर होतेच. त्यांचा एक बुटका जोकर पक्षाघाताने आजारी पडून विकलांग झाला होता. म्हणून बाळगोपाळांना, प्रौढातल्या बाल्यांना आपल्या विदूषकी चाळ्यांनी मनमुराद हसविणारा एक जोकर त्यांना हवाच होता!

छोटूची बौद्धिक झेप मात्र अफाट होती. खरं तर त्याला अभिजात कलावंतच म्हणायला हवं! यशावकाश वेंकटस्वामींना त्याचा प्रत्यय आला. पाहता पाहता छोटू सर्कसचं एक प्रमुख आकर्षण बनला! त्यानं पूरक प्रयोगांच्या मधे मधे कलावंतांना पूर्वतयारीसाठी वेळ मिळावा आणि प्रेक्षकांना रिलीफ मिळावा म्हणून सर्कशीमधले जोकर्स जे बटबटीत, खालच्या दर्जाचे चाळे करीत त्याना पूर्णपणे फाटा देऊन एका ढोबळ कथासूत्राच्या आधारे सतत तीन घंटे वाहते ठेवणाऱ्या प्रसंगांची हास्यस्फोटक मालिका रचली, ती प्रेक्षकांना कमालीची आवडली. सर्कसला येणारे बालगोपाळ तर त्याच्यावर निहायत खूश असत! अनेक उत्साही बाळगोपाळ त्याची स्वाक्षरी घेत,

सर्कस संपल्यावर त्याला भेटत; ही त्याच्या ठायी अतीव आनंदाची बाब होती!

छोटूला ट्रॅपीजचं एक प्रेक्षक म्हणून आकर्षण होतचं, पण सर्कसमध्ये आल्यावर ट्रॅपीज खेळातला थरार त्यानं जवळून अनुभवला. शंभर शंभर फूट उंचीवर दोरीच्या साह्यानं गिरक्या घेणं, पाळणे बदलणं वा हवेत एक दोन उड्या घेऊन जाळीत स्वत:ला झोकून देणं - मृत्यूच्या सीमारेषेला भिडलेल्या या खेळात विलक्षण रोमांच होता, जो छोटूला भावला आणि वेंकटस्वामीच्या प्रोत्साहनानं त्यानं ट्रॅपीजचे धडे गिरवले, त्यात नैपुण्य कमावले. आणि याला विदूषकी चाळ्यांची जोड देत ट्रॅपीजचे प्रयोग करीत प्रेक्षकांना एकाच वेळी हास्य व थरार छोटू देऊ लागला.

खर तर त्याचं ट्रॅपीजवरील काम इतर ट्रॅपीज आर्टिस्टपेक्षा जास्त धोकादायक होतं. प्रेक्षकांना ते पाहताना कदाचित जाणवतही नसेल पण वेंकटस्वामी प्रत्येक वेळी त्याला मायेनं म्हणत, "जरा सांभाळून छोटू! तुझं काम जादा खतरनाक आहे. कारण तुला ट्रॅपीज आर्टमधलं सर्व काही करावं तर लागतचं, पण ते करताना त्यातलं काही जमत नाही असं प्रेक्षकांना दाखवून चुका कराव्या लागतात आणि एकदा तरी घसरून पडावं लागत! ते तू कौशल्यानं करतोस, पण धोका आहे बाबा, तेव्हा जरा सांभाळून!"

या विदूषकी वळणाच्या साहसी ट्रॅपीजमुळे छोटू हा खरा अर्थानं सर्कसचा स्टार बनला होता!

हा काळ त्याच्यासाठी मंतरलेला होता. एका विलक्षण धुंदीत तो जगत होता. सर्कस हे त्याच्या अवघ्या जीवनाचं केंद्र बनलं होतं!

वेंकटस्वामींनी पुणे मुक्कामी हिशोब व अन्य व्यवस्थापकीय कामांसाठी नंदू कामत या चुणचुणीत तरुणास सर्कसमध्ये घेतलं. त्यानं छोटूचे खेळ पाहिल्यावर त्याची आपणहून ओळख करून घेतली आणि काही दिवसांतच ते दोघे जिवाभावाचे मित्र बनले!

नंदूला वाचनाचा खूप शौक होता. ज्या गावी सर्कसचा मुक्काम असेल, तिथल्या लायब्ररीतून पुस्तके आणून फावल्या वेळात वाचणे हा त्याचा विरंगुळा होता. आणि हे वाचलेलं तो मूड आला की छोटूला सांगायचा. असंच एकदा त्यानं सांगितलं,

"छोटू - मी नुकतीच मराठीतले एक श्रेष्ठ लेखक पु. भा. भावे यांची एक कथा वाचली आहे. 'सार्थक' तिचं नाव. एका सर्कसमध्ये मृत्युगोलात मोटारसायकल चालवणे हे नायकाचे काम. या पाच मिनिटांच्या धुंदीवर तो उरलेले तेवीस तास पंचावन्न मिनिटे काढीत असे. किती वास्तव आहे नाही! आणि किती कठोर वास्तव आहे. सर्कस कलावंतांना त्यांच्या कामाखेरीज काही अस्तित्व असू नये! माणूस म्हणून त्याची आयडेंटिटी, ओळख वा अस्तित्व असू नये!"

"नंदू", जरा विचार करून छोटू म्हणाला, "हे मला पटत नाही. परंतु माझ्यावरून सांगतो, या सर्कसच्या तंबूबाहेरही माझं अस्तित्व आहे, विश्व आहे. मी

केवळ बुटका जोकर नाही, तर माणूस आहे. आपल्या सर्कसची ट्रॅपीज क्वीन लीना - ही मला किती मानते - मला 'सर' म्हणते. मी तिचा ट्रॅपीजमधला गुरू आहे. तिला ही विद्या मीच शिकवली -'' क्षणभर छोटू भरकटत गेला. कारण त्याच्या नजरेसमोर ती लावण्यावती तरळत होती. नकळत आपली कानशिले गरम होताहेत असा त्याला भास झाला. पण समोर नंदू होता व एका गंभीर विषयावर चर्चा चालली होती.

"एक आणखी उदाहरण द्यायचं झालं तर राज कपूर मला आपला दोस्त मानतो. शूटिंगच्या वेळी आम्ही जवळ आलो. मध्यंतरी मी त्याच्या लोणीच्या फार्म-हाऊसवर गेलो. तेव्हा त्यानं किती अगत्यानं मला ठेवून घेतलं. माझा पाहुणचार केला. आता तूच सांग - आम्हा सर्कस कलावंतांना बाहेरच्या विश्वात काहीच स्थान नाही - माणूस म्हणून काहीच महत्त्व नाही?''

"छोटू - तूं खरंच फार भाबडा आहेस. जगानं आजवर तुला कुचेष्टा व अवहेलनेखेरीज काय दिलं? तरीही तुझा आशावाद प्रबळ आहे. मी मनापासून प्रार्थना करीन की, तुला स्वत:बद्दल जे वाटतंय ते खोटं ठरू नये - कधीच!''

नंदूची ती सदिच्छा होती की अनिष्टसूचक भविष्यवाणी?.....

खळखळून हसण्याचा आवाज त्याच्या कानी पडला व तो भानावर आला. सायंकाळ होत आली होती. तंबूमध्ये लीना इतर ट्रॅपीजचा खेळ करणाऱ्या मुली आल्या होत्या. त्यांनी जाळी बांधायला सुरुवात केली होती. उजेड कमी असल्यामुळे लाईटस्‌ही लावले होते.

खरं तर आज सुट्टीचा दिवस, पण लीना रोजचा सराव कधीच चुकू देत नसे. हा छोटूच्याच शिस्तीचा परिणाम होता. तोही दैनंदिन सराव कधीही चुकवत नसे. मनाच्या त्या क्षुब्ध अवस्थेतही त्याला तिचं कौतुक वाटलं!

तीन वर्षांपूर्वी लीनानं सर्कसमध्ये प्रवेश केला होता. या पूर्वी दुसऱ्या एका छोट्या सर्कसमध्ये सायकलिंगचे व ट्रॅपीजचे छोटे-मोठे काम ती करीत असे. एरिनामध्येही वेंकटस्वामींनी तिला सायकलिंगच्या खेळासाठीच घेतलं होतं. पण तिचं ट्रॅपीजचं ज्ञान पाहून तिला त्यांनी छोटूच्या हवाली केलं. त्यानं तिला ट्रॅपीजमधील अनेक उच्चप्रतीचे खेळ शिकवले. ती नेहमी म्हणायची, "सरांमुळे मी आज एवढे अवघड ट्रॅपीज गेम्स करू शकते!''

प्रत्येक प्रयोगाच्या पूर्वी ती त्याच्या पाया पडून, त्याची परवानगी घेऊनच ट्रॅपीज सुरू करायची - हा क्रम सरावाच्या वेळीही असायचा!

आताही त्याचं मन किंचित उचंबळून आलं होतं. कालचा प्रसंग विसरून तिनं जर आपल्याला 'सर' म्हणून हाक मारली तर तिच्यासमवेत आपणही सारं काही विसरून ट्रॅपीजचे खेळ करू - नाना विक्षेप करून तिला हसवू, जसे नेहमी सरावाच्या वेळी हसवतो तसे!

पण तिनं त्याच्याकडे पाहात जेव्हा नापसंतीदर्शक खांदे उडवले व नजरेतील तीव्र तिटकाऱ्याचं जहर फेकलं, त्याच्या पायातलं बळचं संपून गेलं! लोहचुंबकाप्रमाणे तो तिथंच खुर्चीला मूढ मुग्धाप्रमाणे खिळून राहिला.

त्याची उपस्थिती जणू लीनाच्या गावी नव्हती असंच ती सफाईनं वावरत होती, ट्रॅपीजचे खेळ करीत होती!

डोळ्यांत सांभाळलेल्या अश्रूंमुळे तिची उंचावरील आकृती त्याला धूसर वाटत होती. स्वप्नाप्रमाणे तिच्या हालचाली भासत होत्या!

त्याच्या मनावरचा ओरखडा खपलीप्रमाणे निघाला होता!

खरं तर त्याच्या जीवनात लीना आली होती ती सोनेरी स्वप्नं घेऊन! स्वत:च्या बुटकेपणामुळे आयुष्यभर तो लोकांच्या अवहेलनेचे व कुचेष्टेचे जहर पीत आल्यामुळे तो स्वत:वर सदैव नाराज असायवचा.

ही जिव्हारी खुपणारी कुचेष्टा व विटंबना आपल्या नशिबी का म्हणून आहे? माझा काय अपराध आहे? दैवानं कमी उंचीचं वैगुण्य, जे लाखात एकालाच मिळतं ते, माझ्या भागधेयात का द्यावे? लोकही एवढे कसे क्रूर, हिंस्त्र असतात? त्यांच्या कुत्सिततेचा केवढा जीवघेणा दंश आपल्या मन-मानसाला होतो याची जराही जाण नसावी! इतरांचं वैगुण्य व व्यंग हा त्यांच्या लेखी मनोरंजनाचा विषय व्हावा? का? का म्हणून?

त्याच्या कडवटपणानं त्याला नास्तिक केलं होतं. त्याचा देवाधर्मावरचा विश्वासच उडाला होता. तो कधीही देवळात जात नसे. एरिना सर्कसचा प्रारंभ हा सर्कसच्या वैभवाचं प्रतीक असलेल्या 'राजा' नावाचा हत्तीच्या 'गणेशपूजनानं' व्हायचा. या वेळी सर्कसमधील व्यंकटस्वामीसह सर्व जण रिंगणात हजर राहायचे अपवाद असायचा तो फक्त छोटूचा! वेंकटस्वामी नेहमी म्हणायचे, "छोटू, अरे आपला धंद्यात रोज मृत्यूशी गाठ असते. आपण आजही सुखरूप आहोत ही देवाची कृपा म्हणायची. श्रद्धेनं फळ मिळतं-!"

छोटूनं वेंकस्वामींना कधीही उत्तर दिलं नाही. पण तेवढ्याच निग्रहानं तो कधी गणेशपूजनाला हजरही राहिला नाही!

अशा वेळी लीना त्याच्या जीवनात आली, एक सोनेरी स्वप्न घेऊन! आपणही कुणी आहोत, कुणी तरी आपल्यालाही महत्त्वपूर्ण मानतं ही भावनाच मोठी हृद्य व मनाला उत्तेजित करणारी आहे!

तो एका धुंदीत वावरत होता. त्याला वाटायचं, लीना ही एक शिल्पकृती आहे, जी आपण मोठ्या प्रेमानं, कलात्मकतेनं घडवत आहोत! मी माझी आहे-

लहान मुलाला जसं त्याचं खेळणं अतिप्रिय असतं व ते तो कुणाला देऊ इच्छित नाही की, शेअर करू इच्छित नाही तसंच छोटूला तिच्याबद्दल वाटायचं. तिच्याबाबतीत

तो कमालीचा पझेसिव्ह बनला होता.

त्याच्या नकळत ती त्याच्या जीवनाचा एक हिस्सा बनली होती!

मनाच्या साऱ्या भावना शरीरमाध्यमातूनच फुलून येतात, प्रकट होतात! याची छोटूला अवचित जाण आली व तो थरारून गेला. हा थरार त्याला रोमांचक वाटला - त्या थरारीत आपल्या जगण्याचा अर्थ आहे असं त्याला वाटलं!

पुन्हा त्याला निमित्त होतं तो ग्रेट शोमन राज कपूर, त्यानं एकदा प्रयोग पाहिल्यानंतर सर्व कलाकारांना आपल्या फार्मवर पार्टी दिली होती व त्यावेळी 'जोकर' हा सिनेमाही दाखवला होता. त्यावेळी लीना छोटूजवळ बसली होती. आणि त्याच्याशी सलगीने कुजबुजली होती -

''जोकरचं दु:ख पाहून त्याचं सांत्वन करावसं वाटतं की, नको रे बाबा अशी टिपं गाळूस तूं! तुझ्या आयुष्यातल्या सर्वच स्त्रिया बेवफा निघाल्या - तुला सोडून गेल्या - हे त्यांचं दुर्भाग्य! तू हिरा आहेस - त्यांना ते कळलच नाही!''

''पण लीना - जोकर ही जगासाठी एक हसण्याची चीज आहे. त्याच्यावर कुणी स्त्री प्रेम करेल?''

''का नाही करणार? जोकर का माणूस नाही? तो तर महान कलावंत आहे!''

तिच्या त्या निकट स्पर्शानं व लागट बोलण्यानं छोटू मोहरून गेला होता!

झपाटून गेला होता! पुन्हा पुन्हा त्याला तिची ती वाक्यं आठवायची - वाटायचं, ती काय सूचित करते आहे वा करू इच्छित आहे? हे - हे तिनं आपल्यासाठी तर म्हटलं नसेल? आपणही जोकर आहोत. शूटिंगच्या वेळी राज कपूर आपणास 'कलावंत' म्हणाला होता. आता लीनाही तेच म्हणते! तीही आपल्यातला कलावंत व माणूस पाहू शकते?- हाऊ नाईस!

लीनाकडे पाहण्याची त्याची वृत्ती पार बदलली होती. एके काळी स्त्री त्याला आकाशीच्या चंद्राप्रमाणे अप्राप्य वाटत होती. पण लीनाच्या रूपाने ती हातावर प्राप्त आहे, फक्त पुढे होऊन हात धरायला पाहिजे, बस!

पण हे हातभराचे अंतर बुटकेपणाच्या व्यंगाची व्यथा आयुष्यभर सहन करीत आलेल्या छोटूसाठी स्त्रियांच्या बाबतीत लक्ष्मण रेषा आहे हे त्याला काल जाणवलं. आणि एक लोभस स्वप्न भंग पावलं!

कालची सकाळ-प्रसन्न कोवळी उबदार. सरावाच्या वेळी ट्रॅपीजचा सराव करताना झालेले चुटपुटते पण ओढ लावणारे लीनाचे स्पर्श. ती केवढी जीवघेणी मादक हसत होती.

छोटू त्याच्या नकळत अंतराळी विहरत होता. शक्याशक्यतेचे, वास्तवतेचे भान केव्हाच सरले होते! डोळ्यात सोनेरी स्वप्नं तरळत होती. मनीमानसी लीना दाटून होती. तो वेडावला गेला होता. चाळवला गेला होता. सरावानंतर तो आपल्या राहुटीत

आला. त्याला प्रसन्न, हलकंफुलकं आणि स्वैर स्वैर वाटत होतं! एका अनिवार लालसेनं त्यानं मद्याचे चार घोटही घेतले आणि सारं शरीर दरवळून आलं - फुलून आलं!

एका अनिवार ओढीनं तो लीनाच्या राहुटीत आला. ड्रेसिंग टेबलासमोर उभी राहून ती काही तरी गुणगुणत आपले मोकळे केस विंचरीत होती. अंगात पारदर्शी गाऊन होता!

एक लावण्यखनी सौंदर्य समोर वेधक हालचाली करत होतं, ते मादक तारुण्य त्याच्या डोळ्यात पसरलं!

छोटू बेभान झाला होता.

काय होतंय हे समजण्याआधीच त्याच्या गालावर सणसणीत चपराक बसली होती. त्याची मिठी झुगारून देत ती चवताळलेल्या नागिणीप्रमाणे फूत्कारत होती, "ही - ही तुझी हिंमत? स्वत:ला कधी आरशात पाहिलं आहेस? तीन फुटांचा एक सामान्य जोकर, माझी अभिलाषा बाळगतोस?- ही लीना एका उमद्या, उंच्यापुऱ्या तरुणासाठी आहे - तुझ्यासारख्या क्षुद्र जोकरासाठी नाही-!

"क्षुद्र जोकर, तीन फूट उंचीचा बुटका जोकर-" छोटूला वाटलं, आपला तोल जातोय! ही कुचेष्टा व ही तुच्छता... तो काही काळ आपले शारीरिक वैगुण्य व व्यंग विसरला होता. पण नाही, जगाच्या लेखी तो आजही जोकरच आहे. उपेक्षित, हास्यास्पद. त्याच्याकडे पाहून चार घटका करमणूक करून घ्यायची. बस! तो कसला कलावंत? तो तर माणूस म्हणूनही कुणाच्या जमेस नसतो. त्याचं विश्व खेळापुरतं!

लीनाचा तो गुरू होता. ट्रॅपीझमध्ये तिला त्यानंच पारंगत बनवलं होतं. एके काळी तिचे विचार होते - 'जोकर का माणूस नसतो?' हे सारं बोलण्यापुरतं, वरवरचं येत होतं तर?

सिनेमातला जोकर तिला हवाहवासा वाटला असेल, कारण तो वास्तवातला हँडसम राज कपूर होता.

ठीक आहे, आपण तिचा प्रिय पुरुष होऊ शकणार नाही. ही शारीरिक उंचीची लक्ष्मणरेषा तिला पार करणं शक्य नसेल, पण तिच्या लेखी त्याच्या गुरुत्वाला, माणसालाही काही किंमत नसावी हे फारच घृणास्पद आहे.

तिनं कधी विचार केला नसेल, पण मीही अखेर माणूस आहे. तीन फुटांचा असलो तरी पुरुष आहे. मलाही वासना-भावना आहेत. मी भाळलो तिच्या वळसेदार शरीरावर. तिला ते पसंत नसेल तर नाही म्हणावं; पण अशी अवहेलना, अशी घृणा का? का म्हणून? तिच्या लेखी आपण माणूस नाही, केवळ सर्कशीतला बुटका जोकर आहोत?

स्वप्नांचा बिलोरी आरसा फुटला होता. त्याचे तुकडे झाले होते. त्या तुकड्यांच्या

शेकडो प्रतिमा त्याच्या लघुत्वाला हिणवत होत्या, डिवचत होत्या!

"तू - तू माणूस नाहीस! कलावंत तर नाहीच नाही आहेस - तू आहेस एक जोकर - तीन फूट शारीरिक उंची असलेला - बस्स!"

०-०-०

# २. मर्सी किलिंग

पोस्टमन आज जो केवळ भूतकाळाचा भाग आहे अशा एका गुलाबी कालखंडात प्रियूनं रघूला शेकडो भावोत्कट प्रेमपत्रं लिहिली होती व त्याचीही तेवढीच आली असतील. त्या काळात पत्र आणणारा पोस्टमन 'मेघदूतातील' यक्षाहून कमी महत्त्वाचा वाटला नव्हता. ज्याची सर्वस्व देऊन पूजा केली, तो रघू मातीचे पाय घेऊन आला होता चिखलातील, तिच्या देहाच्या उपभोगाचा हवा तेवढा हविर्भाग स्वीकारून पुन्हा नामानिराळा होऊन गेला... त्यावेळी चिडून, संतापानं त्याची निर्भर्त्सना करणार खरमरीत पत्र प्रियूनं लिहिलं, तेंव्हा तिने मनोमन निश्चय केला होता - ते कदाचित अखेरचं पत्र आहे मी लिहिलेलं. यापुढे पत्र नाही लिहायचं - कुणा कुणालाही..

पण जसं तिनं मास्टर नंदूची साहसकथा लिहायला प्रारंभ केला, तिला आपला पत्र न लिहिण्याचा निश्चय मोडावा लागला. मा. नंदूच्या साहसकथेवर निहायत खूश असलेल्या बालवाचकांची 'प्रियूदीदी' अशी संबोधन असलेली निरागस भाबडी पत्रे तिला हेलावून गेली... बालवाचकांचा हिरमोड करणे तिला जमले नाही. त्यांना त्यांच्याच भाषेत मोठ्या दीदीप्रमाणे पत्रोत्तर लिहू लागली. पत्रलेखनात तिला तिचा हरपलेला विरंगुळा सापडू लागला.

पण आज पुन्हा एकदा तिला निश्चय करावा लागत होता. पत्र न लिहिण्याचा, एवढंच नाही तर आलेली पत्रे न वाचण्याचा. पोस्टमननं पुन्हा पुकार केला तेव्हा अनिच्छेने उठली. दार उघडलं. पत्रांचा एक गठ्ठाच घेऊन पोस्टमन उभा होता. "बाई, ही डाक घ्या...!" तो म्हणाला, "आज सतत पंधरा दिवस होताहेत, रोज एवढी डाक येत आहे."

"हं...." ती अनिच्छेने हुंकारली.

"मला वाटतं, सगळी बालवाचकांची पत्र आहेत .... आज तर माझ्या पोराचंही पत्र आहे.."

"तुला इतर घरी पत्रं वाटायची नाहीत का?"

"जातो बाई..."

प्रियूची नाराजी पाहून गडबडून तो पोस्टमन म्हणाला, ''पण एक सांगावसं वाटलं बाई-''

''काय?''

''तुम्ही नंदूला इतक्या लवकर मारायला नको होता. त्याच्या साहसकथा मुलांना काय आवडायच्या! माझा मुलगा गंगाराम तर दरमहा एक तारखेची वाट पाहायचा 'बालविश्व'चा अंक केव्हा येतो व केव्हा एकदा मा. नंदूची कथा वाचतो, असं त्याला व्हायचं.''

ती ऐकत होती. एकाच वेळी आपल्या कथांची होणारी तारीफ पण तिला ऐकाविशी वाटत होती आणि नकोशी वाटत होती! नेमकी न कळणाऱ्या शब्दांत न पकडता येणारी एक अनाम हुरहुर तिला घेरून गेली.

''गंगारामच काय, त्याचा हा बाप, मीही नंदूच्या कथा वाचायचो बाई. आपण फार छान लिहिता-'' पोस्टमन ती ऐकत आहे हे पाहून धीर धरून पुढे म्हणाला, ''गेले पंधरा दिवस मी रोज विचार करीत होतो, बोलायला धीर होत नव्हता बाई. नंदूची शेवटची साहसकथा या महिन्याला 'बालविश्वा'त प्रसिद्ध झाली तेव्हा तमाम बालवाचकांप्रमाणे मीही हळहळलो बघा. ते तुम्ही बरं नाही केलं! प्रत्येक बालकच स्वत:मध्ये मा. नंदूचं रूप पाहात होता. माझ्यासारखा त्यात आपल्या आदर्श मुलाचं रूप पहात होता.''

ती आतल्या आत ढासळत होती. जो निश्चय तिने मनोमनात केला होता तो ढेकळासारखा विरघळला तर जाणार नाही ना? असं तिला वाटू लागलं. ती किंचित ओरडून म्हणाली, ''नाही. मी पुन्हा लिहिणार नाही नंदूची साहसकथा. ते - ते मला शक्य नाही.''

''नाही बाई, तुम्हाला ते शक्य आहे आणि आता मा. नंदूवर केवळ तुमचाच नाही, तर सर्वांचा हक्क आहे-''

''मला ते नाकबूल कुठे आहे? - त्यांच्यासाठीच तर मी लिहिलं होतं....''

''व या पुढेही लिहिलं पाहिजे-!'' पोस्टमन म्हणाला, ''आमच्या जातीनं पत्रं वाटताना एवढं बोलू नये, पण तुम्ही एक महान लेखिका आहात. सर्वच बालगोपाळांच्या लाडक्या प्रियूदीदी आहात.... व मला माझ्या धाकट्या बहिणीप्रमाणे, म्हणून एवढं बोललो-!''

पोस्टमन जाताजाता पुन्हा थबकला - व वळून म्हणाला - ''मला वाटतं दीदी, काही दिवस तुम्ही हवापालट करायला कुठे दूर हिल स्टेशनला जा - मनाला तेवढंच बरं वाटेल! तुमचा बंडू गेल्याचं कळलं.... भारी वाईट वाटलं. त्या पुत्र- शोकामुळेच तुम्ही लिहायचं नाही असं ठरवलं असाल तर मला म्हणायचं आहे की...''

''स्टॉप - एक शब्दही पुढे बोलू नकोस... मला ते ऐकायचं नाही. मला

ऐकवणार नाही.'' प्रियू किंचाळली. ''जा, तुला तुझी काम आहेत. आपला व माझाही वेळ वाया घालवू नकोस!''

पोस्टमन तिचा हा अवतार पाहताच अलगद तिथून निघून गेला.

ती पुन्हा आपल्या आरामखुर्चीवर येऊन बसली. पूर्ण खलास होऊन. आपलं डोकं गच्च दाबून धरलं... छे... मस्तकात जणू घणाचे घाव पडत होते!

दोन खोल्यांचा तो ब्लॉक या क्षणी तिला फार मोठा व भयाण वाटत होता.

तिचा बंडू असताना या दोन खोल्या तिला कमी वाटायच्या. कसाही असला तरी तो तिचा होता, तिला प्रिय होता...

आज तो कुठे आहे? कुठे असेल?

तो दिवस.. छे, काळरात्र ती.. समोर बंडूचं निष्प्राण कलेवर होतं आणि झपाटल्यासारखी ती लिहीत होती. मा. नंदूची अखेरची साहस कथा. चित्तथरारक साहसी प्रसंग मालिकेत नंदूचा मृत्यू होतो असं तिनं दाखवलं होतं.. ते बालवाचकांना रुचणार नाही हे माहीत असूनही, कारण त्यांच्यासाठी तिच्या कथा असल्या तरी लिखाणाची खरी प्रेरणा होती - बंडू. तो आज तिला सोडून गेला होता... आता कुणासाठी लिहायची कथा!

तिला आठवलं, आपण मा. नंदूची पहिली साहसकथा केव्हा व कशी लिहिली ते...

सतरा अठरा वर्षांचा बंडू हा फक्त देहानेच वाढला होता. मानसिक वय अद्यापही बाल्यातच रेंगाळत होतं! डॉक्टराचं निदान होतं की, त्याच्या मेंदूवर गर्भावस्थेतच परिणाम झाल्यामुळे मेंदूची वाढच खुंटली होती. तो बुद्धीने प्रगल्भ होऊ शकला नव्हता....

शारीरिक दृष्टीने तो पूर्ण फिट होता. पण त्याला दुनियेचं काही एक कळत नव्हतं! प्रियूनं आपल्या मायेच्या पदरात... जीवनातील वास्तव संघर्षापासून सदैव जपलं होतं... तो व्यवहाराचे उन्ह साहू शकणार नाही हे ती जाणून होती.

अठरा वर्षांचा बंडू अजूनही म्हणायचा -''आई, गोष्ट सांग ना?''

''कोणती सांगू राजा?''

''ती राम - पांडवांची नको. परी - राक्षसाची पण ऐकून कंटाळा आला बघ. काही तरी नवीन, वेगळं सांग... एकदम मस्त!'' असा बंडूचा सदैव लकडा लागलेला असायचा.

एकेकाळी लिटरेचरची ती विद्यार्थिनी होती. रघूसंगतीच्या प्रियाराधनाच्या काळात उत्कट, हळुवार काव्यरचनाही तिनं केली होती. पण रघूनं तिचा देह लुटून तिला सोडून दिलं.. आणि तिची रसिकता करपून गेली होती...

ती आग पुन्हा उभारून आली होती. बंडूचं रंजन होईल, त्याला आवडेल अशी

गोष्ट रचून सांगणे तिच्या लेखी 'मस्ट' होतं! आज बंडूच केवळ तिच्या जगण्याचं एकमेव प्रयोजन होतं...

'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा' हे प्रत्येक मातेचं स्वप्न असतं. अगदी प्रियुसारख्या कुमारी मातेचंही. रघूबरोबर तिने अनेक सिनेमे पाहिले होते. एक तिला कधीही विसरता आला नाही. 'चितचोर'. त्यातला मा. राजू तिला एवढा आवडला होता की ती त्यावेळी रघूच्या कानात पुटपुटली होती, 'रघू, हा मा. राजू केवढा लोभस व गोंडस आहे.. असं वाटतं, आपला होणारा मुलगा असाच असावा....!''

एकदा ती शाळेची ट्रिप घेऊन प्रजासत्ताकदिनी नवी दिल्लीला गेली होती. राष्ट्रीय संचलन पाहण्यासाठी. तेव्हा एका खास समारंभात राष्ट्रपतींच्या हस्ते धाडसी बालवीरांचा सत्कार झाला. तेव्हा तिला आपला होणारा मुलगाही असाच पराक्रमी निघावा असं वाटायचं.

तिची सर्व स्वप्नं राहून गेली. बंडू फक्त देहधर्माची जाणीव असलेला मांसाचा गोळा होता. त्याची मानसिक वाढ दहा वर्षापेक्षा कधीही जास्त होऊ शकणार नव्हती!

म्हणून त्याला रचून गोष्ट सांगताना तिच्या मन:पटलावर आपण पुत्राच्या संदर्भात जी स्वप्नं पाहिली होती ती तिनं एकत्र करून मा. नंदूची व्यक्तिरेखा निर्मिली... आणि ती कथा बंडूला बेहद्द आवडली.

सहज म्हणून बंडूला तिनं जसं सांगितलं, तसं लिहून काढलं. आळीतल्या मुलांनाही - जे बंडूसोबत खेळायला येत, ते तसेच यावेत म्हणून प्रियू त्यांनाही आवडतील अशा गोष्टी सांगायची. त्यांनाही मा. नंदूची साहसकथा आवडली. मग तो नित्यक्रमच बनला.

मा. नंदू सर्व मुलांच्या लेखी सत्य एक भावही झाला होता. सर्व मुलं आपसात म्हणायची ''दीदी, काय छान गोष्ट सांगतात? बंडू किती भाग्यवान, त्याला अशी छान छान गोष्ट सांगणारी आई मिळाली!''

ती कडवट हसू हसायची.... बंडूच्या भाग्याला सीमा नव्हती... या वाक्यात केवढा प्रचंड जीवघेणा विरोधाभास दडला होता हे फक्त तीच एकमेव जाणून होती.

''मी - एक आदर्श माता... माझ्यासारखी प्रेम करणारी आई मिळाली म्हणून बंडू भाग्यवान आहे!''

अशा समयी ती विलक्षण अवघडल्यासारखी व्हायची - आजची आपली जनमानसातील इमेज हा एक मुखवटा तर नाही - त्या सर्वांना जेव्हा ते कळेल की बंडू बिनलग्नाचा आहे, काय वाटेल? मला आज सर्व जण विधवा समजतात. तो पोटात असताना मी गर्भपात व्हावा म्हणून काय काय औषधं, चाटणं घेतली.

रघूनं तिला टाकल्यावर प्रेमभंगाच्या व अपेक्षाभंगाच्या दु:खात प्रियू एवढी सुन्न झाली होती की, असली जाणीव तिला स्पर्शतच नव्हती. पुढे काही कालावधीनंतर

जेव्हा ती भानावर आली, तेव्हा तिला दिवस टळले होते व दिसामाजी गर्भ वाढत होता.

ती काचेप्रमाणे तडकून गेली. समाज - चार लोक काय म्हणतील? हा प्रश्न जेव्हा अक्राळविक्राळ स्वरूपात भावी भीषणतेची नांदी वाजवत तिच्यापुढे उभा राहिला, तेव्हा अनिच्छेने व संस्कारशील मनामुळे होणारा सद्सदविवेकबुद्धीला मनातच दडपून गर्भपाताचा निर्णय घेतला.

गवगवा होऊ नये म्हणून डॉक्टरकडे जायचं सोडून तिनं वळून वैद्याची मदत घेतली. त्याने कसली कडवट चाटणं व मुळ्या औषधी दिल्या होत्या, की त्या घ्यायला अतिशय उष्ण होत्या.

पण विधात्याला हे बहुधा मंजूर नव्हतं! गर्भानं या उष्ण प्रकृतीची औषधं पचवली. गर्भपात झाला नाही. पण त्याच्या वाढीवर परिणाम मात्र जरूर झाला. ती अपुऱ्या दिवसांची बाळंत झाली.

आणि तिचा बंडू जन्माला आला तो वाढ थांबलेल्या मेंदूनिशी; शरीराच्या इतर कुठल्याही अवयवांवर दिसण्याजोगा काही परिणाम झाला नव्हता.... पण मेंदूची वाढ खुंटली होती.

डॉक्टरांनी तपशीलवार तपासणीनंतर हे सांगितलं. तेव्हा ती विलक्षण सुन्न झाली...

"डॉक्टर, मी हे काय केलं? जन्मास येण्यापूर्वी हा मला नको होता, म्हणून कसली औषधं घेतली मी.. पण आता हा या दुनियेत आला आहे. माझ्या रक्त-मांसाचं अंग घेऊन .. तो मला अत्यंत हवा आहे... माझ्या जगण्यासाठी 'मस्ट' आहे. तो बरा नाही का होऊ शकणार?"

"आय ॲम सॉरी मॅडम् -"

"आज मी आहे त्याला, तोवर काळजी नाही. पण माझ्या माघारी कसं होईल त्याचं..? शरीरानं वाढवलेला बंडू मूलच आहे हे दुनिया कसं मानेल? त्याचा आईच्या मायेने कोण सांभाळ करील? मी नुसता विचार करते तरी जिवाचा थरकाप होतो. डॉक्टर, मी .. मी काय करू?"

त्यानंतर प्रियू देवघरात नित्य परमेश्वराची आळवणी करायची - "हे देवा, माझ्या पापाचं, अपराधाचं मी प्रायश्चित्त तर घेतेच आहे. माझं तारुण्य, संसार सगळा त्याग करून केवळ बंडूची आई म्हणून बंडूसाठी जगते आहे. एकच नमन आहे तुझ्या चरणी देवा, की बंडूला माझ्या माघारी ठेवू नकोस. त्याची आबाळ होईल रे-!"

बंडूचा निरागस, भाबडा व काहीच जाणीव नसलेला चेहरा पाहिला की तिला भडभडून यायचं - मी आई नाही, वैरीण आहे! माझ्या पोराला लवकर मरण येऊ दे - असं अमंगल इच्छिते! कुठे फेडशील ते पाप?

पुन्हा तिचं मन तिला म्हणायचं, 'नाही प्रियू, तू वाईट विचार करते आहेस पण अंतिम हेतू चांगला आहे..!'

सहज तिच्या वाचनात एकदा लेख आला होता. कॅलिफोर्नियात 'मर्सी किलिंग'चा कायदा करण्यात आला होता. त्या संदर्भात! - जेव्हा जगणं हे मरणाहून दुःसह असतं, तेव्हा रोग्याच्या नातेवाईकांची परवानगी घेऊन त्याला मृत्यू येईल असं इंजेक्शन दिलं जातं... व झोपेतच त्याचा मृत्यू होतो...!

ती काहीही वाचत असली, विचार करत असली तरी त्याचा केंद्रबिंदू बंडू आणि फक्त बंडूचा असायचा!

जेव्हा आपला शेवट जवळ आला असेल तेव्हा बंडूसाठी 'मर्सी किलिंग' केलं तर?

या विचारानं ती हादरून गेली. "मी असा वेडावाकडा विचार का करते आहे! मी बंडूची आई आहे का वैरीण - त्याच्या जिवावर उठलेली? इडा पिडा टळो, अमंगल न घडो-"

इतरांसाठी ते एक चमकदार सुभाषित असेल, पण प्रियूच्या जीवनानं अशा कलाटण्या तिच्या चाळीस वर्षांच्या कालावधीत घेतल्या होत्या की, ती खरोखरीच क्षणाची पत्नी - पत्नी पण नाही... प्रेयसीच होती व त्या छोट्या कालखंडानंतर आतापर्यंत ती एक आईच होती. आणि कुठलीही आई, अंतिम हेतू केवढाही उदात्त असला तरी, आपल्या पुत्राच्या बाबत 'मर्सी किलिंग'चा निर्णय घेऊ शकत नव्हती - नाही.

आणि प्रियूला तर वाटायचं - आजचा हा बालबुद्धीचा बंडू आपल्या अविचाराचं व अपराधाचं फळ आहे. त्याला जपणं व जगाच्या आचेपासून दूर ठेवणं हे आपलं प्रायश्चित्तच आहे व ते वास्तविक कधीच पुरं होणार नाही, तरीही आपल्या अंतिम श्वासापर्यंत ते मला घ्यायलाच हवं....

मनात कितीही असलं तरी आपल्या हातानं प्रियू करू शकत नसली तरी तो विधाता 'मर्सी किलर'च होता... साध्या तापाच्या निमित्ताने त्याने बंडूच्या जीवनाचा शेवट केला.

आता आपल्या माघारी त्याचं काय होईल ही तिची चिंता देवानं आपणहून सोडवली होती. आणि अधूनमधून सारखा तिच्या मनात 'मर्सी किलिंग'चा विचार घोळायचाच, त्यामुळे तिच्या नकळत तिच्या मनानं बंडूच्या मृत्यूची व तो स्वीकारण्याची तयारी केली असावी.... त्यामुळे अनपेक्षिततेचा धक्का बसला नाही. तिला कदाचित याहीमुळे असेल की, मृत्यूहून भयंकर जीवन तिच्या वाट्याला आलं होतं आणि त्यामुळे मृत्यू तिच्या मनावरचा एक फार मोठा भार उतरवून गेला होता.

ही सुरुवातीची - फर्स्ट रिॲक्शन; नंतर मात्र विशुद्ध वेदनेचा पारा तिच्या

डोळ्यांचे बांध फोडून वाढू लागला.

बंडूचं निष्प्राण कलेवर कवटाळून ती किती वेळ अश्रू ढाळीत होती...!

अजूनही बंडूच्या चेहऱ्यावर थरारकतेचे भाव होते. होय, त्यानं मा. नंदूची शेवटची कथा ऐकली होती व ती कथा ऐकतानाच त्यानं डोळे मिटले होते.... शांतपणे! त्याला कसली समज होती? देवाघरचा तो निष्पाप जीव कोणतं प्रायश्चित्त घेण्यासाठी या जगात आला होता, की....

प्रियूला आठवत होतं.. आपण सांगितलेली मा. नंदूची साहसकथा आणि बंडूचे मिळणारे उत्कट रिस्पॉन्सेस्. मा. नंदू आणि बंडू तिचेच पुत्र होते! एक प्रत्यक्षातला. दुसरा कल्पनाशक्तीतला - मानसपुत्र - तिला नंदू हवा होता पण मिळाला बंडू.

पण इतरांना न मिळालेलं एक वरदान तिला मिळालं होतं. कलात्मक निर्मितीचं. आपल्या प्रतिभेनं हवी ती व्यक्तिरेखा ती निर्माण करू शकत होती. तिच्या प्रतिभेनं मा. नंदूला जन्म दिला होता. तो काल्पनिक होता, पण त्याच वेळी फार खरा होता. मनाच्या गाभाऱ्यात, वात्सल्याच्या उमाळ्यात.

आता बंडू नव्हता आणि म्हणूनच नंदूचं प्रयोजन नव्हतं!

नंदू बंडूसाठी होता म्हणूनच साऱ्या बालकांसाठी होता - बंडू मेला तर नंदूही -

येस... त्याचाही मी शेवट करणार आहे...! ती तशीच उठली. झपाटल्यासारखी टेबलाजवळ गेली, कागद ओढले व लिहू लागली.. मघाशी जिवंत असताना बंडूला सांगिलेली तीच कथा, पण शेवट वेगळा असलेली.

प्रत्येक कथेत कितीही खडतर प्रसंग आला तरी त्यातून मा. नंदू आपल्या बुद्धिमत्तेने व त्याला मिळालेल्या जादूई वस्तूमुळे सहीसलामत सुटत असे..... पण आज प्रियूनं कथेत दाखवलं होतं - त्याला मिळालेली जादूची छडी पाण्यात पडून जाते आणि राक्षसाला मारताना तो स्वत:ही मरतो!

लिहिताना एकदम तिला आठवलं व ती थरारली - हे 'मर्सी किलिंग' आहे. का? मा. नंदूचं? बंडूला मात्र माझ्या माघारी त्रास होऊ नये म्हणून मला 'मर्सी किलिंग' हवं होतं पण मातृप्रेमामुळे ते मला कधीही जमलं नाही. मा. नंदू हा प्रतिभेचा अविष्कार आहे. माझा मानसपुत्र आहे. त्याला मी किती सहजासहजी मारलं ... कथेतच.

हे... हे मर्सी किलिंग आहे? छे, ते तर कसलं ब्रुटल किंलिंग झालं. आई नाही, जखीण करील असं... यापुढे मला मा. नंदूच्या साहसकथा येणार नाहीत. ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

त्यासाठीच...

प्रियूने बालविश्वाच्या संपादकाला ते शहर सोडण्यापूर्वीच एक पत्र लिहून ठेवले.

"तुमचा व माझ्या असंख्य बालकवाचकांचा मी आग्रह मानू शकत नाही. यापुढे

मी नंदूची कथा लिहू शकणार नाही. का? हा प्रश्न मला विचारू नका. त्याला नितांत वैयक्तिक कारणं आहेत.... मी सोबत माझ्या वाचकांना - बालबंधूंना लिहिलेलं पत्र पुढील अंकात छापा - ही माझी तुम्हाला शेवटची विनंती आहे - आज मी ते शहर सोडत आहे - कायमचं... त्यामुळे माझ्या नावे आलेली पत्रं माझ्याकडे पाठवू नका-

०-०-ô

# ३. अंतरीच्या गूढ गर्भी

'आपण ते पत्र लिहायला नको होतं!' कंडक्टरनं बेल दिली आणि सुपर एक्सप्रेस सुरू झाली. सातारा शहर काही मिनिटांत मागे पडलं. माझ्या हातात एक पुस्तक होतं, पण मी वाचत नव्हतो. डोळे सवयीनं त्या काळ्या शब्दांवरून फिरत होते, पण चेतनेत एकही शब्द अर्थबोध घेऊन येत नव्हता. रात्रीचे साडेनऊ झाले होते. सहज घड्याळाकडे नजर गेली तेव्हा वेळेची जाणीव झाली. ही एक संवेदना - तेवढंच मनात विषयांतर होतं!

आता रातराणीमधले दिवे विझले होते. आणि राजरस्त्यावरून बस सुसाट वेगाने धावत होती. बहुतेक सहप्रवासी पेंगले होते. मी मात्र लख्ख जागा होतो...

"आपण ते पत्र लिहायला नको होतं.."

जयाला ते काल किंवा आज नक्कीच मिळालं असणार. काय वाटलं असेल तिला पत्र वाचल्यानंतर?

कोणत्या ऊर्मीत आपण ते पत्र लिहिलं की - आपण जराही विचार केला नाही तिच्या मनाचा.

आधीच ती भरली बाळंतीण आहे. शरीर व मन या वेळी फारच हलकं असतं असं वडीलधारे म्हणतात. अशा वेळी माझं ते वेडं, आवेगी पत्र....

ओ गॉड? हे मी काय करून बसलो? मानसशास्त्राचा प्राध्यापक म्हणून घेतो स्वत:ला; मी मला हे समजू नये की, प्रसूतीनंतर जन्म दिलेल्या अपत्याच्या संदर्भात एका निखळ, कौतुकभरल्या तृप्त वात्सल्याखेरीज नवजात मातेला काही कळत नाही.

जया पत्रातला मजकूर कसा घेईल?

आता माझ्यातला मानसशास्त्रज्ञ जागा झाला होता. शक्यता ही पण आहे की, तिला हे फार खटकेल, तीव्रतेने खुपेल. ती माझी पत्नी जया आत्यंतिक विव्हळ होईल...

उद्या सकाळी औरंगाबादला आपण सासुरवाडीत जाऊ तेव्हा जयाचं कोणतं दर्शन घडेल?

प्रथम प्रसूती, तीही सुखरूप आणि वर मुलगा झालेला - अशा वेळी स्त्रीला जगज्जेत्याचा आनंद होत असतो.

जयाच्या या आनंदात माझ्या पत्रानं विरजण तर घातलं नाही ना गेलं?

जया - माय डियर - माय डार्लिंग - मला माफ कर - माझा हेतू तू समजशील तसा नाहीये - आणि कधीच नव्हता.

माझ्या हातात मनीपर्स होती - उघडलेली. पेनटॉर्चनं मी त्यात लावलेला जयाचा हसरा फोटो पाहत होतो.

मी जयाला पत्रात लिहिलं होतं.

''कॉग्रेच्युलेशन जया, पुन्हा एकवार अभिनंदन! आपला मुलगा मला फार आवडला. कोणी काही म्हणू दे, मला वाटतं.. तो तुझी प्रतिकृती आहे... मी तुझं बालरूप पाहिलं नाही. ते पाहायची तीव्र इच्छा व्हायची. तुझ्या अवखळ सान्निध्यात दैवयोगानं आता ती पुरी होतेय. हा आपला पुत्र दिसामासांनी वाढताना पाहीन. त्याची बदलते रूप पाहीन आणि कल्पना करीन की, माझी जया लहानपणी अशीच असणार म्हणून. तू माझी पत्नी आहेस, सखी-सचिव तर आहेसच. आता बाळराजाच्या प्रतीकातून कन्या म्हणून मी तुझ्याकडे पाहणार आहे. हा अनुभव केवढा एक्सायटिंग असेल नाही का? कल्पनेनंच मी रोमांचित झालो आहे. तू आता लवकर ये बाबा माझ्या घरी.... तुझ्याविना मी हे चार महिने कसे काढले ते माझे मलाच माहीत.

आणखी एक सजेशन - आपण मुलाचं नाव 'मकरंद' ठेवू या का....? चॉईस तुझा राहील. पण हे नाव ठेवावं असं मला वाटतं.''

पत्रातला हा शेवटचा पॅराच आज माझ्या काळजात सल बनून राहिला आहे.

मकरंद नावाची सूचना मी का केली?

जया कशी रिॲक्ट करेल याला?

मनाची अस्वस्थता वाढत होती, बेचैनीचा पारा झरझर झरझर चढत होता.

मकरंद, मी त्याला कधीच पाहिलं नाही. तरीही त्याचं अस्तित्व माझा पिच्छा सोडीत नाही.

जया त्या संदर्भात माझ्याशी प्रत्यक्ष कधीच बोलली नाही. फक्त विवाहापूर्वी एकदा पत्रानं तिनं मनोगत व्यक्त केल होतं एवढंच.

सरांनीही मला पुन्हा पुन्हा बजावलं होतं.

''हे पाहा, तू माझा आवडता विद्यार्थी आहेस. तरीही तू विचार बदलू शकतोस. मी काही वाटून घेणार नाही. माझी पोर - जया बेटी - फार स्वाभिमानी आहे. तिला आणि मलाही दया नकोय. भीक तर नकोच नको....

सर साताऱ्याला आले तेव्हा आग्रहाने मी त्यांना माझ्या दोन रूमच्या ब्लॉकवर ठेवून घेतलं होतं. ते फार काळजीत होते. मी जेव्हा त्यांना खोदून खोदून विचारलं

तेव्हा त्यांनी अनिच्छेनं सांगितले. त्यांच्या सांगण्यानं मला धक्काच बसला.

जयाचा मकरंदशी साखरपुडा झाला होता. सरांची एकुलती एक कन्या म्हणून त्यांनी मोठ्या उत्साहात हा समारंभ केला आणि लग्नतिथी ठरली असता व लग्नाची तयारी सुरू असता मकरंद स्कूटरवरून जाताना त्याला एक भरधाव वेगानं जाणाऱ्या मालट्रकनं उडवलं आणि एक तरुण जीवाची त्यात इतिश्री झाली!

सर या आघातानं भयंकर खचले होते. जयाची अवस्था मी न पाहता कल्पनेनं जाणू शकत होतो.

एकदा विषयाला तोंड फुटल्यानंतर सर बांध फुटल्याप्रमाणे आवेगानं बोलत राहिले आणि मी भावविभोर होत ऐकत राहिलो.

मकरंद देखणा होता, सरांना तो बेहद्द आवडला होता जावई म्हणून. बजाज ऑटोमध्ये उच्चपदस्थ तंत्रज्ञ होता. चार आकडी पगार होता. पवईच्या आय. आय. टी. संस्थेत इतकी वर्षे शिक्षणासाठी राहिला होता, तरीही शालीन व सुसंस्कारित होता.

आता मला जया पण आठवत होती. मी तेव्हा औरंगाबादला एम. ए. करीत होतो. तेव्हा सरांकडे जात येत असायचो तेव्हा 'स. भु.' ची कॉलेज कन्यका होती.

सरांनी आणि काकूंनी तिला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपली होती.

आणि जया होती पण तशीच - लाखात देखणी, अति हुशार आणि स्मार्ट ... चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व. देव एखाद्याला भरभरून देतो ते असं!

मला ती फार आवडायची. तिचं एक जीवघेणं आकर्षण आणि सततची ओढ चित्तात ठसली होती. पण मला माझ्या भावना त्या वेळी कधीच प्रकट करता आल्या नाहीत.

कारण सर माझं एक श्रद्धास्थान होतं. या अनाथ मुलाला त्यांनी माया दिली, मार्गदर्शन केलं. मी कोण कुठला. कॉलेजमध्ये शेकडो विद्यार्थ्यांमधला मी एक, तरीही माझ्या बुद्धिमत्तेचं त्यांनी कौतुक केलं आणि विषयाच्या निवडीत मार्गदर्शन केलं. आजही मागे वळून पाहिलं, तर त्यांचं मार्गदर्शन केवढं अचूक होतं याची जाणीव होते. कारण शिक्षणक्रमात आवडीचा विषय निवडणं आणि व्यवसायही त्याच क्षेत्रातला मिळणे हे दुर्लभ भाग्यच म्हणायला हवं. ते माझ्या वाट्याला आलं ते सरांमुळे.

त्यामुळे त्यांच्या लाडक्या लेकीचा हात मागण्याचं माझं धाडस झालं नाही. एक तर मी अनाथ, रूपानं जेमतेम, आणि नोकरी एका प्राध्यापकाची - तीही जुनियर स्केलमध्ये ....

एखाद्या राजकुमाराचं आयुष्य फुलवण्याचं सामर्थ्य आणि सौंदर्य असलेल्या जयाच्या कपाळी 'पांढऱ्या पायाची' म्हणून शिक्का बसला होता.

त्या रात्री मी झोपू शकलो नाही. मनात बऱ्याच दिवसात न पाहिलेल्या, पण मनमानसात पूर्ण सौंदर्यखुणांसह ठसलेल्या जयाच्या भवितव्याची भेसूर, वेडीवाकडी

चित्रं येत होती.

सकाळी मी सहाच्या ठोक्याला उठलो तो एक निश्चय मनोमन करून, 'सराकडे आपण जयाची मागणी करायची.'

माझ्या मनात का तिची अनुकंपा होती? का कॉलेजवयीन आकर्षण - जे कालौघात आजही कायम होतं? मला आजही - मी मानसशास्त्रज्ञ असूनही नीटसा उलगडा होत नाही. कदाचित दोन्ही भावना अर्धस्फुट असाव्यात...

सरांना मी तेव्हा म्हणालो होतो.

"सर, मी अनुकंपेपोटी मागणी घालतोय असे समजू नका. मी आपला विद्यार्थी आहे आणि पुरेसा रॅशनल आहे. साखरपुडा झाल्यानंतर मकरंदचा मृत्यू ही अशी एक घटना आहे ज्यात जयाचा यत्किंचितही दोष नाही. आणि कॉलेजमध्ये असल्यापासून तिच्याबद्दल सुप्त प्रेम होतं - आजवर मी त्याचा उच्चार करायचं धाडस केलं नाही. आता तुम्ही व जयानं ठरवायचं - मी तुम्हाला योग्य वाटतो का?"

मी त्यांचा आवडता विद्यार्थी असल्यामुळे सरांची मला खात्री होती. प्रश्न खरा होता तो जयाचा! सर औरंगाबादला परतल्यानंतर आठ-एक दिवसांनी जयाचे पत्र आले.

'प्रिय नरेश,

पपांनी मला सर्व काही सांगितले. माझी संमती आहे. पण एक गोष्ट मी आत्ताच स्पष्ट करू इच्छिते. मकरंदशी माझा साखरपुडा झाल्यावर आम्ही दोन-चार वेळा हिंडलो-फिरलो होतो... अर्थात लक्ष्मणरेषा सांभाळूनच. तरीही माझ्या मनात काही काळ का होईना पती - सहचर म्हणून त्याची प्रतिमा ठसली होती हे खरं...

"मी त्याला विसरायचा प्रयत्न करीत आहे. जखमेवर नक्कीच खपली धरली गेली आहे. कालौघात मी त्याला विसरून जाईन - मला काही काळ तरी व्रण हा राहाणारच, हे मी तुला सांगावं असे नाही. तू मानसशास्त्रज्ञ आहेस. माणसाचं मन केवढं कॉम्प्लेक्स आहे हे तू जाणतोसच. मला तू नीट समजून घेशील ही आशा मी करू का?"

त्या छोट्याशा पत्रानं माझ्या मनात भावनांचा कल्लोळ उठला होता. त्यात किती परस्पराविरोधी भावछटा होत्या, हे मी माणसाच्या मनाचा अभ्यास करणारा असूनही पुरेसं जाणू शकलो नाही.

मनात कुठेतरी दुय्यमत्वाची नांगी डंख मारीत होती.

जया, तू एवढी नितळ, पारदर्शी आणि प्रामाणिक कशी? हे सारं मला ठाऊक होतं तरीही स्पष्टपणे तू ते प्रकट केलंस. सरांची कन्या शोभतेस खरी...

माझ्यावर फार मोठी जिम्मेदारी टाकलीस तू... तुला समजून घेणे - या अशा विचित्र परिस्थितीत... तुझ्या भावविश्वात सहचरावर पहिला ठसा मकरंदचा उमटलेला

आहे. तो अस्पष्ट व क्षणजीवी असला तरी...

अशाही परिस्थितीत तुला माझी करायची. आणि हे करताना तुला तर ही जाणीव द्यायची नाही की, हे मला खटकतंय - कुठे तरी डाचतंय...

मी आपणहून सरांकडे जया मागितली आणि तिचीही 'ना' नव्हती. आता मला माघार घेणं शक्य नव्हतं.

जयानं पत्रात शेवटी लिहिलं होतं -

"तू पूर्णपणे विचार कर आणि इत:परही मला आपली करणार असशील तर तार कर. आणि नंतर मकरंद प्रकरणात एक शब्दानेही मला कधी विचारायचं नाही."

"आता पत्र लिहिताना, विचार करताना जाणवतं, मला तूही आवडत होतास. तेव्हा मी किशोरी होते, थोडी पोरकटही होते. पण तुझंही माझ्या जीवनात तेव्हा पण काही एक स्थान होतं हे नक्की आणि विवाहानंतर मी सर्वस्वानं तुझी होण्याचा पूर्ण प्रयत्न करणार आहे, एवढं प्रॉमिस मी आज देते..."

स्वत:च्या मनावर लगाम घालीत मी तिला तिच्या पत्राप्रमाणे तार केली.

एका शुभ मुहूर्तावर जया माझी झाली...

'जया माझी झाली,' असं मी म्हणतो, पण खरंच ती सर्वस्वानं माझी झाली का? हा प्रश्न माझ्यातल्या मत्सरी पुरुषाला अनेकदा पडायचा. त्याच्या प्रत्युतरा- दाखल माझं दुसरं मन वाद करायचं - सर्वस्वानं दुसऱ्याचं होणं हे कितपत शक्य आहे? प्रेमातलं, जीवनातलं अद्वैत हे खरं आहे का?

तिच्याशी रत असताना कधी कधी मला वाटायचं आमच्यात एक अदृश्य छाया आहे. ती मकरंदची आहे...

हे सारे माझ्या मनाचे खेळ होते. स्वत:ची मला अशा वेळी अक्षरश: चीड यायची. मी माझी शतश: निर्भर्त्सना करायचो.

पत्रात प्रॉमिस केल्याप्रमाणं जया माझी होऊन राहात होती. मी सुखाच्या, तृप्तीच्या परमोच्च शिखरावर होतो. पण या सुखाला कुरतडणारी एक व्यथा होती. या तृप्तीला मत्सराची झालर होती.

जया मकरंदला विसरली का? तिला आठवत नसेल का? तिच्याही मनात माझ्याशी प्रणयक्रीडा करताना कधी तरी तो आठवत असेल का?

तिला दुखवणं मला कधीच शक्य नव्हतं. म्हणून पत्रात कबूल केल्याप्रमाणे कधीही मी तिला चुकून मकरंदबद्दल विचारलं नाही.

मग आत्ताच एकाएकी हे मी काय केलं? ते पत्र मी कोणत्या भावनेने लिहिलं जयाला?

मी स्वत:शी विचार करीत होतो. बसच्या वेगाची लय माझ्या विचारचक्रानं पकडली होती.

मी हाडाचा मानसशास्त्रज्ञ होतो खरा. त्यामुळे माणसाचं मन ही काय चीज आहे, हे काही अंशी तरी मी नक्कीच जाणत होतो.

मनाचा चमत्कारिक असा हाही एक स्वभावधर्म आहे की, विसरू म्हटल्यानं एखादी गोष्ट विसरता येत नाही -

जयाच्या प्रामाणिकतेबद्दल मी निःशंक आहे. ती खरोखरच माझी होण्यासाठी मकरंदच्या तिच्या भावविश्वावर उमटलेला ठसा पुसण्याचा प्रयत्नही सर्व शिकस्तीनं करीत असणार... पण मनापुढे तीही हतबल असणार. विसरायचा जाणीवपूर्वक प्रयत्न करता करता मकरंदचा ठसा, न जाणो कदाचित जास्त गडद व्हायचा संभव पण नाकारता येत नाही. ती स्वतः विषय कधी काढत नाही. मलाही बोलणं शक्य नाही. एक मानसशास्त्राचा अभ्यासक म्हणून हा तर्क करू शकतो....

मला झालेल्या साक्षात्काराने मी घायाळ झालो होतो. स्वतःशीच मी ओल्या लाकडाप्रमाणे निःशब्द जळत होतो. जयानं याचा अर्थ वेगळाच घेतला.

'नरेश, अरे, मी बाळंतपणाला जातेय ती नाईलाजानं... मलाही तुला सोडून जावं वाटत नाही रे. तुझ्यासारखी मीही बेचैन आहे. राजा - विरहानं प्रेम वाढतं म्हणे! पाहू या, पुन्हा आपण जेव्हा असं सर्वस्वानं भेटू तेव्हा किती प्रेम वाढतंय ते...' तिचे मोठाले काळेभोर डोळे साकळले होते.

''प्रेम किती वाढतं ते आत्ताच दिसतंय तुझ्या पोटाच्या आकारावरून'', मी थट्टेनं म्हणालो. ''पुन्हा भेटू तेव्हा प्रेम बाहेर आलेलं असेल...''

तिला मी हसवलं खरं, पण माझ्या मनावरचं सावट कमी झालं नव्हतं...

एखाद्या व्यक्तीबद्दल वाटणारी भावना विसरता येत नाही हे खरं असलं तरी त्यांच्यात बदल करता येतो असंही एक तत्त्व आहे मानसशास्त्राचं. या विषयाचं जर्नल वाचताना मनात एक भावना चमकून गेली.

हे तत्त्व आपण जयाच्या मनाला लागू केलं तर?

तिच्या मनात आजही मकरंदबद्दल काही भावना, सख्या-सहचराच्या-असतील तर त्या आपण नष्ट करू शकत नाही, त्यांच्यात परिवर्तन आणू शकतो....

माझ्या एका लेखकमित्राची मला आठवण झाली. तो नेहमी म्हणायचा, 'पत्नी ही थोडी आई पण असते नवऱ्याची.' जयासारखी पत्नी लाभल्यावर त्यातला सत्यांश जाणवतो. याचा अर्थ असा की, पतीकडे स्त्री मुलासारखी पाहू शकते...

आमच्या नवजात पुत्राने जेव्हा जीव धारण केला, तेव्हा जयाच्या मनात मी असेन - नसेन, कदाचित मकरंद असेल किंवा आम्ही दोघेही असू एकाच वेळी...

मकरंदविषयीच्या ज्या काही अस्पष्ट - मधुर भावना जयाच्या मनात आजही जिवंत असतील, त्या जर पुत्रभावनेत, वात्सल्य - उमाळ्यात परावर्तित केल्या तर तीही मुक्त होईल आपल्या भूतकाळापासून - जो आजही माझ्या मनात जिवंत आहे...

म्हणूनच मी तिला पत्रात लिहिलं की, मुलाचं नाव आपण मकरंद ठेवू...

यात माझा थोडा स्वार्थ नक्कीच आहे, पण तिला दुखवावं हा हेतू नव्हता...

माझ्या मनाची गुंतागुंत व माझ्या पत्रामागची ही भूमिका तिला कदाचित समजणारही नाही. पण तिनं वेगळा अर्थ लावू नये हीच मनोमन इच्छा...

जया, मी तुझ्याकडे येतोय ते या भावनेनिशी. मी तुझ्यावर फार प्रेम करतो गं! तू या पत्रानं दुखावली जाऊ नयेस हीच या क्षणी मी आपल्या कुलदेवतेकडे प्रार्थना करतोय...

सकाळी मी नऊ वाजता औरंगाबादला स्टॅण्डला उतरलो आणि रिक्षाने सरांच्या घरी गेलो आणि अधीरतेने, तरीही धडधडत्या अंत:करणाने मी जयाच्या खोलीत प्रवेश केला -

सर मला दारापर्यंत पोहोचवून सुज्ञपणे माघारी गेले.

मी जयाच्या जवळ गेलो, तिचा हात हाती घेतला आणि हृदयाशी धरून पुटपुटलो. ''जया, माय डिअर, माय डार्लिंग.''

ती प्रसन्न हसली आणि म्हणाली, ''आपल्या मकरंदला पाहा ना, मी तर नेहमीच आहे. तो रागवेल अशानं...''

मी चमकलो, पाळण्यातून काढून हृदयाशी तो मासांचा इवलासा गोळा धरला. आणि जयाकडं पुन्हा पाहिले.

तिच्या नजरेत अशी ओढ दाटली होती, जी पूर्वी कधीच नव्हती...

आमच्यातली ती अदृश्य छाया... छे, तिचा मागमूसही आता उरला नव्हता.

० - ० - ०

# ४. बांधा

ती आता लख्ख जागी आहे, पण उठायला मन होत नाहीय. डोळे चुरचुरताहेत... काल रात्री झोप अशी लागलीच नाही. ती ग्लानी होती. डोळे जडावून विसावले होते एवढंच.

अंग कसं जडशीळ झालं... मनाप्रमाणे साऱ्या शरीरातही एक अनिच्छा, एक विमनस्कता भरून आहे...

गजरानं मोठ्या प्रयासानं जडावलेले दुखरे डोळे उघडले. चांगलं फटफटून आलं होतं! आता उठायला हवं.. घरचं सारं व्हायचं आहे...

आणि ते करून रोजगार हमीच्या कामावर जायचं आहे...

शरीराला ओळोखेपिळोखे देत गजरा उठणार तोच हणमंताचा तिच्या शरीराभोवती हात पडला आणि झोपेतच त्यानं तिला कुशीत ओढलं... तीही तेवढ्यात सहजतेनं त्याच्या मिठीत शिरली...

खरं तर काल रात्रीचा रंग कसा तो चढलाच नव्हता. तो असमाधानी, ती बेचैन. तारा न जुळलेल्या त्या खोलीत रात्रभर ती एक ठसकी वेदना घेऊन तळमळत होती, तो मात्र कूस बदलून बिनघोर झोपी गेला होता.

एक अनाम बेचैनी गजराला स्पर्शून गेली आणि झटक्यात तिनं तिच्याभोवती पडलेला हणमंताचा कणखर हात बाजूस सारला... आणि उठून ती खिडकीजवळ गेली. खिडकी उघडताच पहाटेचा थंड वारा तिच्या उतरलेल्या व ताठरलेल्या चेहऱ्याला स्पर्श करून गेला. त्या ताजेपणानं ती सुखावली...

परसदारी जर्सी गाय संथपणे रवंथ करीत होती. तिच्या पुढ्यात मागल्याच आठवड्यात तगाई म्हणून मिळालेला वनखात्याचा चिपाड झालेला शुष्क चारा होता. पहिले दोन दिवस तर गाईनं त्याला तोंडही लावलं नाही. पण भुकेपोटी आता तिनं तोही गोड मानला होता.... संथपणे ती त्या वाळक्या चाऱ्याचं रवंथ करीत उभी होती!

किती वाळली होती ही गाय! दोन वर्षापूर्वी ती चव्हाणाच्या गोठ्याची शान होती. दररोज पाच ते सहा लिटर दूध देणारी; पण दुष्काळाच्या अस्मानी संकटानं तिची पार

ऱ्या गेली होती. आता तिची सारी हाडे उठून दिसत होती.... एकदम चिपाड झाली होती.

जहरी विंचवानं नांगी मारताच वेदनेचा जाळ व्हावा, तशी गजरा मनोमन विव्हळून उठली. तिच्या मनात कसले कसले विचार येत होते, की त्यांच्या स्वैरपिसाट गतीचा आवेग तिला पेलवेना. एका तिरमिरीत ती पुढे झाली आणि खिडकी बंद केली. वळून भिंतीवरचा विरलेला छोटा आरसा हातात घेऊन आपलं शरीर वेगवेगळ्या कोनातून निरखू लागली.

तिच्या कानात पुन्हा एकदा हणमंताचे रात्रीचे बोल घुमू लागले, "गजरे, काय अवस्था करून घेतलीस जरा पहा - हाडं हाडं लागताहेत नुसते... मजा नाही येत पूर्वीसारखी... ती जर्सी गाय आणि तू, दोघीपण हाडकलात...." आणि त्यानं तिला दूर सारलं होतं!

तिच्या हातून आरसा गळून पडला. फुटायचाच तो, पण खाली तिनं दूर केलेलं पांघरूण होतं, म्हणून बचावला एवढंच!

तिची नजर हणमंताकडे गेली. संथ लयीत तो घोरत होता. अंगावर फक्त लेंगा होता. त्याची उघडी, भरदार केसाळ छाती श्वासाच्या लयीनं खालीवर होत होती. त्या छातीत स्वत:चं मस्तक घुसळीत तो पुरुषी दर्प श्वासात खोलवर ओढून घेणं ही तिच्या सुखाची परमावधी होती!

पण आजचा दिवस वेगळेच रंग घेऊन आला होता. त्याचे कालचे काळजात घाव घालणारे बोल अजूनही तिच्या कानात घुमत होते. त्यामुळे त्याचं उघडं, पीळदार शरीर पाहून नेहमी रोमांचित होणारी गजरा आज कडवटली होती.

त्याच्या लेखी तिचं वळसेदार शरीर एवढंच सत्य होतं. त्या सुडौल देहात स्त्रीत्वाची भावना असलेलं तिचं स्त्रीमन त्याला क:पदार्थ होतं!... लग्नानंतर आठ वर्षांनी गजराला हे प्रकर्षानं प्रथम जाणवत होतं. त्याच्या लेखी ती व जर्सी गाय दोन्ही हाडकल्यामुळे निकामी ठरल्या होत्या, हेच सत्य त्यानं काल रात्री बोलताना ठसठशीतपणे अधोरेखित केलं होतं.

तिच्या मनावर मणामणाचे ओझे दाटून आले होते. जिवाच्या कराराने पाझरण्याच्या सीमेपर्यंत पोचलेले डोळे ती कोरडे राखायचा प्रयत्न करीत होती.

कारण जो दिवस कष्ट व श्रमाची एक प्रदीर्घ वाटचाल घेऊन आला होता, त्याची सुरुवात अशी पाझरलेली गजराला परवडणारी नव्हती. चव्हाणांच्या त्या गढीसमान वाड्याची झाडलोट, अंगणसडा, सर्वांचं चहापाणी, मग भाकऱ्या थापणं... कितीतरी कामं तिला यंत्रवत गतीनं उरकायची होती. तीन वर्षं सतत दुष्काळाच्या तडाख्यानंतर वाड्यावरची गडी व बाईमाणूस तिनंच कमी केले होते. त्यामुळे वरकडीची

सारी कामे तिलाच पाहावी लागत होती. आणि हे सारं करून दोन किलोमीटरवर चालू असलेल्या रोजगार हमीअंतर्गत पाझर तलावाच्या कामाला तिला साडेआठच्या ठोक्याला हजेरी लावायची होती.....

पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. अमाप पिकलेल्या उसामुळे जेव्हा वाड्यात लक्ष्मी प्रसन्नतेनं संचारत होती, तेव्हा हणमंतानं हौसेनं तिला शहरातून घड्याळ आणलं होतं. स्वयंचलित आकड्यांचं. त्याच्या जोरावर ती कामावर वक्तशीर पोहोचत असे. पण त्यामुळे सुरुवाती सुरुवातीला तिची प्रचंड टिंगलही झाली होती. तो हलकट मुकादम तिला फिदीफिदी हसत म्हणायचा, "तालेवाराची बाई तू, घड्याळ लावून कामावर येतेस! कशाला उगीच एका जीवाचा रोजगार बुडवतेस?"

खानदानी मराठा संस्कारात वाढलेल्या गजराला ते मनस्वी लागायचं. पण परपुरुषाशी फटकन काही बोलावं हा तिचा स्वभावच नव्हता. तेव्हापासून तिनं ते घड्याळ वापरणंच सोडून दिलं होतं! पण घरातून आठ ते आठ पाचला निघायचं, हा तिचा परिपाठ होता, ज्यायोगे ती कामावर वेळेवर पोहोचायची....

पण रोज सकाळी आठाकडे झुकणारे ते घड्याळाचे काटे पाहिले की, तिला वाटायचं.. हे घड्याळ उचलून फेकून द्यावं. नको ती धावपळ, नको ते कामावर जाणं आणि नको ते उरस्फोडी काम... ज्यामुळे शरीर सुकत चाललेय... मांसलता कमी होत चाललीय....

"धनी... ते काय बोलून गेलात तुम्ही?" तिच्या मनावर उठलेला हा दुसरा ओरखडा. "जीव कसनुसा झाला बघा. पण तुम्हास्नी काय हो त्याचं? आपलं पाठ फिरवून खुशाल घोरत पडल्यावर कसं कळावं? गरीब ग्रामसेवकाची पोर असले तरी पण माहेर खानदानी आहे धनी, तिथली पण रीत हीच होती. घराबाहेर पडायचं ते देवदर्शनाला किंवा लगीन ... हळदीकुंकवाला, पण हे अस्मानी संकट आलं आणि हे असं विपरीत झालं...."

भिंतीला लगटून गजरा किंचित ओणवी आपल्याच विचारात होती. मी - मी घराबाहेर पडले ते व्यंकूनं - पोटच्या गोळ्यानं भुकेसाठी रडणं सुरू केलं तेव्हा. घरी दूधच काय, पण भाकरीचा तुकडाही शिल्लक नव्हता. आणि हे, धनी, तुम्हाला सांगून तरी काय उपेग झाला नसता. तुम्ही इनामदारीच्या तोऱ्यात. निसर्गाची कृपा होती. ऊसशेती होती तेव्हा हा तोरा खपून गेला. पण अतिपाण्यानं जमीन खारावली, फुटली. ऊस पिकेना. आणि मग लागोपाठ तीन वर्षे दुष्काळ. विहीर पण आटली. गतवर्षी जेमतेम हायब्रीड पदरी पडली...."

चांदण्यासारख्या दाणेदार ज्वारीची पांढरीशुभ्र भाकर खाण्यास चटावलेली जीभ हायब्रीडची काळपटलेली जाड भाकरी पाहून रसना पाझरायची विसरली. पण भुकेच्या आगीनं लोचट होऊन ती त्यालाही नंतर सरावली म्हणा!

असा हा दुष्काळाचा फटकारलेला आसूड. त्यात दुसरी विहीर खोदताना खडक लागल्यामुळे बोकांडी बसलेलं बँकेचं कर्ज. त्यांनीही ताठर धोरण स्वीकारून जमिनीचा लिलाव पुकारला वसुलीसाठी. स्त्रीधन म्हणून आलेला काळ्या आईचा पाच एकराचा तुकडा बेभाव गेला, तेव्हा गजरा ओक्साबोक्सी रडली होती. पित्याचं मायेचं पांघरूण उडलं जाऊन ती जणू उघडी पडली होती....

"धनी - या अस्मानी सुलतानीनं भल्या-भल्यांची जिरली, पण तुमचे पाय जमिनीवर कधी आलेच नाहीत. कष्ट करायची, राबायची सवयच नाही तुमास्नी, त्याची लाजबी वाटते... म्हणून मला, डोईवरचा पदर न घसरणाऱ्या गजराला, ओचा मारून रोजगार हमीच्या कामावर मजूर म्हणून जावं लागलं! घरचा धनी जेव्हा घरट्यातल्या पाखरासाठी घास कमवीत नाही, तेव्हा बाईला आपली मानमर्यादा विसरून पुढे यावं लागतं... यात माझं काय चुकलं?...."

गजरा आपल्या निर्णयाबद्दल या दुखऱ्या अवस्थेतही ठाम होती. तरीही सवाल होताच... मग हा बोल का? हा आपला बाईपणाचा अपमान का? "हाडंहाडं लागत आहेत - पूर्वीसारखी मजा येत नाही...."

विरलेल्या खणाची चोळी दंडाला सैलावली होती. गुलाबी हात कामानं करपले होते, घट्ट झाले होते. डौलदार बांधाही आक्रसला होता!

हे.... हे बदललेलं रूप हणमंताला रुचेनासं झालं आहे!

गजरानं पुन्हा एकदा स्वत:कडे नजर टाकली......

'होय, मी बदललेय, माझं रूप बदललंय. हाडं चिवट झाली आहेत. शरीरात कष्टाची ताकद ठासून भरली आहे आणि त्याला वाट करून देण्यासाठी म्हणून तकलादू श्रमाची आंच लागताच वितळणारं पोशीव मांस झडत गेलंय एवढंच... या नव्या हाडकलेल्या गजरेचा मला अभिमान वाटतो. ही मीच आहे, पण खुल्या आभाळाखाली मुक्त श्वास घेणारी... रोज दहा ते बारा रुपये कमवणारी एक उत्पादक स्त्री मजूर, कामगार!

या... या.. साऱ्याचा मला अभिमान आहे.'

आपल्याच विचारात नादावलेल्या गजराला भान आलं ते सासूच्या हाकेनं. "सूनबाई, उठलीस की नाही? हा व्यंकू जागा झालाय. दूध मागतोय...."

लगबगीनं गजरा बाहेर आली आणि दैनंदिन संसाराच्या कष्टाची चक्रं फिरू लागली... घरची सारी कामं आटोपली, तरी हणमंता घोरतच पडला होता. त्याला उठवावं, त्याचं चहापाणी करून द्यावं, असं मनात आलं, पण वेळ नव्हता. आणि त्याच्याकडे पाहताना पुन्हा एकदा एक दुरावा उफाळून आला. एका झटक्यात ती बाहेर पडली आणि लगबगीनं कामाकडे चालू लागली.

पाझर तलावाचा निम्मा अधिक बांध झाला होता. त्याच्याकडे पाहिलं की,

गजराला अभिमान वाटायचा. जाणवायचं की, एक मजूर म्हणून याच्या उभारणीत माझेही श्रम सामील आहेत! जेव्हा तो पूर्ण होऊन पाणी अडवलं जाईल, तेव्हा या गावची बरीच जमीन बागायती होईल, विहिरींना पाणी वाढेल. हळहळ एकच होती, बँकेनं लिलावात जो पाच एकराचा तुकडा विकला होता, तोही बागायत होत होता. पण आता त्याचा धनी वेगळा होता.

त्यांच्या गप्पा रंगत असताना मुकादम त्यांच्या समोरून गेला, पण त्यानं गजराकडे पाहिलं न पाहिल्यासारखं केलं. इतर चार बाईमाणसांप्रमाणेच ती एक. त्याच्या लुबऱ्या नजरेचा तिला तिटकारा होता, त्यामुळे त्याचं आजचं झालेलं दुर्लक्ष तिला दिलासा देऊन गेलं... पण ते क्षणभरच.

दुसऱ्याच क्षणी सकाळपासून मनात उठलेल्या पिसाट विचारांना पुन्हा एकदा चालना मिळाली आणि ती मनस्वी घायाळ झाली....

हा मुकादम जेव्हा गजरा प्रथमच या कामावर आली, तेव्हा कसा डोळे फाडून फाडून आरपार पाहात होता. ती किती भेदरली होती! अशा परक्या पुरुषाच्या नजरेची तिला अजिबात सवय नव्हती. हा आपला घाटदार देह, हणमंताच्या अभिलाषेचा विषय, एका परपुरुषाच्या नजरेत वासना पेरतो व लाळ गाळायला प्रवृत्त करतो याचा तिला विषाद वाटला, पण त्याकडे दुर्लक्ष करून ती काम करीत राहिली होती!

त्या रात्री किती वेळ तरी ती हणमंताच्या कुशीत हमसून रडत होती. 'धनी, ही काय पाळी आणली वो तुमी माझ्यावर?''

''खरं सांगू गजरा, तुझं हे आजचं कामावर जाणं मला पसंद नव्हतं. मी तुला कालच म्हणलं होतं - ही आपली कामं नव्हेत. काही झालं तरी इनामदाराचं घराणं आपलं!'

''ते नगा सांगू मला - घरात व्यंकू - आपलं एकुलतं एक पोर भुकेनं रडतंय... त्याचं बोला...''

''मी आज - उद्या काहीतरी बंदोबस्त करतो पैशाचा - साले, सर्वजण चोर आहेत. एवढे त्यांच्यावर उपकार केले, पण वेळेला एकही मदत करीत नाही.''

''धनी, संकट का एखाद्यावर आलं आहे? साऱ्यांनाच या दुष्काळाचा तडाखा बसला आहे. साऱ्यांचेच हे हाल आहेत.''

क्षणभर गजरा घुटमळली, बोलायचं धाडस होत नव्हतं. तरी पण चाचरत धीर एकवटून म्हणाली ''जो मार्ग मी पत्करलाय, तो नाही तुम्हला जमणार? जोडीनं कामावर जाऊ रोजगार हमीच्या. अनेकजण तसे येतात. रोज तीन किलो धान्य मिळेल कुपनावर - हप्त्याला शंभरसव्वाशे रुपये पण मिळतील....''

''काय म्हणतीस? मी तुझ्यासंग रोजगार हमीच्या कामाला येऊ? यडी का खुळी? हा इनामदार, चव्हाणाच्या खानदानीचा, मजूर म्हणून काम करील? छट्, ते

शक्य नाही...''

"मी नाही जात?'' गजरा शांतपणे म्हणाली, "वेळवखत आला की मानपान बाजूस सारावा लागतो आणि कर्ज करण्यापेक्षा, उसनंपासनं घेण्यापेक्षा कष्ट करून रोजीनं दहा बारा रुपयेच का होईना कमावणं चांगलं नाही का?''

"गजरे, एक दिवस कामावर गेलीस अन् चुरुचुरु बोलायला लागलीस? हे तुझे भिक्कारडे विचार तुझ्याजवळच ठेव. मला ते पटायचे नाहीत. मी तुला कामावर जाऊ देतोय ते मोप हाय...''

आणि त्यानं हा विषय तिथंच संपवून टाकला होता.

हताश होऊन गजरा आपल्या नवऱ्याकडे पाहात राहिली. हा पहिलाच प्रसंग होता, जेव्हा तिला आपल्या नवऱ्याची मनस्वी चीड आली होती. 'असला कसला हा अट्टाहास?... वेळवखत जाणता येत नाही.... घरी पोटचा पोर उपासमारीनं सुकलाय.... त्याच्या दुधाची परवड चाललीय... काही म्हणून काम करायला नको.... अशा वेळी पण... मग याला पुरुष कशाला म्हणायचं? आपल्या शरीरावर हक्क गाजवतो म्हणून?'

तिला वाटलं हेतं.. हणमंता आपलं ऐकेल. आपण जोडीनं कामावर जाऊ. म्हणजे मुकादमाची लुब्री नजर शांत हेईल... बिनधोकपणे काम करता येईल. पण छे.... आपल्याकडे का पुरुष घरच्या बायकांचे ऐकतात? हा आपला नवरा तर शहाण्णव कुळीचा... तो कसा ऐकेल?

आपल्या मनातले बंडखोर विचार तिला पेलवेनात. तेव्हा प्रयत्नपूर्वक ते तिला मनाआड करावे लागले होते.

पण आज तीन महिन्यानंतर पुन्हा तसेच विचार मनात येत होते आणि पुन्हा एकदा मन शिणत होते!

कामाची तपासणी करून इंजिनिअर साहेब गेले आणि कामाला सुरुवात झाली. गजराही आपल्या गँगमध्ये काम करू लागली. पुरुष गडीमाणसं माती खोदीत होती व टोपल्यातून ती माती भरावावर स्त्री मजुरांमार्फत टाकली जात होती.

आता कामाला गती आली होती. उन्हं वाढत होती, त्याचे चटके बसत होते. अंग घामेजली होती, पण पदरानं घाम पुशीत काम अव्याहत चाललं होतं...

दुपारी जेवायची सुट्टी झाली, तेव्हा झाडाखाली आपल्या मैत्रिणीसोबत गजरानंही भाकरीची पुरचुंडी सोडत जेवायला सुरुवात केली. भरपूर घाम गाळल्यानंतर हायब्रीडची भाकरीही आताशी गोड वाटत होती!... ती खुदकन हसली...आपण बदलत आहोत. शरीरानं आणि मनानंही. शरीरानं जास्त चिवट, अधिक कणखर. मनानं बंडखोर व विचारी.

पुन्हा एकदा ती सल ठसठसू लागली...

मुकादम आता आपल्याकडे पाहिल्यासारखं अभिलाषी नजरेनं पाहात नाही. का? या प्रश्नानं ती बावरली आणि कानात त्याच वेळी हणमंताचे ते बोल घुमू लागले. आता आपण पूर्वीसारखे आकर्षक राहिलो नाहीत? देहाची पुष्टाई अन् गोलाई कष्टाच्या कामानं कमी झाली आहे हे खरं.. त्यामुळं का आपलं स्त्रीत्व.. बाईपण अनाकर्षक होतं? हा पुरुषी कावा आहे. त्यांचा विकृत, ओंगळ दृष्टिकोन आहे. बाईमाणूस म्हणजे फक्त तिचं शरीर? त्यातलं मन, त्या मनाचं प्रेम.. निष्ठा काहीच नाही?

हणमंता हा आपल्या कुंकवाचा धनी. सारं काही आपण त्याला दिलं. हे शरीर तर त्याच्या हक्काचं आहे, पण हे मनही त्याला दिलं. त्याचं धन्याला काहीच अप्रूप नाही!

आपल्या शरीरातला बदल त्याला जाणवला, पण मनातला केव्हा जाणवणार? ज्या क्रमानं शरीर झडत गेलं. त्याच क्रमानं मन उन्नत होत गेलं. अनुभवाच्या शाळेत शिकता शिकता, रोजगार हमीच्या कामावर मुक्त श्वास घेता घेता खूप काही समजून येतंय आणि मनात नाना प्रश्न उभे करतंय....

हे सारं हणमंताशी गजरा कधी बोलली नव्हती. का? विचार करता तिच्या मनानं कौल दिला की, धनी हे कधी समजून घेणारच नाहीत. त्यांना फक्त देह कळतो, त्यात एक मनही असतं, हे त्यांना कधी समजून घ्यावंसं वाटतंच नव्हतं!

मीच खुळी... सतत आपल्याभोवती धनी कबुतराप्रमाणे घुमायचे. माझ्या शरीराचे लाड लाड करायचे. आपण त्याला प्रेम.. प्रीती समजलो. संसार मानला. आपली ती चूक होती. तो केवळ वासनेचा उमाळा होता. शरीराची गोलाई कमी झाली, बांध्याचा उभार ढासळला आणि त्यांचं लक्षही उडालं...

गेल्या कित्येक रात्री रंगल्या नव्हत्या. प्रत्येक वेळी तो असमाधानी, ती बेचैन. त्याचं कारण हे तर नसेल....?

दिवसभर गजरा यंत्रवत गतीनं काम करीत होती, पण मनात हे असे विचार पुन्हा पुन्हा येत होते आणि मन प्रक्षुब्ध होत होतं.

चारच्या सुमाराला मुकादमानं सांगितलं... आज मागच्या हप्त्याचा पगार होणार आहे. साऱ्यांचे चेहरे फुलून आले. गजरालाही बरं वाटलं. कारण कालच घरातलं पीठ संपलं होतं. मीठ-मिर्ची पण जेमतेम होती. बरं झालं... कुपनावर रेशन दुकानात जाऊन गहू घेता येतील व इतर सामानही उद्या बाजारात खरेदी करता येईल...

कमरेला गाठीत पैसा मारून गजरा वेगानं परतीच्या वाटेला लागली होती... घराची ओढ मनाला अधीर करीत होती... व्यंकूच्या आठवणीनं वात्सल्य उफाळून आलं होतं. हल्ली व्यंकूला जवळही घेता येत नाही. वेळेअभावी...

औंदाचा मौसम जवळ येतोय. पीकपाणी ठीक झालं तर दैन्य कमी होईल. कदाचित रोजचं हे उरस्फोडी रोजगार हमीचं काम करायची पाळी येणार नाही. आराम

मिळेल, हे सुकलेलं शरीर पुन्हा भरून येईल. पुन्हा आपण हणमंताच्या प्रेमाला पात्र होऊ...

"आईऽगं..." गजराला जोरदार ठेच लागली होती. आपल्या विचाराच्या नादात चालताना तिला भानं राहिलं नव्हतं. कळवळून ती काही क्षण खाली बसली. रक्ताळलेला अंगठा तिनं दाबून धरला. कळ ओसरताच पुन्हा ती उठून चालू लागली....

पण आपण पूर्वीप्रमाणे हणमंताशी समरस होऊ...?

गजरा या प्रश्नासराशी पुन्हा अडखळली... आताची ठेच ही मनाला होती, तरी चालण्याच्या गतीमध्ये खंड पडला नव्हता.

हे तर सरळ बाजारबसवीप्रमाणे झालं! किंमत आहे ती केवळ मांसल देहाला... या मनाला काही मोल नाही?

वाडा दिसू लागताच मनातले भरकटलेले विचार मागे पडले आणि समोर खेळत असलेला व्यंकू तिला पाहाताच पळत येऊन चिकटला. तिनंही त्याचा मायेनं मुका घेतला!

अंमळसा विसावा घेऊन गजरा पुन्हा घरच्या कामाला लागली. चूल पेटवून चपात्या भाजू लागली. व्यंकू समोर ताट घेऊन बसला होता. सासूला पण तिनं वाढून दिलं होतं!

हणमंता घरी नव्हता. सासूलाही बाहेर जाताना सांगून गेला नव्हता. त्या रात्री तो घरी आलाच नाही. त्यामुळे गजरालाही पोटात भुकेचा आगडोंब उसळूनही उपाशी निजावं लागलं.... दिवसभराच्या कामानं शरीर मोडून आलं होतं. आदल्या रात्रीच्या जाग्रणानं आधीच डोळे चुरचुरत होते... परत आजही किती वेळ तरी झोप आली नाही. केव्हातरी पहाटे तिचा डोळा लागला.

आणखी एक नवा दिवस.. पण आज बाजाराचा दिवस म्हणून कामाला सुट्टी होती. तरी दुपारी बाजाराला जायचं होतं.. प्रपंचाच्या वस्तू खरेदीला. पण रात्रभर हणमंता न आल्यामुळे गजराचं कशातच मन लागत नव्हतं!

कुठं गेला असेल बरं हणमंता?... हा प्रश्न तिला सतत सतावत होता. शेजारच्या नामदेवानं सर्वत्र पाहिलं, पण पत्ता लागला नाही. एवढं मात्र समजलं होतं की, तो साखर कारखान्याच्या गावी जाऊन दुपारी परतला होता व संध्याकाळी परत बाहेर पडला होता.

चहा झाल्यावर ती वेणीफणीला बसली, तोच आवाज आला. म्हणून तिनं डोकावून पाहिलं... दारात हणमंता उभा होता. त्याला स्वत:चा तोल सावरत नव्हता. डोळे तांबरलेले... कपडे विस्कटलेले... गजराच्या अंगावर भीतीचा काटा सरसरून आला. ती पुढे झाली आणि तिच्या नाकात एक घाणेरडा दर्प शिरला... हा दारू पिऊन आला आहे खचितच.

"कुठे गेला होता धनी रातच्याला, सांगून पण गेला नाहीत सासूबाईस्नी?...."

"वेडी का खुळी तू गजरा?" खदाखदा हसत हणमंता म्हणाला, "शेवंताबायकडे जाताना का आईला सांगून जायचं असतं?"

"धनी, हे मी काय ऐकतेय?"

"खूप मजा आली. काय मस्त आहे शेवंताबाय! साली काय गच्च भरली आहे...." आणि बीभत्स हातवारे करीत तो सांगू लागला.

"शी.... शी...! इथे मी तुमची लग्नाची बायकू जिती हाय... तरी तुम्ही बाजार हुडकता?" तिचा संताप आवरत नव्हता.

'तुझ्यासंगं मजा नाही येत... हाडंडाडं लागतात. छे! बाई कशी हवी!"

संताप व कमालीच्या उद्वेगानं गजरा भणाणून गेली होती. काल दिवसभर मनात जे ठसठसत होतं, ते एवढं खरं व्हावं याची तिला खंतही वाटत होती...

यावर्षी निसर्ग मेहरबान होता. पाऊसपाणी वक्तशीर व वेळेवर झाला. पुन्हा एकदा हणमंताच्या शेतात ऊस व गहू बहरून आले....

पाझर तलावाचं काम संपलं होतं. पाऊस ओसरताच गावातच पुन्हा जमीन सपाटीकरणाचं काम निघालं. ग्रामपंचायतीनं दवंडी दिली आणि गजरा पण कामावर जायला निघाली.

"गजरे, आता कशाला जातेस कामावर? आवंदा शेतं झकास पिकली आहेत. आता काय कमी आहे आपल्याला?"

"जरा स्पष्ट बोलू का? राग नाही ना धरणार धनी?" गजरा धीटपणे म्हणाली, "कमी आहे ती माझ्यामध्ये... मी सुकलेय, नुसती हाडंहाडं लागतात ना.....!"

"होय गजरे, पूर्वी तू किती छान दिसायचीस.... या रोजगार हमीच्या कामानं पार रया गेली बघ तुझी."

"म्हणूनच तुमचं बाजारबसवीकडे जाणं सुरू झालं!" गजरा धीटपणे म्हणाली, "मला हौस नव्हती कामावर जाण्याची. पण पोटाला फासे पडल्यावर कुणीतरी कमावून आणलं पाहिजेच की!"

"पर ते जाऊ दे, आता सारं ठीक झालंय ना?"

"नाही धनी, ठीक झालं असेल ते तुमच्यासाठी. या गजरेसाठी नाही."

"तुला म्हणायचं तरी काय आहे?...."

"ही गजरा नकोच होती तुम्हाला कधी... पाहिजे होतं ते तिचं शरीर! ते हाडकलं आणि तुम्ही बाजार जवळ केला!" गजराचा आवाज कापत होता, "धनी, आज बाजार जवळ केला.... उद्या घरी सवत पण आणाल. परवा मला घराबाहेर पण काढाल....."

"छे, छे! असं कसं होईल?"

"न व्हायला काय झालं? तुम्ही बाजारात सुख हुडकाल, हे तरी कुठं वाटलं होतं?..." गजरा म्हणाली,

"मला कामावर गेलंच पाहिजे. कष्टाची सवय ठेवली पाहिजे. कारण मला केव्हाही घराबाहेर काढलं जाईल. या घराचा, या घरधन्याचा काही भरवसा देता येत नाही. माझा आधार तुटलाय, तेव्हा मला माझ्या पायावर उभं राहिलंच पाहिजे. संसारात जोडीदाराला जेव्हा फक्त बाईचा देहच पाहिजे असतो, त्या बाईसाठी तो संसार कुचकामी आहे. त्यात अख्ख्या जिंदगीचा आधार शोधता येत नाही - सापडत नाही... या रोजगार हमीच्या कामानं अशा बायांना.... ज्यात मी सुदिक आहे.... आपल्या स्वत:च्या पायावर उभं राहायची ताकद दिली आहे... मार्ग दिला आहे, तो मला सोडून चालणार नाही....."

....आणि ती कामासाठी घराबाहेर पडली.

o - o - o

# ५. भूकबळी

"सर - कलेक्टर साहेब लाईनवर आहेत."

टेलिफोन ऑपरेटरने सांगितलं, तेव्हा तहसीलदार शिंदेंची झोप खाडकन उडाली व ते घाईघाईने म्हणाले, "जोडून दे."

काल रात्री त्यांना झोपायला बराच उशीर झाला होता, काल दिवसभर त्यांनी साक्षरता अभियानाच्या प्रचारासाठी दहा-बारा खेड्यांना भेटी देऊन मीटिंगा घेतल्या होत्या व शेवटी मांजरीला सरपंच व साक्षरता अभियानाच्या कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी बसवलेल्या कलापथकाच्याही कार्यक्रमाला थांबले होते. साहजिकच घरी परतायला रात्रीचा एक वाजून गेला होता व आज जाग आली तेव्हा आठ वाजून गेले होते

मूड अजूनही आळसावलेलाच होता. रेणुकानं दोनदा बजावूनही शिंद्यांनी अद्याप ब्रश केला नव्हता. त्यांची बेड-टीची सवय लग्नानंतर तिने मोडून काढली होती. आजही तिनं तेच बजावलं होतं, "ब्रश केल्याशिवाय चहा मिळणार नाही." पण उठावंसं वाटत नव्हतं, ते तसेच पडल्या पडल्या कालची वृत्तपत्रे वाचत होते. त्यांच्या तालुक्याला जिल्हा व प्रमुख वृत्तपत्रे सायंकाळी चारला येत असत. कारण मुख्य रस्त्यापासून तालुका दूर होता. त्यामुळे रोज सकाळी ताजी वृत्तपत्रे वाचायचा आनंद शिंद्यांना इथे तहसीलदार म्हणून नेमणूक झाल्यापासून मिळत नव्हता. तेव्हा सायंकाळी आलेले पेपर्स रात्री ऑफिस किंवा दौरा करून आल्यानंतर वाचणे किंवा परतायला खूप उशीर झाला तर दुसऱ्या दिवशी वाचणे व्हायचे.

कालची वृत्तपत्रे चाळत असतानाच टेलिफोनची रिंग वाजली. तेव्हा पडल्या पडल्याच हात लांबवून पलंगाच्या कडेला असलेल्या टेबलावरील फोनचा रिसीव्हर उचलला व ते जड स्वरात म्हणाले, "हॅलो...."

"सर, कलेक्टर साहेब लाईनवर आहेत." शिंद्यांचा आळस क्षणार्धात उडाला. काही महत्त्वाचे काम असल्याखेरीज कलेक्टर सकाळी सकाळी घरी फोन करणार नाहीत, हे त्यांना ठाऊक असल्यामुळे ते ताडकन उठून बसले व म्हणाले, "जोडून दे."

खटकन् आवाज झाला, "हॅलो, चंद्रकांत?"

"गुडमॉर्निंग सर!" शिंद्यांनी आवाजात आदब आणीत अभिवादन केलं.

"व्हॉट इज गुड इन धिस मॉर्निंग, चंद्रकांत?"

कलेक्टरांचा रोखठोक स्वर कानी पडताच ते चमकले, सावध झाले. काहीतरी अघटित घडलंय, जे तहसीलदार असून आपल्याला माहिती नसावं किंवा आपण रिपोर्ट न केल्यामुळे इतर मार्गांनी त्यांना काहीतरी समजलं असावं. अन्यथा ते तसे शांत व खेळकर आहेत. पण आजचा नूर काही वेगळा दिसतोय. शिंद्याच्या मनाला एक अल्पशी भीतीची लहर स्पर्शून गेली.

"पार्डन सर - माझं काही चुकलं का?" कलेक्टरांना काय म्हणायचं होतं हे माहीत नसलं तरी नोकरशाहीच्या शिरस्त्याप्रमाणे वरिष्ठापुढे आपली असलेली - नसलेली चूक कबूल करत शिंदे हळुवारपणे आवाजात नसलेली नम्रता आणीत म्हणाले.

"आजचा 'मराठवाडा' वाचला आहे?"

"नाही सर, तो इथं दुपारी येतो चार नंतर-" शिंद्यांनी खुलासा केला, "काही विशेष सर?"

"भयंकर आहे - तुमच्या तालुक्यात भूकबळी पडल्याची बातमी आहे - समजलं?"

आता कुठे कलेक्टरांच्या तीक्ष्ण स्वराचं मर्म शिंद्यांच्या लक्षात आलं होतं. महसूल खात्यात जरी ते नवीनच थेट तहसीलदार म्हणून लागले असले तरी खाण्यासाठी भूकबळी पडणं ही किती नामुष्कीची गोष्ट आहे हे ते जाणून होते. या वर्षी पूर्ण जिल्ह्यात पावसाअभावी अवर्षण परिस्थिती होती, तर त्यांच्या तालुक्यात शासनानं मागच्याच आठवड्यात दुष्काळ जाहीर केला होता. रोजगार हमीची कामे फार मोठ्या प्रमाणावर सुरू होती, त्याच्या संदर्भात मजुरी - भ्रष्टाचाराच्या तक्रारी, धान्य कुपनावर धान्य न मिळणे किंवा जादा भाव लावणे इत्यादी तक्रारीही त्या प्रमाणात वाढल्या होत्या. याखेरीज दररोज कुठल्या ना कुठल्या गावातून नवीन कामाची मागणी येत होती. पुन्हा त्यांच्या तालुक्यात 'शेतकरी शेतमजूर पंचायत' प्रभावी होती. त्यांच्यामार्फत लेखी फॉर्म भरून कामाची मागणी व्हायची. अशा वेळी कायद्याप्रमाणे त्यांना त्वरित रोजगार हमीचे काम देणे भाग पडायचे. अन्यथा बेकार भत्ता देणे बंधनकारक होते व ते 'मागेल त्याला काम' देणाऱ्या राज्यशासनासाठी नामुष्कीची बाब होती. त्यामुळे शिंद्यांना फार दक्ष राहावं लागत होतं, पण रोजगार हमीचं प्रत्यक्ष काम करणारी मृदसंधारण, बांधकाम वा सिंचन विभागाची यंत्रणा मात्र तेवढी जागृत नव्हती, त्यांना दुष्काळाचे म्हणावे तेवढे भान नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षित सहकार्य शिंद्यांना मिळत नव्हतं. समन्वयक म्हणून त्यांना प्रसंगी स्वत:ची तहसीलदारकी विसरून थेट

कनिष्ठ अभियंता वा मस्टर असिस्टंटपर्यंत संपर्क साधावा लागत होता.

शिंदे तरुण होते, उत्साही होते व या वर्षीचा पडलेला दुष्काळ हे एक आव्हान समजून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते, हे कलेक्टर जाणून होते व प्रसंगी मीटिंगमध्ये इतर तालुक्यांच्या तहसीलदारांना सांगत, "शिंद्यांप्रमाणे तुम्हीही सामाजिक बांधिलकीची भावना मनात रुजवा. थोडा रेव्हेन्यू खाक्या विसरून काम करा...."

आणि या पार्श्वभूमीवर कलेक्टर जे फोनवर सांगत होते, त्यामुळे शिंदे अक्षरश: सुन्न झाले होते!

त्यांच्या तालुक्यातील काळगाव दिघी या गावाची एक मध्यमवयीन स्त्री रोजगार हमीचं काम न मिळाल्यामुळे उपासमार होऊन मृत्युमुखी पडल्याची बातमी आजच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. सध्या राज्य विधिमंडळाचे अंदाजपत्रकीय अधिवेशन चालू होते व तालुक्याचे आमदार विरोधी पक्षाचे व रोजगार हमी योजनेच्या विधिमंडळ समितीचे सदस्य होते. त्यामुळे असेंब्लीमध्ये प्रश्न किंवा लक्षवेधी सूचना मांडली जाण्याची शक्यता होती.

कलेक्टरांची काळजी व रागही रास्त होता. वृत्तपत्रात बातमी येईपर्यंत शिंद्यांना माहिती नव्हती, त्यामुळे वरिष्ठ पातळीवर कलेक्टरांना तोंड देणे अवघड होऊन बसले होते.

"सर, या क्षणी मी काही सांगू शकत नाही, पण मी एक-दीड तासात सर्व माहिती घेऊन फोन करतो. आय अॅम एक्स्ट्रीमली सॉरी सर, पण - पण...."

"ओके - इटस् ऑल राईट - चंद्रकांत. पण हे मॅटर तुला, मला जड जाणार आहे. मी आज रामपूरला आहे, तिथं मला फोन करून कळव. किंवा फोन नाही लागला तर चारनंतर सरळ माझ्याकडे हेडक्वार्टरला ये...."

अक्षरश: दहा मिनिटाच्या आत रेणुकाच्या आग्रहाला न जुमानता शिंद्यांनी ब्रेकफास्टही न घेता कार्यालयात येऊन माहिती मिळवायला प्रारंभ केला. त्यांनी जीप पाठवून रोजगार हमीचे नायब तहसीलदार भालेरावांना तातडीने येण्यास सूचित केले व एक शिपाई पाठवून शेतकरी-शेतमजूर पंचायतीचे तालुका चिटणीस विसपुतेंना बोलावून आणण्यास सांगितले.

कार्यालयात नेहमी नवाच्या आत येणारा एम. ए. जी. विभागाचा क्लर्क वाघमोडे सोडता शिंदे एकटेच होते व विचार करीत होते.

गेल्या दोन महिन्यात ज्या ज्या गावातून कामाची मागणी आली होती, तेथे तेथे प्रत्यक्ष जाऊन तेथील मजुरांना त्या गटातच शक्यतो रोजगार हमीचे काम देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. ज्या ज्या मजुरांनी त्यांना काम मागितले होते, त्यांना लेखी पत्र देऊन सोईच्या कामावर पाठवले होते.

तरीही काळगाव दिघीची एक महिला काम न मिळाल्यामुळे उपासमार होऊन

मृत्युमुखी पडली होती व ही वार्ता खरी असेल तर तो भूकबळी ठरणार होता. ही शिंद्यांसाठी वैयक्तिक व तालुक्याचा तहसीलदार म्हणून नामुष्की होती.

विचार करूनही त्यांना आपण कुणाला कामाला नाही म्हणाल्याचं आठवत नव्हतं. पुन्हा पुन्हा ते आपली डायरी चाळत होते, पण अवघ्या एकशेवीस गावांच्या तालुक्यात आजमितीला पंचाहत्तर कामं चालू होती, तरीही काळगाव दिघीची एक महिला काम नसल्यामुळे उपासमारीनं मृत्युमुखी पडली होती!

शिंदे काहीसे भावनाप्रधान होते, त्यामुळे भूकबळीची बातमी त्यांना अस्वस्थ करून गेली होती. वृत्तपत्रातून किंवा व्हिडिओ मॅगेझिनवर त्यांनी कलहांडी वा बिहारमधील उपासमारीच्या बातम्या ऐकल्या-पाहिल्या होत्या. सध्या तर सोमालिया देशातील भुकेची तीव्रता टी. व्ही द्वारे अनुभवली होती. ती भुकेने चिपाड झालेली व सारी भूक डोळ्यात व सुन्न नजरेत सामावणारी काळी मुले पाहून त्या रात्री त्यांना जेवणही गेलं नव्हतं. रेणुकेनं टी. व्ही. बंद करून म्हटलं होतं, "कान्त, एवढा काय ते मनाला लावून घ्यायचं? तुम्ही तर पुरुष आहात. मन घट्ट हवं. पुन्हा ज्या खात्यात नोकरी करता तिथं दुष्काळाशी घडोघडी सामना करावा लागतोय. हा तालुका त्याबाबत अग्रेसर आहे. अशा वेळी काम करताना मन शांत ठेवायला हवं...!"

तरीही त्यांची अस्वस्थता कमी झाली नव्हती. त्यानंतर टीव्हीवर किंवा 'द वर्ल्ड धिस वीक' हा कार्यक्रम पाहाताना सोमालियाची बातमी आली की ते टीव्ही सरळ बंद करायचे. "खरंच रेणू, मला कळतं की हा पळपुटेपणा आहे. मी नाही पाहू शकत, सहन करू शकत ती नजरेतली भूक आणि जीवघेणी सुन्नता त्या लोकांची. आपण अशा वेळी सुस्थितीत आहोत, पोटात रोज गरम अन्न जातं, याची लाज वाटते. पण ती वांझोटी असते..."

तालुक्यात दुष्काळाशी सामना करताना उजाड खेडी, शुष्क रखरखीत प्रदेश पाहून त्यांना आपली सुस्थिती ही वाळवंटातील ओॲसिसप्रमाणे वाटायची व ती मन विदीर्ण करून जायची. त्यामुळेच की काय, ते अधिक तडफेनं व जिद्दीनं दुष्काळावर मात करण्याच्या विचारानं प्रेरित होऊन काम करायचे.

पण यातला तोकडेपणा व मर्यादा त्यांना प्रकर्षानं जाणवायच्या. अजस्र पसरलेल्या प्रशासनातले तहसीलदार म्हणून ते फार छोटे होते, जे त्यांच्यापेक्षा मोठ्या चक्रात व त्यांच्यापेक्षा लहान चक्रात गुंफले गेले होते; त्यामुळे स्वत:ची गती राखता येत नव्हती.

तसंच दुष्काळ पडला की टँकरने पाणी द्यायचं, रोजगार हमीचं काम पुरवायचं, धान्य द्यायचं, हे उपाय दुष्काळाची तीव्रता कमी जरूर करणारे आहेत. पण त्यामुळे तो कायमचा हटत नव्हता. बहात्तरचा दुष्काळ ते फक्त ऐकून होते, पण त्यामानाने तीव्रता कमी आहे, असं अर्थशास्त्राचे विद्यार्थी असलेले शिंदे अनुमान जरूर काढू

शकत होते. तरीही झालेलं फार कमी आहे व करायचं तर एवढं प्रचंड आहे की छाती दडपून जावी, या विचारानं ते बेचैनही व्हायचे.

मागेपुढे कधी सवड मिळाली तर 'दुष्काळाचे अर्थशास्त्र व व्यावहारिक उपाययोजना' अशा तऱ्हेचा विषय पीएच. डी. साठी घ्यायचा व अधिक खोलात जाऊन त्याचा अभ्यास करायचा, असं त्यांनी मनोमन ठरवूनही टाकलं होतं.

शिंद्यांची विचारधारा थांबली ती भालेरावच्या येण्यामुळे. तहसीलदारांच्या चेंबरमध्ये येण्यापूर्वी ते आपल्या कार्यालयात गेले होते, तेव्हा कलेक्टर कचेरीचा वायरलेस नुकताच आला होता व तो वाचून आपल्याला कशासाठी तातडीने बोलावलंय याचा भालेरावांना अंदाज आला होता.

"भालेराव, मघाशी कलेक्टर साहेबांचा फोन होता. काळगाव दिघीची एक महिला रोजगार हमीचं काम न मिळाल्यामुळे मरण पावली...."

"आताच त्यासंबंधी वायरलेस आला आहे सर!" भालेराव म्हणाले, "मी काम मागितलेल्या व्यक्तींची नावे असलेले रजिस्टर सोबत आणले आहे." त्यांनी रजिस्टर उघडीत एक एक पान उलटायला सुरुवात केली.

शिंदे अस्वस्थपणे पेपरवेटशी चाळा करीत होते. काही वेळानं भालेराव म्हणाले, "सर, मागील आठवड्यात काळगाव दिघीच्या एका कुटुंबानं लेखी अर्ज करून कामाची मागणी केली होती. त्यांची नावे आहेत राघू ननावरे, त्याची पत्नी पारू व बहीण ठकूबाई - आणि वायरलेसमध्ये भूकबळी म्हणून ठकूबाईचं नाव आहे...!"

आता शिंद्यांना थोडासा उलगडा झाला होता. त्यांच्याकडे राघूनं "शेतकरी व शेतमजूर पंचायती" मार्फत कामाच्या मागणीसाठी लेखी अर्ज दिला होता, पण काळगाव दिघी पॉकेट मध्ये, ज्यात चार ग्रामपंचायतींचा समावेश होता, एकही काम चालू नव्हते. एक पाझर तलाव मंजूर होता, त्याच्या एका भरावाचं कामही मागच्या वर्षी पूर्ण झालं होतं. त्याचा दुसरा भराव शेतकऱ्यांनी अडवला होता व भूसंपादनाची कार्यवाही अपूर्ण होती. शेतकऱ्यांना किमान ऐंशी टक्के मोबदला, ॲडव्हान्स हवा होता. त्यासाठी स्वत: शिंदे प्रयत्नशील होते. पण शासनाकडून पतमर्यादा न आल्यामुळे तो देता येत नव्हता व त्यामुळेच हे पाझर तलावचे काम बंद पडले होते.

म्हणून त्यांनी सहा किलोमीटर अंतरावर नाला बंडिंगचे एक काम चालू होते, तिथे राघू व त्याच्या कुटुंबीयांनी जावे असे लेखी आदेश दिले व त्याची एक प्रत शिपायामार्फत बंडिंगचे अधिकारी चव्हाण यांनाही पाठवली.

आज राघूची बहीण ठकूबाईचा भूकबळी पडला होता. कागदावर शिंद्यांनी सर्व सोपस्कार पूर्ण केले होते. तरीही कुठेतरी काहीतरी चुकतेय, ही त्यांची टोचणी कमी होत नव्हती.

"राम राम रावसाहेब...."

शिंद्यांनी पाहिलं, विसपुते आले होते. त्यांचं अभिवादन स्वीकारून त्यांना बसायला सांगितलं.

"मी आज तुम्हाला भेटणार होतोच. पण तुमचं पकड वॉरंट आलं शिपायामार्फत म्हणा ना, मग काय करता? तसाच आलो... झालं!'' आणि विसपुते गडगडाटी हसले.

तसं कारण काहीही नव्हतं, पण शिंद्यांना विसपुते हा पहिल्यापासूनच आवडला नव्हता. त्याचं अघळपघळ बोलणं, गडगडाटी हसणं आणि त्याचे मांजरासारखे हिरवे-घारे डोळे, सारंच त्यांना खटकायचं. वाटायचं, हा ज्या 'शेतकरी व शेतमजूर संघटनेचं' काम करतोय, तिथं हा शोभत नाही. हा ती संघटना आपल्या पुढारीपणासाठी वापरतोय. त्याला शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांशी काही देणं-घेणं नाही. खरं तर हा त्यांचा स्वत:चा, व्यक्ती पाहून झालेला ग्रह होता. त्याला काही ठोस आधार वा पुरावा नव्हता.

पण आज मात्र शिंद्यांची खात्रीच झाली की, आपला हा ग्रह चुकीचा नाही. कारण आज त्यांना आपण का बोलावलं आहे हे माहीत असणारंय. तरीही ते गडगडाटी हसत होते... कारण नसताना व विनोदाचं प्रयोजनही नसताना.

"आपल्या पंचायतीमार्फत काम मागण्यासाठी अर्ज केलेल्या राघूच्या बहिणीचा भूकबळी झाल्याची वार्ता आलीय पेपरमध्ये. तुम्हाला काही माहीत आहे त्याबद्दल.....?!

"वा! माहीत तर आहे. अहो, कालच मला पेपरचा वार्ताहर किनाळकर भेटला होता. त्याला मीच सांगितलं हे! तसंच राघूही होता माझ्या बरोबर-!

"विसपुते...!'' तीव्र स्वरात शिंदे म्हणाले, "हे.... हे मला सांगता आलं नसतं तुम्हाला? मी कधी तुमची भेट चुकवली आहे? किंवा सांगितलेल्या कामासंबंधी कार्यवाही केली नाही? तरीही....''

"त्याच असं आहे रावसाहेब. गेले दोन दिवस तुम्ही सतत दौऱ्यावर होता साक्षरता अभियानाच्या कामासाठी. मग कशी भेट व्हायची?'' विसपुते म्हणाले, "अहो, इथे दुष्काळात लोकांचे हाल आहेत आणि शासनाला हे काहीतरीच खूळ सुचतंय.... आधी हातात काम द्या, पोटाला भाकरी द्या व मग त्यांना शिकवा.''

आपल्याला विसपुत्यांनी आधी का कळवलं नाही हे खोलात जाऊन विचारण्यात आता काही अर्थ नव्हता व त्यांचा साक्षरता अभियानावरील रागही त्यांना माहीत होता.

"ठीक आहे. पण मी त्यांना रांजणीच्या नालाबंडिंगच्या कामावर पाठवलं होतं.''

"त्याचं असं झालं साहेब....'' जरा पुढे सरसावत विसपुते म्हणाले, "इथे माझ्या सोबत राघू आहे. तो बाहेर उभा आहे, तोच तुम्हाला सांगेल.''

राघू जेव्हा त्यांच्यासमोर आला, शिंद्याच्या मनात एक अपराधी भाव चमकून गेला. आपण याच्या बहिणीच्या भूकबळीला जबाबदार आहोत, असं त्यांना वाटत

होतं.

त्यांनी राघूकडे निरखून पाहिलं - मध्यम वय, अंगावर मळकट धोतर व सदरा. दाढी वाढलेली, रापलेला काळाकभिन्न चेहरा, त्यावर सुन्नतेचा लेप...!!

"राघू.. काय झालं बाबा? मी तर तुला व तुझ्या घरच्यांना रांजणीच्या कामावर पाठवलं होतं ना?"

"तेचं आसं काय सायेब...." अडखळत राघू सांगू लागला....

राघू ननावरे गाडीलोहार या भटक्या जमातीत मोडणारा. पण जहागीरदार किशनदेव रायांनी निजामाच्या आमदानीत त्याच्या आजोबाला बैलगाडी बनवण्याच्या कसबावर खूश होऊन काळगाव दिघी परिसरातील पाच एकर जमीन दिलेली. आज वाटण्या होऊन राघूच्या वाट्याला जेमतेम दीड एकर आलेली.

मुळात तालुकाच डोंगराळ, म्हणून कठीण, खडकाळ जमीन. तिथे नैसर्गिक पाण्यावर बाजरीखेरीज काही पिकायचं नाही. बाजरीचं पीकही दुष्काळात पुरेसं येत नाही. यावर्षीही असंच झालं. पावसाळा लांबला. मृग पूर्ण कोरडा गेला, त्यानंतर दोन जेमतेम पाऊस झाले. त्यावर कशीतरी तीन क्विंटल बाजरी पदरात आली. त्यातली एका बाजारात दरवर्षीच्या शिरस्त्याप्रमाणे पडत्या भावात ताबडतोबीने विकून आलेल्या पैशात किरकोळ उधार-उसनं देणं व मीठ-मिरचीची तरतूद करणं भाग होतं. उरलेले धान्य राघू, त्याची बायको व दोन मुले आणि विधवा होऊन त्याच्याकडेच राहायला आलेली बहीण ठकूबाई एवढ्या प्रपंचाला कितीसं पुरणार? दिवाळीला तर त्यातला एक कणही राहिला नव्हता.

दरवर्षी शेजारच्या रामपूर तालुक्यात तो सर्व कुटुंबकबिल्यासह साखर कारखान्यावर ऊसतोडीला जायचा. यंदा ऊसही पावसाअभावी कमी झालेला, म्हणून फेब्रवारीतच गळित हंगाम संपला. ठेकेदाराकडून परततानाच पुढील वर्षाची आगाऊ रक्कम घेतली, तीही हां हां म्हणता संपून गेली आणि त्या कुटुंबाला आता रोजगार हमीच्या कामाखेरीज जगण्यासाठी दुसरा मार्ग नव्हता.

राघूनं कामासाठी शोधाशोध सुरू केली. तेव्हा सुदैवानं शेजारच्या गावात तांड्याला जोडणाऱ्या जोडरस्त्याचं काम नुकतंच सुरू झालं होतं. या कामावर आवश्यकता असूनही जास्त मजूर मिळत नव्हते. कारण डोंगराळ भाग असल्यामुळे जवळपास माती नव्हती. खडक होता. तो फोडणं अवघड काम होतं.

याचा प्रत्यय राघूला व त्याच्या पत्नीला - बहिणीला आला. पहिल्याच दिवशी खडी फोडून हाताला फोड आले होते. पण इतर कामापेक्षा मजुरीचे दर जादा होते व आसपास दुसरे कोणतेही कामे सुरू नव्हते, म्हणून शरीर साथ देत नसतानाही त्यांना कामावर जाणे भाग होते.

घरधनी गेल्यानंतर पांढरं कपाळ घेऊन भावाकडे आल्यानंतर त्याच्यावर कमीत

कमी भार पडावा म्हणून अहोरात्र राबणं, रानात कामाला जाणं व उपासाच्या नावाखाली एकदाच दुपारी भाकरतुकडा खाणं, त्यामुळे ठकूबाई कमालीची रोडावलेली होती. तिला हे खडी फोडण्याचं काम झेपणारं नव्हतं. पहिल्या आठवड्यानंतर जेव्हा रोजगाराचं वाटप झालं, तेव्हा तिची मजुरी तिच्या भावजयीपेक्षा अर्धीच भरली होती, "वयनी, काय करू बघा. कपाळीचं कुंकू गेल्यानंतर कुडीत जीवच नाय राहिला....."

गावातल्या व समाजातल्या बायका राघूची बायको मैनाचे कान फुंकत असल्या तरी, जात्याच प्रेमळ असल्यामुळे तिला ठकूबाईकडे पाहिलं की पोटात कसंतरीच व्हायचं. आपल्याच उमरीची ही आपली नणंद. कुंकवाचा आधार गेला आणि बिचारीची जिंदगी बर्बाद झाली. समाजात पुन्हा विवाह होत असे पण तिची खचलेली कुडी व गेलेली रया पाहून कोणी तयार होत नव्हता. दोन मौसम प्रयत्न केल्यानंतर, राघूनं अलीकडे नाद सोडून दिला होता. बहिणीला माहेरी जन्मभर पोसावं एवढी काही त्याची ताकद नव्हती, तरीही तो व मैना जमेल तेवढं व तसे तिला सांभाळीत होते. पण तीही आपल्यापरीनं भार होऊ नये यासाठी कामाची पराकाष्ठा करायची.

हे कठीण काम तिला झेपणार नाही, हे राघू व मैनेला पण ठकूबाईप्रमाणे समजत होतं. तिची मजुरी पण फार कमी पडत होती. तरीही ते चूप होते. कारण तेवढीच मजुरी प्रपंचाला मिळत होती व मुख्य म्हणजे मजुरी कितीही असली तरी दररोज एक किलो गव्हाचे कुपन मिळत होते. त्यामुळे त्यांच्याकडे आता दोन क्विंटल गव्हाएवढे कुपन साचले होते. ते वटवून गहू घ्यायचा व तो बाजारात विकून पैका करायचा राघूचा बेत होता. कारण घरी गहू परवडणार नव्हता. व त्याला परत तेल लागणार होतं.... ते त्यांना शक्यच नव्हतं.

जोडरस्ता अवघ्या दीड किलोमीटरचा असल्यामुळे ते काम तीन आठवड्यात संपलं, तेव्हा राघू तिघांचे कुपन एकत्र करून शेजारच्या गावात बोरसला गेला, पण ते दुकान मागच्याच आठवड्यात धान्याचा काळाबाजार केला असता तहसीलदारांनी रंगेहाथ पकडून निलंबित केलं होतं व ते गाव काळगावच्याच दुकानाला जोडलं होतं.

सारा दिवस व चक्कर वाया गेली होती, पण राघूला त्याचं फारसं काही वाटलं नव्हतं. कारण खेडेगावात रेशन दुकानं कधीच नीट चालत नाहीत, जावं तेव्हा उघडी असली तर धान्य कधी असतं, कधी नसतं; त्यामुळे आपल्या हक्काचंही धान्य नीटपणे वेळच्या वेळी मिळणं अवघडच होतं. हे सारं राघूला माहीत होतं. म्हणून तो निमूटपणे परत आला.

पण काळगावच्या रेशन दुकानाला कुलूप पाहिल्यावर मात्र त्याचा धीर खचला. घरातलं सारं धान्य व पैसा संपला होत. अक्षरश: दोन वेळा पोटात घासही जात नव्हता. रानात कुठेच काही काम नव्हतं. तेव्हा जाणकार ठकूबाईनं डोंगरमाथा हुडकून कसला तरी पाला तोडून आणला होता व दोन दिवस त्यावरच ते कुटुंब पोट भरत

होतं.

आज गहू मिळायला हवा होता, पण दुकान बंद. दुकानदार अचानक बालाजीच्या यात्रेला गेला होता व आठ दिवस येणार नव्हता. तेव्हा तो गावात सरपंच - पोलीस पाटलाच्या उंबऱ्याशी गेला व कुपन दाखवून त्यानं थोडे जोंधळे व बाजरी उसनी मागिताली. सरपंच उर्मट होता. त्यानं भिकाऱ्याप्रमाणे राघूला हाकलून लावलं. पाटलाचा बाप माळकरी होता. त्याने दोन पसे बाजरी दिली. तेवढाच पोटाला दोन दिवस आधार झाला.

अशातच वणवणता राघूला विसपुते भेटले. त्यानं संकोचानं रामराम घातला, तसे खूश होऊन त्यांनी राघूची अघळपघळ चौकशी केली आणि त्याचा प्रश्न जाणून घेतला. त्याच्याकडून निम्मी कुपनं घेऊन पन्नास रुपये दिले व एका फॉर्मवर अंगठा घेतला व आपल्या मोटारसायकलवर मागे बसवून त्याला तहसील कचेरीत नेलं. तिथे त्याच्यासमक्ष तो अर्ज रावसाहेब शिंद्यांना दिला. त्यांनी लगोलग त्याला रांजणीच्या बंडिंगच्या कामावर जाण्याचा हुकूम दिला.

विसपुते तालुक्यालाच राहात असल्यामुळे त्याला एस. टी. चे पाच रुपये खर्चून परत यावं लागलं. पण त्यांनी दिलेल्या पैशातून राघूनं दोन दिवस पोटापाण्याची सोय केली.

मग रात्री त्यानं हा विषय मैना व ठकूबाईपुढे काढला, "कारभारणे, रांजणी चांगली चार - सा कोस हाय बग जायला. पन तितं जायला पाहिजे, नाय तर जगणं कठीण हाय बघ."

"जाऊ की कारभारी - पण ननंदबायला यवढं चालणं झेपेल का? काल सांजेपास्नं त्याच आंग मोडून आलंया आन् गरमबी जालंय..."

मैनानं विचारलं तसा काहीसा गहिवरून राघू म्हणाला,

"व्हय म्या बघतो ना -ठकुबाय लई बीमार हाय, पन् म्या असा करंटा भाऊ - जो भणीचं दवादारू करू नाय शकत. आसं कर ठकूबाय, तू पोरास्नी घिऊन इथचं रहा - एक हप्त्यानंतर म्या तुला नेतो."

"नाय दादा - म्या बरी हाय - म्या येते तुमासंगट - तेवढीच रोजी पदरी पडेल.... जायला जरा वेळ लागेल - पन म्याबी येते दादा --" ठकूबाई संकोचून म्हणाली.

राघू व मैना दोघांनाही तिची प्रकृती माहीत होती, पण प्रश्न रोजीचा होता, जगण्याचा होता, त्यांनी तिथंच विषय संपवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी भाकरतुकडा फडक्यात बांधून ते मुलासह निघाले, रांजणीला जाणारा रस्ता रेशन दुकानावरून जाणारा होता. त्यानं थोडं थांबून चौकशी

केली, पण अजूनही बालाजीला गेलेले शर्मा दुकानदार परत आले नव्हते. त्यांच्या नातवाचं जावळ व बारसं तिथं होतं, अस घरातल्या मुनिमानं सांगितलं तेव्हा अजिजीनं त्यानं म्हणलं,

"पन मुनीमजी, तुमी दुकान उघडा ना. मह्या जवळ लई कुपनं हायती गव्हाची - ती त्यवढी मोडून दिवा की - पोरंबाळं आन् भण भुकेली हायत हो..."

"हे बघ राघू, - शेटजी दुकान बंद ठेवायला सांगून गेले आहेत, मला उघडता येणार नाही. पुन्हा तुझी कुपनं ही बोरसरची. त्या गावचा माल अजून आणला नाही. समजलंस? जा आता, माझा जीव खाऊ नको."

"पन - शेटजी," न राहावून मैना मध्येच म्हणाली, "म्या म्हंते - आसं दुकान न सांगता सवरता बंद ठिवता येतं? जंतेचे हाल हो केवढे? आमचंच बघा ना - जवळ लई कुपनं हायती - पण ती काई पोटास्नी घालता येत नाहीत. कसं भरावं खळगं? लहानी पोरं हायती - बीमार ननंद हाय - पोटाला नगो...?"

"ए भवाने, मला जाब विचारतेस?" संतापून आपल्या चिरक्या आवाजात मुनीमजी फणफणला, "राघू, तुझ्या बायकोला सांग - माझ्याशी नको बोलू म्हणून, मी बाईमाणसांशी नाही बोलत!"

सोशिक राघू आपल्या कारभारणीवरच चिडला, "ए, गप बये, तुला काई समजता का? उगी आपली पिरपिर... गप्प... गप रहा बघू!" आणि लाचारीच्या स्वरात तो मुनीमजीकडे वळून म्हणाला.

"गलती जाली मुनीमजी - कारभारनीला काई अक्कल नाय, माफी असू दे.... म्या नंतर येतो कुपन मोडायला...!"

त्याला लाचारी पत्करून शांत राहणे भाग होते. कारण नेहमी रेशन दुकानात ज्वारी साखरेसाठी जावं लागत असे. त्यानं फटकन् देणं बंद केलं तर? हा प्रश्न होता. पुन्हा आज नाही, चार आठ दिवसांनी का होईना परत त्याच्या दारी जाणं भाग होतं कुपनावरचे गहू घेण्यासाठी. अनेकदा तर शर्माच ते गहू विकत घेत असे. अर्थातच पडत्या भावानं. राघूची वा इतर गावकऱ्यांची त्याबद्दल काही तक्रार नसे.

दम खात, अडखळत आपली शक्तिविहीन कुडी खेचत ठकूबाई आपल्या भावांसगे कशीबशी रांजणीला पोचली, तेव्हा ऊन उतरणीला लागलं होतं. आणि तिथलं नालाबंडिचं काम संपायला आलं होतं. ठकूबाईनं मैनाच्या आधारानं तिथल्या एका झाडाखाली गलितगात्र होऊन बसकण मारली.

राघू तिथल्या मुकादमाकडे गेला. कामावरचा, कृषी सहायक केव्हाच तालुक्याला निघून गेला होता. राघूनं तहसीलदाराचं पत्र मुकादमाला दिलं. ते वाचून तो म्हणाला, "पण मंगळवारीच हप्ता सुरू झाला. हजेरीपटावर त्याच दिवशी नावं लिहिली जातात. आता पुढच्या मंगळवारी ये....!"

"नाय मुकादमदादा, म्या लई लांबून आलो हाय... आनी विसपुते सायेबांनी तुमास्नी त्यांचं नाव सांगाया सांगितलंय. तेंच्या पंचायतीमार्फत अर्ज दिलाय कामासाठी तवा-!"

"अच्छा - अच्छा, तूही आता हक्कानं काम मागतो आहेस." मुकादम त्याच्याकडे आरपार संशयानं पाहात म्हणाला, "ठीक आहे, आजचं तर काम संपलं. उद्या सकाळपासून घेतो तुला कामावर."

त्या रात्री तिथंच झाडाखाली ते कुटुंब झोपलं, सकाळ होताच तयार होऊन ते मुकादम येण्याची वाट पाहू लागलं.

मुकादम व कृषी सहायक एकदमच आले, तोवर सारे मजूर कामासाठी जमा झाले होते. त्याच वेळी ज्या शेतात नाला बंडिंगचं व सपाटीकरणाचं काम चाललं होतं, त्याचा मालक आला आणि म्हणाला, "रामराम साहेब, आजपासून काम बंद करा. मला इथे उन्हाळी भुईमूग घ्यायचं आहे, त्यासाठी पंचायत समितीनं बियाणं व खताची पिशवी पण दिलीय. विहिरीत थोडं पाणी आहे, त्यावर घेण्यासाठी शासनानं सांगितलं बघा!"

साऱ्या मजुरांचे चेहरे काळवंडले. राघूच्या पोटात तर धस्स झालं. जमीन सपाटीकरणासाठी शेतकऱ्याची संमती आवश्यक असते, ती नसेल तर काम करता येत नाही. या शेताचा मालक महादेव चेडे पाटलाला उन्हाळी भुईमूग घ्यायचा होता, तेव्हा काम बंद करणं क्रमप्राप्त होतं.

कृषी खात्याच्या नवीन धोरणाप्रमाणे एका काऊडेपमध्ये नालाबंडिंग, जमीन सपाटीकरण ही कामे घेता येत असत. यापैकी या गावच्या एकमेव काऊडेपमधलं नालाबंडिंगचं काम नुकतचं संपलं होतं व मंगळवारपासून चेडे पाटलांच्या जमिनीतलं सपाटीकरणाचं काम चाललं होतं व आता ते काम त्यांच्या संमतीअभावी बंद ठेवणं भाग होतं.

रांजणीत दुसरा काऊडेप नसल्यामुळे त्या गावी आता रोजगार हमीचं काम संपुष्टात आलं होतं.

राघू, मैना व ठकूबाई सारेच सुन्न झाले. काल दिवसभर वणवण करीत जवळपास सहा कि. मी. अंतर पायी मोठ्या जिकिरीनं तुडवलेलं. रात्री केवळ पाण्यावर पोटं मारून झोपली होती. आज मात्र काम नसल्यामुळे पुन्हा तेवढंच जीवघेणं अंतर परत तुडवीत गावी जाणं आलं.

हातावर पोट असलेल्यांना फारसं बोलता येत नाही, की आपल्या भावनांचं प्रदर्शनही करता येत नाही. परिस्थितीचं भान कधीही हरवत नाही. राघूनं परतायचं ठरवून त्याप्रमाणे परतीची वाट धरली.

कालच्यापेक्षा आज ठकूबाईला जास्ती त्रास होत होता. अंग चांगलंच तापलं

होतं, सारेजण तीन - चार दिवसापासून उपाशी होते, ते त्याही आधी दोन दिवस जेवले नव्हते. कारण जंगली पाला उकडून खाल्ल्यामुळे पोट दुखत होते. चालण्याचे श्रम व अंगात मुरलेला ताप यामुळे एक एक पाय उचलणं तिच्या जिवावर येत होत.

आणि दोन - एक किलोमीटर अंतर त्यांनी जेमतेम कापलं असेल नसेल, साधी ठेच लागल्याचं निमित्त होऊन ठकूबाई अडखळून पडली आणि राघू-मैना तिच्याकडे धावले. तिचं डोकं रस्त्यावरचं मैनेनं आपल्या मांडीवर घेतलं, ठकूबाई नुस्ती तडफडत होती!

"दादा, वयनी, लई तरास होतोय. म्या आता जिंदा ऱ्हात न्हाय आन् तेच बरं हाय. म्या अशी कपाळकरंटी, तुमास्नी भार!"

"असं बोलू नये ठकुमाय, तू मह्या पाठची भण - आगं, जीवात जीव हाय तोवर म्या सांभाळीन तुला. आसं बोलू नये. जरा दम खा इथंच!" राघू कळवळून म्हणाला.

जवळच एक वडाचं जंगली झाडं होतं, तिच्या सावलीत त्यानं व मैनानं तिला आधार देत आणलं व फडतरावर निजवलं, "म्या पानी आनतो, जरा दम खा. ऊन कमी जालं म्हंजे निघू गावास्नी."

पाणी प्याल्यामुळे व विश्रांतीमुळे ठकूबाईचं कण्हणं जरा कमी झालं होतं. थोड्या वेळानं तिचा डोळा लागला. तिच्या बाजूलाच मैनाही जरा लवंडली. राघू समोर खेळणाऱ्या मुलांकडे लक्ष देत गुमान बसून राहिला.

उन्हं उतरत होती तेव्हा मैना उठली आणि सहज म्हणून तिनं ठकूबाईच्या कपाळावर हात ठेवला. मघाशी चटके देणारं कपाळं आता थंडगार पडलं होतं. ती चरकली, तिच्या मनात भीतीची शंका उमटली व ती किंचाळली, "धनी, जरा इकडं या. पगा, पगा - ननंदबाईचं कपाळ आक्षी थंडगार लागतंया."

राघूनं पुढे होऊन ठकूबाईच्या कपाळावर हात ठेवला, तिचा हात हाती घेतला आणि गदगदून म्हटलं, "कारभारणे, आपली ठकुमाय गेली - मेली गं..."

तहसीलदार शिंदे सुन्न झाले होते. सकाळपासून त्यांना छळणारी टोचणी अधिक तीव्रतेने दंश करू लागली होती.

राघू सांगतांना अडखळत होता, थांबत होता. एवढं एका वेळी प्रदीर्घ बोलायची त्याला सवय नव्हती. शब्द आठवत नव्हते आणि बहिणीच्या आठवणीनं तो गदगदून येत होता, पण डोळे कोरडे होते! नजर सुन्न होती...!

"ऐकलंत ना रावसाहेब, हा - सरळ सरळ भूकबळीचा प्रकार नाही तर काय आहे!" विसपुते म्हणाले, "त्या दिवशी म्हणजे परवा एका पत्रकार मित्राला घेऊन मी चाललो होतो. रस्त्याच्या शेजारी हा राघू व त्याचं कुटुंब भेटलं. ठकूबाई तिथं मृतावस्थेत पडलेली...!"

वर्तमानपत्रात 'ठकूबाईचा भूकबळी' या मथळ्याखाली आलेल्या बातमीचा उलगडा आता शिंद्यांना झाला होता. त्यांच्या नजरेसमोर न पाहिलेल्या ठकूबाईचा चेहरा भूक आणि वेदनेचं रूप घेऊन येत होता आणि त्यांचं मन अस्वस्थ, बेचैन होत होतं!

पण त्यांना असं स्वस्थ बसून भागणार नव्हतं. प्रयत्नपूर्वक त्यांनी मन शांत केलं आणि पेशकाराला बोलावून सांगितलं, जीप घेऊन जा - काळगावच्या दुकानदाराला गाडीत घालून आणा.....! तसंच त्यांनी भालेरावाला सांगून तालुक्याचे दोन्ही डेप्युटी इंजिनिअर, बंडिंगचे मृदसंधारण अधिकारी यांना फोन करून बोलावून घेण्यास सांगितलं.

इरिगेशनचे डेप्युटी इंजिनिअर पाटील रामपूरला राहात व इथे तालुक्याला येऊन-जाऊन करीत. आजही ते अपेक्षेप्रमाणे कार्यालयात नव्हते. कसल्यातरी मीटिंगसाठी जिल्ह्याला गेले होते. त्यांचा ऑफिस सुपरिटेंडंट आला व त्यानं हे सांगितलं.

"पण सर, काळगावचं तर काम सुरू झालं होतं आणि तरीही त्यांनी राघू व त्याच्या मृत झालेल्या बहिणीला रांजणीला पाठवलं होतं व चालण्याचे श्रम सहन न होऊन ती वाटेतच मेली होती."

त्यांनी क्षुब्ध नजरेनं भालेरावकडे पाहिलं. तसे ते चाचरत म्हणाले, "सर, मागच्या आठवड्याच्या वीकली रिपोर्टमध्ये काळगाव दिघीचं पाझर तलावाचं काम बंद असल्याचं पाटील साहेबांनीच दाखवलं होतं."

"बरोबर आहे सर," इरिगेशनचा ऑफिस सुपरिटेंडंट मान खाली घालून म्हणाला, "काम मागच्या आठवड्यात सुरू झालं होतं. त्यासाठी पाटील साहेब गावात गेले होते. संबंधित शेतकऱ्यांची समजूत घालून संमती घेतली व काम सुरू केलं होतं."

"पण वीकली रिपोर्टमध्ये ते का आलं नाही?" आवाज चढवीत शिंदे म्हणाले.

"त्याचं असं आहे सर, काम सुरू झाल्याचं मला ऑफिसमध्ये माहीत नव्हतं. मागच्या गुरुवारी काम सुरू करून पाटील साहेब डिस्ट्रिक्ट हेडक्वार्टरला इ.इ. साहेबांनी बोलवलं म्हणून परस्पर गेले. शनिवार - रविवार सुट्टी होती जोडून. - ते थेट सोमवारीच आले, पण दर शुक्रवारी रिपोर्ट करायचा असतो आपल्याकडे कामाचा, म्हणून मी मागच्या आठवड्यात रिपोर्ट तसाच रिपीट केला...."

शिंद्यांनी वैतागानं आपली मूठ टेबलावर आदळली. पण त्यामुळे त्यांच्या हाताला झिणझिण्या आल्या एवढंच. ते हतबुद्ध होऊन ऑफिस सुपरिटेंडंटकडे पाहात राहिले.

दर आठवड्याला शुक्रवारी सायंकाळपर्यंत कलेक्टर ऑफिसला रोजगार हमी कामाचा आठवडी अहवाल तहसीलदारांना सादर करणे बंधनकारक असते. त्यासाठी सर्व कार्यपालन यंत्रणांनी गुरुवारी सायंकाळी किंवा शुक्रवारी सकाळी त्यांच्या खात्यामार्फत कोणती रोजगार हमीची कामे चालू आहेत व कोणती बंद आहेत हे लेखी कळवायचं

असतं. बऱ्याच वेळी प्रत्यक्ष काम करणाऱ्या मस्टर असिस्टंट किंवा ज्युनियर इंजिनिअर्सकडून वेळेवर अहवाल प्राप्त होत नाही, म्हणून मागच्या आठवड्याचा रिपोर्ट रिपीट केला जातो. इथं हाच प्रकार घडला होता. प्रत्यक्ष काळगाव दिघीत वर्षापासून बंद पडलेलं पाझर तलावाचं काम सुरू झालं होतं. तरीही त्याची माहिती कार्यालयात वेळेवर न आल्यामुळे ते काम बंद असल्याचं साप्ताहिक अहवालात नमूद केलं गेलं. ही माहिती तपासण्याची यंत्रणा तहसीलदाराकडे नसते, त्यामुळे कार्यालयीन यंत्रणेची माहिती ग्राह्य धरून जिल्ह्यात व जिल्ह्यातून शासनाकडे अहवाल पाठवला जातो.

इथंही नेमकं हेच घडलं होतं. काम चालू असूनही माहिती प्राप्त न झाल्यामुळे ते काम 'बंद आहे' असं अहवालात नमूद केलं गेलं आणि त्या माहितीच्या आधारे राघूला रांजणीला दूरवर कामावर जाण्यासाठी शिंद्यांनी हुकूम दिला होता. त्याच्या गावात काम सुरू होतं, पण ते कुणालाच माहीत नसल्यामुळे राघूला व त्याच्या बहिणीला रांजणीला बरं नसताना जावं लागलं हेतं.

जर काळगाव दिघीचं काम सुरू असल्याचं माहीत झालं असतं, तर राघूच्या बहिणीला सहा किलोमीटर रांजणीला जाण्याचं व परत येण्याचं काम पडलं नसतं व कदाचित तिचा बळीही गेला नसता.

त्याच वेळी बंडिंगचे गोसावी आले. त्यांनी राघूनं जी माहिती रांजणीच्या कामाबद्दल सांगितली होती तिला दुजोरा दिला. त्यांचाही काही दोष नव्हता. असेल तर परिस्थितीचा व ठकूबाईच्या गरिबीचा होता.

शिंद्याची मात्र घुसमट होत होती. मनोमन ते विलक्षण क्षुब्ध होते. जिवाला तीव्र टोचणी लागून राहिली होती. या भूकबळीला एक शासकीय अधिकारी म्हणून मीच जबाबदार आहे.

एका घंट्यामध्ये जीप परत आली. आणि तहसीलदारांच्या चेंबरमध्ये हात जोडीतच शर्मा दुकानदाराने प्रवेश केला, "जय रामजी की!!" त्यांच्यासमवेत गावचे सरपंच होते.

शिंद्यांनी त्यांना चांगलेच फैलावर घेतलं. शर्माला पाहताच त्यांचा सारा क्षोभ व संताप उफाळून आला, "लाज वाटली पाहिजे तुम्हाला शर्माजी, खुशाल आठ- आठ दिवस दुकान बंद ठेवता, मजुरांना कुपनावर धान्य देत नाही. होत नसेल दुकान चालवणं तर राजीनामा द्या!"

"रावसाहेब, माझं दुकान बंद नव्हतंच. माझ्या मुनिमाकडे माझ्या गैरहजरीत दुकान चालवण्याचं अधिकारपत्र आहे. मी बालाजीला गेलो असता त्यांनी काळगाव दिघीमध्ये वाटप केलं होतं. पाहिजे तर तुम्ही रेकॉर्ड तपासवा, या सरपंचांना विचारा हुजूर ... आम्ही कधीही दुकान बंद ठेवलेलं नाही. रोज वाटप चालू आहे. राघू कधी दुकानावर आलाच नाही!"

पुन्हा एकदा तीच हताशता शिंद्यांना जाणवली. शर्मांनी रेकॉर्ड नीट ठेवलं असणार यात काहीच शंका नव्हती. पुन्हा त्यांना सरपंचाची साथ होती, त्यामुळे तपासात दुकान बंद होतं हे निष्पन्न होणं रेकॉर्डवर तरी शक्य नव्हतं.

त्याचं दुकान सस्पेंड केलं तरी काही दिवसांनी तो सहीसलामत खात्रीपूर्वक सुटला असता....!

"आणि हुजूर, बोरसरचं दुकान नुकतंच आपण सस्पेंड केलंय. ते काळगाव दिघीला म्हणजे माझ्या दुकानाला जोडलंय. ते पत्र परवा तलाठ्यानं आणून दिलंय मुनिमाकडे - पत्राच्या ओ. सी. वर त्यांची सही व तारीख आणि तलाठी अप्पाचा तामिली रिपोर्ट पहा - त्याप्रमाणे काल त्यांनी चलनानं पैसे भरले व आज गोडाऊनकडे मेटॅडोर पाठवलाय साहेब धान्य आणण्यासाठी....!"

शर्माच्या राज्यात सारं काही आलबेल होतं, हाच याचा मथितार्थ होता. शिंद्यांना काही बोलणं शक्य नव्हतं.

ते सारे गेल्यानंतर भालेराव म्हणाले, "सर, मीं वयाच्या वडिलकीनं सांगतो. आपण एवढा त्रास करून घेऊ नका जिवाला. तुमचा काहीएक दोष नाही. प्रत्येक कार्यकारी यंत्रणेचे काही नियम असतात, त्याप्रमाणे ते काम करतात. रांजणीला कुटुंब राहिलं असतं तर हा प्रकार घडलाही नसता, पण शेतकऱ्यांनी अडविल्यावर जबरदस्तीनं कामही करता येत नाही. पाटील साहेबांविरुद्ध रिपोर्ट करता येईल. पण त्याच्या खातेनिहाय चौकशीत ते जरूर सुटतील!"

"भालेराव, ते सारं खरं, पण ठकूबाई उपासमारीनं मेली हे सत्य काही नाकारता येणार नाही. आय फील गिल्टी - मला विलक्षण शरमिंदं वाटतं....!"

"आपण नुकतेच या खात्यात आला आहात सर! हा पहिलाच क्रायसिसचा प्रसंग आहे, पण इथं टफ झालंच पाहिजे. आणखी एक सांगतो, माझ्या पुढे म्हणालात, पण चुकूनही यानंतर कुणापुढे ठकूबाईचा भूकबळी झाला असं म्हणून नका. - ती अतिश्रम, आजारानं मेली, असाच आपण रिपोर्ट द्यायचा, मी तो तयार करतो व तो सारे जण मान्य करतील. कोणीही आक्षेप घेणार नाही, याची मी गॅरंटी देतो...!"

भालेरावांनी तयार केलेला अहवाल वाचताना शिंद्यांचं मन त्यांना सांगत होतं. "हे पांढऱ्यावर केलेलं काळं आहे, हा शब्दांचा खेळ आहे. रंगसफेदी आहे. - खरं एकच आहे. ठकूबाईचा भूकबळी पडला आहे...!" पण मन आवरीत त्यांनी त्या रिपोर्टवर स्वाक्षरी केली.

"सर, मी स्वत: हा अहवाल घेऊन कलेक्टर साहेबांकडे जातो व त्यांना सविस्तर माहिती देतो, तुम्ही रेस्ट घ्या. तुमच्या मनावर बराच ताण पडलेला आहे...!"

भालेराव जीप घेऊन कलेक्टरांकडे गेले व शिंदे घरी परतले. "किती उशीर हा कान्त? भूक लागली असेल ना? मी अन्न गरम करते...."

"नको रेणू, मला जरा पडू दे शांतपणे, मग पाहीन जेवणाचं. डोकं सुन्न झालं आहे..!"

शांतपणे रेणू त्यांच्याजवळ आली व त्यांना तिनं पलंगावर झोपवलं व बाम घेऊन त्यांचे कपाळ आपल्या नाजूक - गोऱ्यापान हातांनी हळुवारपणे चोळू लागली.

तिचं निकट सान्निध्य व तिचा हळुवार स्पर्श मात्र आज त्यांच्या क्षुब्ध मनाला सांत्वना देण्यास असमर्थ होता. तिचा गोरापान हात पाहाताना न पाहिलेल्या ठकूबाईचा वाळलेला, कष्टानं रापलेला हात त्यांच्या नजरेसमोर येत होता.

....आणि जागच्या जागी अस्वस्थपणे ते क्षणाक्षणाला कूस बदलत होते, रेणूचा हात आपल्या कपाळावर घट्ट दाबून धरीत होते.. तरीही ते शांत होत नव्हते. त्यांचा क्षोभ कमी होत नव्हता....!

०-०-०

# ६. उदक

"कि ती वेळा सांगितलं सिद्धार्थ, करुणा की, उन्हात खेळू नका म्हणून. जा, त्या झाडाखाली बसून खेळा. घरात पाणी नाही प्यायला, सांगून ठेवते. उन्हात खेळून तहान - तहान कराल!"

प्रज्ञानं पुन्हा एकदा आपल्या उन्हात खेळणाऱ्या भाच्यांना हटकलं व सावलीकडे पिटाळलं. काटेरी बाभळीच्या झाडांची सावली ती, तरीही रणरणत्या दुपारी उन्हात खेळण्यापेक्षा तिथं झाडाखाली बसून खेळलेलं त्यातल्या त्यात बरं, असा तिचा हिशोब होता.

मघाशी त्यांना घागरीतून पाण्याचा शेवटचा पेला प्यायला दिला होता. कालपासून तांड्यावर टँकरचा पत्ता नव्हता. परवाही टँकरच्या चारऐवजी फक्त दोनच खेपा झाल्या होत्या. त्यामुळे प्रत्येक घराला नेहमीपेक्षा अर्धंच पाणी मिळालं होतं व ते मघाशी संपलं होतं. भाच्यांना पुन्हा तहान लागण्यापूर्वी पाणी यायला हवं आणि हे आपल्यालाच पाहायला हवं. दादा रोजगार हमीच्या कामावर भल्या पहाटे गेलेला आणि वहिनी केव्हाही बाळंत होऊ शकेल. कालपासून तिच्या वेणा सुरू आहेत. तिची पण कडक उन्हानं लाही होतेय. तिच्यासाठी वेगळं घोटभर पाणी राखून ठेवलंय.

प्रज्ञा आपल्या झोपडीबाहेर आली. एका टेकडीवर वसलेला हा नवबौद्धांचा तांडा. पाच वर्षांपूर्वी इथं सवर्णांच्या बहिष्कारामुळे यावं लागलेलं. गावापासून दूर, उंच टेकडीवरील पठारावर. इथं चार सहा जणांची नापीक व खडकाळ जमीन होती व टेकडीची सरकारदरबारी गायरान म्हणून नोंद होती. इथं कसलीही सोय नव्हती. तरीही त्यांना इथं येऊन राहावं लागलं हेतं. वेगळा तांडा करावा लागला होता.

या टेकडीच्या दक्षिण टोकाला उभं राहिलं की अवघी पंचक्रोशी दिसते. खाली वसलेलं गाव एका दृष्टिक्षेपात नजरेत सामावतं. मात्र रस्ता नसल्यामुळे वळणावळणानं जावं लागतं. हाही रस्ता झाला तो टँकरच्या सतत येण्या-जाण्यामुळे; पण खाचखळगे व दगडगोट्यांनी भरलेला हा रस्ता टँकरला पण सोसत नसे.

टँकरचा लोचट ड्रायव्हर इब्राहिम एकदा हसत प्रज्ञाला म्हणाला होता, "मेरी

जान, दूसरा कोई तो यहा टँकर नहीं ला सकता. ये बंदा ही सिर्फ ये काम कर सकता है। उसकी वजह भी सिर्फ तुम हो प्यारी - सिर्फ तुम!''

त्याची ही सलगी प्रज्ञाला रुचत नसे, पण सहन करावी लागायची. कारण तो त्यांच्या तांड्याला जवळपास बारा महिने टँकरने पाणी पुरवायचा. या भागात पाणी लागत नाही, असं भूगर्भशास्त्रज्ञांनी पाहणी करून सांगितलं होतं. पर्याय म्हणून एक पाणीपुरवठा योजना प्रस्तावित होती, पण अवघ्या सत्तर घरांसाठी एवढी मोठी योजना मंजूर होत नव्हती. तांड्याचे पुढारी किसन रणबावळे पंचायत समिती कार्यालयात खेटे मारून मारून थकले होते.

तांड्याचं सारं अस्तित्वच मुळी टँकरच्या पाण्यावर अवलंबून होतं. तरी एक बरं होतं, गतवर्षी नव्यानं बदलून आलेल्या बी. डी. ओ. नं. पाहणी केल्यानंतर टँकर बारमाही केला होता.

बी. डी. ओ.च्या त्या भेटीत प्रज्ञानं त्यांना सांगितलं होतं ''साहेब, हा तांड्यावर येणारा रस्ता तरी रोजगार हमीतून करून द्या... म्हणजे टँकर धडपणे वरपर्यंत येत जाईल. नाही तर आज अशी अवस्था आहे की, दो तीन दिवसाला एकदा टँकर कसाबसा येतो. वर येता येता बिघडतो मग पुन्हा आमची पंचाईत. साहेब, पोटाला भूक दिवसातून दोनदाच लागते, पण या उघड्या माळावर व अशा प्रखर उन्हात पाणी पुन्हा पुन्हा लागतं. भाकरी कमवावी लागते. ती पुरेशी नसते, मग पाणी तरी घोटभर मिळावं साहेब!''

बी. डी. ओ. अवाक् होऊन तिच्याकडे क्षणभर पाहात पाहिले. मग म्हणाले, ''बरोबर आहे, बाई तुमचं. मी कायमस्वरूपी पाणीपुरवठा स्कीमचा पाठपुरावा जरूर करतो. मग रोजगार हमीतून रस्ताही प्रस्तावित करतो तहसीलदाराकडे.'' बऱ्याच प्रयत्नांनी रस्ता मंजूर झाला होता. पण काम सुरू होऊन अवघ्या आठ दिवसांतच बंद पडलं होतं. कारण रस्त्याच्या जागी कठीण खडक होता व खडी फोडत रस्ता करणं जिकिरीचं काम होतं. जवळच बंडिगचं मेहनतीला कमी असलेलं काम सुरू होतं. तिथं सारे मजूर वळले व हे काम मजूर नसल्यामुळे बंद पडलं.

प्रज्ञानं तांड्यावरील आपल्या भावाबहिणींना कितीदा तरी विनवलं होतं, ''हा रस्ता आपल्यासाठी फार महत्त्वाचा आहे. हा तांडा इथं कायमस्वरूपी वसावा असं वाटत असेल, तर आपणच हे जिकिरीचं काम केलं पाहिजे. मला माहीत आहे, हे काम अवघड आहे. मजुरीही बंडिंगपेक्षा कमी मिळते. तरीही केलं पाहिजे. निदान पाण्याचा टँकर वेळेवर नीटपणे यावा यासाठी हा रस्ता हवा!''

तिच्या तांड्यावरील नवबौद्ध बांधवांना ते पटत नव्हतं थोडंच? पण सतत मोलमजुरी करणाऱ्या व काळया हायब्रीडच्या भाकरीचं भोजन करणाऱ्या हाडात व पाठीशी गेलेल्या पोटानिशी जगणाऱ्या देहात मेहनतीचं काम करण्याची ताकद उरली

नव्हती. पुन्हा आज रस्ता नसतानाही टँकर येत होताच, म्हणून त्याची तीव्रता जाणवत नव्हती.

तांड्याचे नेते किसन रणबावळेंनी तिची पाठ थोपटीत म्हटलं होतं, "बाबानू, ही पोर म्हंतेय ते समदं खरं हाय. ह्यो रस्ता व्हायलाच हवा. गावातले मजूर नाय येणार या कामाला... त्यांचा बहिष्कार हाय... नाही!"

"पण दादा, लय जिकरीचं काम हाय. अन् बंडिंगच्या कामावर मजुरीबी जादा मिलते..." एक म्हणाला.

"आनी हे रस्त्याचं काम थोडंच पळून जातं? बंडिगचं काम झाल्यानंतर करू की..." दुसऱ्यानं म्हटलं. आणि साऱ्यांनी मग "हो हो, ह्ये बेस हाय." असं म्हणत दुजोरा दिला व तो विषय तिथंच संपला. प्रज्ञा मात्र हताशपणे त्यांच्याकडे पाहात राहिली.

किसन रणबावळे मग तिची समजूत काढीत म्हणाले होते. "ए, जाऊ दे पोरी, तू नगं इतका इचार करू.... इथं आल्यापासून मात्तर तू निस्ती निकामी हायंस... या तांड्यावर मॅट्रिक शिकलेली एकमेव पोर तू.. भीम्याच्या सौंसारात खस्ता खातीस. मह्या मनात हाय, इथं एक बालवाडी सुरू करावी. तू इथल्या लहान पोरास्नी शिकवू शकशील...!"

प्रज्ञाचे डोळे आशेनं लकाकले. ती म्हणाली, "दादा, खरंच असं होईल? गावात असताना माझी बालवाडी नीट चालायची. इथं मात्र जिल्हा परिषदेची ग्रँट हवी. कारण इथं फी कोण देणार?"

"व्हय पोरी, म्या सभापतीशी बोललूया परवाच. ते म्हणाले, जरूर परयत्न करू!"

तिच्या आई बापाचा विरोध असतानाही भीमदादाच्या प्रोत्साहनानं ती मॅट्रिकपर्यंत शिकली. एवढंच नव्हे, तर चांगल्या दुसऱ्या श्रेणीत पास झाली होती. तिनं मग बालवाडीचा सर्टिफिकेट कोर्स करून गावातच समाजमंदिरात बालवाडी सुरू केली होती. ती चांगली चालत असतानाच बहिष्काराचं प्रकरण उद्भवलं.

त्यावर्षी गावात दुष्काळामुळे पाणीटंचाई होती. अजून टँकर सुरू व्हायचा होता. गावात एक खाजगी विहीर होती जुन्या मालीपाटलाच्या मालकीची. तिला भरपूर पाणी होतं. त्यावर सारं गाव पाणी प्यायचं, पण नवबौद्ध व इतर दलितांना पाणी स्वत:हून घ्यायला पाटलाची मनाई होती. त्यांचे दोन नोकर प्रत्येक घराला एक घागर पाणी शेंदून द्यायचे. हे सुशिक्षित प्रज्ञाला खटकलं होतं, पण ती चूप होती. मात्र काही दलित लोकांना त्यांची चीड आली होती. एका सभेसाठी पँथरचे काही नेते औरंगाबाद नांदेडहून आले होते. जेव्हा हा प्रकार त्यांना समजला, तेव्हा त्यांनी जाहीर सभेत मालीपाटलाचा निषेध केला व दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात मोठी बातमी छापून आली.

त्यामुळे चिडून जाऊन पाटलानं आपल्या विहिरीचं पाणीच साऱ्या दलितांसाठी बंद करून टाकलं! याचा जाब विचारायला किसनभाई मिलिंद कॉलेजमध्ये शिकणाऱ्या आपल्या भाच्यासमवेत पाटलाकडे गेले असता त्यांना शिवीगाळ करून पाटलानं हाकलून लावलं, "जा, ही माझी विहीर आहे. मी माझ्या मर्जीनं पाणी देतोय. तुम्हाला काय करायचं ते करा."

तेव्हा किसनभाऊच्या भाच्यानं सरळ तालुक्यात जाऊन पोलीस स्टेशनमध्ये पी. सी. आर. ची केस केली आणि दुसऱ्या दिवशी पाटलाला अटक झाली. सारा गाव दलितांविरुद्ध खवळून उठला. त्यांनी त्यांचं काम व मजुरी बंद केली. पिठाच्या गिरणीत दळण मिळेना, की गावाच्या दुकानात किराणा मिळेना. त्या बहिष्कारानं त्यांची चांगलीच कोंडी झाली.

काही दिवस हा बहिष्कारही सहन केला, पण त्यामुळे जीवनगाडा चालेना. तशी त्यांनी पुन्हा आपल्या दलित नेत्यांना कल्पना दिली. त्याला पुन्हा वृत्तपत्रात मोठी प्रसिद्धी मिळाली. समाजकल्याणमंत्र्यांचा दड्ढ्या आला व तहसीलदार गावात आले. त्यांनी शांतता समितीची बैठक घेऊन बहिष्कार उठविण्याचं आवाहन केलं. त्याला सवर्णांनी तोंडदेखला होकार भरला. पूर्वीइतका नाही, पण काही प्रमाणात का होईना बहिष्कार राहिलाच. शेतीत मजुरीचं काम आधी इतरांना द्यायचं, फारच गरज पडली तर दलितांना बोलवायचं. एकाही दलिताला उधारीवर माल द्यायचा नाही... अशा पद्धतीनं कोंडी चालूच होती.

ही कोंडी फुटावी कशी? हा प्रश्न किसनभाऊंना व प्रज्ञाला पडायचा. त्यांची खलबतं, चर्चा व्हायची. कारण मुळातच गावात भीषण पाणीटंचाई होती व पाटलानं आपली खाजगी विहीर शासनानं पिण्याच्या पाण्यासाठी अधिग्रहित करू नये म्हणून कोर्टाचा स्टे आणला होता. तिथं आता कुणाला हक्कानं पाणी भरता येत नव्हतं. पाटलाच्या मर्जीनं आजही सवर्णांना पाणी मिळायचं, पण दलितांना व विशेषतः नवबौद्धांना तो स्टे दाखवायचा व साळसूदपणे नकार द्यायचा. त्यामुळे काही करणं अवघड झालं होतं. त्यातूनच ही स्थलांतराची कल्पना पुढे आली. त्यांना निर्णय घेणे कठीण नव्हते. कारण कुणाचीच घरे पक्क्या स्वरूपाची नव्हती. साऱ्यांचीच काडाची पालं होती. एका दिवसात त्यांनी आपला कुटुंबकबिला व खटलं या उजाड पठारावरील माळरानावर हलवलं.

प्रज्ञाला आताही हे सारं क्षणार्धात आठवलं आणि अंगावर काटा आला. केवढी जीवघेणी लाचारी! केवळ मागास जमातीचा कपाळी शिक्का म्हणून? का त्यातही आपले बांधव शिकत आहेत व मुख्य म्हणजे संघर्ष करीत आहेत त्याची ही शिक्षा?

तिनं एक दीर्घ नि:श्वास टाकला व पंचक्रोशी न्याहाळू लागली. दुपारच्या झगझगत्या उन्हात दूरवरही कोठे टँकर दिसत नव्हता. तिच्या पोटात भीतीचा गोळा

सरकून गेला... कसं होणार रमावहिनीचं?

आत झोपडीतून सतत विव्हळण्याचा स्वर येत होता. प्रज्ञाची वहिनी रमा अडली होती. कालपासून वेणा सुरू होत्या; पण अजून मोकळी झाली नव्हती. खरं तर प्रज्ञानं भीमदादाला अनेकवार म्हटलं होतं, जवळच जवळा बाजार आहे. तिथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात रमाला डिलिव्हरीसाठी दाखल करावं म्हणून. पण तिथं जाण्यासाठी सध्या एस. टी. नव्हती. कारण मधल्या पुलाचं काम चालू होतं म्हणून बंद पडलेली एस. टी. सुरू झाली नव्हती. त्यामुळे न्यायचं कसं हा प्रश्न होता.

तांड्यावर कुणाकडेही बैलगाडी नव्हती व गावात मागूनही बैलगाडी मिळणं शक्य नव्हतं. हे माहीत असूनही प्रज्ञानं भीमदादाला गावात जाऊन पाहण्यास सांगितलं. तसा तो अनिच्छेनंच गेला होता. अनेक शेतकऱ्यांना भेटला होता. त्यांना एक दिवस बैलगाडी देण्यासाठी विनवलं होतं. पण छे! त्याला निराश होऊन परतावं लागलं होतं. गाव सोडलं तरी अढी व छुपा बहिष्कार कायम होताच.

प्रज्ञाला काळजीत पडलेलं पाहून रमावहिनीनं स्वत:हून आपल्या कळा कशाबशा सहन करीत म्हटलं होतं, "तुमी कायसुदिक इचार करू नका ननंदबाई... इतं आपल्या तांड्यावर सोजर मावशी हाय की सुईण. तिला तेवढं बोलवा म्हंजे झालं. म्या नीट बाळंत व्हते. काही गरज नाही दवाखान्यात जाण्याची!"

प्रज्ञाला ते पटलं नव्हतं, पण काही इलाजही नव्हता. "ठीक आहे. पण दादा, आज तू कामावर जाऊ नकोस."

"नाही प्रज्ञा, आज पगारवाटप आहे. एक महिन्यापासून जे. ई. साहेब नसल्यामुळे वाटप झालं नाही. मला गेलंच पाहिजे. कारण पैसा नाही तर घर कसं चालणार?" असे म्हणून तो कामाला निघून गेला होता.

सोजरमावशी रमा वहिनीजवळच बसून होती. तिच्या ओटीपोटाला मालिश करीत होती, वेणा काढीत होती व प्रज्ञाला धीर देत होती.

पण अठरा - वीस घंटे झाले तरी सुटका होत नव्हती. त्यामुळे प्रज्ञाचा जीव करवादला होता.

त्यातच मघाशी सोजरमावशीनं सांगितलं होतं, की दोन बादल्या पाणी पाहिजे म्हणून... कडक गर्मीचा रमाला त्रास होत होता. सारं अंग तापलं होतं. तिचं अंग थंड पाण्यानं सतत पुसणं भाग होतं. झालंच तर बाळंतपणानंतर स्वच्छतेसाठी व बाळाला आंघोळ घालून स्वच्छ करण्यासाठी पण पाणी हवं होतं.

मोठ्या मुश्किलीनं साठवलेलं अर्धी बादली पाणी मघाशी संपून गेलं होतं. प्रज्ञानं तांड्यावरील दोन - चार घरातून तांब्या - तांब्या पाणी जमा करून कसंबसं आणखी अर्धी बादली पाणी जमा केलं होतं. पण रमावहिनीचं अंग तापानं तप्त झालं होतं. तिच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणं व अंग पुसून घेणं आवश्यक होतं.

त्यातच हेही पाणी संपणार हे उघड होतं. ते संपल्यावर मात्र थेंबभर पाणी मिळणंही मुश्किल होतं.

पुन्हा एकदा बाहेर येऊन प्रज्ञानं पंचक्रोशी न्याहाळली. 'आता टँकर आलाच पाहिजे, आलाच पाहिजे!' ती स्वत:शीच पुटपुटली. एका नव्या जीवासाठी बादलीभर पाणी हवं होतं. आणि ते मिळणं किती कठीण झालं होतं! यात जसा निसर्गाचा हातभार होता, तसाच जातीच्या शापाचा, लाल फितीचा व बेपर्वाई अनास्थेचाही वाटा होता.

कितीही शिकस्त केली तरी विचार करू शकणारं प्रज्ञाचं मन एकाच वेळी क्षुब्ध व अगतिक व्हायचं. जातीमुळे गावकुसाबाहेरचं निकृष्ट जिणं. संघर्ष केला, आवाज उठवला म्हणून बहिष्कृत होणं, याच्या जोडीला पोटाची विवंचना. आणि या सर्वात भीषण बाब म्हणजे पाण्याची समस्या - जिनं आज जीवन-मरणाचं स्वरूप धारण केलं होतं.

रमावहिनीसाठी ती व्याकूळ होती. तिच्यावर प्रज्ञाचा फार जीव होता. कारण रमावहिनीनं तिला भीमदादाच्या संसारात आल्यापासून मुलीप्रमाणे वागवलं होतं व नवऱ्याच्या बरोबरीनं तिनंही प्रज्ञाला शिकण्यासाठी उत्तेजन दिलं होतं. एवढं शिकून - सवरून प्रज्ञानं रिकामं घरी बसावं व तिला काही काम मिळू नये, याची रमावहिनीला सर्वात जास्त खंत होती.

आज तिची लाडकी रमावहिनी जीवन-मरणाच्या सीमारेषेवर तळमळत होती. तिचा ताप वाढत होता. हात लावला तरी चटका बसावा एवढं अंग तापलं होतं. सोजरमावशीजवळ ताप कमी करण्यासाठी गवती चहाखेरीज कसलाच उपाय नव्हता व तो चहा या तांड्यावर उपलब्ध नव्हता. सकाळी प्रज्ञा तंगडेमोड करून जवळाबाजार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गावात असलेल्या सबसेंटरला गेली होती; पण तिथं भलंमोठं कुलूप पाहून तशीच परत आली होती. नर्स भेटली असती तर निदान चार गोळ्या तापासाठी मिळाल्या असत्या व तिला घेऊन येता आलं असतं रमावहिनीची तब्येत दाखवायला; पण सबसेंटर कधीतरी उघडं असतं. कारण नर्स तालुक्याला राहते.

सोजरमावशी निष्णात सुईण खरी; पण तीही गंभीर झाली होती. "प्रज्ञा, पोरी, लई अवघड केस हाय तुझ्या वहिनीची. म्या शिकस्त करतेय पन् तिचा ताप कमी व्हत नाही. त्यासाठी औवशुद हवं. ते नाही तर पानी तरी हवं. अंग, पुना पुना पुसलं तर ताप कमी व्हईल. जा पोरी, पानी बघ पानी."

त्यामुळे आज - आता पाण्याचा टँकर यायला हवा होता. प्रज्ञा कितीतरी वेळ तशीच उभी होती.

...आणि तिच्या नजरेला दुरून येणारा पिवळा ट्रक उन्हामुळे झगमगताना

दिसला. होय, हाच पाण्याचा टँकर आहे! ट्रकवर पाण्याची टाकी फिट करून त्याचा टँकर म्हणून उपयोग खातं करीत होतं.

आता दहा मिनिटात टँकर तांड्यावर येईल आणि मग आपण रांजणभर पाणी भरून घेऊ... वहिनीचं सारं अंग थंड पाण्यानं पुसून काढू म्हणजे तिचा ताप झटकन उतरेल आणि ती सुखरूप बाळंत होईल व नव्या बाळाला आंघोळ घालून स्वच्छ करता येईल.

प्रज्ञा एकटक खालून वर तांड्यावर येणाऱ्या ट्रककडे पाहात होती. एक एक क्षण तिला प्रदीर्घ वाटत होता.

आणि तो ट्रक वर येईचना. प्रज्ञानं डोळे चोळून पुन्हा पाहिलं. तो वाटेतच रस्त्यावर थांबला होता.

"तो ट्रक बिघडला की काय?" हा प्रश्न तिच्या मनात चमकला आणि तिच्या पोटात पुन्हा एकदा भीतीचा गोळा आला.

आणि ती बेभान होऊन, पायात चपला नाहीत हे विसरून तशीच वेगानं धावत खाली जाऊ लागली. आणि दोन मिनिटात धापा टाकीत, ठेचा खात, अडखळत जेव्हा ती ट्रकजवळ आली, तेव्हा तिथं ट्रकला टेकून इब्राहिम शांतपणे विडी फुंकीत धूर काढीत उभा होता.

"मेरी जान, परेशान लगती हो! क्यात बात है?" लोचटपणे इब्राहिम तिचा उभार बांधा आसक्त नजरेनं न्याहाळात म्हणाला.

जेव्हा जेव्हा इब्राहिम विखारी नजरेनं प्रज्ञाला पाहायचा, तेव्हा तिला वाटायचं, तो नजरेनंच आपल्याला विवस्त्र करून उपभोग घेतोय. तिच्या मणक्यात एक थंड असह्य स्त्रीत्वाची भीती चमकून जायची, पण तिला फारसा विरोधही करता येत नसे. कारण त्यानं अनेकदा गर्भित धमकी दिली होती,

"प्यारी, इस तांडे पे ट्रक - टँकर लाना बडी जोखीम भरी बात है. दुसरा कोई ड्रायवर यहाँ नही आता. सिर्फ मैं आता हूँ तो तुम्हारे लिए, तुम पे दिल जो आ गया."

जेव्हा संधी मिळेल तेव्हा तिच्याशी तो लगट करायचा. प्रज्ञाला त्याच्या विषयांध स्पर्शाची घृणा - किळस वाटायची, तरी सुद्धा त्याला झिडकारता पण येत नसे. त्याची माफक लगट तिला कौशल्याने - तारेवरची कसरत करीत अंतर राखीत सहन करावी लागायची.

पळत आल्यामुळे प्रज्ञाला धाप लागली होती व तिची उभार छाती वर - खाली होत होती. त्याकडे एकटक इब्राहिम पाहात होता. ते जेव्हा तिच्या ध्यानी आलं, तेव्हा ती शहारली व छातीवर हात घेत तिनं विचारलं,

"काय झालं ड्रायव्हर साहेब? टँकर बंद पडला का?"

"वैसाच बोलना पडेगा... रेडिएटर में फॉल्ट है... पाणी ठहरताच नहीं. इंजन

इस वजह से गरम हो गया है. फटने का डर है.'' इब्राहिम जे सांगत होता, त्याचा तिला अर्थ बोध होत नव्हता. पण एवढं कळत होतं, की टँकर बंद पडला होता.

''पाण्याची लई जरुरी आहे, ड्रायव्हरसाहेब. माझी वहिनी बाळंत होतेय, तिला ताप चढलाय. प्लीज, काहीतरी करा व ट्रक वर आणा ना. माझ्यासाठी.'' कळवळून प्रज्ञा म्हणाली.

''तेरे लिए जान भी हाजिर है.'' इब्राहिम नाटकी ढंगात म्हणाला, ''लेकिन थोडा ठहरना पडेगा. इंजन ठंडा होने दो... अभी मैने रेडिएटर में पाणी भरा है... कुछ समय रुकना पडेगा.....''

तिनं सुटकेचा एक नि:श्वास टाकला. ''म्हणजे ट्रक फारसा बिघडलेला नाही. वर येऊ शकेल...!''

''तब तक क्या ऐसे ही धूप में खडी रहोगी? नहीं प्यारी, तुम मुरझा जाओगी.'' इब्राहिमचं हे लागट बोलणं तिला सहन होण्याच्या पलीकडे होतं. पण चूप बसणं ही या क्षणी तिची मजबुरी होती, असहायता होती.

''मला..... मला सवय आहे, ड्रायव्हरसाहेब त्याची.''

''लेकिन मुझसे देखा नहीं जाता. चलो, ट्रक में बैठते है.'' त्याच्या सूचक बोलण्यानं प्रज्ञाचं स्त्रीत्व नखशिखान्त थरकापलं. त्याला नाही म्हणणं म्हणजे आपल्या हातानं पायावर धोंडा पाडून घेण्यासारखं होतं. न जाणो, तो ट्रक घेऊन वर येत नाही म्हणाला तर... तिच्या नजरेसमोर तळमळणारी व प्रसूति वेदना सहन करणारी रमावहिनी आली, तिचं तप्त पोळणारं शरीर आठवलं आणि सोजरमावशीचे शब्द - ''पोरी, दोन बादल्या पानी हवं. काय बी कर, लय गरज हाय तेची... ह्या रमेचा ताप वाढतुया. तो कमी करण्यासाठी पानी हवं... नाय तर मला इपरीत व्हण्याची भीती वाटते...''

ड्रायव्हरनं तिला हात देऊन ट्रकच्या केबिनमध्ये खेचलं. त्यावेळी कौशल्यानं त्याने तिला एक झटका दिला व हात सोडला, तशी बेसावध प्रज्ञा त्याच्या अंगावर कोसळली. त्यानं संधी सोडली नाही व तिला गच्च मिठी मारली.

इब्राहिमच्या कित्येक दिवस आंघोळ नसलेल्या, घामेजलेल्या, वास मारणाऱ्या शरीराचा दर्प प्रज्ञाच्या अंगांगावर किळस पेरून गेला. ती आक्रसली गेली व म्हणाली, ''ड्रायव्हरसाहेब, हे... हे बरं नाही. प्लीज, मी फार परेशान आहे... माझी वहिनी तिकडं तडफडतेय, प्लीज. लवकर गाडी सुरू करून पहा.''

''ठीक है मेरी जान. मैं कोशिश करता हूँ.''

त्यानं तिच्यापासून अलग होत म्हटलं आणि स्टिअरिंग हाती घेऊन चावी फिरवायला आरंभ केला. ट्रक नुसताच दोन - तीनदा गुरगुरला व थांबला. ''नहीं प्यारी, अभी इंजन गरम है. ठहरना पडेगा....''

ते कितपत खरं होतं कोण जाणे, पण प्रज्ञानं कसलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. एक एक क्षण तिच्यासाठी जीवघेणा होता. वहिनीच्या काळजीनं जीव कसनुसा होत होता, तर ट्रकमध्ये इब्राहिमची शारीरिक लगट तिच्या स्त्रीत्वाचे लचके तोडीत होती. तरीही तिला ते निमूटपणे सहन करावं लागत होतं.

पुन्हा इब्राहिम तिच्याजवळ सरकला. त्याचा राकट हात तिच्या देहाचे वळसे व वळणं शोधू लागला. चाचपू लागला. तसा तिनं प्रतिकार केला, "नको, नको, हे बरं नाही ड्रायव्हरसाहेब...."

"ये प्यार - मोहब्बत है मेरी जान.. हम दोनो जवान हैं और ऐसा तनहा मौका बार बार नहीं आता!" त्याच्या स्वरातून वासनेची प्रच्छन्न लाळ गळत होती.

"पण तिकडं माझी वहिनी मरणाच्या दारात आहे. प्लीज, माझं मन नाही ड्रायव्हरसाहेब...."

इब्राहिम काही क्षण तिला आरपार न्याहाळीत राहिला व मग गुरकावीत म्हणाला, "ठीक है, ये ट्रक फिर वापस जायेगा. ऊपर नहीं आयेगा. इसमें इतनें फॉल्ट है कि, मैं ही सिर्फ उसे चला सकता हूँ। ये जोखीम मैं सिर्फ तुम्हारी मोहब्बत की खातिर उठाता हूँ, समझी! तुम नहीं चाहती हो तो..."

"नाही, नाही... माझ्या बोलण्याचा तो मतलब नाही ड्रायव्हरसाहेब...." प्रज्ञा म्हणाली, "मी- मी, मला - मला..."

"ठीक है, कुछ बोलने की जरुरत नाहीं है प्यारी...."

इब्राहिमनं तिची असहायता पुरेपूर ओळखली होती. एक कुंवार स्त्री त्याला विनासायस मिळत होती. केवळ पाण्यासाठी. "वाह रे मालिक, अजीब दस्तूर है तेरा!"

पण या रस्त्यावर व यावेळा त्याची अभिलाषा पूर्णपणे पुरी होणं शक्य नव्हतं, तरीही तिच्या शरीराशी त्याला मनसोक्त खेळता आलं. दहा मिनिटे का होईना तिला मिठीत घेऊन तिचा कुंवारा गंध त्याला लुटता आला.

या दहा मिनिटात एक स्त्री म्हणून ती पुरुषाच्या पशुरूपाच्या दर्शनाने अनेकवार जळून खाक झाली होती. तिच्या मनात एवढा संताप, एवढी अगतिकता दाटून आली होती, की तिला शक्य असतं तर तिनं इब्राहिमचा कोथळा फाडला असता, त्या ट्रकला आग लावली असती आणि मनसोक्त रडली असती. आता इब्राहिमनं तृप्त मनानं चावी फिरवताच ट्रक चालू झाला व दोन तीन मिनिटात तो तांड्यावर आला.

सारे जण "पाणी आलं - पाणी आलं" म्हणून धावू लागले. पण इब्राहिमनं प्रथम तिला पाणी भरून घ्यायला सांगितलं. तिनं क्षणापूर्वीचं सारं विसरून उत्साहानं दोन्ही रांजण पाण्यानं भरून घेतले. तो पाईपमधून पडणारा पांढराशुभ्र फेसयुक्त जलौघ पाहून तिचे डोळे व काही प्रमाणात मनही निवून निघालं.

पाणी भरून होताच ती आपल्या झोपडीकडे धावली आणि दारातच सोजरमावशी गुडघ्यात तोंड खुपसून बसलेली पाहिली... आणि प्रज्ञा थरकापली.... मनात एकाच वेळी अनेक पापशंका चमकून गेल्या.

"मावशे, मावशे, काय झालं?"

"पोरी...." मान वर करीत थरथरत्या आवाजात सोजरमावशी म्हणाली, "लई येळ झाला. रमाचा ताप तू गेल्यावर वाढतच गेला... आनी तिला वाताचे झटके आले... आनी पोराला जनम देताच तिनं डोळे मिटले..."

"नाही, नाही.... माझी रमावहिनी मला सोडून जाणार नाही..." बेभानपणे प्रज्ञा म्हणााली.

'पोरी, सुदीवर ये... सम्दं संपलंय गं... म्या लई कोशिश केली... पाणी जर असतं तर रमाचा ताप कमी करता आला असता...." सोजरमावशी म्हणाली.

"बरं, बाळ कसा आहे" त्याला पाहायचंय!"

'चल पोरी, त्योबी निपचित पडलाय. जन्मल्यापासून तेचं आंगबी तापलंय बघ." सोजर म्हणाली.

"एक बादली पानी घे. बाळास्नी आंगूळ घालू... म्हंजे तेची तलखी कमी व्हईल बघ...!"

ती धावतच गेली. रांजणात बादली बुडवून ती घेऊन आली.

ते नुकतंच जन्माला आलेलं मूल निपचित पडलं होतं. छातीचा भाग वेगानं वर खाली होत होता. त्याला ते सहन होत नसावं. मधूनच वेदनायुक्त हुंकार तो देत होता.

तिनं आपला पदर पाण्यात बुडवला आणि बाळाचे अंग पुसू लागली. तो थंड पदर अंगावरून फिरताना बाळ झटके देत होता... तिचं लक्षच नव्हतं. ती बेभानपणे थंड पाण्यानं त्याचं अंग पुसत होती.

आणि सोजरमावशीनं गळा काढला "थांब पोरी, काईसुदिक उपयोग नाही जाला याचा.. पहा पहा, याचे हात पाय थंड पडत आहेत..."

"अगं मावशे, मग हे ठीकच आहे की, त्याचा ताप उतरतोय..."

"नाही पोरी, हे इपरीत वाटतंया..." मावशी म्हणाली, तसं किंचित भानावर येत प्रज्ञानं बाळाकडे पाहिलं. त्याच्या छातीचा वर खाली होणारा भाता बंद पडला होता.. त्याचा हात तिनं हाती घेऊन पाहिला आणि तिच्या हातातून तो निर्जीव बनलेला हात गळून पडला.

तिचा चेहरा आक्रसून दगडी बनला होता...

"पोरी, नको तेच झालं बघ. रमाबी गेली आनी बाळबी गेलं गं.." सोजरमावशीचे हुंदकेही घुसमटले होते.

प्रज्ञा मात्र तशीच निश्चल बसून होती. किती वेळ कुणास ठाऊक!

भानावर येताच ती लगबगीनं उठली. प्राणपाखरू उडून गेलेल्या आपल्या प्रिय रमावहिनीच्या व नवजात अर्भकाच्या कलेवराकडे तिनं एकवार डोळाभरून पाहिलं व ती बाहेर आली.

ट्रक निघून गेला होता. साऱ्यांचं पाणी भरून झालं होतं.

ती आपल्या झोपडीजवळील पाण्यानं भरलेल्या रांजणाजवळ आली आणि बादलीनं पाणी घेऊन ती आपल्या शरीरावर उपडी करू लागली व सचैल न्हाऊ लागली. एक रांजण पाणी संपून गेलं, तरी बेभानपणे ती न्हातच होती.

सोजरमावशीनं तिला कळवळून विचारलं, "पोरी, हे काय करतेस गं? भानावर ये...."

"मी, मी... माझ्या देहाचं उदक दिलं पाण्यासाठी... माझी वहिनी बरी व्हावी व बाळाला जीवन लाभावं म्हणून.. पण दोघंही मला सोडून गेले. आता हे उदक, हे पाणी डोईवर घेऊन सचैल न्हातेय त्यांच्यासाठी आणि.... आणि या देहाचा ओंगळपणा जाण्यासाठी...!"

आणि बोलता बोलता तिचा स्वर कापरा झाला, मन व डोळे दोन्ही पाझरू लागले आणि तशीच ती सोजरमावशीच्या दुबळ्या मिठीत कोसळली...

"मावशे ... मावशे..!"

o - o - o

# ७. फिरुनी नवी जन्मेन मी!

हो हो.. खरंच मला मरायचं नाहीय. मला तर उलट वाऱ्याच्या गतीनं धावायचंय. वर्ल्डमधील सर्वोत्तम लाँग डिस्टन्स रनर बनायचंय मला महिलांमध्ये, आत्ताशी तर सुरुवात आहे माझी, आधी सेऊल व हे आताच द. - द- दोहा....''

आणि तिनं मान वळवत ती बेडवरील उशीत खुपसली... अनावर हुंदका दाबण्यासाठी. तो दाबण्यात व आपल्या आक्रंदनाचा आवाज होऊ न देण्यात ती यशस्वी झाली खरी, पण अवघा देह त्यानं थरथरत होता.

सरकारी दवाखान्याच्या स्पेशल रूममध्ये मीनाचा - तिनं काल आत्महत्त्येच्या केलेल्या असफल प्रयत्नांच्या संदर्भात जबाब घेण्यासाठी आलेला पोलीस इन्स्पेक्टर अवाक होऊन क्षणाक्षणाला बदलणारे तिचे रंग पाहात होता. क्षणभर तो जबाब नोंदवण्याचं विसरला होता. त्याच्या सोबत आलेला पोलीस रायटर हातात उघडं पेन व फाईल घेऊन किती वेळापासून इन्स्पेक्टरांच्या जबाबाच्या संदर्भात डिक्टेशनची वाट पाहात अवघडून उभा होता. तसेच सिव्हिल सर्जन आणि ड्यूटी इन्चार्ज डॉक्टरही तिथं उपस्थित होता. जबाब देताना पेशंटरवर अवाजवी ताण तर पडत नाही ना हे पाहण्यासाठी.

एका महिन्यापूर्वी मीना राज्याची नव्हे तर पूर्ण देशाची अभिमानबिंदू झाली होती. एका दगडफोडीचं पिढीजात काम करणाऱ्या ग्रामीण पाथरवट भटक्या जातीच्या समाजाची मुलगी दोहाच्या आशियाई खेळात आठशे मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्य पदकासह दुसरी आली होती. इंडियन ॲथलेटिक्स स्क्वाडमध्ये ती वगळता साऱ्या खेळाडू मुली या शहरी-निमशहरी भागातल्या होत्या. मीना मात्र मराठवाड्याच्या उस्मानाबाद या दुष्काळी प्रांतातून आलेली, पाथरूडची. त्यामुळं तिच्यावर सर्व स्तरातून तिच्या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव झालेला.

आणि आज....?

केवळ तिचं नशीब बलवत्तर होतं म्हणून ती वाचली होती. रोजगार हमीच्या कामावर गेलेली मीनाची आई दुपारीच परतली होती. कारण एका शेतकऱ्यानं अचानक

अडवल्यामुळं रोजगार हमीचं काम मुकादमास बंद करावं लागलं होतं. त्यामुळं आई दुपारीच घरी आली. तेव्हा काळ्या-निळ्या अवस्थेत बेहोशीच्या स्थितीत मीना वेदनेनं तळमळत खाटेवर पडलेली तिनं पाहिली. खाटेखाली एक औषधाची उघडी रिकामी बाटली पडलेली व त्यातून दोन दिवसापूर्वी बाजारातून जर्सी गाईच्या आजारपणासाठी आणलेलं औषध सांडलेलं. आईला काय घडलं असेल हे क्षणार्धात लक्षात आलं. पोरगी मरणार की काय, या भीतीनं तिनं टाहो फोडला. मग स्वत: सावरत शेजारच्या चार पाच लोकांना बोलावून मीनाला जवळच असलेल्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केलं. डॉक्टरांनी तातडीनं उपाय करून तिच्या शरीरातलं विष काढलं व तिचा प्राण वाचवला.

त्या जालीम विषानं मीनाच्या शरीराची आग आग होत होती, पण एक बेहोशीचा अथांग सागर अवघ्या जाणिवेवर पसरलेला. त्या जीवन-मृत्यूच्या सीमारेषेवरील मनोवस्थेत बंद डोळ्यासमोर आणि अद्यापही पूर्ण विस्मरण न झालेल्या मनमानसाच्या पटलावर अनेक दृश्यं फेर धरून नाचत होती.

शाळेत दररोज वाऱ्याच्या वेगानं पळत जाऊन पिरिअड गाठताना घामेजलेल्या चेहऱ्यावरची जिंकल्याची सिंकदर भावना ...

कुठलंही काम सांगितलं की, जास्तीत जास्त वेगानं पळत जाऊन करणं. अभ्यासासाठी आई मागं लागली की, तिच्या हातचा मार चुकविण्यासाठी सुसाट धावणं.

आणि त्या पारध्याचा पंधरा-वीस किलोमीटर केलेला पाठलाग.

मीनाच्या चेहऱ्यावर किंचितसं हसू फुलून आलं होतं. क्षणभर तिला आपल्या वेदनांचा विसर पडला होता. तो पोलीस इन्स्पेक्टर आश्चर्यानं पाहात होता. काही बोध होत नसल्यामुळं बुचकाळ्यात पडलेला. पण सॉयकॉलॉजी जाणणाऱ्या डॉक्टरांना वाटलं, कोणत्यातरी आनंददायी आठवणीनं मीनाचा चेहरा नक्कीच फुलून आलाय. त्या आठवणी नक्कीच तिच्या रनिंगच्या खेळाशी संबंधित असणार.

मीनाच्या आठवणींचा कोलाज अर्धवट बेहोशीच्या स्थितीतही चालू होता. ज्या वेगानं ती नेहमी पळायची, त्याच्या कितीतरी अधिक पटीनं मनानं आठवणींच्या दृश्यांची फिल्म उलगडली जात होती.

खरं तर तिच्या दप्तरात, तेही शाळेत जाताना काय असणार? पण ती बॅग नवी चकचकीत होती. जिल्हास्तरीय हौशी ॲथलेटिक्स स्पर्धेत १५०० मी. धावण्याच्या शर्यतीत प्रथमच तिनं भाग घेतला होता आणि त्यात ती सर्वप्रथम आली होती. प्रायोजकानं तिला ही बॅग भेट दिली होती.

मीनासाठी ती अनमोल होती. अठरा विश्वे घरात असलेलं दारिद्र्य आणि रोज दोन वेळा धड पोटभर खाण्याची असलेली भ्रांत. अशाही परिस्थितीत मीना खेळाडूची

जिद्द बाळगून होती. वाऱ्याच्या वेगानं पळणं, हा तिचा जणू स्वभावधर्म आणि कधीही न चुकवला जाणारा दिनक्रम बनला होता. ही पहिली अधिकृत चौदा वयोगटाखालची शर्यत बाराव्या वर्षी सातवीच्या वर्गात तिनं जिंकली होती. तिनं साधलेली वेळही राज्यस्तरावर नवा विक्रम म्हणून नोंदली गेली होती.

गावी परतल्यावर ती चकचकीत बॅग घेऊन प्रथमच मीना शाळेत निघाली होती. नेहमीप्रमाणे पळत वाऱ्याच्या सुसाट गतीनं. शाळेच्या रस्त्यावर तिच्या अनेक मैत्रिणी व शाळाबंधूंना मागं टाकत. खोडकरपणानं मैत्रिणीची वेणी ओढ, कुणाला टपल्या मार, तर कुणाची टोपी उडव, अशा खोड्या करीत धावताना तिला मजा यायची.

आजही असंच मित्र-मैत्रिणींच्या खोड्या करीत त्यांना मागं टाकीत ती पुढं धावत होती. मनात तीच उत्तेजक प्रेरणादायी भावना होती. "आय ॲम ॲट दी टॉप ऑफ दी वर्ल्ड." शाळेत वार्षिक समारंभाला आलेल्या जिल्ह्याच्या कलेक्टर मॅडमनं त्यांच्या भाषणात "उच्च ध्येय ठेवा. त्यासाठी जिवापाड प्रयत्न करा. म्हणजे तुम्ही सर्वोच्चपदी जाल!" असा उपदेश करताना एक यशाचा मंत्र दिला होता. 'ऑल्वेज इमॅजिन दॅट यू विल बी ॲट द टॉप ऑफ दी वर्ल्ड!" मीनाला तो मनस्वी भावला होता. कलेक्टर मॅडमच्या हस्ते बक्षीस घेताना त्यांनी, "तू पुढं काय होणार?" असं विचारलं, तेव्हा ती पटदिशी म्हणून गेली, "मॅडम, मला पी. टी. उषापेक्षाही मोठं यश मिळवायचं आहे. ऑलिम्पिक पदक. येस मॅम, आय विल डू इट. तुमचा उपदेश मी कधीच विसरणार नाही. आय विल बी ॲट दी टॉप ऑफ दी वर्ल्ड." मॅडमचे ते इंग्रजी शब्द तिला पाठ झाले होते, जे तिनं पोपटाप्रमाणे अचूक म्हणून दाखवले होते.

मीनाच्या मनात हीच उत्तेजित भावना तरळत होती आणि पळताना देहानं विजेची गती पकडली होती. अचानक रस्त्यावर दगडाला ठेच लागून ती थांबली आणि पटकन खाली बसली. दप्तर बाजूला पडलं गेलं. तिनं रक्ताळलेला अंगठा रक्तस्राव बंद व्हावा म्हणून दाबून धरला.

आणि मागून आलेल्या मैत्रिणी 'चोर - चोर' म्हणून ओरडल्या. मीनानं वर मान करून पाहिलं. तिची चकचकीत बॅग घेऊन एक चोरटा पळताना तिला दिसला. अरे, हा तर शिवा पारधी आहे. कुणाच्याही वस्तू लंपास करून वेगानं पळून जाणं, ही त्याची खासियत होती. तो जीपनं पाठलाग करणाऱ्या पोलिसांनाही गुंगारा देण्यात वस्ताद होता.

मीनासाठी पहिल्या विजयाची स्मृती म्हणून बक्षीस मिळालेली बॅग अनमोल होती. आपल्या नजरेसमोर ती चोरटा पळून नेत आहे, हे तिला सहन झालं नाही, ती वेदना सावरीत उठून उभी राहिली. "मीही रनर आहे आणि शिवा पारध्याला हरवलं पाहिजे. पळत जाऊन गाठलं पाहिजे आणि आपली बॅग पुन्हा मिळवली पाहिजे. तो माझा दुसरा विजय असेल!"

आणि ती पळू लागली. तिला दुखऱ्या रक्तबंबाळ अंगठ्यामुळं मनस्वी वेदना होत होत्या, पण मनात एक खुन्नस भरून आली होती. शिवा पारध्याला जिंकायची, गाठायची. तसं झालं तर 'वन्स अगेन आय विल बी अॅट दी टॉप ऑफ दी वर्ल्ड' ही भावना मनाला उभारी देत होती.

काही सेकंदांतच तिनं गती पकडली. अजूनही तो शिवा पारधी नजरेच्या टप्प्यात होता. त्याला नजरेआड करणं धोक्याचं होतं. तिनं गती वाढवली. केवळ भाकरी भाजी व कधीमधी मांस-मच्छी खाणाऱ्या तिच्या काटकुळ्या देहात व पायात कमालीची ताकद संचारली. तिनं पाहता पाहता त्या शिवा पारध्याला गाठलं आणि त्याच्या कानाखाली काडकन वाजवीत आपली बॅग हिसकावून घेतली व म्हणाली, "भाड्या, आज बरा गावलास चोरी करताना. तुला जेलमध्येच पाठवते." तोवर इतर लोक तिथं जमा झाले होते. त्यांनी शिवा पारध्याला पकडून ठेवलं आणि आपले हात-पाय मोकळे करीत मागं शिवानं लंपास केलेल्या त्यांच्या वस्तूंच्या रागानं चांगलंच बदडून काढलं.

तिथं काही वेळानं एक लाल दिव्याची गाडी आली. ती थांबली आणि त्यामधून कलेक्टर मॅडम उतरल्या. मीनानं त्यांना पटकन ओळखलं. मॅडमसोबत एक पोलीस अधिकारीही होते. ते मात्र तिला अपरिचित होते.

मीनानं मॅडमला अभिवादन करीत घडलेला प्रकार सांगितला. तसे ते पोलीस अधिकारी मॅडमला म्हणाले, "ग्रेट, आय वोन्ट बिलीव्ह! १० मिनिटात साडेपाच सहा किलोमीटर पळून या पोरीनं शिवाला पकडलं. शी विल बी ए ग्रेट अॅथलिट - ए ट्रू इंटरनॅशनल लाँग डिस्टन्स रनर!"

कलेक्टर मॅडमनं त्या पोलीस अधिकाऱ्यास मीनाच्या शाळेत नुकत्याच झालेल्या बक्षीस समारंभामध्ये मीनानं कसं तिला पी. टी. उषाच्या पुढं जायचं आहे, हे आत्मविश्वासपूर्वक म्हटल्याचं सांगितलं. दोघं आपासात इंग्रजीत बोलले. त्यातलं मीनाला थोडं समजलं, पण बरंच डोक्यावरून गेलं, पण तिच्याबद्दल ते बोलत होते हे नक्की. मग कलेक्टर मॅडम तिला म्हणाल्या.

"मीना, रियली वन डे यू विल बी अॅट दी टॉप ऑफ दी वर्ल्ड. हे एस. पी. साहेब आहेत. आम्ही ठरवलं आहे की, तुला पुण्याच्या बालेवाडीतल्या क्रीडा प्रबोधिनीत पाठवायचं. तिथं तुला रनिंगचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळेल."

आणि प्रबोधिनीत तिला सुरेश बाबूसारखा कोच भेटला. आणि सेऊल गेममध्ये पहिले आंतरराष्ट्रीय ब्रॉंझ पदक मिळवून तिनं श्रद्धापूर्वक कलेक्टर मॅडम, ज्या आता मुंबईला मंत्रालयात प्रसिद्धी खात्याच्या सचिव आहेत त्यांना; एस. पी. जे आता पुणे विभागाचे डी. आय. जी. आहेत त्यांना आणि गुरू कोच सुरेशबाबूला खरीखुरी स्व-कामईची गुरुदक्षिणा दिली. त्यानंतर मागील महिन्यातल्या दोहा आशियाई स्पर्धेतलं ८०० मीटरमध्ये रौप्य पदक मिळवून कलेक्टर मॅडमचा विश्वास पण तिनं सार्थ

ठरवला. मात्र, त्यावेळी १५०० मीटरमध्ये तिला खेळू दिलं नाही. त्यावेळी त्याचं कारण मॅनेजरनं सांगितलं नाही. पण मनात ती दडून बसलेली भीती उफाळून आली होती. लहानपणी शिवा पारध्याला बेड्या ठोकल्यावर त्याला जेलमध्ये नेण्यासाठी पोलीस जीपमध्ये बसवत होते, तेव्हा बसताना तुच्छेतेनं पचकन थुंकन तो मीनाकडं पाहत म्हणाला, ''ही काय बाय आहे? तिचं नाव बदला साहेब. मीना नाही, मर्दसिंग - मर्दसिंग.'' जेंडर टेस्टमध्ये काही गडबड झाली का? अशी शंका आली आणि 'मर्दसिंग' हा शब्द तिच्या मनावर घणाचा घाव घालू लागला.

''नाही - नाही, मी - मी... बाईच आहे, मर्दसिंग नाही.'' अचानक किंचाळत मीना ताडकन उठून बसली आणि समोर पोलीस व डॉक्टरांना पाहताच गुडघ्यांत मान खुपसून हुंदके देऊ लागली.

तिच्या पाठीवरून मायेचा चिरपरिचित हात फिरला. तिनं मान वर करून पाहिलं, समोर मंजुळाभाभी उभी होती. तिचे गुरू सुरेशबाबूंची पत्नी व साऱ्या विद्यार्थ्यांची दुसरी आई आणि बरंच काही. गाईड, फिलॉसॉफर, पेशानं वकील, पण पती मार्गदर्शक असल्यामुळं त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना आपलं विशाल कुटुंब मानणारी मंजुळाभाभी, तिला पाहताच मीनाला पुन्हा उमाळा दाटून आला. तिनं नि:संकोचपणे भाभींच्या कमरेला मिठी मारली व स्फुंदत म्हणाली, ''पहिल्यापासून सांगत आले आहे व आज पुन्हा सांगते... मी बाईच आहे हो, पण हा शब्द माझा पिच्छा सोडत नाही - 'मर्दसिंग!' ''

मीना आता एकवीस वर्षांची आहे. अजूनही तिची पाळी सुरू झालेली नाहीय, हे मंजुळेला माहीत होतं! पण आजवर मीना इतकी जवळची आणि तिची लाडली असूनही त्याबाबत मंजुळेचं त्याचा एक खेळाडू म्हणून होणाऱ्या परिणामांकडं लक्ष गेलं नव्हतं!

मीनानं दोहामध्ये ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीत पूर्ण भारताची शान वाढवीत रौप्य पदक संपादन केल्यानंतर, तिच्याबद्दल सुरेशबाबू आणि मंजुळेस दुसऱ्या दिवशीच्या १५०० मीटर दीर्घ पल्ल्याच्या शर्यतीबाबत मोठ्या अपेक्षा होत्या. इथं तिला सुवर्ण पदक अपेक्षित होतं, पण ती खेळलीच नाही. पायात गोळा आल्याचे व तीव्र 'मसल पेनचं' कारण सांगणाऱ्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे वृत्तपत्रातील जाहीर झालेल्या बातमीनं त्यांना हळहळ वाटली. ''बिचारी, ऐनवेळी तब्येतीनं घात केला, नाही तर-'' मंजुळेनं म्हटलं, त्याला पुष्टी देताना सुरेशबाबू म्हणाला होता.

''हो ना, प्रबोधिनीचा सकस आहार असूनही, तिच्या तब्येतीत काही फारसा फरक पडला नाही. तिच्यात वर्ल्डक्लास रनिंगचे सर्व गुण जन्मजात आहेत, पण स्टॅमिना कमी पडतो. एका दिवसात दोन किंवा सलग दोन दिवसात दोन आंतरराष्ट्रीय शर्यतीमध्ये ती तोकडी पडते. खास करून दुसऱ्या शर्यतीमध्ये.''

"पण इथं येण्यापूर्वी भाकरी - भाजीवर जगली, वाढली. त्यावरच तिचा पिंड पोसला गेला आहे. पण शरीराची खेळाडू म्हणून काही अंशी वाढ कमी पडतेय - असं दिसतंय."

मंजुळेला हे सारं स्मरलं आणि तिच्या आक्रंदनाचा, "मी, मी, बाईच आहे. मीना आहे, मर्दसिंग नाही." याचा अर्थ आता कुठं थोडा - थोडासा उमगत गेला, पण त्याला बराच उशीर झाला होता.

लिंगचाचणीमध्ये ती सपशेल 'फेल' झाली होती आणि आशियाई ऑलिम्पिक असोसिएशननं तिचं रौप्य पदक काढून घेण्याचा निर्णय जाहीर केला. तेव्हापासून ती गावीच होती. बरं नाही म्हणून मीना चार दिवसांसाठी परवानगी घेऊन प्रबोधिनीतून पाथरूडला आपल्या घरी गेली होती आणि त्यानंतर पंधरा दिवसांनी तिच्या आत्महत्येच्या प्रयत्नाची बातमी कानी आली. तशी मंजुळा व सुरेशबाबू आठ तासांचा प्रवास करून तिला पाहायला पाथरूडला आले होते.

"मी-मी बाईच आहे हो भाभी. मीना आहे, मर्दसिंग नाही."

या जेमतेम दोन शब्दांनी मागील दीड महिन्यात तिनं काय भोगलं असावं. याची लख्खपणे मंजुळेला जाणीव झाली. आपण बाई असून तिला समजू शकलो नाही. आज सारं जग तिच्या स्त्री असण्यावर अंगुलीनिर्देश करतंय. इंटरनेटवर सर्च इंजिनवर 'ती (She) का तो (He)' असे खोचक प्रश्न विचारणाऱ्या कॉमेन्टस् येत आहेत. कसं सहन केलं असेल तिनं?

आता तर आशियाई ऑलिम्पिक असोसिएशननं तिचं बाईपण स्पष्टपणे नाकारलं होतं व ती गुणसूत्रांच्या आधारे स्त्री नसून पुरुष आहे, असं जाहीर केलं होतं. लिंगचाचणीमध्ये फेल होणं याचा हाच अर्थ होता.

मीनाला पण लहानपणापासून का तिच्या स्त्रीत्वाची शंका होती? तिला वयात आल्यावर पाळी आली नाही, हे मंजुळेला माहिती होतं, पण काही शारीरिक दोषांमुळं असं अनेकींच्या बाबतीत घडतं. तिची एक भाची अशीच होती. पण तिचं लग्नही आता झालं आहे. वैषयिकदृष्ट्या ती सुखी आहे व नवऱ्याला कामसुख देऊ शकते. फक्त तिला मूल होणार नाही एवढंच. बाकी त्यांचा संसार सुखात चालू आहे. एक स्त्री म्हणून बाकीचं परिपूर्ण जीवन ती जगते आहे.

नेमकी कुठली लिंग परीक्षा घेतली असेल दोह्याला? त्याचा एक वकील म्हणून मला शोध घेतला पाहिजे. मंजुळेच्या मनात विचारांची चक्रं गरगरत होती. यापूर्वी सेऊलला तिला पदक मिळालं होतं, तेव्हा ती स्त्री नव्हती? तेव्हा तिची लिंगचाचणी घेतली नव्हती, की त्यात ती उत्तीर्ण झाली होती? आताच असं काय घडलं की, तिला प्रथम १५०० मीटरर्सच्या शर्यतीत धावू दिलं नाही आणि नंतर लिंगचाचणीत ती फेल झाल्याचं जाहीर करून तिच्या 'मर्दसिंग' म्हणून उपहासानं होणाऱ्या टीकेवर जणू

शिक्कामोर्तब केलं आहे.

"सुरेश, माझी गट फिलिंग सांगतेय. यात काहीतरी गेम आहे. मीनावर अन्याय झालाय, असं मला वाटतंय. एक वकील म्हणून असं असेल तर मी लढेन. भारतीय व आशियाई ऑलिम्पिक महासंघास कोर्टात खेचून आव्हान देईन." मंजुळाच्या शब्दा-शब्दांत निर्धार व अन्यायाची चीड झळकत होती.

"होय मंजुळा, मलाही तसंच वाटतंय. आपण दोघं लिंगचाचणी परीक्षेचा वैद्यकीय व तांत्रिक अभ्यास करू, काही डॉक्टर्स व क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञांशी बोलू आणि ठरवू पुढं काय करायचं ते -" सुरेश म्हणाले, "गेली पाच वर्षं माझ्या हाताखाली मीना सराव करतेय. मला कधी जाणवलं नाही की, तिच्या स्त्रीत्वाबद्दल शंका आली नाही."

मंजुळा विचार करीत होती. स्त्री म्हणून मीनाची शरीरकृती नजरेसमोर आणून तिच्या स्त्रीत्वाच्या संदर्भात तपासून पाहात होती. मीना कृश आहे. छाती व नितंबाचा भागही सपाट आहे. ब्लेझर घातल्यावर केसांचा बांधलेला अंबाडा सोडला तर ती मुलगा आहे असंच वाटू शकतं. पण अशा मुली असतातच की, पुन्हा स्त्रीत्व का हे अशा बाह्य खुणांवर अवलंबून असतं? किमान जीवशास्त्रीय गुणसूत्राप्रमाणे मीना बाईच असेल की.. का जेंडर टेस्ट प्रमाण मानली तर ती स्त्री नाही?

तिनं मनात आलेल्या या सर्व शंका सुरेशपुढं मनाची खदखद कमी व्हावी म्हणून व्यक्त केल्या. खरंतर तिचं हे स्वैर विचारचिंतन होतं. तरीही त्यातली सार्वत्रिक सत्यता सुरेशलाही पटत होती. काहीसा विचार करीत तो म्हणाला.

"मंजुळा, यू आर थिंकिंग ऑन राईट ट्रॅक. तिच्यात कदाचित स्त्रीत्वाला तू म्हणालीस त्या बाह्य खुणा कमी विकसित झाल्या असतील; पण तरीही ती स्त्रीच आहे, असं मलाही ठामपणे वाटतं. आणि त्यामागं एक ठोस कारण आहे."

"ते कोणतं?"

"आठवतं का तुला, तिचं त्या किशोर दांगट या कुस्तीगीरासोबतचं गाजलेलं अफेअर? तेव्हा आपण समुपदेशनाचा आधार घेऊन नाजूक हातानं गुंता सोडवला होता. त्यांना मित्र राहण्यास आपण मज्जाव नाही केला; पण दोघांनी प्रबोधिनीत असताना आंतरराष्ट्रीय खेळाडू बनण्याचं ध्येय विसरू नये, असं सांगून त्यावर पडदा टाकला होता."

मंजुळेला किशोर आठवला. एका रात्री त्याच्या खोलीतून बाहेर पडताना तिला तिनं व सुरेशनं हॉस्टेलचा राऊंड घेताना पकडलं, तेव्हा तिचा फुललेला चेहरा आणि विस्कटलेले केस व कपडे पाहून मंजुळेला मनानं धोक्याचा इशारा दिला... प्रकरण बरंच पुढं गेलं आहे. बालेवाडी शासकीय प्रबोधिनी असल्यामुळं त्याचा गुंता नाजूकपणे सोडवता आला, याचंच त्या दोघांना त्यावेळी हायसं वाटलं होतं.

पण आज वकील म्हणून विचार करताना तिचं व किशोरचं अफेअर व त्या रात्री त्याच्या खोलीतून मीनाचं येणं महत्त्वाचा दुवा वाटत होतं. त्या रात्री त्यांचा शरीरसंग झाला असेल का? हे तिला संभाव्य न्यायालयीन आव्हानासाठी महत्त्वाचं वाटत होतं; पण तिला बराच अभ्यास करणं भाग होतं. शास्त्रीय माहिती समजून घेणं आवश्यक होतं.

तिला तिची माहेरची मैत्रीण विद्या आठवली, ती कलेक्टर असताना उस्मानाबादहून मीनाला तिची सर्वोत्तम लाँग डिस्टन्स रनर होण्याची क्षमता लक्षात घेऊन पुण्याला बालेवाडीच्या क्रीडा प्रबोधिनीत पाठवलं होतं आणि मंजुळाला तिची स्थानिक पालक व्हायची विनंती केली होती. आता विद्या मुंबईला मंत्रालयात सचिव पदावर आहे. मंजुळाची व तिची मैत्री आजही कायम आहे.

तिनं तातडीनं विद्याला फोन लावला. तेव्हा विद्या तिचं सारं ऐकल्यावर म्हणाली "मंजुळा, मलाही जेंडर टेस्टमध्ये मीना फेल होण्याची न्यूज शॉकिंग वाटली होती; पण मी माझ्या व्यग्र दिनक्रमात विसरून गेले होते बघ." विद्याच्या शब्दांत काहीसा अपराधीपणा जाणवत होता. "तिला मी पुण्याला पाठवताना तिची पूर्ण काळजी घेईन म्हणून तिचा घरच्यांना वचन दिलं होतं; पण खैर - आय ॲम अशेम्ड ऑफ मायसेल्फ."

"नाही विद्या, उगीच असा विचार करू नकोस!" मंजुळा म्हणाली, "अजूनही तुझा तो मनस्वी स्वभाव कायम आहे, याचं बरं वाटलं."

"ठीक. मी डॉक्टर आहे, आज जरी मेडिकल सायन्सपासून कोसो मैल दूर प्रशासनात आले असले तरी, थोडाफार टच कायम आहे मेडिकल फिल्डशी. मी जेंडर टेस्टची पूर्ण शास्त्रीय माहिती मिळवते; पण तू सांग, केव्हा येशील मुंबईला तू? आपण चर्चा करून फ्युचर कोर्स ऑफ ॲक्शन ठरवू या. जर मीनावर खरंच अन्याय झाला असेल तर वुई मस्ट फाईट. आय ॲम वुईथ यू."

"थँक्यू विद्या! हा केवळ कायद्याचा प्रश्न नाही. यात अनेक मॉरल आणि जेंडर इश्यू पण इन्व्हॉल्व्ह आहेत. लेटस् स्टडी इन डेप्थ."

मंजुळा व सुरेशच्या येण्यानं मीनाला बराच धीर आला होता. मंजुळेचं आश्वासन तिच्या मनावर हळुवार फुंकर घालून गेलं होतं. "मीना, तुझं पदक मी तुला परत मिळवून देईन. तुझी क्रीडा कारकिर्दही पुन्हा सुरू होईल, हे मी पाहीन. माझं हे तुला वचन आहे. फक्त तू धीरानं घे आणि लवकर बरी हो."

मीनाला तिची दोह्याला घेतलेली लिंगनिदान चाचणी व तिला मेडिकल टीमनं सांगितलेला निष्कर्ष आठवत होता. तिच्या गुणसूत्रांमध्ये (क्रोमोझोम्स) पुरुषासारखंच 'वाय' सूत्र होतं. पुन्हा तिला पाळी न येणं आणि अंशरूपानं पुरुषी लैंगिक अवयव बीजरूपानं का होईना शरीरात असणं यामुळं तिचं निर्विवाद स्त्रीत्व सिद्ध होत नव्हतं.

तिच्यात 'वाय' गुणसूत्रामुळे काही पुरुषी तत्त्वं होती व त्यामुळं तिचा त्याचा अवाजवी फायदा खेळताना इतर महिला खेळाडूंच्या तुलनेत मिळण्याचा संभव होता. या कारणास्तव तिला लिंगचाचणीत नापास करण्यात आलं असल्याचा मेडिकल टीमचा अंतिम निष्कर्ष होता.

"पण सर, मॅम, - गतवर्षी सेऊल कोरियामध्ये आशियाई ट्रॅक व फिल्ड स्पर्धेतही मला पदक मिळालं होतं. तेव्हा नाही कुणाला संशय आला? माझ्या बर्थ सर्टिफिकेटवर डॉक्टरांनी लिंग म्हणून फिमेल असंच लिहिलं होतं."

"त्याचं असं आहे मीना, अलीकडं सरसकट जेंडर टेस्ट घेतली जात नाही. कुणी मागणी केली तरच केली जाते."

"माझ्या संदर्भात कुणी मागणी केली ते मला कळेल?"

"ते गुपित असतं. असं उघड करता येत नाही. सॉरी."

मेडिकल टीमनं सांगितलं नाही तरी तिला दुसऱ्या दिवशी कळलंच. कारण त्या दिवशी १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सानिया ही मुंबईची धावपटू धावली होती व तिला त्यात कांस्य पदक मिळालं होतं. जर मीना धावली असती तर तिला सुवर्ण पदक नक्की होतं.

मीनाची राष्ट्रीय संघात निवड होण्यापूर्वी सानिया ही निर्विवादपणे भारताची नंबर एकची खेळाडू होती. लॉंग डिस्टन्स रनर कॅटेगरीमधील, खास करून ८०० आणि १५०० मीटरच्या शर्यतीमध्ये. पण मीनानं तिच्यापेक्षा दोन ते पाच सेकंदांचा कमी अवधी घेऊन तिला मागं टाकलं होतं. तेव्हापासून तिची मीनावर खुन्नस होती!

ॲथलेटिक्स टीमचे मॅनेजर व सानियाची विशेष दोस्ती ही उघड बात होती. सानिया एका बड्या व श्रीमंत कारखानदाराची कन्या होती. आणि तिच्या गुडबुकमध्ये राहणं मॅनेजरसाठी फायद्याचं होतं. पुन्हा ती देखणी होती. मीडियाची लाडकी स्टार होती. टेनिसपटू ॲना कुरनिकोव्हाप्रमाणे तीही खेळापेक्षा सौंदर्य, फॅशन्स आणि जाहिरातीमुळं जास्त प्रसिद्धीच्या झोतात होती.

याउलट मीना काळीसावळी, कृश, पुरुषांच्या नजरेत भरणाऱ्या कोणत्याही स्त्री खुणा नाहीत. उंच व 'टोन्ड बॉडी'मुळं तिच्या व्यक्तिमत्त्वात काहीशी पुरुषी झाक होती. तिच्या ओठावर लवही जरा वाजवीपेक्षा जादाच होती. आणि तिचं ते तिच्या स्त्रीत्वाचं अपमान करणारं टोपण नाव 'मर्दसिंग' सानियाला कुठून तरी कळलं होतं. ते ती प्रत्येक वेळी मीनाचा उल्लेख त्याच नावानं करून तिचा पुरुषीपणा अधोरेखित करीत होती.

८०० मीटर्सच्या शर्यतीत सानियाला मीना असताना उतरायाची संधी नव्हती. त्या दिवशी ती नुसती ओल्या लाकडासारखी धुमसत जळत होती. एका आंधळ्या सूडानं व विकृत तिरस्कारानं ती जणू मंत्रभारित अमानुषपणे भारली गेली होती. तिनं

मीनाचं कोरडं कौतुक रौप्य पदक मिळाल्याबद्दल केलं आणि आपल्या रूममध्ये येऊन स्वत:ला कोंडून घेतलं.

त्या दुपारी मॅनेजरनं तिला एक टीप दिली, "हे पाहा सानिया, तुला उद्या खेळायचं असेल तर मीनाला बाद... अनफिट ठरवलं पाहिजे."

"पण, ते कसं शक्य आहे सर?" काहीशा अविश्वासानं, तिनं विचारलं.

"मीनाच्या लिंगचाचणीची, आय मीन, जेंडर टेस्टची मागणी करून."

"ही काय भानगड आहे."

त्यानं लिंगनिदान चाचणीचा थोडा इतिहास सांगितला.

"बेबी, १९६० च्या शतकात काही पुरुष खेळाडूंनी स्त्रीवेष धारण करून स्त्री म्हणून स्पर्धा जिंकल्याच्या काही घटना उघडकीस आल्या. म्हणून लिंगचाचणी परीक्षा सुरू केली. यू नो, तू सायन्सची विद्यार्थिनी आहेस. तुला हे माहीत असेलच की, स्त्रीमध्ये दोन एक्स क्रोमोझोम असतात, तर पुरुषात एक एक्स व एक वाय क्रोमोझोम असतो, पण काही स्त्रियांमध्ये पुरुषाप्रमाणे एक्स - वाय क्रोमॉझोम्सची जोडी असते. तरी बाह्यरूप स्त्रीचं विकसित होतं. असंच काही मीनाचं असावं, तू जेंडर टेस्टची मागणी कर. ती जर त्यात फेल झाली तर तुला उद्या १५०० मीटरच्या शर्यतीती उतरता येईल. यू हॅव - गुड चान्स टू विन मेडल!"

"पण, इंटरनॅशनल ऑलिम्पिक असोसिएशननं अशा चाचण्या फुलफ्रुफ नसल्यामुळं बंदी घातली ना?"

"येस, पण आशियाई ऑलिम्पिक असोसिएशननं घातली नाहीय. त्याचा तू फायदा येऊ शकतेस."

"पण - पण सर, मी - मी व्हिलन ठरेन...!" सानिया थोडी भीत होती.

"चॉईस इज युवर्स, बेबी."

सानियानं तासभर विचार केला आणि खलनायिका होण्याचा धोका पत्करून पदक जिंकण्याच्या लालसेनं रीतसर तक्रारवजा संशय नोंदवून लिंगनिदान चाचणीची मागणी केली.

मीनाला मेडिकल टीमच्या प्रमुखानं तपासणीनंतर बोलावून स्पष्ट सांगितलं, "हे बेबी, तू जेंडर टेस्ट हरलीस, तू फिमेल नाहीस, मेल आहेस."

"पण - पण हे कसं शक्य आहे सर?" मीनानं धाडस करून लज्जेची मर्यादा ओलांडत एक मनोमन जमलेलं गुपित उघड केलं. "मी - मी माझ्या बॉय फ्रेंडसोबत सेक्सचा अनुभव घेतला आहे. स्त्री म्हणून तो मी एंजॉय पण केला आहे. बिलीव्ह मी सर, मी खरीखुरी स्त्री आहे. सेंट परसेंट फिमेल."

पण तिची विनवणी अरण्यरुदन ठरलं. त्यांनी तातडीनं भारतीय व्यवस्थापकास बोलावून लिंगनिदान चाचणीचा निकाल सांगितला, "शी कांट प्ले टुमारे इन १५००

मीटर रनिंग कॉम्पिटिशन.''

दुसऱ्या दिवशी पायात 'सिव्हिअर क्रॅम्पस्' असल्यामुळं मीना शर्यतीत भाग घेणार नाही असं भारतीय संघानं जाहीर केलं. त्या शर्यतीत सानिया उतरली, पण तिला कांस्य पदकावर समाधान मानावं लागलं. जिला सुवर्ण पदक मिळालं, तिच्यापेक्षा तीन सेकंद कमी वेळ घेत सेऊलला मीनानं १५०० मीटरची स्पर्धा जिंकली होती. आपल्या रुममध्ये आपला स्त्रीत्वाच्या झालेल्या घोर अपमानाच्या जाणिवेत सारा दिवस काळोख करून मीना अक्षरश: ओक्साबोक्शी रडत होती. त्यात पुन्हा आपल्याला खात्रीनं मिळणारं सुवर्ण पदक कट करून, न मिळू देण्याचं कारस्थान आपलेच सहकारी करतात, या जाणिवेनं ती हतबुद्ध झाली होती, त्या दुहेरी आघातानं ती कोसळली होती. त्याची परिणिती अविरत झरणाऱ्या अश्रूत होत हेती. तिचे तीव्र हुंतके व मुक्त वाहणारे आसू त्या रूमचे चारही कोपरे व भिंती निर्विकारपणे पाहत होत्या.

त्यावर पुन्हा सानियानं जखमेवर मीठ चोळावं तसं कुत्सित स्वरात फोनवर विचारलं, ''कशी आहेस मर्दसिंग...? आय मीना, मीना? सॉरी हं.''

मीनानं धाडकन रिसिव्हर फोनवर आपटला. पुन्हा मोठ्यानं आकांत करीत टाहो फोडला आणि उशीत तोंड खुपसून विकलपणे बेभान रडू लागली... किती तरी वेळानं ग्लानीची गुंगी चढली. तसे हुंदके थांबले व गालांवरून वाहणारे आसू पण सुकले, पण तिच्या सावळ्या चेहऱ्यावरच्या शुभ्र दंतपक्ती दाखवणारं तिचं निर्मल हास्य मात्र त्या क्षणापासून कायमचं पुसून गेलं.

''हे बेबी, तू फिमेल नाहीस, मेल आहेस.'' हा लिंगनिदान चाचणीचा निष्कर्ष खोल मनात पुन्हा पुन्हा डोकावत स्वत:ला तपासूनही पटत नव्हता. ''मी - मी अंतर्बाह्य स्त्री आहे. क्रोमोझोमचं माहीत नाही, पण किशोरच्या पुरुषी आसक्त नजरेनं आपलं स्त्रीत्व मोहरून आलं होतं. त्याच्या बलदंड मिठीत चुरगळून जात शरीरसुख घेताना तनमनाचा कणकण फुलून आला होता. ही, ही माझ्या जातिवंत स्त्रीत्वाची खूण नाही का?''

पण मेडिकल टेस्ट खोटी कशी म्हणायची? ते डॉक्टर्स काही माझे दुश्मन नाहीत. मन स्त्रीचं. शरीरही स्त्रीचं. फक्त छाती इतर बायकांप्रमाणे भरदार नाही. पण खेडेगावात अन्नान्न दशा असणाऱ्या अनेक स्त्रिया सपाट छातीच्या असतात की! मग मी पुरुष कशी ठरते?

आणि उद्या हे जेव्हा जगजाहीर होईल, तेव्हा सारी दुनिया मला त्या शिवा पारध्याप्रमाणे 'मर्दसिंग' म्हणून उपहासानं म्हणेल. तो शब्द शापमुद्रेप्रमाणे मनमानसावर आपली तप्त निशाणी पुन्हा पुन्हा कोरत जाईल. आपली जखम अधिक तप्त व उग्र होईल. सारं जग मला स्त्री मानण्यास इन्कार करेल आणि दुसरी बाब म्हणजे आता आपले खेळाचे करिअर संपणार. मला कधीच पी. टी. उषाच्या पुढं जाता येणार नाही.

भारतासाठी ऑलिम्पिक पदक जिंकता येणार नाही.

मीना, तू संपलीस. खलास झालीस, आता जगाला कशी तोंड दाखवशील? का - का जगायचं आता?

पण दीड महिना दररोज अनेक वेळा आत्महत्येचे विचार मनात येऊनही कोणती जीवनलालसा तिला त्यापासून परावृत्त करीत होती देव जाणे, पण परवा पुन्हा एकवार ती विकल अवस्था आली. तो क्षण तिला फार असह्य झाला आणि घरी आणलेलं जनावराचं औषध पिऊन जीवन संपविण्याचा निर्णय तिनं घेतला, पण - पण तिच्या दुर्दैवानं ती वाचली.

आज मंजुळाभाभीची भेट झाली आणि वाटलं, बरं झालं, आपण वाचलो ते. भाभी वकील आहेत. त्यांनी वचन दिलंय, तुझी खेळाची पुन्हा कारकिर्द सुरू करून देईन म्हणून.

असं होईल?

एक गोड भाबडी आशा मन पुलकित करून गेली.

पण हे कसं शक्य आहे? तो मेडिकल रिपोर्ट भाभी खोटं आहे हे कसं सिद्ध करतील?

नाही मीना, भाभीवर विश्वास ठेव, त्या मोजकं बोलतात, पण ठाम बोलतात, खरं बोलतात आणि बोललेलं खरं करून दाखवतात.

मला वाट पाहिली पाहिजे - बस.

किती वेळा माहिती नाही, पण भाभी, तुमच्यावर केवळ विश्वासच नाही तर श्रद्धा आहे. मी प्रतीक्षा करेन. शांतपणे, खंबीरपणे. कितीही वेळ लागू दे.

मी स्त्री आहे, हे सिद्ध करा. पदक न मिळू दे, पुन्हा खेळायची संधी न मिळू दे. पारध्यानं बहाल केलेली 'मर्दसिंग'ची मनमानसावरची तप्त मुद्रा पुसून काढायची आहे. बस एवढं करा माझ्यासाठी भाभी.''

मंजुळा मुंबईत आली तेव्हा दोन दिवस विद्यानं चक्क रजा टाकली. तिनं एक क्रीडावैद्यक शास्त्रातला नावाजलेला तज्ज्ञ डॉक्टर आणि आंतरराष्ट्रीय कायद्याची जाण असलेला एक ज्येष्ठ वकीलही बोलावून घेतला होता. मंजुळाही बरंच होमवर्क करून आली होती.

डॉक्टर व वकील दोघांचंही चर्चेअंती एकमत झालं होतं.

''मॅडम, मीनाची केस ही कंप्लीट ॲण्ड्रोजन इन्सेसिटिव्हिटी सिंड्रोमची केस आहे. इथं पुरुषाप्रमाणे स्त्रीमध्ये एक्स - वाय गुणसूत्रं असतात. आणि ॲण्ड्रोजन नावाचा पुरुषी हार्मोन असला तर तो स्वीकारण्यासाठी रिसेप्टर नसतो. अशा जीवात पुरुषी इंद्रिये विकसित होत नाहीत. उलट सर्व स्त्री इंद्रिये उमलून येतात, असं नैसर्गिकरीत्या एक्स क्रोमोझोममध्ये बदल - म्युटेशन घडून येतं. अशी कंप्लीट

ॲण्ड्रोजन इन-सेन्सिटिव्हिटी सिंड्रोम (सी. ए. आय. एस) ची स्त्री लैंगिक सुखही अनुभवू शकते. फक्त पाळी नसल्यामुळं ती आई होऊ शकत नाही एवढेच.''

''ते ठीक आहे वकीलसाहेब, पण क्लिनिकली व जेनेटिकली मीनाला पुरुष मानलं गेलं दोह्याला मेडिकल टेस्टद्वारे. त्याच्या विरुद्ध काय युक्तिवाद आहे आपल्याकडं?''

''खरं तर, याचा फैसला इंटरनॅशनल ऑलिम्पिक असोसिएशननं ऑलरेडी केला आहे. जेंडर टेस्ट या १०० टक्के विश्वसनीय नाहीत म्हणून, खासकरून सीएआयएस महिलांबाबत.''

''त्याचं कारण?''

''ॲण्ड्रोजन हार्मोन स्वीकारणारं रिसेप्टर नसणं, हे होय! ते नसल्यामुळं कितीही स्टिरॉईड घ्या, अशा स्त्रियात मस्क्युनिलिटी कधीच डेव्हलप होणार नाही. त्यामुळे अशा एक्स वाय गुणसूत्र असणाऱ्या पण ॲण्ड्रोजन हार्मोन स्वीकारणारं रिसेप्टर नसलेल्या स्त्रियांमध्ये पुरुषी जननेंद्रियं विकसित होत नाहीत, पुन्हा इतर स्त्रीच्या तुलनेत सी. एस. आय. एस. स्त्रीमध्ये जादा ताकद वा इतर पुरुषी गुण असतात, असं आजवर निर्विवादपणे सिद्ध झालेलं नाही. अशा स्त्रियांना इतरांच्या संदर्भात कोणताही फायदा खेळात होत नाही.'' डॉक्टरांनी शक्य तितक्या सोप्या भाषेत स्पष्ट करायचा प्रयत्न केला.

विद्या मूळची डॉक्टर होती. मीनाची केस काही शेकड्यात एक अशी होती. तिच्या लक्षात सारं काही आलं होतं. मीनाची प्रकृती आणि वृत्ती स्त्रीत्वाकडे बहुतांश झुकलेली, पण पुरुषी गुणसूत्रामुळं तांत्रिकदृष्ट्या तिला पुरुष ठरवून दोह्याचा मेडिकल टीमनं पुढील शर्यतीत खेळण्यासाठी त्यांच्या नियमामुळं अपात्र केलं होतं.

''मंजुळा, आपल्याला फायटिंग चान्स आहे. ॲण्ड्रोजन हार्मोन हे जीवाला पुरुषी रूप देतं. केवळ एक्स आणि वाय क्रोमोझोम असणं पुरेसं नाही पुरुषासाठी. मीनामध्ये ॲण्ड्रोजन सद्वीकारणारं रिसेप्टर नाही. त्यामुळं तिच्या शरीराला मस्क्युलाईन टच नाही. कितीही शक्तिशाली स्टिरॉईड घेतली तरी ॲण्ड्रोजन स्वीकारणाऱ्या रिसेप्टरअभावी तिचे मसल पुरुषाप्रमाणे डेव्हलप होणं शक्य नाही. त्यामुळं मीनाला कोणत्याही कम्पॅरिटिव्ह ॲडव्हांटेज एक्स-वाय क्रोमोझोनमुळं खेळताना - पळताना मिळत नाही. हे तर्कशुद्ध रीतीनं कोर्टात मांडलं तर आपल्याला जिंकायची चांगली संधी आहे.''

''आणखी एक ट्रम्प कार्ड आहे आपल्याजवळ. जेव्हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटना लिंगनिदान चाचणी पूर्णपणे विश्वासार्ह मानत नाही आणि ती बंद करते, तेव्हा तिचा एक भाग असलेली आशियाई संघटना ती लिंगनिदान चाचणी कशी चालू ठेवते? त्या नावाखाली एका खेळाडूचं अस्तित्व उद्ध्वस्त करण्याचा निर्णय कसा घेते? हा मुद्दा फार महत्त्वाचा ठरू शकतो.''

चौघांनी एकमतानं थेट सुप्रीम कोर्टात जनहितार्थ याचिका दाखल करण्याचं

ठरवलं. मंजुळा थोडी साशंक होती, पण वकीलसाहेब म्हणाले, "ही फार आगळा-वेगळी केस ठरणार आहे. त्याबाबत कोणाचा प्रिसिडन्स नाही. आणि आपली सर्वोच्च न्यायसंस्था धाडसी व कमालीची प्रो-ॲक्टिव्ह आहे. आपण जरूर चान्स घेऊ या."

"थँक्स अ लॉट." मंजुळा म्हणाली, "मी उद्याच जाऊन परत मीनाला भेटते, आणि मग आपण येत्या सोमवारी केस दाखल करू या!"

मंजुळा दुसऱ्या दिवशी पाथरुडला पोहोचली आणि पाहते तर काय, पुन्हा मीना आय. सी. यू मध्ये. तिनं पुन्हा आत्महत्येचा प्रयत्न केला होता, पण पुन्हा ती वाचली होती.

मीनानं मंजुळाभाभीला पाहिलं, तेव्हा तिची नजर खाली झुकली गेली. 'आय ॲम सॉरी, पण, पण....."

"असं काय घडलं पोरी? इथे मी तातडीनं आली आहे, ते तुला खूशखबर द्यायला की, आपण केस जिंकू शकतो. त्यासाठी आम्ही सुप्रीम कोर्टात जाणार आहोत. हे तुला सांगायला मी इथं आलो; पण...."

"मी सॉरी म्हणलंय ना. पण, मी तरी काय करू? मजबूर होते."

"मला नाही सांगणार काय झालं पुन्हा असं की, तुला दुसऱ्यांदा आत्महत्या करावी वाटली?"

मीनाचे ओठ थरथरत होते. काही नाजूक भावनिक असं सांगायचं होतं. पण कसं सांगावं हे उमगत नव्हतं. तरीही थोड्या वेळानं हिंमत धरून तुटकमुटक शब्दात धीर एकवटून तिनं घडलेलं सारं काही सांगून टाकलं.

मीनाच्या भेटीला तिची गेल्या दोन वर्षांतील खेळाडू मैत्रीण तनू आली होती. ती मीनाची सदैव रूम पार्टनर असायची, पण गेल्या एक वर्षापासून मीनानं रूम पार्टनर बदलली होती. मग ती सानियाची पार्टनर झाली होती. तिच्याकडून सानियाला मीनाबद्दलचं एक नाजूक गुपित कळालं होतं. मग त्याचा फायदा घेऊन पाहिल्या आत्महत्येतून वाचलेल्या मीनावर पुन्हा घाव घालून तिला कायमचं खेळातून पार करावं, म्हणजे आपली बदनामी होणार नाही. समाज आपल्याला खलनायिका ठरवणार नाही? या आंधळ्या प्रेरणेनं सानियानं तनूस भरीस घातलं. त्यासाठी तिच्या सर्व आर्थिक गरजा पुरवल्या.

तनू मीनाला भेटल्यावर म्हणाली, "तू मला झिडकारलंस. पण आय स्टील लव्ह यू, मला आजही तूच लाईफ पार्टनर म्हणून हवी आहेस. वुई आर रिअली ए गुड कपल. तू माझ्यासाठी मर्द आहेस, मर्दसिंग! आपल्याला रिलेशनमध्ये तू नवरा व मी बायको आहे. मला अजूनही तू हवी आहेस."

मीना हादरली, स्तंभित झाली. तनू बोलत होती ते काही खोटं नव्हतं. किशोर तिच्या जीवनातून निघून गेल्यानंतर देशात विविध स्पर्धात खेळताना टीम मेंबर म्हणून

तनू तिच्या जीवनात आली आणि त्यांची दाट मैत्री झाली. दोघी स्पर्धेच्या वेळी एकत्र राहू लागल्या. रूम पार्टनर म्हणून. अशाच एका स्पर्धेच्या वेळी हॉटेल रूममध्ये धुंद क्षणी तनूनं पुढाकार घेतला आणि मीनाचं शरीर साथ देऊ लागलं. आणि दोघींनी लेस्बियन कपल म्हणून एकत्र राहायचं ठरवलं. तनू म्हणायची, "तुझा आक्रमकपणा मला सुखावतो." मीना प्रत्युत्तर द्यायची. "मलाही तुझा कोवळेपणा आवडतो." तिनं त्या संबंधात आपला आक्रमक पुरुषीपणा अभिमानानं मान्य केला होता.

"भाभी, कसं सांगू?" मला तनू भेटली अन् एक प्रखर सत्य जाणवलं की, खरंच का मी मीना नाही, मर्दसिंग आहे. आम्ही काही काळ एकत्र 'लेस्बियन कपल" म्हणून राहिलो होतो, तनूनं मला जाणीव दिली की मी पुरुषी आहे. मर्दसिंग आणि.. आणि.." मीनाला हुंदका फुटला होता.

मंजुळाला तिची चीड कमी व दया जास्त येत होती. तिच्या केसचा अभ्यास करताना सी. ए. आय. एस. स्त्रियांच्या लैंगिक जीवनाचीही माहिती मंजुळानं करून घेतली होती. अशा स्त्रिया 'बायोसेक्स्युअल' असू शकतात. त्या पुरुषांच्या संगतीत स्त्री म्हणून लैंगिक सुख जसे उपभोगू शकतात, तसेच त्यांच्यात लेस्बियन प्रवृत्ती पण असू शकते. मीना तशीच होती.

"भाभी, पुन्हा किशोर माझ्या जीवनात आला. त्यात त्यानं आजही माझ्यावर पूर्वीइतकंच प्रेम असल्याची ग्वाही दिली आणि मी तनूपासून अलग झाले. पुन्हा कधी असे संबंध ठेवले नाहीत, बिलीव्ह मी. कारण मला माझ्या किशोरसाठी अस्सल जातिवंत स्त्री म्हणूनच राहायचं होतं. माझ्या त्या मर्दानगीला पूर्णपणे संपवायचं होतं. म्हणून तिला दूर सारलं, पण परवा ती वाट वाकडी करून आली. ती बोलली नाही. पण तिला नक्कीच सानियानं पाठवलं असणार मला पूर्णपणे खच्ची करण्यासाठी."

"हे तुला कळत होतं की, सानिया आपली व्हिलनगिरी उघडकीस येऊ नये म्हणून अशी खेळ खेळत होती. तरीही-"

"त्याक्षणी तनूला समोर पाहून व तिच्या सतत संबंधाच्या बोलण्यामुळं माझ्या मनात पुन्हा तोच सल सलू लागला - खरंच का मी पुरुष आहे? दोह्याच्या मेडिकलचा रिपोर्ट कुठंतरी मनोमन आत खोलवर घट्ट घर करून होताच आणि तनूशी माझा असलेला संबंध खराच होता. आणि त्यावेळी मी आक्रमक असायची. त्यामुळं पुन्हा मी..."

"पोरी, कसलं नशीब घेऊन आली गं." तिच्या डोईवरून ममतेनं हात फिरवत कळवळून मंजुळा म्हणाली, "अगं, तुझ्या गरीब जीवनातील अपुऱ्या आहारानंही फरक पडतो. त्यामुळं छाती व नितंब सपाट राहतात, पण तरीही तुझ्यासारख्या सी. ए. आय. एस. स्त्रिया या स्त्रीचं परिपूर्ण जीवन जगत असल्याची कितीतरी उदाहरणं मला इंटरनेटवर मिळाली आहेत. बायसेक्स्युअल असणं नैसर्गिक आहे. म्हणून काय

त्यामुळं स्त्री पुरुष होत नाही. सेक्समध्ये स्त्रीनं आक्रमक असू नये असा काही नियम नाही निसर्गाचा."

"म्हणजे... म्हणजे...'

"तू स्त्रीच आहेस बेटा. आणि मी ते कोर्टात सिद्ध करणार आहे." मंजुळा ठामपणे म्हणाली, "बस्, तू स्वत:ला सांभाळ. दोनदा मरता मरता वाचलीस. पुन्हा असा जीव पणाला लावायचा नाही. पुन्हा नाही संधी मिळणार जगण्याची. इतका स्वत:वर अन्याय करू नकोस."

"प्रॉमिस भाभी. आता मी जगेन." मीना तिचा हात हाती घेत आपल्या डोळ्यांना लावीत सद्‌गदित स्वरात म्हणाली.

" 'त्या गाण्याप्रमाणे, 'एकाच या जन्मी जणू, फिरुनी नवी जन्मेन मी.' माझं झालं आहे. याचि देही याचि डोळा या एकाच जन्मात एका महिन्याच्या अंतरात मी 'फिरुनी नवी जन्मास' आले आहे. तुम्ही, आता माझ्या भाभी, या जीवनी आई का होत नाहीत?"

"का नाही बेटा?" मंजुळा तिला जवळ घेत म्हणाली "माझी मीना बेटी आहेस. पुन्हा कधी स्वत:ला 'मर्दसिंग' समजायचं नाही. कोणी तसं म्हटलं तरी मनास लावून घ्यायचं नाही."

मीना प्रसन्नपणे हसून म्हणाली, "हां भाभी, अहं, आई, आज मला प्रथमच १०० टक्के स्त्री असल्याचं मनापासून वाटतंय. सारे संभ्रम संपले आहेत. तू मला पुनर्जन्म दिला आहेस. एका नव्या मुलीला."

मंजुळा तिचे आनंदाश्रूंनी भरलेले डोळे पदरानं पुसत ममतेनं म्हणाली,

"माझी गुणाची पोर."

०-०-०

# ८. बंद लिफ्ट

"तुला असं वाटतं नाही हॅम की, या दोन्ही विल्यम भगिनी म्हणजे प्युअर ब्लॅक डायमंड आहेत?"

निलूनं जिनचा सिप घेत टी. व्ही.च्या पडद्यावर व्हीनस व सेरेना य अमेरिकेच्या कृष्णवर्णीय भगिनींमधला यू. एस. ओपनचा अंतिम सामन्याचा श्वास रोखायला लावणारा थरारक पहिला सेट पाहताना उत्स्फूर्तपणे म्हटलं!

हॅमनं तिचे हे उद्‌गार ऐकले न ऐकले असं करीत काहीच उत्तर दिलं नाही. निलूनं विल्यम भगिनींना ब्लॅक डायमंड हे लावलेलं विशेषण जुन्या स्मृती जागं करीत त्याला डंख मारीत होतं म्हणून तिला पाठमोरा होत, बंद खिडकीच्या काचेतून तो मुंबईचा प्रसिद्ध असणारा बेबंद पाऊस अनिर्बंधपणे कोसळताना पाहात होता. त्याच्या जुहू बीचवर असलेल्या सागर दर्शन अपार्टमेटच्या टेरेस फ्लॅटच्या बंद काचेतून निसर्गाचा तो प्रताप पाहताना भरतीची वेळ असल्यामुळं उचंबळून आलेल्या सागराप्रमाणे तोही मनोमन स्वैर विचारांनी उसळत होता, धुमसत होता! पूर्ण वातानुकूलित बेडरूममध्ये शरीर गारेगार करणारा गारवा निलूच्या लोभस, उबदार संगतीत शरीर रोमांचित करीत होता. पण तिच्या त्या उद्‌गारांनी त्याची ती नशा क्षणार्धात ओसरली व तो तिच्यापासून अलग होत खिडकीला लगटून बाहेर पाहू लागला होता!

तो निसर्गाचा प्रताप पाहताना हॅमला बालपणीच्या झोपडपट्टीच्या दिवसांतले धुवाधार पावसाच्या रूपानं नित्य अनुभवास येणारे चिखल, घाणीचे, कुडकुडणाऱ्या थंडीचे, ओल्या व न वाळल्यामुळं कुबट वास मारणाऱ्या कपड्यांचे, रोजगार बुडाल्यामुळं पोटाला पडणाऱ्या फाक्याचे व पोटाप्रमाणे मन मारूनही कुरतडणाऱ्या भुकेचे क्षण जागे होत होते! पायामधील चपलेचा खिळा चालताना अंगठ्याला टोचावा, तसे हॅमचे अंतरंग मंदपणे ठणकत होते.

निलू जशी क्रिकेटची चाहती होती, तशीच टेनिसचीही. त्यामुळं चारही ग्रॅण्डस्लॅमच्या स्पर्धा ती सहसा चुकवत नसे. आपल्या एअर होस्टेसच्या कामाचं शेड्यूल दर तीन महिन्यांची ड्यूटी बदलताना ग्रॅण्डस्लॅमच्या वेळापत्रकाला नजरेसमोर ठेवून कौशल्यानं

बदलून घ्यायची. त्यानुसार कालच लंडनहून आपली ड्यूटी संपवून निलू मुंबईला परतली होती. आणि आरामात महिला व पुरुषांचे अंतिम यू. एस. ओपनचे सामने ती पाहू शकणार होती!

व्हीनस ही तिची आवडती टेनिसपटू, तशीच तिटी धाकटी बहीण सेरेनाही तिला आवडायची. त्यांची दणकट ॲथलेटिकची शरीरयष्टी, ताकदवान खांदे व पाय आणि झंझावती फटके यांची ती चाहती होती.

"हॅम, त्या दोघींना टॉपला पोचलेलं व अंतिम सामन्यात खेळताना पाहताना बरं वाटलं! यू नो? आय आयडेंटिफाय वुईथ देअर स्पेक्टॅक्युलर राईज ॲण्ड इक्वली ट्रिमण्डस सक्सेस! त्या कृष्णवर्णीय भगिनींशी माझं एक दलित व वर्णभेदाची बळी म्हणून नातं आहे. एक गहिरा दर्दका रिश्ता है, जो मुझे उनकी तरफ खींचता है! आज दोन बहिणींतच सामना असल्यामुळं कुणीही जिंकलं तरी अफसोस नाही वाटणार."

तो किंचित हसत तिचे खांदे दाबतो आणि तिला जवळ ओढतो. तीही आवेगानं त्याच्या कुशीत शिरते, पण अजूनही तिचा मूड मॅचचा असतो. ती म्हणते, "एकच राहून राहून वाटतं. व्हीनस वा सेरेना थोड्या आधी जन्माला यायला हव्या होत्या आणि टेनिसच्या सर्वोत्तम महान खेळाडू गौरवर्णीय मार्टिना नवरातिलोव्हा व स्टेफी ग्राफला त्यांनी हरवायला हवं होतं आणि त्यांच्या विरुद्ध ग्रॅण्डस्लॅम जिंकायला हवं होतं!"

तो घशातून हुंकारत तिचे बॉब केलेले केस ओढत राहतो. ती त्याच आवेगात पुढं बोलत राहते. "अगदी तसंच, जसं एकेकाळी.. फार जुनी गोष्ट नाही.. तू सॅमला मागं टाकलं होतंस.. टेस्टमध्ये दोन सलग डबल सेंच्युरी मारून व पहिल्याच वनडे इंटरनॅशनलमध्ये सेंच्युरीसह भारताला विजय मिळवून देऊन. तो हॅम मी कुठं हरवून बसले रे?"

हॅमचं मन ठसठसू लागलं होतं. नेहमी टीपकागदाप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावरचे भाव वाचणाऱ्या निलूचं त्याच्याकडं लक्षच नव्हतं. ती आपल्याच मूडमध्ये होती. खूप दिवसांपासून पराभूत व हताश हॅमला पाहून मनात डाचणाऱ्या भावना ती प्रकट करीत पुढं म्हणाली, "मला तो माझा आवडता हॅम का सापडत नाही? गिव्ह मी अन्सर हॅम. यू- यू - ओ ॲन एक्सप्लेनेशन टू मी! डोंट यू थिंक सो? तुझा हा जिगरी दोस्त सॅम तुला व्हीव रिचर्डप्रमाणे ब्लॅक डायमंड म्हणायचा., त्याचं तेज कुठं गेलं? तो का फिकुटला?"

निलूला बरीच चढली होती. टेनिस किंवा क्रिकेटची मॅच पाहताना तिला मनसोक्त प्यायला लागायचं. आजही तिच्या आवडत्या व्हीनस व सेरेना या विल्यम भगिनींमध्ये टेनिसचा अंतिम सामना होता. तो पाहताना विचार न करता ती पीत होती. अशा वेळी तिची नेहमीची शांत व धीरोदात्त वृत्ती तिला आवरणं कठीण जायचं. तिची खदखद आणि वेदनाही त्यांच्या संदर्भातली असायची. त्यामुळं तो अधिकच खोलवर

उदास व्हायचा, दुखावला जायचा. आणि त्यावर मात करावी म्हणून अशावेळी निलूच्या संदर्भात तिच्या प्रेम व समर्पणानं तिच्या प्रती सदैव ऋणी आणि कृतज्ञ असणारा हॅम अकारण आक्रमक व्हायचा आणि तिला लागट बोलायचा. आजही तसंच झालं.

आधीच बेबंद कोसळणारा पाऊस पाहताना त्याला झोपडपट्टीचे ते अभावाचे आणि खेडेगावच्या गावकुसाबाहेरचे जगण्याचे सदृश्य जीवन आठवण देत जगणे उदास करीत होतं. आणि त्या जीवनावर ज्या क्रिकेटमुळं मात करीत जुहू बीच कॉलनीत खिडकीतून समुद्र दिसणाऱ्या आलिशान फ्लॅटच्या उच्चभ्रू जीवनापर्यंत वाटचाल केली, त्या क्रिकेटची कवचकुंडलंही गळून पडली होती, पण कर्णाप्रमाणे त्याला त्याविना लढता पण येत नव्हतं. कारण लढण्यासाठी त्याला युद्धभूमीच मुळी नाकारण्यात आली होती. त्याला सतत टीममधून वगळलं जात होतं. ही कदाचित शेवटची संधी होती. आगामी दक्षिण आफ्रिका व वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी जाणाऱ्या संघात त्याला निवडण्यात आलं नव्हतं. मघाशी टेनिस मॅचपूर्वी लागलेल्या बातम्यात संघ निवडीची बातमी होती. त्याच्याप्रमाणे धर्मांतरित ख्रिश्चन दलित असलेले आणि म्हणूनच ज्यांच्याबद्दल त्याला आपलेपणा वाटायचा, त्या त्याचा फ्रेण्ड, फिलॉसॉफर ॲण्ड गाईड असणाऱ्या निवड समितीच्या अध्यक्षांनी प्रेस ब्रीफिंग करताना एका पत्रकारानं विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना शेवटचा घाव घातला होता. "नो, ही इज नॉट कंसिडर्ड ॲट ऑल. आय डोंट थिंक, ही हॅज एनी चान्स टू कम बॅक...."

निवडलेल्या संघात अर्थातच सॅम होता. त्याच्या शारदाश्रम शाळेचा मित्र आणि सहाध्यायी. तो जसा खेळू लागला. तसा पहिल्या मॅचपासून भारतीय संघाचा अविभाज्य भाग होता. मॅच विनर आणि रन मशीन असं त्याला म्हटलं जायचं. शेन वार्ननं तर त्याला 'इंडियाज लिव्हिंग गॉड' असं संबोधलं होतं. त्या सॅमची मागील सामन्यामधील क्षणचित्रं बातम्यांसोबत दाखवली जात होती. हॅमला त्याच्या निवडीची खात्री होती व आपण वगळले गेलो हे कळूनही नेहमीप्रमाणे सॅमबद्दल त्याला निर्मळ आनंद झाला होता!

मघाशी निलूनं विल्यम भगिनींचा 'प्युअर ब्लॅक डायमंड' असा उल्लेख मॅच पाहताना सहज केला आणि हॅमची मद्याची आणि तिच्या बऱ्याच दिवसांनी मिळणाऱ्या उबदार व लोभस सहवासाची धुंदी खाडकन उतरली. त्याचं मन ठसठसू लागलं. रंध्रारंध्रातून एक हताशता आणि पराकोटीचं नैराश्य विद्युत वेगानं स्त्रवू लागलं! आणि बेभान होत निलूनं प्रकट केलेली त्याची वेदना आणि क्रिकेट जगतानं आता आपल्यास पूर्णतः नाकारल्याची जाणीव त्याला शोकसंतप्त करून गेली. तीव्र न्यूनगंडाचा भाव दडपून टाकण्यासाठी त्यानं परंपरागत पुरुषी आक्रमकतेचा सहारा घेतला आणि तो कडाडला. 'इटस् इनफ निलू - इनफ! नॉट ए सिंगल वर्ड यू विल अटर मोर, अदर

वाईज...''

"काय करशील? मला मारशीलच ना?'' तिची धुंदीतली बेभान अवस्था अजूनही ओसरली नव्हती. त्यामुळं त्याच्या आक्रमक धमकीला तेवढ्याच आक्रमकतेनं उत्तर देत हिस्टेरिक झाल्याप्रमाणे ती किंचाळत म्हणाली, "मार - मार. तिथं मैदानात बॅटनं सॅमभय्याप्रमाणे चेंडू ताकदीनं मारता येत नाही. मागच्या मोसमातील तुझ्या कमबॅक मॅचमध्ये पाहिलं ना! तुझ्यापेक्षा मुंबई तर सोडून दे, पण गुजरात- मध्यप्रदेशचा रणजी प्लेअर पण बरा खेळला असता! यू आर फिनिश्ड माय डिअर, फिनिश्ड.... मघाशी तुझे सो कॉल्ड मेंटॉर ॲण्ड गॉडफादर काय म्हणाले ऐकलंस ना? यू आर नॉट कन्सिडर्ड ॲट ऑल. यू, यू हॅव नो चान्स टू कम बॅक....'' आणि थकून गेल्याप्रमाणे कोचावर तिनं बसकण मारली आणि क्षणभरानं म्हणाली, "ह्यूम, काय झालं रे हे? आय जस्ट कांट डायजस्ट धिस न्यूज....'' आणि त्याच्या गळ्याला मिठी मारून ती मोठ्यानं आवाज करीत स्फुंदू लागली. ह्यूम तिची पाठ थोपटीत 'निलू निलू' असं पुटपुटत तिला सांत्वना देत होता आणि डाव्या हातानं आपल्या डोळ्यात जमा होणारं पाणी पुसत होता!

"निलू - निलू डार्लिंग .. शांत हो. नाकारलेपण अगं कर्णाला जिथं चुकलं नाही, तिथं मी कोण? भारतात दलिताला पराक्रमापेक्षा नियतीवरच जादा भरवसा ठेवावा लागतो. प्लीज शांत हो!''

"आय ॲम रियली अपसेट ह्यूम. असं वाटतंय, तू नाही, मीच पराभूत झालेय....'' निलू पुटपुटली. "मागच्या वर्ल्डकपच्या वेळी भारतीय संघाला चीअरअप करण्यासाठी संजय मांजरेकर, अनिल कुंबळे अशा खेळाडूंसोबत तूही गाणं गायलं होतंस ना त्या कॅसेटमध्ये. ते गाणं म्हण विनोद, आय मीन ह्यूम....''

"किती दिवसांनी मला मूळ नावानं साद दिलीस! ती ऐकायला बरं वाटलं बघ!'' ह्यूम म्हणाला, "म्हणून सहजतेनं ओठावर तुझं मूळचं खिश्चन नाव आलं. बापासाठी मी तुझं निलू असं नामकरण केलं आणि ओठात तेच रुजलं गेलं!''

"लग्नानंतर तुम्हा हिंदूंची बायकोचं नाव बदलायची परंपरा मला कधीच पसंत नव्हती, पण खैर....'' निलू जुन्या जमान्यात स्मृतीनं जात म्हणाली, "नाव का फक्त मुलीचं बदलायचं? मुलाचं का नाही? असं मी कॉलेजमध्ये डिबेटिंगमध्ये मुद्दा मांडून युनिव्हर्सिटी विनर ठरले होते. त्यामुळं जसं तू मला निलू केलंस मी तुला आधी ह्यूम केलं. विनोद म्हणजे ह्युमर... म्हणून ह्यूम! पण तुझा बालमित्र सचिनला तू सॅम म्हणायचास, म्हणून त्याला पॅरलल असं ह्यूम म्हणायला मी सुरुवात केली. सॅमभय्यालाही ते आवडलं. तो व तू एकत्र असला की व तुमच्या मैत्रीचा संदर्भ काढला की न चुकता तू मनापासून गायचास... सात अजुबे इस दुनियामें आठवी अपनी जोडी...''

"नो निलू, प्लीज. डोंट रिमाइंड मी दॅट साँग ऑफ माय फ्रेण्डशिप वुइथ

सॅम...!'' हॅम आवेगानं थरथरत म्हणाला, ''आमच्यात फार अंतर पडलंय! ही ईज ॲट द टॉप ऑफ द वर्ल्ड आणि मी पराभूत खाईत गाडला जातोय लोकांच्या विस्मृतीच्या. कारण इंडियन मॉब वर्शिप करतो तो फक्त शायनिंग स्टारची. आय वाज फेडिंग ग्रॅज्युअली आणि आज तर पूर्णत: फेड आऊट झालो आहे मी. मी सॅम सोबत पुन्हा कधीच खेळू शकणार नाही. आमची जगभर मशहूर असलेली क्रिकेटमधील जोडी संपुष्टात आली आहे, आणि वेडे, तू मला त्या फ्रेण्डशिपच्या गाण्याची याद देऊन टोचण्या देतेस?''

''असं का म्हणतोस हॅम? तुझी व सॅमभय्याची मैत्री तर तुमच्या चड्डीतल्या दिवसांपासूनची - क्रिकेटच्या पलीकडची ना?''

''निलू, तुला कधीच कळायचं नाही ते. अगदी मुंबईतही एका दलिताशी उच्चवर्गीय निर्मळ दोस्ती नाही ठेवू शकत. सॅम त्याला बऱ्याच अंशी अपवाद ठरला. पण तोही माझ्या, त्याच्या क्रिकेटच्या समान धाग्यामुळं व आमचे खरे गुरू आचरेकर सरांमुळं.''

''व्हॉट यू मीन हॅम, मला कळणार नाही, असं का म्हणतोस?''

''व्हेरी प्लेन ॲण्ड सिंपल! अगं, तुझं घराणं ब्रिटिश आमदानीपासून धर्मांतरित असल्यामुळं व मागील तीन पिढ्या लष्करात कॅप्टन व कर्नल अशा हुद्यावर तुझे वडील असल्यामुळं आधी ॲंग्लो इंडियन व मग मेट्रोपोलिटन - कॉस्मोपॉलिटन कल्चरमध्ये तू वाढलीस, मोठी झालीस. तुला समाजात मिसळण्यात कधी जातीचा अडसर निर्माण झाला नाही, म्हणून म्हटलं मी. माझं तसं नाही. माझा रंग आणि माझी झोपडपट्टी जगाला माझी जात विसरू देत नाही. तरीही सॅमची निर्भेळ मैत्री मिळाली, हे भाग्यच म्हटलं पाहिजे.''

''बरं, ते जाऊ दे. प्लीज सिंग फॉर मी. आय वॉंट टू हिअर दॅट सॉंग फ्रॉम चीअर अप कॅसेट...''

त्यानं आपला गळा खाकरला आणि गुणगुणू लागला.

'रूक जाना नहीं, तू कही हार के
काटों पे चलते, मिलेंगे साये बहार के,
ओ राही, ओ राही...''

आणि त्याच्या नकळत हॅमच्या ओठांतून एक हुंदका निसटला. निलू अवाक् होऊन पाहात राहिली. आता तिची पाळी होती त्याचे सांत्वन करण्याची व त्याच्या डोळ्यांतले पाणी टिपण्याची.

''मी - मी पराभूत झालोय. थांबला गेलो आहे, तर मग कसं म्हणू - रुक जाना नही.''

''आय ॲम सॉरी. मला वाटलं होतं...''

"ठीक आहे पण आज तुला गाणं ऐकायचंय ना? मग ऐक, पण प्लीज ते ऐकताना तू डोळ्यांतून पाणी नाही काढायचं. मला मात्र त्या निमित्तानं साऱ्या पराभवाचा, हताशतेचा निचरा डोळ्यांतून अवघे आसू वाहून करायचा आहे."

"हॅम - ..."

"नो-नो निलू," तो एक जुनं दर्दभरं गाणं उत्कटतेनं गाऊ लागला. आणि हॅमनं पुन्हा गाणं म्हणायला सुरुवात केली.

"भूली हुवी यादों, मुझे इतना ना सताओ.
अब चैनसे रहने दो, मेरे पास न आओ..."

त्याचा खर्जातला आवाज थरथरत होता आणि बाहेरच्या मुंबईच्या पावसाशी स्पर्धा करीत त्याचे डोळे बरसत होते.

निलूला त्या आवाजातून प्रकटणारी तीव्र निराशा, वेदना आणि पराभूतता असह्य होत होती. आत खोलवर साचलेल्या भावनांचा तो उद्रेक, ज्वालामुखीच्या लाव्हारसाप्रमाणे भाजून काढत होता; पण ती त्याला रोकणार नव्हती. फक्त उद्रेक शमण्याची, थांबण्याची वाट पाहात होती आणि ती वाट प्रदीर्घ वाट होती, एवढंच तिला जाणवत होतं. केव्हा व कधी तिच्या डोळ्यांतली आसवं त्याला मिठीत घेऊन त्याच्या आसवात मिसळून गंगा-यमुनेच्या संगमाप्रमाणे एकरूप होऊन वाहू लागली, तिला कळलंच नाही.

ते दोघं परस्परांच्या मिठीमधून अलग होत भानावर आले ते टेलिफोनच्या बेलनं. आपले डोळे पुशीत हॅम म्हणाला, "नक्कीच सॅमचा फोन असणार." त्यानं रिसिव्हर उचलत म्हटलं - 'हॅलो.'

निलूनंही स्वत:ला एव्हाना सावरलं होतं. ती ऐकत होती. कॉर्डलेस यंत्राचं बटन दाबून सॅम व हॅमचं संभाषण. 'सॉरी फ्रेण्ड, अॅज ए कॅप्टन, मी निवड समितीला बरंच प्रेस केलं, तुला एक चान्स द्यावा म्हणून. मला टीममध्ये मधल्या फळीत माझ्याप्रमाणे पूर्ण मैदानावर फटके मारीत वेगानं धावा करणारा आक्रमक फलंदाज हवा होता; पण-पण तुझा रणजी व दिलीपचा खराब परफॉर्मन्स तुझ्या निवडीआड आला."

तो मनापासून व तळमळीनं बोलत होता. हे हॅमप्रमाणे निलूलाही जाणवलं.

"जाने दो सॅम... ये न थी हमारी किस्मत... दुसरं काय? सुनील सरांच्या जमान्यातल्या मोहिंदर अमरनाथप्रमाणे मीही चारवेळा इंडियन टीममध्ये कम बॅक केलं; पण पुरेशी संधी कधी दिलीच नाही मला सेटल व्हायची. प्रत्येक वेळी मोठा गॅप, त्यामुळं आंतरराष्ट्रीय सामन्यात पुनरागमनाच्या वेळी खेळताना दडपण जाणवायचं की, आपण यावेळी क्लिक झालो नाही तर पुढच्या सामन्यात वगळले जाऊ... त्यामुळं गेलेला फॉर्म गवसण्यापूर्वीच व सेटल होण्यापूर्वीच वगळला जायचो... खैर, नाऊ द चाप्टर इज ओव्हर. आता आपण एकत्र कधीच खेळणार नाही सॅम..."

"असं का म्हणतोस हॅम. अजूनही संधी आहे. वय पण आहे."

"कशाला खोटं बोलत मला धीर द्यायचा प्रयत्न करतोस? आय कॅन रीड द रायटिंग ऑन द वॉल क्लिअरली." कडवट हसत हॅम म्हणाला. ते ऐकताना निलूच्या अंगावर सर्रकन काटा आला. ते हास्य नव्हतं, हसरं रुदन होतं.

"हॅम, काय बोलावं कळत नाही. मी आता तुझ्याकडं येतो. समक्ष बोलूयात."

"नो कॅप्टन, नो. आज मला तुला भेटायचं नाही." हॅम घाईघाईनं म्हणाला. "पराभूत कर्णाला सदैव विजयी असणाऱ्या अर्जुनानं भेटायचं नसतं. ती भेट कर्णासाठी अधिक वेदनादायी असते."

"प्लीज हॅम, प्लीज.... आपण शाळेत मराठीच्या मॅडममुळं कर्णावरील कादंबऱ्या वाचल्या आहेत; पण आज स्वत:ला तू कर्ण म्हणवून घेणं मला नाही सहन होत मित्रा. स्वत:ची शरम वाटते. आणि मी रे कसला अर्जुन? आणि माझ्याइतकीच, नव्हे काकणभर सरस अशी, तुझी कामगिरी सुरुवातीला होती. या पाच-सहा वर्षांत तू खराब खेळूनही तुझी टेस्ट व वनडेची सरासरी एवढीच जवळपास आहे."

"माझं जाऊ दे. तू खरंच अर्जुन आहेस. मॅच विनर", हॅम म्हणाला. "आणि तू अभेद्य, अजिंक्य आहेस. कारण तुझ्यामागं तुझा कृष्ण उभा आहे."

"व्हाट डू यू मीन? मला कोणी गॉडफादर नाही, हे तू जाणतोस."

"मी त्या अर्थानं नाही म्हणालो सॅम. तुझा कृष्ण म्हणजे तुझी जात. उच्च जात व वर्ण. तो अदृश्य कृष्ण या दलिताचा सारथी कसा होणार?"

"यू आर टॉकिंग नॉन्सेन्स यार. इथं जातीचा प्रश्न येतोच कुठं?"

"तुझा प्रश्नच नाही. तुझी निवड वादातीतच होती व आहे."

हॅम पुन्हा तसाच कडवट हसत म्हणाला, "पण माझ्यानंतर संघात आलेले, राहुल काय, सौरभ काय, दोघांना किती वेळा सलगपणे संधी दिली गेली? त्यांचा सातत्यानं खेळ खराब व अप टू द मार्क नसूनही? त्या पार्श्वभूमीवर माझ्या प्रत्येक कम बॅकला एक वा दोन सामने झाल्यावर खराब खेळ केला म्हणून मला वगळलं, पण ते कायम राहिले व आज संघात पक्के झाले... माझ्या बाबतीत असं का घडलं नाही? यू हॅव एनी अन्सर?"

निलूला हॅमची ही खंत माहीत होती आणि तिलाही ते पटायचं. त्याचे मैदानाबाहेरचे चित्रविचित्र चाळे व स्वैर वागणं यावर जेवढी कठोर व प्रसंगी जहरी टीका मीडियात व्हायची, तेवढी ती कधी अझहर वा सौरभच्या अफेअरची होत नाही. हॅमला वगळताना खराब फॉर्मसोबत बेशिस्त वागणं हे जे कारण निवड-समितीकडून दिलं जायचं, त्या समितीला इतरांचं असंच वागणं कधी का खुपत नव्हतं? या प्रश्नाचं निलूलाही उत्तर सापडत नव्हतं. आज हाच प्रश्न हॅमनं संघाचा कॅप्टन सॅमला केला होता आणि त्याचं उत्तर ऐकायला तीही उत्सुक होती.

"वेल हॅम, व्हाट शुड आय से अबाऊट धिस?'' सॅमचा स्वर गोंधळलेला वाटत होता. "मी - मी जातीच्या संदर्भात याचा कधी विचार केला नाही. तुला पुरेशी संधी न देता वगळण्यात आलं हे खरं आहे आणि सौरभ-राहुलवर सुरुवातीला पुअर खेळत असूनही निवड समितीनं त्यांच्यावर विश्वास टाकला. त्यांना सातत्यानं संघात स्थान दिलं हेही खोटं नाही, पण त्याचा जातीशी संबंध लावणं? यू आर फार स्ट्रेचिंग युवर इमॅजिनेशन आऊट ऑफ डेस्परेशन.....''

"नाही दोस्त, इंडियात जात हे असं सत्य आहे की, सवर्ण ते नाही असं समजून दडपायचा प्रयत्न करतात आणि पददलितांना पदोपदी त्याचा सामना करावा लागतो....'' हॅम म्हणाला, "परवा दक्षिण ऑफ्रिकेत मला अनायासे दरबनला युनोनं आयोजित केलेल्या रेसिजमच्या जागतिक परिषदेत सहभागी होता आलं. नो, आय ॲम नॉट क्रुसेडर. मी एका क्लबच्या आमंत्रणावरून तिथं महिनाभर काही कंट्री मॅचेस खेळण्यासाठी गेलो होतो. आणि तिथं माझा रणजीत हरवलेला फॉर्म गवसला. मी ज्या क्लबच्या वतीनं खेळलो, तो विजयी ठरला आणि मला सीझनचा सर्वोत्कृष्ट बॅटस्मन आणि मॅन ऑफ द सिरीजचा किताब मिळाला.... त्या निमित्तानं मी दरबनला होतो. तिथं मला काही महाराष्ट्रातले दलित नेते व कार्यकर्ते भेटले व त्यांच्या बरोबर त्या परिषदेत सहभागी झालो. इट वॉज ॲन आय ओपनर फॉर मी. सॅम, तिथंच मला माझ्या कास्टची, त्याहून जादा त्यामुळं होणाऱ्या डिसक्रिमिनेशनची जाणीव झाली... मला जे माझ्या विरुद्ध सौरभ, राहुलच्या संदर्भात वाटायचं, त्याला एक प्रकारे पुष्टी मिळाली.''

सॅम शांतपणे पलीकडून ऐकत होता. त्याचा जड व भारी श्वास कॉर्डलेसच्या यंत्रातून निलू नेमका टिपत होती, सॅम हतबुद्ध झाला होता.

"सॉरी सॅम, मी भरकटत गेलो बोलताना. जाऊ दे, तुला ते नाही समजणार यार.''

"खरंय ते दोस्त. नाही तरी मी जनरल नॉलेज व अवेअरनेससंदर्भात बुद्धूच आहे. पण तुझ्या स्वरातील वेदना मला एनलायटन करून गेली.... यू - यू मे बी राईट. यू आर सर्टनली, आय मस्ट से, डिस्क्रिमिनिटेड ॲट दी टाईम ऑफ सिलेक्शन.''

"थँक्यू सॅम. निदान तुला तरी कळलीय माझी वेदना.''

"हॅम मी येतोय, प्लीज नाही म्हणू नकोस. मी तुझं काही एक ऐकणार नाही. निलूभाभी, मला माहितेय. एकदा हॅमनंच सांगितलंय की तुम्ही आमचं बोलणं नेहेमी कॉर्डलेसचं बटन ऑन करून ऐकता म्हणून. तर भाभी, ऐकताय ना, मी येतोय तुमच्या हातचा प्रॉन खायला.'' आणि सॅमने रिसिव्हर ठेवून दिला. तो काही मिनिटातच त्याच्याकडं यायला निघेल आणि पंधरा मिनिटात पोहोचेल. त्यामुळं निलू उठली आणि हॅमचे खांदे किंचित थोपटीत किचनकडं डिनरच्या तयारीसाठी वळली.

हॅमच्या हातात अजूनही व्हिस्कीचा प्याला होता. त्यानं पाय लांब करीत

समोरच्या टीपॉयवर ठेवले आणि कोचात डोळे मिटून शांत पहुडला. शरीर स्वस्थ असलं तरी अस्वस्थ मन खदखदत होतं.

अस्वस्थ वाटणारा मनाचा उद्रेक शांत व्हावा म्हणून त्यानं पुन्हा टीव्ही ऑन केला. व्हीनस व सेरेना विल्यमची मॅच संपली होती व विजेती व्हीनस बक्षिसाचा करंडक उंचावत प्रेक्षकांना अभिवादन करीत होती. हॅमला तिच्या घामानं निथळणाऱ्या चेहऱ्यावर विजयाचं स्मित पाहताना त्यामागची किलर इन्स्टिंक्टची ओतप्रोत भरलेली भावना स्वच्छपणे वाचता येत होती.

आपल्या व्यक्तिमत्त्वाचा तो अविभाज्य भाग असलेला किलर इन्स्टिंक्ट कुठं गेला? क्रिकेटचा समालोचक लेखक द्वारका त्याचा उल्लेख नेहमी लढवय्या असा करायचा. काही वर्षांपूर्वी एका लेखात त्यानं हॅमच्या आत्मविश्वासाबद्दल लिहिताना त्याच्या क्रिकेट कसोटींच्या पदार्पणाच्या मोसमातली एक हकिकत वर्णिली हेती. त्यातला शब्दन्‌शब्द त्याच्या आजही स्मरणात आहे. सॅम तेव्हा म्हणाला होता, ''या द्वारकानं जे लिहिलं ते एकदम अचूक आहे त्यानं तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा अर्कच जणू या घटनेद्वारे पेश केला आहे.''

द्वारकानं आपल्या रसिल्या बहारदार शैलीत लिहिलं होतं. ''आमचा हॅमही असाच लढवय्या आहे आणि आत्मविश्वास तर त्याचा लहानपणापासूनचा मित्र आहे व ती मैत्री अतूट आहे. त्याचा एक लहानपणीचा रणजीमधील पदार्पणाचा किस्सा सांगतो. थेट शाळेतून सॅमसोबत मुंबईच्या संघात आलेला हा पोरगा. मुंबई संघात तेव्हा नव्या पोरांना दबदबा वाटावा अशा दिलीप, संजय, लालू, संजू व रवीसारख्या कसोटी वीरांचा भरणा होता, पण हॅम असा वावरत होता की जणू तो त्याच्या शाळेच्या मैदानावरच आहे.

टू डाऊनवर फलंदाजीला जाताना कॅप्टननं त्याला सांगितलं, तू तुझा नैसर्गिक खेळ कर. त्याने कर्णधाराची आज्ञा शिरसावंद्य मानली, पहिले दोन चेंडू मैदानाबाहेर फेकले. नाबाद अर्धशतक झळकावून तो लंच टाईमला ड्रेसिंग रूममध्ये परतला आणि हसत सहकाऱ्यांना म्हणाला, 'हे काय, शॅम्पेन कुठं आहे? बरं, ते जाऊ दे.' आणि त्यानं थम्सअपची बाटली उंचावली. बूच उघडून ती शॅम्पेनसारखी उडवली. हा उद्धटपणा नव्हता तर वरच्या स्तरावरचा आत्मविश्वास होता. हॅम आधीच्या दोन सामन्यात शून्यावर बाद होऊ दे. पण पुढील सामन्यांत खेळायला अशा आत्मविश्वासानं जाईल की, त्यानं आधीच्या सामन्यात झंझावाती शतक केलंय. असा हा आत्मविश्वास व मानसिक शक्ती अपवादरूप अशी दुर्मीळ आहे.''

मनोपृष्ठावर द्वारकाच्या त्या लेखातल्या ओळी उमटल्या होत्या आणि त्याच्या स्मृतींनच त्या हॅमला पाठांतर चोख केलेल्या शाळकरी मुलानं वक्तृत्व स्पर्धेत घडाघडा भाषण करावं अशा म्हणून दाखवल्या होत्या. पण त्यानं मनाला उभारी

वाटली नाही, की दिलासा मिळाला नाही. तो अधिकच निराशेच्या गर्तेत कोसळत गेला.

समोर टीव्हीवर व्हीनस व सेरेनाच्या त्या ऐतिहासिक मॅचची क्षणचित्रे दाखवली जात हेती. १८८४ साली लिलयन व मॉड वॅटसन य गोऱ्या भगिनींची विम्बल्डनची जेतेपदासाठी लढत झाली होती. त्यानंतर तब्बल ११७ वर्षांनी दोन कृष्णवर्णीय भगिनींमध्ये सामना झाला होता.

दर्बनच्या वंशवादाच्या परिषदेच्या पार्श्वभूमीवर वर्णभेदावर मात करीत, गोऱ्या मानसिकतेला आव्हान देत टेनिसच्या सम्राज्ञीपदावर हक्क सांगणाऱ्या विल्यम भगिनींशी माझं दुःखाचं, वेदनेचं नातं आहे. ब्लॅक अमेरिकन हे रंगभेदाचे बळी, तर मी दलित म्हणून जातीव्यवस्थेचा बळी. आज जशा दिमाखदारपणे विल्यम भगिनी वा आपल्या क्रीडा कारकीर्दीमध्ये कार्ल लुईस व फ्लो जो हे ॲथलेटिक वर्णद्वेषी अमेरिकन जगतात गोऱ्या अहंकाराला चिरडीत सर्वोच्च स्थानी पोहोचले, तशीच आपली क्षमता होती. हे केवळ माझा मित्र सॅमचंच नव्हे, तर साऱ्यांचंच मत हेतं.

खरं तर आपल्याला सॅमच्या जोडीनं बरोबरीनं भारतीय संघात प्रवेश मिळायला हवा होता, पण त्याच्यानंतर दोन - अडीच वर्षांनी संधी मिकळी. तेव्हाच प्रथम जातिभेदाची जाणीव झाली. त्याची नंतरच्या काळात तीव्रता कमी झालीय, पण मनाच्या पापुद्र्याआड ती अद्यापही लखलखती आहे, हे जाणवतं होतं. तरीही मिळालेल्या पहिल्या संधीचा फायदा घेऊन द्वारका म्हणतो तशा आत्मविश्वास व लढवय्येपणाच्या बळावर आपल्या बॅटीचं आपण पाणी दाखवून दिलं. लागोपाठ दोन कसोटी सामन्यात दोन द्विशतके आणि एकदिवसीय सामन्यात पदार्पणातच शतक झळकवीत 'मॅन ऑफ द मॅच' चा सन्मान जिंकत भारताला मिळवून दिलेला विजय आपल्याला सॅमच्या पंक्तीमध्ये घेऊन गेला.

तेव्हा हॅमनं एका पत्रकाराला एका प्रश्नाचं उत्तर देताना म्हटलं होतं, "मी सॅमनंतर अडीच वर्षांनी आलोय. त्याला गाठायचं असेल तर जिने चढून गाठता येणार नाही म्हणून मी लिफ्टनं भराभर वर जात आहे."

सॅमनं तेव्हा दाद देताना म्हटलं होतं, "वेल सेड फ्रेण्ड, वेल सेड. पण तुझं विधान अर्धसत्य आहे. तू लिफ्टनं वर केव्हाच पोहोचला असून माझी तिथं येण्याची सच्च्या मित्राप्रमाणे वाट पाहात आहेस."

हॅमचं मन त्या आठवणीनं रोमांचित होत फुलून आलं, पण क्षणभरच. पुन्हा क्रिकेटचं मैदान व पराक्रम गाजवीत जातीद्वेषावर मात करीत पुढं येण्याची युद्धभूमी आपण आता कायमची गमावून बसवलो आहोत, या विदारक जाणिवेनं पुन्हा मन कडवटलं गेलं!

आपला तो मित्र हां हां म्हणता वर आला व आपल्यालाही मागं टाकून जिथं

इतर कुणाला साधं पोहोचणंही दुरापास्त व्हावं अशा उच्चस्थानी जाऊन बसला. हा इतिहास अगदी काल-आजचा आहे व भारतातल्या शेंबड्या पोरालाही तो ज्ञात आहे. आपण मात्र त्या पहिल्यावहिल्या झंझावाती यशाच्या धुंदीत भरकटत गेलो आणि ज्या गतीनं सॅम पराक्रमाची पर्वत शिखरं चढत होता, त्यापेक्षा अधिक गतीनं पराभवाच्या दरीत आपण कोसळत होतो. का व कसं झालं हे कळलं नाही आणि आता फार उशीर झाला आहे.

"निलू, माझे काकदृष्टीचे व माझ्या वगळण्यानं खूश होणारे पत्रकार माझ्यावर टीका करताना म्हणतात," एकदा हॅम तिच्यापुढं अशाच एका विकलांग दुबळ्या क्षणी कन्फेशन द्यावं, तसा कबुली जबाबाचा पाढा वाचत म्हणाला होता,

"मी - मी भरकटत गेलो. यशाची धुंदी मला फार लवकर चढली आणि चित्रविचित्र चाळे, भडक रंगीबेरंगी ड्रेसेस घालणं, कानात भिकबाळी घालून कधी, तर कधी चमनगोटा कर, रात्ररात्र डिस्कोमध्ये घालव... त्यांच्या काकदृष्टीतून त्यातलं काही, काहीसुद्धा सुटलं नव्हतं. पण क्रिकेट जगतात असं करणारा मी एकटाच नव्हतो. मी एवढं अभावाचं जगत आलो होतो की पुढ्यात आल्यावर ओरबाडल्याप्रमाणे दोन्ही हातांनी सुख व भोग ओरबाडत गेलो, पण मैदानात बॅट तळपळतच होती, हे ते सोईस्कर विसरतात. केवळ दोन सामन्यात मी खराब खेळलो. एकदा विकेट फेकली आणि फिल्डिंग पुअर आहे म्हणून मला वगळण्यात आलं. पुन्हा मी जिद्दीनं खेळून कम बॅक केलं, पण माझी निवड केवळ पहिल्या दोन सामन्यांसाठीच होती. त्यात एका सामन्यात सॅमला मी बऱ्यापैकी साथ दिली. त्यानं आत्मविश्वास येऊन दुसऱ्या सामन्यात मी माझ्या नेहमीच्या नैसर्गिक शैलीत खेळत वेगानं धावा जमवत असताना मुरलीधरनच्या एका अप्रतिम बॉलवर बाद झालो. अशा बॉलपुढं मीच काय, सॅम काय, ब्रॅडमन व गॅरी सोबर्सही बाद झाला असता. पण मला पुढील तीन सामन्यात बारावा गडी केलं व नंतर वगळलं...."

निलूला त्याचं पूर्ण क्रिकेटिंग करिअर माहीत होतं. जयपूरचा त्याचा पहिलावहिला वन डे इंटरनॅशनल तिनं पाहिला होता आणि त्या अप्रतिम खेळीनं ती त्याच्या प्रेमात पडली होती. खेळाच्या दरम्यान चौकार व षटकार मारला की, तो गळ्यातलं पदक काढून त्याचं चुंबन घ्यायचा आणि आकाशाकडं पाहायचा. निलूला वाटलं होतं, त्याची कुणी गर्लफ्रेण्ड असणार व तिचा फोटो पदकात असणार आणि आकाशाकडं पाहणं त्याच्या ख्रिश्चॅनिटीची निशाणी दर्शवीत होती, पण त्या दोन कृतीतील रहस्य जेव्हा तिला समतलं. ती अवाक झाली होती.

"निलू, पदकात आम्हा दलितांचे देव - आदर्श असलेल्या बाबासाहेबांचा फोटो आहे. ते मला सदैव स्फूर्ती देतात आणि आकाशाकडं पाहणं म्हणजे अंगराज कर्णाप्रमाणे त्या विश्वतेजाशी तादाम्य साधणं होय... आय ॲम नॉट अशेम्ड ऑफ

माय बॅकग्राऊण्ड ॲण्ड एस. सी. कास्ट. त्यावर मात करीत क्रिकेट जगतात मला माझ्या नावाची लखलखती मुद्रा कोरायची आहे आणि मी ती कोरणार आहे.''

पहिल्या तीन - चार वर्षांत हॅम फॉर्मात असताना सॅमच्या जोडीनं त्याची नाममुद्रा लखलखीत होती, पण जेव्हापासून त्याला वगळलं गेलं, त्याचे तिन्ही कम बॅक ते तेज पुन्हा आणू शकले नाहीत. आज ती नाममुद्रा पुसट होत चालली आहे.

पण तो खरंच फायटर आहे. लढवय्या आहे. प्रत्येक कम बॅकनंतर खेळताना तो कधीही दडपणाखाली खेळला नाही, पण ग्लोरियस अनसर्टनटीसाठी क्रिकेट मशहूर आहे. प्रत्येक वेळी अप्रतिम चेंडूवर हाणामारीच्या शेवटच्या हाताघाईच्या षटकात किंवा दुसऱ्याच्या चुकीच्या कॉलमुळं बाद होणं हॅमच्या वाट्याला सातत्यानं येत गेलं आणि निवड समितीला वगळण्यासाठी कारणं मिळत गेली.

मागच्या वर्ल्डकप सिरीजच्या सेमीफायनलला भारत हरला. तेव्हा फोर डाऊन आलेला हॅम एक बाजू लावून शेवटपर्यंत खेळत होता. पण सॅमनंतर पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे भारताचा डाव कोसळत गेला. पॅव्हेलियनला परतणाऱ्या हॅमच्या डोळ्यात पाणी होतं. ते टीव्हीच्या कॅमेऱ्यातून जगभराच्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचत होतं. हॅमची तीव्र निराशा प्रामाणिक होती, पण विदूषकी प्रतिमा प्रसारमाध्यमांनी त्याला चिकटवल्यामुळं त्याची पण प्रचंड टिंगल झाली. त्याला त्या सिरीजनंतर वगळण्याचं ते पण एक एक ऑफिशिअल कारण होतं. असं निराश मनानं सॅमनं त्याला सांगितलं तेव्हा न पेलणारा मर्मांतक धक्का बसला होता.

"सॅम, जस्ट इमॅजिन! माझ्या जागी तू असतास, तुझ्या डोळ्यात इंडियाच्या पराभवानं पाणी आलं असतं तर तर मीडियाने 'देशप्रेमी, सच्चा हिंदुस्थानी' अशा वेचक शब्दांनी स्मृतिसुमनं तुझ्यावर उधळली असती. कारण शेवटी तू हीरो आहेस आणि मी जोकर - हास्यास्पद ब्लॅक. लो कास्टचा... आणि ऑफकोर्स लो टेस्टचा.''

मागच्या वर्षी एका मॅचमध्ये कॅप्टनच्या जागी बदली खेळाडू म्हणून तो क्षेत्ररक्षणासाठी उतरतो काय आणि नंतर प्रचंड वेदनेनं विव्हळत हॅम स्ट्रेचरवरून परततो काय! कागद टर्रकन फाडावा, तसेच त्याच्या डाव्या पायाचे स्नायू फाटले होते. एक बॉल अडविण्यासाठी पायानं प्रयत्न करताना विचित्र पद्धतीनं तो पडला होता. सुमारे सहा महिने पाय फ्रॅक्चरमध्ये होता, पण त्यातूनही तो जन्मजात लढवय्या गुणांच्या आधारे बरा होऊन उठला होता आणि रणजीत पुन्हा खेळताना चमक दाखवत होता. त्यामुळं पुन्हा एकवार कम बॅकची उमेद बाळगून होता.

"निलू डार्लिंग, आता मला संधी मिळाली ना, तर मी त्याच सोनं करीन. मी नाही, माझी बॅट बोलेल आणि पुन्हा भरधाव वेगानं लिफ्टनं जात सॅमला गाठायचा प्रयत्न करीन... जस्ट सी माय डिअर, आय मीन इट, आय मीन इट.''

पण निवड समितीनं पुन्हा एकवार त्याला वगळलं होतं आणि अध्यक्षांनी

ब्लंटली म्हटलं होतं, "नो, ही इज नॉट कन्सीडिर्ड अ‍ॅट ऑल. आय डोंट थिंक, ही विल हॅव एनी चान्स टू कम बॅक."

पुन्हा एकवार कर्णाची कवचकुंडली काढली गेली होती. त्या कर्णाला समाधानाची दोन कारणं तरी होती. एकतर त्यानं इंद्रासारख्या राजाला याचक म्हणून विनवणी करीत आल्यामुळं दान करून दानवीराची दिगंत कीर्ती मिळवली होती. आणि कवचकुंडलाविनाही त्याला युद्धभूमीवर लढता येत होतं. किमानपक्षी वीरमरण तरी निश्चित होतं.

पण हॅम युद्धभूमीही हरवून बसला होता. न लढता, न खेळता पराभूत होणं, मिटून जाणं हे आता आपलं नशीब आहे आणि ते बदलण्याची शक्यता नाहीच्या बरोबर आहे हे त्याच्या मनानं त्याला ब्लंटली बजावलं होतं. "यस, आय अ‍ॅम टोटली फिनिशड निलू... जिथं अमेरिकेतही रंगभेदामुळं कृष्णवर्णीयाचं निर्विवाद वर्चस्व असणाऱ्या बास्केटबॉल या खेळाला राष्ट्रीय खेळाचा दर्जा दिला जात नाही, तिथं भारतात माझी काय पत्रास? एक तर मी तसा काळा आहे. पुन्हा दलित.. धिस एज ए डिस्गस्टिंग कॉम्बिनेशन, वुईच कॅन रुईन एनीबडी..."

"हॅम, डोंट लूज हार्ट. अरे व्हीनस, सेरेनाकडं पाहा. झिम्बाबेच्या ओलोंगाकडं पाहा. यू विल कम बॅक अगेन, आय अ‍ॅम कॉन्फिडंट."

"नाही निलू... माझ्या मनाची आत्मविश्वासरूपी कवचकुंडलंही आता गळून पडली आहेत. मी - मी संपलो गं..." तिच्याकडं पाणावल्या नेत्रानं पाहात छिन्नछिन्न स्वरात भयव्याकूळ होत हॅमनं विचारलं, "ज्या डॅशिंग क्रिकेटियरवर तू प्रेम केलंस. तो संपला आहे. त्याचा तिरस्कार नाही ना करणार? एक वेळ तेही चालेल. पण प्लीज, माझी कीव करू नकोस चुकूनही कधी. नहीं तो मैं जीतेजी मर जाऊंगा. यकिनन मर जाऊंगा..."

सॅम आला. त्याच्याशी व निलूशी पूर्वीप्रमाणेच दिलखुलास बोलला. हॅमनंही स्वत:ला सावरलं होतं. त्याचा निरोप घेऊन परतताना लिफ्ट तांत्रिक कारणांनी बंद पडली हेती. तेव्हा तो जिन्यावरूनच जिने पायी उतरून जाण्यासाठी सज्ज झालेल्या सॅमला म्हणाला, "मला लिफ्टनं भराभर वर जात तुला गाठायचं होतं... पण माझी ही लिफ्ट बंद बडलीय मित्रा, कायमची, पुन्हा कधीही सुरू होणार नाही."

आणि खदाखदा हसत, भसाडा आवाज काढीच हॅमनं तान मारली. "कैसे मैं आऊ? लिफ्ट मेरी बंद है...."

सॅम त्याच्याकडं किती वेळ तरी मूढमुग्धासारखा अवाक होऊन पाहात राहिला. श्रीमंत सोसायटीमधील उच्चभ्रू नीतिनियमांची पर्वा न करता हॅम गातच राहिला, गातच राहील... लिफ्ट मेरी बंद है. लिफ्ट मेरी बंद है....

०-०-०

# ९. रन बेबी रन

माफ कर बेबी. तुझी इच्छा मी पूर्ण करू शकलो नाही. तुझा हा गुरू, हा कोच अखेर रणांगणातून पळ काढणारा ठरला. तुझ्याप्रमाणेच. तूही नाही का जीवनातून पळ काढलास?

समोर चिता भडकलेली. तिच्या वाऱ्यानं फरफरणाऱ्या ज्वालांची दाहकता दुरूनही जाणवणारी, पण त्या गर्दीत किंचित अधोमुख असलेल्या गुरूला त्याचं भान नव्हतं. तो चितेत भस्म होणाऱ्या बेबी नामक कलेवराच्या प्राणतत्त्वाशी मूक संवाद करीत होता.. खरं तर तो आत्मसंवाद होता! गेल्या आठ वर्षातील गुरू- शिष्याच्या क्रीडा प्रवासाचा वेध घेणारा. कॅलिडोस्कोपिक. मनात एकाच वेळी अनेक आठवणीचं उठलेलं मोहोळ. फ्लॅशबॅकप्रमाणे मागंपुढं कालानुक्रम न पाळणारं.

"रन, बेबी रन!"

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १०० मीटर धावण्याची अंतिम फेरी. तो दिवस गुरुपौर्णिमेचा होता. गुरूच्या पाया पडत बेबी म्हणाली होती, 'सर, आज मी गोल्ड मेडल मिळवून तुमच्या चरणी वाहणार. आय प्रॉमिस यू."

"मला खात्री आहे. आजचा दिवस तुझा आहे. उद्याच्या पेपरची हेडलाईन तुझ्या नावाची असणार आहे." तिच्या डोक्यावरून हात फिरवत व पाठ थोपटत तो म्हणाला होता.

"रन, बेबी रन.. यू आर गोइंग टू विन." असं तिला चिअर्स अप करीत गुरू प्रोत्साहन देत होता आणि डोळ्यांचं पातं लवतं न लवतं, तोवर राष्ट्रीय उच्चांक नोंदवत बेबीनं ती शंभर मीटर धावण्याची शर्यत जिंकली होती.

आज ती बेबी विद्युत वेगानं प्राणतत्त्व सोडून कुठं पळून गेली होती? ही धाव वेगळीच होती. 'स्टार्ट' चा फायर करून आदेश नव्हता की, 'रन, बेबी रन'चं चिअर्स अप नव्हतं. तरीही कशी सुसाट धावत नजरेआड झाली कायमची. मघाशी चितेवर पुष्पहारानं मढवलेलं तिचं शरीर आता भाजल्यामुळं जळून खाक कोळसा झालं होतं. केवळ चेहरा वाचला होता. तो किती शांत व प्रसन्न वाटत होता. त्यावर अखेरचे शब्द

होते 'सर' - तिच्या गुरूसाठी. त्याच्यासाठी कोमात गेलेली बेबी काही क्षण शुद्धीवर आली होती. तेव्हा आपण तिच्या नजरेसमोर होतो. त्या 'बर्न वॉर्ड'मध्ये मोठ्या डोलाऱ्यात तिचं ऐंशी-पंचाऐंशी टक्के भाजलेलं शरीर झाकून ठेवलं होतं. चेहरा तेवढा बाहेर होता. त्याला वार्ता समजताच मागचा पुढचा विचार न करता तो धावत दवाखान्यात आला होता. आणि त्याच वेळी तिला शुद्ध आली होती.

गुरूला बेबीनं ओळखलं होतं. ती काहीशी हसली आणि पुटपुटली "सर.... सर...." पुढं तिला काही बोलायचं होतं, पण बोलू शकली नाही. पाहता पाहता तिची नजर ताठरत स्थिर झाली. तिची प्राणज्योत त्या क्षणी निमाली होती! बेबीचा नवरा बालाजी फूत्कारला, "बघितलंस आई, मरतानाही छिनाल त्याचंच नाव घेत होती. तूच सांग, तिची अंतिम इच्छा कशी मान्य करायची?"

गुरूच्या तीक्ष्ण कानांनी कुजबुजीचा तो फूत्कार नेमका टिपला होता. मृत्यूबरोबर संबधितांबाबतचा राग-लोभ संपतो, त्याचा अंत होतो, असं आपलं धर्मशास्त्र व संस्कार सांगतात. हे खोटं म्हणायचं? बालाजीचा तिच्यावरचा राग तिच्या मृत्यूनंतर संपला नव्हता, पण बेबीची अंतिम इच्छा काय होती? त्याच्याशी आपला काही संबंध असावा.... कुणाला विचारावं? हा प्रश्न होता. थेट बालाजीला विचारणं शक्य नव्हतं. नाहीतर त्या दिवशी केला तसा त्यानं तमाशा केला असता.

गुरूला दवाखान्यातून सुन्न मनानं बाहेर पडताना बालाजीच्या चुलत भावानं, व्यंकटनं गाठलं. "सर, थोडं थांबा." गुरू चालता चालता मागून आलेल्या हाकेनं थबकला होता. व्यंकटही त्याचा शिष्य होता. दोन तीन वर्षं त्याच्याकडं ॲथलेटिक्सचे कोचिंग घेत होता. पण नंतर घरच्या व्यवसायाकडं वळल्यामुळं त्यानं मैदान सोडलं होतं. "सर, बेबी वैनीनं स्वत:ला जाळून घेतलं. तिला आम्ही दवाखान्यात आणताना माझ्या काकूला, तिच्या सासूला, ती म्हणाली होती. "मला जगायचं नाही आणि मरण आलं तर माझ्या चितेला ह्यांनी नाही, तर सरांनी अग्नी द्यावा. नाही तर मला मुक्ती नाही मिळणार...."

"क..क... काय? अशी तिची शेवटची इच्छा होती?"

"होय सर!" व्यंकट म्हणाला, "आणि तुम्हाला ती पुरी केली पाहिजे!"

"पण ते कसं शक्य आहे व्यंकट!" गुरू अस्वस्थ होत म्हणाला "अरे, काही झालं तरी तिचं लग्न झालं होतं आणि बालाजी तिचा धर्माचा नवरा आहे."

"नवरा?" व्यंकट संतापानं थरथरत बोलला, "सैतान, पण तोही परवडला असता, त्या पलीकडचं काम होतं आमच्या बालाजीचं. खरं सांगतो सर, त्याला भाऊ म्हणून घेण्याचीही शरम वाटते. त्याच्यामुळंच वैनीनं जाळून घेतलं असणार..."

गुरू कमालीचा हतबुद्ध. कानात व्यंकटचे शब्द शिशाप्रमाणे भरले जात होते आणि त्याचं अंतर्मन दग्ध होत होतं. नजरेसमोर बेबीचा उत्स्फूर्त चेहरा, ओठावरचं

मधाळ स्वरातलं 'सर' हे त्याच्यासाठी खास असलेलं संबोधन येत होतं!

"सर... तुम्ही खरंच माझे गुरू आहात!", अशाच एका क्रीडा स्पर्धेच्या निमित्तानं केरळला ट्रेननं जाताना, कशावरून विषय निघाला होता कोण जाणे. बेबी बोलून गेली होती. "केवळ गुरूच नाही, तर फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईडसुद्धा."

"बेबी, मी केवळ तुझा कोच आहे. तोही नोकरी करणारा. एन. एस. आय. कोच. मी फार काही करतोय असं नाही. इतकंही एका माणसानं दुसऱ्या माणसाला मानू नये..... त्याला मग अहंकार होतो की, आपण खूप काहीतरी आहोत."

"सर... आय स्वेअर! मी खरं बोलतेय, पण मला यापुढं जाऊन म्हणायचं आहे की, त्याहून तुम्ही माझ्यासाठी काकणभर जास्त आहा. ते काय, मला सांगता येणार नाही, पण..." ते तिचे शब्द आजही गुरूच्या स्मरणात आहेत.

त्यावेळी तर मनमानस एक अनाम आनंदाची व उत्तेजनाची कारंजी थुईथुई उडवत चिंब झालं होतं! तो प्रसंग कर्नालला शंभर मीटर धावण्याची स्पर्धा बेबीनं नव्या राष्ट्रीय उच्चांकासह जिंकली होती. तिनं क्रमांक एकच्या मधल्या प्लॅटफार्मवर उभी राहून मान वाकवीत सुवर्णपदक महनीय राज्यपाल महोदयांच्या हस्ते स्वीकारलं होतं. गुरू भरलेल्या डोळ्यानं तो क्षण एकटक पाहात होता. एक कोच, एक प्रशिक्षक म्हणून त्याच्यासाठी दिवस मोठा भाग्याचा होता. कारण ती ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरू शकत होती.

त्यासाठी बेबीवर कडी मेहनत घ्यायची आणि भारताचं ॲथलेटिकमधलं पदक तिच्या रूपानं महाराष्ट्राला पुन्हा मिळवून द्यायचं. यापूर्वी फक्त १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये खाशाबा जाधवानं कुस्तीतलं पहिलं पदक मिळवलं होतं. बेबीत ती क्षमता खचितच होती!

पत्रकारांनी तिला पदक स्वीकारल्यानंतर तिथंच गाठत प्रतिक्रिया विचारली. "प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा!" ती उत्स्फूर्तपणे म्हणाली होती, "माझं हे पदक माझ्या राज्यासाठी मिळवलंय आणि माझ्या गुरूंसाठी, टीचरसाठी. त्यांच्याविना मी कुणी नाही. केवळ एक मातीचा गोळा होते. त्यांनी मला घडवलं. मी मी त्यांचे शिल्प आहे, त्यांची निर्मिती आहे." आता गुरूच्या डोळ्यात अश्रूंची गर्दी झाली आणि त्यानं प्रयत्न करूनही ते चुकारपणे एक एक, दोन -दोन करीत ओघळत राहिलेच. याचं त्याला भान नव्हतं! पण त्याला मित्र व गुरू-मार्गदर्शकापेक्षा अधिक काही मानणाऱ्या बेबीचं त्याच्याकडं जरूर लक्ष होतं! हा खरा गुरू आपला. अगदी जवळचा. फार सच्चा, खोलवर मनात उतरलाय. आपल्या पराक्रमानं आनंदाश्रू ढाळतोय..... पत्रकार, टीव्ही व स्टिल कॅमेरामनची गर्दी दुसऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी बाजूच्या स्टेडियममध्ये निघून गेली आणि बेबी मघाशी ज्या वेगानं पळत होती त्याच वेगानं धावत त्याच्या जवळ आली आणि जगाचं भान हरवून त्याला तिनं मिठी मारली.

"सर.... सर..." तिला काय बोलावं हेच कळत नव्हतं. फक्त मिठी अधिक घट्ट करीत त्याच्या छातीवर विसावली होती. "आय - आय ॲम प्राऊड ऑफ यू बेबी." "खरंच सर...." तिनं मान वर करीत त्याच्याकडं पाहिलं. आता गुरूचे आनंदाश्रू मुक्तपणे वाहत होते. हा नेहमीपेक्षा वेगळाच गुरू तिला वाटत होता. जणू तिला, तिच्या सुप्त मनाला कुठंतरी अबोधपणे कल्पिलेला गुरू गवसल्यासारखा वाटला. बेबीनं नकळत टाचा उंचावल्या आणि त्याच्या अश्रूभरल्या डोळ्यांवर ओठ ठेवले आणि ते अश्रूकण काही क्षण बेभानपणे टिपत राहिली...

एका कॅमेऱ्याचा फ्लॅश झळकल्याची जाणीव झाली. भानावर येत गुरूनं तिला दूर सारलं. "बेबी, भानावर ये. प्लीज...." आणि त्यानं वळून पाहिलं. एक परदेशी तरुणी, बहुधा हौशी क्रीडा फोटोग्राफर किंवा टुरिस्ट असावी. तिनं त्याच्या त्या बेभान पण फार उत्कट क्षणाला कॅमेराबद्ध केलं होतं! "इट इज सच ए टचिंग ॲण्ड टेंडर मोमेंट... आय कांट रेजिस्ट टू कॅप्चर इट..." तिनं खुलासा केला. "तुम्ही इथं कुठं उतरलात ते सांगा. रात्रीच कॉपी तुम्हा दोघांना पाठवीन." त्या रात्री हॉटेलच्या लाऊंजमध्ये हॉटेल मालकानं विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्या खेळाडूंसाठी खास कॅंडललाईट डिनर दिलं होतं. एका टेबलावर ते दोघं होते. त्या परदेशी तरुणीनं पाठवलेलं ते रंगीत छायाचित्र त्यांच्या पुढ्यात होतं. ते किती सुरेख होतं.

गुरू तिच्या चेहऱ्यावरचे भाव पुन्हा पुन्हा निरखीत होता. तर त्याचे पाणावलेले डोळे किती बोलके आहेत, याची तिला जाणीव होत होती.

त्याला तिच्या त्या बेभान मिठीचा स्पर्श पुन्हा पुन्हा आठवत होता. आपण तिच्यासाठी कोण आहोत? केवळ प्रवासात, ट्रेनमध्ये ती जे म्हणाली त्याचा अर्थ काय लावायचा? आणि आजचं तिचं वर्तन?

नाही गुरू, तुझ्या तीव्र कल्पनाशक्ती असलेल्या मनाला थोपव. काहीही अर्थ, कोणतेही निष्कर्ष काढू नकोस.

आजचा दिवस तिचा पराक्रम आणि ही कॅंडललाईटमधील डिनरची रात्र नासवू नकोस... तुमच्या दोघांच्या नात्याला कसलंही लेबल लावू नकोस. ते फार गहिरं, फार सच्चं आणि परस्परांसाठी सुखद व प्रेरणादायी आहे, हे पुरेसं नाही का? गुरूनं ते मनातले ओढाळ विचार निग्रहानं बाजूस सारले आणि तिच्याशी तो हलकंफुलकं बोलू लागला.

पण तिनं बोलताना अक्षरशः बॉम्बगोळाच टाकला. त्यावेळी त्याला वाटलं होतं, आपल्या मनात जे अस्फुट वाटत होतं हे केवळ कल्पनारंजन होतं.... तिच्यासाठी आपण केवळ गुरू - टीचर व फार तर जवळचे मित्र आहोत. बस.

बेबीनं किमान आजचा दिवस व कॅंडललाईट डिनरची ही सुखद संध्याकाळ नासवायला नको होती. आपण त्यासाठी मनाला थोपवलं होतं. पण...

"सर, एक तुम्हाला सांगू की नको, कळत नाही, पण मन अस्वस्थ झालंय म्हणून सांगते." बेबीच्या त्या प्रस्तावनेत गुरूला एक अनिष्ट संकेत जाणवला. त्यामुळे तो म्हणाला, "नको बेबी, आज नको, पुन्हा कधी."

"प्लीज सर, मला बेचैन होतंय आणि ही बेचैनी कशाची हेही कळत नाहीये. रात्रभर मी झोपू नाही शकणार, म्हणून 'प्लीज' सर."

"तसं असल तर ओके." खांदे उडवीत तो म्हणाला, "तुला आज पुरेशी झोप मिळणं आवश्यक आहे. कारण उद्या फोर बाय फोरची चारशे मीटर्सची रिले दौड आहे. इतर तिघींचा सध्याचा रनिंग टाईम आणि तू आज शंभर मीटरमध्ये नोंदवलेली वेळ पाहता महाराष्ट्राला आणखी एक गोल्ड मेडल मिळणं सहज शक्य आहे. आजच्यापेक्षा एक सेकंद कमी वेग राहिला तरी चालेल. पण नको बेबी. तुला आजचा वेग कायम राखला पाहिजे, नव्हे, वाढवला पाहिजे. आणखी दोन महिन्यांनी ऑलिम्पिक पात्रतेसाठी चाचणी स्पर्धा होईल.... तेव्हा एक ते दीड सेकंद वेळ वाढवली पाहिजे. तर तुला ऑलिम्पिकच्या अंतिम आठ स्पर्धकांत स्थान जरूर मिळेल. पी. टी. उषानंतर तूच हे स्थान मिळवणारी दुसरी भारतीय महिला ठरशील. पण तुला तिच्यापुढं गेलं पाहिजे, पदक मिळवलं पाहिजे."

"पुरे, पुरे सर." बेबी म्हणाली, "तुम्ही फार मोठी स्वप्नं पाहता. मला, मला भीती वाटते सर. आणि प्रश्न पडतो सर की, मी ती पुरी करण्याइतपत सक्षम आहे का?"

"एस, डेफिनेटली बेबी. यू आर माय फाइण्ड ॲण्ड क्रिएशन. हे मी नाही, तूच नेहमी म्हणतेस ना? मनापासून? खरंखुरं?"

"होय सर."

"मग माझा माझ्या क्रिएशन्सच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे. यू कॅन विन, नो, यू विल बिन."

"ओ.के. ओ. के. सर आय प्रॉमिस यू...."

तिनं त्याच्या हातावर आपले हात ठेवीत म्हटलं... पण त्यात नेहमीचा जोश आणि आश्वासकता नव्हती. ती म्हणाली, "घरी साताऱ्याला फोन केला आई बाबांना. तेव्हा त्यांनी माझ्या यशाबद्दल अभिनंदन करताना त्यांच्या मते एक आनंदाची बातमी दिली...."

"अच्छा... मी पण त्या आनंदात सामील होईन की."

"सर, आय ॲम कन्फ्युज्ड.... माझ्या मनाचा गोंधळ उडालाय. मला हे हवं होतं की नाही कळत नाहीये. आज काहीतरी वेगळंच होतंय.." बेबी म्हणाली, "पण तुम्हाला सांगितल्यानंतर मन तरी शांत होईल. म्हणून..."

"शुअर, बोल ना!"

"तुम्ही तर जाणता सर की, आमच्या समाजात तशी लवकरच लग्नं होतात अगदी अल्पवयीन नाही, तरी अठरा वर्षं संपता संपता तरी केली जातातच. त्यामानानं चोवीस वर्षांची मी घोडनवरीच म्हणायला हवी..."

गुरूच्या काळजाचा एक ठोका निसटला. त्याला कळेना असं का व्हावं?

"पंधरा दिवसांपूर्वी माझा दाखवण्याचा कार्यक्रम झाला. तिकडून पसंती आली आहे."

"तुला ते पसंत आहे?"

"मला आई-बाबांनी विचारलंच कुठं? त्यांनी त्यांना संमती देऊन टाकली आहे. मी परतताच हळदीचा कार्यक्रम आहे. आय मीन, साखरपुड्याचा." बेबीचा स्वर कापत होता, "तुम्ही याल सर त्यासाठी?"

"छट, कदापि नाही." ताडकन तो म्हणाला आणि स्वत:शीच मनोमन तो शरमला. आपली ही टोकाची तीव्र नकाराची प्रतिक्रिया का? त्याला प्रश्न पडला होता. याक्षणी तरी त्याच्याकडं त्याचं उत्तर नव्हतं, पण कसाबसा स्वत:ला सावरत म्हणाला.

"त्याचं असं आहे बेबी, तुझ्या घरच्यांना ते रुचेल काय? पुन्हा मी पडतो बी. सी., दलित..."

"तुम्ही माझे गुरू आहात. इथं जातीचा प्रश्न कुठं येतो?" बेबी भावुक भाबडेपणानं म्हणाली. "केवळ गुरूच नाही तर फ्रेंड, फिलॉसॉफर व गाईड आहात. त्याहून जादा अधिक जवळचे आहात. ते कसं? सांगता येत नाही, पण मी मनापासून सांगते सर."

तिचा सूर कमालीचा प्रांजळ होता. त्यातली सच्चाई व आर्तता त्याला जाणवत होती...

"बेबी, मलाही असंच काहीसं वाटतं.. तू - तू माझ्यासाठी 'स्पेशल' आहेस. तुझा धावण्याचा सराव घेताना मीही तुझ्या सुसाट वेगाशी स्पर्धा करू पाहायचो अन् त्यात आनंद मिळायचा... तुझ्या समवेत धावताना मन हलकं, तरल असायचं. मी कधी विचार केला नाही. मनाचे व्यवहार खरंच कळत नाहीत. त्यामुळं तुझ्याबद्दल वेगळं, काहीतरी खास सच्चं वाटतं. त्याचा अर्थ आजही उमगत नाही. पण, पण कुठंतरी तुझा विवाह ठरल्याचं ऐकून धक्का का बसला?"

"सर, लग्नाला आणि दाखवून घ्यायला माझी ना नव्हती हे खरं, पण एवढ्या लवकर... हे सारं काही... मला कळत नाही, यामुळं मी खूश आहे की नाही?"

"का? तो तुला पसंत नाही?"

"तसं काही नाही. त्याचं खानदानी घरणं आहे. दिसायला तसा तो नक्कीच स्मार्ट आहे. हॉटेलचा व्यवसाय आहे. पण, पण मला तो अपरिचित आहे... मला भीती वाटते.."

"कसली?"

"ते सांगता येत नाही, पण का कोण जाणे, माझ्या मनाला कसले संकेत मिळतात की, मला नाही कळत मला काय वाटलं ते..." बेबी म्हणाली. "मला आज जागून डायरी लिहिली पाहिजे. स्वत:ला शोधण्यासाठी."

"पण बेबी, जास्त जागरणं नकोत. उद्याच्या रिले स्पर्धेत तुला आजचा बहारदार परफॉर्मन्स रिपीट केला पाहिजे."

"तुम्ही माझ्यावर नाराज नाहीत ना?"

"कशाला मी नाराज होईन?" गुरू स्वत:च्या मनाला आवरीत चंद्रबळ आणीत, मुद्रा हसरी करीत म्हणाला, "पण त्यासाठी एक प्रॉमिस हवं. उद्या सुवर्णपदक मिळायला हवं!"

"डन सर. मी उद्याही सर्वोत्कृष्ट परफॉर्मन्स देईन."

.....व्यंकट त्याच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाला, "सर, मी तुमची अवस्था समजू शकतो. आज पोस्टमार्टम होईल. त्यामुळं उद्या अंत्यसंस्कार होतील.. तोवर विचार करा. वैनीची अंतिम इच्छा पूर्ण व्हायला हवी. मी तुम्हाला हमी देतो. फक्त तुम्ही हो म्हणायचं आहे."

"लेट मी थिंक. अजून मी धक्क्यातून सावरलो नाहीये व्यंकट," गुरू म्हणाला. "बेबी आता आपल्यात नाही यावर अजूनही विश्वास बसत नाही आणि तू अंत्यसंस्काराची बात करतो आहेत... संध्याकाळी माझ्याकडं ये. मग आपण बघू काय करायचं ते..."

"ओके सर", व्यंकट म्हणाला. आपल्या खांद्यावर लटकलेल्या बॅकेतून त्यानं एक डायरी काढली. ती त्याला देत म्हणाला, "सर, ही बेबी वैनीची डायरी आहे. ती मला तिच्या बेडखाली मिळाली. त्यात तुमचा फोटो होता... म्हणून तुम्हांला ती देतोय..."

"व्यंकट... तू-तू... मला-मला..."

"नाही सर. मी कसलीही गैरसमजूत करून घेत नाहीय..." व्यंकट किती समंजस व सुजाण बोलत होता. आश्वासकही.

"मीही तुम्हांला मानतो. माझ्यासाठी पण तुम्ही आजही गुरू आहात. मी मात्र तुमचं शिष्यत्व निभावू शकलो नाही. तुमच्या माझ्याकडून फार अपेक्षा होत्या; पण... खैर. जाऊ द्या ते. ही डायरी घ्या सर..."

घरी आला तरी गुरू सुन्न. मन बधिरलेलं. समोर टीपॉयवर डायरी पडलीय. ती उघडून पाहायचा, वाचायचा धीर होत नाहीये. अस्वस्थतेला वाट मिळावी म्हणून एकामागून एक सिगारेटी ओढतोय फसाफसा. छाती धुरकटलीय. नाका-तोंडात धुराचा दर्प दाटलाय. पण अस्वस्थता कमी व्हायचं नाव घेत नाहीय. "माफ कर बेबी." त्याचं स्वत:शीच पुटपुटणं. "तुझ्यापुढं मी सिग्रेटा लिमिटमध्ये ओढायचो. तुला मला धाक

होता. आता तूच नाहीस तर... तर...''

आपलं आणि बेबीचं गुरू-शिष्येपेक्षा अधिक खोल नातं होतं. ते न कळताच संपलं. आपण त्यावर कधी विचार केला नाही. पण बेबी डायरी लिहायची हे आपल्याला माहिती होतं.

*''डायरीलेखन हा माझा स्वत:ला जाणायचा प्रयत्न असतो तर... प्रत्येक वेळी तो सफल होतोच असं नाही; पण मी तो प्रयास करते... ही-ही माझ्यासाठी एक प्रकारची मनोक्रीडा आहे. जशी मी सुसाट पळते. तसंच माझं मनही वायुवेगानं पळतं. फक्त त्याला दिशा नसते. लक्ष्य नसतं. विनिंगपोस्ट नसतं, जिथं थांबायचं असतं. त्यामुळं मन सतत पळतं. 'अचपळ मन माझे नावरे आवरिता' शाळेत असताना रामदासांची करुणाष्टके मी पाठ केली होती. पाठांतर स्पर्धेसाठी. त्यातली ही एक ओळ आहे. मला सार्थ लागू होणारी. या माझ्या अचानक अचपळ मनाचा शोध घेण्यासाठी हे डायरी लेखन!''*

गुरू पुढं झुकत डायरी हाती घेतो. आणि मधलंच कुठलं तरी पान उघडतो. तिथं त्यांचा कर्नालचा त्या परदेशी तरुणीनं घेतलेला फोटो असतो. तो पाहताच तो पुन्हा अनावर होतो. काही वेळानं स्वत:ला सावरत तो मजकूर पुढं वाचू लागतो.

*''गुरू... डायरीत मी तुम्हांला कधीच 'सर' संबोधलं नाहीय. कारण मला माहित नाही! जुन्या जमान्यातला गुरुदत्त मला मनस्वी आवडतो. तुमचं तेच नाव मला म्हणूनच प्रिय आहे. आजचा दिवस माझ्यासाठी अनेक अर्थानं अविस्मरणीय आहे. शंभर मीटर धावण्यातला नवा राष्ट्रीय विक्रम नोंदवीत सुवर्णपदक पटकावणं हा निखळ आनंदाचा क्षण. हे पदक मी तुमच्या चरणी अर्पण केलंय. ही धावपटू बेबी राणे तुमची निर्मिती आहे... मी नाही, तुम्ही जिंकलात सर!*

*पण तुमच्या नव्या-नव्या, पहिल्यापेक्षा मोठ्या स्वप्नांनी मला आजवर नेहमीच मोह घातला आहे. नव्हे, तुमच्या स्वप्नपूर्तीचं मी मला साधन समजते; पण तुमचं आजचं माझ्याबद्दलचं ऑलिम्पिकचं स्वप्न- मला प्रथमच भीती वाटली सर. मी-मी कदाचित पुरं नाही करू शकणार. प्रथमच मी साशंक आहे. थोडीशी भयभीतीही...*

*माझं लग्न ठरलंय. ते होणारच. मला ते टाळता येणं शक्य नाही; पण त्याचा आनंद का वाटत नाहीये? मनात कसलं तुफान उठलंय? कळत नाहीय.*

*समोर आजचा एक उत्कट क्षण साकारणारा त्या विदेशी तरुणीनं टिपलेला फोटो आहे. त्या फोटोतले मी माझे भाव वाचायचा प्रयत्न करीत आहे.*

*मी-मी तुम्हाला नकळत आवेगानं मिठी घातली. तुमचे वाहणारे अश्रू ओठांनी टिपले. ती उत्स्फूर्त कृती होती. पण फार खरी व निर्मळ होती. मला त्याचा कधीही पश्चात्ताप होणार नाही. काही झालं तरी हा फोटो मी जपून ठेवणार. डायरीत तो खुणेसाठी वापरणार...''*

गुरूनं त्या फोटोवर ओठ टेकवले... तिनं त्यावेळी जसे त्याच्या डोळ्यांवर अश्रूकण टिपण्यासाठी टेकवले होते. 'जो बात तुझ में है, तेरी तसबीर में नहीं.' हेच खरं, आपण तिला शेकहॅण्डखेरीज कधीच स्पर्श केला नाही. त्यावेळी तिनं मिठी घातली तोच एकमात्र स्पर्श. त्यावेळीही आपण संकोचानं तिच्या पाठीवर हात फिरवत असल्यामुळं तिच्या स्पर्शाची शरीराला सोडा, मनालाही पूर्ण जाणीव झाली नाही. त्याक्षणी आपल्याला आपलं दलितपण का आठवत होतं? आपण का आक्रसत होतो? या प्रश्नांपासून आपली सुटका व्हावी म्हणून त्यानं डायरीचं पहिलं पान उघडलं. त्यावर शीर्षक होतं. 'आज मला गुरू भेटला!'

*"आज मला गुरू भेटला! बाजारात अचानक पाठीमागून कुणीतरी आलं आणि हातातली पर्स हिसकावून घेतली. क्षणात जाणीव झाली की, तो चोर आहे. मी त्याचा पाठलाग करू लागले, पण वाटेत गुरूंना, तेव्हा ते अजनबी होते, धडकले. त्यांना पळणाऱ्या चोराकडं बोट दाखवत म्हटलं. 'त्याला पकडा.' ते म्हणाले, 'तुला चांगलं पळता येतं. पळ, मीही सोबत आहे. तूच त्याला पकडायचं. तुझा वेग कमी पडला तर मी त्याला पकडेन. आय ॲम रनर.' मला कसली तरी अनामिक स्फूर्ती चढली. मी सुसाट पळत त्या चोराचा पाठलाग करू लागले. गुरूही माझ्या बरोबरीनं पळत होते. आणि म्हणत होते 'रन बेबी रन!' पण माझी ताकद संपुष्टात येत होती. वेग कमी होत होता. तेव्हा त्यांनी धावून पुढं जात त्या चोराला पकडलं आणि माझी पर्स मिळवली. तोवर मी तिथं पोहोचले होते. त्यांनी चोराला दोन लाथा देत म्हटलं, 'मघाशी जेवढ्या वेगानं पळालास, त्याहून जादा वेगानं पळत इथून सुटायचं, नाही तर पोलिसांत देईन तुला..."*

*कुल्ल्याला पाय लावत तो भेकड पळून गेला.*

*मी गुरूंचे आभार मानले. तेव्हा ते म्हणाले, "नुसत्या आभारानं काम नाही चालणार. बक्षीस हवं."*

*मी म्हणाले, "मी गरीब आहे हो. पर्समध्ये जेमतेम शंभर रुपये असतील; पण तेही मला फार आहेत."*

*"वेडे, मला असं बक्षीस नकोय," ते म्हणाले. मी न समजून विचारलं, "मग काय देऊ तुम्हाला?"*

*"मला तू हवी आहेस - शिष्या म्हणून. तू छान पळतेस. तुझ्यामध्ये विजेच्या धावपटूची क्षमता आहे. तुझी पावलं लांबसडक आहेत आणि स्प्रिंटही छान पडतात. यू आर नॅचरल रनर."*

*"खरंच सर. लहानपणापासून मला पळायला आवडतं." मी म्हणाले, "खरंच मी छानपैकी रनर होईन?"*

*"ऑफकोर्स; पण त्यासाठी तुला खूप मेहनत करावी लागेल. आणि स्वतःला*

*या गुरूच्या हवाली करावं लागेल. तुझ्यापासून मी किमान राष्ट्रीय पदक मिळणारी धावपटू निर्माण करेन.''*

*''आज मला माझा गुरू भेटला होता आणि त्याच्या हाती मला सोपविण्याचा निश्चय केला होता.''*

त्यांच्या पहिल्या भेटींचा प्रसंग त्याच्या मनात डायरी वाचताना जागृत झाला होता. गुरूनं आणखी एक मधलं पान उघडलं.

*''मला कळत नाही, गुरू माझ्याकडं असं का पाहतात? सराव झाल्यावर दम खाण्यासाठी मी स्टेडियमच्या प्रेक्षक गॅलरीत वर जाऊन बसते. ताजी हवा मिळते म्हणून. तेव्हा माझ्यामागं गुरू पळत येतात. माझ्या हाती टॉवेल देतात घाम पुसण्यासाठी व थंड पाण्याची बॉटल...*

*पळून तापलेलं व भात्याप्रमाणे फुसफुसणारं शरीर शांत होण्यासाठी मी वारा घेत बसून असते. आणि गुरू माझ्याकडं अधूनमधून अनिमिष नेत्रानं पाहत असतात.... वाऱ्यानं भुरभुरणारे केस आवरीत मी जेव्हा त्यांना पाहते, ते नजर चुकवतात.*

*या खेळाची मला गंमत वाटते. मनात काहीतरी उष्णगोड वाटतं. काय ते कळत नाही.''*

पुन्हा एकदा गुरू तो फोटो पाहतो. हा तिचा चेहरा एका अस्सल स्त्रीचा आहे, जी एकाच वेळी माता, कन्या, सहचरी व सखी सारं - सारं काही आहे. पुरुष तत्त्वाला आपलंसं करणारी प्रकृती. सखी.... मनात काहीतरी झणझणतं - सखी.

आणि काय नवल! गुरू पुन्हा मधलं एक पान उघडून वाचतो.

*''गुरू, तुम्ही माझे कोण आहात?*

*टीचर, कोच या अर्थानं गुरू तर आहातच, पण त्याहून माझे चांगले मित्र आहात. मित्रापुढं माणसाला मोकळं, दिलखुलास वाटतं. सारखं चिवचिवत राहावसं वाटतं. अगदी साधी, निरर्थक बाबही सांगावीशी वाटते. मला तुमच्या सहवासात तसं वाटलं. म्हणून तुम्ही माझे सच्चे व एकमेव मित्र आहात! आणि गाईडही. मला मार्गदर्शन करणारे.*

*फिलॉसॉफर! नक्कीच. कारण मला माझ्या जीवनाचं सार्थक कशात आहे. हे पटवून दिलंय. तुमच्यामुळं माझ्या जीवनाचं मी तत्त्वज्ञान बनवलं. वेग आणि धावणं हा माझ्या जीवनाचा मूलमंत्र बनला. त्यासाठी साधना. शरीराला व्यायाम, आहार व नियमित जीवनशैली - त्यासाठी हरेक क्षण सजग ठेवणं. वेग हा माझा धर्म आणि पळणं हे माझं कर्मकांड चांगल्या अर्थानं बनलं. सो यू आर माय फिलॉसॉफर.*

*पण याहून तुम्ही माझ्यासाठी जादा काही आहात! आपलं हे नातं सुप्त मनाला जाणवलं, पण त्याला नाव काय द्यायचं? हा मला पडलेला प्रश्न होता, पण अचानक त्याला नाव सापडलं, पण त्याचा अर्थ अद्याप अस्पष्ट आहे. मात्र त्या अपूर्णतेही 'गोडी'*

*आहे. 'गोडी अपूर्णतेची लावी जिवास वेड' हेच खरं.*

*मला जुने सिनेमा आवडतात. टीव्हीवर आजच अमिताभ-राखीचा सिनेमा पाहिला. 'बेमिसाल'. त्यात अमिताभ राखीला 'सखी' म्हणतो. या नात्याचा अर्थ सांगताना तिचा बाप ए. के. हनगल म्हणतो. 'महाभारतात श्रीकृष्ण द्रौपदीला सखी म्हणायचा आणि ती त्याला सखा.''*

*गुरू, तुम्ही माझे सखा आहात, पण, पण मी तुम्हाला हे कधीच सांगणार नाही. आपला समाज ते समजणार नाही, पण एक विचारावंसं वाटतं. 'तुम्हाला मी कधी सखी वाटेन का हो?'*

पुन्हा गुरूचे डोळे झरू लागतात. ''बेबी, सखी... होय, होय आज मी तुला सखी म्हणतोय. पण ते ऐकायला तू कुठं आहेस? मला समजायला फार उशीर झाला गं!''

डायरीचं आणखी एक पान.

*''उद्या माझा बालाजीशी विवाह होणार. मन बेचैन आहे. मला तो समजून घेईल का? माझ्या व गुरूच्या नात्याला? आणि माझं धावपटूचं करिअर... तो मला साथ देईल? मला गुरूचं ऑलिम्पिकचं स्वप्न साकार करायचं आहे; पण त्यामध्ये माझा विवाह आड नाही येणार? अंजू बॉबी जॉर्जचा नवराच तिचा गुरू, कोच आहे. इथं माझा नवरा मला समजून घेईल? प्रोत्साहन व साथ देईल? तो तसं म्हणतोय खरा, पण त्याचा स्वर सच्चा का वाटत नाही? त्यावर विश्वास का बसत नाही? आणि मुख्य म्हणजे त्याची नजर मला आश्वस्त करणारी का वाटत नाही?*

*प्रश्न, नुसते प्रश्न.*

*माझा हा मूक संवाद आहे तुमच्याशी गुरू''*

*''गुरू, आज ज्याची भीती वाटत होती तेच घडलं. माझी डायरी नवऱ्याच्या हाती पडली. त्यात आपला तो कर्नालचा फोटो होता. बालाजी भडकला आणि मला चक्क व्यभिचारी ठरवीत त्यानं 'छिनाल', 'रांड' अशा शिव्या दिल्या. मारहाणही केली. मी ती सहन केली. का? कळत नाही. भारतीय स्त्री नेहमीच अशी दुबळी असते का हो? नवऱ्यापुढं पड खाणारी? पण जेव्हा त्यानं तुम्हाला नावं ठेवायला सुरुवात केली, मी न राहवून त्याला स्पष्ट सुनावलं,*

*''तुम्ही मला नाही नाही ते बोललात. मारहाण केलीत. मी सहन केलं. तुमची लग्नाची बायको म्हणून. पण गुरूबद्दल काही बोलू नका. मी ते ऐकून घेणार नाही.''*

*''कसं ऐकशील याराबद्दल? छिनाल, रांड साली.'' पुन्हा त्याच गलिच्छ शिव्यांची बरसात.*

*''मी शिंदळकी नाही केली हो.'' मी कळवळून म्हणाले.*

*''खंडोबाची शप्पथ घेऊन सांगते, मी तुमच्याशी एकनिष्ठ आहे. आणि गुरू हे*

माझे कोच आणि फ्रेंड, फिलॉसॉफर व गाईड आहेत. महाभारतात द्रौपदीचा श्रीकृष्ण जसा सखा होता, तसा सखा. आमचं नातं असेल तर मानसिक आहे.''

पण आपल्या गावापलीकडं जग नसलेल्या त्या बालाजीला हे कळण्यापलीकडचं होतं. उगीच मी हे बोलून गेले सर. त्याच्या व माझ्यात केवढं अंतर आहे. सर्वच बाबतीत. किती व कशी जुळवून घेऊ? फार त्रास होणार आहे. खूप कठीण जाणार आहे; पण लग्नगाठ पडली आहे. तर निभावली पाहिजे.

माझ्यात तेवढं बळ, तेवढी सोशीकता आहे? वेलींसारखी? आय डाऊट.''

पण.... म्हणूनच बालाजीनं आपण तिला भेटायला गेलो असताना तमाशा केला होता. बेबीशी चार शब्द बोलताही आले नाहीत. तिचा केविलवाणा चेहरा मनात रुतून बसला होता. तिची, तिची व आपली शेवटची भेट... तो विदीर्ण चेहरा इंगळ्याप्रमाणे डसतो. आपण तरी अशा परिस्थितीत काय करू शकत होतो?

''गुरू, मला खरंच सहन नाही होत हो. हा माझा नवरा आहे की माझ्या मुलीच्या जिवावर उठलेला सैतान? मला धमकावतोय, ऑर्डर देतोय.. उद्यापरवा दवाखान्यात जाऊन गर्भपात करून घ्यायचा. कारण? पोटात वाढणारा गर्भ मुलीचा आहे....

आणि त्यानं मला लग्नाच्या वेळी दिलेलं वचन खोटं होतं, त्याला माझ्या ॲथलेटिक्समधल्या करिअरची तिळमात्रही फिकीर नव्हती. पुढील महिन्यात ऑलिम्पिक पात्रता फेरीसाठी चाचणी स्पर्धेमध्ये माझी भारतीय संघात निवड होण्याचा चान्स होता. ही माझ्यासाठी केवढी मोठी अचिव्हमेंट ठरली असती..... पण बालाजी नवरा होता. खराखुरा. त्याला बायकोची कीर्ती व पराक्रम खुपत होता.

लग्नाच्या पहिल्या रात्रीचं त्यानं सांगितलं होतं, 'आता संसार पहिला महत्त्वाचा. आमचं खटलं (आमच्याकडं बायकोला खटलं म्हटलं जातं सर) आमच्या घरात राहावं. बाहेर मिरवून खानदानांच्या अब्रूची वाट लावू नये.' मी त्यावेळी फारसं मनावर घेतलं नाही.

आगामी क्रीडास्पर्धेच्या दृष्टीनं शरीरसंबंधातून गर्भधारणा तूर्त होऊ नये म्हणून मी त्याला कंडोम वापरायचा आग्रह धरला; पण त्याच्या विकृतपणाचा नमुना पाहा. तो म्हणाला.

''मी काही छिनाल नाही. कुण्या वेश्येकडं गेलो नाही. मला कंडोम वापरायला सांगतेस? तुला एड्स नाही होणार.''

''पण धनी, मी काय म्हणते...''

''काही बोलू नकोस, कंडोमनं मला मजा नाही वाटणार.''

तेव्हा मी ओरल पिल्स घ्यायला सुरुवात केली. त्याला त्याचा सुगावा लागताच त्या गोळ्याचं पाकीट फेकून दिलं व मला शेजेवर फेकीत म्हणाला.

''मला बाप व्हायचंय. आज मी तुला सोडणार नाही. साली.''

*"सर, विवाहितेवरही आपल्याच नवऱ्याकडून बलात्कार होतो.*

*याची त्या रात्री जाणीव झाली. माझ्या वाट्याला हे भोग का यावेत?*

*तो खरंच पराक्रमी होता. त्या रात्रीच्या बलात्कारी संबंधातून मला दिवस राहिले. हा त्याच्यासाठी त्याच्या तथाकथित पौरुषाचा विजयाचा क्षण होता.*

*काही दिवस तो माझ्याशी बऱ्यापैकी वागत होता, पण मी अस्वस्थ होते. माझी बरबाद होणारी क्रीडा कारकिर्द दिसत होती. मी केवळ त्याच्यावरच नव्हे तर स्वत:वर आणि पूर्ण जगावरही वैतागले होते. माझा हा वैताग वांझोटा आहे. हे कळत होतं, पण तो जात नव्हता.*

*एक दिवस मला तो दवाखान्यात घेऊन गेला. माझ्या नकाराला न जुमानता सोनोग्राफी करावयास लावली. गर्भाचं लिंग कळावं म्हणून. ते जेव्हा कळलं आणि मला मुलगी होणार असं डॉक्टरांनी सांगितलं, तो म्हणाला, "डॉक्टर उद्या - परवा आम्ही येतो. गर्भपात करायचा, आम्हाला पहिली बेटी नको."*

*मध्यरात्र झालीय. माझा नवरा ढाराढूर झोपलाय. आणि मी डायरी लिहिते आहे. अस्वस्थ मनाच्या उद्रेकाला वाट करून देण्यासाठी. मी-मी काय करू? माझ्या होणाऱ्या गर्भाला स्त्रीलिंग आहे म्हणून ॲबॉर्शननं खुडून टाकू? हा - हा माझ्या स्त्रीत्वचा अपमान आहे; पण मला ते रोखता येईल? माझा नवरा मानेल?"*

वाचताना गुरू क्षणाक्षणाला धुमसत होता. हादरत होता. ओ माय गॉड, बेबी, खरंच तुझा नवरा सैतान आहे गं.... मला - मला हे आधी कळलं असतं तर मी त्याचा खून केला असता.... होय. तू मला हे कधी फोननं किंवा पत्रानं का नाही सांगितलं बेबी? एवढा का मी परका होतो?

डायरीची पुढील पानं वाचायला धीर होत नव्हता. तरीही गुरू हिंमत करून वाचू लागला.

*मला माझा गर्भपात रोखता आला नाही. काही काळ मी सुन्न होते. पण त्यातून स्वत:ला सावरून फिटनेससाठी व्यायाम सुरू केला. बालाजी सकाळी उशिरा उठायचा. तोवर मी रनिंग करून यायची. पण माझ्या सासूला कुठं हे मान्य होतं? तिनं बालाजीचे कान भरले. पुन्हा मारहाण आणि सक्त ताकीद की, 'खेळ - क्रीडा सारं बंद. आता संसार करायचा फक्त." मी कळवळून म्हणाले. "फार नाही, वर्ष दोन वर्षांचा प्रश्न आहे. एवढी एक स्पर्धा होऊ दे, मग मी सारं सोडून देईन. जरा विचार करा, माझी ऑलिम्पिकसाठी भारतीय संघात निवड झाली तर किती नाव होईल. आपण दोघंही सिडनीला जाऊ. तो देश पाहता येईल."*

*"पुरे ही थेरं. तुझ्यामुळं मी ओळखला जावा तुझा नवरा म्हणून हे मला जमणार नाही. बायको म्हणजे नवऱ्याच्या पायातली वहाण. ती पायातच हवी. मी डोक्यावर घेऊन मिरवणार नाही. समजलं?"*

*"प्लीज, एवढं माझं ऐका, हे केवळ माझं नाही तर माझ्या गुरूंचंही स्वप्न आहे."*

*"खबरदार, त्या याराचं नाव काढलंस तर..."*

*ते दिवस माझ्यासाठी काळेकुट्ट होते सर. माझं करिअर संपलं होतं. तुमचं माझ्याबाबत पाहिलेलं व मला जे साकार करायचं होतं, ते स्वप्न भंगलं होतं! माझ्यासाठी प्रत्येक रात्र पाशवी बलात्काराची होती. 'तुला पुन्हा गर्भार केली पाहिजे. तरच तू घरात गुंतून राहशील.'*

*चार पाच महिने मी नवऱ्याचा हा सैतानी छळ सहन करीत होते. मला त्या काळात दिवस गेले नाहीत. म्हणून बालाजीनं माझी डॉक्टरी तपासणी करून घेतली. गर्भपाताच्या वेळी गंभीर इजा झाली होती. म्हणून माझं युटेरस तेव्हा डॉक्टरांनी काढलं होतं. मी कधीच आई होऊ शकणार नव्हते.*

*एकाच वेळी त्याचा विषाद वाटत होता आणि हायसंही. सैतानाचा गर्भ तसाच पुढं सैतान निपजला तर?*

*त्याचा छळ वाढत होता. सासू म्हणत होती, "तिला टाकून दे.. किंवा फारच दया वाटत असेल तर दुसरा घरोबा कर. ती राहील मोलकरणीसारखी घरचं काम करायला...."*

*माझं कसं व्हायचं सर? मी - मी काय करू?"*

डायरीचं शेवटचं पान त्रोटक होतं.

*माझ्या सहनशीलतेचा कडेलोट झालाय सर. मला आता सहन होत नाहीय. कितीदा तरी वाटलं. सारे बंध तोडून तुमच्याकडं यावं. तुम्ही मला नाही म्हणणार नाहीत, याचा विश्वास आहे.*

*आज जाणवतंय गुरू की, मी खरंच तुमची होते. माझ्या मनात तुम्हीच होतात. हे - हे प्रेमच होतं, पण किती वेडी मी, मला आज जीवनाच्या अशा टप्प्यावर समजतंय, जिथून पुढं वा मागं जाण्याचा रस्ताच नाहीय.*

*मला माहितये, आजचं डायरीलेखन हे शेवटचं आहे. म्हणून इथं मी कबूल करते. माझ्या लग्न - संसाराच्या मर्यादा सोडून कन्फेस करते - आय लव्ह यू गुरू - तुम्ही मला हवे आहात. या जन्मी शक्य नाही. निदान पुढच्या जन्मी तरी माझे व्हाल ना? पुनर्जन्म असेल तर मला तो खरंच हवा आहे. तुमच्यासाठी. माझ्यासाठी. आपल्या दोघांच्या सहजीवनासाठी आणि रनिंगसाठी. आय लव्ह यू सो मच.*

*गुडबाय.*

त्या संध्याकाळी व्यंकट गुरूला भेटायला आला होता. तेव्हा तो शांतपणे म्हणाला. "नाही व्यंकट, मला तमाशा करायचा नाही, बेबीची विटंबना, बदनामी नकोय. त्या नालायकाला करू दे तिचा अंतिम संस्कार."

"पण सर?"

"ही डायरी तिचा आत्मा होता. मन होतं. ते माझ्याजवळ आहे. त्याला भडाग्नी देऊ या."

गुरूनं डायरीचं एकेक पान फाडून लायटरनं पेटवत जाळायला सुरू केलं. व्यंकट अवाक होऊन पाहत राहिला.

गुरू केवळ शेवटचं पान व फोटो जाळणार नव्हता. तो त्याच्यासाठी उर्वरित आयुष्य जगण्यासाठी बळ देणारा अमोल ठेवा होता. विशेषत: तिच्या भावभिन्या मिठीची याद देणारा फोटो. आणि डायरीच्या शेवटच्या पानातली तिची प्रेमाची कबुली. *"मला पुनर्जन्म हवा आहे. तुमच्यासाठी, माझ्यासाठी. आपल्या सहजीवनासाठी, कारण आय लव्ह यू सो मच!"*

०-०-०

# १०. 'लाईफ' 'टाईम'चा 'फॉर्च्यून'

"तुमची बेल झाली आहे. चला, ऑफिसला चला!"

केवळ दोन दिवस व तीन रात्रीची पोलीस कस्टडी, पण हा काळ किती प्रदीर्घ वाटत होता! जणू तो थबकलाय. पुढे सरकत नाहीय. मन दाट निराशेनं भरून गेलेलं. अख्ख्या जगाला आपल्याशी काही देणं-घेणं नाही. बेकारीचा शाप काय असतो हे लख्खपणे जाणवतंय. त्या व्हाईट कॉलर तरुणांच्या भवितव्याशी खेळू पाहणाऱ्या नराधमाच्या तोंडाला काळं फसलंय. त्याचा तो तुपकट, गलेलठ्ठ व पैशानं माजलेला चेहरा साबणानं धुऊन एव्हाना पूर्ववत झालाही असेल, पण आपल्या मनात साचलेल्या काळोखाचं काय? तीन रात्रीच्या पोलीस कस्टडीत विविध गुन्ह्यांखाली कैद करून आणलेल्या समाजाच्या विविध स्तरातील गुन्हेगारांच्या संगतीत तो अधिकच दाट झालाय!

सिद्धार्थ बोलत होता आणि नामदेव चूप होता. तीन रात्री व दोन दिवस. फक्त अधून मधून दोस्ताला बरं वाटावं म्हणून तो प्रतिसाद देत होता, पण त्याची अशब्द व अव्यक्त व्यथादेखील तीच होती.

आपण बेकार आहोत. अगदी ठार बेकार! नोकरी मिळत नाही म्हणून बेकार तर खरेच, पण जगायलाही बेकार आहोत.

या जेलनं ती भावना अधोरेखित झालीय. मुद्रांकित, अधिक गडद.

दोघांनी मनोमन ठरवलेलं आहे की, आपण जामिनासाठी प्रयत्न नाही करायचा. त्यासाठी कुणाशीही संपर्क साधायचा नाही. बाहेर येऊन तरी काय करणार आहोत आपण या दुनियेत? आजवर एक स्वप्न होतं - उत्तम करिअरचं. उज्ज्वल भवितव्याचं. आपल्याला अंमलदार व्हायचं होतं. सनदी अधिकारी. आता ते चकनाचूर झालं आहे. आता कदाचित.... कदाचित काय, नक्कीच कधीही ते साकार होणार नाही. कारण आपल्या नावावर आता गुन्ह्याची नोंद आहे. सरकारी नोकरीत नियुक्तीच्या वेळी निष्कलंक जीवनाचा, कोणताही गुन्हा दाखल नसण्याचा दाखला लागतो. आपल्याला या जेलमुळे यापुढे तो कसा मिळेल?

सालं जगणंही आता ओझं वाटतंय! कोठडीतल्या नि:सत्त्व अन्नानं शरीर खंगल्यासारखं वाटतंय. पण त्याच्या कितीतरी अधिक पटीनं मन खंगलंय. खचलंय. एक प्रकारची बधीरता येत चाललीय.

म्हटलं तर हे सिद्धार्थचं स्वगत होतं. स्वत:शीच पुटपुटणं होतं. म्हटलं तर नामदेवाला उद्देशून केलेलं मनाच्या घालमेलीचं प्रगटीकरण होतं.

हा त्याच्या, माझ्या, आपल्या आजच्या अख्ख्या पिढीचा, एम. पी. एस. सी. च्या माध्यमातून चांगलं करिअर करू पाहणाऱ्या काही लाख तरुणांच्या अस्वस्थतेचा, वैतागाचा आणि संतापाचा तो उत्स्फूर्त व आक्रमक उद्रेक होता. ज्वालामुखीच्या उकळत्या रसासारखा तप्त!

सिद्धार्थ बोलूनचालून भाषाप्रभू, किंचित कवी. मराठी साहित्याचा एन्सायक्लोपिडिया म्हणावा एवढा भाषातज्ज्ञ. नामदेव अर्थशास्त्रामधला किडा, दोघांनी एम. पी. एस. सी. परीक्षा दोन वेळा दिलेल्या. दोघांचेही पेपर छान गेलेले, पण....

आता सारं काही संपलेलं. तीन रात्री पोलीस कोठडीत जागत मन स्वत:लाच विचारीत होतं... आता पुढे काय?

एक भलं मोठं, कधीच न संपणारं कृष्णविवर..!!

स्पर्धा परीक्षेसाठी विज्ञान घटकाचा अभ्यास केल्यामुळे नामदेवला कृष्णविवर आठवलं. त्याच्या, सिद्धार्थच्या व नेहाच्या उद्याच्या बेकार, शिवाय त्या कृत्यानं शिक्का बसलेल्या गुन्हेगाराच्या जीवनाचं प्रतीक!

....आणि आज सकाळी पोलीस सांगत येतात, "चला, तुमची बेल झालीय!"

कुणी व का केली? कशासाठी?

असाच निरोप नेहाला. "तुझा व तुझ्या त्या दोन साथीदारांचा जामीन झाला आहे. चल कार्यालयात!"

पोलीस कोठडीतल्या तीन रात्री ती स्वत:ला निक्षून बजावत होती, "नाही बये, तुला धीर सोडून चालणार नाही. तू बिलकूल काही गुन्हा केला नाहीस. त्या नराधमाला खरं तर फटके मारले पाहिजे होते वेताचे. त्या मानानं केवळ तोंडाला काळं फासणं फारच सौम्य शिक्षा आहे. तू गुन्हेगार नाहीस."

पण आपलंच छिद्रान्वेषी मन टोकत होतं, "मारे मोठ्या थाटात दोस्तांसह त्या माजी कुलगुरूंच्या तोंडाला काळं फासलंस! आव तर होता, साऱ्या परीक्षार्थी बेरोजगार तरुणांच्या संतापाचा तो उद्रेक होता. आज अख्ख्या महाराष्ट्रात दोन ते तीन लाख तरुण - तरुणी एम. पी. एस. सी. परीक्षेचे स्वप्न पाहात आयुष्यातली तीन-तीन, चार-चार, तर कधी पाच-दहा वर्षेही, रात्रीचा दिवस करीत अभ्यास करीत आहेत. त्यांनी काय केलं? तुम्हा पराक्रमी त्रिकुटाच्या समर्थनार्थ काही मोर्चे काढल्याचं, उपोषणं वगैरे

केल्याचं काही वृत्तपत्रात आलं नाही. त्यांना का एक अख्खी परीक्षा मुलाखतीनंतर रद्द झाल्याची झळ पोहोचली नव्हती? दोन वर्षांच्या त्यानंतरच्या परीक्षांचे निकालही जाहीर न केल्यामुळे त्यांचा नाही जीव अधांतरी टांगला गेला होता? मग त्या साऱ्यांच्या भवितव्याशी खेळ खेळणाऱ्या नराधमाला आपण तिघांनी तोंडाला काळं फासून त्यांच्या अस्वस्थतेला वाट दिली आणि जेल पत्करला. पण त्यांना त्याचं काहीच कसं वाटत नाही?''

का? का? पुन्हा त्याच छद्मी, टोकदार मनाचं घायाळ करणारं विश्लेषण, ते अजूनही सहनशील आहेत. त्यांना अजूनही आशा आहे. त्यांना सनदी अधिकारी व्हायचं आहे. आपल्या नावावर गुन्हा नोंद करून घ्यायचा नाहीय आपल्यासारखं! कारण उद्या सिलेक्शन झालं तर पोलीस दप्तरी गुन्हा दाखल झाला असता तर नावावर काट मारली गेली असती!

....आणि नेहाचं मन तिला टोचणी देऊ लागायचं. ''का असा मूर्खपणा केलास? काय मिळवलं त्यातून? तो नराधम तसाही जेलबंद आहेच. प्रयत्न करूनही, नामवंत क्रिमिनल वकील देऊनही कोर्टानं त्याला बेल नाकारलीय. तो सडतोच आहे जेलमध्ये! कोर्टातून बाहेर येताना पत्रकारांना उत्तर देताना त्यानं दाखवलेला निर्ढावलेपणा व पश्चात्तापाची यत्किंचितही जाणीव नसलेला त्याचा हसरा चेहरा पाहून आपला उद्रेक झाला आणि कोर्टाच्या आवारातच पावसामुळे झालेला चिखल त्यांच्या तोंडाला फासला आणि तोंड काळं केलं.''

मी-मी काहीच चूक केली नाही. त्यामुळे झालेला गुन्हा आपल्या करिअरच्या आड येणार नाही.

पण भांगेत तुळस असावी तसे एम. पी. एस. सी. च्या दलदलीत त्या साऱ्यांपासून अलिप्त राहणारे सूर्यवंशी सर, ज्यांच्या ज्ञानोदयात आपण शिकलो व त्यांच्या आदर्शानं संस्कारित झालो, ते त्यावेळी किती कळवळून म्हणाले होते,

''पोरांनो, तुम्ही या कृत्यानं आपल्या पायावर धोंडा पाडून घेतलात. अरे, मी आणीबाणीत विद्यार्थी नेता म्हणून निदर्शनं केली व जेलमध्ये गेलो. त्यानंतर एम. पी. एस. सी. परीक्षेत टॉपर राहूनही नोकरी मिळाली नाही. अन्यथा, आज कलेक्टर झालो असतो. मी इथं होतो ना. सारं काही साफ करायच्या मार्गावर होतो, पण तुम्ही हे काय करून बसलात?''

आणीबाणीनंतर सरकारी नोकरी मिळण्याची शक्यता नसल्यामुळे सरांनी लेक्चररशिप पत्करली. पुढे प्राध्यापक झाले. नंतर प्राचार्य. आता एम. पी. एस. सी. चे सदस्य. कदाचित उद्या चेअरमन होतील. सारं काही साफ करतील. रखडलेले दोन्ही वर्षांचे निकालही लागतील.

पण आपले स्पर्धा परीक्षेचे मार्ग बंद झाले आहेत. आपलं सनदी अधिकाऱ्याचं

स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही!

हा - हा माझ्यावर अन्याय असणार आहे. तो नाही मी सहन करणार. आय मस्ट फाईट.

पण अवघ्या दोन रात्रीच्या पोलीस कस्टडीनं आपली लढण्याची खुमखुमी जिरली तर नाही? नवऱ्याच्या छळामुळे त्याला मारून तुरुंगात आपल्या सोबत असलेल्या स्त्रीला आपण काय म्हणालो होतो? "त्याचा खरं तर खून करायला पाहिजे होता आम्ही. पण वाईट वाटतं की, तसं मी करू शकत नाही. कारण या हातानं कुणावर मला अन्याय करता येत नाही! आणि त्याचं वाईट वाटतं."

अन्याय सहन करणं हा मोठा अपराध आहे. तो - तो मी का सहन करू? येस् - मला काही तरी केलं पाहिजे. समथिंग ड्रास्टिक, समथिंग ड्रामॅटिक!

पण ही जेलची कोठडी केव्हा संपेल? कुणी आपल्या सुटकेसाठी प्रयत्न करेल?

आणि अचानक सुटकेची, जामीन झाल्याची वार्ता.

कोण धावून आला त्यासाठी?.... नक्कीच सर असतील!

पोलीस इन्स्पेक्टरच्या कार्यालयात जेव्हा सिद्धार्थ, नामदेव व नेहाला आणण्यात आलं, तिथं सूर्यवंशी सर आणि एक मॅडम खुर्चीवर बसल्या होत्या. त्या - त्या एम. पी. एस. सी. च्या सेक्रेटरी तर नाहीत? नंदिता मॅडम? होय, नक्की त्याच.

"सिद्धार्थ, नामदेव - तुमचा सरांमुळे जामीन झाला. यापुढे नीट वागा." इन्स्पेक्टरनं करड्या आवाजात उपदेशाचा डोस पाजीत म्हटलं, "आणि नेहा, नंदिता मॅडमनं तुझ्या वर्तनाची हमी दिलीय. तू सुद्धा..."

"नीट वाग.. असंच म्हणायचं ना तुम्हाला सर?"

नेहा तिच्या नेहमीच्या आक्रमक सुरात बोलून गेली. "मान्य, की तोंडाला काळं फासणं हा गुन्हा आहे, पण पैसे घेऊन पास करणं हा गुन्हा नाही का? सारी यंत्रणा वेठीस धरून एका डी. आय. जी. च्या तीन - तीन मुलांना हेराफेरी करून डी. वाय. एस. पी. एकाच बॅचला करणं हा त्यापेक्षा कितीतरी अधिक पट गुन्हा नाही? तुम्हीच सांगा, प्रामाणिकपणे अभ्यास करून सरळ मार्गानं आम्ही अधिकारी, कदाचित डी. वाय. एस. पी. होऊ इच्छितो, पण आम्हाला सरकारनं न्याय दिलाय? केवळ आम्हा तिघांनाच नाही, लाखो तरुणांना असंच वाटतंय. आमच्या जिवाशी सरकारी यंत्रणा क्रूर खेळ खेळतेय... तरीही-"

"पुरे नेहा." नंदिता म्हणाली, "तीन भावांचं एकाच वेळी डी. वाय. एस. पी. व्हायचं ते प्रकरण मीच नाही का शोधून काढलं? मीही त्याची काही कमी किंमत नाही मोजली बेटा. पण असं अविचारानं वागून का न्याय मिळणार आहे?"

"एक्झॅक्टली. मलाही तेच म्हणायचं आहे." सूर्यवंशी म्हणाले, "सिस्टिम बदलली पाहिजे. चांगल्या माणसांनी दृढतेनं चांगलं वागून वाईट माणसांना बाद केलं पाहिजे. व्हाईट करन्सी कॅन ड्राईव्ह आऊट ब्लॅक करन्सी फ्रॉम इकॉनॉमी, तसंच आहे हे."

"पण हे शक्य आहे सर? तुम्ही काय, नंदिता मॅडम काय, अपवाद आहात या पोखरलेल्या भ्रष्ट दुनियेत. त्यामुळे भ्रष्टाचार आम असल्याचा व पूर्ण यंत्रणा सडल्याचा नियम अपवादानं नाही का सिद्ध होत?"

सिद्धार्थ म्हणाला, "या तीन रात्रींनं मला एक रिअलायझेशन दिलंय, वुई हॅव नो होपस्. धिस कंट्री डोंट नीड अस. काहीतरी ड्रास्टिक केलं पाहिजे."

"सिस्टिम बदलता येत नसेल तर तिचा भाग तरी बनलं पाहिजे." नामदेव हताश स्वरात म्हणाला, "त्यासाठी फार कोडगं मन लागतं. ते आम्ही कुठून आणायचं? सवाल तोच आहे. टू बी ऑर नॉट टू बी!"

युवा पिढीच्या त्या तीन प्रतिनिधींच्या कडवट प्रतिक्रिया ऐकताना तो इन्स्पेक्टरही नकळत मऊ झाला होता. कारण काही वर्षांपूर्वी तोही नेमका याच दिव्यातून गेला होता. दोन वेळा तो पी. एस. आय. ची परीक्षा पास होऊनही गृहविभागाला - तेव्हा त्यांच्या परीक्षा एम. पी. एस. सी घेत नव्हती, तर गृहविभाग घ्यायचा - मागणीप्रमाणे पैसे न चारता आल्यामुळे निवड झाली नव्हती. मग इजा बिजा - तिजा नको म्हणून तिसऱ्या वेळी लेखी परीक्षा पास झाल्यावर जमीन विकून पैशाची सोय केली आणि निवड झाली. पहिल्या वर्षातच दुप्पट जमीन खरेदी करून बापाला दिलासा दिला व भावंडांची सोय केली. मग भ्रष्टाचाराचा सिलसिला चालू झाला. एकदा सुरू झालेला भ्रष्टाचार थोडाच थांबतो? आज ती आपली विकृती न राहता सहज प्रकृती बनली आहे!

त्या तीन डी. वाय. एस. पी. एकाच वेळी झालेल्या भावांपैकी एक जण आपला बॉस होता. त्यानं दारूच्या नशेत आपल्या बापानं प्रत्येक स्तरावर सारी यंत्रणा वेठीस धरत व पैसा चारत तिघांना कसं निवडून आणलं, हे कथन केलं होतं. तेव्हा वाटलं होतं, काळ किती झपाट्यानं बदलत गेला. तेव्हाचा गृहविभाग सोवळा वाटावा इतकं आजचं एम. पी. एस. सी. कार्यालय भ्रष्ट झालं आहे. आणि गृहविभाग? आपण त्याचाच भाग आहोत. त्याचं काय सांगावं?

आज त्या संतप्त युवकांच्या प्रतिक्रियेनं मन का हळुवार होतंय? कुठेतरी आतून हलल्यासारखं का वाटतंय?

नाही, असं मऊ होणं आपल्याला परवडणारं नाही. आपण टफच राहिलं पाहिजे. या खात्यात शिरलो व भ्रष्टाचाराला मिठी मारली, तेव्हाच आपले परतीचे दोर कापले गेलेत. आपण आता सरळ वागू लागलो, तर आपल्या खात्यातील खेकडे आपलेच पाय खाली ओढतील. आपली पापं जगजाहीर करीत आपल्याला खड्यासारखं बाहेर काढतील... नो, आय कांट अफोर्ड इट.

पण या तीन मुलांसाठी मला काहीतरी केलं पाहिजे. तेवढंच परिमार्जन. पापक्षालन.

"इन्स्पेक्टर साहेब - " सूर्यवंशी म्हणाले, "मी गृहमंत्र्यांशी बोललो आहे. यांचं पोलीस रेकॉर्ड बनवू नये म्हणून. उद्या ते पास झाले तर पोलीस रेकॉर्ड त्यांच्या नोकरीआड येऊ नये यासाठी. रिअली आय डोंट नो द प्रोसिजर. पण ही प्रॉमिसड् मी टू लुक इन टू इट. तुम्ही तेवढं - "

"नक्की सर." इन्स्पेक्टर म्हणाला, "तुम्ही मला ओळखणार नाही सर. पण मी तुमच्याच कॉलेजचा विद्यार्थी. तेव्हा आपण प्राचार्य नव्हता. माझी सायन्स साईड होती. त्यामुळे तुमचा प्रत्यक्ष विद्यार्थी नव्हतो; पण तुमचा आदर्श, तुमची तत्त्वं मला माहीत आहेत सर. कदाचित तुम्हाला मला एकेकाळचा तुमचा विद्यार्थी मानणं योग्य वाटणार नाही. कारण... कारण... नो नीड टू टेल यू, बट आय विल डू सर्टनली समथिंग फॉर दीज गाईज. आय प्रॉमिस!"

पोलीस स्टेशनच्या बाहेर सूर्यवंशी सर, नंदिता मॅडम व ते तिघे आले, तेव्हा पत्रकार व चॅनेलवाल्यांनी त्यांना गराडा घातला. त्यांना शांत करीत सूर्यवंशी म्हणाले, "प्लीज, आज नको. उद्या माझ्या घरी या, तेव्हा त्यांच्याशी बोला."

आणि तिघांना उद्देशून ते म्हणाले, "तुम्ही माझ्याकडे काही दिवस राहणार आहात. माझा मोठा सरकारी बंगला आहे. तिथं मी एकटाच असतो. तेव्हा चला. थँक्यू नंदिता मॅडम, फॉर युवर को-ऑपरेशन!"

"नो सर, तुमच्याप्रमाणे मलाही वाटलं म्हणून मी सहकार्य केलं. जसं तुम्ही सफाईचं काम करीत आहात, तशीच मीही प्रयत्न करतेय! हे तिघे बळी जाता कामा नयेत एवढंच मला वाटलं."

"आय ॲडमायर युवर करेज ॲण्ड डेडिकेशन टू द कॉज, नंदिता." सूर्यवंशी म्हणाले, "मी बोलूनचालून प्राध्यापक. तुम्ही सनदी अधिकारी. मंत्रालयीन कॅडरचे. उद्या तुम्हालाही आय. ए. एस. चे चान्स पदोन्नतीने असताना हे - हे कशासाठी?"

"या प्रश्नाचं एकच उत्तर असतं सर... आपला विवेक. आपला कॉन्शस. तो उगी बसू देत नाही -" नंदिताचं ते स्मितही काहीसं खिन्न व अट्टाहासानं ओढून आणलेल्या चंद्रबळासारखं होतं.

"ओ. के. सर. मला गेलं पाहिजे. इथून दहिसरला जायला दीड तास लागेल. उद्या मीही येते बंगल्यावर."

"थँक्यू मॅम..." नेहा नंदितापुढे नमस्कार करायला वाकली, तेव्हा तिला मिठीत घेत नंदितानं नमस्कार करू दिला नाही. नेहा पुटपुटत म्हणाली, "तुम्ही - तुम्ही माझ्यासाठी हे... हे... एवढं..."

"पुरे. काही बोलू नकोस. उद्या आपण भेटूच!"

सूर्यवंशींच्या लाल दिव्याच्या व्हाईट ॲम्बेसेडर कारमध्ये मागच्या बाजूला सरांसोबत सिद्धार्थ व नामदेव बसले, तर पुढील सीटवर नेहा. मुंबईच्या मरीन ड्राईव्हवरून वेगानं पळणाऱ्या कारमध्ये बसलेले असताना तिघांच्या मनात व नजरेत पुन्हा पुन्हा आपण कधी काळी असेच बडे अधिकारी होऊ ही पाहिलेली स्वप्नं व त्याचं एका ध्यासपर्वात रूपांतर झालेलं स्मरत होतं. मग आता ती स्वप्नं उद्ध्वस्त झाल्याची जाणीव मनाला ऑफिस सीलच्या लाखेच्या तप्त मुद्रेप्रमाणे भाजत होती. ए. सी. कारची थंड हवा त्यावर दिलाशाचं मलम लावायला असमर्थ होती.

सूर्यवंशींच्या हाजीअलीच्या सरकारी क्वार्टर्सचा दिवाणखाना. पत्रकार व चॅनेलवाल्यांनी खच्चून भरलेला.

सूर्यवंशी सरांच्या स्टडीरूममध्ये नंदिता त्यांची वाट पाहात होती. सर बेडरूममध्ये तयार होऊन अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होते. या तीन पोरांना प्रेसपुढे उभं करणं चुकीचं तर नाही? ती खोचक प्रश्नांना उत्तरं देताना भाडभाड बोलत सुटली तर? पण आता तीर तर सुटलेला होताच. आपणच प्रेस व चॅनेलवाल्यांना आजचं आमंत्रण दिलंय. समजा, दिलं नसतं तरी त्यांनी तिघांना एकत्र वा एकेकटं गाठलंच असतं! त्यामुळे हे तर अपरिहार्यच होतं.

पण आपल्याला कशाची भीती वाटतेय? काल पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या बोलण्यात 'काहीतरी ड्रास्टिक केलं पाहिजे' असा जो निर्वाणीचा सूर होता, त्याचं तर भय वाटत नाही?

आपण का एवढे या तिघांत गुंतून पडलो आहोत, असा प्रश्न विचारला तर काय उत्तर द्यायचं?

सिद्धार्थ व नामदेव रात्रभर एकत्र बोलत होते. स्वत:ला मोकळं करीत होते. दुसऱ्या बेडरूममध्ये एकटी झोपलेली नेहाही रात्रभर लख्ख जागी होती. पहाटे डोळा लागत होता; पण निद्रावस्थेतही मनात विचारांचं तेच तुफान होतं. तिच्याकडे जेव्हा नामदेव व सिद्धार्थ आले तेव्हा तिला थोडं हायसं वाटलं. एक फिकट स्मित करीत तिनं त्याचं स्वागत केलं. तिघेही काही न बोलता खाली स्टडीरूममध्ये आले.

नंदितानं विचारलं, "कसे आहात तुम्ही तिघे?"

केवळ ओळखीचं स्मित देत तिघं म्हणाले, "ओ. के. मॅम..."

काही क्षणात सूर्यवंशी आले. ते म्हणाले, "चला, सारा हॉल खचाखच भरलाय. मला एवढंच सांगायचं आहे पोरांनो, चॅनेलवाल्यांपुढे संयमित प्रतिक्रिया द्या..."

सूर्यवंशींच्या अपेक्षेप्रमाणे पहिला प्रश्न त्यांनाच विचारला गेला. "तुम्ही एम.

पी. एस. सी. चे सदस्य आहात. सर्वांत ज्येष्ठ आहात. कदाचित आता चेअरमनही व्हाल. तुम्हाला विशेष लक्ष घालून युवकांना जामीन देऊन का सोडावंसं वाटलं?''

क्षणभर ते थांबले. चेहऱ्यावर फ्लॅशच्या प्रकाशात पडलेला ताण जाणवावा एवढा त्यांचा चेहरा पारदर्शी व स्वच्छ होता. तो त्यांना लपवायचा पण नव्हता.

''वेल, मी एम. पी. एस. सी चा सदस्य आहे. म्हणून मला परीक्षार्थी युवकांची काळजी केली पाहिजे. त्यांच्या भवितव्याशी खेळायचा आम्हाला अधिकार नाही.''

''पण सर, गेल्या दोन परीक्षांचा तीन वर्षांपासून निकाल नाही. एकाच वर्षी एकाच घरची तीन भावंडं डी. वाय. एस. पी. होतात आणि त्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल झालीय.. ही सारी उदाहरणं हे दाखवतात की, एम. पी. एस. सी. युवकांच्या जिवाशी बेपर्वाईनं खेळत आहे, नाही का?''

सूर्यवंशींनी उत्तर देण्यापूर्वी उत्स्फूर्तपणे सिद्धार्थ बोलून गेला, ''नक्कीच, आमचा हाच तर आक्षेप आहे. तो आम्ही त्या माजी कुलगुरूंना काळं फासून व्यक्त केला आहे. आमची तक्रार सरांपुढे लेखी नोंदवली आहे.''

''जस्ट इमॅजिन!'' नामदेव दुजोरा देत म्हणाला, ''तुमच्याही घरात कदाचित आमच्या वयाची भावंडं, मुलं असतील, तीही कदाचित आमच्यासारखी शासकीय अधिकारी बनायची स्वप्नं पाहत अभ्यास करीत, तारुण्याची तीन - चार वर्षे रात्रीचा दिवस करीत असतील. त्यांची निराश मानसिकता, त्यांची घालमेल व अंतरीचा उद्रेक जाणायचा प्रयत्न करा. मग तुम्हाला कळेल, आम्ही किती व काय काय सोसत आहोत ते. चार दिवसांपूर्वीची आमची काळं फासण्याची कृती ही त्याचा एक उद्रेक होता. ती त्या एका आततायी क्षणाची उत्स्फूर्त व संतप्त प्रतिक्रिया होती, बस्!''

त्या दोघांना इशाऱ्यानं थांबवत सूर्यवंशी म्हणाले, ''मी त्यासाठी प्रयत्न करतोय. मी इथं जॉईन होताना एका मिशननं आलो होतो. आणि पहिल्या दिवसापासून हे दोन वर्षांचे रखडलेले निकाल तयार करून घेण्याचा प्रयत्न केला. आता ते तयार आहेत.''

''पण एम. पी. एस. सी. मधला भ्रष्टाचार, सावळा गोंधळ? त्याचं काय?''

''मान्य की, पुरी यंत्रणा अलीकडच्या काही काळात सडली आहे. ती दुरुस्त करायची आमची जबाबदारी आहे. सिस्टीममध्ये राहूनच सिस्टीम बदलण्याचं हे काम करायचं आहे!''

आता प्रश्नांचा ओघ नंदिताकडे वळला. एका शोधक पत्रकारानं प्रश्न विचारून चक्क बॉम्बगोळाच टाकला. ''तुम्हाला यासंदर्भात काही प्रश्न विचारण्यापूर्वी एक उत्तर द्या. तुमची बदली एम. पी. एस. सी. च्या सचिवपदावरून शासनानं परत मंत्रालयात पशुसंवर्धन विभागात केली आहे. तुम्ही त्या तीन डी. वाय. एस. पी. भावांच्या संदर्भात पोलीस केस केल्यामुळे, हे खरं आहे काय?''

सूर्यवंशी व ते तिघे हे ऐकून चकित झाले. नंदिताकडे अविश्वासानं पाहतच

राहिले. नंदिताच्या चेहऱ्यावर पत्रकारांच्या व टी. व्ही कॅमेऱ्याच्या नजरा खिळल्या होत्या. कदाचित तिला या प्रश्नाची अपेक्षा असावी. ती शांतपणे उत्तरली.

"होय, हे खरे आहे. काही दिवसात मला चार्ज सोडावा लागणार आहे. पण त्याचा संबंध तुम्ही पोलीस केसशी का जोडता हे मला कळत नाही. ही रुटीन बदली आहे."

उद्या तिच्यावर शिस्तभंगात्मक कार्यवाहीची पाळी आली तर तिनं बचावासाठी हे प्रतिपादन केलेलं होतं.

"पण त्या पोलीस केसचं काय?"

"ती चालू राहीलच की आणि मला जेव्हा चौकशीला बोलवतील तेव्हा मी जाईन आणि सत्य काय ते सांगेनच. आता मी त्या सिस्टिमच्या बाहेर आहे. चौकशीत साऱ्यांनीच सर्व काही खरं सांगायचं असतं, या तत्त्वानं मी सारं खरं मला माहीत असलेलं पुराव्यासह सांगेन आणि बाहेरून सिस्टिम बदलण्यासाठी माझं योगदान देईन!"

पत्रकारांना छानपैकी बाईट्स मिळत होत्या. तिच्या बदलीची ब्रेकिंग न्यूजही मिळाली होती.

"एकूण तुम्ही सिस्टिमशी बाहेरून व सूर्यवंशी सर, तुम्ही सिस्टिममध्ये राहून सिस्टिमशी लढणार आहात. या दुहेरी लढाईचा चांगला परिणाम पाहायला मिळेल अशी अपेक्षा जनतेनं करावी का?"

"कदापि नाही!" आवाजाच्या दिशेनं पत्रकारांच्या नजरा व कॅमेऱ्याची लेन्स वळली. तो सिद्धार्थ होता. "वुई हॅव नो होपस्. ही सिस्टिम चिखल झाली आहे. सर व मॅडम त्यात उमललेली दोन कमलपुष्पे आहेत. त्यांना या सिस्टिमनं त्या चिखलातच गाडू नये म्हणजे मिळवली!"

"आय टोटली ॲग्री वुईथ सिद्धार्थ." नामदेव म्हणाला, "आम्ही खूप विचार केला आहे. एम. पी. एस. सी. चा भ्रष्टाचार हा एकूण भ्रष्टाचाराच्या हिमनगाचा एक अंश आहे. उजेडात आलेला. इथून तिथून साऱ्या राजकीय व सामाजिक जीवनाला भ्रष्टाचाराच्या ऑक्टोपसनं विळखा घातलाय. नथिंग विल हॅपन. धिस कंट्री हॅज रिअली नो फ्यूचर - ॲटलिस्ट फॉर गुड अँड ऑनेस्ट पीपल!"

"सर नेहमी म्हणतात की, गुड करन्सी कॅन ड्राईव्ह आऊट बॅड करन्सी. पण मी ठामपणे सांगते की, इथं बॅड करन्सीच आहे सर्वत्र. ती आपल्या पाशवी सामर्थ्यानं नंदिता मॅडम व सूर्यवंशी सर नामक गुड करन्सीला बाहेर काढून त्यांची बदनामी करीत त्यांनाच बाद करतील." नेहा म्हणाली, "त्याची सुरुवात नंदिता मॅडमच्या बदलीनं झालीच आहे."

तिथं थेट मुद्द्याचं बोलणं सूर्यवंशींना मनस्वी भिडलं होतं. त्यांच्या मनातल्या

अबोध भीतीचं त्यांना आतापर्यंत न उमगलेलं कारण हेच तर नाही?

नंदिताच्याही मनावरचा ताण नेहाच्या प्रतिपादनानं उजागर होत तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाला होता. आपण विवेकला प्रमाण मानीत पोलीस केस करायचं धाडस केलं खरं, पण त्याची किंमत प्रशासकीय कार्यवाही, कदाचित निलंबनानं तर मोजावी लागणार नाही? पतीच्या माघारी सिंगल पॅरेंटचा रोल निभावीत आपण दोन किशोरवयीन मुलं वाढवत आहोत. त्यांच्यासाठी मला नोकरी आवश्यक आहे. पण ती पणाला लागली तर नाही?

"मी एक जाहीर करू इच्छितो." नामदेव म्हणाला, "मी स्वप्न पाहिलं होतं, सनदी अधिकारी होऊन इथल्या विकासकामांमध्ये प्रशासनामार्फत योगदान देण्याचं. पण हे अधिकारी आज क्षुद्र कीटक बनले आहेत. जळवा बनलेत जळवा. त्यांना राजकारण्यांच्या तालावर नाचावं लागतं, नाही तर बदली व कार्यवाहीचं ब्रह्मास्त्र वापरून नामोहरम करीत त्याचा पार खुळखुळा केला जातो. हे नंदिता मॅडमच्या आजच्या झालेल्या तडकाफडकी बदलीनं सिद्ध होतं. म्हणून मी प्रशासक होण्याचं स्वप्न सोडून देत आहे.. मी इकॉनॉमिस्ट आहे. प्रयत्न केला तर मला प्रायव्हेट बँकींग, इन्शुरन्स वा एम. एन. सी. मध्ये सहज जॉब मिळेल. नव्हे. यापूर्वी मिळालेला जॉब नाकारून एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी. करिता मी तीन वर्षे वाया घालवली. या देशाला, या राज्याला चांगले ध्येयवादी व प्रामाणिक प्रशासक नको आहेत. तर मग आम्ही स्वत:ला त्यासाठी का पणाला लावायचं? मी प्रायव्हेट कंपनीमध्ये नोकरी पत्करून सुखासीन, आत्मकेंद्री आयुष्य जगू शकतो. तेही आम आदमीच्या शोषणावर जगणं असणार आहे. बट आय हॅव नो अल्टरनेटिव्ह!"

"पण मी नामदेवइतका हताश नाही. माझ्यात अजूनही व्यवस्थेच्या विरोधात लढायची खुमखुमी आहे." सिद्धार्थ म्हणाला, "मी खराखुरा भीमसैनिक आहे. 'जग बदल घालून घाव सांगून गेले भीमराव' यावर माझा विश्वास आहे. मी बंडखोर दलित साहित्यावर व भीम विचारांवर पोसलेला तरुण आहे. मी असा हताश होणार नाही. मी लढाई अर्धवट सोडणार नाही, पण गीअर बदलणार आहे."

"म्हणजे काय? जरा विस्तारानं सांगा ना!"

"शुअर," किंचित हसत सिद्धार्थ म्हणाला, "आजवर नामदेव व नेहाप्रमाणे अधिकारी होऊन चांगलं प्रशासन देत भारत देश आणि हा आपला महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्यात आपलाही सहभाग असावा असं माझं प्रामाणिक मत होतं अन् तसं स्वप्नही होतं. ते आता संपल्यातच जमा आहे. पण मी लढणार आहे. ही सिस्टिम बदलायची असेल तर राजकीय ताकद हवी."

"म्हणजे तुम्ही राजकारणात प्रवेश करणार?"

"होय! तिथं ताकद कमावून सिस्टिम बदलण्याचा प्रयत्न करणार. साऱ्या

भ्रष्टाचाराची गंगोत्री जर राजकारण असेल तर तेच क्षेत्र प्रथम बदलणं आवश्यक आहे. म्हणून मी राजकारण जॉईन करणार आहे.''

''पण तुम्ही त्याच सिस्टिमचा भाग बनणार नाहीत कशावरून? कारण आजचं राजकारण म्हणजे पैशाचा खेळ. सरपंचपदावर निवडून येण्यासाठी सुद्धा हजार - लाखात खर्च येतो, म्हणून विचारलं.''

''वेल, मी सिस्टिमविरुद्ध अखेरपर्यंत लढेन की, त्या सिस्टिमचा काही दिवसांनी एक भाग बनेन हे मला आज सांगता येणार नाही, एवढंच मी या क्षणी प्रांजळपणे कबूल करतो!''

मनोमन त्यालाच आपला भरवसा वाटत नव्हता. कारण अभावाच्या जिंदगीमुळे पैशाचं महत्त्व तो जाणत होतां. अर्थात इज्जतीनं पैसा कमवावा म्हणून तारुण्याची चार वर्षे त्यानं अभ्यासात घालवली होती. पण आता सारं संपलं होतं. राजकारणाची वाट त्याला खुणवू लागली हेती. तिथं आपली डाळ शिजेल का? निभाव लागेल का? हे प्रश्न आज तरी अनुत्तरित होते.

राजकारणातील तडजोडीचं काय? त्या करताना मोहाच्या वाटा लागल्या तर आपण काय करू? ठामपणे आपण स्वच्छ राहू असं आपलं मन का ग्वाही देत नाही? हा सवाल व ही सल त्याला व्याकूळ करीत होती!

''मी मात्र एकदम ड्रास्टिक ॲक्शन घेणार आहे.'' नेहा तिच्या नेहमीच्या आक्रमक सुरात म्हणाली. त्याबरोबर हॉलमध्ये शांतता पसरली. साऱ्या पत्रकारांच्या नजरेत कुतूहल व औत्सुक्य दाटून आलं होतं.

''मी, ही नेहा, नक्षलवादी बनणार आहे.'' तिनं सावकाश पण ठामपणे एका एका शब्दावर जोर देत म्हटलं आणि साऱ्या मीडियाला उद्याची हेडलाईन व ब्रेकिंग न्यूज सापडली.

''होय, मी पूर्ण विचारांती बोलले आहे. मी नक्सलाईट मूव्हमेंट जॉईन करू इच्छिते. मला माहीत आहे की, आज अनेक राज्यात तिच्यावर बंदी आहे. नक्षलवादी उग्र व हिंसक आहेत. पण ते या अन्यायग्रस्त करप्ट सिस्टिमविरुद्ध लढा देत आहेत हे महत्त्वाचं. आज देशाच्या एकतृतीयांश जिल्ह्यांमध्ये त्यांची चळवळ पसरली आहे. हे कशाचं द्योतक आहे? हजारो तरुण - तरुणी, सुविद्य लोक त्यांना सामील होत आहेत, ते कशासाठी? ही 'हॅव' आणि 'हॅव नॉट' ची लढाई आहे. देशावरील करप्शनचा डाग मिटवायचा असेल तर जालीम उपायांची गरज आहे. तो उपाय माझ्या मते नक्षलवादी चळवळ हा आहे. चारू मुजुमदारांचा आदर्श मला मोह घालतो... आय वॉंट टू बी लेडी चारू मुजुमदार ॲंड वॉंट टू चेंज द होल सिस्टिम!''

प्रेस कॉन्फरन्स संपली होती. सारे जण निघून गेले होते. तिघांच्या तीन भिन्न प्रतिक्रियांनी सूर्यवंशी हादरून गेले होते. त्यांच्यातला आदर्शवादी माणूस घायाळ

झाला होता. नेहाची टोकाची भूमिका नंदिताला पटली नव्हती. पण तिला स्वत:ला त्यामुळे लढायला बळ मिळालं होतं!

आत हॉलमध्ये ते तिघे उरले होते. वादळानंतरची शांतता जाणवत होती. अस्वस्थ अन् बेचैन नेहा कोचावर बसली होती. हाताच्या खळगीत हनुवटी रुतवून, एका बाजूला कोचाच्या हातावर तिच्याकडे पाठ फिरवून सिद्धार्थ अवघडलेल्या अवस्थेत बसला होता. तिच्यापासून मनानं दूर गेलेला नामदेव कोचाच्या दुसऱ्या बाजूला सिद्धार्थकडे पाठ फिरवलेला. त्याला आतापासूनच खाजगी कंपनीची, भक्कम आर्थिक सुखाची व सुखासीन उपभोगी दुनिया खुणावत होती. नेहाच्या मनात नक्षलवाद्यांची वाचलेली माहिती घोळत होती. एका अज्ञाताच्या खुणा तिला ऐकू येत होत्या. सिद्धार्थचा हॅम्लेट झाला होता. आपण सिस्टिमविरुद्ध झगडण्यासाठी की त्याच सिस्टिममधील आकर्षणामुळे तिचा भाग बनण्यासाठी आपला ट्रॅक बदलत आहोत, याचा त्याला उलगडा होत नव्हता. मात्र यापुढे यू. पी. एस. सी. व एम. पी. एस. सी. बंद स्पर्धा परीक्षा नाही. ऑफिसर होणे नाही. यावर तिघेही ठाम होते. तिघांनी आपल्या तीन दिशा निवडल्या होत्या, मीडियाच्या साक्षीनं!

सारे पत्रकार व मीडियावाले निघून गेले होते. तिथं फक्त पूर्वा रेंगळत होती ती सध्या पत्रकारितेचा कोर्स व एका वृत्तपत्रात अर्धवेळ कामही करीत होती. त्याच वेळी तिची स्पर्धा परीक्षेची तयारीदेखील चालू होती. त्या तिघांनी माजी कुलगुरू असलेल्या व आज जेलबंद असलेल्या चेअरमनला काळं फासल्यापासून त्यांची स्टोरी ती करीत होती. आजही तिला बराच मसाला मिळाला होता. पण त्यावरून 'कव्हर स्टोरी' करावी का त्याचं ॲनॅलिसिस करणारं वार्तापत्र करावं, हा प्रश्न तिच्यापुढे होता. का त्या तिघांचं जीवन जाणून घेऊन त्याची 'ह्युमन इंटरेस्ट स्टोरी' करावी? या प्रश्नाचं उत्तर शोधायचं होतं. त्यासाठी ती तेथे थांबली होती.

ते तिघे जवळजवळ पण तीन वेगळ्या दिशांना तोंड करून विचारमग्न अवस्थेत बसले होते. पूर्वाला एकदम राज कपूरचा 'जोकर' सिनेमाचा एक छोटा सीन आठवला. विमान प्रवासात राज कपूर, राजेंद्रकुमार व पद्मिनी 'लाईफ' 'टाईम' व 'फॉर्च्युन' ही तीन मासिक चाळत असतात; त्या तीन मासिकांची नावे त्यांच्या भावी जीवनप्रवासाची द्योतक असतात.

समजा, या तिघांच्या लाईफवर कुणी सिनेमा काढला तर या तीन भिन्न दिशेला तोंड करून बसलेल्या तिघांच्या हाती कोणती मासिकं द्यावीत?

नामदेवासाठी 'फॉर्च्यून' शोभेल. कारण तो उद्याच्या बड्या प्रायव्हेट कंपनीचा सुखवस्तू एक्झिक्युटिव्ह बनणार आहे. सिद्धार्थला 'टाईम' देणं बरं. उद्याची वेळच सांगेल की तो सिस्टिम सुधारेल, का सिस्टिमचा भाग बनून प्रवाहपतिताचं जीवन जगेल? आणि नेहासाठी नक्कीच 'लाईफ' मासिकच दिलं पाहिजे. जीवन अतर्क्य

असतं. चांगल्या पांढरपेशा मध्यमवर्गाची नेहा जाहीरपणे जेव्हा "मी नक्षलवादी होणार" असं म्हणते तेव्हा जीवनाची अनिश्चितता व अतर्क्यता प्रत्ययास येते....

पूर्वाला आपल्या या कल्पनाविलासाची मनोमन थोडी मौज व थोडी खिन्नता जाणवत होती. आणि एक प्रश्न सतावीत होता.

आपल्या स्वत:च्या 'लाईफ' 'टाईम' चा 'फॉर्च्यून' केव्हा उदयाला येणार? एनी होप?

०-०-०

# ११. भव शून्य नादे

"शिवशंभो हर हर - शिवशंभो!"

काल दुपारी तामुलवाडीला आल्यानंतर जो धुंवाधार पाऊस सुरू झाला, तो रात्रभर चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणे वाडीवर आसूड ओढीत होता! साथीला सूं सूं असा भयप्रद, जीव लकलक करणारा आवाज करीत वारा वेगवान वाहत होता. त्यामुळे वठायला आलेली अनेक बाभळी - लिंबांची झाडे कडाकडा आवाज करीत कोसळत होती. तर तामुलवाडीच्या तिन्ही बाजूंनी दुथडी भरून वाहणाऱ्या ओढ्यात फोफावलेली बांबूची लवचीक वने वाकत सुसाट्याचा वारा झेलत होती आणि त्यांच्या छिद्रातून मंजुळ मुरलीच्या नादाऐवजी रुद्र वादळी संगीत प्रसवत होतं....

अवघी वाडी, एक पाटलाचा वाडा सोडला तर, झोपड्यांची किंवा कच्च्या अर्धपक्क्या घरांची हेती... घरंही दगड-मातीनं बांधलली व छत म्हणून पत्रे असलेली - ज्यांच्या आधारासाठी मोठमोठे दगड ठेवलेले! ते भिरकावून देत तुफान वारा पत्रेही उडवीत अनेक घरं उघडी पाडीत होता...

निसर्गाचं ते प्रलयंकारी तांडव जीवन मुठीत धरून पाहात - अनुभवत अवघ्या वाडीची समस्त माणसे - बायका - मुले, होत्या-नव्हत्या त्या सोलापूर चादरी, कांबळी आणि तेही नसेल तर चिरगूट पांघरून स्वत:चा त्या तुफानी वादळी पावसापासून बचाव करीत चिडीचिप्प झोपली होती.

दक्षिणेला पूर्णा नदीच्या काठावर हेमाडपंथी बांधणी असलेल्या महादेवाच्या चिरेबंदी देवळात रात्री अक्षयच्या साथीला धुनी लावून बसलेला व तुफानी पावसाची पर्वा न करता नामस्मरणात मग्न असलेला मोरया गोसावी होता! अक्षयसाठी एक लाकडी बाज देवळात आणून टाकली होती व मास्तरांनी दिलेली राठ, टोचणारी पण उबदार घोंगडी गळ्यापर्यंत पांघरून अक्षय पहुडला होता!

समोर दोन - तीनशे मीटरवर पूर्णा नदी पुराचं लालजर्द पाणी घुसळीत वाढत्या सामर्थ्यानिशी वाहत होती. तिचा तो वादळी - प्रपाती नाद कानात रात्रभर घोंगावत होता! नजर जाईल तिथवरचं विश्व विजेअभावी गडद अंधारलेलं. देवळाच्या गाभाऱ्यात

मात्र समई थरथरत का होईना, तेवत क्षीण प्रकाश देत होती.

केव्हातरी मध्यरात्री मोरया गोसावी निद्राधीन झाला होता. झोपेतही तो 'शिवशंभो' असं पुटपुटत होता...

अक्षय लख्ख जागा होता. देवळाचं प्रशस्त आवार, सभोवती गाभाऱ्यातून येणाऱ्या थरथरत्या प्रकाशात गर्दतमाची तीव्रता त्याला अधिकच जाणवत होती. त्याची झोप साफ उडाली होती. खरं तर काल दुपारपासून अवघी तामुलवाडी तुडविल्यानंतर अंतर्बाह्य चिंब भिजलेल्या अक्षयचा तरुण देह थकला होता. ओली झालेली जीन्स पँट अधिक जड झाली होती... शर्ट अंगाला चिकटला होता आणि हुडहुडी भरवीत होता.

त्याच्या मनात अनेक प्रश्नांचं तुफान उठलेलं.... आपण इथं काम करीत आहोत, आपलं मुंबईचं सुरक्षित आयुष्य सोडून. पवईला आय. आय. टी. मध्ये बी. टेक. होऊन एखाद्या मल्टीनॅशनल कंपनीत जॉब घेण्याऐवजी राज्य शासनाच्या अभियांत्रिकी सेवेत कार्यकारी अभियंत्याची नोकरी स्वीकारलेली - प्रशिक्षणाच्या कालावधीत साहाय्यक अभियंता म्हणून परभणीस आलो... व या मध्यरात्री या पुरानं वेढलेल्या तामुलवाडीत देवळात खाटेवर पडून जे अनुभवीत आहोत, ते आपल्या कॉन्व्हेंट प्रशिक्षित हाय सोसायटीतल्या मित्रांना मुंबईत परतल्यावर सांगितलं तर ते विश्वास ठेवणार नाहीत...

खराखुरा अस्सल भारत - खेडेगावांचा भारत असाच आहे का? या तथाकथित प्रगतीशील महाराष्ट्रात अशी तामुलवाडी असेल तर बिहार - उत्तर प्रदेशाची काय स्थिती असेल?

तो पुन्हा पुन्हा आपलं मुंबईचं मरीन ड्राईव्ह - कफ परेडचं ए. सी., वॉल टू - वॉल कार्पेटचं संपन्न, चंगळवादी उपभोगाचं जीवन आणि ग्रामीण महाराष्ट्राचं विदारक प्रतीक असलेल्या तामुलवाडीचं काल दुपारपासून पाहात असलेलं अभावाचं आणि निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असलेलं कुंठित-गतानुगतिक जीवन यांच्यातला कॉन्ट्रॅस्ट शरमिंद्या मनानं, स्वत:ला अपराधाची टोचणी लावीत तपासत होता आणि अस्वस्थ होत होता...

म्हणूनच त्याला झोप येत नव्हती. आणि नजर समोरून वाहणाऱ्या अंधारातही लाल पाण्याचे रंग अंगांगावर अनाम व खोल भीती उठवीत वाहणाऱ्या नदीवर खिळलेली होती.... आपण या गावचे, या लोकांचे काही देणे लागतो का? आर वुई बिलाँग टू अनदर प्लॅनेट... अनदर अर्थ?

आणि त्याच्या कानावर शिवस्तुतीचे शब्द आले. अक्षय त्या अंधाराच्या पोकळीत खणखणीत, भक्तीभिजल्या स्वरात ऐकू येणाऱ्या नादपूर्ण शब्दांनी रोमांचित झाला. मोरया गोसावी नदीकडून येत होते व शिवस्तुती म्हणत होते.

**कैलासराणा शिवचंद्र मौळी ।**

फणींद्र माथा मुकुटी झळाळी ।
कारुण्य सिंधू भवदुःख हारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ।

सारी तामुलवाडी निसर्गाच्या तांडव प्रतापानं भयभीत होऊन दिवाभीताप्रमाणे वळचणीला बिलगली असताना हा निःसंग गोसावी त्या पूर्णा नदीच्या पुराच्या पाण्यात सचैल स्नान करून आला होता व शिवस्तुती गात गाभाऱ्यात पूजेला बसला होता!

''अनुहत शब्द गगनी न माय ।
तिचे नि नादे भव शून्य होय ।।
कथा निजांगे करुणा कुमारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ।।''

अभयनं घोंगडी बाजूला सारली व तो उठून गाभाऱ्याजवळ गेला. मोरया गोसावीनं काजळी झाडल्यामुळे समईची वात दीप्तीमान होऊन गाभारा उजळीत होती. त्या प्रसन्न, उबदार, पवित्र प्रकाशात शिवलिंग झळाळत होतं. पांढऱ्या कण्हेरीच्या फुलात मोरया गोसावी शिवलिंग शृंगारत होता आणि पूजेचे मंत्र म्हणत होता -

''पाद्यं ग्रहण देवेश सर्व क्षेमसमर्थ भो ।
भक्त्या समर्पित देव लोकनाथ नमोस्तुते ।।''

मॅट्रिकला मेरिटमध्ये येण्यासाठी शंभरपैकी शंभर मार्क्स मिळतात म्हणून अक्षयनं दुसरी भाषा म्हणून हिंदीच्या ऐवजी संस्कृत घेतलं होतं. त्यामुळे मोरया गोसावी जे मंत्र म्हणत होता, त्याचा अर्थ त्याला समजत होता. त्या ब्राह्म मुहूर्तावर निसर्गाच्या प्रलयकारी तांडवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरात एकाकी निःसंग गोसावी रुद्ररूप शिवाची मनोभावे पूजा बांधीत होता.

अक्षयचं क्षुब्ध मन हळूहळू शांत होत होतं. नकळत आजीने शिकवलेले बालपणीचे संस्कार जागृत होत होते. त्यानं गुडघ्यावर बसून नकळत हात जोडले होते.

तामुलवाडीला अशा एका शिवाची व मोरया गोसावीसारख्या शिवभक्ताची जरुरी होती - किमानपक्षी त्यांचं मन शांत ठेवायला मदतगार सिद्ध होणारी होती. आजवर आयुष्यात कधी पूजा न केलेला व आजीच्या मृत्यूनंतर चुकूनही कधी मंदिरात न गेलेला अक्षय आज भल्यापहाटे शिवमंदिरात वीरासन घालून, हात जोडून मोरया गोसावीनं आरंभलेली पूजा पाहात होता. आणि मनातल्या प्रश्नांच्या तुफानाला वाट शोधत होता...

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्यसुंदर मस्तकी बाळा ।
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।

जयदेव जयदेव जय श्री शंकरा।
आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा।

पूजेनंतर मोरया गोसावी जपासाठी गाभाऱ्यातच ध्यान लावून बसला आणि भारावलेली अवस्था संपल्यावर भानावर येत अक्षय उठून बाहेर आला.

पाऊस थांबला होता आणि सूर्याचा लख्ख प्रकाश आसमंतात फाकला होता. पण त्यानं प्रसन्नता - नवचैतन्य आणलेलं नव्हतं, तर त्या प्रकाशात काल रात्रीच्या विध्वंसाचं विदारक रूप दिसत होतं! अजूनही आपली सीमारेषा - आपलं पात्र - ओलांडून गावातील सखल भागात शिरलेली पूर्णा नदी उन्मत्त आवेगानं आपलं लाल जळ धडकी भरवरणाऱ्या वेगानं नेत वाहत होती... काळी चिकण माती लाभलेली तामुलवाडी चिखलानं लथपथली होती. ठिकठिकाणी दबा धरून बसलेले बेडूक किळसवाण्या भीतियुक्त आवाजात ओरडत होते... गुरुडानं आकाशातून झेप घेत एक मेलेला सर्प उचलून नेताना अक्षयनं पाहिलं आणि तो शहारला!

तामुलवाडीला जाग आली होती आणि नेहमी प्रातर्विधीस वाळूच्या वनात जाणारे ग्रामस्थ तेथून पाणी वाहत असल्यामुळे अलीकडेच विधीला बसले होते... ते दृश्य पाहून अक्षयला मुंबईत असताना लोकलमधून पहाटे जाताना दोन्ही बाजूंच्या दृश्यमालिका आठवल्या.... आणि त्यानं खांदे उडवले!

वाड्यावरून पाटलाचा गडी सांगावा घेऊन आला होता. चहाला त्यांनी बोलावलं होतं व तिथं आमदार व तहसीलदार अक्षयची वाट पाहात होते. रात्री त्यानं वाड्याच्या सुरक्षित उबेत राहायचं नाकारून मंदिरात राहायचं पसंत केलं होतं आणि वाड्यावरचं कोंबडीचं मसालेदार जेवण टाळून तो मास्तरंच्या घरी पिठलंभाकरी जेवला होता. त्याचं हे विचित्र वागणं त्यांना समजत नव्हतं.

अक्षयला तरी कुठे आपल्या विचित्र वर्तनाची संगती लागत होती? तो क्षुब्ध होता, पण आपला क्षोभ कुणावर होता हेच त्याला कळत नव्हतं!

काल दुपारी तहसीलला आमदारांनी समन्वय समितीची बैठक बोलावली होती. अक्षय रुजू झाल्यानंतर ही पहिलीच बैठक, पहिल्या पंधरवाड्यातच लागलेली. तेथे तामुलवाडीच्या पुनर्वसनाचा प्रश्न उपस्थित झालेला. वाडीचे सरपंच व चार ग्रामस्थ तेथे आले होते व त्यांनी रोखठोकपणे सवाल टाकला होता.

"किती वरीस आम्ही दर बरसातीला भीत-भीत जगायचं, आमदार साहेब? तिन्ही बाजूंनी ओढे आहेत व चवथ्या दिशेला पूर्णा नदी. गाव तसं उंचावर आहे, पण तुफान पाऊस पडला की नदीचं पात्र वाढतं, बॅकवॉटर ओढ्यात शिरतं आणि पूर्ण वाडी पाण्यानं वेढली जाते. जिल्ह्यातून, जगापासून दोन - दोन, तीन - तीन दिवस संपर्क तुटतो. अशा वेळी बाळंत बाईचं, म्हाताऱ्याकोताऱ्यांचं मरणच!"

अक्षयच्या कानात त्याचा ज्युनिअर इंजिनिअर कुजबुजला, "खरं आहे सर, पण

आपल्या इरिगेशनच्या शास्त्राप्रमाणे हे गाव उंचावर असल्यामुळे पूररेषेत येत नाही. तसा रिपोर्ट दप्तरबंद आहे. पण पाण्याचा वेढा पडतो. पूर प्रतिबंधक भिंत खर्चिक म्हणून होत नाही, तर पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाला गाव - गावची घरं, वाड्या, एकूण गाव पण पूररेषेत यावं लागतं, तरच शासन मंजुरी देतं...''

जुन्या जाणत्या, खात्यात मुरलेल्या तहसीलदारांनी फाईल पाहून नेमकं हेच उत्तर फेकलं, पण तामुलवाडीच्या सरपंचाचं व ग्रामस्थांचं त्यानं काही समाधान झालं नाही. होणं शक्यही नव्हतं!

''गावची किती माणसं मेली म्हणजे तुम्हाला या प्रश्नाची तीव्रता समजणार आहे?'' एका ग्रामस्थानं संतापानं विचारलं, तेव्हा नव्यानं निवडून आलेले आमदार चपापले. त्यांनीही निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी या गावाला भेट दिली नव्हती. कारण नदीतून बारमाही टोकरा - छोटी होडकी - चालायची. यातून पैलतीरी जायचं व पुन्हा अर्धाएक मैल रान तुडवायचं... प्रचाराचा अर्धा दिवस मोडला असता या व्यावहारिक हिशोबानं आमदारांनी तामुलवाडी टाळली होती!

त्यांनी अक्षयकडे पाहिलं- त्यांच्या नजरेतला मथितार्थ त्यानं जाणला. आमदारांना हा उमदा, उच्चविद्याविभूषित तरुण आवडला होता. त्याचं उच्चशिक्षण, डिग्री याचं खात्यात फारसं चीज होणार नाही, असंही त्यांनी बोलून दाखवलं होतं! पण त्याला ग्रामीण भारत पाहायचा होता, आयुष्याची किमान दोन - तीन वर्षे त्याला ग्रामीण भागाच्या पुनर्रचनेसाठी द्यायची होती. त्यात अपयश आलं तरी धोका नव्हता. त्याची आयआयटीची डिग्री त्याला केव्हाही २५ - ३० हजारांची नोकरी मुंबई-पुण्याला द्यायला समर्थ होती!

अक्षय म्हणाला, ''आज बैठकीनंतर आपण तामुलवाडीला जाऊ या. तहसीलदार साहेब पण आले तर बरं होईल! या गावचा प्रश्न पुनर्वसनापेक्षाही जादा, इतर भागापासून पुराच्या वेळी कटऑफ होण्याचा आहे - वेढा पडून जगाशी संपर्क तुटण्याचा आहे... नेमकी कोणती बाब कमी खर्चाची राहील हे मी प्रत्यक्ष पाहणी केल्यावर सांगू शकेन... पुनर्वसन हा कधीही केवळ तांत्रिक प्रश्न असू नये. त्यात मानवी भावनेची बाजू आणि गावाचे लोकेशनही महत्त्वपूर्ण ठरतात...''

सरपंच त्याच्याकडे अवाक होऊन पाहात राहिले. हा काल आलेला कॉलेज कुमारासारखा दिसणारा इंजिनिअर वाडी न बघता नेमकेपणानं प्रश्नांची गुंतागुंत किती सहजतेनं उलगडून दाखवत होता.. गेली पंधरा वर्षे ते सरपंच होते व तेव्हापासून गावाच्या पुनर्वसनासाठी झटत होते. पण क्लिष्ट कायदे व तांत्रिक नियम यांच्यात त्यांच्या गावचा प्रश्न चपखलपणे बसत नव्हता. मुख्य म्हणजे वरिष्ठ अधिकारी टोकऱ्यातून पैलतीरी येऊन पाहण्याचे कष्ट घेत नव्हते व खालच्या कर्मचाऱ्यांचे तांत्रिक ज्ञान ठीकठाक असले तरी त्यातून कसा मार्ग काढायचा याची प्रज्ञा व अधिकार

नसल्यामुळे त्यांचे अहवाल नकारार्थीच असायचे...

एकाएकी सरपंचाला त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागली. "अगदी बेस बोललात तुम्ही साहेब... चला, आम्ही तुमास्नी वाडीला नेतो."

मीटिंग संपून वाडीला नदीपर्यंत जायला तीन-चार वाजतील. मग पाहणी होता होता अंधार पडेल! तहसीलदार पेन्शनला आलेले, जाडजूड अंगाचे होते. त्यांना टोकऱ्यातून जाणं व पायी गाव तुडवून पाहणी करणं जिवावर आलं होतं. "आमदार साहेब - पुन्हा कधीतरी तारीख द्या. आज वेधशाळेची तारही आली आहे - अतिवृष्टीचा संभव आहे. पूर आला तर तुम्ही-आम्ही अडकून पडू!"

मघाशी रोखठोक बोलणारा ग्रामस्थ पुन्हा उपहासानं हसत तेवढ्याच ठणठणीतपणे म्हणाला, "वा साहेब - आम्ही हरसाल हे संकट, ही अस्मानी - सुलतानी झेलतो. तुम्हाला प्रत्यक्ष पहाया मिळालं तर निदान मंजुरी तरी द्याल..."

आमदारांना आता नाही म्हणणं शक्य नव्हतं. ते म्हणाले, "ठीक आहे रावसाहेब! वेधशाळेचा अंदाज जून उलटला तरी खरा ठरत नाहीय - जेमतेम मुतल्याप्रमाणे पाऊस झालाय थोडासा - बस्... जाऊन येऊ या... पुन्हा माझंही बजेट सेशन आहे - वेळ नाही मिळणार. हे आमचे नवे इंजिनिअर अक्षयबाबू काय तोडगा काढतात हे मला पाहायचं आहे."

ते सर्वजण तामुलवाडीला पोचले तेव्हा तहसीलदारांना चालण्याच्या श्रमानं धाप लागली होती. त्यांनी पाटलाच्या वाड्यावर विश्रांती घेण्याचं ठरवलं. आमदारांनाही त्यांच्या पक्षकार्यकर्त्यांनी घेरा घातला, तेव्हा अक्षयसोबत सरपंच आणि तो ग्रामस्थ उरला. त्यांनी पूर्ण गाव चारी बाजूंनी फिरून पाहायला सुरुवात केली असता पावसाचे थेंब तुटू लागले. मग चक्क गारांच्या वर्षावात धुंवाधार पर्जन्यवृष्टी सुरू झाली... पाहाता पाहाता ओढे भरून वाढू लागले. शांतपणे झुळझुळणारी पूर्णा नदी उन्मत्त झेपावू लागली... आणि पूर आल्यामुळे त्यांना तामुलवाडीतच मुक्काम ठोकावा लागला होता!

पाटलाच्या वाड्यावर चहा-फराळ झाला आणि पुन्हा अक्षय बाहेर पडला. पुन्हा एकदा त्याला तामुलवाडी पाहायची होती...

तुकड्या तुकड्यानं जाणवणारी दृश्य मालिका - पण सामूहिक परिवार मात्र संघटित - एकेरी! सुन्न करणारं विदारक वास्तव जेव्हा समोर येतं तेव्हा हताशतेखेरीज अन्य काही जाणवत नाही.

सेवानिवृत्त मास्तरांची लेक माहेरी बाळंतपणाला आलेली - मूल आडवं पोटात झालेलं - कालपासून तळमळत आहे! तिला दाखवायला, उपचाराला प्राथमिक आरोग्य केंद्राला न्यायला हवं... पूर ओसरला तरच जाता येईल. पण गावाच्या चारी दिशांच्या वाटा पाण्यानं गिळलेल्या...

एकाच खोलीतला भीषण अभावाचा संसार... कोपऱ्यात बाजेवर ती पोरसवदा पोर करुण किंकाळ्या फोडीत आक्रंदत होती. एक अनुभवी सुईण पोटावरून हात फिरवीत कळ जिरवत होती. ती वाढवणं धोकादायक होतं.

अक्षय क्षणभरच त्या घरात डोकावला... आणि लगेच बाहेर पडला. असं या विज्ञानयुगात पाहावं लागेल. हे त्याच्यासाठी अविश्वसनीय होतं.

सखल भागातली अवघी झोपडपट्टी रात्रभर पाण्याखाली होती. आता कुठे पाणी ओसरल्यामुळे ते गोरगरीब जीव, जे रात्रभर शाळेत आसऱ्याला होते, परत आले होते व आपला पाण्यात उद्ध्वस्त झालेला संसार पाहात होते. पाण्याच्या वेगानं लवचीक बांबूपासून बनलेल्या झोपड्या तगून होत्या; पण भांडीकुंडी, धान्य - पीठ व इतर सामान पार धुऊन निघालं होतं. अंगावरील वस्त्राखेरीज कपडे उरले नव्हते... काहींच्या बकऱ्या - कोंबड्याही वाहून गेल्या होत्या. खिशात पैका नव्हता. गावात आलेलं रॉकेल मागेच संपलं होतं. या गावचं रेशन दुकान दुकानदारानं सहा महिने माल उचलला नाही म्हणून रद्द करून ते नदीपल्याड गावाला जोडलं होतं. तिथं गेल्याखेरीज चूल पेटायला पण रॉकेल मिळायचं नाही. पावसानं लाकूड-फाटा, काटक्या-कुटक्याही ओल्या सर्द झाल्यामुळे पेटत नव्हत्या. भकास नजरेनं टळाटळा नदीच्या पुराकडे पाहात बसलेल्या स्त्रिया - दरवर्षीच्या अशा उद्ध्वस्त होण्यामुळे बनलेल्या दैववादी वृत्तीमुळे निर्विकारतेचे चेहऱ्यावर चढलेले लेप, पण केवढे बोचक, टोचणी लावणारे. उघडी, उकिडवी बसलेली पुरुष मंडळी, हलक्या स्वरात कुजबुजणारी - पोटाची, रोजगाराची व संसाराची चिंता त्यातून प्रकट होत होती. उघडीनागडी पोरं मात्र तहान भूक विसरून पुराचं पाणी पाहात खिदळत होती. जीवनाची आशा, जगण्याची उमेद वाढविणारी ती प्रकाशकिरणे वाटली अक्षयला. त्याला त्यांच्यात मोरया गोसावीची नि:संग छबी दिसली.

सरपंच अक्षयला सांगत होता, "सायेब, चहूबाजूंनी पाणी असल्यामुळे गावच्या मातीखाली पाझर झिरपून सदैव ओल आणतो... आमची घरं - कितीही पक्का पाया रचला तरी धा-पाच वर्षांत ढासळतात; कारण खालची जमीन दलदल झालीय..."

काही ठिकाणी त्यानं पहारीनं खणायला लावलं, तेव्हा एका झटक्यात पहार जमिनीच्या आत सहजतेनं गेली होती! अक्षयला त्या क्षणी त्या गावाची वर्षावर्षाला कणाकणानं येणारी मृत्यूची चाहूल जाणवली आणि त्याच्या मनात काही विचार पक्के होत गेले!

'हिस्स-' असा आवाज झाला. अक्षय सरपंचाशी बोलण्याच्या नादामध्ये जात असताना त्या आवाजानं भानावर आला. समोर एक हिरवागर्द साप सळसळत होता. मानवी चाहुलीनं त्यानं आवाज केला होता. अक्षय तो निघून जाईपर्यंत थबकला होता!

"साहेब, पाऊस सुरू झाला की तामुलवाडीला साप-विंचवाचा हा असा त्रास

होतो बघा! दर वर्षाला एक-दोन सर्पदंशाचे मृत्यू ठरलेले बघा...!''

पुन्हा मनात एक हताशतेची उठलेली लहार... सर्पदंशावर इलाज होऊ शकतो, हे त्याचं विज्ञाननिष्ठ मन आजवर ग्वाही देत आलेलं; पण आज ते खरं वाटेना... त्याला आपली उच्च तांत्रिक डिग्रीही फोल, कवडीमोलाची वाटू लागली.

''आमच्या वाडीला तामुलवाडी हे नाव इथं मिळणाऱ्या स्ट्राँग कडक तंबाखूच्या पिकामुळे पडलं बघा साहेब!'' सरपंच सांगत होते, ''पण कधी कधी वाटतं, यामागे देवाची करणी असावी! अशा पुराच्या प्रसंगी घरच्या घरी तंबाखूची पानं वळून विडी केली जाते. तिच्या झुरक्यात वेदना हलक्या होतात...''

पुन्हा एकदा थक्क व्हायची अक्षयवर आलेली पाळी... गावात रोगावर उपचार करायला एकही डॉक्टर वा आरोग्यसेवक नाही... त्यामुळे शरीरवेदनेवर इथल्या कडक तंबाखूचं सरळ सेवन करणं वा बिड्या वळवून फुंकणं हाच एक अक्सीर रामबाण उपाय त्यांना माहीत होता, सहज मिळणारा होता. त्याला स्त्रिया व मुलेही अपवाद नव्हती. मास्तराच्या मुलीची ती कळ जिरवणारी सुईण मधूनमधून तंबाखूची गोळी दाढेखाली ठेवण्यासाठी देत होती.

तापानं फणफणलेल्या पोरांना निपचित पडून राहण्यासाठी अशीच गोळी आईबाप द्यायचे...

''पुरे सरपंच, पुरे - मला माझीच शरम वाटू लागली आहे!'' अक्षय म्हणाला. त्याचा स्वर कमालीचा प्रांजळ वाटत होता. इथून पळून जावे, ही नोकरी सोडावी व मुंबईला परत आपल्या परिचित - संपन्न, भरपेट विश्वात जावं हा मोह होत होता. पण विवेकी मन टोकत होतं, आत्मपरीक्षणाला भाग पाडीत होतं!

पण ते किती त्रासदायक, छळवादी होतं!

''अशाही स्थितीत तुम्ही कशाच्या बळावर जगता सरपंच साहेब?''

अक्षयनं न राहवून विचारलं. कारण तो कालपासून तामुलवाडीत ग्रामस्थांच्या सोबत होता. त्यांची जगण्याची विजिगीषा पाहात होता.

तामुलवाडी कुणी या ठिकाणी बसवली, माहीत नाही; पण गावाचा हा पुराच्या पाण्यानं वेढा पडण्याचा प्रसंग बहुतेक दरवर्षी यायचा! अडकलेली बाळंतीण, वाहून गेलेली झोपडपट्टी, साप-विंचवांचा सुळसुळाट, जगापासून संपर्क तुटल्यामुळे धान्य-मीठ-मिरची नाही, रॉकेल नाही, की पिण्यासाठी शुद्ध पाणी नाही. गावात व पंचक्रोशीत डॉक्टर वा तज्ज्ञ नर्सही नाही...

पुराचा वेढा पडला की जीवन वाटणारे पाणी मृत्यूचं विक्राळ रूप घेऊन येतं - आणि दरवर्षी चार-दोन मानवी बळी घेतं. त्या पुराच्या पाण्याचा उरी धडकी भरवणारा आवाज मग अणूरेणूत सामावला जातो... जिल्ह्यासाठी वरदायिनी, पूज्य ठरलेल्या पूर्णामायेला इथं मात्र यमाची - तमाची - सहोदर मानलं जातं...

जिल्ह्याच्या - राज्याच्या विकासप्रक्रियेत जणू तामुलवाडीचं नामोनिशाणही नव्हतं!

"साहेब, जन्माला आलं की मरेपर्यंत जगावं लागतंच - मग ते जगणं किती का कठीण असेना!" सरपंच म्हणाला, "सतत मृत्यूच्या छायेत जीव मुठीत धरून वावरावं लागतं. अशा वेळी एकच सहारा आहे - नदीकाठचं महादेवाचं देऊळ! आमच्या जीवनमरणाचं सारं ओझं - भार त्याच्या चरणी अर्पण करतो... आणि तो मोरया गोसावी - कोठून आला देव जाणे, पण त्याची प्रार्थना - त्याची पूजा आम्हाला धीर देते - जगायचं बळ देते! तो काही फारसा बोलत नाही. अडल्या - नडल्याच्या घरी - त्याला कसं समजतं माहीत नाही - अचूक येतो, देवाचं भस्म लावतो; अंगावरून - मस्तकावरून शिवशंभो हर-हर करीत हात फिरवतो... आणि मग येणारं मरणही सुखानं - शांतपणे येतं, साहेब-"

अक्षय चांगलाच बुचकळ्यात पडला होता. मोरया गोसावी हा खरंच जिवंत खराखुरा माणूस आहे का श्रद्धा-धैर्याचं प्रतीक? गावकऱ्यांनी त्यांच्यासाठी निर्माण केलेलं प्रतीक - मिथक?

"पुरामुळे तामुलवाडीत दोन दिवस आमदार अडकून पडले" अशी खमंग बातमी या काळात वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. नदीचा पूर ओसरण्याचा वेग मंद होता, त्यामुळे आमदार व तहसीलदार हे तामुलवाडीत कमालीचे बोअर होत पाटलाच्या वाड्यात आराम करीत होते.

अक्षय मात्र चळ लागल्याप्रमाणे वाडीत भिरभिर हिंडत होता. प्रत्येक घरात जात होता. लोकांशी बोलत होता, त्याहीपेक्षा जास्त ऐकत होता. त्याला त्यांच्या प्राप्त परिस्थितीतही चिवटपणे जगण्याचा पीळ शोधायचा होता आणि निर्लेपपणे मृत्यूला सामोरं जाणाऱ्या वृत्तीचंही रहस्य जाणून घ्यायचं होतं! त्याचा हा शोध पुन्हा पुन्हा नदीकाठचं पुरातन शिवमंदिर आणि निस्संग अवलिया मोरया गोसावीपाशी येऊन थांबत होता. पण मोरया गोसावीचं मौन आणि शून्यवत नजर त्याला अनाकलनीय वाटत होती! प्रसंगी चीड यावी इतपत अलिप्त व कोरडी वाटत होती.

पण ती फोल आहे हे अक्षयला जाणवलं ते त्या दुपारी वाडीच्या एका तरण्याताठ्या शेतकऱ्याच्या मृत्यूनं. दुपारी अक्षय शिवमंदिरात भिंतीला टेकून पहुडला होता आणि मोरया गोसावी पद्मासनात समाधी लावून बसलेला. ओठातून घुमणारे शब्द येत होते, "शिव शंभो हरहर - शिवशंभो!"

अक्षय त्याचा डोळे मिटलेला चेहरा एकटक पाहात होता. त्याला तो वाचायचा होता; पण मनातलं त्यावर काही उमटलेलं दिसत नव्हतं! हीच तर कर्मयोगी अवस्था नाही? कसलीही अपेक्षा न करता जगण्याचं एकदा साधलं की आपल्या आधुनिक जगातले जगण्याचे सारे संदर्भ व प्रेरणा, स्पर्धा, संघर्ष आणि चंगळवादी शैलीचं जगणं

फोल ठरतं आणि या पूर्णा नदी व तीन ओढ्यांनी जगापासून अलग केलेल्या तामुलवाडीत तरी ते अप्रस्तुत ठरतात!

तो किती वेळ तरी आपल्याच विचारात नादावला होता. अचानक भान आलं ते मोरया गोसावीनं समाधी सोडीत त्याला दिलेल्या हाकेनं. "बाळ, आपल्याला गावात जायचं आहे." दोन रात्री व तिसऱ्या दिवशी जवळजवळ असूनही तो अक्षयशी एक शब्दही बोलला नव्हता. आजची त्याची हाक त्याला त्यामुळे क्षणभर अविश्वसनीय वाटली.

"चला महाराज." तो उठत म्हणाला.

मोरया गोसावीचे दाढी-मिशीच्या जंजाळात हरवलेले ओठ किंचित हलले होते. जणू त्यानं स्मित केलं होतं, उबदार व स्नेहल. कारण त्याच्या डोळ्यांत त्याच्या छटा अक्षयला जाणवल्या.

कदाचित-कदाचित आज आपण दोन दिवस वाडीच्या लोकांच्या जीवन-मरणाचा शोध घेत आहोत, तो कदाचित सफल होईल...

पण-पण ते कळून तरी काय फायदा? हा सवाल त्याला फटकारून गेला, तरीही मनात त्याची जिज्ञासा होती. त्या ओढीत तो मोरया गोसावीसोबत चालू लागला.

काही क्षणातच मोरया गोसावी एका झोपडीत शिरला. त्याच्या मागोमाग अक्षयही. तेथे एका मोडक्या खाटेवर त्या घराचा तरणाबांड गडी वेदना असह्य होत असल्यामुळे किंचाळत होता. सारं अंग काळंनिळं पडलं होतं. त्याला सर्पदंश तर झाला नाही? अक्षयच्या मनात शंका आली आणि ती खरी असल्याची ग्वाही त्या गड्याच्या म्हातारीनं दिली -

"आज रामपारी झाड्याला जाताना पोराचा पाय एका सापावर पडला आणि त्यानं चावा घेतला..."

ओ माय गॉड... किती वेळ गेला बहुमोल असा. या काळात त्याला तातडीनं दवाखान्यात हलवलं असतं तर तो वाचला असता. आता तो मृत्यूच्या दारी आहे. कदाचित आपल्यासमोरच... अक्षयला आपल्या आजीचा मृतदेह आठवला आणि मृत्यूच्या जाणिवेनं काळीज थरकापलं.

तरीही काहीतरी केलं पाहिजे, असं त्याला वाटत होतं! त्यानं खिसा चाचपला, त्याचा दाढीचा छोटासा किट खिशात होता, त्यातलं त्यानं रेझर काढलं व जेथे सर्पदंश झाला तेथे तो ठेवून कातडी कापली व वरच्या पिंढऱ्या गच्च धरल्या. मोरया गोसावी अचल व निस्संगपणे त्याची कृती पाहात होता. त्यानं मदतही केली नाही की विरोधही केला नाही. अक्षयच्या त्या कृतीचा काही उपयोग झाला नाही. कारण फिकटं रक्त बाहेर येत होतं, मंदपणे. म्हणजेच त्याच्या जगण्याच्या यंत्रणा मंदावत होत्या. तो निःसंशय मरणाच्या दाराशी होता.

अक्षय बापुडा झाला, तसा मोरया गोसावी पुढे होत खाटेच्या समोर बसला. आणि खणखणीत स्वरात उच्चार केला, "शिवशंभो हर हर!" आणि वेदनेनं तडफडणाऱ्या गड्याच्या तोंडावरून, देहावरून व सर्पदंश झालेल्या पायावरून हळुवारपणे हात फिरवायला सुरुवात केली.

"बेटा, शांत हो, शांत हो! तुझ्या महाप्रस्थानाची वेळ आली आहे. ते शुभ आहे. हा मलिन झालेला देह तुला आता त्यागायचा आहे आणि लवकरच तुला नवा उत्तम देह मिळणार आहे. तू तूच राहणार आहेस, नंतरही, अनंत काळासाठी. कारण आत्मा अमर असतो. बस्, शिवशंकराचं नामस्मरण कर आणि शांतपणे वेदना सहन कर-"

अक्षय थिजल्याप्रमाणे मोरया गोसावीचे शब्द ऐकत होता. मनात पुन्हा प्रश्नांची वादळं उमटत होती. त्याचं मरणाचं तत्त्वज्ञान त्याला फोल वाटत होतं. वृद्धापकाळी, जराजर्जर अवस्थेत जगण्याच्या यंत्रणा निकामी होत मरण जवळ येतं तेव्हा कदाचित हा उपदेश योग्य होता पण आज जेमतेम तिशीतला तो गडी साप चावून उपचाराअभावी मरत होता. आणि हा गोसावी त्याला जीवनाच्या अनंतत्वाचं तत्त्वज्ञान सांगत होता. पढिक पंडिताप्रमाणे का मूर्खाप्रमाणे?... तो विषण्ण हसला!

पण मोरया गोसावीच्या शब्दात काय जादू होती की, तो विव्हळणारा गडी शांत झाला होता. आणि अस्फुट स्वरात शिवस्तुती करीत त्याच्यासमोर शांतपणे त्यानं अंतिम श्वास सोडला!

त्यानंतर गोसावी त्याला मास्तराच्या घरात घेऊन गेला. त्यांची लेक अद्यापही बाळंतवेणा काढीत तळमळत होती. गोसावीनं तिच्याही चेहऱ्यावर हात फिरवला, तसाच नऊ महिन्यांच्या गर्भारानं फुललेल्या पोटावरूनही. अक्षय पाहात होता. मोरया गोसावीच्या चेहऱ्यावर तेच कनवाळू वत्सल मंदसं स्मित होतं, त्यानं आता त्याला काहीसं भारल्यासारखं वाटत होतं!

"गुरुजी, काही काळजी करू नका. महादेवाचं स्मरण करा. तुमची लेक सुखरूप बाळंत होईल."

"तसं झालं आणि मुलगा झाला तर मी त्याचं नाव मोरया ठेवीन महाराज."

मास्तरांची पाठ थोपटीत मोरया गोसावी बाहेर आला व देवळाकडे चालू लागला. अक्षयनंही त्यांची पाठ धरली! पुन्हा देवळात त्याचं पद्मासन घालून समाधी लावणं आणि अक्षयचं त्याच्याकडे एकटक पाहात मनातील विचारांचा, प्रश्नांचा शोध घेणं, हा क्रम सुरूच होता!

"महाराज..." आता त्यांच्याशी बोललंच पाहिजे, असं वाटून अक्षय तीव्र स्वरात म्हणाला, तसं मोरया गोसावीनं डोळे उघडले व म्हटलं, "बोल बाळ, चिंताक्रांत दिसतोस. गोंधळलेला वाटतोस."

"हां महाराज, गेले दोन रात्री व तीन दिवस मी तुमच्या संगतीला आहे. मंत्रचळ

झाल्याप्रमाणे! का? कळत नाही, पण काही विचारायचं आहे. विचारू? परवानगी आहे?''

मोरया गोसावी मंदपणे हसला. ती त्याची संमती समजून अक्षयनं विचारलं, ''महाराज, आजवर कधी मी अध्यात्माचा विचार केला नाही; पण इथं आल्यावर, तामुलवाडीकरांचं निसर्गाच्या लहरीवर, म्हणजेच पर्यायानं नियतीवर, अवलंबून असलेलं परावलंबी व कुंठित जीवन पाहिलं की वाटतं, त्यांना जगण्या-मरण्यासाठी धर्म-श्रद्धा नामक अफूची गोळी, इथं तंबाखू अमाप पिकतो, म्हणून तंबाखूची गोळी म्हणावी लागेल, त्याची फार गरज आहे. तुम्ही संन्यासी आहात. कदाचित वेदशास्त्रसंपन्न दर्शनकार असाल. तुम्ही याची कशी मीमांसा कराल? या नियतीच्या संकेतामागच्या ईश्वरी इच्छेचा कशा पद्धतीने अर्थ लावाल?''

कदाचित मोरया गोसावीला अक्षयकडून अशा कूटप्रश्नाची अपेक्षा नसावी. त्याच्या नजरेतलं ते वत्सल स्मित काहीसं झाकोळलं गेलंय, असं अक्षयला वाटलं!

''आज तुमच्या संगतीनं एक मरण पाहिलं व जीवनाची प्रतिभा, नव्या जीवनाच्या जगप्रवेशाची नांदी-मातेच्या वेणेतून अनुभवली. तुम्ही काय केलं? त्या मरत्या जिवाला वाचवू शकला नाहीत की येणाऱ्या जिवाला आणू शकणार आहात? केवळ वैद्यकीय मदतीचा अभाव हे त्या दोन घरांच्या जीवन-मरणाच्या वेदनेचं कारण आहे.''

''ती-ती त्यांची नियतीच म्हणावी लागेल. कदाचित गावाची पण!'' मोरया गोसावीचा स्वर त्याला बचावात्मक व पोकळ वाटत होता. ''माझं दर्शनशास्त्र असं सांगतं की, जन्म-मरण असं काही नसतं. कारण आत्मा अमर असतो. तो वस्त्रांप्रमाणे शरीर बदलतो...''

''ते एक वेळ मान्य करता येईल. कारण एक हिंदू म्हणून माझ्यावरही तेच संस्कार आहेत.'' अक्षय म्हणाला, ''पण तो जन्मास आला आहे तुमच्या कर्म विपाकाच्या सिद्धान्तानुसार. त्याला या जगात किमान भौतिक सुख - सुविधा मिळाली पाहिजे. ती त्याला मिळत नाही, कारण आम्ही प्रशासक व आमच्यावर अधिकार गाजवणारे राज्यकर्ते नालायक आहेत. इथं नियतीचा काय संबंध?''

''तुमचं - तुमचं नातकर्तेपण व त्यामुळे त्यांचं पुराशी व पर्यायानं मृत्यूशी बांधलं गेलेलं जीवन हीच ती नियती आहे बेटा!''

''हा- हा जबाबदारी झटकण्याचा, रणांगणातून पळ काढण्याचा मार्ग झाला महाराज. मला तो खरंच तर्काला व बुद्धीला पटत नाही.'' अक्षय आवेगानं म्हणाला, ''मनाला तुमची शिवस्तुती व मंत्रोच्चाराच्या नादच्या प्रभावानं एक अज्ञातसा दिलासा मिळतो, पण तो तर्काच्या कसोटीवर टिकत नाही.''

''बेटा, हा तुझ्या अध्यात्माच्या, एका अज्ञात वाटेवरील शोधयात्रेचा आरंभबिंदू आहे.'' मोरया गोसावी म्हणाला, ''आपल्या प्रश्नांची उत्तरं आपणच शोधायची असतात. त्यासाठीचं शास्त्र म्हणजे अध्यात्म आहे, बेटा. तू आज त्या वाटेवर

आहेस... निवड तुझी आहे - त्यात शिरायचं की माघारी वळायचं!"

"महाराज, तुमचं इथलं निस्संग वागणं, आज दुपारची कृती मला खरंच नाही समजत आणि समजली तरी नाही पटत. तुम्ही तामुलवाडीकरांना वाटणारी जीवनाची, आय मीन पाणी वा उदकाची भीती घालवू शकत नाहीत की पुराच्या अस्मानी संकटातून त्यांना वाचवू शकत नाहीत. फार तर तुम्ही त्यांना मरताना शांती देता, पण जीवन खचितच नाही. ते अभागी जीवनही मुळातच दैववादी असल्यामुळे मरताना आत्मबळासाठी तुम्हाला शरण जातात. त्यांचं हे मरण शांत, समाधानी नसतं, तर बेमतलबी व भौतिक अविकासातून उद्भवलेलं, मानवनिर्मित असतं... त्याला आम्ही जसे जबाबदार आहोत, तसेच तुम्हीही त्यांना शांतपणे मरणाची वाट दाखवत - अध्यात्माच्या गूढ प्रदेशात शिरायला लावता. मात्र त्यांना बंड करून उठायला, संघर्ष करून आपले प्रश्न - रस्त्याचे, पुनर्वसनाचे व पुराचा धोका टाळण्यासाठी संरक्षक भिंत बांधून घेण्यासाठी सरकारशी झगडण्याचे शिकवत नाही......

मोरया गोसावी अक्षयचे अंतस्थ खदखदीतून येणारे उद्रेक शांतपणे झेलत होता, पण नजरेतली स्थितप्रज्ञता आणि निर्विकारपणा काहीसा लोपला होता.

"गावाचा प्रश्न पुनर्वसनानं सुटेल. ओढ्याचं पाणी वळवून सुटेल. ते विज्ञान करेल. राज्यकर्ते करतील. तेथे तुमची श्रद्धा, तुमचं दर्शन कुठेतरी फोल आहे असं नाही तुम्हाला वाटत?"

तो मोरया गोसावी शांत होता, स्थिर होता. समाधी मघाशीच सोडली असली तरी अजून पद्मासनातच होता. पण पाठीचा कणा किंचित ढिलावला होता. क्षणभर अक्षयला जाणवलं, त्याच्या निस्संगपणाला कुठेतरी सूक्ष्म तडा गेला आहे. त्यानं पुन्हा शून्यात नजर लावली आहे.

"शिवशंभो हर हर! बाळ, मी एक निस्संग फकीर. जीवन मरणाचं मला कसलं सोयर सुतक नाही. आपलं सारं जीवन त्या प्रभूच्या इच्छेवरच अवलंबून असतं आणि मरण म्हणजे देहाचं वस्त्र बदलणं! पण या काळात जगताना माणसाला सुख - समाधान मिळालं पाहिजे असं तू म्हणतोस. मग सुख - सुख म्हणजे काय असतं? ते व्यक्तिसापेक्ष असतं, म्हणूनच खोटं, तकलादू असतं. आणि त्यात जितकं गुरफटून जाऊ तितकं त्या प्रभूपासून दूर जाऊ. तसं जाऊ नये म्हणून तो अशा यातना देत असावा, अशी माझी श्रद्धा आहे. त्यामुळे तुला पडणारे प्रश्न मला पडत नाहीत, सर्पदंशाने त्या अश्राप जिवाचा आज मृत्यू झाला. तो औषधानं वाचला असता, असं तुझं म्हणणं आहे. तुझ्या परीनं ते खरं आहे, पण या तामुलवाडीत पूर्वजन्माच्या कर्मानं तो जन्मास आला व तारुण्यातच कष्ट, गरिबी व अस्मानी संकटानं जीर्ण देह त्यागून गेला... हे - हे फार गहन गूढ आहे, बेटा, माझा तेवढा अधिकार नाही, पण..." क्षणभर तो थांबला आणि 'शिवशंभो हरहर शिवशंभो!" असा आपलं सारं बळ

एकवटून खणखणीत स्वरात शिवस्तुतीचा जागर केला.

अक्षयला वाटलं - ही त्याची दुबळी धडपड आहे. त्यानं त्यामुळे बुद्ध्याच अखेरचा घाव घातला

"मला तर तुम्ही हे जे बोलतात ते पटलं नाही. महाराज, तुम्हाला ते कुठेतरी फोल व पोकळ वाटत नाही?"

त्यांचा संवाद थांबला होता. मोरया गोसावी समाधीत लीन झाला होता, पण देह अचल नव्हता. सूक्ष्मसे तरंग जाणवत होते, का हा आपला भास आहे? अक्षयला शंका वाटली.

तो मनानं थकून तिथंच आडवा झाला.

परभणीला परतल्यावर, रेस्टहाऊसच्या संपन्न सूटमध्ये विसावल्यावर आणि पोटात उबदार अन्न आणि घसा जाळणारी व्हिस्की गेल्यावर त्याला बरं वाटलं... फोनवर मुंबईला आईशी आणि एंगेजमेंट झालेल्या प्रियेशी बोलल्यावर मन हलकंफुलकं झालं! त्यानं तांत्रिक बाजू मांडीत गावची जमीन पाझरामुळे भुसभुशीत झाली आहे व मुळातच अर्धी कच्ची - पक्की असलेली घरं कशी कमकुवत आहेत व जोराचा पाऊस व वादळी वारा त्यांचा सहजतेनं कसा कसा विध्वंस करील व अपरिमित जीवितहानी होईल याचं शास्त्रशुद्ध विवेचन करून, सुस्पष्ट निष्कर्ष काढून गावाचं एक विशेष बाब म्हणून पुनर्वसन करावं असा अहवाल दिला.....

पण पुनर्वसनाची जादा किंमत व प्रचलित नियमात बसत नसल्यामुळे त्यात मंत्रिमंडळाची कॅबिनेटची मंजुरी आवश्यक होती! व तिथपर्यंत फाईल पोचायला कार्यकारी अभियंता, जिल्हाधिकारी, मुख्य अभियंता - आयुक्त करीत ती पाटबंधारे, महसूल व पुनर्वसन सचिव व मंत्री यांच्यामार्फत ती मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयापर्यंत पोहोचणं म्हणजे काही वर्षांची तरी निश्चितच बेगमी होती.

त्यावर तात्पुरता उपाय म्हणून कलेक्टरांनी गावठाण वाढ योजनेंतर्गत नदीच्या पलीकडे सुरक्षित जागी गायरान जमीन पुनर्वसनासाठी देऊ केली. गावकऱ्यांना तेथे फक्त प्लॉटस् मिळणार होते, तेही किंमत देऊन... पण घर उभारण्यासाठी काही अनुदान, कर्ज मिळणार नव्हतं. पुन्हा रस्ते - वीज - पाणी आदी नागरी सुविधा जिल्हा परिषदेनं पुरवाव्यात असं त्यांनी सूचित केलं होतं. जिल्हा परिषदेनं नेहमीप्रमाणे निधी नाही असं कारण सांगत काखा वर केल्या होत्या... त्यामुळे तामुलवाडीकरांनी ते प्लॉटस् घेण्याचे नाकारले!

अवघ्या सहा महिन्यांतच अक्षयनं ही नोकरी सोडून परत मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला होता.

"ठीक आहे. आज नाही, काही वर्षांनं का होईना पुनर्वसनाचा प्रस्ताव मंजूर होईल, अशी आपण आशा करायची... तोवर मात्र आम्ही जगू का राहू माहीत नाही..."

सरपंचांची हताश प्रतिक्रिया.

मास्तरांना तो नोकरी सोडून परत मुंबईला जात आहे हे समजलं होतं, तेव्हा ते कडाडले, "तुम्ही पण साहेब, पळपुटे निघालात... खेडेगावचं... ग्रामीण भागाचं उघडंनागडं वास्तव तुम्ही स्वीकारू शकत नाहीत... तुम्ही मुर्दाड नाही... संवेदनशील आहात म्हणून त्रास करून घेता, बेचैन होता.... पण तुमच्या संवेदना आम्हाला दिलासा देऊ शकत नाहीत... म्हणून वांझोट्या आहेत त्या, वांझोट्या..."

अक्षय मान घालून ऐकत होता.. मास्तराचं वाक्ताडन त्याला वर्मी घायाळ करीत होतं, पण प्रतिवाद करायचं बळ नव्हतं आणि मुख्य म्हणजे तोंड नव्हतं. त्यांचा एक एक शब्द कटू असला तरी खरा होता....

"मला मोरया गोसावींचं दर्शन घ्यायचं आहे. चला, आपण देवळात जाऊ या.." अक्षय म्हणाला. तसे सारे गावकरी एकदम शांत झाले व त्यांनी मान खाली घातली. अक्षय चरकला, म्हणाला "असे तुम्ही गप्प का? काय झालं?"

मास्तर दीर्घ सुस्कारा टाकीत म्हणाले, "तुम्ही गेल्यावर दुसऱ्याच दिवशी त्यांनी सदेह आम्हा सर्वांच्या साक्षीनं या पूर्णामायेत जलसमाधी घेतली. वरच्या काठाला पाच मैलावर मोठा पूल आहे, त्यावरून त्यांनी उडी टाकली. खरे साधू संन्यासी होते ते. त्यांचा देहही हाती आला नाही..."

अक्षयला गलबलून आलं होतं. त्याला मोठ्यानं ओरडून म्हणावंसं वाटत होतं. "नाही, हा देहत्याग नाही. मी त्यांना मारलं - मी मी मारलं.... त्यांची श्रद्धा, त्यांचा नि:संगपणा मी त्या रात्री त्यांना अस्वस्थ करणारे प्रश्न विचारत खरवडून काढला. त्यांचं शांत - नि:संग मन प्रथमच संदेही, साशंक बनलं असावं. त्यांना श्रद्धाहीन जगणं एक पळही मंजूर नसावं. कारण गावासाठी ते जगण्याचं श्रद्धास्थान होते! म्हणून म्हणून असेल कदाचित - त्यांनी देह त्यागला...."

शिवमंदिरात आल्यावर तो सर्वांना म्हणाला, "बंधूंनो, आपण जावं. मी इथं थोडावेळ बसेन. मन शांत झाल्यावर मी परत परभणीस जाईन. मला सोबतीची गरज नाही. प्लीज-"

मोरया गोसावींविना ते देऊळ भकास, प्राणहीन, काजळी, धरल्याप्रमाणे भासत होतं!

"हे भगवान, मी कदाचित प्रथमच व अखेरची प्रार्थना करतोय. तुझ्यापुढे हात जोडतोय. मला क्षमा कर! पण मला, मोरया गोसावीला विज्ञाननिष्ठ व तर्कशुद्ध प्रश्न माझ्या मते असलेले, विचारून त्याच्या श्रद्धांचं व जीवननिष्ठेचं भंजन करायचा काय अधिकार होता? मी तामुलवाडीचं संकट पुनर्वसन करून सुटणं शक्य असलं तरी सोडवू शकत नाही. कारण मी फार मामुली अधिकारी आहे. पण अशाही कुंठित अवस्थेत निसर्गाच्या अस्मानी लहरीवर जगताना गावकऱ्यांच्या श्रद्धेचं बळ होतं मोरया गोसावी... त्याचं दु:ख शांत करणारं व जीवन-मरणाला अध्यात्माचा स्पर्श देत खोटं,

तकलादू असलं तरी अर्थपूर्ण करणारं! ते मी खर्ची केलं..... मला माफ कर, माफ कर!"

तो गाभाऱ्यातून बाहेर आला, तसे त्याला मास्तर सामोरे झाले. त्यांच्या हातात सहा महिन्यांचं एक बालक निरागसपणे हसत मस्ती करीत होतं.

"साहेब, तिकडं मोरया गोसावींनं जलसमाधी घेतली व इकडं याचा जन्म झाला. माझी लेक सुखरूप बाळंत झाली. त्याचं नाव मी मोरया ठेवलं आहे. साऱ्या गावाला, आणि खोटं कशाला सांगू, विज्ञानाचा शिक्षक असूनही या गावात जन्म गेल्यामुळे मलाही वाटलं, नव्हे, आता ती आमची अभंग श्रद्धा बनली आहे की, मोरया गोसावींनं याच्या रूपानं पुनर्जन्म घेतला आहे."

अवाक् होऊन अक्षय ऐकत होता!

"गावात कुणी मरणाच्या वाटेवर असला की मला सांगावा येतो. मी या चिमुकल्या मोरयाला तेथे नेतो. त्याचे हात त्या मरणाऱ्या माणसाच्या चेहेऱ्यावरून फिरवतो... आणि नवल म्हणजे, तो माणूस शांतपणे मृत्यूला सामोरा जातो. माणूस कसाही जगू शकतो साहेब, पण मरताना बळ हवं. ते तेव्हा मोरया गोसावी द्यायचा व आता बाळाच्या रूपानं पुनर्जन्म घेऊन पुन्हा तोच देतोय - आम्हा तामुलवाडीकरांना त्याचीच तर गरज आहे..."

परभणी व तिथून मुंबईला जाताना अक्षय स्वत:ला एकच बजावत होता. "हे सारं तुला एक निरर्थक, बेमतलबी स्वप्न म्हणून विसरून जायचं आहे. त्याचा जिवाला त्रास करून घ्यायचा नाही. आणि त्याबाबत प्रश्न विचारून स्वत:ला घायाळ करून घ्यायचं नाही...

अंडरस्टँड?"

०-०-०

# १२. स्वत:लाच रचित गेलो

आजची पहाट कशी कमलसाठी झिंग घेऊन आली होती.

नेहमीपेक्षा लवकर तिला जाग आली होती. पण पूर्ण झोप झाल्यामुळे ताजेतवाने वाटत होते. रात्री, झोपेतही तिच्या नजरेसमोर तिचं हसरं घरकुल येत होतं. मधल्या काळात तिची मुळं त्या घरकुलातून उखडून टाकली आहेत या विदारक वास्तवाला तिच्या सुप्त मनानं विस्मृतीच्या दर्यात पार डुबवून टाकलं होतं. तिच्या अवघ्या अस्तित्वाचं केंद्रबिंदू असलेल्या घराच्या स्वप्नील स्मृतीनं आज उठल्या उठल्या मन उल्हासित झालं होतं. हवेत छानपैकी गारवा होता. म्हणून चूळ भरून ती आपल्या स्पेशल वार्डातून बाहेर आली व दवाखान्यासमोरील बागेत फेरफटका मारू लागली, तिचं मन काहीसं उत्तेजित झालं होतं.

मागे काही वर्षांपूर्वी बदलून आलेल्या एका फुलवेड्या डॉक्टरमुळे त्या इस्पितळात छानपैकी बाग विकसित झालेली होती. कमलचा आवडता पारिजात मंदपणे दरवळत नाजूक सुकुमार फुलांचा सडा शिंपीत होता. पक्ष्यांचा मधुर किलबिलाट मन प्रमोदित करीत होता. तिने खाली वाकून ओंजळभर फुले वेचून त्याचा ताजा सुवास रंध्रारंध्रात भरून घेतला. तेव्हा तीव्रतेने तिला गावंसं वाटलं, अचानक तिच्या ओठावर एक परिचित गाण्याची लकेर आली.

"मिल गये मिल गये आज मेरे सनम
आज मेरे जमीपर नही है कदम।"

ती खुदकन हसली. आज नक्की श्रीकांत आपल्याला घ्यायला येईल. आपण पूर्ण बरे झालो आहोत. त्या नव्यानं रुजू झालेल्या ऑनररी डॉक्टरनं त्याला स्वत: फोन केला होता.

ती ते गाणं गुणगुणत आपल्या रूमकडे वळली, तेव्हा सनईचे मंगल सूर कानी पडले. त्या नव्या डॉक्टरांची ही कल्पना होती. रोज ते सकाळी व दिवसाच्या विविध प्रहरी त्या त्या प्रकारचे राग असलेले वाद्यसंगीत लावत. त्यामुळे रोग्याच्या मनावर अनुकूल परिणाम होतो म्हणे.

पुन्हा तिला खुदकन हसू येतं. डॉक्टर किती छान प्रभावी बोलतात. त्यांनीच तर तिला विश्वास दिला आहे की, ती बरी झाली आहे. तिचं कमकुवत मन व त्याचे मनोविकार आटोक्यात आले आहेत. तिच्यात मुळातच 'फायटिंग स्पिरीट' आहे; ते जागृत झाले. आता तिला कधी नैराश्य येणार नाही. किती छान, पण सोपं बोलतात डॉक्टर. सारे मनाचे आजार चुटकीसरशी पळवून लावतात. हो, त्यांची ख्याती आहे म्हणे. म्हणे काय, माझा अनुभवच सांगतो की, ते सारं खरं असलं पाहिजे. मी, मी आता पूर्ण बरी झाली आहे ना. त्याचं कारण डॉक्टरांचा हा संगीतमय उपचार किंवा दुसरं काही असू दे, पण सनईचे सूर या पहाटे किती आनंददायी व प्रसन्न वाटतात.

एक सुरेल सम साधून विलक्षण नजाकतीनं आलाप घेत पूरिया राग शहनाईवर बिस्मिल्ला खान यांनी पूर्ण केला होता. टेप थांबला होता. कमलने उत्स्फूर्त दाद दिली. "वाऽऽबहोत खूब! क्या कहने?"

नेहमी चिडखोर भाव चेहऱ्यावर वागवणाऱ्या व म्हशीसारख्या नजरेनं पाहणाऱ्या नर्सने खेकसत दिलेला चहाही तिला चवदार वाटला व तिने आपल्या मधुर आवाजात म्हटले, "थँक्स सिस्टर..." ती अवाक होऊन परत जाताच कमलला परत हसू फुटलं...

आपल्या डोळ्यात पाणी आल्याचे तिला जाणवले... हे अश्रू पण किती आनंदाचे आहेत.. आपला श्रीकांत तसा रसिक आहे. आता या क्षणी आला तर तो ते ओठाने टिपून घेत कानात उष्ण श्वास सोडत विलक्षण मार्दवाने म्हणेल, "वेडे, मी आलोय तुला घेऊन जायला... आता पुन्हा कधी अश्रू दिसणार नाहीत या मीनाक्षी नेत्रात... मी वचन देतो."

खरंच असं होईल? आज श्रीकांत येईल आपल्याला न्यायला?

गाडीवानानं बैलांच्या पुठ्ठ्यावर कडाडून आसूड ओढावा व त्यांनी तुफान पळत सुटावं, तसं या प्रश्नांच्या फटकाऱ्यानं ती चौफेर उधळली आणि मन भरून आलं, छाती जडावली व क्षणार्धात निस्त्राण होत तिनं पलंगावर स्वत:ला झोकून दिलं. उशीत तोंड खुपसलं. जिवाच्या करारानं बंद ओठाआड हुंदके जिरवत तिची काया गदगदत राहिली.

काही वेळाने उशी चिंब केल्यानंतर ती रिती-कोरडी होऊन गेली. एक सुन्न ग्लानी तिला जाणवत होती. पण विचार व संवेदना तल्लख आहेत व आपलं भान कायम आहे, हे जाणवताच तिला हायसं वाटलं. पहाटेपासूनची सारी लक्षणं डिप्रेशनच्या विकारापासून आपली मुक्तता झाली आहे, याची ग्वाही देत होती. डॉक्टरांनी काही उगाच वृथा विश्वास दिला नाही. मी खरंच बरी झाली आहे.

मग श्रीकांत का येत नाही मला घ्यायला?

या प्रश्नाला उत्तर देताना तिचं मन जणू तिलाच ग्वाही देत होतं. "कमल, धीर

घर! तो येणार आहे तुला घेण्यासाठी. डॉक्टरांनी त्याला फोन केला आहे. ते माझ्यासारखा वेडीलाही प्रभावित करतात, तर श्रीकांत तर चांगला जाणता आहे... तो येईल, येणार आहे..''

कमलला वाटलं, आपल्या सुरेल आवाजात गाणं म्हणून त्याला बोलवावे., ''आ जा रे, परदेसी, मैं तो कबसे खडी इस पार...''

श्रीकांत तिला म्हणायचा, ''कमल, आता मी टेप विकून टाकतो. काय गरज आहे मला त्याची? मला गाणं ऐकण्याचा मूड आला की तुला बस् फर्माईश करणार... आणि माझी ही लता, अनुराधा पौडवाल छानपैकी गाणी ऐकवणार.. तीही माझ्या आवडत्या जुन्या हिंदी सिनेमांची.''

तिनं ट्रांझिस्टर ऑन केला. आकाशवाणी केंद्रावर 'रामचरितमानस'' सुरू होतं. त्यानंतरच्या बातम्या व सुगम संगीत ती आवर्जून ऐकायची.

बातम्यांमध्ये परभणी येथे जानेवारीत भरणाऱ्या अडुसष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कवी नारायण सुर्वे यांची निवड झाल्याची बातमी होती. कमल त्या बातमीनं हरखून गेली. तिच्या माहेरी, तिच्या आवडत्या कवीच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलन होणार होतं.

पुढील बातम्या जणू तिच्या कानावर येत नव्हत्या. ती पाहता पाहता उत्तेजित झाली आणि दिवास्वप्नांचे सुरेख जाळं विणू लागली. घरी औरंगाबादेत श्रीकांतपुढे तिने लाडिक हट्ट धरला आहे व त्यानंही परभणीला संमेलनासाठी जोडीनं जायचं मान्य केलं आहे. घरी बाबा व आई किती खूश होतील जावयाला लेकीसह पाहून. आईच्या वत्सल मिठीत शिरताना व बाबांच्या गळी पडताना हे खरं वाटत नाही की, मी त्यांची कन्या नाही. मला त्यांनी अनाथ आश्रमातून एक वर्षाची असताना आणली आहे. संदीपभय्याला बहीण हवी म्हणून.

आणि पुन्हा एकदा उदासीनता तिच्या मनात घर करून गेली. श्रीकांत खरंच मला घ्यायला येईल?

''कमल, क्षणात उत्तेजित होणे व तितक्यात चटकन उदास होणं असा तुझा स्वभाव आहे. तुझा मूड कधी हर्ष तर कधी खेद यामध्ये हेलकावत असतो.''

डॉक्टरांचे शब्द तिच्या कानात घुमत होते व तिला स्वत:कडे डोळसपणे पाहायला प्रवृत्त करीत होते.

''अशा स्वभावाला आमच्या मानसशास्त्रीय भाषेत सायक्लोथायमिक व्यक्तिमत्त्व म्हणतात. तू इथं आलीस तेव्हा एम. डी. पी. म्हणजे मॅनिक डिप्रेसिव्ह सायकोसिसची शिकार झाली होतीस. यामध्ये टोकाचं विकृत औदासीन्य व टोकाची विकृत उत्तेजना माणसाच्या मनात आळीपाळीने येत असते... पण आता तुझी ती स्टेज संपली आहे. बेसिकली तुझ्या या दोन्ही भावना असंतुलित होण्याइतपत तीव्रतम नव्हत्या - नाहीत.

पण श्रीकांतने तुला नाकारणे हा धक्का एवढा जबर होता की तुला एम. डी. पी.चा झटका आला. पण तू एक कणखर स्त्री आहेस, तुझ्यातलं फायटिंग स्पिरिट जबर आहे. म्हणून तू इतक्या लवकर माझ्या उपचारांना प्रतिसाद दिलास."

डॉक्टरांनी उपचाराचा एक भाग म्हणून कमलला तटस्थतेने विचार करायला व आपल्या भावनांची चिरफाड करायला शिकवलं होतं. आताही ती पडल्या पडल्या स्वत:ला तपासून पाहात होती.

आईची मी जीव की प्राण. बाबांना मी घरी नजरेसमोर क्षणभरही दिसले नाही की चैन पडत नसे आणि संदीपभय्या तर मला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपायचा. असे वीस उन्हाळे, पावसाळे फुलांनी घातलेल्या पायघड्यावरून चालताना अत्तराच्या फायाप्रमाणे गोड सुगंध मागे ठेवीत उडून गेले. आणि 'कन्या हे परक्याचे धन' ही जाणीव बाबांना झाली. कमलसाठी वरसंशोधन त्यांनी आरंभलं. तीही गोड भावविश्वात रमत होती. त्या काळातलं तिचं गुणगुणायचं गाणं होतं, "परिकथेतील राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का, भाव दाटले मनीं अनामिक, साद तयांना देशील का!"

आणि पहिला नकार पचवणं कमलला फारच जड गेलं. का त्यानं आधी पसंती देऊन नाकारलं? रूप, सौंदर्य, शिक्षण, झालंच तर सुरेल आवाज. काय कमी होतं माझ्यात? हा प्रश्न तिला सतावत होता. त्यानंतरही दोन - तीन वेळा असंच घडलं, तेव्हा ती आईच्या गळी पडत रडत म्हणाली,

"आई, मला यापुढे दाखवून नाही घ्यायचं. भले माझं लग्न नाही झालं तरी हरकत नाही. मला नकार नाही सहन होतं."

"जाऊ दे बेटा, ते सारे तुला नाकारणारे गाजरपारखी होते, त्यांना अस्सल माणिक मोती कळत नाहीत." तिची समजूत घालत आई म्हणाली होती.

तेव्हा गंभीर होत बाबा म्हणाले, "अशी किती समजूत घालणार आहेस? एकदा तिलाही कळलंच पाहिजे."

संदीपभय्या तिथंच वाचीत बसला होता, तो म्हणाल, "नो, नो बाबा...."

"नाही बेटा" बाबा म्हणाले, "मलाही सांगताना फार वेदना होतात. मीही हे विसरून गेलो होतो. पण लग्नाच्या वेळी सारं सांगायला हवं म्हणून प्रत्येक स्थळाला सांगितलं. वाटलं होतं. ते मन मोठं करून हे न्यून - ते खरं तर न्यून नाही, म्हणून स्वीकारतील. पण खरंच, आपला समाज किती बुरसटलेला आहे, शी..."

कमल भयचकित झाली होती. बाबांचा तो गंभीर स्वर तिच्या काळजाचं पाणी पाणी करून गेला होता.. काहीतरी त्यांना आपल्याला लागोपाठ आलेल्या नकाराच्या संदर्भात सांगायचे आहे. पण ते काहीतरी भयंकर, असह्य असं आहे. म्हणून त्यांचा स्वर व्याकूळ झालेला आहे.

"मला तिची अवस्था पाहावत नाही संदीप. काय कमी आहे तिच्यात? रूप,

गुण, स्वर आणि शिक्षण या चारही आघाड्यांवर तिचं पारडं भारी आहे. ज्याला ती मिळेल तो नशीबवान खरा. पण...!''

''पण, पण काय बाबा?'' कापऱ्या आवाजात कमलने विचारले, ''मला भीती वाटते हो मला - मला..''

''शांत हो पोरी आणि मन घट्ट कर. हे आज ना उद्या तुला कळणारच आहे. ते तुला सांगणं कधी तरी भाग आहे. मग आजच का नको?'' बाबा म्हणाले, ''हे बघ, मी जे आज सांगणार आहे, त्यानं आपल्या नात्यामध्ये फरक पडणार नाहीय; पण हे सत्य आहे की, तू आमच्या रक्तमांसाचा गोळा नाहीस. मात्र प्रेम, घामाचा आणि वात्सल्य, ममतेचा वारसा आहेस.''

''मी, मी... म्हणजे म्हणजे मला असं असं म्हणायचं आहे की...'' कमलचे शब्द फुटतच नव्हते. पण आतून काहीतरी पायाखालची जमीन काढून घेणारं व आपली रुजलेली मुळं उखडणारं असं काहीतरी बाबा सांगणार आहेत, याची अस्पष्टशी जाणीव होत होती आणि मन नैराश्याच्या, उदासीनतेच्या डोहात बुडत आहे असा भास होत होता.

''हां बेटा, तुला कदाचित मला काय म्हणायचं आहे ते समजलं असावं.'' बाबा म्हणाले, ''आम्ही तुला अनाथ आश्रमातून एक वर्षाची असताना आणले आहे. संदीपला बहीण हवी होती व तुझी आई त्याच्या जन्माच्या वेळीच मरता मरता वाचली होती. म्हणून तिला बाळाला पुन्हा जन्म देणं परवडणार नव्हतं. धोक्याचं होतं म्हणून...

''आई'', तिच्याकडे झेपावत कमल म्हणाली, ''तू तू सांग, हे हे खोटं आहे? तुझा वत्सल स्पर्श, माझी तुम्हाबद्दलची ओढ ही तुझ्या गर्भात न वाढताच आली आहे?''

तिला थोपटीत आई म्हणाली, ''पोरी, शांत हो. या वस्तुस्थितीनं काय फरक पडतो? कृष्ण जन्म दिलेल्या देवकीपेक्षा यशोदेचा अधिक खरा पुत्र होता... तू माझी आहेस. आमची आहेस. बेटा.''

''हो कमल, भाऊबीज व राखी आठव आणि सांग, मी तुझा भाऊ नाही? संदीपभय्या नाही?''

त्या रात्री ती क्षणभरही स्वस्थ नव्हती. चुपचाप काही न बोलता कूस बदलत होती. बाजूच्या खोलीत संदीप व आई - बाबा किती वेळ तरी जागे होते.

दुसऱ्या दिवसापासूनची कमल वेगळीच झाली होती. उदासीनतेची लेणी शृंगारलेली व अलिप्ततेची कवचकुंडलं ल्यालेली. पराभूत कर्णाप्रमाणे एकाकी. तिचं सदैव चिवचिवणं, आईभोवती पिंगा घालीत अगदी छोट्यातली छोटी घटनाही तिला रंगवून सांगणे, सदैव लकेरी घेत गुणगुणणं आणि रेडिओ श्रीलंकावरील सकाळी 'भूले बिसरे गीत' कार्यक्रमातील आवडलेलं गाणं दिवसभर वेळीअवेळी म्हणणं... सारं सारं संपलं

होतं. ती कामापुरतंच, तेही शक्यतो खुणांच्या भाषेत बोलायची. आपल्या खोलीमध्ये पलंगावर स्वस्थपणे आढ्याकडे नजर लावून राहायची. या उदास मनोवृत्तीला जोड मिळाली ती चिडचिडपणाची. तिची समजूत घालण्यासाठी तिघांपैकी कुणी आलं की, प्रथम ती सरळ दुर्लक्ष करायची, नाही तर ती नाराजी व्यक्त करीत बेफाम होत बोलायची. तिची जेवणावरची वासनाही उडाली होती व झपाट्याने तिचं वजन उतरत होतं. कमळासारखा चेहरा सुकून काळवंडला होता. साध्या चालण्याच्या क्रियेनंही तिला थकवा जाणवत होता.

तिला आपलं हे वागणं बरोबर नाही, त्याचा पूर्ण घराला त्रास होतोय हे समजत होतं. पण बाबांनी केलेला गौप्यस्फोट तिला समूळ हादरवून गेला होता. आपण कुणाच्या तरी पापाचे, अवांछित कामवासनेचे फळ आहोत, आपल्या जन्मदात्री आईसाठी आपण जन्माच्या वेळी कलंकरूप ठरलो होतो. म्हणून उकिरड्यावर तिनं टाकलं. पोलिसांनी मग अनाथ आश्रमात दाखल केलं. पण आई-बाबांना आपण आवडलोत व हे घर मिळालं.. आजवर किती उबदार व लोभस विश्‍व होतं आपलं. पण त्या गौप्यस्फोटाने एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं. आईचा वत्सल आश्‍वस्त स्पर्श तोच होता. पण कमललाच तिच्या जागी रंगरूप नसलेली एक स्त्री दिसायची. बाबांचं लक्ष व मायेची पाखर तशीच होती, उलट ती कदाचित अपराधी भावनेच्या टोचणीमुळे वाढली होती. पण तिला तेथे अज्ञात पिता- जो तिच्या आईचा प्रेमी होता, की बलात्कारी होता देव जाणे, जाणवायचा आणि ती ताठर व्हायची, आक्रसून जायची. संदीपभय्याचा स्पर्शही तिला वेगळी जाणीव द्यायचा. त्याचं आपलं रक्ताचं नातं नाही...

तिच्या विचारांना व बुद्धीला पटायचं की, जन्म दिल्यानं कोणी आईबाप होत नाही. खस्ता खाऊन रात्र रात्र जागवीत ममतेनं संगोपन करता करता ते नातं जुळून येतं, तसं आपलं आहे. ते खऱ्याहून खरे माता - पिता व भाऊ आहेत.

तरीही मनाला ते भिडत नव्हतं. रक्ताची ओढ त्यात नाहीय, असं वाटत होतं. ते खरं नाहीय. परवा संदीपभय्याला स्कूटरचा छोटासाच ॲक्सिडेंट झाला, तेव्हा आपणही किती कळवळलो होतो. ही काळजी व ओढ आपलं नातं नाही सिद्ध करीत? आईच्या पायावर ऊनऊन पाण्याचा तांब्या निसटून कातडी भाजून निघाली तेव्हा मलमासोबत आपण आपल्या डोळ्यातील अश्रूंचा व मनातील काळजीचा लेप लावला होता. तेव्हा तिचं आपलं मायलेकीचं नातं नाही का अधोरेखित झालं? बाबा काही कामासाठी मुंबईला गेले होते, तेव्हा तुफानी पावसानं ते ट्रेन वाटेतच थांबल्यामुळे अडकून पडले होते. सुदैवाने जवळच मोबाईल फोन होता, त्यावरून त्यांनी निरोप दिला. तरीही आई ते येईपर्यंत डोळ्यात प्राण आणून वाट पाहत होती. तिच्या व्याकुळतेत आपणही सामील होत रात्रभर झोपलो नाही व जेव्हा बाबा थकूनभागून

सुखरूप परतले, तेव्हा रडत रडत आपण त्यांना आवेगानं मिठी घातली. तेव्हा ते माझ्या लेखी पिताच होते...

मग आपण अशा बेचैन, उदास का आहोत? मनातून ही जाणीव का जात नाही की जन्मदात्रीस आपण नकोसे होतो. आपण निश्चितच पापाचे फळ होतो. हे जगळं उपरं आहे. दयेचं, करुणेचं आहे. खऱ्या प्रेम व हक्काचे नाही.

त्या रात्री टी. व्ही.वर तीही सर्वांसोबत आग्रहाला बळी पडून सिनेमा पाहात होती. बाबांचा त्यांच्या जमान्यातला आवडता एक कलात्मक चित्रपट 'गर्म हवा' लागला होता. सिनेमा पाहाताना त्यातली गीता सिद्धार्थ मनगटाच्या रक्तवाहिन्या कापून आत्महत्या करते, ते दृश्य पाहून कमल कमालीची उत्तेजित झाली होती आणि सारे झोपी गेल्यावर एक पिसाट भावना तिच्या मनात घर करून राहिली की, आपलं जगात येणं हाच मुळी एक अपघात होता. तो कदाचित विधात्यालाही मंजूर नव्हता. हे जगणं बांडगुळाचं उपरं जगणं आहे. नो - मला असं जगणं मंजूर नाही. मला - मला या जगात राहण्याचा काही अधिकार नाही.

तिनं सिनेमाप्रमाणे संदीपभय्याच्या दाढीच्या सामानातील एक ब्लेड काढली व डाव्या मनगटाची रक्तवाहिनी कापली. पण मग आपलं रक्त पाहून तिलाच भोवळ आली, भेदरून जिवाच्या आकांताने तिने टाहो फोडला, "आई, बाबा, भय्या...."

तिला ताबडतोब दवाखान्यात दाखल करण्यात आलं. सुदैवाने तिने घेतलेली ब्लेड वापरलेली असल्यामुळे बोथट होती, म्हणून फारसा रक्तस्राव झाला नव्हता. पण आई, बाबा व संदीप हादरून गेले होते.

"धिस इज ए केस ऑफ अॅक्युट डिप्रेशन लीडिंग टू अटेम्प्ट टू स्युईसाईड." डॉक्टर सांगत होते, "पण मग तिलाच भीती वाटली, कदाचित जगण्याची आशा जागृत झाली असावी. म्हणून तिने हाक दिली, हे तुमचं सुदैव. ती तुमच्या हाती त्यामुळे लागली."

"तिनं असं का केलं असावं?"

"तुम्ही फ्राईडचं नाव ऐकलं असेलच. त्यांच्या मते प्रत्येक माणसाच्या अंतर्मनात जीवन व मृत्यू याचं प्रतिनिधित्व करणाऱ्या परस्परविरोधी शक्ती वास करीत असतात. "इरॉस' ही शक्ती जीवनाचा मूल स्रोत आहे. तर थानाटॉस (हे दोन्ही ग्रीक प्रतीकं आहेत.) ही विनाशाकडे ओढणारी प्रेरणा किंवा शक्ती आहे. जीवनातील ध्येयं साध्य होतील की नाही, इच्छा अपुऱ्याच राहणार काय, अशा निराशात्मक विचारांनी मनातला थानाटॉस जागी होते. कमलला तिचं जन्मरहस्य कळल्यामुळे सर्व बाबतीत उजवी असूनही वरपक्षांचे नकार झेलावे लागले. त्या स्वप्नभंगाच्या अस्वस्थ गडद निराशेमध्ये ती असताना तिला जेव्हा तुम्ही तिचं जन्मरहस्य सांगितलं तेव्हा ती हादरली आणि तिला ती स्वत:लाच नकोशी वाटत गेली. त्यातून हा आत्महत्येचा प्रयत्न तिने केला."

डॉक्टरांच्या 'शॉकथेरपी'ने आणि मनमोकळ्या गप्पानं कमल महिनाभरातच खडखडीत बरी झाली. या दोघांच्या गप्पांच्या सिटिंग सेशनमध्ये संदीपभय्या पण रस घेऊन सामील होत होता. डॉक्टरांनी त्याला क्लू दिला होता की, तिचं मन कणखर व्हायला पाहिजे व ती जरी अनाथ आश्रमातून आलेली असली तरी तिचं स्वतःचं हक्काचं घरकुल आहे व यात तिला काही दोष नाही हे पटवून देता आलं पाहिजे.....

संदीपला तिची संगीत व कवितेची आवड माहीत होती, पण तो पडला इंजिनिअरिंगचा विद्यार्थी, पण तिच्या मनाला उभारी मिळावी म्हणून साहित्याचं वाचन करून तिच्याशी गप्पा मारीत तिला रिझवायचा प्रयत्न करू लागला. तिच्याबरोबर संगीताच्या मैफलीला कळत नसूनही जाऊ लागला व तिला समजून घेण्याचा प्रयत्न करू लागला आणि अचानक त्याला एक जादूचा मंत्र सापडला. त्याचा अचूक वापर करीत कमलला सत्य सहजतेनं स्वतःला दूषण न देता स्वीकारायला त्यानं भाग पाडलं.

"कमल, तू नारायण सुर्वेंच्या कविता वाच. हा युगप्रवर्तक असा कामगार कवी. पण त्याच्या वडिलांना, म्हणजे गंगारामांना, तो फूटपाथवर सापडला. पण त्याचा त्यांनी किती सहजतेने स्वीकार केला. आजही ते उघडपणे व जाहीरपणे सांगतात व स्वतःला 'सूर्यकुलातील लोक' म्हणवून घेत कवितेतून म्हणतात

"मी लिहितो दारावर मांगल्यासाठी शेवटचा उच्चार
सूर्यकुलातील लोकांना थांबणे माहिती नाही.
त्याखाली कशासाठी हवे नावः निनावे म्हणतील म्हणून
आपल्या हाताचे ठसे पुरेसे का नाहीत?"

"कमल, तुझं नातं असलंच तर त्या प्रतिभावंत कवीच्या कलासाधनेशी, जीवनसाधनेशी आहे. पुन्हा सुर्व्यांना जसे प्रेमळ वडील भेटले, तुलाही हे आपलं घरकुल आहे व बिलिव्ह मी- आम्हा तिघांच्याही जगण्याचा केंद्रबिंदू तू आहेस. मला तर असं क्षणभरही वाटत नाही, तू माझी सख्खी बहीण नाहीस. खरं नातं हे मनाचं, प्रेमाचं व परस्पर ओढीचं असतं, ते रक्ताचं असलंच पाहिजे अशी काही अट नाही...." आणि खरंच कमल बदलली. नारायण सुर्व्यांचं जीवन व कविता वाचून तिला तिचा 'इरॉस' गवसला होता.

कात टाकून जसा नाग पुन्हा लसलसलेला जीवनगामी होतो, तशी कमल पण समरसून जीवनाचा क्षणन् क्षण उत्कटतेने जगू लागली. तिचं काव्यलेखन पुन्हा बहरून आलं, संगीतसाधना अधिक प्रखर बनली आणि झी. टी. व्ही. च्या 'अंताक्षरी' कार्यक्रमात व 'सारेगम' कार्यक्रमातून ती एकाच आठवड्यात चार दिवसांच्या अंतराने सर्वप्रथम आली आणि तिला श्रीकांतनं मागणी घातली आपणहून. तिचं छोट्या पडद्यावरचं मोहक रूप व तेवढाच आकर्षक आवाज ऐकून, पाहून. बाबांनी धूमधडाक्यात

त्यांचं लग्न लावून दिलं.

यावेळी मात्र त्यांनी आणि संदीपनं धोरणीपणानं तिचं जन्मरहस्य श्रीकांतपासून लपवून ठेवलं होतं. मागेपुढे यथावकाश सांगावं. तोवर परस्पर प्रेमात बांधले गेलेले जीव एकमेकांना नीट समजून घेतील व सारं काही सुरळीत होईल ही त्यांची प्रामाणिक भावना होती.

पण झालं विपरीत. बाबांच्या जवळच्या मित्राला हे कमलचं जन्मरहस्य ठाऊक होतं. त्यांनी वकील म्हणून कमलला कायदेशीर दत्तक घेण्यास मदतही केली होती. त्यांचा मुलगा हा श्रीकांतचा वर्गमित्र निघाला. त्यानं सहज मित्रांमध्ये गप्पा मारताना कमलच्या जन्मरहस्याचा स्फोट केला आणि श्रीकांत बिथरून गेला.

कमलवर निरतिशय प्रेम करणाऱ्या श्रीकांतसाठी आता कमल एकाएकी अस्पृश्य ठरली होती. त्यानं बेभान होत तिच्या अंगावर धावून जात म्हटलं, "तू तू मला फसवलंस. तुझ्या बापानं कुठल्या तरी गंद्या गटारीचा किडा माझ्या पदरी बांधला. ओ नो, मला ही कल्पनाच सहन होत नाही. माझा रक्ताच्या शुद्धतेवर आणि खानदानी गोष्टींवर विश्वास आहे."

एवढा उच्चशिक्षित केमिकल इंजिनिअर असलेला श्रीकांत एवढ्या बुरसटलेल्या व खुळचट विचारांचा असेल, असं तिला वाटलं नव्हतं. खरं तर तिला हे माहीतच नव्हतं. ती आपली समजून चालली होती की, बाबांनी त्यालाही आपलं जन्मरहस्य सांगितलं असणार. पण तिच्या सुखासाठी व तिनं केलेल्या आत्महत्त्येच्या प्रयत्नामुळे व्यथित होऊन त्यांनी ते न सांगण्याचा निर्णय घेतला असावा. पण त्याचा असा विपरीत परिणाम होईल व एवढा प्रचंड उद्रेक होईल असं तिला वाटलं नव्हतं.

"श्री, मला खरंच माहीत नव्हते की, बाबांनी तुला माझं जन्मरहस्य सांगितलं नव्हतं ते. अरे, जन्म का आपल्या हाती असतो? पण संस्काराने मी देसाई घराण्याची आहे. सांग, या वर्षभरात माझ्यात काही खोट आढळून आली?"

तो थोडा जरी भानावर असता तरी त्याला निरुत्तर व्हावं लागलं असतं. कालपर्यंत तिच्याभोवती पिंगा घालत प्रेमकूजन करण्यात तो थकत नव्हता. पण एका रहस्यस्फोटानं तो पार बदलून गेला होता.

खरंच का माणसे एवढी रूढी-परंपरेच्या ओझ्याला जळवासारखी चिकटून असतात? रक्ताची शुद्धता, रिवाज महत्त्वाचे; मात्र शिक्षण, संस्कार व नीतिमत्ता यांना काहीच स्थान नाही? शिक्षणानं माणूस बदलतो, विचार अधिक प्रगल्भ होतात म्हणे. हिंदू पुरुष मात्र आजन्म सनातनीच असतो की काय?

कमल त्या रात्री अक्षरश: मिटून गेली. एक शब्दही तिला बोलावासा वाटला नाही. बोलूनही फायदा नव्हता. कारण श्रीकांत एवढा बिथरलेला होता की, त्याच्यातलं माणूसपण संपलं होतं आणि त्यांच्या सहजीवनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या...

पुन्हा एकदा तीच लक्षणं कमलमध्ये दिसू लागली. परकोटीची तीव्र निराशा, अलिप्ततेचं कवच चढवून स्वत:च्या कोषात बद्ध होणं, झपाट्याने काळवंडणारा चेहरा व झडणारी काया, तहान व भुकेची जाणीव न होणे... हीही एक प्रकारची आत्महत्याच होती. कणाकणाने, क्षणाक्षणाने होणारी. ती अजून जिवंत होती एवढंच.

पुन्हा संदीप व बाबांनी तिला माहेरी आणून दवाखान्यात ॲडमिट करणं, डॉक्टरांची पुन्हा 'शॉकथेरपी', पुन्हा तिचं बरं होणं आणि नारायण सुर्व्यांच्या कवितेच्या आधारे मन पुन्हा सबल, कणखर बनविणं.

"त्याच दिवशी मनाच्या एका कोऱ्या पानावर लिहिले,
हे नारायणा, अशा नंग्या दुनियवेत चालायची वाट,
लक्षात ठेव सगळ्या खाणाखुणा
भेटला हरेक माणूस, पिता, मित्र, कधी नागवणारा होऊन
रणरणत्या उन्हात डांबरी तव्यावर घेतले पायाचे तळवे होरपळून.
आता आलोच आहे जगात
वावरते आहे या उघड्या नागड्या वास्तव्यात
जगायलाच हवे, आपलेसे करायला हवे
कधी दोन घेत, कधी दोन देत.'

आता कमल पूर्ण बरी झाली आहे. डॉक्टरांच्या विश्वासाच्या बळावर वाट पाहात दिवस घालवते आहे. श्रीकांत पुन्हा तिला घ्यायला परत येईल. पुन्हा एकदा राखेतून फिनिक्स पक्ष्यानं भरारी घ्यावी तशा जळून गेलेल्या सहजीवनाच्या मृगजळातूनही हिरवळ लसलसून वर येईल....

संदीप आला तो तिची नजर चुकवीत, हातात एक नोटीस घेऊन. कमल बावरली, पण तिला जाणवलं, पूर्वीप्रमाणे हादरलो नाही आहोत. भयसूचक नांदी कानात वाजली तरी साहस पूर्णपणे तुटलेलं नाहीय, कदाचित विपरीत झेलायची सवय झाली असावी. तीव्र उदासीनता व तीव्र उत्तेजना जाणवत नाहीय. तरीही दोन्ही भावना फिकटपणे मनाला बिलगून आहेत.

ती श्रीकांतची नोटीस होती. त्यानं तिच्याकडून डायव्होर्स मागितला होता. तिनं तो कागद नजरेसमोर धरला. जे त्या रात्री संपून गेलं होतं, त्याला फक्त कायदेशीर रूप द्यायचं होतं.

डॉक्टरांनी तिला दिलासा दिला असला तरी मनोमन कुठे तरी त्यातली व्यर्थता व खोटी आशा तिला कळली होती. कमलला वाटलं, आपल्या भावना, संवेदना का बोथटल्या आहेत? भारतीय विवाहित स्त्रीसाठी घटस्फोट म्हणजे जन्माचा पराभव. तो आता आपल्या समोर येऊन ठाकलाय. आयुष्य निरर्थक झाल्याची जाणीवही लखलखते आहे... तरी आपल्याला तीव्र निराशेने व उदासीनतेचे घेरलेले नाहीय. मुख्य म्हणजे

तसं वाटतं नाही. घटस्फोट जर नामुष्की असेल तर ती दोघांसाठी पण असावी, असते. आपणच का स्वत:ला अपराधी समजायचं? इथं तर सारा दोष त्याचा आहे. मी का त्याची स्वत:ला शिक्षा करून घेऊ?

तिनं शांतपणे कसलाही सवाल न करता त्या कागदावर सही करून दिली. संदीपला तिच्या शांतपणाचं भय वाटलं. ते त्याच्या नजरेत उमटलं. ते ओळखून ती म्हणाली, "भय्या, घाबरू नकोस. इजा, बिजा झाला, पण आता तिजा होणार नाही. किंबहुना असं काहीसं मी कल्पिलं पण होतं, म्हणून धक्काही फारसा बसला नाही. खरं सांगू, श्रीकांत इज नो मॅच फॉर मी. त्याला माझं महत्त्व नाही. जो महत्त्व देतो रक्ताला, जन्माला व तथाकथित खानदानीला, ते माझ्या लेखी फोल आहे. नारायण सुर्व्यांच्या कवितेप्रमाणे मी सूर्यकुलातील लोकांपैकी एक आहे. मला त्याच्या नावाची गरज नाही. बाबांचं नाव आहे, ते पुरेसं आहे. आणि ते अभिमानानं मिरवावं असं आहे. मला बाकी सारं फिजूल वाटतं. या नव्या कणखर कमलचा निर्माता तू आहेस भय्या. तू नारायण सुर्व्यांचं जीवनरहस्य सांगून मला धीट बनवलंस. मी आता स्वत:ला एक निखळ माणूस समजते व एक प्रखर स्त्री...." संदीप तिच्याकडे थक्क होऊन पाहात राहिला.

"आता माझ्या पोटात एक जीव वाढतो आहे. बीज त्याचं आहे, पण क्षेत्र माझं आहे. खऱ्या अर्थानं तो माझा आहे. त्याच्या नावापुढे मी माझं नाव त्याला पसंत असेल तर लावेन, नाही तर कुणाचेही नाव तो लावणार नाही. त्याच्यावर असे संस्कार करीन की त्यानं फक्त माणूसपण आयुष्यभर जपावं. बस् ... आणि उद्या सुर्व्यांप्रमाणे ताठ मानेनं म्हणावं...

**"आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही**
**उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही**
**पैगंबर खूप भेटले, हेही काही खोटे नाही**
**स्वत:लाही उगीचच हात जोडताना पाहिले नाही**
**कळप करून ब्रह्मांडात हंबरत हिंडलो नाही**
**स्वत:लाच रचित गेलो, ही सवय गेलीच नाही."**

०-०-०

# १३. सारांश

"मदर, मी तुला दिलेलं वचन पाळलंय! त्या दिवसानंतर कधीही मी तुला माझं काळ तोंड दाखवलं नाहीय." मी प्रार्थनेच्या वेळी मनोमन म्हणालो.

आमच्या हार्डी घराण्याच्या अनेक पिढ्या ज्या 'चोवीस डिस्ट्रिक्ट' परगण्यात गुजरल्या, त्या प्रांतातल्या प्रसिद्ध सेंट थॉमस चर्चमध्ये मी आज कितीतरी वर्षांनी 'संडे प्रेअर' च्या निमित्तानं आलो होतो. गेल्या आठवड्यात माझी आई मेरी मदर अल्पशा आजारानं निवर्तली होती. तिच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून मी आज चर्चमध्ये आलो होतो. पूर्णत: नास्तिक असलो तरी मन हळुवार व भावव्याकूळ झालं असल्यामुळं माझ्या मनानं हा निर्णय घेतला होता. त्याचीही उद्याच्या पेपरसाठी हेडलाईन होणार होती व आजच्या संध्याकाळच्या लोकल टी. व्ही. चॅनेलसाठी 'ब्रेकिंग न्यूज' ठरणार होती. कारण या वर्षीच्या बुकर प्राईजचा मी विजेता लेखक होतो ना. पुन्हा माझी धर्म या संस्थेबाबतची परखड मतं जगजाहीर होती.

"मदर, तुझ्या आत्म्याला कदाचित नवल वाटल असेल. सैतानानं ताबा घेतलेल्या तुझ्या या पापी लेकराला अवचित कशी उपरती झाली, असंही तुला वाटलं असेल!"

त्या भव्य चर्चमधील मदर मेरीच्या व क्रूस वाहणाऱ्या येशू ख्रिस्तांच्या तसबिरी पाहात होतो. पण मनमानसात माझी आई आठवत होती. माझ्या सावत्रभावाच्या जवळ असलेल्या अल्बममध्ये अलीकडचे मदरचे बरेच फोटो होते. पण त्या मदरला मी ओळखत नव्हतो. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी घर सोडताना पस्तिशीतली माझी तरुण आई माझ्या मनात होती. त्यानंतरच्या चार दशकात मी तिला कधी भेटलो नव्हतो की तिनंही कधी माझ्याशी संपर्क साधला नव्हता. तिचं धर्मनिष्ठ ख्रिस्ती मन तिच्या मातृत्वभावनेवर हावी झालं होतं, त्यानं मला तिच्या पवित्र धार्मिक जीवनातून कायमचं हद्दपार केलं होतं!

"ठीक आहे मदर, तुझी हीच आज्ञा असेल तर तुझा पुत्र म्हणून मला तीही मान्य आहे. माझ्यासाठी ती फार कठोर सजा आहे, पण जसं तुझ्यासाठी धर्मजीवन महत्त्वाचं

आहे, तसंच माझ्यासाठी माझं लेखन! मी आजच हे घर व हे गाव सोडेन. तुला पुन्हा कधीही भेटणार नाही. नो, मदर नो! मला माझ्या लेखनाबद्दल उपरती होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळं वाट चुकलेलं लेकरू तुझ्याकडं परत येण्याचा संभव नाही...''

मी घर सोडताना बोललेलं सारं काही मला आताही आठवत होतं. आता ती या जगात नाही आणि आपण आता खरंच या अफाट दुनियेत एकाकी, अनाथ झालोत ही जाणीव मन व्याकूळ करीत होती.

त्यावेळचा मदरचा उदास, पुत्रवियोगाच्या जाणिवेनं खचलेला चेहरा मला आजही स्मरणात आहे. पण त्याच वेळी त्या चेहऱ्यावर धर्मनिष्ठेची अविचल मुद्राही कोरलेली होती. सैतानानं आपल्या मुलाच्या मनाचा ताबा घेतला आहे व त्या असुरी प्रभावाखाली तो अनैतिक स्वरूपाच्या, हिंस्र उघड्या-वाघड्या जीवनाच्या अश्लील कथा लिहीत आहे. त्याच्या वियोगाच्या जाणिवेनं तिचं मातृत्व तीळतीळ तुटत असणार. पण तिचा जन्म हा तिच्या मते येशू ख्रिस्तासाठी आहे आणि त्या पवित्र जीवनाशी माझं वागणं, माझं लिहिणं सुसंगत नाही. मुख्य म्हणजे त्याबाबत मला जराही पश्चात्ताप होत नाही. धर्मभ्रष्ट झालेला मुलगा की, पवित्र धर्म? यामध्ये तिनं धर्माची निवड केली होती. म्हणून मला घर सोडणं भाग होतं.

त्या घटनेलाही आता चार दशकं झाली. मीही आता वृद्धत्वाच्या दिशेनं वाटचाल करीत होतो.. स्वैर, बेबंद जीवनाचा परिणाम निसर्गानं दाखवायला केव्हाच प्रारंभ केला होता. अनेक व्याधींनी शरीर पोखरलं होतं. जीवन उपभोगण्याची आणि लेखनाची धुंदी बऱ्याच प्रमाणात ओसरली होती. पपांच्या जीवनाला केंद्रस्थानी ठरवून लिहिलेल्या बुकर विजेत्या 'दि सटॅनिक हिरो' या कादंबरीनंतर गेल्या दीड वर्षात फारसं मनासारखं लिहून होत नव्हतं. जणू मी आजवर जे जीवन-तत्त्वज्ञान मनी बाळगून व त्यावर निष्ठा ठेवून जगलो, ते मला मनोमन कुठंतरी अपुरं व पोकळ वाटू लागलं होतं. ही जाणीव तशी अस्पष्टच होती. आज ती काहीशी तीव्र व नेमकी जाणवत होती. एवढंच!

याचा कुठं तरी मदरच्या निधनाशी व माझ्या व्याधीनं घेरलेल्या शरीराशी संबंध आहे काय? मी कुठंतरी माझं जीवनतत्त्वज्ञान नाकारत तर नाही ना?

छट्.... मनात उठलेला हा तीव्र इन्कार मला क्षणभर उभारी देऊन गेला. हिंसा, सेक्स आणि क्रौर्य या आदिम मानवी वृत्तींचा वेध घेणारं लेखकीय जीवन ही माझी नियती होती. हे जग, ही उघडीवागडी दुनियाही तेवढीच खरी होती आणि साहित्य हा जीवनाचा आरसा आहे असं मानणारा मी, त्याचा माझ्या लेखनातून वेध घेत होतो, धीटपणे अन् पूर्ण ताकदीनं! ते लेखन इंग्रजी साहित्यात वादळ उठवून गेलं. माझ्या अनेक पुस्तकांवर अश्लीलतेचे खटले भरले गेले. चर्चनं त्या सैतानी कलाकृती म्हणून वाळीत टाकल्या. पण मी ग्रेट ब्रिटनचा नागरिक होतो. ईश्वराचा दूत मोहंमद पैगंबरांची

नालस्ती केली म्हणून धर्मनिष्ठ इस्लामींनी ठार मारावं असा ज्याच्याविरुद्ध हुकूमनामा काढला होता, त्या सलमान रश्दीलाही इंग्लंडनेच आसरा दिला होता. 'लेखन व विचार स्वातंत्र्य' या लोकशाही मूल्यांच्या आधारे त्याला आसरा मिळाला होता. त्या देशात माझ्यावर तसा बाका प्रसंग येणं शक्य नव्हतं. पण ख्रिश्चनांमधला एक फार मोठा धर्मनिष्ठ वर्ग मला सलमान रश्दीप्रमाणं धर्मद्रोही मानत होता हे मात्र खरं. त्याच पंथाच्या माझ्या आईनं चार दशकांपूर्वीच सैतानानं माझ्या अंतरात्म्याचा ताबा घेतल्याचं मानून मला घरातून बाहेर काढलं होतं.

खरं तर, मी तिच्यासाठी कोणतेही धार्मिक विधी करू नयेत, असं मदर मेरीनं तिच्या मृत्युपत्रात स्पष्टपणे नमूद करून पुत्राचा अंतिम अधिकारही नाकारला होता. तो तिनं दिला होता माझ्या सावत्रभावाला. खरं तर, माझ्या वडिलांनी त्याच्या आईशी विधिवत विवाहही केला नव्हता, तसंच त्यांनी मदरला कधी घटस्फोट दिला नव्हता. खरं तर दोन ध्रुवांवर जगणारे ते दोन जीव तरुण वयात प्रेमात पडून एक झाले. पण त्यांच्यात बांधून ठेवणारा सहजीवनाचा एकही धागा नव्हता. तरीही पपांचं मदरवरील प्रेम अजब, अतार्किक होतं. मदरचं त्याबाबतचं स्पष्टीकरण तिच्या धर्मनिष्ठ विचारांचं द्योतक होतं, "अजूनही त्यांच्या मनात ख्रिस्त धर्माचा एक कोपरा शिल्लक आहे..." त्या पपांच्या विवाहबाह्य संबंधाचा मदरनं सदैव तिटकाराच केला होता. त्यासाठी त्यांना ती नेहमी शिव्याशाप देत आली होती. तरीही माझा पुत्र म्हणून अंत्यविधीचा अधिकार नाकारून विवाहबाह्य संबंधातून बापानं या दुनियेत आणलेल्या माझ्या सावत्र भावाला तो अधिकार मृत्युपत्रान्वये मदरनं देऊ केला होता. कारण तिची सवतही चर्चला नियमित जायची. मदरनं माझा आयुष्यभर दुस्वास केला, त्याची ही परिसीमा होती. तरीही तिच्या निधनाचं वृत्त कळताच मी माझी सारी कामं बाजूला सारून इथं आलो होतो. माझ्या त्या सावत्र भावाचे बेसुमार मद्यपानामुळं लिव्हर बिघडले होते. मरणासन्न अवस्थेत उपचार घेत असलेल्या धर्मादाय हॉस्पिटलमधून शोधून त्याला आणण्यात आलं. त्याच्या हस्ते मदरचे अंत्यविधी ख्रिस्ती धर्माप्रमाणं करून परत त्याला दवाखान्यात पाठवलं होतं.

मदरच्या दफनविधीनंतरचा आजचा रविवार होता. तिला 'संडे प्रेअर' फार प्रिय होती. इथं आल्यापासून मागील तीन दिवसात माझं मन हळुवार झालं होतं. माझं मलाच त्याचं नवल वाटत होतं. त्या भावविभोर अवस्थेनं मला आज थॉमस चर्चमध्ये संडे प्रेअरला येण्यासाठी मजबूर केलं होतं.

त्या मदरसाठी माझी आजची संडे प्रेअर होती. जिचं मुख मी सोळाव्या वर्षी घर सोडल्यानंतर तिच्या कठोर आज्ञेमुळं जिवंतपणी पुन्हा कधीही पाहिलं नव्हतं. तिच्यासाठी आज मी मनापासून प्रार्थना करीत होतो. आजवर माझ्या आयुष्याला ज्याची कधीच जाणीव झाली नव्हती. अशी एक पवित्र, उदात्त भावना मला स्पर्शून जात होती. मदर

आज जिवंत असती आणि मला मनापासून प्रेअर करताना तिनं पाहिलं असतं तर तिला किती बरं वाटलं असतं!

"मदर, तू मला जन्म दिलास व नऊ महिने उदरात आणि नंतर सोळा वर्षं वाढवलंस, त्या तुझ्या ऋणातून मी आज मुक्त होत आहे. पुन्हा कदाचित कधीच मी चर्चमध्ये जाणार नाही....."

मी हॉटेलच्या वातानुकूलित सूटमध्ये विषण्णपणे पहुडलो होतो. सायंकाळची लंडनची फ्लाईट होती. आता मला अक्षरश: काहीच काम नव्हतं. खरं तर, लोकल टी. व्ही चॅनेल, रेडिओ व वृत्तपत्रांना माझ्या मुलाखती हव्या होत्या, पण मी त्या साऱ्यांना नकार दिला होता. आज मला कुणाशीही संवाद साधायचा नव्हता. कारण मी अस्वस्थ होतो आणि माझ्या बेचैनीचा, अस्वस्थतेचा केंद्रबिंदू होता मदर! मला राहून राहून तो प्रसंग आठवत होता, ज्या दिवशी मी घर सोडलं होतं त्याच दिवशी मी रोमहून पळून आलो होतो.

"मदर, फर्गिव्ह मी! पण मला तिथं राहणं खरंच शक्य नव्हतं. त्या धार्मिक जीवनासाठी माझा जन्म नाहीय."

माझ्या या स्पष्टोक्तीनं मदरवर जणू मर्मांतक प्रहार केला होता. ती तळमळून म्हणाली, "बेटा, नक्कीच फादर म्हणतात तसा तुझ्या मनाचा त्या पापी सैतानानं ताबा घेतलाय. नाही तर माझा मुलगा असा व्हॅटिकन सिटीमधून फादरला न सांगता सवरता पळून आला नसता. का असा तू पळून आलास?"

"मदर, कसं सांगू तुला? ते तुला कधीच पटणार नाही." मी म्हणालो, "अगं, मला मनमुराद जीवन जगायचं आहे. हे विशाल जग जवळून पाहायचं आहे...."

"तुझ्या पपांसारखं अनिर्बंध - स्वैर...?"

"खरं सांगायचं झालं तर, येस मॉम! उजेड आणि अंधार, सुष्ट आणि दुष्ट, हिंसा, क्रौर्य, साहस- साऱ्या आदिम भावना व निसर्गप्रेरणा जाणून घ्यायच्या आहेत. त्या साहित्यात साकार करायच्या आहेत. अधिक स्पष्ट सांगायचं तर लेखक ही माझी ओळख आहे व लेखन हीच माझी नियती...."

व्हॅटिकन सिटीच्या त्या पवित्र, पण मला न पटणाऱ्या व म्हणूनच खोट्या वाटणाऱ्या, उदास कळकट नियमांनी करकचून बांधलेल्या व जीवन हे पापाचं मूळ आहे असं समजून कठोर देहदंडयुक्त जीवन जगणाऱ्या वातावरणात मला राहाणं एका महिन्यातच असह्य झालं होतं. तिथून मी चक्क पळून घरी आलो होतो.

रानावनात आणि माणसांपेक्षा वन्यपशूंत आणि सागराच्या सान्निध्यात रमणाऱ्या, बलदंड व रसरसतं जीवन जगणाऱ्या माझ्या पपांनी दोन्ही बाहू फैलावून माझं स्वागत केलं. मला मिठीत घेत म्हटलं, "ये बेटा, तुझं स्वागत असो! अगदी वेळेवर परत आलास. गेली दोन वर्षं आपण सागर सफरीचं जे स्वप्न पाहिलं होतं ते यंदा पूर्ण

होणार. मी नुकताच सौदा केला आहे. एका महिन्यात एक सागरी बोट दुरुस्त करून नव्या रूपात आपल्याला मिळणार आहे. चांगलं महिनाभर प्रशांत सागरात सफर करू. वादळवारे झेलीत, समुद्रधून ऐकत नवी अनोखी दुनिया पाहू. कदाचित त्यातून तुला लेखनाला नवे विषय मिळतील."

पपांचे खारावलेले निळे डोळे नव्या अदम्य साहसाच्या कल्पनेनं चमकत होते. "बेटा, जग किती अनोखं, सुंदर, व समृद्ध आहे. ते सर्वांगानं अनुभवणं हीच खरी जिंदगी आहे.."

पपांचा हा वादळी वारसा माझ्या नसानसात भिनला होता. म्हणूनच मदरच्या पवित्र पण कंटाळवाण्या धार्मिक दुनियेत मी अस्वस्थ होतो. माझी घुमसट तिला समजत नव्हती. तिच्यासाठी चर्चच्या माध्यमातून मानवतेची व त्या द्वारे येशू ख्रिस्ताची सेवा हे जीवनाचं अंतिम ध्येय होतं. तिला स्वत:ला तरुणपणी नन् व्हायचं होतं. त्या माध्यमातून धार्मिक जीवन जगायचं होतं. पण तारुण्याच्या वादळी रक्तओढीनं ती पपांच्या प्रेमात पडली. जेव्हा ती त्यातून भानावर आली तेव्हा ती संसारी स्त्री झाली होती. तिच्याकडून मला जन्म दिला गेला होता. पपांच्या जंगली साहसाच्या दर्यावर्दी जीवनामध्ये आणि विशेषत्वानं त्यांच्या शिकारी जीवनामध्ये ती स्वत:ला 'मिसफिट' समजत होती. दोघांचा सुसंवाद तुटत गेला. ती चर्चकडं अधिकाधिक झुकत गेली. त्यातूनच मला धार्मिक शिक्षण देऊन चर्चच्या सेवेसाठी 'फादर' बनवायचं, असं तिच्या मनानं घेतलं. त्यासाठी मला विचारावंसं तिला वाटलं नाही. मला तिनं गृहीत धरलं होतं. "मुलाला त्यात काय विचारायचं?" अशी तिची भूमिका होती. पपांनी तिला विचारलं तेव्हा ती म्हणाली होती, "पवित्र कामासाठी का परवानगी घ्यावी लागते?" तिच्या दृष्टीनं हे योग्यच होतं. कारण चर्च व चर्चप्रणीत सेवाजीवन यापेक्षा जगण्यात अधिक काही असतं, हेच तिला मुळी मान्य नव्हतं. पपांवर नव्हाळीच्या वयात केलेलं वादळी, बेबंद प्रेम व विवाह हा तिच्यासाठी एक अपघात होता. त्यामुळं उर्वरित आयुष्य त्या पापांचं परिमार्जन करीत घालवायची तिची मनीषा होती. मला 'फादर' बनवण्यासाठी व्हॅटिकन सिटीला पाठवणं ही त्याचीच तर्कशुद्ध परिणती होती.

झापडबंद धार्मिक जीवन जगणारी मदर मला ओळखू शकत नव्हती. पण पपा खरंच ग्रेट होते. त्यांची जीवनप्रेरणा हाच जीवनाबाबतचा माझा दृष्टिकोन होता. म्हणून मदरचा हा निर्णय त्यांना मान्य नव्हता. त्यांनी कडाडून विरोध केला पण ती ठाम होती. मला त्या कोवळ्या वयात काही आवाज नव्हता.

व्हॅटिकन सिटीच्या चर्चमधील कठोर, बंदिस्त व यमनियमांच्या दोरखंडानं करकचून बांधलेलं जीवन, पपांच्या तालमीत तयार झालो असल्यामुळं माझ्या पचनी पडणं शक्यच नव्हतं. अवघ्या एका महिन्यातच मी त्या जीवनाला कंटाळलो. त्या एका प्रसंगानं मला तिथून पळ काढण्याचा निर्णय घेणं भाग पडलं.

व्हॅटिकन सिटीला जाण्यापूर्वी पपांसमवेत मी जंगलात शिकारीला गेलो होतो. माझ्या हातानं गोळी झाडून एका मस्तवाल रानडुकराची शिकार केली होती. त्यावेळी मी प्रथमच मृत्यूला सामोरं गेलो होतो. माझं वय अवघं सोळा वर्षांचं होतं. त्या कोवळ्या वयात जीवन-मरणाच्या त्या रौद्र दर्शनानं मी थरारून गेलो होतो. कितीतरी दिवस तो अनुभव मला अस्वस्थ करीत होता. त्याला एके दुपारी अवचित वाट मिळाली, ती लिखाणातून! कोणती अज्ञात नियती माझं बोट पकडून माझ्याकडून एका अनाम प्रेरणेनं व प्रबळ ओढीनं लिहून घेत होती, ते मला कळत नव्हतं. आजही एवढंच लक्षात आहे की, मी एका झपाटलेल्या अवस्थेत अडीच-तीन तास पांढऱ्यावर काळं करीत होतो. त्या भावविभोर अवस्थेतून बाहेर आल्यावर लिहिलेलं वाचून पाहिलं. माझा मीच स्तिमित होऊन गेलो होतो. माझ्या त्या कथेनं मीच झपाटून गेलो. एका अनोख्या निर्मितीच्या आनंदानं थरारून गेलो.

ती कथा पपांनी एका एजंटामार्फत लंडनच्या एका प्रसिद्ध साहित्यिक मासिकाला पाठवली. मी नंतर ते विसरूनही गेलो. पण व्हॅटिकन सिटीमध्ये धार्मिक शिक्षण घेत असताना ती कथा छापलेला त्या मासिकाचा अंक 'रिडायरेक्ट' होऊन हाती पडला. माझी प्रसिद्ध झालेली पहिली कथा पुन्हा एकवार वाचताना मी हरखून गेलो. पुन्हा प्रकर्षानं जाणीव झाली की, 'मदरच्या आग्रहास्तव इथं आलो खरा, पण या जीवनाशी आपण समरस होऊ शकत नाही. कारण त्यासाठी लागणाऱ्या सश्रद्ध धार्मिक भावना आपल्यात नाहीत. आपल्या रक्ताला ओढ आहे ती जंगल, सागर जीवनाची आणि हिंसा, क्रौर्य, साहस आणि शिकारी वृत्तींच्या आदिम प्रेरणांनी जगणाऱ्या माणसांच्या दुनियेची! मी इथं मिसफिट आहे....'

मला धर्मशिक्षण देणाऱ्या व्हॅटिकन सिटीच्या फादरनी ती कथा वाचली आणि सर्वांसमक्ष माझी कानउघाडणी केली.

"माय सन! हे लिहिताना नक्कीच सैतानानं तुझ्या अंतरात्म्याचा ताबा घेतला असणार. या कथेत हिंसा आणि हरणं मारण्याचा तू धक्कादायक पुरस्कार केला आहेस.. हे.... हे येशूच्या प्रेमाच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. म्हणून माझा निर्णय ऐक! तू सर्वांसमक्ष आकाशातल्या त्या बापाची जाहीर माफी मागावीस. पुन्हा असं घाणेरडं लिहिणार नाहीस अशी शपथ घे! बेटा, यापुढं जर तुला लिखाण करायचंच असेल तर ते ख्रिस्ती धर्माचं तत्त्वज्ञान, येशूच्या प्रेमाचा व विश्वबंधुत्वाचा संदेश- अशा चांगल्या समाजोपयोगी विषयांवर कर."

मला माझ्या लेखनाचा व निर्मितीचा तो अवमान सहन झाला नाही. मी सारं धैर्य गोळा करीत ठामपणे उत्तर दिलं. "फादर, ही माझी प्रतिभाशक्ती आहे. तुमच्या भाषेत बोलायचं झालं तर ती त्या आकाशातल्या बापाचीच देणगी आहे. लेखक हाही ईश्वराप्रमाणेच निर्माता असतो. मी जे निर्माण केलं आहे, ते अस्सल आहे. वास्तव

आहे. कृपया त्याचा तुम्ही अवमान करू नका.''

त्यानंतर जवळपास मी तीन आठवडे चर्चमध्ये होतो. पण फादरनी शिक्षा म्हणून व पापाचं परिमार्जन व्हावं म्हणून मला सर्वांपासून अलग एका खोलीत, जवळपास बंदिवान करीत, एकांतवासात ठेवलं होतं. मी आत्मपरीक्षण करावं व येशूला शरण जावं म्हणून!

मी त्या सक्तीच्या एकांतवासात आत्मपरीक्षणच करीत होतो. स्वत:ला, स्वत:च्या विचारांना तपासून पाहात होतो. तिथं मला साक्षात्कार झाला की, लेखन ही माझी अटळ अशी नियती आहे. लेखक म्हणून आपण ननैतिक आहोत. जीवनातही सुष्टता-दुष्टता तसंच धैर्य-क्रौर्य, हिंसा अन् करुणा या साऱ्या आदिम मानवी प्रेरणांची जगताना होणारी गुंतागुंत व व्यामिश्रता मला जाणून घ्यायची आहे. या जगातले जंगल, सागर, पशू, पक्षी आणि मानवी जीवनातली पांढरी-करडी व काळी छटा, पवित्र व उदात्तता, मानवातलं दानवत्व आणि सैतानी मनातली उदात्तता लेखनातून आविष्कृत करायची आहे, तीच माझी नियती आहे.

माझ्या या निर्मितीक्षम जीवनात चर्च, त्याचं बंदिस्त व कर्मठ जीवन आणि मुख्य म्हणजे माणूस हेच पापाचं मूळ असून, त्याचं परिमार्जन करीत जगणं बसत नव्हतं. ते जीवन माझ्यासाठी अनैसर्गिक म्हणूनच लादलं गेलं होतं. त्यात आपल्याला गुदमरल्यासारखं होतंय! त्यातून मुक्त व्हायचं आहे, नव्हे झालंच पाहिजे, असं मला वाटत होतं.

मी आज चर्चमधून पळून घरी आलो होतो, मदरला कसं तोंड द्यायचं, हा प्रश्न होता. पण पपा मला सांभाळून व समजून घेतील हा विश्वास होता.

माझे पपा जातिवंत शिकारी व दर्यावर्दी होते. निसर्ग नामक पुस्तक सहजतेनं समरसून वाचणारे ते जीवनवाचक होते. त्यांच्या हातात एक तर बंदूक असायची वा घोड्याचा लगाम. दोन सफरींमध्ये काही काळ ते घरी असायचे मदरसोबत, बस्स! त्यांना चेकबुकवर सही करण्यासाठी सुद्धा हातात क्षणभर पेन धरणं फारसं आवडत नसे. त्यामुळे ते फारसं वाचत नसत. पण माझी पहिली कथा त्यांनी माझ्याकडून आवर्जून वाचून घेतली होती. थरारून जात मला घट्ट मिठी मारून ते म्हणाले, "माय सन, यू आर ग्रेट! आय ॲम रिअली प्राऊड ऑफ यू. हे फारच अनोखं व जिवंत वाटतंय. मला ते माझं जीवन, माझं जगणं वाटतंय. हे जर साहित्य असेल तर बेटा, खरंच तू एक दिवस नक्कीच मोठा लेखक होशील. गॉड ब्लेस यू!''

माझ्या अपेक्षेप्रमाणं पपांनी चर्चमधून पळून आलो तरी माझं स्वागतच केलं होतं. कदाचित त्यांना ते अपेक्षित असावं. त्यांना मदर मेरीचा मला 'फादर' बनविण्यासाठी व्हॅटिकन सिटीला पाठवण्याचा निर्णय साफ नापसंत होता.

पण मदरनं जे अकांडतांडव केलं, अक्षरश: थयथयाट करीत मला जे शिव्याशाप

दिले, त्यानं मी केवळ अवाकच नाही तर हादरूनही गेलो होतो. माझ्या मनात तिच्याबद्दल मातृत्वाची जी कोमल व मंगल भावना काही प्रमाणात का होईना शिल्लक होती, ती त्याक्षणी संपून गेली. मुख्य म्हणजे तो माझ्या नास्तिक जीवनाच्या जन्माचा क्षण होता. ज्या धर्मापायी मदर आपल्या पोटच्या गोळ्याची भावना समजू शकत नाही, त्या धर्माचीच मला मनस्वी चीड आली. त्यानंतर मी कधीही धर्म वा ईश्वराला मानलं नाही. ख्रिस्ती म्हणून कोणतेच धर्मविधी, अगदी संडे प्रेअरही, केली नाही. एक वेगळंच बेहोश वादळी व निर्मितीक्षम लेखकीय जीवन जगलो. त्या जीवनात कधीही मला धर्म वा देवाची क्षणभरही आठवण झाली नव्हती. त्याची गरज भासली नव्हती. त्यानंतर आजच मी चर्चमध्ये मन हळुवार झाल्यामुळं आलो होतो. मदरच्या ऋणातून मुक्त होण्याचा हाच एक मार्ग होता, या जाणिवेनं असेल कदाचित!

चर्चमधून पळून घरी आलो, तेव्हा माझी दुसरी कथा प्रसिद्ध झाली होती. पोस्टानं आलेला मासिकाचा अंक मदरच्या हातात पडला होता. ती कथा वाचून मदर संतापानं थरकापली होती. त्यामुळंच तिचा थयथयाट व शिव्याशाप एवढे प्रखर व आक्रस्ताळे झाले होते.

माझी ही दुसरी कथा स्पेनमधील प्रसिद्ध अशा 'बुलफाईट' या जीवघेण्या साहसी व रौद्र जीवनावर आधारित होती. मी त्या क्रौर्य व शौर्याच्या खेळाच्या बलदंडतेचं अमानुष तत्त्वज्ञान मांडलं होतं. नव्हे, पुरस्कारलेलं होतं. मदरची आता खात्री झाली होती की माझ्या अंतरात्म्याचा सैतानानं पुरता ताबा घेतला आहे. त्याची परिणती तिच्या आक्रस्ताळी प्रतिक्रियेत झाली होती. त्यावर काय प्रतिक्रिया द्यावी हे मला त्या क्षणी उमगत नव्हतं.

माझ्या पहिल्या दोन कथातली पात्रं व घटनाप्रसंग मी पपांच्या जीवनातून व त्यांच्या जगण्याच्या तत्त्वज्ञानातून कच्चा माल म्हणून उचलले होते. माझ्या प्रतिभेतून त्याला कथारूप दिलं होतं. पपांचं साहस, शौर्य, निरोगी हिंसा आणि मर्दानगीचं... 'ही मॅन' चं जगणं मला आपलं वाटायचं. कारण मी त्या दुनियेतला तगडा नौजवान मर्द होण्याच्या मार्गावर होतो.

मदर मात्र चर्चच्या प्रभावानं व आध्यात्मिक प्रेरणेनं जगाचं शांतिमय व मंगल, करुणामय रूप पाहात होती.

"माय सन, कसलं अघोरी पापमय हिंस्र जीवन कथेतून रेखाटतो आहेस?" ती मला तळमळून म्हणाली होती, "अरे बेटा, तो तूच आहेस का माझा लिटल स्वीट चाईल्ड? जो मी येशूचा हुंकार मानीत होते, मदर मेरीचा आशीर्वाद समजत होते. तुझ्यात मला एक संतपदाला पोचणारा फादर पाहायचा होता. माझ्या माहेरच्या घराण्यातले एक थोर पुरुष अठराव्या शतकात संतपदाला पोहोचले होते. पवित्र रोम शहरात त्यांच्या नावानं कॅथेड्रल बांधण्यात आलं आहे. तो आपला अभिमान बाळगावा

असा वारसा आहे.. आणि हे तू काय असं विपरीत करीत आहेस? असं घाणेरडं लिखाण करण्यासाठी चर्चमधून पळून आलास? आय ॲम अशेम्ड ऑफ यू माय सन!''

पण पपांमुळं माझ्यापुढं एक वेगळीच मर्दानगीची साहसी दुनिया साकारलेली होती. तसंच माझ्या अखंड जिज्ञासू कुतूहलामुळं, चौकस बुद्धीमुळं माझ्या नजरेसमोर एक वेगळंच विश्वास उलगडत होतं. त्या दुनियेत उघडं नागडं ऊग्र जगणं होतं, चोरीमारी होती, टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी देहविक्रय होता. स्त्रियांच्या देहाचा बाजार मांडून जगणारे दलाल, भडवे होते. गुन्हेगारी जीवन होतं व त्यांचंही आकर्षक असं एक तत्त्वज्ञान होतं. अमानुष, निर्घृण, मानवी जीवन क:पदार्थ मानणारं क्रौर्य व हिंसेचं ते जग होतं. त्यात मरणं, मारणं, स्वार्थ, निर्घृणता आणि उघडावागडा व्यापार होता. हेही जीवनाचं वास्तव रूप होतं. ते करडं व काळं होतं. हे सारं मला एक लेखक म्हणून एक्सायटिंग वाटत होतं, खुणावत होतं. तसंच याच्या जोडीला नागर जीवनापलीकडची नदी - सागर, अफाट जंगलं, पशुपक्षी आणि आजही आदिम जीवन जगणाऱ्या आदिवासी माणसांची दुनिया होती. त्याचंही मला आकर्षण होतं. ही दोन विश्वं मला लेखक म्हणून आव्हान देत होती. ते शब्दबद्ध करायला प्रतिभा अक्षरश: मनात उसळी मारीत होती. एक अनोखं वादळी जीवन जगायचं आणि तेवढंच वेगळं, अस्सल ननैतिक असं लिखाण करायचं, हे माझं जीवनध्येय मला खुणावत होतं...

मदर मला आई म्हणून कितीही आवडत असली तरी तिच्या कल्पनेप्रमाणं यापुढं मला जगणं केवळ अशक्य होतं. ते मी तिला धीटपणे स्पष्ट सांगून टाकलं, तेव्हा मदर हादरून गेली. त्याचं रूपांतर तीव्र संताप आणि त्याहीपेक्षा अधिक तीव्रतम स्फोटात झालं. तिनं मला चक्क शाप दिला.

''तुला आयुष्यात कधीही समाधान लाभणार नाही. एका पापभीरू मातेचं हृदय तू तोडलं आहेस. यापुढं माझं आजन्म तोंड पाहू नकोस. आजपासून तू माझ्या लेखी अस्तित्वात नाहीस... जा, या घरात तुला स्थान नाही.''

त्या क्षणी मी घर, माझं गाव, परगणा सोडला. त्यानंतर आज चाळीस वर्षांनी परतलो होतो.

मदरचा शाप खरा ठरला होता. आजवरच्या आयुष्यात मी सदैव अस्वस्थ, असमाधानी व बेचैनच होतो. माणूस म्हणून फार काही सोसावं, करावं लागलं होतं. पण एक लेखक म्हणून माझं हे असमाधान व ही अखंड बेचैनी माझ्यासाठी वरदानरूप सिद्ध झाली होती. त्यातूनच माझं विश्वविख्यात साहित्य साकारलं होतं. लेखनाचं 'पुलिटझर' व 'बुकर प्राईज' ही पटकावलं होतं. नोबेल पारितोषिक खुणावत होतं. माझ्या बेचैन व अस्वस्थ जीवनाची सामग्री वापरून मी जे वेगळे लेखन केलं होतं,

ते जिवाचं मोल देऊन. सर्वस्व पणाला लावून. जितक्या उत्कटतेनं तीन दशकं माझं लेखन बहरत होतं, तेवढ्याच तीव्रतेनं माझं जगणं जखमी व रक्तबंबाळ होत होतं. मनाच्या एका कोपऱ्यात मदरची शापवाणी सदैव वेदना देत होती. त्यामुळं माझं माणूसपण असमाधानी होतं. पण लेखकीय जीवन लख्ख उजळून निघालं होतं.

आज सकाळच्या संडे प्रेअरनं मन थोडंसं शांत व समाधानी झालं होतं.

दारुण अपेक्षाभंगामुळं त्यावेळी क्रुद्ध होत मला दिलेला शाप सोडला तर मदर ही जीवनभर प्रेममय कारुण्यमूर्ती बनूनच राहिली. तिनं नर्सिंग व संगीतामध्ये प्रावीण्य संपादून या परगण्यातील लोकांची ख्रिस्ती धर्माच्या आज्ञेप्रमाणं मनोभावे सेवा केली होती. तिची वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारी बातमी व छायाचित्रं मला तिच्या उदात्ततेची जाणीव करून द्यायची. त्यामुळं माझं असमाधान अधिकच तीव्र व्हायचं. हा अस्वस्थ आणि असमाधानी जीवनाचा भणंग मार्ग स्वत:हून स्वीकारला होता. तो एका अव्यभिचारी निष्ठेनं - की जगणं आणि लिहिणं अलग नसतं.

माझे पपा असंच अस्वस्थ पण वादळी जीवन जगले. एका जोगिणीसारखं व्रतस्थ दैनंदिन धार्मिक जीवन जगणाऱ्या स्त्रीबरोबर त्यानी आयुष्यभर संसार केला. त्यांना जीवनातली कोणतीही बाब त्याज्य नव्हती. अगदी नव्या नव्या नशांचाही ते शोध घ्यायचे. जगण्यातला कोणताही भलाबुरा अनुभव त्यांना वर्ज्य नव्हता. पपांनी मदरला संसारात कसं निभावून नेलं असेल? तो का संसार होता? दोन विरुद्ध जीवनधर्म मानणाऱ्या व त्याप्रमाणं प्रामाणिकपणे जगणाऱ्या त्या जीवांना एकत्र बांधून ठेवणारं एकही सूत्र मला शोधूनही आजवर सापडलं नव्हतं.

तरीही पपांनी तिला कधी दूर लोटलं नव्हतं. ते तिचा प्रच्छन्न उपहास करीत, तिच्या धर्मनिष्ठ जीवनाची यथेच्छ टिंगल-टवाळीही करीत. अधिकाधिक वेळ शिकार, नशा, सागरी जीवनात व जंगलात व्यतीत करीत, तरीही ते तिच्यापासून कधी अलग झाले नाहीत.

एक लेखक म्हणून त्या दोघांचं परस्परांना बांधलेलं विसंवादी व कोणतेच समान धागे नसलेलं सहजीवन मला आव्हानात्मक वाटायचं. सेक्सबद्दल पपा मोकळेढाकळे होते. त्यांच्या अनेक मैत्रिणी होत्या, लिव्ह इन रिलेशनशिप्स होत्या. अशाच एका रिलेशनशिपमधून माझ्या सावत्रभावाचा जन्म झाला. पण त्यांनी आपल्या बायकोला - माझ्या मदरला कधी सोडलं नाही. ब्रिटन - युरोपात घटस्फोट आम असतानाही त्यांनी तो विचार कधी मनात आणला नाही. मदरला पपांचं अनिर्बंध जीवन पापमय वाटायचं. त्यांनाही ती शिव्याशाप द्यायची. पण त्यांचं तिच्यावरचं प्रेम काही अजबच होतं. कितीही विचार केला तरी आजवर त्याचा मला पूर्णांशानं वेध घेता आला नाही.

खरं तर पपांना तरी मी कुठं पूर्णांशानं जाणलं होतं? कारण त्यांचा शेवट मला आजही अस्वस्थ करतो. त्यांच्या आत्महत्येचा काही उलगडा होत नाही. वरकरणी

काहीही कारण नसताना त्यांनी शांतपणे कानशिलावर पिस्तुलानं चाप ओढून जीवनाचा शेवट केला होता. आणि त्यापूर्वीचं ते त्यांचं अंतिम पत्र! मला वाटलं, आयुष्यात त्यांनी प्रथमच मला उद्देशून एवढा प्रदीर्घ मजकूर लिहिला असावा. ते पत्र मला आजही बुचकळ्यात पाडतं.

"बेटा, मी आज आत्महत्या करायला निघालो आहे. त्यापूर्वी तुला हे पत्र लिहीत आहे. स्वत:च्या हातानं कानशिलावर पिस्तुलाचा चाप ओढून मी जीवनाचा अंत करतोय. काय गंमत आहे नाही? आधी मी ठरवलं, स्वत:चा शेवट करायचा आणि त्यानंतर विचार करतोय, त्यामागील कारणांचा. त्यासाठी कधी नव्हे ते पेन बोटात धरलं आहे. लिहिण्याची सवय मोडलीय ना, म्हणून अक्षर कापरं, अडखळत येतंय. त्याबद्दल माफ कर. अक्षरं नीट जुळवून वाच हं!

"माय सन! अवघं जीवन मी कैफात जगलो. हा कैफ, ही नशा होती नित्यनूतन शोधाची. जंगल, पशुपक्षी, सागर लाटांवर हिंदकळणारं, अनिश्चित निसर्गावर अवलंबून असलेलं जीवन, बुलफाईटसारखे अचाट साहसी खेळ. आणि नव्या नव्या नशांचा शोध. सतत मी अस्वस्थ होतो म्हणूनच असेल कदाचित, मी अशा कैफात राहिलो. माझी आंतरिक अस्वस्थता दडविण्यासाठी असेल कदाचित, हे सारं केलं. एक अनिर्बंध वादळी जीवन पत्करलं व अतार्किक निष्ठेनं त्याच्याशी इमान राखलं! पण बेटा, निसर्गक्रम कुणाला चुकला आहे? उसळी मारणारं रक्त थंडावू लागलं, गात्रं सैलावू लागली आणि वाटू लागलं, जे जीवन जगतो ती एक निरुद्देश नशा होती. तुझ्या आईच्या, माझ्या मेरीच्या ज्या धर्मनिष्ठ पवित्र जीवनाचा सदैव मी उपहासच केला. तोच जीवनाचा खरा मार्ग होता का, हा जीवघेणा प्रश्न मला सतावू लागला, त्याचं उत्तर मला माहीत नाही. खरं तर मी कधी क्षणभरही विचार करीत स्वस्थ बसू शकत नाही, त्यामुळं हा संभ्रम, हा संदेह मला पेलवत नाहीय. त्यामुळं असेल कदाचित, मला स्वत:चा शेवट करावासा वाटतो.."

त्या पत्रानं मी त्या वेळी कमालीचा अस्वस्थ झालो होतो. पपांनी जे अडखळत, त्यांच्याजवळ असलेल्या तोकड्या शब्दसंग्रहाचा वापर करून लिहिलं होतं, त्यापेक्षा त्यांना शेवटच्या क्षणी अधिक काही मला पत्रातून सांगायचं होतं. पण कदाचित त्यांचं त्यांनाच नीटसं उलगडत नसावं. मी त्यांच्या कबरीसमोर उभं राहून मनमुक्तपणे आसवं ढाळीत होतो. त्यांना जीवनाचा शेवट करताना जे प्रश्न सतावत होते, ते मला अकराळविकराळ स्वरूपात भयभीत करू लागले होते. मी कमालीचा संत्रस्त व संदेहित झालो होतो.

पण त्यातूनही मी मार्ग शोधला. नेहमीप्रमाणं पांढऱ्यावर काळं करीत! त्यात सारे संत्रस्त सवाल विरघळून गेले. माझ्या पदरी आणखी एक वेगळी कादंबरी जमा झाली होती... "दि सटॅनिक हिरो"(सैतानी नायक) जी पपांच्या जीवनाचा वेध घेणारी कादंबरी

होती. माझ्या प्रतिभाशक्तीनं त्यात मी त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचा शोध घेतला होता. वेगळ्या ननैतिक जीवनतत्त्वज्ञानाची ती शोधयात्रा खरंतर माझ्या स्वत:साठी होती. पुढील जीवन जगताना तत्त्वज्ञानरूपी बळ देण्यासाठी होती.

आज मदरच्या पश्चात तिच्या घरात वावरताना मला गलबलून येत होतं. आणि पपांना जीवनाच्या शेवटी जो प्रश्न पडला होता, तो पुन्हा मनात उसळी मारून संत्रस्त करीत होता. त्याच्या पार्श्वभूमीवर मदरच्या जीवनाची गोळाबेरीज नवे नवे सवाल उभे करीत होती. त्यातला सर्वांत प्रमुख सवाल होता - मी जे जीवन जगलो, ते सफल होतं की ती अरूपाची केवळ एक अंधयात्रा होती?

आमच्या घरच्या जुन्या नोकरानं मला एक पत्र व बंद पाकीट आणून दिलं. ते पत्र माझ्या मदरचं होतं. अतिशय त्रोटक. तिनं मला उद्देशून कदाचित मरण्यापूर्वी काही काळ आधी लिहिलं असावं.

"ज्या पिस्तुलानं तुझ्या पपांनी आपल्या पापमय जीवनाचा शेवट केला, ते सांभाळून ठेवलेलं शस्त्र मी तुला भेट देत आहे. तुलाही कधी काळी त्याची गरज भविष्यात भासेल म्हणून. पण बेटा, तू तरी त्यांच्यासारखं अंतिम सत्याकडं पाठ फिरवू नकोस. धैर्यानं त्याला सामोरं जा! आणि त्यावेळी त्या दीनदयाळू प्रभूला, आकाशातल्या बापाला शरण जायला कचरू नकोस!''

पत्रासोबतचं पाकीट सुन्नावस्थेत उघडलं. त्यात माझ्या पपांचं प्रिय असं छोटेखानी पिस्तूल होतं. ते कुरवाळीत पुन्हा पुन्हा मदरचं ते शेवटचं पत्र मी वाचत होतो. त्यातून मला नियती गूढ पण सूचक इशारे देत होती.

खरं तर मी फार थकून गेलो होतो. मनाला प्रचंड शिणवटा जाणवत होता. वयाच्या पन्नाशीनंतर वृद्धत्वाकडं वाटचाल करताना अनेक शारीरिक व्याधींनी मी पोखरला गेलो होतो. बेबंद जीवनाची मला निसर्गानं ती शिक्षा दिली होती, त्याच्या रिवाजानुसार न चुकता! आजवर जे अफाट जीवन जगलो, जी बेफाट साहसं केली, पाप-पुण्य, नीती-अनीतीचा विचार केला नाही, त्या माझ्या झंझावाती बेफाम जीवनाचा काय सारांश होता? डझनभर कादंबऱ्या, पाऊणशे कथा, दोन नाटकं, तीन चित्रपट कथा - पटकथा आणि अनेक जागतिक साहित्यिक मानसन्मान व पुरस्कार! रक्ताचं पाणी करून, प्रत्येक वेळी सर्वस्व पणाला लावत नवनवे अनुभव घेत लिहिलं. तेच का जीवनाचं श्रेयस होतं? तर मग हे असमाधान का? मदरच्या शापामुळं? अंहं, आजवर असं कधी चुकूनही वाटलं नाही. तर मग आज मग त्या शंकेनं का व्याकूळ होतंय? कदाचित तिनं पत्रासोबत पपांनी ज्या पिस्तुलानं आत्महत्या केली, ते मला भेट दिल्यामुळं असेल. जीवनाचे अंतिम क्षण जवळ आल्याचं राहून राहून का वाटतंय? आजवरच्या जीवनाचा सारांश शून्यवत का वाटतोय?

नाही, हे सारे माझ्या संभ्रमित, गोंधळलेल्या मनाचे खेळ आहेत, खुळे विचार

आहेत. यंदाच्या साहित्याच्या नोबेल पारितोषिकासाठी माझं नाव अंतिम होण्याची शक्यता असल्याची आतील गोटाची बातमी आहे. पुलिट्झर, बुकर प्राईजनंतर आत सर्वोच्च नोबेल प्राईज मिळालं तर माझं जीवन शून्यवत कसं ठरेल? ते नाही मिळालं तरी आजवरचं लेखन व पुरस्कार हेही का कमी आहेत? नाही, माझं जीवन अगदीच काही वाया गेलेलं नाही. तरीही हातात ते काडतुसानं एक गोळी वगळता भरलेलं, ज्यानं पपांनी आपलं जीवन संपवलं होतं, ते पाच गोळ्या असलेलं पिस्तुल निरर्थक चाळा म्हणून खेळवताना विषाद का वाटतो आहे. अवघं जीवन प्रश्नांकित का होत आहे?

पपांनादेखील अखेरच्या क्षणी अशीच विदारक शून्याची जाणीव झाली असेल? कदाचित त्यांना तेच सहन झालं नसावं. विचार करणं आणि निष्कर्ष काढणं हा त्यांचा स्वभाव नव्हता. सीध्यासाध्या मनाचा कौल मानीत, मन मानेल तसं जगणं हा त्यांचा जीवनधर्म होता. जेव्हा तो त्यांना अर्थशून्य वाटू लागला, तेव्हा त्यांनी मागचा पुढचा विचार न करता आपलं जीवन संपवलं असावं.

येस, येस! आता या क्षणी मला त्यांचा आत्महत्येचा अन्वयार्थ गवसतो आहे. पपांच्या जीवनावरच्या गाजलेल्या 'दि सटॅनिक हिरो'ची नवीन आवृत्ती काढायची. ती केवळ रिप्रिंट न करता नव्यानं त्याचं पुनर्लेखन करून त्यांच्या शेवटाची कहाणी अलगपणे रेखाटली पाहिजे. नवा अनोखा व हृदयस्पर्शी शेवट केला पाहिजे. लेखनातला नवा प्रयोग.. नव्या आवृत्तीत मूळ शेवट तर ठेवायचा, पण हा नवाही शेवट सामील करायचा. वाचकांनी दोन्ही शेवट वाचून 'दि सटॅनिक हिरो' च्या जीवनाचा कोणता अर्थ त्यांना भावतो, हे मला कळवावं असं आवाहन करायचं. जीवनाचा सारांश सांगणारे दोन अर्थ - दोन्हीही आपल्या परीनं सच्चे आणि कलात्मकही!

मी अंतर्बाह्य थरारून गेलो होतो. एका नव्या कलात्मक सत्याच्या साक्षात्काराची व चिंतनाची अंधारगुहा प्रकाशमान झाली होती. अंतरंग दिपवणाऱ्या अनोख्या आनंदाचे ते रोमांच होते. असा रोमांचकारी अनुभव केवळ कलावंताच्या नशिबी असतो. त्याची धुंदी अनुभवताना मी विचारानं बेफाम व स्वैर झालो होतो...

"मदर थँक्स, थँक्स अ लॉट! तू मला खरंच अनमोल अशी भेट दिली आहेस. ही पपांची निशाणी मला सदैव हे भान देत राहील की आपण जगतो, आपल्या जीवनाचा जो अर्थ सापडतो, तेवढंच जीवन नसतं! त्यापलीकडंही काही तरी हातात न येणारं, केवळ मनाला जाणवणारं असं काही अरूपासारखं, पण तेवढंच सत्य असं काही तरी असतं! त्यामुळं प्रत्येकाचा जीवनप्रवास अन् जीवनाचं तत्त्वज्ञान अपुरं म्हणून निसरडं व फसवं असतं. जसा तो पपांचा जीवनप्रवास होता. मदर, तुझाही तसाच होता. नक्कीच असला पाहिजे. धर्म, पवित्र जीवन आणि त्या मार्गानं चालताना झालेलं जीवनदर्शन तरी कुठं अंतिम सत्य आहे? हेही मिथक आपणच नाही का निर्माण केलं?

मला तुम्हा दोघांच्या मृत्यूनं जीवनाकडं आजवर जे पाहाता आलं नाही, अशा वेगळ्या नजरेनं पहायला शिकवलं आहे. मदर, मी पपांच्या जीवनाचा सारांश 'दि सटॅनिक हिरो' या कादंबरीच्या माध्यमातून शोधला. त्याचं पुनर्लेखन करून आणखी एकवार नव्या जाणिवेनं तो शोधायचा आहे. तसंच आता मला पुढील काळात तुझ्या जीवनाचा सारांश शोधायचा आहे. मला तू दिलेल्या शापवाणीमुळं आयुष्यभर मिळालेल्या असमाधानाच्या निमित्तानं.

मदर, तू तरी अंतिम श्वास सोडताना समाधानी, कृतार्थ होतीस का गं? खरंच का तुला पपांवर तारुण्याच्या आवेगात तू केलेलं धुंद प्रेम, शरीरसुखात चिंब भिजलेलं ते दोन - तीन वर्षांचं उपभोगाचं व सहप्रवासाचं जीवन आणि माझा झालेला जन्म तुझ्या आध्यात्मिक जीवनातला अपघातच वाटत राहिला, शेवटपर्यंत? पपांपासून त्यानंतर तू खरंच पूर्णपणे अलिप्त व कोरडी झाली होतीस? का 'ही - मॅन-' खराखुरा मर्द असलेल्या पपांची ओढ आणि धर्माची, पावित्र्याची प्रेरणा यातलं द्वंद्व तुला जाणवत होतं? फादर होण्यास दिलेला माझा नकार तुला एवढा क्रुद्ध कसा बनवून गेला की, मला तू आयुष्यभर असमाधानी राहण्याचा शाप दिलास? माझं तोंड तू आयुष्यभर पाहिलं नाहीस. तुझ्यात मातृत्व नक्कीच प्रखर होतं. कारण तू नर्सिंगच्या माध्यमातून आजाऱ्यांची शुश्रूषा आईप्रमाणं करीत होतीस. त्यांच्या जखमा धुताना क्रूसावरील येशूच्या जखमांवर लेप लावण्याचं समाधान त्यातून तू घेत होतीस. त्या माझ्या मेरी मदरला कधीच मला भेटावंसं वाटलं नाही, माफ करावंसं वाटलं नाही? मी व पपांनी जो जीवनप्रवास केला तो जाणून घ्यावासा वाटला नाही? चुकूनही कधी, क्षणभर का होईना त्यात सहभागी व्हावंसं वाटलं नाही? पपा व माझ्याविना चर्चच्या सेवेच्या दुनियेत तू खरंच का पूर्णपणे समाधानी होतीस?

मदर, तुझ्या संदर्भात मला हे प्रश्न यापूर्वीही प्रसंगाप्रसंगानं पडले होते. आज या जगातून तू गेल्यानंतर ते एकत्रित, समुचितपणे जाणवत आहेत. मला या साऱ्यांचा वेध घेतला पाहिजे., त्यांची उत्तर शोधली पाहिजेत. त्यासाठी पुन्हा मला कोरे कागद आणि काळ्या शाईचं पेन हाती घेतलं पाहिजे. त्यातून एक कादंबरी निश्चित जन्माला येईल. 'दि सॅक्रेड हिरॉईन!' येस, हे नाव मला चपखल वाटतंय. पपा 'दि सटॅनिक हिरो', तर तू 'दि सॅक्रेड हिरॉईन!''

पपांना मी 'सैतानी नायक' म्हटलं असलं तरी त्यांच्यातील देवत्वाच्या छटाही मी कादंबरीत रेखाटल्या होत्या. आता मदर, तुझी 'दि सॅक्रेड हिरोईन' (पवित्र नायिका) चितारताना तुझ्यातलं सैतानत्व व काळीकरडी बाजूही मी तेवढ्याच सच्चेपणानं मांडीन... तू दिलेला शाप मला कसा विसरता येईल? बट आय प्रॉमिस यू मदर वनथिंग... मी तुला, तुझ्या जगण्यालाही न्याय देईन. मला चिंतन करून गवसलेलं कलात्मक सत्यच मांडेन कादंबरीतून. तुला कदाचित ते रुचणार नाही. बट, आय कांट

हेल्प!

त्यानंतर मी माझ्या जीवनाचा सारांश शोधण्याचा प्रयत्न पुन्हा कादंबरीच्या माध्यमातूनच करीन.... "ॲन इटरनल अनहॅपी मॅन' (एक कायम असमाधानी माणूस) असं त्या कादंबरीचं शीर्षक मला आताच सुचतंय, तेही 'दि सॅक्रेड हिरोईन' प्रमाणं चपखल आहे...

एका अर्थानं या तीन कादंबऱ्या 'ऑटोबायोग्राफिकल नॉव्हेल्सची ट्रॉयॉलॉजी' ठरतील. त्यासाठी जग मला मी गेल्यानंतरही आठवेल. त्या कादंबऱ्या वाचक पुन्हा पुन्हा वाचतील आणि आपल्या जीवनाचा सारांश त्याद्वारे जाणायचा प्रयत्न करतील. कारण हे माझं नितांत वैयक्तिक जीवन एका अर्थानं व्यापक सर्वस्पर्शी आहे. कारण माझी श्रद्धा आहे, "व्हेन यू राईट मोअर ॲण्ड मोअर पर्सनल, इट बिकम्स मोअर ॲण्ड मोअर युनिव्हर्सल....."

माझं सर्वस्व ओतून माझ्यातल्या "ॲन इटरनल अनहॅपी मॅन'चा मी शोध घेईन. मदर, ही माझी माझ्यावरची पर्सनल नॉव्हेल लिहिताना टेबलावर तुझ्या व पपाच्या तसबिरी पाहात लिहीन. ज्या क्षणी माझा हा आत्मशोध पूर्ण होईल, माझी कादंबरी पूर्ण होईल, तो क्षण असेल माझ्या समाधानाचा. कारण माझ्या असमाधानी जीवनाचा अन्वयार्थ मला लागलेला असेल आणि त्याद्वारे एक अपूर्व अशी कलात्मक कलाकृती निर्माण झाली असेल.

तोच क्षण माझ्या जीवनाचा शेवटचा क्षण असेल. येस मदर, त्यानंतर मी काही लिहू शकणार नाही. कारण माझं असमाधान संपलेलं असेल! मी त्यावेळी पपांच्या पिस्तुलानं स्वत:चा शांतपणे व समाधानानं शेवट करून घेईन. असं समाधान कदाचित तुलाही मरताना लाभलं नसेल. मी धैर्यानं त्यावेळी सत्याला जरूर सामोरं जाईन, पण ख्रिस्ताला खचितच शरण जाणार नाही. कारण तो तर केवळ देवदूत होता. जगनिर्माता नव्हता. मी तर कलावंत, लेखक, शब्दसृष्टीचा. ईश्वर! नवं निर्माण करणारा. त्याच्याहून श्रेष्ठ. त्याला का शरण जाऊ? मी माझा शेवट माझ्या मनानं ठरवून करेन. फॉर दॅट, फरगिव्ह मी मदर!

येस मदर, मी तुला ठामपणे आजच सांगू शकतो की माझ्या जीवनाचा शोध घेणारी आत्मचरित्रात्मक कादंबरी पूर्ण होणारा क्षण माझ्या जीवनाचा अंतिम क्षण असेल!

कारण....? मी जे जीवन जगलो, तो पपांचा वारसा आहे, त्यांची दिशा आहे आणि त्यातलं असमाधान तुझं आहे आणि अस्वस्थता ही माझी आहे. एक कलावंत म्हणूनः मी जर जीवन पणास लावून, अनुभव घेऊन लेखन केलं असेल तर हाच माझा शेवट योग्य ठरणार आहे. या कादंबरीचा शेवट 'ॲन इटरनल अनहॅपी मॅन' पिस्तुलाद्वारे आत्महत्या करतो असा मी दाखवेन. हा माझा रचलेला प्लॉट आहे आणि तोच माझा

केवळ लेखनाचा नाही, तर जीवनाचाही क्लायमॅक्स ठरणार आहे...

थँक्यू मदर! अॅण्ड थँक्यू पपा! आय विल नॉट फर्गेट यू. लास्टली आय विल नेव्हर पिटी माय इटरनल अनहॅपी स्टेट ऑफ माइंड, वुईच हॅज गिव्हन बर्थ टू अॅन आर्टिस्ट, नॉव्हेलिस्ट!

.....हाच तर माझ्या जीवनाचा सारांश असेल!

०-०-०

# १४. माधुरी व मधुबाला

जवळपास महिन्यापासून त्यानं दीर्घ मुदतीची रजा काढलीय ऑफिसमधून, तिच्याजवळ राहाता यावं म्हणून. तिला सावरावं, पुन्हा ती पूर्वीसारखं उत्फुल्ल गुलाबासारखी टवटवीत व्हावी म्हणून.

पण ती त्याला नजरेसमोर थांबू देत नाहीये. त्याला पाहिलं की हिस्टेरिक होतेय. क्षण दोन क्षण तिची ती कडेलोटाच्या पलीकडे गेलेली विदीर्ण अवस्था पाहून अधिकच मनोमन शरमिंदा होत बेडरूममधून तो पाय काढता घेतो. जिथं, त्या घटनेपूर्वी कधीच बसत झोपत नसे, त्या गेस्ट रूममध्ये जाऊन आढ्याला नजर लावून तो पडून राहातो. अस्वस्थ, बैचेन. त्याची ही अपराधी, बैचेन अवस्था अधिकच शोचनीय होते, जेव्हा त्यांच्या दोघांच्या खास असलेल्या भावविश्वाच्या बेडरूममधून तिचे हुंदके आणि वरकरणी वेडसर वाटणारे पण वेदनेच्या खोल डोहातून उमटलेले शब्द कानावर पडतात....

मी काय करू? तिला कसा सावरू? का मीच आज ती ज्या अवस्थेतून जातेय, तसाच नियंत्रणहीन होत भावनिक संतुलन गमावून बसेन?

नाही, ही माझी स्थिती मला, या घराला परवडणारी नाही. मुख्य म्हणजे तिला पूर्ववत करायचं आहे, त्यासाठी मला खंबीर व स्थिर राहिलं पाहिजे - मानसिकदृष्ट्या.

आईला आपण बोलवून घेतलं होतं. सुनेला तिनं मायेनं सांगून धीर द्यावा म्हणून. पण तो अंदाज चुकलाच. "तुला मी आधीच लग्नापूर्वी बजावलं होतं की, ही पोरगी नादिष्ट आहे. संसाराला उपयोगाची नाही. आता गर्भपात का कुणाचा होत नाही? आणि मुलगा हवा ही अपेक्षा का चुकीची आहे? थोरल्या मुलानंतर ओळीनं तीन मुलींवर तू झालास - त्या काळी नव्हती ही आजची तंत्र! नाहीतर-"

"हळू आई. असं काही बोलू नकोस. तिच्या कानावर हे पडायला नको." तो घाईघाईनं अस्वस्थ होत आईला चूप बसायचा इशारा करतो. त्यानं ती चांगलीच भडकते व अधिकच तावातावानं बोलू लागते,

"गणू, एवढा बायकोवेडा झाला असशील असं मला वाटलं नव्हतं. एवढं प्रेम

होतं तर हा निर्णय कशाला घेतलास? आणि मला तिच्या तालावर नाचायला, तिचं मन सांभाळायला का बोलावलंस? मी जाते आपली थोरल्याकडे. थोरल्या सुनेनं जुळे लव -कुश दिलेत वंशाला. त्यांना खेळवत मजेत राहाते-''

आणि खरंच दोनच दिवसात ती परत मोठ्या भावाकडे निघून गेली. त्यानंही तिला थांबवलं नाही. तो 'थांब' म्हणाला असता तर आई थांबली पण असती. या वयातही तिनं निगुतीनं सारं केलं असतं. पण तिच्या तोंडाचा अखंड चालणारा पट्टा मात्र थांबला नसता. आणि त्याचा अधिकच त्रास शारीरिक व मानसिक दृष्ट्या खचलेल्या पत्नीला - सरितेला झाला असता.

गणेशला घरी काही काम नव्हतं आणि सरितेच्या खोलीत बसायला तयार नव्हता. कारण त्याला पाहिलं की ती बेभान होत किंचाळायची ''माझी - माझी बेबी कुठयं? तिचं तुम्ही काय केलं?''

''अगं, अचानक रक्तस्राव झाला आणि तुझा अकाली गर्भपात झाला पाचव्या महिन्यातच. मी खरं सांगतो राणी, माझ्यावर विश्वास ठेव!''

''नाही, हे सारं खोटं आहे, माझी बेबी जिवंत आहे.'' तिचा काळजाला घरे पाडणारा हुंदका. ''हे पहा - '' आपल्या पोटावरून ती हात फिरवत म्हणते, ''आत्ता आत्तापर्यंत या पोटात ती बागडत होती, ढुशी मारीत होती... अचानक हे पोट रिकामं कसं झालं?''

''तुला सांगितलं ना, गर्भपात झाला म्हणून?''

''कसा होईल? माझी तब्येत तर चांगली होती.'' ती पुन्हा किंचाळत म्हणाली, ''तुम्ही खोटं सांगत आहात. त्या दिवशी सोनोग्राफी टेस्टनंतर डॉक्टरसाहेबांनी नाही का सांगितलं, माझी तब्येत चांगली आहे म्हणून. बाळाची पण वाढ चांगली आहे म्हणून.''

त्याला ते सारं आठवत होतं!

त्या रात्री तिच्या टपोऱ्या कळीसारखं उन्मलून आलेल्या गोऱ्यापान टपोऱ्या पोटावर असोशीनं त्यानं हळुवारपणे ओठ ठेवले होते. बाळाची चाहूल घेण्यासाठी कान लावले होते, तेव्हा ती किती गोड शहारली होती.

''आई ....गं....'' ती किंचित विव्हळली होती.

''क-काय झालं राणी?'' त्यानं काळजीनं विचारलं, तशी ती ओठ दाबत व वेदना जिरवत तशाही स्थितीत समाधानानं चेहराभर हसत म्हणाली,

''काही नाही. बेबी मस्ती करतेय, लाथा झाडतेय आता.''

''पाहू - पाहू' असं म्हणत त्यानं पुन्हा तिच्या ओटीपोटाला कान लावला आणि म्हणाला, ''खरंच, पण ही सणसणीत लाथ व आक्रमक हालचाली ह्या मुलाच्या आहेत. मी सांगतो, नक्कीच आपल्याला मुलगा होणार.''

"अंहं, माझी खात्री आहे, मला मुलगीच होणार." सरिता म्हणाली, "तुम्हाला आठवत नाही का? आपण अंबाबाईच्या दर्शनाला गेलो होतो, तेव्हा मुलीच्या बाजूनं कौल पडला होता."

"हो, तसं तू म्हणाली होतीस. पण हे कौल-बिल काही खरं नसतं." तो काहीसा अस्वस्थ झाला होता. खरं तर त्यानंच तिला कौल लावायला सुचवलं. होतं. तसा तो फारसा धार्मिक नव्हता आजवर कधी. पण बाळ होणार असल्याचं कळलं आणि तो मनोमन बदलला. हळुवार झाला आणि आजवर कधी न जाणवलेली एक सुप्त लालसा मनोभूमीवर तरारून आली - आपलं पाहिलं मूल हे वंशाचा दिवा असायला हवं! आपल्याला मुलगाच हवा.

त्याच्या घराण्यात मुलींचा सुकाळ. त्याला आधीच्या तीन व पाठची एक बहीण होती. त्याला काका नव्हता.. आत्या दोन. आईकडच्या घरी पण अशीच अवस्था. त्यामुळे त्यांचं लग्न झाल्यापासून व विशेषत्वानं सरिता गर्भार राहिल्यापासून वडील काय, आई काय, बहिणी व आत्या काय, सारेच 'पेढा हं!" असंच बजावायचे.

सरिता गणेशप्रमाणे विज्ञान शाखेची पदवीधर. पण लग्नानंतर स्वत:हून पूर्ण वेळ गृहिणीपदाचा स्वीकार केलेला. तिला दिवस गेले तेव्हा आपण आई होणार याचा आनंद होता. पण घरचे जेव्हा उठसूठ तिला 'पेढा हवा, बर्फी नको गं बाई!" असं सुचवू लागले, तेव्हा ती नाराजीने व स्पष्टपणे नवऱ्याला म्हणाली "हे काय, मुलगा की मुलगी हे काय आपल्या हाती असतं? जे व्हायचं ते होऊ दे..."

"पण मला मात्र, खरं सांगतो राणी, मनापासून मुलगा हवा आहे."

"तुम्हीही तसेच - इतरांसारखे." त्याच्याकडे ती क्षणभर अविश्वासानं पाहात राहिली. ठरवून केलेलं लग्न असलं तरी, त्याचा उमदा प्रेमळ स्वभाव पाहाता ती वाङ्निश्चयापासून त्याच्या मनस्वी प्रेमात पडली हेती. वाङ्निश्चय ते विवाह या तीन महिन्याच्या काळात ते दोघे प्रेमीजनांप्रमाणे वावरत होते. तो तिला उदार व स्त्रीपूजक वाटला होता. सासूबाईंचा बोलभांड व काटेरी स्वभाव असला तरी त्याचा आईवर केवढा जीव होता. बहिणीसाठी किती दक्ष होता. एका आत्याच्या आजारपणात त्याच्या मुलाबरोबर पंधरा दिवस रजा घेऊन त्यांनही तत्परतेनं शुश्रूषा व दवाखाना केला होता. हे सारं तिला मनस्वी भावलं होतं. तो स्त्रीप्रति मार्दवशील आहे. आपल्याला जपेल, आपलं मन सांभाळेल, हा विश्वास तिला त्याच्या निकट घेऊन गेला होता.

आणि लग्नानंतरची ही दोन वर्षे त्या तिच्या विश्वासाच्या कसोटीवर सार्थ उतरलेले होते. तो तिचं मन कसोशीनं जपायचा. तिची प्रत्येक इच्छा पूर्ण त्याच्यासाठी आज्ञा असावी अशी तत्परता तो त्या पुऱ्या करताना दाखवायचा.

असा आपला नवरा आज हे काय बोलतो आहे? क्षणभर तिचा विश्वास बसला नाही. मुलाची इच्छा असावी यात तिला काही गैर वाटायचं नाही. पण 'पेढा हवा, बर्फी

नको' असा सासरच्या मंडळींचा प्रेमाचा पण जुलमी आग्रह तिनं कधीही मनावर घेतला नाही. पण आज नवरा पण मुलगाच हवा म्हणत होता. आणि केवळ आग्रह नव्हता, त्या पलीकडचं काही होतं. हे तिला त्या क्षणी फार खटकलं होतं.

"राजा, मी आई होणार आहे, याचा मला स्त्री म्हणून आनंद आहे. मुलगा की मुलगी हा सवाल गौण आहे." ती म्हणाली, "मला सांग, काही झालं तरी तुझ्या बापपणात काही फरक का पडणार आहे? तिचा किंवा त्याचा तू पप्पाच होणार आहेस, हे महत्त्वाचे नाही का?"

तो चूप झाला होता. पण त्याच्या सुप्त व अबोल मनात अस्सल पुरुषी विचारतरंग उमटत होते. आणि त्याला एकच स्वर होता, एकच ध्यास होता - मला मुलगा हवा. मुलगा.

का नको आपल्याला मुलगी? त्याच्या विवेकी मनानं त्याला फटकारलं, तसा तो मनोमन निरुत्तर झाला. खरंच का आपल्याला मुलगा हवा - वंशाचा दिवा हवा?

त्याचं ते विवेकी, विचारी मन त्याला सांगू लागलं, "बेट्या, ही खास भारतीय व आशियाई - पौर्वात्य मानसिकता आहे. कारण मनापासून आपण स्त्रीला हीन, दुय्यम लेखत आहोत. तिला शिक्षणाचा अधिकार नाकारून तिच्या प्रगतीच्या वाटा बंद केल्या आणि आपली पुरुषवर्चस्वाची श्रेष्ठत्वाची भावना रुजत गेली. खरं तर, वंशाचा दिवा, कुलदीपक किंवा म्हातारपणाची काठी म्हणून मुलगा हवा ही आधुनिक काळात सर्वथा फोल ठरलेली भावना आहे. तिच्या तू फार आहारी जाऊ नकोस."

गणेश स्वत: एका मोठ्या आय. टी. कंपनीत बड्या हुद्द्यावरचा संगणक अभियंता होता. भारतात दर दहा वर्षाच्या जनगणनेत मुलींचे कमी होणारे प्रमाण व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्या त्याला माहीत होत्या. त्या डोक्यात होत्या. पण हृदयात शिरत नव्हत्या, मनाला भिडत नव्हत्या. त्यामुळे त्याच्या विवेकी मनाचे फटकार त्याला विचारांपासून परावृत्त करण्यास असफल ठरत होते.

मुलगा हवा ही तीव्र लालसा त्याला अंबाबाईला कौल लावण्यास प्रवृत्त करत होती. त्याला स्वत:ला विचारानं कौल-नवस या बाबी निरर्थक वाटत होत्या. पण आपल्या होणाऱ्या अपत्याचं लिंग काय आहे हे जाणून घेण्यासाठी तो आतुर होता. आपण ज्या उच्चपदावर काम करीत आहोत त्या पदाची आधुनिकता व त्याद्वारे निर्माण झालेली आपली मॉडर्न प्रतिमा, त्यामुळे स्वत: देवीला कौल लावण्याची मनोमन इच्छा असूनही त्याला तो धजत नव्हता त्यामुळे त्यानं सरिताला कौल लावण्यास सांगितलं.

ती सश्रद्ध होती. तिच्या माहेरची व सासरची कुलदेवता अंबाबाईच असल्यामुळे तिनं कौल लावला. पण ती कौलाबाबत तटस्थ होती. तिला आई व्हायचं होतं व अपत्य मुलगा की मुलगी ही बाब तिच्यासाठी गौण होती.

त्यामुळे कौल मुलीच्या बाजूने पडला त्याचा तिला खेद मुळीच नव्हता.

उलटपक्षी ती म्हणाली, "तुम्ही भाग्यवान आहात, पहिली बेटी धनाची पेटी हे खरं ठरलेलं मी पाहातेय. तुम्हाला बढतीनं सीनियर एक्झिक्युटीवचं प्रमोशन मिळालं, हा येणाऱ्या बेबीचा पायगुण समजायला काय हरकत आहे?"

स्पर्धेत दोन सीनियर असताना गुणवत्ता व मेहनतीच्या जोरावर सीनियर एक्झिक्युटीवचं कंपनीत मिळालेलं पद त्यालाही सुखावून गेलं. पण हा येणाऱ्या बाळाचा पायगुण मानायला त्याचं मन तयार नव्हतं. कारण देवीला लावलेल्या कौलाप्रमाणे मुलगी जन्मणार होती.

त्याच्या छद्मी मनानं पुन्हा टोकलं, "समजा, देवीचा कौल मुलाच्या बाजूने असता तर हा पायगुण वाटला असता की नाही?"

दिवसेंदिवस सरितेच्या अंगावर गर्भारपणाचं तेज पसरत होतं. ती केतकीसारखी पिवळीधमक रसरसत होती. तिच्याकडे पाहाताना नजर हटवू नये एवढी ती बहरून आली होती. त्याचं सौंदर्यसंपन्न मन तिचं ते लावण्यरूप प्राशन करायला सदैव अधाशी असायचं.

पण त्या सदैव प्राशनानं होणाऱ्या तृप्तीतही एक अतृप्ती होती. आपल्याला पहिली मुलगी होणार आहे. पुन्हा दुसरं अपत्य होईल - न होईल. कोण जाणे. आजकाल वाढत्या प्रदूषित वातावरणात स्त्रियांची जननशक्ती कमी होतेय, असं म्हटलं जातं!

त्याला आपल्या मनातील या उलटसुलट विचारांचा राग येत होता. आणि शीणही जाणवत होता. आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. आधुनिक तंत्रशिक्षण व नोकरी असूनही आपण पुराणपुरुषाप्रमाणे जुन्या विचारांचे प्रतिगामी कसे? हे त्याचं त्यालाच उमगत नव्हतं. आपण एवढं शिक्षण घेऊनही व देश विदेश हिंडूनही शंभर टक्के पुरुषी वृत्तीचेच आहोत, ही विदारक जाणीव त्याला स्वत:ला आपल्याच नजरेत शरमिंदी करीत होती!

पोटातल्या बाळाची वाढ व प्रकृती पाहण्यासाठी सोनोग्राफी चाचणी करायची होती, त्याच्या आधी काही दिवस गणेशानं आपल्या मनातील खदखद आपल्या मित्रापुढे पोटात व्हिस्कीचे दोन पेग गेल्यावर व्यक्त केली. तेव्हा मित्रानं सरळ सल्ला दिला, "त्यात एवढं काय आहे? सेक्स डिटर्मिनेशन - लिंग-निदानाची टेस्ट करून घे, अन खात्री कर!"

"अशी टेस्ट करता येते?"

"तुला माहीत नाही?" तो मित्र त्याच्याकडे आश्चर्यानं पाहात त्याला खुळा समजून काहीसा खिजवत म्हणाला, "अरे, अशा डॉक्टरचं पेव फुटलंय आपल्या जिल्ह्यात. अरे, सोनाग्राफी मशीन हे गर्भातील विकृती पहाण्यासाठी, वाढ पाहाण्यासाठी जसं उपयुक्त आहे, तसंच त्याद्वारे बारा आठवड्यानंतर लिंगही जाणून घेता येतं. आणि

त्यानंतर गर्भपातही!''

''पण कायद्याप्रमाणे लिंगचाचणीला बंदी आहे ना?''

''अरे, आपल्या देशात कायदे खूप आहेत, पण कायद्याचं राज्य कुठंय? आणि सर्व डॉक्टरांना झटपट श्रीमंत व्हायचंच असतं. आणि तुझ्यासारखे मुलगाच हवा म्हणणारे का कमी आहेत समाजात? त्यांचं त्यामुळे फावतं!''

''तू... तू मला त्यातलाच एक समजतोस?'' काहीशा अपराधी भावनेनं गणेशनं विचारलं, ''मी सहज बोलून गेलो.''

''मी काही समजत नाही, आणि निष्कर्षही काढीत नाही.'' मित्र म्हणाला, ''अब दिल्ली दूर नाही. मला काय, जगालाही यथावकाश आऊटकम कळेलच!''

रात्रभर गणेशाला झोप आली नाही. मनात ती माहिती विषासारखी भिनत गेली. विवेकी मनावर मात करीत त्याचं पक्कं ठरलं गेलं, की, आपण सोनोग्राफी टेस्टच्या वेळी डॉक्टरकडून लिंगनिदान करून घ्यायचं.

आणि देवीचा कौल खरा ठरला आणि लिंगनिदान चाचणीतही मुलगीच निघाली तर?

गर्भपात? भ्रूणहत्या?

हे दोन शब्द मनाभोवती पिंगा घालत होते. पण मन कचरत होते आणि मित्राची भीती वाटत होती. त्याच्यापुढे आपला 'वीकनेस' उघड झाला होता. उद्या त्याला रोज कंपनीत कसा तोंड देऊ?

पण दोनच दिवसात तो मित्र कंपनी सोडून नोयडाला दुसऱ्या एका कंपनीत अधिक मोठ्या पदावर जॉईन झाला. आणि गणेशाचा जीव भांड्यात पडला.

आणि ती असुरी कल्पना गणेशाचा पिच्छा सोडेना. ऑक्टोपसप्रमाणे आठ टेंटॅकल्सद्वारे चहूबाजूंनी त्याच्या मनाचा कब्जा त्या अघोरी विचारानं घेतला होता.

सोनोग्राफी टेस्ट करताना डॉक्टरांनी भरमसाठ फी आकारून लिंगनिदान चाचणीचा निष्कर्ष सांगितला - ''मुलगी!''

त्यानंतरचा महिना त्याच्यासाठी अस्वस्थ खदखदीचा होता. पण तो सावध होता. कुणाशीही चर्चा-मसलत करायची नाही, जे काही करायचं ते आपल्या मनानं, असं त्यानं ठरवून टाकलं होत!

इकडे सरिता मुलीच्या स्वप्नरंजनात रमली होती. नवऱ्याशी बोलताना त्याच गप्पा. पण एकतर्फी, तो केवळ हां हुं करत कोरडा प्रतिसाद द्यायचा हा त्याचा अबोला आई होण्याच्या सुखामध्ये न्हाऊन निघताना सरिताच्या लक्षात येत नव्हता.

तिनं माधुरी - मधुबाला ह्या दोन सिनेनट्यांच्या देखण्या तसबिरी एक दिवस बेडरूममध्ये लावल्या. त्याला त्याचं कारण सांगताना ती म्हणाली, ''मला तुला जगातली सर्वात सुंदर कन्या द्यायची आहे. म्हणून या तसबिरी!''

''आणि कौल जर मुलाच्या बाजूने असता तर?''

''मी इथं राजकपूर व हृतिक रोशनची तसवीर लावली असती.'' सरिता म्हणाली, ''कदाचित हा खुळेपणा असेल, पण तो लोभस आहे. शास्त्रीय दृष्टीने नाही, पण माझं मन ग्वाही देत की, देवीचा कौल खरा ठरणार. आपल्याला मुलगी होणार. आत्तापासूनच माझ्या मनात तिची प्रतिमा तयार होतेय. तुझी बुद्धिमत्ता, तुझं आरोग्य घेऊन. तसंच - मी म्हणत नाही, तूच म्हणतोस ना, मी सुंदर आहे, त्यामुळे माझं, तुला आवडणारं, सौंदर्य घेऊन आपली मुलगी जन्मास यावी.''

तिच्या या गोड व मधुर स्वप्नरंजनात गणेशला सामील होता येत नव्हतं. उलट ते त्याला इंगळ्या डसल्याप्रमाणे वेदना देत होतं. आपल्या मुलाच्या स्वप्नावर ते नांगी मारतंय व खिजवतंय असं वाटत होतं.

तरीही तिचा त्याला राग करता येत नव्हता. तिला दुखवता येत नव्हतं. त्याला आपल्या पोटी माधुरीसारखी सुंदर कन्या नको होती, तर हृतिकसारखा बलदंड व देखणा मुलगा हवा होता!

मनकवडी होत ती म्हणाली, ''मला माहीत आहे, तुम्हाला पहिला मुलगा हवा होता, पण ते आपल्या हाती थोडंच असतं? देवीचा कौल आणि माझी मनोदेवता सांगते की मुलगी होईल. पण मुलगा झाला तरी मला आनंदच आहे. काही पण होऊ दे, आपण आई बाबा होणार हे महत्त्वाचं. पेढा काय, बर्फी काय? दोन्ही गोड ना!''

कसला सण होता म्हणून तिनं पुरणपोळी केली हेती. ती कर्नाटकी पद्धतीची खरपूस भाजलेली चविष्ट पुरणपोळी करण्यात माहीर होती. तो तिच्या हातच्या पोळीवर नेहेमी आडवा हात मारायचा. पण आज तीच चव असूनही त्याच्यासाठी ती नासली होती. तोंडातच घास घोळत होता.

त्याला स्वत:चा विलक्षण संताप येत होत. आपण का नाही दैवावर सोडून देत जे होईल त्यांचा स्वीकार करायला तयार होत? सरितेनं नाही का म्हटलं, तिला मुलगी हेईल असं वाटतंय, पण मुलाचाही ती स्वीकार सहजतेनं करेल. आपणही असं का सहजतेनं मुलगा वा मुलगी, जे अपत्य होईल. त्यांचा स्वीकर करू शकत? मुलाचा अट्टाहास का?

आणि त्यासाठी मनातला जागा झालेला सैतान आपण का कुरवाळत आहोत? तो सैतान पण मनमानस पोखरतोय, तरीही त्याला हुसकून  लावावसं वाटत नाही.

पण त्या सैतानाचा कानमंत्र पटला असूनही आपला जीव का धजत नाही ते करायला?

सरितेच प्रेम? होय, ते मागे ओढतेय, तिची नाजूकता हा आपल्या प्रीतीचा विषय. आज त्या नाजूकतेची काळजी वाटतेय. उद्या तिची तब्येत बिघडून पुन्हा गर्भधारणा होणार नसेल तर?.....

पण... पण... पण..

डॉक्टरांनी त्याला निर्वाणीचं सांगितलं, "हे पहा मि. गणेश, काय निर्णय घ्यायचा तो चार आठ दिवसांत घ्यावा लागेल. आता आठवड्याभरात तुमची पत्नी सहाव्या महिन्याची होईल. त्यावेळी तिच्याही जीवाला धोका संभवतो, मग मीच काय, कुणीही डॉक्टर गर्भपात करणार नाही. तेव्हा अधिक लांबड लावू नका."

"मला - मला भीती वाटते डॉक्टर. आपलं हे गैरकृत्य उघडकीस तर येणार नाही ना?"

"तसं कठीण आहे. पण... पण लेट मी थिंक." डॉक्टर 'डोंट वरी' म्हणण्याऐवजी अर्धवट बोलत थांबले. कारण त्या क्षणी त्यांच्या लक्षात आलं होतं की, इथं हात धुवून घेण्याची चांगली संधी आहे. तेव्हा त्यांनी दहापाच मिनिटे गर्भजल परीक्षेचा कायदा (पी. सी पी एन डी टी अ‍ॅक्ट), त्यांची गंभीर कलमे व होणारी जबर शिक्षा इत्यादी रंगून सांगून शेवटी म्हणलं, "डोंट वरी. असं असलं तरी मी आहे ना. तुम्ही निर्धास्त राहा. फक्त हात सैल सोडायची तयारी ठेवा!"

निरोप देताना डॉक्टरांनी गणेशला शेवटचं बजावलं, "नाऊ ऑर नेव्हर. थिंक अँड लेट मी नो."

आता गणेशाला निर्णय करायचा होता. त्याच्या मनात पूर्ण पसरलेल्या सैतानानं तो केव्हाच केला होता. गर्भपात व त्याद्वारे भ्रूणहत्या. डॉक्टर सारी कायदेशीर बाजू सांभाळणार होते.

त्यानं अखेरीस हा निर्णय पक्का केला, तेव्हा मन शांत झालं. पण तरीही ते त्याला धिक्कारत राहिलं. त्याकडे दुर्लक्ष करायचं, सद्सदविवेकबुद्धी दाबायची, हे त्यानं ठरवलं होतं!

सरितेला पुन्हा त्यानं डॉक्टरांकडे सोनोग्राफीला नेलं, डॉक्टरांनी गंभीरपणे तिला सांगितलं, "पोटात रक्तस्त्राव होतोय. दवाखान्यात अ‍ॅडमिट व्हावं लागेल." तसं अविश्वासानं तिनं विचारलं, "पण डॉक्टर, मला तर काही त्रास होत नाही उलट मी व बाळ मजेत आहोत."

"वरून कळत नसतं मॅडम!" डॉक्टर म्हणाले, "आणि डॉक्टर मी का तुम्ही?" तशी ती चूप झाली, पण तिला काही तरी खटकतं होतं. तिनं नवऱ्याकडे प्रश्नार्थक नजरेन पाहिलं, तेव्हा त्यानं आपली चर्चा निर्विकार ठेवीत तिची नजर व पुढचं संभाषण टाळलं!

तिला भूल देऊन डॉक्टरांनी गर्भपात केला. ते हत्या केलेले भ्रूण पाहाताना गणेश मनोमन शहारला होता. त्याच्या काळजात एक खोल चरा उमटला होता. आपण खून केला आहे, असं मनाला कुठेतरी वाटत होतं.

पण त्यांच्या शरमिंदेपणाला स्वत: बद्दलच्या तीव्र घृणेची जोड तेव्हा मिळाली,

जेव्हा अनावर झालेल्या सरिताने काळीज कापवणारा टाहो फोडाला, 'हे-हे काय झाले?'

तिचा हात रिकाम्या पोटावरून फिरताच ती पुन्हा आक्रंदन करीत म्हणाली, "कुठे आहे माझं बाळ? कुठे आहे माझी बेबी?"

डॉक्टरांकडे तिरस्काराची नजर टाकीत ती क्रुद्ध स्वरात म्हणाली, "तुम्ही-तुम्ही माझ्या बेबीला मारतात. तुम्ही खुनी आहात!"

गणेशानं तिला सावरण्यासाठी तिच्या जवळ जात तिचा हात हाती घेत म्हणाला, "शांत हो राणी, शांत हो.."

विजेचा झटका बसावा तसं सरितेनं त्याच्या हाताचा स्पर्श होताच तो झटकून टाकीत म्हटलं, "तुम्ही पण खुनी आहात माझ्या बाळाचे. दूर व्हा माझ्या नजरेसमोरून!"

गेला पूर्ण महिना ती त्याला नजरेसमोर येऊ देत नव्हती. रात्रंदिवस आक्रंदत होती. डोळ्याला लागलेली अविरत धार. स्वत:ला एकटं काळोखात कोंडून घेणं. तिची ही अवस्था पाहात बाजूच्या गेस्टरूममध्ये तो अस्वस्थ, बैचेन होत तिची तडफड मनोमन झेलायचा आणि स्वत:च घायाळ व्हायचा.

मग तिचा तोल जाऊ लागला. कसले भ्रम तिला होऊ लागले.

अशाच एका भ्रमात चक्क तिनं त्याला बोलावून विचारलं, "माझी बेबी कुठंय? तिलं दूर का ठेवलंय? मला दूध येत नाही म्हणून? पण मला एकदा तरी तिला भेटवा हो....!"

तिचा हा भ्रम त्याला थोडा आश्वस्त करत गेला होता. आता या क्षणी ती त्याला खुनी-मारेकरी म्हणत नव्हती, तर लकडा लावीत होती की, माझी बेबी मला आणून द्या.

"रक्तस्त्रावामुळे अपुऱ्या दिवसाची मी बाळंत झाले, त्यामुळे का बेबी कमी वजनाची जन्मली आणि तिला इनक्युबेटरमध्ये ठेवावी लागली? काही हरकत नाही. मला तिथं घेऊन चला.... एकदा तिला पाहू द्या हो."

तिचा हा भ्रम बळावत होता. आता पुन्हा ती हिस्टेरिक होत चालली होती.

गणेश एकटा असताना फाडफाड स्वत:च्याच मुस्काटात मारून घेत, स्वत:चा धिक्कार करायचा. 'थू तुझ्यावर! तू का माणूस आहेस? सैतान- खुनी आहेस. स्वत:च्याच गर्भाला मारलंस. ती मला कधीच माफ करणार नाही. माझा अपराध फार मोठा आहे. तिनंच काय, पण देवानंही माफ करू नये मला!'

आता तो सर्वत्र उघड्या मनाने पाहू लागला. अरे, हे कधी आपल्या लक्षात आलं नाही की, आपली आई वडिलांपेक्षाही किती कर्तबगार आहे. आपली धाकटी बहिण भारतीय संघात क्रिकेटर आहे व मला तिचा भाऊ म्हणून ओळखतात - आता ती सैन्यदलात जायचं म्हणते. म्हणजे क्रीडा घ्या, घरगृहस्थी घ्या किंवा संरक्षण दल घ्या,

सर्वत्र स्त्री बरोबरीने वावरते आहे.

मला हे आजवर कधीच कसं जाणवलं नाही? किती अविचारी पद्धतीनं मुलाचा आपण ध्यास घेतला. आपले आवडते राजकीय नेते पं. नेहरू व शरद पवारांना एकच मुलगी आहे. त्यांनाच त्यांनी राजकीय वारस म्हणून पुढे आणलं. इंदिरानं तर दिगंत किर्ती मिळवत बापाचं नाव किती तरी मोठं केले. सुप्रिया पण त्याच मार्गावर आहे.

आणि आपल्या गावची सुवर्णकन्या तेजस्विनी सावंत! ती व तिच्या दोन बहिणींचा आई बापांनी अभिमान बाळगला. आज तेजस्विनीनं शूटिंगमध्ये जागतिक पराक्रम करीत वडिलांचं व घराण्याचं नाव किती उंच केलं!

आपली व सरितेची बेबी पण अशीच नक्षत्रासारखी सुंदर झाली असती आणि आपलंही नाव तिनं रोशन केलं असतं!

मी फार मोठा अपराध केला आहे. सरितेचा तर मी शतश: अपराधी आहे. मला त्याचं परिमार्जन केलं पाहिजे. या भयंकर अशा भ्रूणहत्येच्या अपराधाचं प्रायश्चित घेतलं पाहिजे!

कसं? कसं?

त्याच्या कंपनीच्या बॉसला मुलीचा वाढदिवसानिमित्त देणगी द्यायची होती. त्यांना इंटरनेटवर सर्च करताना या शहरातील 'बालसंकुल' या अनाथ मुलांसाठी रिमांड होम व ॲडॉप्शन सेंटरची माहिती मिळाली. तेव्हा ते तिथं गणेशला घेऊन गेले व एक लाखाचा चेक संस्थेला देणगी दिली.

त्यावेळी संस्थेची माहिती घेताना गणेशनं नवजात, टाकलेल्या बाळाच्या खोलीत एक छोटी दीड एक महिन्याची गोंडस मुलगी इनक्युबेटरमध्ये असलेली व स्वत:शी खेळताना पाहिली. आणि त्याच्या काळजात एक तीव्र कळ उमटली.

आपली बेबी जन्मली असती तर कदाचित अशीच दिसली असती, आज एवढीच राहिली असती!

त्याच्या मनात सरितेचे ते बोल घुमू लागले, "रक्तस्रावामुळे अपुऱ्या दिवसांची मी बाळंत झाले, त्यामुळे का तुम्ही तिला कमी वजनाची आहे म्हणून इनक्युबेटरमध्ये ठेवली आहे? काही हरकत नाही. मला तिथं घेऊन चला. मला तिला भेटायचं आहे!"

हा - हा देवीचा कौल आहे? दुसरा कौल? पहिला कौल आपण उधळून लावला. त्याची मी शिक्षा भोगतोय, माझी प्रिय पत्नी ही आज त्या आपल्या कृत्यामुळे जिवंत कलेवर झाली आहे. मुलीचा ध्यास घेत भ्रमिष्ट झाली आहे.

मनात एक विचार चमकून गेला आणि स्वत:शीच तो समाधानाने हसला. येस.. मला असंच केलं पाहिजे!

त्या दिवशी सकाळी सरिता झोपेतून जागी झाली, तेव्हा तिच्या कुशीत एक छोटी मुलगी खेळत होती. तिला बिलगत होती.

"बेबी - माझी बेबी!" सरिता आनंदानं चीत्कारली, तिचे डोळे भरून आले. ते पुसत कुशीत खेळणारी ती छोटी मुलगी पाहू लागली.

तिला तिनं आवेगात छातीशी धरलं, आणि त्याला हाक मारली. तो जवळच होता. त्याला पाहाताच ती म्हणाली, "असा गोड धक्का मला द्यायचा होता तर? केव्हा बरी झाली आपली बेबी! तिला इनक्युबेटर मधून केव्हा घरी आणली? आजच ना! मी मेली ठार झोपेत होते.... हे पहा ... मला खरंच पान्हा फुटतोय."

तो अवाक होऊन पाहात होता. मातृत्व एवढं प्रखर, सुंदर असतं? अगदी खरं आहे, स्त्री ही अनंत काळाची माताच असते, आणि मीही तसाच अनंत काळाचा पिता बनायचा प्रयत्न करीन!

बाहेर येत तो बालसंकुलाच्या संचालकांना म्हणाला, "मी आभारी आहे. आपण किती लवकर व तत्परतेनं दत्तक विधान प्रक्रिया पूर्ण करून दिली!"

पुन्हा काही वेळानं तो आत आला. सरिता बेबीला खेळवण्यात रंगून गेली होती. कसलं तरी बडबडगीत बोबड्या स्वरात म्हणत होती. तो त्या मातृत्वाच्या वात्सल्याच्या भिजून गेलेल्या बालगीतात रमून गेला.

बेबीला त्यानं हातात घेतलं. तिच्या गोबऱ्या गुलाबी गालाचा हलकेच पापा घेतला व सरितेला म्हणाला, "हिचं नाव आपण माधुरी ठेवू या!"

"ऐकलं का लबाडे? तुझे बाबा तुझं नाव माधुरी ठेवणार म्हणे?" आणि त्याच्याकडे पहात ती म्हणाली, "तिला व मला दोघांनाही माधुरी हे नाव पसंत आहे!"

तो एकदम किंचाळला, "अग... अग, हे काय?"

"माधुरीनं प्रसाद दिला वाटतं?" त्याचा ओला शर्ट पाहात सरिता खट्याळपणे म्हणाली, "आता खरेखुरे बाप झालात, हा, हा शकुन आहे बरं!"

तो नुसताच समाधानानं हुंकारल्यासारखा हसला,

"आता दुसऱ्यांदा मी तुम्हाला मुलगा, पुत्र देईन - प्रॉमिस!"

"अं हं, आता मला माधुरी पाठोपाठ मधुबाला हवीय - मधुबाला!"

०-०-०

# १५. लंगडा बाळकृष्ण

## पुर्वार्ध

### तो एक बाप

तुम्हाला आश्चर्यचकित व्हायचं काही कारण नाही. कारण बसस्टँडवरील ऑटो रिक्षावाल्यांची नजर आता तयार झाली आहे. ते नेमकेपणानं तुम्ही 'जय महालक्ष्मी हॉस्पिटल'मध्ये जाण्यासाठी जिल्ह्यातील गाव - तालुक्यातून किंवा जवळच्या जिल्ह्यातून आले असणार हे अचूकपणे ताडतात. आपणहून तुमच्याजवळ येतात आणि मीटर टाकून तुम्हाला दवाखान्यात घेऊन जातात.

'जय महालक्ष्मी हॉस्पिटल.'

तसं फार मोठं सुसज्ज व आधुनिक हॉस्पिटल म्हणता येणार नाही. पण 'माऊथ पब्लिसिटीनं' प्रसिद्ध झालं आहे. हमखास मुलगे पैदा करणारं हॉस्पिटल म्हणून खेड्यापाड्यात त्याचं नाव आहे.

आणि दवाखान्यात जर कुणी चक्कर कधी मारली व चर्चा ऐकली तर कानावर कधी चुकार क्षणी शब्द पडून हमखास जातील. ''आज पाच हजार खर्च करा, उद्या पाच लाख वाचवा....''

पण कृपया मला त्याचा अर्थ उलगडून सांगायचा आग्रह करू नका. तुम्ही तेवढे सुज्ञ नक्कीच आहात.

नाही तर, आज तुम्ही तुमच्या बायकोला, आईसह कशाला या दवाखान्यात आणलं आहे?

कमॉन यार! कशाला उगाच ताक मागायला जाताना भांडं लपवता?

पुत्रजन्माचा सोस असणारे तुम्ही एकटेच नाही आहात. ती नमुनेदार भारतीय मनोवृत्ती आहे. आपलं धर्मशास्त्र सांगतं की, मुलानं अग्नी दिला नाही तर आत्म्याला सद्‌गती मिळत नाही. गरुड पुराणात हे स्पष्टपणे म्हटलं आहे. तुम्ही आम्ही हिंदू मंडळी - जात कोणतीही असो - भाविकच ना! आणि या एका बाबतीत एकमत. पुन्हा मुलगा हा वंशाचा दिवा. भले आपण सामान्य कारकून, शाळा मास्तर किंवा शेतकरी,

शेतमजूर वा छोटे-मोठे व्यापारी असो, आपल्याला त्यांचं नशीब म्हणून आजोबांचं, क्वचित प्रसंगी पणजोबाचं नाव आठवतं; कारण अजूनही भिंतीवर वाळवीनं खालेल्ली व तडा गेलेल्या काचेसह त्यांची तसबीर आहे. ते केवळ जन्मले, वाढले, जगले, संसार केला, तुमच्या वडिलांना - आईंना जन्म दिला आणि एक दिवस मरून गेले. ते तुमच्याही क्वचितच स्मरणात श्राद्ध, पितरपंधरवडा प्रसंगी - बाकी त्यांची कुणाला आठवण आहे? तरीही तुम्हाला वंशाचा दिवा हवाय, जसा यांना हवा होता व तो त्यांनी तुमच्या रूपाने पैदा केला व धन्य धन्य झाले. तुमच्या पत्नीनं त्यांचे म्हातारपणी हाल केले, काही जणांना सरकारी मातोश्री वृद्धाश्रमात वा पैसा असला तर खाजगी वृद्धाश्रमात राहावं लागतंय. ते तुम्हाला चांगलं माहीत आहे. तरीही तुम्हाला वंशसातत्यासाठी व आडनाव पुढे नेण्यासाठी कुलदीपक हवा आहे. तुम्ही कबूल नाही करणार, पण उद्याच्या एकविसाव्या शतकाच्या आधुनिक चंगळवादी जगात तुम्हाला तुमची मुलं विचारतील की नाही, याची मनोमन धास्ती आहे. तरीही वंशाला दिवा हवाच. ते काही मनातून जात नाही. खरं ना?

हो, त्यासाठीच तर तुम्ही 'जय महालक्ष्मी हॉस्पिटल' मध्ये आला आहात ना. पहिल्या वेळी विचार नाही केला, मुलगी झाली. 'पहिली बेटी धन की पेटी' म्हणून समाधान मानलं. खरं तर तुमच्या मते 'कोई भी बेटी खर्चे की पनौती' आहे. पण समाजात वावरताना तसं बोलता येत नाही. कारण तुमची आधुनिक पुरोगामी प्रतिमा तुम्हीच तयार केलीय. ना. ती जपणं भाग आहे. दुसऱ्या वेळी मात्र तुम्ही हुशारीनं तपासून घेतलं आणि मुलीचा गर्भ म्हणून पाडून टाकायला बायकोला बळजबरी केली. एवढंच नव्हे तर दोन तीन गर्भपात, ॲबॉर्शन लादले. त्यात तिची रया गेली म्हणून बाहेर मजाही करता. तिनं तक्रार केली तर तिला धमकी देता, "आता काय राहिलंय तुझ्यात? जरा बाहेर सुख पाहिलं तर नाक वर करीत तक्रार करतेस?" आणि कबूल करा की, तुमचा हातही प्रसंगी उठायचा. तिला बिचारीला सावरून घेत चार लोकापुढे म्हणावं लागतं की, 'तसं काही नाही. मीच पाय घसरून पडले होते, त्यामुळे ही जखम झाली!' हेच वा असंच कारण तिनं गर्भपात झाल्यावर शेजारी पाजारी सांगितलं असणार.... जाऊ द्या साहेब! उगीच मला तुम्हाला शरमिंदा करायचं नाहीये.

पण सारं शहर जाणतं, 'जय महालक्ष्मी हॉस्पिटल' मध्ये तपासणी करायला लोक का जातात? तुम्ही उगी आपलं कानकोंडं होऊ नका.

चला, बिंधास्त चला! तुमचं सारं निस्तारायला व तुमचं रक्षण - कल्याण करायला ती महालक्ष्मी माता समर्थ आहे.

हे मी नाही, खुद्द डॉक्टर सांगतात या हॉस्पिटलचे!

'जय महालक्ष्मी हॉस्पिटल'ची सुबक दुमजली इमारत आहे, ती प्रथमदर्शनी नजरेत भरते ती प्रवेशद्वाराच्या वर भिंतीमध्ये चोवीस तास चमचमणाऱ्या विद्युतमाळेच्या

प्रकाशात दिसणाऱ्या महालक्ष्मीच्या तसबिरीनं!

डॉक्टर महाशय देवीचे परमभक्त आहेत. ते दररोज सकाळी स्नानानंतर देवीचं मुखदर्शन करून मगच ब्रेकफास्ट घेतात व आपल्या दिवसभराच्या कामाला लागतात. आत वेटिंग रूममध्येही देवीची सालंकृत प्रतिमा आहे.

पण ती गर्भवती मातांना खचितच दिलासा देत नाही. कारण त्यातल्या बऱ्याच जणी रिकाम्या कुशीनिशी व रित्या हातांनी परततात! त्यांचे नवरे व सासवा मात्र मनोभावे देवीला परत जाताना नमस्कार करीत मनोमन म्हणतात, 'माते, तूच संकटातून वाचवलंस!'

दवाखान्याचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. दवाखान्यात साखळदंडानं बांधलेले दोन आडदांड, वाघाची बछडी वाटावीत, असे हाऊंड कुत्रे! खास अफगाणिस्थानच्या काबूलहून आणलेली ही शिकारी कुत्री आहेत. त्यांचं हिंस्र सौंदर्य तुम्हाला जाणवतं ना?

दवाखान्याच्या शेवटच्या टोकाला भलं मोठं कुलूप लावलेलं व लोखंडी जाळीनं बंद केलेलं एक बंद दार तुम्हाला दिसेल. ते दार स्वत: डॉक्टर कधी तरी रात्री - अपरात्री उघडतात आणि मग साखळ्या धरून कुत्र्यांना तिथं डॉक्टरांचे दोन कंपाऊंडर, जिवा आणि शिवा घेऊन जातात. ही त्यांची टोपणनावं आहेत बरं का. डॉक्टरांनी एका दमात हाक मारायला सोपी जावीत म्हणून ठेवलेली.

दारापलीकडे काय आहे हे मात्र कुणालाच माहीत नाही. जिवा - शिवा तिथं कुत्री का घेऊन जातात व त्यापूर्वी हमखास डॉक्टर का जातात हे मात्र कृपया विचारू नका.

उगाच चोंबडेपणा नको महाशय! तुम्ही तुमच्या कामाशी मतलब ठेवा. पाणी घाल म्हटलं, की पायावर पाणी घालावं, यजमानाच्या वा पाहुण्याच्या भिकबाळीकडे पाहू नये, ह्या जुन्या कालबाह्य झालेल्या म्हणीची तुम्हाला आठवण करून देतो. समझनेवालोंको इशारा काफी है!

काय, भलताच हट्ट धरलाय तुमच्या पत्नीनं? तिला समजवा की राव. एवढं हिंमतीनं तिसऱ्यांदा तिचा पोटातला गर्भ मुलीचा आहे म्हणून पाडून टाकलात. क्षणाचाही विचार केला नाही. तुमच्या मनावर थोडा पण ओरखडा उमटला नाही. मानलं राव तुम्हाला. भले हिंमत बहाद्दर!

पण तरीही तुम्हाला बायकोला समजावून सांगता येत नाही? बरोबर आहे, ती सारखी पदर डोळ्यास लावून टिपं गाळते आहे. स्त्री ना ती. तिच्या डोळ्यात अश्रुपिंडांना काय कमी - तिचं रडणं तुम्ही मनाला लावून घेत नाही हे ठीकच आहे. पण अशा वेळी रागवता येत नाही. आवाज चढवून चूप पण बसवता येत नाही.

एकच तिचा हट्ट. "मला पाडलेला गर्भ पाहायचा आहे. तो मला आपल्या

शेतात नेऊन पुरायचा आहे व त्यावर एक मोगऱ्याचं झाड लावायचं आहे.''

काय हा भलताच विचार. त्याला काही अर्थ?

''आहेच मुळी! एक एक फुलणारी टपोरी मोगऱ्याची कळी मला माझ्या मारलेल्या मुलीची सुगंधी आठवण देईल. तेवढंच मन हलकं होईल!''

वा, काय तर्क! काय कल्पनाशक्तीचा फुलोरा. तुमची बायको कविता करते की काय? का अलका कुबल - आशा काळेंचे रडके मराठी सिनेमे पाहाते? नाही तर असं काही सुचलं नसतं!

माहीतंय महाशय की, तुम्हाला त्या गंभीर वातावरणात (हो, तुमच्या बायकोनं रडून डोक्यावर घेतल्यामुळे) हसं आवरताना कठीण जातंय - तिचं हे खुळचट भयंकर विनोदी बोलणं ऐकून. पण बाजूला नर्स आहे व अनेकांची जनरल वॉर्डमध्ये सतत ये जा आहे, म्हणून तुम्ही शांत आहात!

''ठीक आहे. मी डॉक्टरांना आले की विचारतो!''

''त्याशिवाय मी नाही हं घरी येणार.''

''पुरे. फार झालं. चूप आता!''

मागील दोन वेळा तिच्या तर नाहीच, पण तुमच्याही मनात पाडलेल्या गर्भाचं - भ्रूणाचं दर्शन घ्यायचं जरा पण आलं नव्हतं!

तुम्ही तसे धश्चोट व कठोर काळजाचे आहात. हे तुमची बायको अनेकदा म्हटल्याचं ऐकलंय म्हटलं आम्ही. पण तरीही तुमची ते पाहायची हिंमत झाली नव्हती - खरं ना?

अहो, तुमच्या पुरुषी वीर्याचा तो आविष्कार ना! तुमचं पुरुषत्व त्यानं पुन्हा पुन्हा सिद्ध होतं ना! त्या - त्या टोमण्याकडे तुम्ही दुर्लक्ष करता ते ठीकच आहे. तुमच्यात पोर पैदा करायचे गुण नाहीत - केवळ पोरीच पैदा होण्याचे क्रोमासोम्स आहेत! ते खरंच तुम्ही मनावर घेऊ नका. जन्मणाऱ्या बाळाचं लिंग हा गुणसूत्रांच्या खेळाची परिणती आहे हे त्यांना कळत नाही. पण ते आपल्याला थोडंच कळतं? ते टोमणे मारणारे अज्ञानी आहेत, असं मानून तुमचं दुर्लक्ष करणं योग्यच आहे. तुम्ही मात्र कसे विज्ञाननिष्ठ! म्हणून तर लागणाऱ्या डोहाळ्यावरून मुलगा का मुलगी यावर विश्वास न ठेवता, विज्ञानाची कास धरत सोनोग्राफी टेस्ट करता. शंकेला वाव नको म्हणून 'सेकंड ओपिनियन' घेता. या वेळी तर डॉक्टर महाशयांशी तिसरी वेळ असल्यामुळे झालेल्या मैत्रीचा हवाला देत तुम्ही स्वतः मॉनिटरवर लिंग पाहून खात्री करून घेतली. नुन्नीच्या ऐवजी छिद्र पाहून तुमच्या मनालाही शतशः छिद्रं पडली होती. हा भाग वेगळा. पण तुम्ही खरंच विज्ञानवादी.

त्यामुळेच तुम्हाला माहीत आहे की, पोटात असला तरी गर्भात प्राण भरलेला आहे. लहानपणी शाळेत पानामध्ये, वनस्पतीमध्ये जीव असतो याचा शोध लावणाऱ्या

जगदीशचंद्र बोसचा अभ्यासलेला धडा इतक्या वर्षानंतरही तुम्हाला आठवतो. त्यामुळेच न पाहिलेल्या व आत्ता कुठे चार महिन्याचा गर्भ झाल्यामुळे आकार यायला सुरुवात झाली होती, तो प्राण हरवलेला गर्भ पाहायला धीर होत नाही ना? कदाचित त्यात तुम्हाला तुमच्या रूपाची छाया दिसली असती, किंवा जिच्यावर तुमचं निरतिशय प्रेम होतं त्या बाळंतपणात दगावलेल्या बहिणीचं रूप दिसलं असतं तर तुमच्या नकळत तुमचा जीव हेलावला असता. अभावितपणे डोळ्यात अश्रूचे थेंब तरळले असते... ते तुमच्या धीरगंभीर, स्थितप्रज्ञ वृत्तीला शोभलं नसतं! असो.

पण या वेळी तुमच्या बायकोचा फार आग्रह आहे, म्हणून तुम्हाला डॉक्टरांना विचारणं भाग आहे. एक मात्र नक्की, तो स्त्री भ्रूण तुम्ही बायकोला नाही दाखवणार हे नक्की. तिच्या हळव्या मनाची तुम्हाला काळजी वाटतेय ना! बरोबर आहे. तिसरा गर्भपात - मुलगी आहे, म्हणून हे तिच्यासाठी सहन करणं कठीण आहे. त्यातून तिला सावरणं आवश्यक आहे. कारण तुम्हाला कुलदीपक हवाय. त्यासाठी पुन्हा तिच्यावर तुम्ही बाळंतपण चार-दोन महिन्यात लादणार... कशाला नकारार्थी मान उगाच हलवता? आम्हाला नाही फसवू शकणार बच्चमजी. हम सबकी खबर रखते है.

पण तुम्ही आज तो तुमच्या वीर्यातून आकारास आलेला व पोटातच खुडला गेलेला गर्भ पाहायची हिंमत करणार आहात - ब्रेव्हो! तुमच्या धिटाईला दाद देतो महाशय!

खरंच, तुम्ही धीराचे आहात. तुम्ही शांतपणे, निर्विकार चेहऱ्यानं तुमच्या इच्छेनं व भरपूर दिलेल्या पैशानं डॉक्टर महाशयांच्या द्वारे तुम्ही आपल्याच रक्ताचा, वीर्याचा व जीवनाचा अंश असलेल्या व मारलेल्या स्त्री भ्रूणाचा, गर्भाचा तो मांसल रक्ताळलेला गोळा पाहात आहात. तुमच्या मनात थोडी तरी कालवाकालव नक्कीच झाली असणार. पण तुमच्यातला पुत्राचा मोह पुन्हा वरचढ ठरत असणार. तुम्ही स्वत:ला बजावलंत ना, ''मला मुलगा हवा होता शास्त्र परंपरेनुसार. घराणं व आडनाव पुढे चालावं म्हणून. मला प्रॅक्टीकल व्हायला हवं! हे असले सेंटिमेंटल विचार पुन्हा मनात यायला नकोत. ते मला मुळापासून खुडून टाकायला पाहिजेत!''

तुमच्याच जातीचे डॉक्टरमहोदय. पुरुष आणि पुरते धंदेवाईक. कशाही मार्गानं लक्ष्मीदेवता आली तरी ती स्वागतार्ह असं मानणारे. इतर अनेकांप्रमाणे हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल ना की, हे डॉक्टर ज्या महालक्ष्मीचे भक्त आहेत, ती महालक्ष्मी म्हणजे पैसा - धनसंपदा तर नाही? वाच्यार्थाने व भावार्थाने पैसा उर्फ लक्ष्मी ही सर्वश्रेष्ठ म्हणून महालक्ष्मी - चीफ गॉडेस ऑफ वेल्थ! तिचे डॉक्टरमहाशय भगत - निस्सीम!

''डॉक्टर, या पाडलेल्या गर्भाचं तुम्ही काय करता?'' तुमचा प्रश्न ऐकून डॉक्टर

महाशय थोडे दचकले व म्हणाले, "त्याच्याशी तुमचा मतलब?"

"तसा काही नाही. पण एक उत्सुकता म्हणून- कुतूहल म्हणून."

"तुम्ही माझे गाववाले, माझ्या जातीचे. म्हणून तुम्हाला ते मी सांगेनही." डॉक्टर विचारपूर्वक म्हणाले, "पण ते गुपित ठेवलं पाहिजे."

"नक्कीच. कारण हा सारा चोरीचा मामला आहे. कायद्यान्वये तुमच्या-प्रमाणे मलाही शिक्षा होऊ शकते, हे मला माहीत आहे."

वा, किती तर्कनिष्ठ आहात तुम्ही. मानलं बुवा. 'चोरोंके भी कुछ उसूल होते है.' असा एक लोकप्रिय डायलॉग आहे. त्याचं तुम्ही किती कसोशीनं पालन करता. धन्य आहे तुमची!

"पण तुम्हाला सहन होईल का?" डॉक्टर म्हणाले, "माझी फार वेगळी पद्धत आहे."

"तुम्ही काय मला बाईलमनाचे कोमल वगैरे समजलात?" तुमचा पुरुषी अहंकार व पीळ प्रकट झाला होता. बरोबर आहे - डॉक्टर तुम्हाला बायकांप्रमाणे कच्च्या दिलाचे समजतात की काय? तुम मर्द हो और मर्द को दर्द नही होता. हुवा तो भी बर्दाश्त कर सकते है. तेवढी ताकद तुमच्यात जरूर आहे. हे पटवून देण्याचा चंगच तुम्ही आज बांधलेला दिसतोय!

पण तुमच्या कल्पनेपेक्षाही भीषण प्रकार होता तो. तुम्ही खरंच जाम हादरून गेलात. आणि आयुष्यात प्रथमच डोळ्यात पाणी आलं तुमच्या. आणि - आणि भडभडून ओकलात तुम्ही त्या जागी.

ही पांढऱ्यावरची काळी अक्षरंही अधिकतम काळी ठिक्कर पडावीत, असं ते सारं होतं!

डॉक्टरांनी मागचं दार, लोखंडी शटर वर उघडलं. स्वत: तुमच्या मुलीचं व दिवसभरातील इतर सहा आठ गर्भपाताद्वारे जमवलेल्या भ्रूणांचे एक गाठोडे घेऊन डॉक्टर दाराबाहेर आले आणि तिथं ते गाठोडे उघडून जमिनीवर ठेवले.

तुम्ही पाहात होतात आणि नाही म्हटलं तरी, तुमच्या काळजाचा ठोका चुकत होता. हो ना?

डॉक्टरांनी आवाज दिला जीवा - शिवा....

आणि त्यांचे दोन कंपौंडर साखळ्या धरीत दोन्ही हाऊंड जातीच्या त्या भयंकर वाटणाऱ्या कुत्र्यांना घेऊन आले. अंधुकसा प्रकाश व बराचसा अंधार होता. दोन्ही मस्त पोसलेल्या मस्तवाल कुत्र्यांचे डोळे त्या पुसट प्रकाशात गुंजेप्रमाणे लकाकत होते व लांब जिभा आत-बाहेर करीत होत्या. त्या जिभांचा लाल रंग तुम्हाला रक्ताळलेला वाटत होता.

डॉक्टरांनी इशारा केला. दोन्ही कंपौंडरनी हातातल्या साखळ्या सोडल्या व

कुत्र्यांना मुक्त केलं. क्षणार्धात दोन्ही कुत्री त्या उघड्या गाठोड्यामधील आठ दहा भ्रूणांच्या मांसल गोळ्यांवर तुटून पडली. त्यात तुमच्या मुलीचंही भ्रूण होतं. पाहाता पाहाता दोन्ही कुत्र्यांनी त्या मांसल गर्भांचा फडशा पाडला आणि त्यांची नाक व जीभ तृप्तीनं फुरफुरल्या.

"हा आजचा कोटा खरं तर पुरेसा नव्हता भुकेसाठी या माझ्या दोन टायगरांना." डॉक्टर थंडपणे म्हणाले, "पण आज थोडा उपास घडला तर चालेल. माणसाप्रमाणे त्यांनाही डाएट हवंच! आणि हो, तुम्हाला म्हणून सांगतो. या गर्भपाताच्या खेळाचा नियम म्हणजे पुरावा मागे ठेवता कामा नये. यापेक्षा प्रभावी मार्ग दुसरा मला असेल असं वाटत नाही."

काय झालं तुम्हाला बुवा? का भडाभडा ओकलात तुम्ही? त्या ओकारीच्या आवाजात तुम्हाला का तुमचा हुंदका लपवायचा होता?

असेल बुवा. पण तुम्ही सांगितलं तरच कन्फर्म होईल. पण तुम्हाला ते विचारून त्रास नाही देणार.

## पुर्वार्ध

## मी एक आई

आज पहाटेच मला जाग आली ती एक सुरेल गाण्यानं. मोठ्या कलात्मकतेनं जोपासलेल्या बागेत अगणित मोहरांनी लगडलेल्या आंब्याच्या झाडावर बसून का कोकीळ पक्षी गात होता? मी कधी कोकीळ पाहिला नाही बाई. पण ते सुरेल दैवी स्वर ऐकताना मन फुलून आलं होतं आणि वाटलं, या माझ्या हक्काच्या नव्या घरी मी सहा महिन्यांनी गोंडस बाळासह काल उशीरा रात्री आले व एक आई म्हणून आजपासून इथं माझा खऱ्या अर्थानं वावर सुरू होत आहे, त्याची ही एवढी छान मधुरतम सुरुवात! बाई गं! माझ्या भाग्याला सीमा नाही.

डॉक मला चिडवतात ते काही खोटं नाही. "तुझ्यासारखी तीव्र संवेदनक्षम बाई मी पाहिली नाही. अगदी लहानसहान बाबींनंही फुलारून येतेस!" आत्ताही त्यांचे ते शब्द आठवले व मनोमन खुदकन हसले. आणि पटकन जीभ चावली. या प्रसन्न शांततेला त्याची पण बाधा झाली असती. कदाचित डॉकची झोपमोड झाली असती. बेडरूममध्ये नाईट लॅम्पचा फिकट निळा सावळा प्रकाश मनावर सुखाची तृप्त साय आणत होता. डॉकही तसेच आहेत. सतेज सावळे आणि किंचित निळसर झाक असलेले डोळे. त्यांची पत्नी होऊन आल्यापासून त्या निळ्यासावळ्या बाधेनं मी अखंड मंत्रमुग्ध राहिलेली आहे.

आजचा हा या माझ्या - अं हं - माझ्या डॉकच्या आणि आमच्या तीन महिन्याच्या राजस सुकुमार बाळाच्या घराला मातृपदाची बढती मिळाल्यानंतरचा हा

पहिला दिवस. त्याची ही अशी सुरेल सुरुवात झाली होती.

मन सुखानं उचंबळून आलं होतं! मी हलकेच पांघरूण सारलं व डॉकच्या एक दिवसाच्या वाढलेल्या दाढीवर अलगत माझे ओठ टेकवून बाळाची जशी मी पापी घेते तसा हलकेच किस घेतला. त्या एक दिवसाच्या वाढलेल्या दाढीनं माझ्या नाजूक ओठावर तरलशी हुळहुळी आली. ती देखील मला अतीव सुखद वाटली. किती शांत, तृप्त झोपला होता माझा नवरा- डॉक. होय, डॉक्टर आहेत ते. स्त्रीरोग तज्ज्ञ. मी त्यांना प्रेमानं डॉक म्हणते. त्यांनाही ते आवडतं. खरं, माझं सारंच त्यांना आवडतं. 'तू मला अंतर्बाह्य, नखशिखान्त आवडतेस. एवढं सुंदर रूप, एवढं काव्यमय कोमल मन आणि आता मला पुत्ररूपानं दिलेली जगातली सर्वात मोठी सर्वोत्तम भेट... तू माझ्यासाठी अक्षय्य सुखाची ठेव आहेस. म्हणून आजपासून तुला मी सुखदा म्हणणार...'

माझ्या माहेरी डॉक मला व बाळाला भेटायला दर रविवारी यायचे. तो दिवस माझ्यासाठी हरक्षण विशेष असायचा. मी दिवसभर त्यांच्याभोवती अखंड चिवचिवत असायची. पपा म्हणायचे, 'अग, आम्ही पण आहोत बरं! पण नवऱ्याखेरीज कुणी दिसतच नाही तुला.' पपांचा हा कृतककोपही मला समाधान देऊन जायचा. मी फक्त खुदकन हसायची. त्या रविवारी पण मी डॉकभोवती रुंजी घालत होते. बाळाला पदराआड घेऊन अंगावरचं पाजताना एक माता म्हणून मी एक गाढ, संपृक्त तृप्ती अनुभवत होते. आणि डॉक माझ्याकडे अनिमिष नेत्रानं पाहात असताना 'सुखदा' असं म्हणाले.

सुखदा... किती छान काव्यमय नाव. लग्नात माझं नाव त्यांनी बदललं नाही. कारण तेही डॉकला भारी आवडायचं -मानसी. 'आहेसच तू माझ्या मनासारखी' असं स्पष्टीकरणही मला भावलं नाही! पण आज एकांतांत म्हणण्यासाठी त्यांनी माझं नामकरण केलं- सुखदा. आणि आनंदानं टचकन डोळ्यात पाणी आलं माझ्या. माझ्या या सुखाला कधी दृष्ट तर लागणार नाही?

आताही मी क्षणभर दचकले. पण ते विचार बाजूला सारीत मी बाळाच्या पाळण्याजवळ आले. स्वारी पण डॉकप्रमाणे छानसा गाढशा झोपेत होती. आपला इवलासा अंगठा ओठात धरून. माझ्या वात्सल्याला भरतं आलं. पण स्वत:ला आवरत त्याची झोपमोड होणार नाही अशा बेतानं त्याच्या नाजूक गुलाबी गालावर टेकले. त्या रेशमी स्पर्शानं मोरपीस फिरताना उठावे तसे रोमांच उठले. मघाशी डॉकच्या एक दिवस वाढलेल्या दाढीचा हुळहुळता स्पर्श व आताचा बाळाचा हा मुलायम मोरपिशी स्पर्श... दोन्ही स्पर्श सुखाचे. ते मी सर्वांगानं अनुभवत होते आणि सुखावत होते.

बाळाच्या अंगावर शुभ्र रेशमी दुलई होती. माझं लक्ष त्याच्या दोन्ही पायांकडे गेलं. झोपेत हालचाल केल्यामुळे दुलई विस्कटली होती. आणि त्याची दोन्ही पावलंही उघडी पडली होती. गुलाबी रंगाची, अम्लान!

का कोण जाणे, मनोमन कुठेतरी मी भ्याले. पपा सांगायचे ते आठवलं. प्रौढ कृष्णाचे पाय असेच नाजूक गुलाबी होते. अंत्यसमयी दुरून ते पाहून पारध्याला हरिण आहे असं वाटलं आणि त्यानं बाण मारला... आई गं! कसले भलते-सलते विचार मनात आले. मी दचकले आणि तिथून ते मनाआड केले. बाळाची दुलई नीट केली. आणि त्याच्या राजस मुखाकडे पाहू लागले. पुन्हा आई म्हणून मी मोहरून आले. हा माझा अंश. उद्या मला आई म्हणेल तेव्हा कान किती तृप्त होतील! बाळ अचानक झोपेत हसला. त्याच्या गोंडस गालावरची खळी काहीशी रुंद झाली.

लबाडा! झोपेत कोणती खोडकर स्वप्नं पहातोस राजा, त्यामुळे असं गोड हसू आलं? त्याच्या खळीवर मी जिभेचा ओलसर शेंडा फिरवला आणि पदरानं तो पटकन पुसलाही. पण पुन्हा एकवार मन समाधानानं निवून आलं होतं!

मी पायात सपाता सरकवून, गाऊनची गाठ पोटावर मारून बाहेर आले. गॅलरी पूर्व दिशेला होती. नुकताच सूर्यनारायण उगवला होता. त्याचं कोवळं सोनेरी रूप आणि तापहीन किरणं त्या थंड हवेत तजेला भरत होती!

आणि सारा दिवस  कसा असाच सकाळप्रमाणे अमृतमय गेला. एका धुंदीत मी वावरत होते. आणि मनोमन अंतराळी विहरत होते.

टबबाथमध्ये सुंगधी साबणाचा फेस करून केलेली साग्रसंगीत अंघोळ, डॉकला आवडतं म्हणून पैठणीचा शिवलेला स्लीवलेस पंजाबी सूट, डॉकनं माझ्या ओलसर केसात पाठमोरी मिठीत घेत आपलं तोंड खुपसणं, मग माझ्या लटक्या रागाला न जुमानता सकाळचा रंगलेला शृंगार, मग मिळून केलेला शाही ब्रेकफास्ट, डॉक्टरांना गॅलरीतून त्यांची कार दिसेनाशी होईपर्यंत दिलेला निरोप मग आख्खा दिवस मी आणि माझा बाळ. त्याचं दाईकडून मालीश करून घेणं, स्वत: पायावर घेत त्याला आंघोळ घालणं आणि त्याला भुकेच्या वेळी अंगावरचं पाजणं आणि प्रत्येक वेळी आई म्हणून तृप्त होणं. आणि वेळात वेळ काढून केलेली पूजा. माहेरून आणलेल्या लंगड्या बाळकृष्णाची पण स्नान - अभिषेकयुक्त पूजा केली. कृष्णाच्या बाळलीला आठवताना उद्या आपलं बाळ थोडं मोठं झाल्यावर अशाच खोडकर क्रीडा करेल, त्या पाहाताना-अनुभवताना माझ्यातली आई तृप्त होईल.

फक्त दुपारी डॉक घरी जेवायला आले नाहीत हाच एक निराशेचा क्षण. पण ते प्रथितयश डॉक्टर आहेत व आज बरीच ऑपरेशन्स आहेत म्हणून जमलं नसेल यायला, असं मानीत मनातला खट्टूपणा काढून टाकला. त्यांना मोठा टिफीन त्यांना आवडणाऱ्या पदार्थांनी भरून पाठवला. तासभरानं त्यांचा एस. एम. एस. आला. 'थँक्स फॉर ग्रेट मील. लव्ह यू सुखदा!' मी खुदकन हसले. खरं तर त्यांनी एक फोन करून हे म्हटलं असतं तर कानात अवघा प्राण गोळा झाला असता. पण, जाऊ दे. बये, ते एवढे काम करतात ते तुझ्या व बाळासाठीच ना? तुम्हाला ऐशआरामात ठेवावं

व सुख द्यावं म्हणूनच ना?

असा सारा दिवस विलक्षण सुखाचा गेला. मला आजही प्रत्येक लहान- सहान गोष्टीत सुख दिसत होतं, प्रत्ययास येत होतं. केस वाळवीत, झोपाळ्यावर झुलत वाचलेला रोमँटिक काव्यसंग्रह, अमेरिकेतून शालेय मैत्रिणीचा आई झाल्याबद्दल अभिनंदनाचा आलेला फोन व त्या निमित्तानं मारलेल्या अर्धा तास गप्पा, बाळाशी खेळत उगीच उष्टावल्यासारखं केलेलं सुग्रास जेवण, मग छानशी वामकुक्षी, मन आळसलेल्या मूडमध्ये पडून माणिक वर्माची ऐकलेली सुंदर गाणी, दुपारचा मस्त चहा, मग घरच्या जिममध्ये केलेला तासभराचा, शरीराचा रंध्ररंध्र हलका करणारा, व्यायाम, मग शॉवर खाली थंड पाण्यानं केलेली मनसोक्त आंघोळ, पुन्हा छान नटणं - वेषभूषा करणं....

आणि संध्याकाळची चाहूल लागली. मनाची सुखावस्था कमी होत काही तरी सूक्ष्मसं बोचू लागलं. कातरवेळ ती हीच का? असं काही कारण नसताना उगाच हळवं उदास होणं पण मला हवंहवंस वाटत होतं. त्यामुळे का पुन्हा बारीकसारीक सुखाची लज्जत वाढते? असेल बाई!

दवाखान्यातून निरोप आला की, डॉक रात्री उशिरा, नऊ - दहाला येतील. सकाळपासून ज्या सुखद गुंगीमध्ये मी बेधुंद वावरत होते, त्यातून मी ठोकर लागताच विव्हळावं तशी शहारत भानावर आले!

स्वत:ला किती वेळ तरी समजावत राहिले. डॉक्टर आहेत ते. पुन्हा स्त्री-'रोग तज्ज्ञ. त्याचं मॅटर्निटी सेंटर आहे. तिथं चोवीस तास पेशंटस् असतात. अनेक इमर्जन्सी ऑपरेशन्स असतात. बुद्धीला पटत होतं, पण मन मानत नव्हतं.

आणि ठरवलं की आपणच बाळाला घेऊन 'जय महालक्ष्मी हॉस्पिटल' ला जावं, डॉकला सरप्राईज द्यावं व त्यांच्या सोबत घरी यावं. त्यापूर्वी लाँग ड्राईव्ह करून मस्तपैकी या शहराची खासियत असलेली पावमिसळ आणि मोठा कपभर मँगो आईस्क्रीम खावं आणि पुन्हा सारी रात्र सुखाच्या बरसातीमध्ये चिंब भिजत गाढ झोपी जावं....

आज मी प्रथमच हॉस्पिटलला जाणार होते. लग्नानंतर एकदाही मला डॉकनं तिथं नेलं नाही. 'तुझ्यासारख्या सुंदर ललनेसाठी ते ओसाड वाळवंटच की' अशी वर मखलाशी. खरं आहे म्हणा. मुळातच मला दवाखान्याची भीती वाटते. इंजेक्शनही घ्यावं वाटत नाही. अशा प्रसंगी नुसती सुई पाहिली तरी आधीच किंचाळते. त्यामुळे मीही कधी आग्रह केला नाही.

पण सहा महिन्यानंतर मी इथं सासरी - माझ्या हक्काच्या घरी आले. आजच्या दिवसाचा शेवट पण मस्त व्हावा म्हणून मी डॉकला न कळवता हॉस्पिटलला जायचा निर्णय घेतला.

रात्रीचे आठ वाजले हेते. तरीही रस्ते माणसांनी फुललेले होते. मी बंद काचेतून ए. सी. च्या थंड हवेत बाळासह मजेत पाहात होते. मोठमोठे शॉपिंग मॉल्स, प्रकाशानं झगझगणाऱ्या इमारती व वाहनांची वर्दळ.. मला या क्षणी तेही नवीन वाटत होतं व छानपैकी एंजॉय करीत होते. कारमध्ये सीडीवर माझी आवडत्या गाण्याची सीडी ड्रायव्हरनं लावली होती. 'धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना....' गीतकार जगदीश खेबुडकरांचे शब्द या क्षणी माझी धुंदी गीतातून जागवत होते.

दवाखान्यात माझं स्वागत रिसेप्शनिस्ट मुलीनं केलं. ती मला डॉकच्या रूमच्या अँटीचेंबर मध्ये घेऊन गेली. "कुठे आहेत डॉक्टर?"

"इथंच आहेत. येतील एवढ्यात!" ती असं शुष्कपणे का म्हणाली मला कळलं नाही. पण मला तिचा थोडासा राग आला हे मात्र खरं.

तसंच दवाखान्यातल्या मुख्य सिस्टरनं, मी तिथं आल्यावर का दचकल्यासारखी एक्सप्रेशन्स दिली कळलं नाही. पण थोडं विचित्र वाटलं.

डॉकच्या अँटीचेंबरला लागून एक खोली होती, तिथं मी डोकावून पाहिलं. "दोन हॉऊंड कुत्र्यांसाठी ती खोली आहे मॅडम!"

मला कुत्रा हा प्राणी आवडत नाही, तर डॉकला त्यांचा प्रचंड शौक. म्हणून कदाचित त्यांनी दवाखान्यात कुत्री ठेवली असणार. पण तरीही दवाखान्यात त्यांना ठेवणं मला अस्थानी व नवलाचं वाटत होतं!

का कोण जाणे, दवाखान्याचं वातावरण मला अस्वस्थ करीत होतं. मी विचार करीत होते, सारा दिवस कसा मस्त मजेत गेला, सुखाचं माप शिगोशीग भरून आलेलं होतं. आता डॉकसह लाँग ड्राईव्ह व पाव - मिसळचं चटकमटक खाणं आणि मोठ्या कपातलं मँगो आईस्क्रीम - असा त्या सुखावर कळस चढवायचा माझा बेत होता. त्यामुळे कारमधून येताना मन फुलारून आलं होतं! पण दवाखान्यात मला काही तरी वेगळं वातावरण जाणवत होतं.

इथं येऊन पंधरा वीस मिनिटं झाली केवळ, पण डॉकची प्रतीक्षा का जीवघेणी वाटतेय? त्यांना कळलं नाही का, की मी अचानक सरप्राईज देण्यासाठी इथं बाळासह आले. मग अशा कुठल्या महत्त्वाच्या कामात गर्क आहेत?

मुख्य म्हणजे मला अनइझी का वाटतंय? इथल्या हवेत काही वेगळं का वाटतंय? आणि ते अनिष्ट आहे, असं का मनात येतंय?

मी अस्वस्थतेमध्ये अँटी चेंबरच्या बाहेर आले. बाळाला कोचावर झोपवलं. अंगावर दुलई टाकली. सिस्टरला पहायला सांगितलं व इकडून तिकडं चक्कर मारू लागले.

दवाखान्याच्या मागच्या बाजूस फिरत गेले, तो काय, समोरून डॉक येत होते.

मी धावतच पुढे गेले. "डॉक - डॉक"

केवढे दचकले ते मला पाहून. मला कळेना!

"क - काय झालं? माझं काही चुकलं का?" क्षणार्धात मी रडवेली होत म्हणाले.

"न - नाही. नाही. मला खबर नव्हती म्हणून चकित झालो एवढंच!"

त्यांच्या सोबत एक माणूस होता आणि पाठीमागून जिवा-शिवा ते दोन भयंकर हॉऊंड जातीचे कुत्रे घेऊन येत होते. त्यांचे गुंजेसारखे डोळे व लवलवत्या लाल जिभा.... मी भेदरले. "डॉक, मला भीती वाटते त्यांची. त्यांच्या जिभेवर रक्त आहे का? एवढ्या लाल का दिसतात त्यांच्या जिभा?"

पुन्हा त्यांचं तसंच दचकणं व पुन्हा सावरत मला दिलासा देणं, "वेडी कुठली. घाबरू नकोस."

आणि आवाज चढवीत त्यांनी म्हणलं, "जिवा - शिवा .. जा, ती दोन्ही कुत्री खोलीत बांधून ठेवा!"

त्यांचा चढलेला आवाज ऐकून मी तर भेदरलेच. पण जिवा - शिवाची जोडी पण सटपटली. त्यांच्या हातातले साखळदंड निसटले. ती दोन कुत्री मोकळी सुटली आणि आमच्या बाजूने समोर धावत सुटली.

डॉकचं पुन्हा ओरडणं. जिवा - शिवाचं धावणं. मी थरथरत होते.

आणि एक बाल किंकाळी ऐकू आली. माझ्या जिवाचं पाणी पाणी झालं. ही ही माझ्या बाळाची किंकाळी तर नाही?

माझ्या जिवाचा ठाव सुटला. भीतीनं व अनिष्ट भयसूचक जाणिवेनं रक्ताचं पाणी पाणी झालं.

"राजा - माझ्या बाळा...." असं हुंदका दाबीत मी ओरडले व धावत सुटले

समोरचं दृश्य पाहून मी जिवाच्या करारानं त्या कुत्र्यांवर धावून गेले. त्यांनी - त्यांनी माझ्या बाळाच्या पायाचा लचका तोडला होता.

बाळाच्या अंगावरची दुलई सरकली होती व त्याचे इवले गुलाबी पाय उघडे पडले होते. डावा पाय रक्ताळला होता. त्या कुत्र्यांनी ते पाय पाहिले असावेत... आणि ...आई गं!

डॉक प्रथम हतबुद्ध. मग पिसाळल्याप्रमाणे स्वरक्षणासाठी घेतलेले व सदैव आपल्या सफारीत कमरेपाशी बांधून ठेवलेले पिस्तूल काढले व सरळ दोन्ही कुत्र्यांवर गोळ्या चालवल्या. एकामागून एक दोन्ही कुत्रे कोसळले व आचके देत काही क्षणात गतप्राण झाले!

माझं बाळ रडत होतं - वेदनेनं तडफडत होतं. माझ्या अंगातलं सारं बळ ओसरलं होतं! आणि उरी फुटत मीही रडत होते!

डॉक्टरांनी बाळावर उपचार केले... पण त्याचा डावा पाय पोटरीपासून त्या कुत्र्यांनी लचके तोडीत अलग केला होता व जिभल्या चाटीत खाल्ला होता.

"मला माफ कर सुखदा. ही - ही माझ्या पापाची शिक्षा देवानं बाळाला नको होती द्यायला..." डॉक सद्‌गदित झाले होते. "पण ही शिक्षा खरी मलाच आहे - आयुष्यभर मी मला माफ नाही करू शकणार. अश्वत्थाम्याप्रमाणे ही पापकृत्याची जखम मी वागवतच जगणार. आणि उद्या मेलो तरी ती नाही भरून येणार...."

मला डॉक काय बोलत आहेत ते मुळीच समजत नव्हतं. एवढंच जाणवत होतं की, माझा सुकुमार राजस बाळ कुत्र्यांच्या हल्ल्यात डाव्या पायानं पंगू झालाय.

लंगडा बाळकृष्ण....

माझं मन कडवटून आलं होतं!

आजवर त्या विधात्यानं प्रत्येक दिवशी माझ्यावर सुखाची बरसात केली होती. आजचा दिवस पण कसा सुख-समाधान घेऊन आला होता.

त्याचा हा असा अकल्पित शेवट?

मला डॉकवर खूप ओरडावंसं वाटत होतं, संतापून बोलावंसं वाटत होतं. का तुम्ही मला नको असताना ती भयंकर कुत्री बाळगली? कशासाठी?

पण बोलण्याऐवजी मला रडूच कोसळत होतं

पुन्हा पुन्हा डॉक म्हणत होते, "आय ॲम सॉरी... रिअली सॉरी.."

डॉकसोबत मागच्या दारापासून आलेला त्या माणसानं म्हटलं, "डॉक्टर, तुमच्याप्रमाणे मीही चिरंजीव वेदना घेऊन जगणार आहे. माझीही त्यापासून सुटका नाही."

त्यानं मेलेल्या कुत्र्याजवळ येत त्यांच्या कलेवराला प्रथम लाथ मारली आणि विकट हसू लागला. त्यानं माझ्या अंगावर काटा आला.

मग तो वेड्यासारखा त्या दोन कुत्र्यांच्या अंगावर नाचू लागला. त्याचं हास्य अधिकच विकट व बीभत्स होत गेलं!

डॉक त्याच्याकडे थिजल्या डोळ्यानं, तर मीही हतबुद्ध होऊन तो रौद्र पण विकट आविष्कार पाहात होते.

त्याचं हास्य अचानक थांबलं आणि दोन्ही हातानं पोट धरीत तो वाकला. मोठ्यानं आवाज करीत त्या कुत्र्यांच्या कलेवरावर भडाभडा ओकला....

मला घेरी येत होती. मी डॉकच्या बाहूत कोसळले. आणि डोळ्यापुढे अंधार पसरला....

मला त्या काळोखातही माझा लंगडा बाळकृष्ण विसरता येत नव्हता!

o - o - o

# १६. केस स्टडीज़

## उपोद्घात

परवा रात्रीच्या वेळी त्याचा अचानक फोन आला तेव्हा मी चकित झालो. एकेकाळी कॉलेज जीवनात आम्ही हॉस्टेलला चार वर्षे रूम पार्टनर असल्यामुळे आमची घट्ट मैत्री होती. पण नंतर आमची करिअर भिन्न झाल्यामुळे संपर्क राहिला नाही. मी व्हेटरनरी डॉक्टर म्हणून प्रथम शासकीय नोकरी काही वर्षे केली व मग गेल्या दोन दशकापासून वधूवर सूचक मंडळाचं पूर्ण वेळ काम व्यवसाय व सामाजिक जाणिवेनं करतोय. तो प्रथम उपजिल्हाधिकारी म्हणून सेवेत लागला. तेव्हा मी त्याच्या गावी जंगी सत्कारही घडवून आणला होता. मग तो नोकरीच्या निमित्तानं पूर्ण महाराष्ट्र हिंडत राहिला. तो पब्लिक फिगर असल्यामुळे व प्रत्येक पदावर वेगळं, चाकोरीबाहेरच्या कामामुळे मी त्याच्या बातम्या नेहमीच वाचायचो. पण कधी त्याला फोन केला नाही की संपर्क साधला नाही. पण मित्र म्हणून त्याचा नेहमीच अभिमान वाटायचा. आज तो एका जिल्ह्याचा कलेक्टर आहे. तेथे तो सतत काही तरी नवं नवं करतोय हे टी. व्ही. वर पाहात, ऐकत व पेपरात वाचत होतो. पण का कोण जाणे, त्याच्याशी अलीकडेही संपर्क साधायचा प्रयत्न केला नाही. माझं 'रेशीमगाठी' हे वधूवर सूचक मंडळ मी नोकरीत असताना पत्नीच्या नावानं सुरू केलं होतं ते एका सामाजिक जाणिवेनं. पूर्वीच्या काळी प्रत्येक जात - जमात व समाज हा एकमेकाला धरून पंचक्रोशीत राहायचा व संपर्कातून विवाह - अरेंजड् मॅरेजेस सहजतेनं व्हायचे. पण शिक्षणाचा प्रसार, देश व जगभर नोकरीसाठी भटकणं, चौकोनी कुटुंबामुळे आप्त कुटुंबीयांशी कमी झालेले संबंध आणि अूजनही भारतात पाच-दहा टक्क्यापेक्षा जास्त न होणारे प्रेमविवाह त्यामुळे मुलांची लग्नं जुळवण्यासाठी आईबापांना करावी लागणारी धावपळ हे आजचं एक सामाजिक वास्तव आहे. मी स्वत: आवर्जून नातेवाईक व मित्र परिवारातील लग्न चुकवत नाही. 'शादी किसीकी हो, अपना दिल तो गाता है' अशा भावनेनं 'दिवाना अब्दुल्ला'प्रमाणे अस्मादिक लग्न समारंभात जायचे. त्यावेळी होणाऱ्या गप्पागोष्टीतून हे वास्तव अधोरेखित झालं. आणि

त्यातून मी 'रेशीमगाठी' हे मॅरेज ब्युरो - वधूवर सूचक मंडळ स्थापन केलं. त्याचा पसारा वाढत गेला तशी मी नोकरी सोडली. आता त्यालाही दोन दशकं होऊन गेली. व्यवसाय म्हणून समाधान असलं तरी एक नवाच प्रश्न मला हल्ली जाणवायला लागलाय. आणि तोही मीच घेतलेल्या पुढाकारातून ठसठशीतपणे अधोरेखित झालेला.

आणि जिल्हाधिकारी असलेल्या मित्राचा अचानक फोन आला. त्याला निमित्त झालं ते फेसबुकवर मी काही महिन्यापूर्वी 'रेशीमगाठी' या नावानं अकौंट उघडलं, ते जास्तीत जास्त वधूंची स्थळ नोंदणीसाठी यावीत म्हणून. कारण दरवर्षीच्या माझ्या भव्य प्रमाणात होणाऱ्या वार्षिक वधूवर सूचक मेळाव्यात लग्न जुळण्याचं प्रमाण हल्ली कमी कमी होत होतं. कारण मुलांची स्थळ मोठ्या प्रमाणात नोंदली जायची, पण त्याच्या तुलनेत किती तरी कमी प्रमाणात हल्ली नवीन मुलींची स्थळ नोंदली जात होती. त्यामुळे फेसबुकवर मी 'रेशीमगाठी' नेली, पण तेथेही आश्वासक प्रतिसाद नव्हता. पण सुरुवात झाली होती. माझ्या मित्रानं फेसबुकवर 'रेशीमगाठी' पाहिली आणि मला परवा रात्री त्याचा फोन आला.

''यार उत्तम, मी येत्या पाच एप्रिलला येतोय तुझ्या शहरात. मला एक पुरस्कार मिळतोय. ते निमित्त समज, पण मला तुझ्या या वर्षीचा रेशीमगाठीचा वार्षिक वधूवर सूचक मेळावा अटेंड करायचा आहे.''

''कशासाठी? तुझं कुणी नात्यातलं स्थळ आहे का?'' मी नेहमीप्रमाणे इतरांना विचारतो तशी विचारणा केली.

''ओ, नो! मी एक केस स्टडी करतोय, त्यासाठी मला एका मॅरेज ब्युरोची मदत लागणार आहे.'' तो म्हणाला, ''तुझं हे ब्युरो १९८५ साली स्थापन झालं - राईट? म्हणजे जवळपास तीन दशकं तू हे काम करीत आहेस. तुझी स्वत:ची रेशीमगाठीची वेबसाईट आहे, ती मी ओपन करून पाहिली आहे. आणि गेल्या महिन्यात दोन तीन वेळा फेसबुकवर मी रेशीमगाठी फॉलो केलीय. मला माझ्या केस स्टडीसाठी तूच सर्वात उपयोगी ठरशील!''

''मला आनंद आहे की, मी तुला तुझ्या कामात थोडा तरी उपयोगी ठरलो तर.'' मी उत्तेजित होत म्हणालो, ''कांता, किती दिवसांनी भेट होणार आहे आपली? क्षणार्धात आपली कॉलेज जीवनातली चार वर्षे व असंख्य स्मृती मनात तरंगून गेल्या बघ. तू जरूर ये. माझ्या घरीच राहा. पूर्वीप्रमाणे चहा-सिग्रेटीवर गप्पा मारीत रात्र रात्र जागवू.''

''येस. येस. किती तरी वर्षात असं रात्रभर गप्पा मारण्याचा योग आला नाही.'' तोही उचंबळून आला होता. मला मोबाईलमधून येणाऱ्या आवाजात त्याची उत्तेजना व मित्र भेटीचा आनंद जाणवत होता. ''मी माझ्या प्रशासकीय कामात एवढा रममाण

असतो की नोकरीची तीस वर्षे कशी गेली कळलंच नाही. आजही आपलं कॉलेज लाईफ जणू काल-परवाची गोष्ट वाटतेय.''

''कांता, यू आर मोस्ट वेलकम.'' मी त्याला पुन्हा आग्रहाचं निमंत्रण देत म्हणालो, ''तू नक्की ये. पण कोणती केस स्टडी तुला करायची आहे? आणि त्याचा काय संबंध आहे माझ्या रेशीमगाठीशी, हे जरा कळू दे.''

''मला ही केस स्टडी ज्या उद्देशानं तू रेशीमगाठीला फेसबुकवर आणलंस, त्यानं तर सुचलीय!'' तो म्हणाला. आणि नंतरचा अर्धा तास तो त्याच्या विषयाच्या संदर्भात बोलत राहिला व तो येण्यापूर्वी मी काय करावं हे सांगून म्हणाला, ''जर शक्य असेल तर हे तू लिहून काढ. आणि २०१२ चा मेळावा तर मी प्रत्यक्षच ऑब्झर्व्ह करणार आहे.''

''खरं सांगू कांता, हा विषय मला अनुभवाच्या आधारे जाणवत होताच, पण त्यातलं धगधगतं वास्तव तुझ्या बोलण्यावरून अधोरेखित होतंय.'' मी विचारमग्न होत म्हणालो, ''मी जरूर प्रयत्न करीन. आणि दोन प्रसंग माझ्या साध्या-सरळ घरगुती भाषेत लिहून काढीन.''

''थँक्स मित्रा. मी येतोय तेव्हा बाकीचं बोलू!'' आणि कांतानं फोन बंद केला.

आता माझी झोप उडाली होती. मी लॅपटॉप उघडला. प्रथम रेशीमगाठी फेसबुकवर गेलो. मागच्या आठवड्यात जगभरातून जी नोंदणी झाली होती त्यामध्ये मुलाचं प्रमाण चांगलं होतं, पण मुलीचं तुलनेत कमी होतं. मग मी माझी वेबसाईट उघडली. त्यात मागील दहा वर्षांची सर्व स्थळांची व जुळलेल्या लग्नांची नोंद होती. जवळपास दोन तास मी लॅपटॉप उघडून होतो आणि मनात मागील पंचवीस वर्षांच्या आठवणी जाग्या होत होत्या.

आणि कांतानं ज्या सूचना केल्या त्याप्रमाणे त्याच्या केस स्टडीसाठी दोन वार्षिक प्रसंग झपाट्यानं लिहायला सुरुवात केली. की-बोर्डावर वेगानं बोटं फिरत होती, त्याहीपेक्षा अधिक वेगानं मन:पटलावर विचार येत होते. दोन्हीची गती जुळवून घेत लॅपटॉपवर टंकबद्ध करताना तारांबळ होत होती. पण सत्य मनाला हादरे देत होतं. मला नुकताच नातू झाला होता. तो जेव्हा लग्नाच्या वयाचा होईल तेव्हा काय? हा प्रश्न मनात उमटला आणि माझी की-बोर्डावर फिरणारी बोटं थांबली. खोलवर कुठेतरी एक कळ उमटली.

कांता आज जे काम करीत आहे व केस स्टडीसाठी अभ्यास व संशोधन करीत आहे ते सामाजिकदृष्ट्या किती महत्त्वाचं आहे हे प्रकर्षानं जाणवलं. त्याच्या-माझ्या नातवंडांसाठी. सुदैवानं आमच्या मुलांची लग्न झाली आहेत, या विषम जैविक असमानतेच्या काळातही. म्हणून ती सुटली! त्याचं काम किती महत्त्वाचं आहे. त्यासाठी मला मदत केली पाहिजे. मी भरकटलेल्या मनाला सावरीत पुन्हा की-

बोर्डाच्या साहाय्यानं वर्ड फाईलमध्ये दोन्ही प्रसंग लिहून काढले. आणि त्याला ई-मेल केले. आणि पहाटे पहाटे मी बिछान्यावर शक्तिपात झाल्याप्रमाणे स्वत:ला फेकून दिलं.

सकाळी जाग आली तेव्हा डोकं जडावलेलं होतं. उठणं भाग होतं. सवयीनं ब्लॅकबेरीवर आलेले एस.एम.एस. पाहिले. कांताचाही एस.एम.एस. होता. 'ग्रेट. फार चांगलं निरीक्षण तू नोंदवलं. मला हेच पाहिजे होतं. ५एप्रिलला येतोय. गुड डे.''

व्हॉट इज गुड इन टुडे? असा मनात प्रश्न उमटला. कारण दिवसभर मला आई-बापांच्या अधीर, चिंतातुर प्रश्नांचा सामना करायचा होता. पण ते माझं काम होतं- कर्तव्य होतं!

पण रेशीमगाठीच्या कार्यालयात जाण्यापूर्वी मी कांताला ई-मेल केलेला मजकूर बायकोला दाखवला, तेव्हा ती गमतीनं म्हणाली, आता आपण जर लग्नाच्या वयाचे असतो तर होकार - नकार तुम्ही नाही, मी दिला असता...

मी तिच्या खेळकर टीकेनं हसलो, पण मनोमन अस्वस्थ झालो. कारण ती सत्य सांगत होती. आज आम्ही लग्नाच्या वयाचे असतो तर तिला चॉईस माझ्यापेक्षा नक्कीच जास्त राहिला असता. कदाचित तिनं मला नकार दिला असता... कारण ती माझ्यापेक्षा जास्त बुद्धिमान व देखणी होती. त्या काळी तिच्या बापानं माझी सुरक्षित, क्लास टूची सरकारची नोकरी व घराणं पाहिलं. अनुरूपतेचा विचार त्यांच्या मनाला शिवलाही नसेल. मी आनंदात होतो की मला किती सुंदर बायको मिळाली. ती टीपकागद आहे - माझे सूक्ष्मातिसूक्ष्म भाव नेमकेपणानं टिपणारी. ती माझ्याजवळ येत म्हणाली, ''मी सहज बोलले हो. त्या काळी आम्हा मराठवाड्यातील मुलींच्या लग्नाच्या वेळी फारशा अपेक्षा नसायच्या. पदरी पडलं अन् पवित्र झालं, अशा संस्कारात आम्ही वाढलो. पण तुम्ही कधी नवरेशाही केली नाही, त्या काळात दुर्मीळ असणाऱ्या समानतेनं मला वागवलंत आणि माझं करिअर होण्यात तुमची साथ लाभली. तुम्ही मनात काही आणू नका. आणि सहवासानं लोणच्याप्रमाणे आपला संसारही छानपैकी मुरत गेलाय - खमंग, चविष्ट झालाय. खरंच सांगते मी.''

रुतलेला काटा हलकेच काढल्यावर जो आराम वाटतो, तसं मन आश्वस्त झालं. मी समाधानानं हसलो. ''पण आपल्या नातवाची काळजी वाटावी अशी उद्याची, वीस-तीस वर्षांनी परिस्थिती येईल ही शक्यता खरी वाटते. देव करो, तसं न होवो. पण मनात विचार आलाय माझ्या. उद्या आपला नातू सुमार रूप-बुद्धी व छोट्या नोकरीचा निघाला तर-तर...'' दिवसभर कार्यालयात तिचा हा प्रश्न मन:पटलावर इको इफेक्टप्रमाणे पुन्हा पुन्हा आदळत होता. आणि माझा निश्चय होत होता - कांताच्या केस स्टडीला पूर्ण मदत तर करायची, पण त्याच्या कलेक्टर म्हणून चालवलेल्या स्त्रीभ्रूणहत्या विरोधी अभियानात सहभाग द्यायचा.

## एक

## १९९१ : कांदापोह्याची सेंचुरी!

चिखलठाणा बस स्टँडवर एस. टी. निम्म्याच्या वर खाली झाली होती. आता दहा मिनिटात औरंगाबाद बस स्टँड येईल. रात्रभर हिंगोली-औरंगाबाद बस प्रवासानं माझं अंग आंबलं होतं. खडबडीत रस्त्यामुळे गाडी उडत होती, त्यामुळे मला नीटशी झोपही लागली नव्हती. पण हे छानपैकी घोरत होते आणि माझी छकुली - अं हं - नीरा पण माझ्या खांद्यावर साऱ्या अपेक्षेभंगाचं ओझं ठेवून निष्पापपणे झोपली होती.

किती छान व गोड दिसत होती नीरा. कुठल्यातरी पुस्तकात वाचलेलं मला आठवलं. स्त्रीचं सौंदर्य पारोशात पाहावं! त्या कसोटीला नीरा खचितच उतरत होती. नितळ कांती, गोड व सदैव स्मित विलसित असणारा चेहरा आणि नितंबापर्यंत वाढलेले दाट काळेशार केस... तिच्या लहानपणी हे म्हणायचे, आपल्या छकुलीच्या लग्नाची चिंता नाही. कुणीही तिला आपणहून मागणी करून घेईल. पण आता वाटतंय - किती जड बाशिंगबळ आहे माझ्या लेकीचं. आई म्हणून गेली तीन वर्षे प्रत्येक दिवस एकच चिंता करीत उगवतो व मावळतो... कधी उजवली जाईल पोर माझी? प्रत्येक वेळी दाखवताना हल्ली नीरा उदास असते. तेच कांदेपोहे, तेच पाहाण्यास आलेल्यांचे टिपिकल प्रश्न. रूप-गुणापेक्षाही हुंड्याचा अग्रक्रमाने आलेला सवाल. आमचं दारिद्र्य - त्यामुळे शरमिंद होणं. आणि पुन्हा एकवार नकाराचा निरोप वा खलिता... 'योग नाही.'

हे पण हल्ली वैतागलेत. मूळचा शांत स्वभाव जणू ते हरवून बसलेत. हल्ली त्यांचा शीघ्रसंतापी रुद्रावतार मलाही भेदरवतो आणि नीरा तर अधिकच संकोचून जाते. मुळातच ती मितभाषी. हल्ली दिवस दिवस अबोल - मूक असते.

खरं तर तिला गावातच शिक्षिकेची नोकरी चालून आली होती. ड्रॉईंग कम संगीत शिक्षिका म्हणून. दोन्हीत तिची जात्याच गती होती. पण ह्यांचा सनातनी स्वभाव व धारणा आड आल्या, "मला मुलींनी नोकरी करणं पसंत नाही. आपण तिला लवकरात लवकर उजवून देऊ." त्यांचं भिक्षुकाचं घराणं. पोथी - सत्यनारायण पूजा सांगण्यात हयात गेली. तालुक्याच्या गावी असा कितीसा व्यवसाय होणार? पुन्हा शेती कूळकायद्यात गेलेली. त्यामुळे जन्मदारिद्र्याचा कपाळी बसलेला शिक्का कसा पुसला जाणार?

पण आकाशाला फूल यावं तसं नीरा नावाचं देखणं फूल आमच्या संसारात फुलून आलं. बोलणं पण गाण्यासारखं. रेडिओ ऐकून हुबेहूब लता - आशाप्रमाणे गाणी म्हणते. तसंच छान चित्रं काढते. तिला साऱ्याच गोष्टींची मनस्वी हौस. रोज रांगोळी काढते, पण प्रत्येक दिवशी काही तरी त्यात नवं असतं! राहाणं पण नीटनेटकं. तांब्यात कोळसे घालून साडीला इस्त्री करते व घालते. माझ्याकडून तिनं

स्वयंपाकाचे धडे घेतले, पण माझ्या वरताण ती छान पदार्थ करते. खास करून खरपूस सोनेरी रंगाची व योग्य सारण असलेली पुरणपोळी हा तिचा हातखंडा पदार्थ. मीही तिच्या हातची एक पोळी जादाच खाते व ढेकर देत तृप्तपणे म्हणते, ''पोरी, पोटातून नवऱ्याच्या आत शिरशील व त्याला प्रेमानं कायमचा गुलाम करशील!''

पण - पण - पण - नीराला विसावं लागलं आणि ह्यांनी तिच्या लग्नाचं पाहायला सुरुवात केली. वाटलं होतं, कोणी तरी राजपुत्र तिच्या रूपागुणावर भाळून तिला सहज पसंत करेल. म्हणून आम्ही प्रथम डॉक्टर्स, अधिकाऱ्यांची स्थळं पहायला सुरुवात केली. आणि प्रथमग्रासे मक्षिकाप्रमाणे धक्के बसायला पहिल्या झूट प्रारंभ झाला. ''गरीब भिक्षुकी घराणं असताना आमच्याकडे येताच कसे'', असे पुसले जाणारे रोकडे सवाल ह्यांना हवालदिल करून गेले. मलाही धक्काच बसला. वाटत होतं, मुलांना सुंदर, सद्‌गुणी मुलगी हवी असते. तिचं उत्पन्न महत्त्वाचं नसतं. पण भारतातल्या लग्नाच्या बाजाराचा नियम मी खरंच विसरले होते. इथे हुंडा द्यावा लागतो, तोही श्रीमंतांना चढत्या प्रमाणात. मुलीचं रूप-गुण हे नंतर पाहिलं जातं. हे हिशोबात फार पक्के. तुटपुंजं उत्पन्न असलं तरी दररोज पै नं पैचा हिशोब लिहून ठेवतात. ते नीराच्या प्रत्येक दाखवण्याची पण नोंद ठेवीत होते. एक दाखवणं म्हणजे पत्र व्यवहार, प्रत्यक्ष जाऊन भेटणं, फोटो-पत्रिकेच्या कॉप्यांचा खर्च आणि दाखवण्याच्या वेळी चहा-पोह्याचा खर्च. साधारणपणे सरासरीनं १९८५ ते ९० च्या दरम्यान एक दाखवण्याचा खर्च त्यांनी काढला होता - पाचशे रुपये. जेव्हा कांदापोह्यासह दाखवण्याचं अर्धशतक - हाफ सेंच्युरी झाली, तेव्हा हे सचिंत होत म्हणाले, ''कसं व्हायचं आपल्या पोरीचं? वाटलं होतं, रूपागुणाची नक्षत्रासारखी पोर आहे. काटकसर करून लग्नखर्च व हुंड्याची बेगमी पण करून ठेवली आहे. पण मुलगी पाहाण्यापूर्वी बापाचं उत्पन्न पाहातात - हुंडा किती मिळेल या हिशोबानं. आणि मुलाला आपली नीरा पसंत पडली तरी नकार देतात.''

''खरं आहे. पण सतत नकारानं पोर मनानं खचून गेली आहे हो.''

''मला का दिसत नाही?'' हे विचार करीत पुढं म्हणाले, ''खरं सांगू, हल्ली मुलींचं प्रमाण जास्त आहे असं माझं निरीक्षण आहे. आपल्या नातेवाईकात बघ - मुली किती जादा आहेत. त्यामुळे मुलांना व त्यांच्या बापांना माज चढलाय. त्यांना वाटतं, एक नाही, छप्पन्न मुली झक मारत येतील. त्यांना निवडीची खूप संधी आहे -''

आमचं विश्व छोटं असलं तरी त्यातले हे येणारे अनुभव पाहाता ह्यांच्या म्हणण्यात सत्यांश जरूर होता!

मागच्या आठवड्यात झालेला दाखवण्याचा समारंभ ह्यांच्या हिशोबाप्रमाणे नव्याण्णवा होता. पण तिथेही त्याच कारणामुळे नकारघंटा आली होती. खरं तर मुलगा सुमार होता. नीराच्या नखाची पण त्याला सर नव्हती. पण नकाराचा त्याला

अधिकार होता व तो त्यानं वापरला.

वर्षापूर्वी मीच मागे लागून औरंगाबादच्या 'रेशीमगाठी' वधूवर सूचक मेळाव्यात नीराची नोंदणी केली होती. त्यांच्यामार्फत सांगून आलेल्या मुलांची पण नकारघंटाच येत होती. "आज आपल्या नीरेच्या कांदा-पोह्यांची सेंचुरी होणार बघ." हे खिन्न स्वरात म्हणाले, "पाहू या, आज तरी कुण्या मुलाची विकेट पडते का?"

दरवर्षी 'रेशीमगाठी' तर्फे भव्य प्रमाणात वार्षिक स्वरूपाचा वधूवर - परिचय मेळावा आयोजित केला जातो. इथं खूप स्थळं येतात. त्यामुळे आज आम्ही मोठ्या आशेनं जात होतो. इथं पाहातो तो काय, मुलींची संख्या जास्त व मुले तुलनेत कमी. त्यामुळे श्रीमंत मुलीच्या बापांनी मुलांना पटवल्यामुळे आमच्या वाट्याला सुमार स्थळं येत होती. नीराची सौंदर्याची जाणीव पराकोटीची होती, त्यामुळे तिची विद्ध नजर पाहाताना माझ्याही मनात कालवाकालव होत होती. काय एक एक ध्यान आमच्या वाट्याला येत होतं!

एका स्थळाला नीरा पंसत पडतेय असं वाटलं. पण त्याचं कुरूप ओबडधोबड व्यक्तिमत्त्व, अधाशी भुकेली नजर आणि त्याच्या एक डोळ्यात पडलेल्या फुलानं झालेली एकाक्ष नजर... त्याच्या बापानं सांगितलं, "पसंत आहे स्थळ. चला हॉटेलात जाऊ या. चहा-पोहे करीत पुढलं ठरवू या." शंभरावे कांदे पोहे सार्थकी लागत होते. "तुम्ही साजेसं लग्न लावून द्या. आणि फार नाही - दहा हजार हुंडा द्या!"

मी व नीरा एकमेकींकडे पाहात होतो. तिची विद्ध हताश नजर सारं काही सांगत होती. तिच्या वाट्याला नवऱ्यामुलाची अधाशी भुकेली नजर पाहाता संसारात दररोज बलात्कारच वाट्याला येणार होता. तिची वेदना कळली व मी म्हणाले, 'अहो - '

"जरा थांबा." हे म्हणाले व नवऱ्या मुलाच्या बापाला म्हणाले, "आम्हांला मान्य आहे."

"अहो पण - "

"पुरे. काही बोलू नका. मी कुटुंबप्रमुख आहे निर्णय घ्यायला."

गावी परतल्यावर घरी हे म्हणाले, "मला कळतं, पण नाईलाज होता. पोरीचं वय वाढत चाललंय. दिवसेंदिवस कठीण होत चाललंय. मला मान्य आहे, नीरासाठी हे स्थळ अनुरूप नाही. पण किती वरसंशोधन करायचं? किती वहाणा झिजवायच्या?"

नीरा खाली वाकली. ह्यांच्या चपला हातात घेत उभी राहिली. आणि कधीही वडिलांच्या नजरेला नजर न देता, खालमानेनं हळुवार बोलणारी माझी पोर त्यांच्याकडे पाहात किंचाळत म्हणाली,

"माझं चुकलं - तुमच्या पोटी जन्म घेतला आणि लग्नासाठी तुम्हाला त्रास दिला. ह्या तुमच्या वहाणा - खरंच बाबा, खूप झिजल्या आहेत. माझ्यासाठी. माझ्या पायी. तुमचा हा निर्णय मला मान्य आहे. माझं त्या माणसाशी लग्न होत

नाहीय, तर त्याला माझ्यावर रोज बलात्कार करायला, तुम्ही लग्नाच्या नावावर परवानगी देताय... पण एक नक्की करेन तुमच्यासाठी. मांडव परतणीला येईन ती तुम्हाला नवीन कोल्हापूरी चप्पल घेऊन. कारण लग्नानंतर देवीला जायचा त्यांचा कुळाचार आहे, म्हणून कोल्हापूरला जावं लागणार आहे. तिथली प्रसिद्ध चप्पल आणेन. पुन्हा ती कधीही झिजणार नाही.''

आणि त्या झिजलेल्या वहाणा ती आपल्या गालफडात मारून घेऊ लागली. मी क्षणभर अवाक होते. काय करावं हे सुचेनासं झालं होतं. मग भानावर येत तिच्या हातातून चप्पल हिसकावून घेतली व बाजूस टाकली. ती निस्त्राण होत माझ्या मिठीत कोसळली, ''मला माफ कर आई. मला माफ करा बाबा.''

## दोन

## २०११ नकाराचा सिक्सर - पण मुलीकडून!

अमित माझा धाकटा भाऊ खरा, पण आम्हा दोघात जवळपास बारा वर्षांचं अंतर असल्यामुळे मुलासारखा आहे. आई-वडिलांचं सुख मी काही काळ तरी उपभोगलं, पण वयाच्या पाचव्या वर्षी अपघातात आई-बाप गमावल्यावर त्याच्या वाट्याला पोरकेपणच आलं होतं. मी नोकरीस लागताच लग्न केलं व त्याला मामाच्या घरून माझ्याकडे आणलं. आणि पोरकेपणाचा, मामाच्या घरी आश्रित म्हणून रहाताना त्याच्या मनावर उमटलेला ओरखडा मिटवण्याचा प्रयत्न मी व माझ्यापेक्षा माझ्या बायकोनं - त्याच्या लाडक्या वहिनीनं केला!

मामाच्या घरी त्याची आबाळच झाली. नगरपरिषद शाळेचा सुमार दर्जा व बेताच्या बुद्धीमुळे कसाबसा पास श्रेणीस मॅट्रीक झाला. मग साधा बी. ए. व एका खाजगी कंपनीत पोट भरण्यापुरती नोकरी. माझीही परिस्थिती फारशी चांगली होती अशातली बाब नव्हती. पण ही घरच्याघरी शिलाईकाम करून हातभार लावीत होती. त्यामुळे अमितला पुढं शिकवणं पैशाअभावी शक्य नव्हतं. त्याची आम्हा दोघांनाही खंत होती. पण काही इलाजही नव्हता.

आता अमित लग्नाचा झाला होता, पण त्याला फारशी स्थळं सांगून येत नव्हती. आणि जी एक-दोन आली ती त्याला व आम्हा दोघांना पसंत पडली नाहीत. मी व बायकोनं साऱ्या नातेवाईक - मित्र मंडळींना सांगून ठेवलं होतं व वारंवार पुन्हा पुन्हा आठवण देत होतो, पण स्थळं सांगून येण्याचं प्रमाण फारच कमी होतं. किंवा ते जवळपास नव्हतंच. त्यामुळे हिनं पुढाकार घेऊन शहरातील सर्व वधूवर सूचक मंडळात त्याचं नाव नोंदलं. पण मागील सहा महिन्यात मंडळांच्या संचालकांनी सुचवूनही वधूपक्षाकडून काही प्रतिसाद येत नव्हता. मी 'रेशीमगाठी' मॅरेज ब्युरोत बऱ्याचदा गेलो होतो. त्यामुळे त्याचे संचालक उत्तम देगावकरांचा बऱ्यापैकी परिचय

झाला होता. ते स्वभावानं मोकळे होते. त्यांच्या- पुढे मन मोकळं केलं, तेव्हा ते गंभीर होत म्हणाले, "तुमची समस्या खरी आहे. पण स्पष्ट बोलतो - राग मानू नका. पण अमित सर्वच बाबतीत कमी आहे स्थळ म्हणून."

"त - तुम्हाला काय म्हणायचं आहे साहेब? मी - मी नाही समजलो."

"ओ - कमॉन अर्जुनराव." देगावकर म्हणाले, "ठीक आहे. मी सारं खुल्लमखुल्ला बोलतो. अहो, हल्ली मुली किती कमी झाल्यात. माझ्याच काय पण कुठल्याही वधू-वर सूचक मंडळात जा, तिथं शंभर मुलांची स्थळं महिन्यात नोंदली जात असतील तर मुलींची जेमतेम पंचवीस-तीस. त्यामुळे मुलींना तुलनेने चॉइस आहे, जो दुर्दैवानं तुमच्या भावास - अमितला नाहीय. कारणही उघड आहे. बेताचं शिक्षण, जेमतेम नोकरी आणि साधं व्यक्तिमत्त्व!"

मी त्यांच्या स्पष्टोक्तीनं मनस्वी घायाळ झालो होतो. पण कुठेतरी हेही लख्खपणे जाणवत होतं की, ते बोलतात ते काही चुकीचं नाही.

प्रश्न असेल तर हाच होता की, सामान्य कुवतीच्या माणसांना संसाराचा अधिकार नाही?

त्याचंही त्यांनी थेटपणे उत्तर दिलं, "आहे ना. पण आपणच त्या सोनोग्राफी तंत्रानं लिंगनिदान करून गर्भातल्या मुली मारत आहोत, त्यामुळे मुलींची संख्या कमी होतेय. १९९१, २००१ व २०११ च्या जनगणनेचे आकडे हेच कटू सत्य अधोरेखित करतात अर्जुनराव! त्यामुळे लग्नाच्या मार्केटमध्ये मुली कमी आहेत. आणि इथंही बाजाराचं तत्त्वज्ञान लागू होतं - डिमांड अँड सप्लायचं. मुलींना, मुले जास्त असल्यामुळे, साहजिकच जास्त डिमांड आहे, पण सप्लाय कमी आहे. त्यामुळे त्यांना भाव आहे, चॉईस आहे -"

आणि ते बराच वेळ या विषयाच्या अनुषंगानं बोलत राहिले. मी शांतपणे ऐकत होतो आणि मनोमन अस्वस्थ होत होतो. अमितच्या भवितव्याची व लग्नाची माझी चिंता मात्र शतपटीनं वाढली होती!

आज 'रेशीमगाठी'चे वार्षिक वधूवर परिचय संमेलन होते. त्याला प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम महाराष्ट्राच्या एका जिल्ह्याचे कलेक्टर आले होते. त्यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यावर परिचय सोहळा संपन्न झाला. आमच्याकडे वधूपक्ष प्रथम फिरकलाच नाही. अमितचा चेहरा उतरला होता. त्याच्या पुरुषी अहंकाराच्या किती ठिकऱ्या होत असतील याची मला जाणीव होती, पण मी त्याला कसा दिलासा देणार होतो?

मग उत्तम देगावकरांच्या सूचनेप्रमाणे आम्ही वधूपक्षाकडे गेलो. एक-दोन-तीन-चार-पाच. खरं तर या सर्व मुली अमितच्याही तुलनेत डाव्या होत्या, अधिक सुमार होत्या. पण त्यांनाही देगावकर म्हणाल्याप्रमाणेच चॉईस होता. चांगले देखणे व अधिक पगारावरच्या मंडळींनी त्यांना आमच्या समक्ष मागणी घातली होती व ते अस्वस्थ

मनानं पाहाण्याखेरीज आम्ही काय करू शकत होतो?

एका मागून एक असे पाच नकार पचवताना खरंच जड जात होतं. मला संताप येत होता, तर हिचा चेहरा मलूल झाला होता. उसनं अवसान आणीत अमित शांत मुद्रेनं वावरत होता - पण त्याच्या आत किती तप्त उकळता ज्वालामुखी पेटला होता, हे मी जाणू शकत होतो!

सहावी मुलगी आतापर्यंतच्या पाच मुलीच्या श्रेणीत चढत्या क्रमानं डावी होती. त्या वधू पक्ष मंडळीनाही दुपार होता होता कोणी भेटला नव्हता. त्यामुळे थोडी आशा वाटत होती. त्याच वेळी आणखी एक वरपक्ष तेथे आला. आणि जणू मुलीला स्वयंवराद्वारे अमित व त्या मुलामध्ये निवड करायची होती. तो मुलगा सरकारी नोकरीत होता व घरी जमीनजुमला होता. या दोन्ही बाबतीत अमितला तो निश्चितच वरचढ होता. वधू पक्षाचे प्रश्न, त्याला आमची व दुसऱ्या वरपक्षाची उत्तरं आणि त्यावर वधूपक्षाचे प्रतिसाद. "शिक्षण बी. ए.; बी. एस्सी., डी. बी. एम्. अगोबाई, याचं शिक्षण प्रोफेशनल आहे की!"

दुसरा प्रश्न. दुसरी चौकशी. "नोकरी? पगार? खाजगी. दहा हजार; सरकारी. पर्मनंट. अठरा हजार!"

"हे दुसरं स्थळ चांगलं आहे. तुम्ही या. योग नाही समजा. आणि तुमचं स्थळ आम्हांला पसंत आहे. आजच बोलणी करू या!"

सहावा स्वच्छ नकार - तोही तुलना करीत. आता तेथे थांबणं शक्य नव्हतं!

बाहेर आल्यावर अमित म्हणाला, "तुम्ही जा घरी."

"पण तुम्ही कुठे जाणार आहात भाऊजी?" हिनं काळजीनं विचारलं. "मला माहीत नाही." अमितचं तुटक उत्तर. त्याचा चेहरा आता स्वच्छ वाचता येत होता. कार्यालयात त्यानं ओढूनताणून आणलेलं चंद्रबळ आता ओसरलं होतं. त्याचा चेहरा निराशा, संताप व नकारानं विद्रूप - विकृत झाला होता जणू. मला त्याच्याकडे पाहावत नव्हतं. "तुम्ही जा. उगी माझ्याकडे बिच्चारा नजरेनं पाहू नका." अमितचा आवाज फाटका चिरका झाला होता. "नकार - अपमानाची ही सिक्सर - मी मनानं घायाळ, जखमी झालोय दादा-वहिनी. पण मला कीव आवडत नाही - तुमची पण. तेव्हा मला काही विचारू नका. मी कुठे जाणार आहे - काय करणार आहे, मला माहीत नाही."

"अरे पण -" माझं वाक्य पूर्ण होण्यापूर्वी तो लांब लांब ढांगा टाकीत आमच्या नजरेआड झाला होता.

"अरुणा-" मी वळून बायकोला म्हणालो, "हे माझं पाप आहे. मी तुला पहिल्या गर्भारपणी बळजोरीनं सोनोग्राफी करायला लावली व मुलीचा गर्भ म्हणून अबॉर्शन करायला लावलं, त्याची ही शिक्षा आपली कुलदेवता महालक्ष्मी आपणास देत आहे. मला माफ कर."

"मला भावोजींचा घोर लागून राहिलाय. पहा, कसे विचित्र बोलत होते." ती पण कापऱ्या आवाजात म्हणाली.

ती सारी संध्याकाळ आम्ही घरी दोघांनी नि:शब्द काढली. मला पुन्हा पुन्हा देगावकरांचे या प्रश्नाच्या संदर्भातले विवेचन आठवत होते. ते म्हणत होते, त्याचा आज मला अमितच्या संदर्भात किती गडद पद्धतीने प्रत्यय आला होता. खरंच, आपल्या समाजाला मुली का नको आहेत? मीही त्यातलाच एक आहे की. मीही पहिला मुलगाच हवा म्हणून बायकोला स्त्रीभ्रूण म्हणून पाडायला लावलं होतंच की! यामुळे मागील वीस वर्षात मुलींची संख्या झपाट्यानं कमी झाली, त्यामुळे आज लग्नाच्या बाजारात मुलींचा तुटवडा आहे. अगदी चांगल्या देखण्या व भरपूर पगाराच्या मुलांनाही अनुरूप मुली मिळणं कठीण होत चाललंय. त्यांनाही तडजोड करीत कमी प्रतीच्या, विजोड मुलींना स्वीकारावं लागतंय.

अमितसारख्या साध्या, सुमार व कमी पगार-शिक्षण असलेल्या मुलांची लग्नं जुळणं किती कठीण होत चाललंय. आज सहा नकार त्यानं व आम्ही पचवले की... त्याच्या शारीरिक भुकांचं काय?

अंगावर पाल पडताच जसं किसळून यावं, तसं माझं मन शहारलं. किती तरी वेळ तो विचार मनातून जाईना. घड्याळाचा काटा चढत होता, पण अमितचा पत्ता नव्हता. त्यानं बहुतेक मोबाईल पण स्विच ऑफ करून ठेवला असावा.

मध्यरात्री दारावरची बेल कर्कश्श आवाज करीत वाजली. नुकताच कुठे माझा डोळा लागत होता. तो कॉलबेलचा दीर्घ आवाज कसली तरी भयसूचक घंटा वाजवीत मला खाडकन जागं करून गेला.

मी दार उघडलं आणि कसाबसा स्वत:ला सावरीत पूर्ण शुद्ध हरवलेला अमित आत आला व आपल्या कॉटवर स्वत:ला त्यानं एखादी नकोशी वस्तू फेकावी तसं फेकून दिलं!

तो स्वत:शीच नशेमध्ये अस्फुट पुटपुटत होता, त्यातले काही शब्द कानी पडले व संध्याकाळपासून वाटणारी भीती खरी ठरली होती, "ख-ख-खूप मजा आली... साली-काय गच्च होती!"

काही दिवसातच त्याला एका एडस्‌चा उपचार करणाऱ्या 'आधार' संस्थेत दाखल करावं लागलं. कारण - अनप्रोटेक्टेड सेक्स. तो त्या दिवसापासून जिच्याकडे रोज रात्री जाऊ लागला होता, तिचा हा प्रसाद होता!

त्याला घरी ठेवणं तो पुत्रवत असूनही मला अशक्य झालं होतं. कारण एके रात्री हिनं मला सांगितलं होतं, "भावोजींची नजर बदललीय - मला भीती वाटते. काल त्यांनी माझा-माझा हात धरायचा प्रयत्न केला होता!"

पुन्हा आम्हांला चाहूल लागली होती. यावेळी मला मुलगी हवी होती. खंत एकच होती, मी जर अमितची बहीण असतो तर माझी मुलगी त्याला मोठी झाल्यावर देऊन त्याला जावई करून घेतला असता - केलेल्या स्त्रीभ्रूण हत्येचं पातक म्हणून. पण तो माझा भाऊ होता. त्यानं आपलं मरण हातानं ओढवून घेतलं होतं. ते पाप त्याच्या बरोबर माझं होतं - गेल्या वीस वर्षात ज्यांनी मुलीचा गर्भ मारला त्यांचं होतं!

### तीन

**२०३१ - किंवा नंतरचं दशक: गे वर-वर सूचक मेळावा.**

'रेशीमगाठी' कार्यालयासमोर सुमारे पन्नासच्या वर वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक्स मीडियाची तोबा गर्दी झाली होती! प्रवेशद्वारावर खाजगी सुरक्षा दलाचे आठ-दहा जवान तैनात होते. त्यांनाही प्रसार माध्यमांना आवरताना नाकी नऊ येत होते. ते पुन्हा पुन्हा सांगत होते, "साहेबांचा हुकूम आहे - नो मीडिया. तुम्ही जा इथून. हा सारा खाजगी समारंभ आहे." प्रसारमाध्यमांना ते माहीत होतं, तरीही कळलेली बातमी एवढी खळबळजनक होती की, ब्रेकिंग व सर्वात प्रथम बातमी आपल्या चॅनेलवर यावी म्हणून इलेक्ट्रॉनिक मीडियाची धडपड चालली होती. फेसबुकवर 'रेशीमगाठी'नं चक्क एक साईट ओपन केली होती आणि तिला प्रचंड प्रतिसाद मिळत होता. काल रात्रीपासून कार्यालय उघडं होतं. हेतू हा होता की, ज्यांना आपली ही आयडेंटीटी लपवायची हाती, त्यांनी साऱ्या समाजाच्या नजरा चुकवून आधी यावं. काही जण तर चक्क बुरखा पांघरून आले होते. काही पठाणी सूट घालून पण चेहरा झाकून आले होते, काही धीट उघडपणे येत होते. प्रसार- माध्यमांना फेसबुकवरून ही ब्रेकिंग न्यूज कळली होती. आणि त्यांच्या गर्दीमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना. मग काय, एकाकडून दुसऱ्याला. अशा गुणाकार पद्धतीनं ती काही क्षणात शहरभर पसरली. पोलिसांनाही ती समजली. लगेच एक सबइन्स्पेक्टर दहा-वीस पोलीस घेऊन तिथं बंदोबस्ताला आले.

सनातनी, धर्म-संस्कृती रक्षक संघटना व पक्षांनाही बातमी कळताच भलतंच स्फुरण चढलं. तेही लगबगीनं निषेधाचे फलक घेऊन 'रेशीमगाठी'च्या कार्यालयासमोर जमा झाले व घोषणा देऊ लागले.

"धिक्कार असो. धिक्कार असो."

"देगावकर हाय हाय!"

"वधूवर सूचक मंडळ की विकृती केंद्र?"

तेव्हा तिथं कारमधून नुकताच ज्यांचा शहरात एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणून अमृत महोत्सवी वर्षाचं निमित्त साधून जाहीर नागरी सत्कार केला होता, ते उत्तम देगावकर उतरले. ताठ शरीरयष्टी पण पूर्ण पांढरे केस व तशीच दाढी - पहाताक्षणी ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व वाटावं. सत्कार समारंभात तसा आदरानं उल्लेख

पण झाला होता. पण आज समस्त शहरवासीयांच्या रोषाला त्यांना सामोरं जावं लागत होतं. त्याची त्यांना कदाचित जाणीव असावी. ते त्यासाठी तयार पण असावेत. त्यांचं जमलेल्या समुदायाकडून हाय-हाय नं स्वागत झालं. कॅमेऱ्याचे फ्लॅश लखलखले. देगावकर शांत होते. "मला काही बोलायचं नाही. मला आधीच उशीर झालाय." असं म्हणत ते आत जाऊ लागले, तसं मीडियानं त्यांना गराडा घातला. "आम्हांला काही विचारायचं. एक-दोन प्रश्न प्लीज घ्यावेत आपण. फार नाही, फक्त पाच मिनिटं..."

देगावकर जाता जाता थबकले. क्षणभर त्यांनी मनाशी विचार केला. हीच योग्य वेळ आहे - समाजाला धक्का देण्याची. खडबडून जागं करण्याची. त्यामुळे आता उघड बोलायला हरकत नाही. ठीक आहे. ते म्हणाले, "तुम्ही काही विचारण्यापूर्वी मीच स्पष्ट करतो. होय, आजचा गे-समलिंगी संबंध असणाऱ्यांचा परिचय - मैत्री मेळावा आहे. फेसबुक वर रेशीमगाठीनं नवी साईट ओपन करून त्यांना आज मीच आमंत्रित केलंय. आता या क्षणी पन्नास गे पुरुष जमा झाले आहेत."

"तुम्ही समलिंगी विवाहाचं समर्थन करीत समाजातील विकृतीला मान्यता नाही देत आहात?"

"आजच्या जमान्यात पण तुम्हाला मला सांगावं लागतंय की, सेक्शुअल प्रिफरन्स इज ए पर्सनल चॉईस. गे रिलेशनशिप हे वास्तव आहे, ते तुम्ही - आम्ही कितीही नाकारायचा प्रयत्न केला तरी ते बंद होणार नाही, हे समजून घ्या."

"व्यक्तिगत पातळीवर हे ठीक आहे, पण तुम्ही त्याला सामाजिक रूप देत आहात. ते कितपत योग्य आहे?"

"त्याचं उत्तर देण्यापूर्वी मी तुम्हाला २०११ साली घेऊन जातो. त्या वेळी भारताच्या जनगणनेचे आकडे प्रसिद्ध झाल्यावर व मुलींचं झपाट्यानं कमी होणारं प्रमाण पाहून एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणाले होते, पुढील काळात गे मॅरेज मोठ्या प्रमाणात होतील. आज ते राजकारणात नाहीत, त्यांना मी आज या कार्यक्रमासाठी आमंत्रितही केलं होतं. पण प्रकृती अस्वास्थामुळे ते आले नाहीत -"

"आणखी एक सर -"

"प्लीज. पाच मिनिटं संपली आहेत." देगावकर म्हणाले, "मला गेलं पाहिजे. पण जाण्यापूर्वी एक सांगतो, भारतभूमी, महाराष्ट्र आणि खास करून आपला हा जिल्हा लँड विदाऊट डॉटर्स होत आहे. तीस वर्षापूर्वीची 'मातृभूमी' ही फिल्म काढणारा दिग्दर्शक काळाच्या किती पुढे होता हे आज मला जाणवतं. आपण भारतातल्या समस्त पुरुष, ऑफकोर्स आपल्या बायकांच्या सहमतीनं म्हणा व त्यांच्यावर बळजबरी करून, गेली तीस चाळीस वर्षे गर्भातच मुली मारत आलो आहोत, त्यामुळे भारतातील काही राज्यात पुन्हा पाच पांडव - एक द्रौपदी म्हणजेच बहुपतीत्वाचा जमाना आला आहे. जर ही जैविक असमानता पुन्हा समतोल करायची असेल तर

पुढील काळात उलट पद्धतीनं लिंगनिदान सतत करून केवळ पुरुष भ्रूणहत्या केली तरच शक्य आहे -''

अत्यंत ब्रेकिंग न्यूज मिळाल्याच्या आनंदात इलेक्ट्रॉनिक मीडिया समाधानाने निघून गेले. इतर पत्रकारही पांगले. एक वृद्ध पत्रकार सरदेसाई देगावकरांजवळ येत म्हणाले, ''तुम्ही सातत्याने तीस वर्षे बोलत-लिहीत आला आहात जेंडर इनबॅलन्स बद्दल. पण आपला समाज करंटा आहे - नादान ठरलाय हेच खरं. त्यामुळे तुम्हाला हा मैत्रीमेळावा घ्यावा लागतोय. पण तरीही मनाला हे पटत नाही. जाऊ द्या उत्तमराव. आम्ही आता म्हातारे म्हणून कदाचित - अंहं, निश्चितच कालबाह्य झालो आहोत!''

देगावकर त्यांना निरोप देत आत प्रवेशते झाले. उपस्थित पन्नास तरुणांनी उठून उभं रहात टाळ्या वाजवीत त्यांचं स्वागत केलं. स्टेजवर उभे राहून ते बोलू लागले, ''आजचा हा मैत्री मेळावा वेगळा व अभूतपूर्व आहे हे खरंच आहे. पण तो कितपत निरोगी आहे याबद्दल मी साशंक होतो. पण गेली चाळीस वर्षे मी रेशीमगाठी नावाचे हे वधूवर सूचक मंडळ चालवतोय. आज ब्लॉग लेखनात त्याची अपरिहार्यता लॉजिकली मांडायला प्रयत्न केला आहे. तो तुम्हाला पटला म्हणून तुम्ही इथे आला आहात. तुमचं मी स्वागत करतो. आणि एकच सांगतो, मनावर विकृतीचं ओझं घेऊ नका. दोषी तुम्ही नाहीत, समाज आहे. आमच्या-सारखी मागील तीन-चार पिढ्यांची पुरुष मंडळी व खास करून मेडिकल कम्युनिटी दोषी आहे. तुमची आई पण तेवढीच दोषी आहे. तिनं लिंगनिदान करून मुलीचा गर्भ पाडला व तुमचा पुरुषी गर्भ वाढवत तुम्हाला जन्म दिला... जन्मलेल्या प्रत्येकाला शरीरधर्म आहे - भूक आहे. आणि गे रिलेशनशिप ही काही आज जन्मलेली नाही. ती आदिम काळापासून अस्तित्वात आहेच - लेस्बियन प्रमाणेच. आज हेट्रो-सेक्युअल असतानाही तुमच्यापैकी अनेकांना गे व्हावं लागतंय. माझी आजच्या मेळाव्यामागची भूमिका स्वच्छ आहे - मुलीचं प्रमाण कमी असताना मुलांना शरीरसुखासाठी समलिंगी संबंध नाईलाजानं का होईना ठेवावे लागत आहेत. त्याला आपण लग्न नाही, पण मैत्री कराराचं रूप देऊ या आणि जबाबदारीनं संबंध ठेवू या... तुम्ही आसपास बोला, चर्चा करा आणि पार्टनर निवडा. पण एडस्‌ची भीती विसरू नका. प्रोटेक्टेड सेक्सची माहिती करून घ्या. आज ती आम्ही तज्ज्ञ डॉक्टर्सकडून देणार आहोत. तेव्हा - चीअर अप. गुड लक.''

देगावकरांच्या स्पष्ट बोलण्यानं चोरून व दबकत येणारे तरुण मोकळे झाले होते. आणि मग एका अनौपचारिक पार्टीचं रूप त्या समारंभाला प्राप्त झालं. सिग्रेटच्या धुरात कॉफी व स्नॅक्स खात-पीत वर्तुळावर्तुळातून परिचय होऊ लागला, गप्पा रंगू लागल्या. अनुरूपता जाणवत गेली आणि पार्टनरची जोडीदाराची निवड होऊ लागली.

केदार तगडा व सिक्स पॅकवाला होता, पण कुरूप व काळा. त्याला नाजूक चणीचा गोपाळ भेटला. दोघांचा परिचय झाला व गप्पांतून त्यांचे सेक्शुअल प्रिफरन्स

स्पष्ट होत गेले. गोपाळ म्हणाला, "आपल्या रिलेशनशिपमध्ये मी बायको - तू नवरा. पुढाकार तू घ्यायचास व मला चेतवायचंस-"

केदारही त्याच्या बोलण्यानं खुलून आला. "होय मित्रा, मलाही असेच संबंध आवडतील!"

देगावकर पूर्ण सभागृहात हिंडत होते. प्रत्येकाशी बोलत होते. एक समाधान त्यांना जाणवत होतं की, आपण एका सामाजिक समस्येचं समाधानकारक उत्तर शोधलंय. पण इथं येणारा प्रत्येकजण काही नैसर्गिकरीत्या गे टाईपचा - वृत्तीचा नव्हता. त्यांना चॉईस - पर्याय नव्हता म्हणून ते तसे झाले होते वा होणार होते. मुलींची संख्या एवढी कमी झाली होती की, अनेक मुलांना एकटं राहाणं भाग होतं. पण त्यांनाही नैसर्गिक भुका होत्या, त्याचं शमन कसं करायचं? समाजात वाढती समलैंगिकता हे त्याचं अपरिहार्य असणारं उत्तर होतं!

म्हणूनच त्यांना आजच्या 'गे मैत्री संमेलनाची' कल्पना सुचली होती. त्यांचा मित्र सेवानिवृत्त जिल्हाधिकारी उमाकांतच्या भाषेत सांगायचं तर आऊट ऑफ बॉक्स विचार व उपाय सुचला होता. पण मनात खोलवर एक भीती काट्याप्रमाणे सलत होती. महासत्ता झालेला समर्थ भारत आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे समान झाला होता. दारिद्र्य व गरीबीचं पूर्णपणे उच्चाटन झालं होतं. आधुनिक शिक्षणानं नॉलेज इकॉनॉमीच्या जोरावर हे तीस वर्षात शक्य झालं होतं. पण शंभर टक्के शिक्षित भारत मुलींच्याबाबत साक्षर पण नव्हता. ठार परंपरागत वागत होता. त्याची परिणती अशी झाली होती. जगामध्ये कमी मुलींमुळे भारत लाफिंग स्टॉक बनला होता. आणि आपण आज जे पाऊल उचललं आहे, ते कितीही अपरिहार्य व गरजेचं असलं तरी ते फारसं काही नैसर्गिक नाहीये आणि खरं संसारसुख देणारं नाहीय. उद्या ते आम होणार तेव्हा लाफिंग स्टॉकची भारताची प्रतिमा अधिक गडद होणार...

आता खरंच घड्याळ्याचे काटे उलट्या दिशेनं फिरवण्याची पाळी आली आहे. आता लिंगनिदान करून मुलाचा गर्भपात करीत पुढील काही वर्षं तरी मोठ्या प्रमाणात केवळ मुलींनाच जन्म दिला पाहिजे...

देगावकर खिन्नसे हसले. आपले डोळे भरून आले आहेत असं त्यांना वाटलं. मन तर भारी जडशीळ झालं होतंच. त्यांनी चष्मा काढला, रुमालानं डोळे कोरडे केले. आणि पुन्हा चष्मा लावला.

आणि त्यांची नजर सुरेंद्रवर गेली. त्यांचा नातू त्यांच्या नकळत तेथे आला होता. त्यानं आपला एक पार्टनर बहुतेक निवडला होता. तो तगडा होता.

आज घरी आपण सुरेंद्रच्या जोडीदाराचं सून का जावयाच्या रूपात स्वागत करणार आहोत?

प्रश्न खरंच कठीण होता!

"कांता, तुझ्या सूचनेवरून माझ्या अनुभवाच्या संचिताच्या आधारे 'कांदे पोह्याची सेंच्युरी' व 'नकाराचा षटकार - पण मुलीकडून' या दोन केस स्टडीज अनुभवाच्या आधारे लिहिल्या, पण तुझी ही भविष्यात काय घडू शकेल याची कल्पना करून लिहिलेली 'गे - वर-वर सूचक मेळाव्याची' स्टोरी अप्रतिम आहे. मनाला हादरून सोडणारी आहे."

वार्षिक मेळाव्याला उमाकांत आला होता, आणि त्यानंतर दोन दिवस तो माझ्या घरीच राहिला होता. काल रात्रभर बहुधा तो जागा असावा. कारण दोनदा मी बाथरूमला जाताना त्याच्या खोलीतला प्रकाश पाहिला होता. मी हलकेच डोकावून पाहिलं. तो लॅपटॉपवर काम करीत होता. आज सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी त्यानं मला हातात या केसस्टडीजची प्रिंटआऊट दिली. ती डायनिंग टेबलावरच चहा घेता घेता वाचून काढली. 'कांता, ही तुझी केस स्टडी सर्व वृत्तपत्रात प्रसिद्ध व्हायला पाहिजे. चांगलं झणझणीत अंजन घालणारी ठरेल. कदाचित त्यामुळं काही प्रमाणात तरी जाणीव जागृती होईल!"

आणि पाच वर्षांचा माझा नातू सुरेंद्र पळत पळत आला आणि खुर्चीवर चढत माझ्या मांडीवर बसत बोबड्या स्वरात सांगू लागला, "आबा, तुम्ही ममाला सांगा ना - आज मला स्कूल नको. या आबाच्या गाडीत बसायचंय... तो रेड लँप का लावला तुम्ही कार वर?"

एकदम मला केस स्टडीचा कांतानं शेवट केलेला आठवला. माझ्या सुरेंद्रवर येऊन ती केस स्टडी संपली होती. काळजात एक कळ उठली व पत्नीनं गमतीनं म्हटलेलं आठवलं. जर आपला नातू सुमार निघाला तर -

तर काय होईल याचं एक विदारक चित्र कांतानं रेखाटलं होतं!

"उत्तम, मला खरंच माफ कर. मला ही केस स्टडी तुझ्या - एका मॅरेज ब्युरो चालवणाऱ्यांच्या नजरेतून लिहायची होती, म्हणून सुरेंद्रचा संदर्भ आला. पुन्हा म्हणतो, आय ॲम सॉरी."


"इटस ओ. के. कांता." माझी अस्वस्थता काही संपत नव्हती.

त्यानंही ते ताडलं असावं. माझा हात हाती घेत म्हणाला, "प्लीज. असं काही होणार नाही - निदान सुरेंद्रच्या बाबतीत तरी. मी तुला एक सांगतो - मला नुकतीच नात झाली आहे. तिला मी देईन सुरेंद्रसाठी - झालं?"

मी खुदकन हसलो. जड झालेलं मानस एकदम निवळू लागल्याची जाणीव झाली होती!

०-०-०

# नाटक



# १. अखेरची रात्र

*(पडदा वर जातो. खुर्चीवर पाठमोरा बसलेला अब्बास. समोरच्या रायटिंग टेबलवर बसून डायरी लिहीत आहे. पूर्ण रंगमंचावर काळोख. फक्त पाठमोऱ्या अब्बासवर प्रकाशझोत. पार्श्वभूमीवर त्याचा आवाज. लेखनातले शब्द प्रेक्षकांना ऐकू येतात.)*

आवाज : तू दिलमें तो आता है - पर समझ नही आता.
पर जान गये की, तेरी पहचान यही है!

गुरू... वाटलं होतं तसंच होतंय. 'अखेरची रात्र' ही तुझ्या जीवनावरची कादंबरी तुझ्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न करत लिहिली खरी, पण तेव्हाही वाटलं होतं, हातातून, मनातून पाऱ्यासारखं काहीतरी निसटून गेलंय... मला जे भावलं, प्रत्ययास आलं तेवढंच तुझं रूप, जीवन नव्हतं. त्याही पलीकडे तू कितीतरी उरला होतास... आज तुझ्याच आयुष्यावर लिहिलेल्या कादंबरीसाठी पुरस्कार स्वीकारताना प्रेक्षकात बसलेल्या प्रेरणा आणि प्रतिभा यांना पाहिलं तेव्हा कादंबरीसंदर्भात लिहून झाल्यावर जे वाटतं होतं, तेच पुन्हा प्रकर्षानं वाटायला लागलं... मला समजलेला गुरू किती अपुरा होता... माझा मित्र, लेखक, कलावंत म्हणून मला समजलेला, मी चितारलेला गुरू... पण त्या पलीकडे प्रेरणा आणि प्रतिभेच्या वाट्याला तू कसा आला होतास? त्या दोन स्त्रियांच्या नजरेतून तू काही वेगळा होतास का?... असावास असं आज मला त्या दोघींच्या चेहऱ्यावरचे हरवलेले भाव पाहून वाटलं. आणि ते आज मला एक माणूस म्हणून, एक लेखक म्हणून जाणून घ्यायचंय. आज त्या दोघींना मी बोलवलंय इथं. तू गेल्यावर आज कितीतरी वर्षांनी त्या दोघींना एकत्र भेटणार आहे. एकीच्या प्रगतीचा वारू चौफेर उधळलेला, तर दुसरी दारू आणि अश्रूंच्या दलदलीत रुतून बसलेली - उनका सामना मैं कैसे कर पाऊंगा गुरू? समझ नही आता, पण खैर, आज त्या माझ्या महेमान आहेत, त्यांच्या मुखातीब जाणं

भाग आहे.

*(रंगमंच उजळतो. अब्बास रंगमंचाच्या कोपऱ्यात जात दार उघडतो. प्रेरणा व प्रतिभा प्रवेश करतात. यावेळी पूर्ण शांतता. अब्बासच्या समोर प्रतिभा तर त्यांच्या दोघांच्या समोर प्रेक्षकांकडे तोंड करून प्रेरणा बसते. त्यांच्यावर प्रकाशझोत. अब्बास गोरापान, धिप्पाड. तंग सलवार व तलम मखमली झब्बा. डोळ्यात शांत स्थिर भाव. एकूण खानदानी व्यक्तिमत्त्व. प्रतिभा, अभिजात मुस्लीम सौंदर्याचा नमुना. प्रौढत्वाकडे झुकलेली पण तारुण्य व सौंदर्य टिकवून असलेली. उंची काळी रेशमी साडी व कोपभर ब्लाऊज, केसांची घरट्यासारखी रचना. अत्यंत बोलका चेहरा. पण उदासीनतेची झाक असलेला. प्रेरणा टिपिकल बंगाली, सावळ्या सौंदर्याची धनीण. केस मोकळे सोडलेले, पांढरी साडी व ब्लाऊज, मोठाले पाणीदार डोळे हसरे, रुदन जाणवणारी नजर.)*

अब्बास : *(शांततेचा भंग करत सहज स्वरात)* अरे, दोघी एकदम आलात.. या.. बसा...

प्रेरणा : मीच तिला आग्रहानं आणलं... इतक्या वर्षानंतर कशाला हवेत क्षुद्र रागलोभ...

प्रतिभा : का मला बोलावलंत तुम्ही? मला यायचं नव्हतं...

अब्बास : दारापर्यंत तर येतेस आणि भेटायचं नव्हतं म्हणतेस? कमाल आहे तुझी. आता आत तर याल की नाही दोघी? *(प्रेरणा सहज तर प्रतिभा नाईलाजानं आत येते. दोघीही खुर्च्यांवर बसतात. अब्बास उभाच. काही क्षण शांतता. अब्बास वातावरण निवळवायचा प्रयत्न करत)* बरं वाटतंय आज तुम्हा दोघींना बघून.

प्रतिभा : तुम्हाला कुठे मला भेटायचं होतं भाईजान? तुमच्या आणि प्रेरणाच्या लेखी मी तर व्हिलनच ना? गुरूच्या आत्महत्येला कारणीभूत ठरलेली *(अब्बास अस्वस्थ. काही बोलायचा प्रयत्न करतो पण त्याला शब्द सुचत नाहीत. काही क्षणानंतर)*

प्रेरणा : सत्य फक्त एवढंच आहे की आपण तिघंही आयुष्यातलं अनमोल असं काहीतरी हरवून बसलोत. मैं तो बस उसी अभाव में जी रही हूँ और पी रही हूँ.

प्रतिभा : भाईजान, फंक्शनला पण ती पिऊनच आली होती... तिला सावरा तुम्ही. माझ्या मनाचा विचार नाही केलात तरी चालेल. मला फक्त दु:खाचं छान ॲक्टिंग करता येते असं एखादा तुम्हीच म्हणाला होतात ना?

अब्बास : *(खजिल होत)* मी... मी... गुरूचा पक्षपाती होतो.. आहे... पण आज तुमच्या नजरेतून मला गुरू समजून घ्यायचाय.

प्रेरणा : त्याला आता उशीर नाही झाला? तुमची कादंबरी प्रकाशित होऊन ज्ञानपीठही मिळालं... ती लिहिताना नाही वाटलं आम्हालाही समजून घ्यावं?

प्रतिभा : तुम्ही अनेक क्लासिक कॅरेक्टर्स निर्माण केलेले जिनियस रायटर. पण या शहनाजला, गुरूच्या प्रतिभेला नाही न्याय दिला भाईजान तुम्ही. लोकांच्यातली माझी प्रतिमा खलनायकी केलीत. *(आवेगानं)* खरंच तुम्हाला असं वाटतं, गुरूनं माझ्यामुळं आत्महत्या केली?

अब्बास : कठीण आहे काही ठामपणे सांगणं... पण गुरूच्या संपूर्ण अस्तित्वाला मी नेमकेपणानं कादंबरीत पकडू शकलो नाहीये. काहीतरी निसटून गेलंय हे मात्र खरं.

प्रेरणा : कादंबरीत ते निसटून गेलेय जे तुमच्यासारख्या जिनियस रायटला एक पुरुष असल्यामुळं कळणं अवघड आहे. आणि ते म्हणजे गुरूशी असलेले भावबंध. आमचे दोघींचे.

प्रतिभा : *(चकित होऊन प्रेरणाकडे पाहात)* मी खरंच गुरूच्या आणि तुझ्या संसारात यायला नको होतं...

प्रेरणा : *(कडवट हसते)* जाऊ दे प्रतिभा.. शकिलनं म्हटलंय ते खरं आहे... नसीब मैं जिसके जो लिखा था वो तेरी मैफिल में रास आया, किसीके हिस्से में प्यास आयी, किसीके हिस्से में जाम आया...

अब्बास : अंहं... आपल्या तिघांच्याही हिश्याला फक्त प्यास आली... कारण तिघांच्याही आयुष्यात महत्त्वाचा होता तो फक्त गुरू. *(क्षणभर थांबून)* बरं, काय घेणार तुम्ही? चहा, कॉफी? सॉरी, तुम्हाला आल्या आल्या विचारायचं विसरूनच गेलो.

प्रेरणा : *(अस्वस्थ हसत)* भाईजान... माझं ड्रिंक एकच ...ते...ते मिळेल?

अब्बास : अगं... किती पिशील? रात्रंदिवस तेच?... अशानं मरून जाशील एक दिवस.

प्रेरणा : त्याच दिवसाची वाट पाहतीये भाईजान. जगण्यासारखं काय राहिलंय आता आयुष्यात? गाण्याचं करिअर पण संपल्यातच जमा आहे. माझ्यात गुरूसारखं धाडसं नाही. नाहीतर... *(विमनस्क हसते)*

प्रतिभा : *(किंचित उत्तेजित, वरचा स्वर)* मी मात्र जगणार आहे... अजूनही गुरूच्या फिल्ममध्ये असायची तशी काही कॅरेक्टर्स मला करायची आहेत. *(अभिमानाची झलक)* गुरूची प्रतिभा आहे मी.. मला तर जगायला पाहिजे... (आवेगानं) हल्ली तर मी कॅमेऱ्यापुढे इमोशनल सीन देताना माझ्या सगळ्या दुःखाचा आसवांवाटे निचरा करते आणि कोरडी होऊन जाते. *(काही क्षण शांतता.)*

अब्बास : आज तुम्ही दोघी बोला... फक्त माझ्यासाठी बोला... तुम्ही दोघींनी

गुरूबरोबर केलेला आणि त्याच्याशिवाय केलेला प्रवास मला समजून घ्यायचा आहे.

प्रेरणा : त्याचा आम्हाला दोघींनाही भयंकर त्रास होईल भाईजान... मला मग कितीही प्यायले तरी नशा चढणार नाही आणि फक्त तळमळत राहीन मी सगळी रात्र.

प्रतिभा : ॲक्शन म्हटलं की ऑन आणि कट म्हटलं ऑफ होणं हा कलाकाराचा धर्म. पण त्यानंतर मी जगापुढे ऑफ आणि स्वत:शीच ऑफ असते भाईजान. मला गुरूबद्दल जे वाटतं ते केवळ माझं, खाजगी आहे. रोझीची भूमिका करताना 'आज फिर जिने की तमन्ना है' म्हणत थिरकले खरी, पण ती फक्त माझी पडद्यावरची भूमिका होती. पण आतून... खूप आतून मात्र 'आज फिर मरने का इरादा है' असंच सारखं वाटतं मला. मी माझा इरादा फक्त कृतीत उतरवत नाही एवढंच.

अब्बास : मला तर असं वाटतंय की बोलल्यामुळेच कदाचित मोकळं होऊ शकाल तुम्ही दोघी.

प्रेरणा : बोलल्यामुळं दु:ख कमी होईल की वाढेल ते नाही मला सांगता येणार, पण ते संपणार तर नाहीच ना भाईजान? *(काही क्षण सगळे अस्वस्थ)* प्रतिभा...तू बोल...आता इतक्या वर्षानंतर तेव्हासारखी तीव्र भावना राहिली नाही माझी. कदाचित आता मी तुला अधिक मोकळेपणानं समजू शकेन...

प्रतिभा : हल्ली सिनेमाचे डॉयलॉग सोडले तर दिवस दिवस बोलतच नाही मी... आज तुमच्यासमोर एवढी कशी काय बोलतीये तेच कळत नाही... मला हिच्याप्रमाणे दु:ख दारूत बुडवता येत नाही की अश्रू ढाळत रात्री जागवता येत नाही. लेकिन सचमुच, आज बहोत सारी बाते करने को जी चाह रहा है... गुरू के बारे में... अपने बारे में... प्रेरणा के बारे में भी...

अब्बास : आज जवळपास पंधरा वर्षे गेली... मेरी जहन में आज भी गुरू की रात जिंदा है... उसे भूल नही सकता.

*(मंद पार्श्वसंगीत सुरू होते. पावसाचा आवाज, विजांचा कडकडाट ऐकू येत जातो. रंगमंचाची दुसरी बाजू प्रकाशित होते. तिथे गुरू उभा, पण त्याचा चेहरा दिसत नाही; फक्त त्याचं अस्तित्व जाणवतं.)*

गुरू : कुठल्या पर्वतांमधून हिंडताहेत श्वासांचे साधू? हा बर्फाचा पाऊस कधी थांबणार आहे? कधी थांबणार आहे हे चेहऱ्याचं निखळणं? कधी भेटणार आहेत माणसं समोरासमोर? बर्फातून मोकळी झाल्यानंतर फांदी हिरवी असेल का? धरेल का स्पष्ट झालेल्या वाटेवर ती सावली? या मंत्रजागराला असणार आहे का काही अर्थ? हे प्रश्नांचे मोहोळ शांत होणार आहे का?

हा एकटेपणा मला गिळून तर टाकणार नाही ना? *(फोन करतो. रंगमंचावरील अब्बासच्या घराचा भाग उजळतो)*

गुरू बोलतोय...

अब्बास : गुरू? एवढ्या रात्री? कसा आहेस गुरू?

गुरू : नेहमीप्रमाणेच अस्वस्थ ... बेभान... बेचैन.

अब्बास : *(हळुवार)* झोप येत नाही गुरू? या फिर शायद किती की याद में खुद को परेशान कर रहे हो?

गुरू : म्हणूनच तुला फोन केला... यार... गेले तीन दिवस... तीन रात्र जागा आहे मी... क्षणभरही पापणीला पापणी लागलेली नाही... *(एकूण व्याकूळ स्वर)* अब्बास... मेरे पास आ... अभी ... इसी वक्त... तू नही आया तो मैं, मैं शायद मर जाऊंगा यार...

अब्बास : मी येतोय... निघतोच मी... पण पण एक सांगू? जरा बेतानं पी दोस्त...!

गुरू : दॅट इज नॉट पॉसिबल अब्बास... आयुष्यात कोणतीच गोष्ट मी कधी हिशोबानं केली नाही. आणि आताशी तर हीच माझी एकमेव साथीदार आहे... उसे तो में बेहिसाब पिऊंगा... आज संध्याकाळपासून निद्रादेवीची आराधना करत व्हिस्कीमध्ये कांपोजच्या गोळ्या घालून पितोच आहे... पण साली किकही येत नाही... आणि झोपही येत नाही...

अब्बास : *(प्रचंड धक्का, क्षणभरानं सावरत)* क... क... काय? तू व्हिस्कीत कांपोजच्या गोळ्या घालून आहेस? गुरू...नको रे...*(उसळत)* स्टॉप इट... थांबव हा वेडेपणा... मी येतोय... मित्रा. लवकरात लवकर.

गुरू : थँक्यू माय फ्रेंड. तू नसतास तर मी कधीचाच संपून गेलो असतो. अगदी एकटा आहे रे मी या अफाट दुनियेत. माझी प्रेरणा मला सोडून गेली आहे... तर प्रतिभा माझ्याकडे येत नाही... या अफाट बंगल्यात मी... मी अगदी भुताप्रमाणे इकडून तिकडे हिंडतोय... ही वेडी रात्र चढतेय... हा धुंवाधार पाऊस भीती जागृत करतेय... आणि झोपही येत नाही... डोळे ताठरलेले... आग आग होतेय.. अंग अंग ठणकतंय... मन भरकटतंय... कसले कसले विचार मनात घुमतायत... पता नही... माझं मन भूतखाना झालंय यार...

अब्बास : मी निघतोच, पण आता दारूतून कंपोजच्या गोळ्या घ्यायच्या नाहीत सांगून ठेवतो. *(फोन ठेवतो. रंगमंचावरून निघून जातो.)*

गुरू : (टीपॉयवर असलेल्या फोनचा रिसीव्हर उचलतो आणि नंबर फिरवतो. अधीर मनोवस्था. मग कानाला रिसीव्हर लावत) हॅलो... कौन, अम्मीजान? प्रतिभा... याने शहनाज है क्या? मैं गुरू... क्या? किसी पार्टीमें गयी है?

*(फोन ठेवतो. अस्वस्थपणे रंगमंचावर येरझाऱ्या घालू लागतो. गुणगुणतो)*

**दिल हि तो है, न संग ओ खिश्त,**
**दर्द से भर नाये क्यूं**
**रोयेंगे हम हजार बार,**
**कोई हमें सताये क्यूं?**

फार.. फार... एकाकी वाटतंय प्रतिभा.. गेलं वर्षभर तू मला भेटली नाहीस की फोनवर तुझा आवाजही ऐकला नाही.. कधी विचार केलास की कैसे मेंने ये दिन... ये कभी खत्म न होनेवाली लंबीलंबी राते गुजारी होगी? ये भी जानता हूँ की, मुझसे दूर होकर तू भी कोई खास खूश नहीं रही होगी... "यह कह सकते हो, हम दिल में नहीं है, पर यह बतलाओ, की अब दिल में तू ही तू हो, तो आँखोंमे निहा क्यूं हो...

*(पायसाचा आवाज वाढवणे.. हळूहळू कमी करणे. बंद करणे. गुरू फोनपाशी जातो.)*

गुरू : हॅलो... हॅलो... *(रिसीव्हरकडे बघत)* फोन कट झाला की केला? पलीकडे अम्मीजान होती की प्रतिभा? नक्कीच प्रतिभा असणार... का माझा फोन घेत नाहीस प्रतिभा? एवढा दुरावा? एवढा राग? का? *(फोन ठेवून अस्वस्थपणे येरझाऱ्या घालू लागतो.)*

प्रतिभा : *(रिसीव्हरशी खेळत स्वत:शीच)* फार कठोर आणि मगरूर झालीस शहनाज तूं... त्याचा फोनही घेत नाहीस? *(डोकं धरीत)* ओ... नो... नाही मला त्याच्याशी बोलायचं. गुरू... गुरू... गुरू... पूरे दिलो दिमागमें छाकर भी कुछ बचा है... शायद मुझे परेशान करने के लिये... किती कठिण आहेस तू... तुझ्या संगतीत तुझ्याजवळ राहू शकत नाही आणि तुझ्यापासून दूर जाऊन जगूही शकत नाही... हा तुझा प्रभाव, का माझा दुबळेपणा? हे पुरुष म्हणून तुझं छळणं, की प्रकृती म्हणून माझं सोसणं? प्रश्न... मनात उठणारे नुसते प्रश्न! तुझा... तुझा आवाज ऐकला की मला विरघळून जाण्याची... तुझी मनात ओढ जागृत होण्याची भीती वाटते... मोठ्या कष्टानं... जिवाच्या करारानं तुझे माझे बंध मी जाणीवपूर्वक तोडलेत. ते मला पुन्हा जोडायचे नाहीत. मी... मी फार दुबळी आहे रे गुरू... आपल्या रिलेशनशिपचं भान मला बेभान करतं.. *(फोनची रिंग वाजू लागते. नाईलाजाने प्रतिभा फोन उचलते.)*

गुरू : हॅलो... हॅलो... *(हळुवारपणे)* मला माहीत आहे प्रतिभा, तूच फोन उचलला आहेस... प्लीज - प्लीज फोन बंद करून नकोस.. किती दिवस झाले... तुझा आवाज ऐकला नाही... एवढा का बदनसीब आहे मी? एवढं

का अंतर पडलंय आपल्या नात्यात? प्रतिभा... प्रतिभा... ऐकते आहेस ना?

प्रतिभा : *(न कळत बोलते. पण शुष्क स्वर)* गुरू, मी ऐकतेय. का फोन केलास एवढ्या रात्री?

गुरू : *(गुणगुणत)* **कर रहा था गमे जहाँ का हिसाब**
**आज तू याद बेहिसाब आये.**
**तुम्हारी याद के जब जख्म भरने लगते हैं,**
**किसी बहाने तुम्हे याद करने लगते हैं।**

प्रतिभा : आता मी कठोर झाले आहे गुरू. अशा मनाला जखमी करणाऱ्या तुझ्या शब्दांनी घायाळ नाही होणार आता. *(किंचित चढा सूर)* मला सांग, इतक्या रात्री का फोन केलास?

गुरू : प्रतिभा, मला तू हवी आहेस... येशील? तू नाही आलीस तर मला कधीच पाहू शकणार नाहीस... *(प्रतिभा विदीर्ण होत त्याचं बोलणं ऐकते आहे. पण बोलत नाही. चेहऱ्यावर संमिश्र भाव)*

प्रतिभा : गुरू... तुला मरणाचं पहिल्यापासून ऑबसेशनच आहे. अरे, तुला कसं कळत नाही? या रात्री मी एकटी कशी येऊ? ड्रायव्हर पण नाहीये आता माझ्याकडे.. ठेवते मी फोन... (फोन ठेवू लागते)

गुरू : हॅलो... हॅलो प्रतिभा... अगं, फोन नको ठेवू. ऐक माझं... हॅलो हॅलो...

प्रतिभा : गुरू, सॉरी. *(कठोरपणे निश्चय करीत फोन ठेवून देते) (म्युझिक?)*

प्रतिभा : मला वाटलं, तसंच घडतंय. मी कणाकणानं विरघळतेय. कितीही मन घट्ट केलं तरी गुरूचा आवाज ऐकला की लोहचुंबकाप्रमाणे त्याच्याकडे जीव झेपावतो... परवान्याप्रमाणे जळून ज्ञाणं हीच या शमेची - माझी किस्मत आहे का?

गुरू : प्रतिभा... तू असा फोन बंद करायला नको होतास *(टीपॉयवर ठेवलेल्या कांपोजच्या गोळ्याची बाटली उघडतो व ती व्हिस्कीच्या बाटलीत उपडी करतो)* सॉरी अब्बास... तू मला बजावलं होतंस - कंपोजच्या गोळ्यांना हात लावायचा नाही म्हणून बट - नो अल्टरनेटीव्ह. आज अखेरची रात्र आहे. पण ती मी स्वतःहून ओढवून घेतोय एवढंच समाधान... *(पेला उचलून घोट घेत)* कदाचित हा अखेरचा प्याला असेल... हा जेव्हा संपेल... कदाचित माझं भान हरवलेलं असेल... पुन्हा कधीही भान न येण्यासाठी... तब प्रतिभा, तू बहोत रोएगी... बहोत पछताओगी ... *(तो उठतो. त्याचा तोल जात आहे. दारूचे घोट घेत खिडकीमधून बाहेर पाहात रहातो. अंधार)*

*(पुन्हा प्रकाश येतो तेव्हा गुरू आणि प्रतिभा एकत्र बाहेरून रंगमंचावर प्रवेश करतात.)*

प्रतिभा : कसला विचार करतोयस एवढा गुरू?

गुरू : एक नव्या पिक्चरचा जर्म सुचतोय. तुला आणि राजला घेऊन एक पिक्चर करता येईल... एकदम वेगळा... राजच्या हसू आणि आसूच्या प्रतिमेला गहराईपर्यंत नेणारा आणि त्याला मी तुझ्या रूपात प्युअर रोमान्सची जोड देईल. हां हां, येस येस! माझा पुढचा पिक्चर याच थीमवर असेल. प्रतिभा, आता इथं अब्बास पाहिजे होता, म्हणजे त्याला माझी वन लाईन सांगता आली असती - तो त्यातून एक ग्रेट स्टोरी डेव्हलप करेल.

अब्बास : *(प्रवेश करीत)* बंदा हाजीर है जनाब। भूल गये? आपने ही तो पार्टी में कहा था... घर आने को... मैं तुम्हारे स्टडीरूममे कबसे मॅग्जीन पढते तुम्हारी राह देख रहा था. कुठे गेला होतास पार्टीनंतर...?

गुरू : तुम से क्या छिपाना यार? पार्टीमध्ये राज, नर्गिस आणि प्रतिभाबरोबर त्यांच्या पुढच्या पिक्चरची धुंद गाणी ऐकून मन प्रफुल्लित झालं होतं. त्या मूडमध्येच आम्ही समुद्रावर जाऊन बसलो. त्यामुळे लेट झाला.

प्रतिभा : ओ. के. तुमचं स्टोरी सेशन सुरू करा... मी चलते. गुरुला फक्त सोडायला म्हणून आतपर्यंत आले. फार वेळ झालाय.

गुरू : वा... असं कसं? ही थीम तुझ्याबरोबर डिस्कस केल्याशिवाय साकार होणार नाही. तू तर हवीच. *(वेगळा स्वर)* प्रतिभा... आज इथेच राहणार आहेस तू...

प्रतिभा : *(चकित)* काय? इथे?... या घरी मी राहू? भाईसाब, इन्हे कुछ समझाओ...

अब्बास : शहनाज... प्रेरणा भाभी घरसे आज ही चली गयी है... *(प्रतिभा त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पहाते)* दोघात कडाडून भांडणं झाली... रात की तनहाई अकेला बर्दास्त नही कर पाएगा...

गुरू : *(कडाडत)* कशाला नको त्या गोष्टींची आठवण करून देतोयेस अब्बास? आज भरपूर प्यायल्यानंतर आत्ता कुठे मूड बरा व्हायला लागला होता, नको त्या गोष्टींची आठवण देऊन मिठाचा खडा टाकलास मित्रा.

प्रतिभा : *(तीव्र उच्च स्वर... संतापानं धगधगता)* वा... गुरू... वा... प्रेरणा नाही, म्हणून मला राहण्याचा आग्रह? मी काय तुझी कीप आहे, ती नसताना तुझी सोबत करायला?

गुरू : शी... किती कठोर बोलतेस प्रतिभा? हे तुझ्या मनात आलं तरी कसं? कीप? किती घाणेरडा शब्द वापरलास तू आपल्या नात्यासाठी.

प्रतिभा : *(हुंदका)* पण मी एक स्त्री आहे रे... मला रिलेशनशिपमध्ये स्थैर्य हवंय...

गुरू : लोक तर तुला गुरूची प्रतिभा म्हणतात आणि मला प्रतिभेचा गुरू. हे काय टोमणे झाले?

प्रतिभा : हे तुझ्या... माझ्या समोर... पण माघारी? *(चेहरा पिळवटून येतो, ओठ थरथरतात, दाताने ते चावीत)* गुरूची - गुरूची रखेल? होय - असंच म्हणतात सगळे ... कारण तू विवाहित आहेस. प्रेरणा तुझी बायको आहे. मी मात्र... *(हुंदका देत चेहरा ओंजळीत लपवते.)*

गुरू : *(तिच्या जवळ जात, तिच्या केसातून हात फिरवीत)* किती भयंकर आहे हे.. समाज किती दुष्ट असतो हे मला कधी समजलंच नाही.

प्रतिभा : पण खोटं का आहे? सांग ना.. तुझ्या-माझ्या रिलेशनशिपला काय नाव द्यायचं?

अब्बास : गुरू... तिचं उसळणं... रागावणं... आणि कठोर बोलणं अस्वाभाविक नाही. तिला समजून घ्यायचा प्रयत्न कर.

गुरू : *(किंचित त्रासिक सूर)* तुला काय म्हणायचंय अब्बास?

अब्बास : मला एक सांग... दुपारी प्रेरणा तुझ्याशी भांडून भावाकडे निघून का गेली?

गुरू : नेहमीचंच कारण - प्रतिभा जशी माझ्या जीवनात आली तसं हे सारं संपलं.. नेहमी भांडणं, धुसफूस. आता प्रेरणा प्यायला पण लागलीय अब्बास... मला कळत नाही ती अशी का वागते ते?

प्रतिभा : कारण सांगू? स्त्री प्रेम करते सर्वस्वानं.. ज्याला आपलं मानलंय त्याला सर्वस्वानं भरभरून देते. त्यात ती कुणाला शेअर नाही करू शकत... म्हणूनच मला फार गिल्टी वाटतं. प्रेरणेपासून तिचा नवरा मी हिरावून घेतला.

गुरू : प्रतिभा, तुम तन मन से मेरे निकट हो... शायद ये संबंध जायज नहीं हैं, पण आपली रिलेशनशिप केवळ एवढ्यानंच का डिफाईन होते? नाही प्रतिभा, आपले संबंध दिल की गहराई तक है... यू आर माय फाईन्ड - माय क्रिएशन... मी तुझा निर्माता आहे...

अब्बास : परंपरेनं पुरुष स्त्रीला मालकी हक्काची वस्तू समजून खेळतो... तू निर्माता म्हणून तिच्याशी खेळतोस... काय फारक आहे?

गुरू : पुरे झालं तुझ ॲनालिसिस अब्बास... तुला काय मिळतं असं मनाची सालटी काढण्यात? संबंधांना छिन्न भिन्न करण्यात?

अब्बास : सत्यापासून कोणी पाठ फिरवू नये म्हणून

गुरू : नाही सहन होत मला अब्बास. नाही सहन होत... सत्य एवढं घायाळ करणारं असेल तर मला ते नको...

अब्बास : पण किती काळ किती काळ असा त्यापासून विन्मुख राहशील? जेव्हा ते सत्य समग्रपणे नग्न स्वरूपात तुझ्यासमोर येईल... तू त्याचा सामना करू शकणार नाहीस.. मिटून जाशील. मला त्याचीच भीती वाटते.

प्रतिभा : नको भाईसाब... त्याला परेशान नका करू... हे सगळं आता बोललंच पाहिजे का?

अब्बास : हां, शहनाज हां. केव्हा तरी मला हे एकदा बोलायचं होतं. हीच वेळ आहे, तुम्ही दोघांनीही साहस बांधलं पाहिजे., हिंमत धरली पाहिजे.

गुरू : ओ. के. यार... मला तू काय म्हणतोय याचा थोडा थोडा बोध होतोय... ते व्यक्ती म्हणून स्वीकारायला... पचवायला कठीण आहे. जखमी, उद्ध्वस्त करणारं आहे. पण एक कलावंत म्हणून मला फार एक्सायटिंग वाटतंय. *(एकदम उचंबळून येत उत्तेजित स्वरात)* अब्बास, प्रतिभा... या क्षणी एक सुचतंय... प्यासाचा पुन्हा रिमेक करायचा.. पण तो प्रेरणा, प्रतिभा आणि माझ्या रिलेशनशिपवर बेतलेला. एकाच वेळी दोघी हव्यात आणि एकीला सोडून दुसरी नको... असे काही तरी गूढ जाणवतंय...

अब्बास : गुरू... अरे मी तुझ्या जीवनात आत्ता... या क्षणी चालू असलेल्या वादळांच्या संदर्भात बोलतोय... त्यावरही तुला सिनेमा सुचतो?

गुरू : *(तंद्रीतच)* जीवनापेक्षा कला मोठी, सिनेमा मोठा. उद्या मी नसेन. प्रतिभा, प्रेरणा नसतील. पण ही मानवी गुंतागुंत असेल. त्यावर बेतलेला, गहराईको छूनेवाला सिनेमा मी जर बनवला तर आय विल बी इम्मॉर्टल... सो, छोडो ये मेरा-प्रेरणा का प्रॉब्लेम. लेट अस डिस्कस धिस थीम, यार.

अब्बास : पाहिलंस प्रतिभा... केवढा गजबका आर्टिस्ट है. कलावंताचं असं दर्शन होणं दुर्मीळ असतं.

प्रतिभा : हां, तो कलावंत म्हणून खरंच दुर्मीळ आहे पण तेवढाच धीट माणूस असता तर फार बरं झालं असतं.

अब्बास : एक्झाक्टली. मला हेच सांगायचे आहे तुम्हाला दोघांना. गुरू प्यासामधला नायक आणि तुझ्यामध्ये फारसे अंतर नाही... पण प्रेयसी आणि गणिका म्हणजे प्रेरणा आणि प्रतिभा नाहीत.

गुरू : आणि माझ्यासाठी दोघीही तेवढ्याच प्रिय आहेत. एक प्रेरणा जगण्याची... तर दुसरी प्रतिभा.. स्वत:ची मयसभा निर्माण करून त्यात विहार करण्याची... एक राहू दे, दुसरीचा मात्र त्याग कर असं कुणी म्हटलं तर ते कसं शक्य आहे?

प्रतिभा : मी कुठे हे अमान्य केलंय? पण या नात्याला मला फक्त सामाजिक मान्यता हवीय. मला नाही सहन होत कोणी त्याची कीप म्हटलेलं. नाही सहन होत. *(गुरूजवळ जात)* गुरू... माझ्याशी विवाह कर.. तिला मी

सोडून दे म्हणत नाही... मी माझ्याच घरी राहीन... पण मला शादी करायची आहे.

गुरू : *(धक्का बसल्याप्रमाणे हतबुद्ध होत)* काय? शादी? प्रतिभा... मैने कभी इस बारे में सोचा तक नही।

प्रतिभा : *(रागाने उसळत)* खराखुरा पुरुष आहेस तू.. अप्पलपोटा. लग्न न करताही मी मिळते ना तुला? मग गरजच काय तुला लग्नाची?

गुरू : प्रतिभा, आज तुला झालंय तरी काय? असं वाकड्यात काय शिरते आहेस? लग्न म्हणजे तरी काय असतं? दोन मनं, आत्मा एक होणंच ना? आपण का अलग आहोत?

प्रतिभा : मग त्यालाच समाजासाठी... समाजाच्या मान्यतेसाठी कायदेशीर रूप द्यायचं मी म्हणतेय... कुठलीही स्त्री संसारात... जीवनात दुय्यम स्थान स्वीकारत नाही... पण तुझ्या प्रेमात मी एवढी दुबळी... असाहाय्य बनलेय... (रडत राहाते)

अब्बास : गुरू, मुझे ये ठीक लगता है... कुछ हदतक... कमसे कम प्रतिभा का प्रॉब्लेम का हल हो सकता है. वो टूटनेकी कगार पर हैं, बच सकती हैं, तू ने उसके साथ शादी की, तो वो संवर जायेगी...

गुरू : अब्बास, प्रतिभा, तुम्ही माझाही जरा विचार करा. विवाहित असताना दुसरं लग्न? हे संबंध कायदेशीर करणं कसं शक्य आहे?

प्रतिभा : मला कुठे तुझ्या इस्टेटीवर अधिकार सांगायचा आहे? मला फक्त चारजणांच्या नजरेत तुझं पत्नीपद भूषवायचे आहे... बस.

गुरू समाज हे मान्य करील असं वाटतं? प्रतिभा, ह्या सामाजिक बंधनाचाच जाच कधी कधी असह्य होतो.

प्रतिभा : *(अब्बासकडे वळत, डोळे पुसत)* पण मी असं किती काळ फरफटत येऊ तुझ्यामागे? मनानं मुर्दाड असते तरी एकवेळ जगणं सुसह्य झालं असतं. पण ही प्रतिभाही एक अस्सल कलावंत आहे व तिलाही कॉम्प्लेक्स मन लाभलं आहे. पराकोटीची हळवी आहे ती. आणि समाजाला ठोकर मारण्याइतपत धीट पण नाही... हां गुरू, मला आपलं करू शकत नाही चारजणाच्या साक्षीनं... मला नाही वाटत, मी एक स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून कमीपणा आणणारी अवस्था फार काळ सहन करू शकेन. ह्या सगळ्याचा ब्रेकिंग पॉईंट आलाय. फार फार जवळ...

अब्बास : नो, शहनाज नो... मला कळतंय तुझ्या मनाचे विचार कोणत्या दिशेनं चाललेत ते. तू कोणत्या निर्णयापर्यंत येती आहेस ते. पण नको. त्याचा उच्चारही नको.

प्रतिभा : *(कडवट असते)* तुम्हीच मघाशीच म्हणालात ना.. माणसानं सत्याला धीटपणे समोरं... *(निश्चयी सुरात)* मी मनाचं साहस बांधलं आहे.. *(गुरूला)* गुरू, मी जे बोलले त्याचा विचार कर. मला तू सचमुच दिलोजानसे हवा आहेस पण - पण असा नाजायज रिश्ता नको - मैं शादी चाहती हूँ। बस... *(प्रतिभा निघून जाते)*

अब्बास : गुरू, जरा सोचो क्या फरक पडता है दूसरी शादीसे? प्रेरणाशीही याविषयी बोलता येईल. तू काय तिला विचारून प्रतिभेच्या प्रेमात पडलास का?

गुरू : तुझ्या धर्मात ठीक आहे रे. पण..

अब्बास : आपण सगळे कलावंत आहोत. तोच आपला धर्म, तीच आपली जात. आणि आज तुला हे आठवंतय, की मी मुसलमान आहे, तू हिंदू आहेस? लानत है तुझंपर.

गुरू : सॉरी यार. *(क्षणभर थांबून)* मला कायद्याची भीती वाटते आणि त्याहीपेक्षा प्रेरणाला काय वाटेल याची भीती वाटते.

अब्बास : आणि प्रतिभा? तिची काळजी नाही वाटत?

गुरू : हे काय विचारणं झालं अब्बास? तिच्याशिवाय माझं कलाजीवन शून्य आहे यार.

अब्बास : मग तिला तुला सांभाळलं पाहिजे. त्यासाठी प्रतिभानं तुझ्यासमोर ठेवलेला लग्नाचा प्रस्ताव मला ठीक वाटतो. बस्.

गुरू : *(अचानक अब्बास गेलेल्या दिशेने पाहात स्वत:शीच)* बरं झालं अब्बास, आज तू प्रतिभेला रोखलंस ते. तिच्या विचारंची दिशा मला जाणवत होतीच. मी कशाला घाबरतोय? प्रतिभा का खोने का डर? या फिर प्रेरणा का लिहाज? प्रेरणा... ओ माय गॉड.. मला काहीच समजत नाहीय... अशा वेळी प्रेरणा जवळ असती तर? ती किती खंबीर आहे *(मंद संगीत, निळसर प्रकाश, छायासम प्रेरणा त्याला दिसते.)*

आवाज : मी इथंच तर आहे गुरू. तुझ्याविना मला अस्तित्वच कुठे आहे?

गुरू : प्रेरणा... तूं परत आलीस?

प्रेरणा : *(हसून)* मी तुला सोडून कुठे गेले होते?

गुरू : मला अजूनही खरं वाटत नाहीय. डोळ्यावर विश्वास बसत नाहीय.

प्रेरणा : तुझ्या मनाचा कौल काय सांगतो? मन हीच खरी गोष्ट, किमान आपण कलावंतासाठी. म्हणून तर आपल्याला मनस्वी म्हणतात. मनाची प्रेरणाच आपली प्रतिभा फुलवत असते आणि कलाकृती घडत जाते आपल्या हातून. विसरलास गुरू? ते तुझंच लाडकं मत ना?

गुरू : खरंय प्रेरणा. पण आता या क्षणी मला माझ्या मनाचा ठावच लागत नाहीये.

प्रेरणा : माहितेय - दुपारी मी तुझ्याशी भांडले ना. आणि आता प्रतिभाही तुला संकटात टाकतीये. सहाजिक आहे तू गोंधळून जाणं.

गुरू : किती मनकवडी आहेस प्रेरणा. पण *(स्वत:शीच)* हा अजूनही का मला भास वाटत आहे? प्रेरणा, तू खरंच इथं माझ्या समोर आहेस? मला स्पर्श कर बघू.

प्रेरणा : *(खळखळून हसत)* तुझ्या मनात मी आहे, मग वेगळा स्पर्श हवा?

गुरू : *(प्रसन्नपणे)* हां प्रेरणा, तू तर माझ्या मनात आहेस, श्वासाश्वासात आहेस. मी आज जो कोणी फिल्ममेकर आहे, तो तुझ्यामुळेच आहे. पण - पण...

प्रेरणा : पण आता प्रतिभा माझ्या कलाजीवनाचा अविभाज्य भाग आहे; असंच ना?

गुरू : ते तुझसे थोडाही छिपा है?

प्रेरणा : या फिर तेरे जिंदगीका अटूट हिस्सा बन गयी है?

गुरू : ये - ये भी सही है। पर मैं क्या करू? असं ठरवून थोडंच होतं? हा इत्तेफाक आहे प्रेरणा।

प्रेरणा : पण कलेपेक्षा जीवन मोठं असतं - जर मी तुझ्या जीवनाचा हिस्सा आहे. अर्धांगिनी आहे तर...

गुरू : अगं, पण मी ते कुठे नाकारतोय? फिर भी...

प्रेरणा : हा फिरभीच आपल्या वादाचं मूळ आहे... प्रेम आणि सहजीवन हे स्वामित्व मागतं आणि मी तेच मागतेय गुरू - तो माझा अधिकार नाही?

गुरू : अगं, आहे ना... पण तरीही प्रत्येकाला स्वत:ची अशी वेगळी स्पेस लागतेच.

प्रेरणा : ती स्वत:साठी लागते. कलेच्या साधनेसाठी लागते - त्याला माझी हरकत नाही.

गुरू : मग?

प्रेरणा : हरकत आहे त्या स्पेसमधल्या प्रतिभेच्या अस्तित्वाला. जिथं फक्त मी असायला हवं तिथं ती पण आहे... हे मला सहन नाही होत गुरू.

गुरू : मी... मी काय करू?

प्रेरणा : सगळ्यात प्रथम सत्याला धीटपणे समोर जायला शीक. अब्बासभाई मघाशी हेच तर सांगत होते. फैसले की घडी आई है और तुम्हारे फैसले का इंतजार मुझे भी है... *(वाद्यसंगीत, निळा प्रकाश नाहीसा होतो.)*

गुरू : प्रेरणा - प्रेरणा ... कुठे गेली ही? (आजूबाजूला पहात) हा भास होता?

इथं प्रेरणा खरंच येऊन गेली होती? *(नि:श्वास टाकीत)* खैर... जो भी हो, कदाचित ती येऊन बोलली किंवा माझ्याच मनानं तिच्या भेटीचा हा सीन रचला. हे डायलॉग पण माझ्या मनातूनच आले असतील. पण त्यानं माझ्या टु बी ऑर नॉट टु बी च्या इंटरनल डायलेमाचे डायमेन्शन बदलले हे खरं.. ते अधिक गुंतागुंतीचे आणि धारदार झाले. ही मनाची गुंतागुंत... मी त्यानं घायाळ होतोय माणूस म्हणून, की कलावंत म्हणून ते एंजॉय करतोय? मानवी मनाच्या अगम्य तळाचा शोध लागतोय थोडा, म्हणून एक्साईट होतोय... त्या अमूर्त पण अस्तित्वाचा प्राण असलेल्या मनाचा शोध घेतला पाहिजे. हीच तर आपली मूलभूत प्रेरणा आहे आणि ती जाणण्याची, कलाकृतीत परावर्तित करण्याची प्रतिभा पण लाभलीय...

*(पुन्हा संगीताचा कल्लोळ, रंगमंचावर एका प्रकाशझोतात प्रेरणा, तर दुसऱ्या बाजूच्या प्रकाशझोत प्रतिभा त्याला दिसते.)*

**कधी काळी एक गलबत**
**भरकटत होतं दिशाहीन.**
**त्याच्यासाठी दीपस्तंभ**
**झालीस तू प्रेरणा...**
**आणि त्या गलबताला बंदर मिळालं...**
**विसाव्याचं ठिकाण मिळालं...**
**साथ मिळाली जीवनात...**
**आणि कलेतही...**
**तरीही मनातली प्रतिभा...**
**काही तरी हुडकत होती...**
**तिला ओढ होती नवनिर्मितीची...**
**स्वतःची मयसभा करण्याची...**
**त्याला रंग - रूप आणि आकार...**
**दिलास तूं प्रतिभा...**
*(तिच्याकडे झेपावत)* **मला - मला तूं हवीस...**
*(प्रेरणाकडे वळत)* **आणि तूही हवीस - तूही हवीस...**
*(मोठ्याने)* **मला प्रेरणा हवी - मला प्रतिभा हवी...**
**प्राण आणि आत्मा...**
**जगायला दोन्ही हवं ना?**
**एक सोडून दुसरी कसं चालेल?**
*(प्रेरणेला)* **समजतं का मी काय म्हणतो ते?**

*(प्रकाशझोत बंद. ती नाहीशी होते.)*

*(प्रतिभेला)* **तुला तरी हे समजतं का?**

*(प्रकाशझोत बंद. प्रतिभा पण नाहीशी होते.)*

*(तो थकून कोचावर बसकण मारतो. अंधार)*

*(पुन्हा प्रकाश येतो तेव्हा गुरू बसलेला. समोर प्रतिभा.)*

प्रतिभा : आज फैसले की घडी है गुरू

गुरू : *(त्रस्तपणे)* मैं कुछ फैसला नही कर सकता...

प्रतिभा : नाही गुरू, आता ती वेळ आलीय, कालच मला याचा सोक्षमोक्ष लावायचा होता. फक्त अब्बास भाईजाननी आग्रह केला म्हणून थांबले.

गुरू : तसंच काही नाहीय प्रतिभा - गिव मी सम मोअर टाईम...

प्रतिभा : तू कधीच फैसला करू शकणार नाहीस गुरू. तू माझ्याशी... माझ्या समाधानासाठी म्हणून का होईना लग्न करू शकणार नाहीस. कारण तुझ्या अंतरात्म्यात पूरी तरहसे प्रेरणा बसी है; उसके कारण तू फैसला नहीं ले सकता. मी स्पष्टच सांगते गुरू. मला तुझी पत्नी होता येत नसेल तर मी तुझ्यापासून वेगळी होतेय... होय. माझ्या मनाचा आजपर्यंत निश्चय होत नव्हता... माझ्यामुळे तुझी प्रतिभा काळवंडतेय ना?... मग मी दुर होते गुरू.

गुरू : किती सहजपणे किती कठोर बोलून गेलीस, प्रतिभा? अगं, असं नुसतं म्हटल्यानं वेगळ होता येतं? मनानं... आत्म्यानं होता येतं? आज माझी प्रतिभा नात्याच्या गुंत्यानं आणि बंधनानं काळवंडलीय. पण तू दूर गेलीस तर ती पुरती संपून जाईल...

प्रतिभा : तुला स्वत:ला सावरावं लागेल गुरू... कारण माणसापेक्षाही तू मोठा कलावंत आहेस... आणि तुझं खरं कार्य मला किंवा प्रेरणेला सुख देण्यापेक्षाही चित्रपट निर्माण करणे हे आहे... असायला हवं... तुझं माझ्यावाचून काही अडणार नाही... मी गेले तरी तुझी प्रतिभा तुझ्याजवळ आहे. तू नव्या प्रतिभा घडवू शकतोस गुरू...

गुरू : नाही... मला ते जमणार नाही.. तू केवळ फक्त एक अभिनेत्रीच नाहीस. माझ्या जीवनाचा... कलाजीवनाचा प्रभावी हिस्सा आहेस. तू दूर झालीस तर कदाचित मी जगेनही. पण कलावंत... दिग्दर्शक म्हणून संपून जाईन...

प्रतिभा : तू वेडेपणा करतो आहेस... तुझं माझ्यावरचं उत्कट प्रेम बोलतंय... पण तू प्रतिभेविनाही मोठा कलावंत होतास, आहेस आणि असशील. मी तुझ्यापेक्षा जास्त सोशिक आहे. स्त्री आहे ना... मलाही तुझ्यापासून वेगळं होऊन जगणं सुखाचं नाही... सोपं तर मुळीच नाही. पण जगेन कशी

तरी... आणि तुला जगलेलं आणि खूप मोठ्ठं झालेलं पाहीन मी. *(हुंदके देत निघून जाते)*

**अंक पहिला समाप्त**

**अंक दुसरा**

अब्बास : आईये... भाभी... आईये... आपही का घर है...

प्रेरणा : भाईजान... माझ्याच घरी येते आहे मी अजनबी प्रमाणे... *(कडवट हसू)* शुक्रिया भाईसाब... शुक्रिया...

अब्बास : शुक्रिया किसलिये? प्रेरणा, या घराचा मीही एक हिस्सा आहे... मी केलं ते या घरासाठी...

प्रेरणा : *(कृतज्ञ स्वर)* सचमुच आज आप सिर्फ भाईजान नही... एक फरिश्ता बनके आये और मुझे फिर से मेरे घर ले आये...

अब्बास : किती वेळा असं भांडण झालं की घर सोडायचं प्रेरणा? प्रत्येक वेळी मग मी तुझ्या भावाकडे यायचं... तुझी समजूत घालायची आणि परत आणायचं. मला काही दुसरा उद्योग नाही?

प्रेरणा : आपको भाईजान जो कहती हूं... तो छोटी बहन के लिए इतका तो करना ही पडेगा.

अब्बास : पण बहिणीनंसुद्धा ऐकावं मोठ्या भावाचं. तुला किती वेळा सांगितलं की गुरू सामान्य माणसांसारखा नाही... त्याच्या वागण्याला व्यावहारिक फूटपट्या लावून तू चूक करतेस. त्याला आणि स्वत:ला त्रास देतेस...

प्रेरणा : कळतं.. सगळं कळतं भाईजान... पण काय करू? माझे संस्कार मला असं करायला भाग पाडतात. मी नाही सहन करू शकत माझा गुरू मला सोडून दुसऱ्या स्त्रीमध्ये गुंतलेला..

अब्बास : पण गुरूची आणि प्रतिभेची रिलेशनशिप केवळ स्त्री-पुरुषाचीच नाही.. त्याहीपेक्षा तो निर्माता आणि ती त्याची आवडती कलाकृती अशी आहे. दोन अस्सल ताकतीच्या कलावंताची परस्परांना प्रेरणादायी ठरेल अशी ती संगत आहे.

प्रेरणा : भाईजान... तुम्ही विसरलात... मीही एक कलावंत आहे.. स्वत:चं स्थान असलेली इंडस्ट्रीतली एक आघाडीची गायिका आहे.

अब्बास : गुरू नेहमी तुझ्याबद्दलसुद्धा म्हणत असतो... प्रेरणा माझा स्वर आहे... माझ्या अंतरात्म्याचा आवाज आहे...

प्रेरणा : आणि शहनाज माझी निर्मिती आहे... प्रतिभा आहे... असंच ना? *(उसळत)* हा शुद्ध अप्पलपोटेपणा झाला. तुम्ही पुरुष आपल्या फूटपट्टीनं त्याचं

समर्थन करता.

अब्बास : कदाचित हे खरंही असेल प्रेरणा... पण हे तुला कबूल केलंच पाहिजे की, आपणा सर्वांपेक्षा गुरू मोठा कलावंत आहे. तो आपल्याशी कसा वागतो हे महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं आहे ते त्याचं फिल्म मेंकिग, आपणच त्याला जपलं पाहिजे... सांभाळलं पाहिजे. कारण माणूस म्हणून तो फार दुबळा आहे. छोट्या मुलाप्रमाणे क्षणिक लहरीवर, अंत:प्रेरणांवर जगणारा आहे.

प्रेरणा : भाईजान, तुम्ही गुरूचे दोस्त आहात. दोस्ती ही भावना निखळ एकेरी असते... त्यात गुंतागुंत नसते, म्हणून तुम्ही असे बोलू शकता. पण मी पत्नी आहे त्याची.. कोट्यधीशाची मुलगी मी. त्याच्या प्रेमात पडून मी घर सोडलं त्यावेळी गुरू कोण होता? एक धडपडणारा होतकरू नट. मी मागचा पुढचा विचार न करता त्याच्या सोबत दहा बाय दहाच्या खोलीत संसार थाटला. तेव्हाचा त्याला स्ट्रगल... त्याची उमेदवारी, तेव्हाचं त्याचं फ्रस्ट्रेशन मी माझं म्हणून सोसलं.. भोगलं... त्याला... त्याच्यातल्या हळव्या कलावंताला उभारी दिली. त्याच्यावर माझा त्या काळच्या सहजीवनापोटी तरी अधिकार नाही?

अब्बास : हां प्रेरणा. पण गुरूला कुठं इन्कार आहे?... त्याला तू आजही तेवढीच हवी आहेस

प्रेरणा : पण प्रतिभाला शेअर करतच ना? भाईजान... मला तेच सहन होत नाही... तडफड होते जिवाची...

अब्बास : मी गुरूची बाजू घेतोय असं समजू नकोस... पण ही फिल्मी दुनिया मेक बिलिव्हची दुनिया आहे. इथं हिरो, हिरोईन यांना कॅरेक्टर जगावे लागतात, ते जगता जगता त्यांच्यात जवळीक निर्माण होणं नॅचरल आहे.

प्रेरणा : माझा प्रतिभावर राग नाही. माझी तक्रार आहे गुरूबद्दल. स्त्रीनं पतीला सात जन्मासाठी आपलं मानायचं अशी प्रथा आहे आपल्या समाजात, मग स्त्रियांनीसुद्धा हीच अपेक्षा का करू नये पुरुषांकडून?

अब्बास : शेवटी मीही पुरुषच ना.

प्रेरणा : तुम्ही सफाईनं उत्तर द्यायचं टाळता आहात भाईजान...

अब्बास : नाही प्रेरणा... मला उत्तर टाळायचं नाही... पण ते पुरतं माहीत नाही हे कारण आहे. *(विचार करीत)* स्त्रियांसारखी समर्पणशीलता पुरुषांमध्ये कमीच असते. कदाचित हजारो वर्षांपासून पुरुष घराबाहेर वावरत आला आहे म्हणून असेल किंवा स्त्रीला घरातच कुटुंब-व्यवस्थेच्या आदर्शाखाली बांधलं गेलं म्हणूनही असेल, पण स्त्री एकाच पुरुषाची होऊन राहते.

प्रेरणा : हां भाईजान... आमच्या गुणसूत्रांमध्येच कदाचित वर्षानुवर्षे समर्पणाचे आणि एकनिष्ठेचे संस्कार वास करून असावेत. पण मनाची तडफड तर होतेच ना...

अब्बास : *(नि:श्वास टाकून)* स्वत:ला सावरायला आपणच शिकलं पाहिजे प्रेरणा..

प्रेरणा : कदाचित सामान्य स्त्री असते, भावना बोथट असत्या तर जमलंही असतं... पण त्या दोघांप्रमाणे मीही स्वरांच्या दुनियेतली कलावंत आहे... त्या सुरांच्या दुनियेत प्रत्येक तान शुद्धच लागते... भेसळ खपत नाही तिथं भाईजान...

अब्बास : प्रेरणा...

प्रेरणा : एकांतात गुरूच्या संगतीत असताना गुरूलाही पूर्ण खात्री असते. हे प्रेरणेच्या देहाचे रोमांच.. उमाळे... त्याचेच आहेत. अम्लान - शुद्ध आहेत... ते परपुरुषाच्या स्पर्शापासून मुक्त आहेत... पण माझं काय भाईजान? *(हुंदका, स्वरात कमालीची वेदना)* त्याचा स्पर्श अनुभवताना वाटतं, की हाच स्पर्श प्रतिभेनेही तेवढ्याच उत्कटतेनं अनुभवला असेल... त्याचे रोमांत तिच्याही वाट्याला आले. असणार.. यात मला ताजेपणा वाटत नाही. उष्टं जेवणात चालत नसतं, तसंच जीवनातही...

अब्बास : तुला कोणत्या शब्दानं दिलासा देऊ प्रेरणा? काल परवा आपण खूप बोललो आहोत. वास्तव आपण स्वीकारलचं पाहिजे. आणि वास्तव हे आहे की, आज तो प्रतिभेविना राहू शकत नाही.. आणि तुझ्याविना तर नाहीच नाही...

प्रेरणा : भाईजान...

अब्बास : आपण सगळेजण या फिल्मी इंडस्ट्रीचे ऋणी आहोत. आज जे कोणी आहोत ते याच इंडस्ट्रीमुळे; तिचं कर्ज फेडायचं असेल तर ही कला पुढे नेली पाहिजे, चांगले सिनेमे काढून. आणि ती ताकद गुरूमध्ये आहे. आपण त्याला साथ द्यायला पाहिजे चांगले सिनेमे काढण्यासाठी. माणूस म्हणून आपली सुखदु:खे कितीही खरी असली तरी कलेपुढे ती महत्त्वाची नाहीत... प्रेरणा.. म्हणूनच तुला परत घेऊन आलो आहे. गुरू फार कोलमडून गेला आहे... त्याला तू सावर. त्याला नवा सिनेमा सुरू करावयाचा आहे. सचिनदांनी फार अप्रतिम चाली दिल्या आहेत साहिरच्या गीतांना. त्याचं तू सोनं करशील प्रेरणा. हे बघ... हे बघ.. आपण गाणी रेकॉर्ड करून सुरुवात करू गुरूच्या या नव्या सिनेमाची. मी प्रतिभेलाही असाच तयार करीन काम करण्यासाठी आणि हे तुलाही केलं पाहिजे... गुरूसाठी आणि त्याहून जादा या फिल्म इंडस्ट्रीसाठी...

प्रेरणा : हा भाईजान... मै... मै... कोशिश करूंगी... लेकिन बहुतही मुश्किल काम है. मुझे आप साहस देते रहना... मेरा धीरज बांधते रहना.. *(तोंड ओंजळीत लपवते.. नि:शब्द हुंदके. गुरू येतो.. उदास चर्या काळवंडलेली. अब्बास व प्रेरणेला पाहतो. क्षणभर चकित. मग दोघं सुस्कारा टाकीत)*

गुरू : *(अब्बासला)* मला माहीत आहे... तूच तिची समजूत घालून घरी आणलं असणार... शुक्रिया मेरे दोस्त.

अब्बास : बोल तिच्याशी... *(अब्बास निघून जातो)*

गुरू : ये प्रेरणा. यू आर वेलकम हिअर. आणि प्लीज.. पुन्हा मला सोडून जाऊ नकोस... तुझ्याशिवाय जगण्याची मला सवय नाही गं...

प्रेरणा : हां गुरू, पुन्हा मी कधीही हे घर सोडून जाणार नाही... पण एकदाही कधी मला बोलवायला आला नाहीस.

गुरू : कोणत्या तोंडानं? प्रेरणा... मला माझी शरम वाटते... तुझ्या वेदना समजतात, पण त्या दूर करणं शक्य नाही, हे लक्षात आलं की मी स्वत:च्या नजरेत उतरत जातो... कसा येऊ मी तुझ्याकडे?

प्रेरणा : असं म्हटलं की झालं... मी नाही माझा अपमान विसरून पुन्हा पुन्हा येते तुझ्याकडे? प्रेमात फक्त स्त्रीनंच का स्वत:ला अपमानित करून पुरुषाला सावरायचं नेहमी?

गुरू : नाही, असं तू स्वत:ला अपमानित समजू नकोस प्रेरणा. उलट मी तुझी प्रतारणा करतोय हा माझ्या मनातला अपराधीपणा कमी आजही झालेला नाही. तुला आपली ही फिल्मी दुनिया माहीत आहेच... इथं दररोज पार्टनर बदलले जातात... पण मी कधीही बाजार सेक्स जवळ केला नाही... प्रतिभा खरंच माझ्या जीवनात यायला नको होती. पण एक सांगतो, आजवर तुला हे कधीही सांगितलेलं नाही. मी अजूनही प्रतिभाशी पूर्ण समरस होऊ शकलेलो नाही... तिच्या- बरोबर असतानाही मला तूच आठवतेस.. पण तुझ्याबरोबर असताना मात्र मला सगळ्या जगाचा विसर पडलेला असतो.

प्रेरणा : *(चकित होत आनंदानं)* खरंच? मला खरंच हे ऐकून किती बरं वाटतंय म्हणून सांगू ... गुरू, तुझ्याविना मला जीवनच नाहीय... आणि हे मी प्रत्येक वेळी घर सोडल्यावर अनुभवते...

गुरू : थँक्यू... यापुढे प्लीज हे घर सोडून जाऊ नकोस... तू नसताना मी एकट्यानं हे दिवस कसे काढले कुणास ठाऊक... आपल्या बेडरूमनं माझा एक एक हुंदका साठवून ठेवला असेल. माझं मूक आक्रंदन आणि घुसमट तिनं पाहिली आहे. या काळानं माझी माणसाची... माणसाच्या

निखळ सुख दु:खाची आणि कॉम्प्लेक्स इगोची जाण अधिक समृद्ध केली आहे... ह्याचा... ह्याचाच मला पुढच्या सिनेमात उपयोग करून घेतला पाहिजे... अब्बास, आपला पुढचा सिनेमा खराखुरा ऑल टाईम क्लासिक ठरला पाहिजे...

प्रेरणा : गुरू... मी तुला पूर्णपणे साथ देईन.

(गुरू अस्वस्थ)

प्रेरणा : काय झालं गुरू?

गुरू : पण हिरॉईन म्हणून प्रतिभाशिवाय कुणी डोळ्यासमोर येत नाही.

प्रेरणा : तू माझ्यासाठी संकोच करू नकोस. घे तू तिला तुझ्या सिनेमात. ती खरोखरच ग्रेट ॲक्ट्रेस आहे.

गुरू : *(सुस्कारा सोडत)* ओ थँक गॉड... प्रेरणा *(उदास स्वर)* पण ती कबूल होणार नाही.. तिनं माझ्याबरोबर पिक्चर न करायचा निर्णय घेतला आहे..

प्रेरणा : मी भेटेन तिला... मी वळवेन तिचं मन.

गुरू : प्रेरणा... मी एवढा चांगला नाही, प्रेरणा. माझ्यासाठी तू एवढं करावंस इतका तर...

प्रेरणा : गुरू... आपला सिनेमा बेमिसाल ठरला पाहिजे... हा माझाही स्वार्थ आहे तुझ्याइतकाच ... आणि त्यासाठी मी प्रतिभाचं मन नक्कीच वळवीन.

*(अंधार)*

*(पुन्हा प्रकाश येतो तेव्हा स्टेजवर गुरू व प्रतिभा)*

गुरू : एकाच टेकमध्ये दीड मिनिटाचा सीन आणि अर्ध्या पानाचा डॉयलॉग ओ. के. झाला. ग्रेट. सिंपली ग्रेट. प्रतिभा, रिहर्सल न करताही किती Excellent love scene रंगवलास... या फिल्मचा तो हायलाईट ठरेल.

प्रतिभा : थँक्यू गुरू. मी आता जाते माझ्या रूममध्ये.

गुरू : जरा थांब ना. कॅमेऱ्यापुढे एवढी इमोशनल होतेस पण सीन संपला की किती कोरडी... अलग होऊन जातेस?

प्रतिभा : फक्त सिनेमासाठी मी परत इथं आलेय, बास.

गुरू : खोटं खोटं बोलतेस तू, मघाशी जो लव्ह सीन रंगवलास तो अस्सल नव्हता? त्याला आपले वैयक्तिक संदर्भ नव्हते?

प्रतिभा : *(उसळून पण घायाळ स्वरात)* पुरे गुरू - तो चॅप्टर माझ्यासाठी क्लोज झालाय. तू प्रेरणेचा होऊन राहा - मला त्यात समाधान आहे.

गुरू : पण तुझाही मी नाही का?

प्रतिभा : ओ - नो *(तोंड ओंजळीत लपवते. पण हुंदका आवरत नाही)*

गुरू : तुझं रडणं सगळं सांगून गेलंय मला, अशी दूर का राहातेस? मला

निखळ सुख दु:खाची आणि कॉम्प्लेक्स इगोची जाण अधिक समृद्ध केली आहे... ह्याचा... ह्याचाच मला पुढच्या सिनेमात उपयोग करून घेतला पाहिजे... अब्बास, आपला पुढचा सिनेमा खराखुरा ऑल टाईम क्लासिक ठरला पाहिजे...

प्रेरणा : गुरू... मी तुला पूर्णपणे साथ देईन.

(गुरू अस्वस्थ)

प्रेरणा : काय झालं गुरू?

गुरू : पण हिरॉईन म्हणून प्रतिभाशिवाय कुणी डोळ्यासमोर येत नाही.

प्रेरणा : तू माझ्यासाठी संकोच करू नकोस. घे तू तिला तुझ्या सिनेमात. ती खरोखरच ग्रेट अॅक्ट्रेस आहे.

गुरू : *(सुस्कारा सोडत)* ओ थँक गॉड... प्रेरणा *(उदास स्वर)* पण ती कबूल होणार नाही.. तिनं माझ्याबरोबर पिक्चर न करायचा निर्णय घेतला आहे..

प्रेरणा : मी भेटेन तिला... मी वळवेन तिचं मन.

गुरू : प्रेरणा... मी एवढा चांगला नाही, प्रेरणा. माझ्यासाठी तू एवढं करावंस इतका तर...

प्रेरणा : गुरू... आपला सिनेमा बेमिसाल ठरला पाहिजे... हा माझाही स्वार्थ आहे तुझ्याइतकाच ... आणि त्यासाठी मी प्रतिभाचं मन नक्कीच वळवीन.

*(अंधार)*

*(पुन्हा प्रकाश येतो तेव्हा स्टेजवर गुरू व प्रतिभा)*

गुरू : एकाच टेकमध्ये दीड मिनिटाचा सीन आणि अर्ध्या पानाचा डॉयलॉग ओ. के. झाला. ग्रेट. सिंपली ग्रेट. प्रतिभा, रिहर्सल न करताही किती Excellent love scene रंगवलास... या फिल्मचा तो हायलाईट ठरेल.

प्रतिभा : थँक्यू गुरू. मी आता जाते माझ्या रूममध्ये.

गुरू : जरा थांब ना. कॅमेऱ्यापुढे एवढी इमोशनल होतेस पण सीन संपला की किती कोरडी... अलग होऊन जातेस?

प्रतिभा : फक्त सिनेमासाठी मी परत इथं आलेय, बास.

गुरू : खोटं खोटं बोलतेस तू, मघाशी जो लव्ह सीन रंगवलास तो अस्सल नव्हता? त्याला आपले वैयक्तिक संदर्भ नव्हते?

प्रतिभा : *(उसळून पण घायाळ स्वरात)* पुरे गुरू - तो चॅप्टर माझ्यासाठी क्लोज झालाय. तू प्रेरणेचा होऊन राहा - मला त्यात समाधान आहे.

गुरू : पण तुझाही मी नाही का?

प्रतिभा : ओ - नो *(तोंड ओंजळीत लपवते. पण हुंदका आवरत नाही)*

गुरू : तुझं रडणं सगळं सांगून गेलंय मला, अशी दूर का राहातेस? मला

स्पर्शही करू देत नाहीस? का?

प्रतिभा : एकदा जे संपवलं ते नातं मला पुन्हा नाही जोडायचं. खूप त्रास होईल मला. खूप.

गुरू : म्हणजेच अजूनही तूं मला माणूस म्हणून माफ केलं नाहीस प्रतिभा... बस, अब्बास के खातीर तू फिल्म कर रही है.

प्रतिभा : मला खरं तर हे बोलायचं नाहीय, पण आता बोलते. गुरू, अरे कधी तरी स्वत: पलीकडे पाहायला शीक. कलावंताला इगो हवा, पण हे अती होतंय. तुला दु:ख होतं, तुला वेदना होतात. तू खूप हळवा आहेस... कबूल.. पण मीही पत्थरदिल नाही... मीही स्वत:ला सावरते आणि भावना प्रकट करत नाही. तुझ्यापासून दूर होणं मलाही सोपं नव्हतं, नाहीय. पण तरीही तुझा हा क्लासिक ठरणारा सिनेमा मनावर धोंडा ठेवून करतेय ते तुझ्यातल्या कलावंताला आजही तेवढीच निस्सीम पूजते म्हणून. पण - म्हणून...

गुरू : पण म्हणून माझ्यातल्या अप्पलपोट्या आणि आत्मकेंद्री माणसाला का माफ करावं असंच ना?... खरं तर शूटींगचे गेले आठ दिवस मी एका आशेवर जगत होतो... तू मला जवळ घेशील, हृदयाशी धरशील...

प्रतिभा : *(चेहरा पिळवटलेला, मूक आक्रंदन)* नाही - गुरू - पुन्हा असं काही बोलू नकोस. मी - मी विरघळून जाईन - परत स्वत:ला सावरू शकणार नाही मी - मी प्रेरणेला वचन दिलंय - मी पुन्हा कधीच गुरूच्या जीवनात येणार नाही म्हणून...

गुरू : *(उसळत)* मग कलाजीवनात तरी का आलीस? आपलं पर्सनल लाईफ आणि कला एकमेकात मिसळलेली आहे, हे विसरलीस?

प्रतिभा : ती - ती माझी चूक झाली. कलावंत म्हणून. आणि प्लीज, तूही ती करू नकोस ... मला जाऊ दे..

गुरू : ठीक आहे... हा - हा माझा शेवटचा प्रयत्न होता प्रतिभा - मी हरलो ... पण एकदाच - मला जवळ घे - क्षणभरच. मग जा... पुन्हा असा हट्ट नाही धरणार... *(प्रतिभा त्याच्या जवळ जाते.. त्याचे हात हातात घेते, मग त्याचा चेहरा ओंजळीत धरते व डोळ्यात पाहाते. हुंदका देत प्रतिभा निघून जाते. गुरू विमनस्कपणे क्षणभर ती गेलेल्या दिशेकडे पाहात राहतो. (क्षणभर अंधार. पुन्हा रंगमंच उजळतो तेव्हा गुरू आणि प्रेरणा)*

गुरू : प्रेरणा.. केवढा दर्द ओतलास आज गाण्यात.. आणि त्या दर्दला किशोर स्टाईलनं हमिंगची अनोखी लाजवाब जोड... स्टँडिग ओव्हेशन... *(टाळ्या वाजवत उठतो)*

प्रेरणा : *(कडवट हसत)* मनातला दर्द गाण्यात उतरला एवढंच... शैलेंद्र वेचक शब्दात मनाच्या आरपार घुसतो... *(गुणगुणते, शेर पेश करण्याचा अंदाज)*

**पास है पर तूं साथ नहीं।**
**मैफील का दौर है, पर वो बात नहीं।**
**उदासी का आलम और चाँद की रात नहीं।**
**मौत आती नहीं और जिंदगी के जजबात नहीं।**
**कैसे कोई जीये जब तेरा हाथ में हाथ नहीं।**
**कैसे गुजारे लंबे दिन, रात कटती नहीं।**
**चुप्पी नहीं पर मुकम्मलसी बात नहीं।**
**विरह की उमरकैद और थोडी भी राहत नहीं।**

गुरू : खरंच सैतान आहे हा शायर... हे हाले दिल उसने मुझे देखकर गीत में बांधा, लेकिन दर्द तेरी आवाजसे निकला... ऐकताना प्रत्येक वेळी डोळ्यात पाणी येतं...

प्रेरणा : हां गुरू,... हा दर्द, ओल्या जखमाच तर कलेची बीजं असतात... ह्या जखमा प्रेक्षकांना कलात्मक आनंद देतात, पण त्या सादर करणाऱ्या कलावंताला दु:खाच्या सागरात डुंबावं लागतं.

गुरू : बडी पते की बात कही तू ने प्रेरणा.

प्रेरणा : *(नि:श्वास सोडून)* आता थोडे स्विच ऑफ होऊ या -

गुरू : कसं शक्य आहे? मला नाही जमत असं ऑन - ऑफ होणं.

प्रेरणा : *(हसून)* ते अस्सल कलावंताचं लक्षण आहे गुरू. और तू तो गजबका आर्टिस्ट है... तुझे ये बात मै बताऊँ? ताज्जुब है... *(जोरजोरात हसत राहाते)*

गुरू : मला कळतं गं, पण अलीकडे या दोन वर्षात मी फार गोंधळतोय. माझी संभ्रमित अवस्था संपत नाही.

प्रेरणा : कलाकारानं माणूसपण आणि कलावंतपणाची गल्लत करता कामा नये. ती चूक तू हल्ली करतोयस. जेथं माणसासारखं वागायला हवं, तिथं कलावंत जागवत मेलोड्रामॅटिक रिॲक्शन देतोस आणि कलावंत म्हणून अभिनय करताना माणसासारखं स्वैर भावनिक होतोस - कलावंताला भावना प्रकट करतानाही अंतर्यामी तटस्थता बाळगावी लागते हे विसरू नकोस. तुझी कात्रीत सापडलेल्या सुपारीसारखी अवस्था झालीय, त्या कात्रीची दोन पाती म्हणजे तुझं कलावंत आणि माणूसपण... त्यात तू कातरून निघतोयस, गुरू सावर स्वत:ला, नाही तर संपून जाशील...

गुरू : *(भावनावश होत)* होय प्रेरणा, मला सावरायलाच हवं - पण त्यासाठी

तू हवीस - अगदी जवळ...

प्रेरणा : गुरू, मी आहे तुझ्यासोबत...

गुरू : पण जवळ नाहीस... दुसऱ्या बेडरूममध्ये झोपतेस.. का? का? हेच तुझं मला सावरणं आहे? मला तूं हवी आहेस... मनानं आणि शरीरानं...

प्रेरणा : ते - ते अजूनही मला जमत नाही - कारण - कारण तू माझ्या एकट्याचा आजही नाहीस.

गुरू : अगं, मी प्रतिभेला स्पर्शही केला नाही ती दोन वर्षापूर्वी वेगळी झाल्यापासून. ती कॅमेरा ऑफ होताच स्पर्शही करू देत नाही.

प्रेरणा : हा तिचा ग्रेटनेस आहे. मला दिलेलं वचन पाळतेय. पण गुरू - अजूनही तुला ती हवी आहे. बेडरूममध्येही.

गुरू : ओ माय गॉड,... *(चेहरा हातात लपवीत)* शैलेंद्रप्रमाणं तूही सैतान आहेस.. एवढं मनकवडं असू नये माणसानं. मी तोंडानं नाही म्हटलं तरी माझा चेहरा मला दगा देतो.

प्रेरणा : मी खरं तेच बोलले ना?

गुरू : मी - मी कबूल करतो.

प्रेरणा : मी मागे तुला म्हणाले होते - सुरांच्या दुनियेत मी प्रत्येक तान शुद्ध सच्ची लवते, तिथं मला भेसळ खपत नाही गुरू.

गुरू : तुझ्या या कॉम्प्रमाईज न करणाच्या वृत्तीचा अभिमान वाटतो... पण तेवढीच तकलीफही होते...

प्रेरणा : मलाही का कमी होते? पण मन घट्ट करत स्वत:ला सावरलं पाहिजे... तू. मनमानी करायला मुखत्यार नाहीस. तुझ्यावर फिल्म इंडस्ट्रीचं कर्ज आहे. ते फिल्म बनवून अदा करणं तुझं परम कर्तव्य आहे आणि त्यासाठी तुला मी पूर्णपणे साथ देतेय.

गुरू : *(सुस्कारा टाकीत, हताश स्वरात)* तेच पुन्हा - तूही माझ्याजवळ आलीस ती कलावंताला माफ करत, पण माणूस म्हणून अजूनही मला तू माफ केलं नाहीस.

प्रेरणा : माझ्यातलं स्त्रीत्व फार दुखावलंस तू. इतकं की, माझ्यातलं माणूसपण कितीतरी कमी झालंय.. त्याचं मला दु:ख नाही, कारण त्याचमुळे शुद्ध वेदना बोथट होतात. मी माझ्यातली गायिका मरू दिली नाही कटाक्षानं, लेकिन मेरे अंदर का आदमी जितना जल्दी खत्म हो जाये, उतना अच्छा है मेरे लिए.

गुरू : माझं माणूसपण पण तीव्र निखळ आहे... ते मला मारता येत नाही जीते जी... त्या माणसाला जरा जवळ कर प्रेरणा... त्याला तुझा स्पर्श हवाय,

निकटता हवीय...

प्रेरणा : जो मुमकिन नही फिलहाल, वो क्यों मांगते हो? मला अजून त्यासाठी वेळ हवाय.

गुरू : तब तक शायद फिल्म खत्म हो जायेगी - फिर न जाने तू अलग हो गयी तो?

प्रेरणा : गुरू... गुरू... काय उत्तर देऊ तुझ्या या प्रश्नाला? प्रेमात मी एकनिष्ठ आहे. आणि तीच अपेक्षा तुझ्यापासून ठेवली होती... पण तुम्हा पुरुषांना एकीचं होऊन जीवनभर राहाता येत नाही. मीही असंच वागले असते तर तू काय केलं असतंस गुरू?

*(प्रेरणा बारपाशी जाते. पेग तयार करून पीत राहाते. गुरू आणि प्रेरणा फक्त एकमेकांकडे बघत राहातात. अंधार)*

*(पुन्हा जेव्हा रंगमंच प्रकाशतो, तेव्हा अब्बास व गुरू दिसतात.)*

गुरू : नाही यार... कुछ नही जम रहा है... मला वाटत नाही, मी हा पिक्चर पूर्ण करू शकेन.

अब्बास : गुरू... बडे अजीब किस्म का आदमी है तू... एवढी चांगली पटकथा आपण तयार केली आहे. पुन्हा उत्तम गाणी, उत्तम संगीत आहे. अप्रतिम ड्रीम स्टारकास्ट आहे. कमी आहे ती फक्त तुझा सूर गवसण्याची...

गुरू : तोच तर तारा तुटल्याप्रमाणे बद्ध झाला आहे. पिक्चरचं सारं काही यथायोग्य आहे.. माझ्या जागी तूही हा सिनेमा दिग्दर्शित करशील तर ग्रेट होशील.

अब्बास : पण तुझा परीसस्पर्श हवा त्यासाठी.

गुरू : *(विषण्ण हसत)* लोखंडाला कशाला परीस म्हणतोस अब्बास... यातलं परीसत्व हरवलंय रे.

अब्बास : गुरू... यापूर्वीही याहीपेक्षा जास्त टेन्स आणि डिप्रेस्ड असताना तू सगळं विसरून स्वत:ला चित्रपट निर्मितीमध्ये झोकून देत होतास... वेळी काय झालंय तुला? प्रेरणा आणि प्रतिभा किती समजुतीनं वागत आहेत. तुला सांभाळत आहेत...

गुरू : दोघींना मानलं पाहिजे. यार... खरंच त्या दोघी किती ग्रेट आहेत... स्वत:ची परवड सहन करायची, स्त्री म्हणून होणारा अपमान गिळायचा... एवढा मी त्यांच्या प्रेमाला लायक नाहीय रे...

अब्बास : असं स्वत:ला कमी समजायचं काही कारण नाही... तू आम्हा सर्वांपेक्षा मोठा जीनिअस कलावंत आहेस. आम्हा तिघांनाही तू तेवढाच हवा आहेस हे कधीही विसरू नकोस...

गुरू : त्याचीच तर भीती वाटते.. दडपण असेल तर याचं आहे की, तुम्ही मला

माफ केलं ते माणूस म्हणून नव्हे तर कलावंत म्हणून... माझ्यातलं माणूसपण त्यामुळे कायमच शरमिंदं झालं आहे... त्याला सतत अपराधी वाटत आहे... त्यामुळे कदाचित मला डिरेक्शनमध्ये झोकून देता येत नाहीये...

अब्बास : धिस इज टू मच.. तू ठार वेडा झालेला आहेस... का हाही तुझा पुरुषी कलावंताचा इगो आहे?... आपल्या जवळच्यांना घायाळ करून तडफडवणं आणि सॅडिस्ट वृतीनं त्याचा आनंद उपभोगणं...

गुरू : अब्बास... आता वेडा मी, का तू... *(घायाळ स्वर)* तू माझा इतक्या जवळचा मित्र... कॅरेक्टरच्या छोट्यात छोट्या भावनासुद्धा समर्थपणे टिपणारा लेखक तू.. तू असं म्हणावसं?

अब्बास : हो... मीच म्हणतोय गुरू. तुला सगळं काही सुरळीत चाललेलं कदाचित रुचत नाही. तुझ्या कॉम्प्लेक्स मनाला सतत दु:ख, वेदना, तडफड हवी असते कुरवाळायला... दु:खाची नशा चढते तुम्हाला... वेदनेत कुठे तरी सुखाची अनुभूती जाणवते तुम्हाला.

गुरू : सचमुच तू दिलसे बोलता है, इसीलिये गुस्सा नही करूंगा *(विचारात मग्न)* अब्बास, तू म्हणतोस ते काही अंशी का होईना पटतं... मला खरंच सुख सहन नाही होत,... कारण त्याची सवय नाही... कलावंताला कदाचित दु:खाचीच नशा चढते... तीच त्याच्या कलानिर्मितीची प्रेरणा असते का रे?

अब्बास : गुरू... आज मला तुझ्याकडून सरळ उत्तर हवंय... आपल्या पिक्चरचं काय? किती दिवस असे वाया घालवायचे? प्रतिभेनं या फिल्मसाठी दोन-दोन बिगबजेट पिक्चर सोडले आहेत... त्याही डेट्स तू वाया घालवणार?

गुरू : कसं सांगू यार तुला.. शूटींगच्या पहिल्या दिवसापासून मला जाणवतंय... आय... आय... कांट डिरेक्ट धिस फिल्म... एक माणूस म्हणून मी फार संभ्रमित आहे. त्यामुळे ॲक्टिंग करताना मी फार कॉन्शस असतो मित्रा - त्यामुळे नॅचरल अभिनय होत नाही. म्हणून मला सिनेमा करावासा वाटत नाही.

अब्बास : गुरू, थोडं स्वत:ला सावर. दोन वर्षापूर्वी प्रतिभा तुझ्या जीवनातून निघून गेली, तेव्हा तू स्वत:ला सावरलं होतसंच की - आता ती फक्त सिनेमासाठी काम करायला आलीय असं समज आणि प्रोफेशनल होत ॲक्टिंग कर.

गुरू : तेच तर जमत नाही. मला समजतं, ये ठीक नहीं, फिर भी ए कंबख्त दिल कहाँ मानता है.

अब्बास : आता मात्र तू माणूस म्हणूनही स्वार्थी, अप्पलपोटा झाला आहेस. गुरू,

तुला मी जीनिअस कलावंत म्हणत आलोय ते सगळं खोटं समजायचं?

गुरू : महापुरुषांना देवत्व बहाल करून, त्यांचे देव्हारे उभारून, पुतळे करून त्यांची माणूस म्हणून हत्या करायची, हा समाजाचा जुना रीतीरिवाज आहे... अब्बास, तूही माझ्यातल्या माणसाकडे साफ दुर्लक्ष करणार आहेस?... माणूस म्हणून मीही स्वार्थी... भेकड, आप्पलपोटा थोडाफार असेन, नव्हे आहेच. माझे पायही मातीचे आहेत... एक पुरुष म्हणून मीही इगोइस्टिक आहे. भ्रमरवृत्तीचा आणि शिकारीप्रवृत्तीचा पण असेन... माझ्या वासना, माझ्या वृत्ती या माझ्या आहेत, माझ्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य घटक आहेत, आणि मी माझ्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे जगतोय, तो माझा अधिकार नाही?

अब्बास : फार कठीण सवाल आहे गुरू. ह्याचं उत्तर मला पूर्णपणे नाही माहीत. पण माणसे मर्त्य असतात, कला अमर असते हेच सत्य आहे.. शो मस्ट गो ऑन ॲट एनी कॉस्ट... मी तुझा कलावंत म्हणून मृत्यू होणार असेल तर नाही सहन करू शकत. *(अब्बास निघून जातो)*

गुरू : तू म्हणतोयस तेही खरं आहे अब्बास. आता मला हे लख्खपणे जाणवतंय की, माझ्याच मनोरचनेचा हा दोष आहे. त्यात दुर्बलता, परावलंबीपणा, आत्मकेंद्रितपणा हीच तत्त्वं मिसळली आहेत. का म्हणून मीच एकट्यानं कलावंत असण्याची प्रिव्हिलेजेस मागावीत? अब्बाससुद्धा एक समर्थ कलाकार आहे. पण तो कुठे डिमांडिंग आहे? प्रेरणा आणि प्रतिभासुद्धा ह्या सिनेमाच्या निमित्तानं परत आल्याच की माझ्याकडे? मग मीच का असा दुभंगतोय? दोन्ही डगरी सांभाळतांना माझाच का तोल जातोय?

*(प्रतिभा रंगमंचावर प्रवेश करते.)*

प्रतिभा : गुरू... काय ऐकतेय मी हे? आता तूच माघार घेत आहेस?

गुरू : तू काय... प्रेरणा काय, तुम्ही समर्थ आहात.. कणखर आहात. मी मात्र फार दुबळा आहे..

प्रतिभा : हा दुबळेपणा आपणच कमी करायचा असतो. मनाशी निश्चय करून कामात स्वतःला झोकून दिलं की आपला कमकुवतपणा कमी होतो, हा माझा अनुभव आहे. तुझ्यापासून वेगळी झाल्यानंतर भीती आणि दडपण ह्यावर मात करत मी हा रोल करतेय. आता हा पिक्चर तू पूर्ण करायला हवास गुरू. माझ्यासाठी. भले या पिक्चरनंतर मला एकही सिनेमा नाही मिळाला तरी चालेल. पण गुरू, माझा असा सूड घेऊ नकोस... हा पिक्चर अर्धवट सोडू नकोस...

गुरू : तुझ्या या अशा अपेक्षांनी माझं दडपण वाढतयं... माझी बेचैनी धारदार

होतेय प्रतिभा,... एक माणूस म्हणून कोलमडून पडलो असताना कलावंत म्हणून कसा उभारी घेऊ?

प्रतिभा : सांग... मी काय करू म्हणजे तुझी ही कन्फ्युजन संपेल... तुझ्यातल्या कलावंत बळ मिळेल?

गुरू : मी पुन्हा तुला हे सांगायला हवं?

प्रतिभा : *(धक्का बसून)* गुरू... जे शक्य नाही... जे निव्वळ अशक्य आहे. त्याचीच का इच्छा धरतो आहेस? शक्य नाही...

गुरू : का, प्रतिभा का? ... मी आजही तेवढ्यात उत्कटतेने तुझ्यावर प्रेम करतो...

प्रतिभा : मी नाही करीत?... तरीही हे शक्य नाही... प्रेरणाशी प्रतारणा करीत आणि स्वत:च स्त्रीत्व अपमानित करीत विदी मनानं छिन्न- भिन्न अवस्थेत कशी मी तुझ्याशी एकरूप होऊ? खऱ्या प्रेमात मनाची एकरूपता पुरेशी नाही?... त्यात शरीरमाध्यमातून वासनेचा अंश का ओतायचा? मी आता त्या अवस्थेपलीकडे गेले आहे. (हुंदका) मला बोलवत नाही गुरू... मी जाते... पिक्चर करणार असशील तर अर्ध्या रात्री मी येईन, नाही तर खुदा हाफीज... *(आवेगाने निघून जाते अंधार)*

*(पुन्हा प्रकाश येतो तेव्हा गुरू आणि प्रेरणा रंगमंचावर)*

गुरू : मी हा सिनेमाच बंद करून टाकतोय. तुम्हाला भेटीचं कारण नको.

प्रेरणा : असं मला, प्रतिभा आणि अब्बास भाईजानला इमोशनल ब्लॅकमेल करू नकोस. ही फिल्म न करणं हा सर्वस्वी तुझा निर्णय असणार आहे गुरू.

गुरू : मला समजतंच नाही प्रेरणा, मी असा का वागतोय ते.

प्रेरणा : कारण अगदी लहानपणापासून दु:ख कुरवाळत, मनाला लहान- सहान बाबींवर घायाळ करीत जगायची सवय लागली आहे गुरू तुला.. त्याचा तू कलेसाठी मोठ्या ताकदीनं उपयोगही करून घेतला आहेस. पण त्याचं रूपांतर आता ऑब्सेशनमध्ये झालं आहे... त्यामुळे असा ठायीठायी अडखळतो आहेत...

गुरू : *(कडवट स्वर... उपहासाने हसत)* किती व्यवस्थितपणे तू काय, प्रतिभा काय किंवा हा आमचा परममित्र अब्बास काय... माझ्या मनाचं सुंदर पोस्टमार्टेम करता... आता एकदा तिघे एकत्र बसून त्याचा छानपैकी अहवाल तयार करा. फ्राईडनंतर तुमचंच नाव सायकिआट्रीत अजरामर होईल... थँक्स ए लॉट.. तुम्ही सगळ्यांनी मलाच माझ्यासमोर नग्न उभं केल्याबद्दल...

प्रेरणा : तुला ठामपणे निर्णय कुठं घेतो येतो? तू देंवदास - हॅम्लेटच्या जातकुळीचा...

स्वत: तडफडायचं आणि इतरांनाही. आय कान्ट लिव्ह विथ यू इन सच सरकम्स्टन्सेस गुरू.

गुरू : *(धक्का बसल्याप्रमाणे)* तू... तूही मला सोडून जाणार?

प्रेरणा : हो. कायमचं. आणि आता हा निर्णयही शेवटचाच.

गुरू : इतकं पण प्रखर व्यक्तिमत्त्व असू नये माणसाचं... स्वत:बरोबर इतरांनाही घायाळ करणारं.

प्रेरणा : *(हसत)* जाऊ दे गुरू... बात निकली तो दूर तक निकल आयेगी. मी आज ना उद्या जाणार हे नक्की. पिक्चर धडपणे करणार असशील तर तोवर थांबेन, पण नो फर्दर.

गुरू : माझ्यात तुला रोखायचं सामर्थ्य नाही. पण तू गेलीस तर मी फार काळ नसेन प्रेरणा.

प्रेरणा : तुला मरणाचं बोलायला आवडतं. पण मलाही कुठे जगण्यात स्वारस्य उरलंय? *(किंचित हसते. मग विचारपूर्वक)* किंवा असं पण होईल. तू एकटेपणामुळं कणखर पण होशील. आज मी प्रतिभाला वचनातून मुक्त केलंय. तिला आपलं कर. मी केव्हाही घटस्फोटाच्या कागदावर सही करायला तयार आहे. बस, एकच कर, माझ्यासाठी तुझ्यातल्या देवदासला मार. हॅम्लेटला हद्दपार कर. तरच जगू शकशील, सिनेमा करू शकशील. गॉड ब्लेस यू... बाय. *(हुंदका देत निघून जाते.)*

*(अंधार)*

प्रतिभा : *(प्रेरणेकडे पाहत)* मी गुरूला माझ्या आयुष्यातून वेगळं केलं ते तुला दिलेलं वचन पाळण्यासाठी, पण तू का सोडलंस त्याला?

प्रेरणा : त्यानं जगावं म्हणून. त्याला मी तुझ्याशी लग्न करण्याचा सल्ला दिला होता. आणि डिवोर्सची तयारीसुद्धा दाखवली होती.

प्रतिभा : *(धक्का बसून)* काय? तुझ्याशिवाय माझ्यासंगतीत तो क्षणभरही स्वस्थ जगू शकला नसता. गुरूच्या सान्निध्यात मी स्वत:ला प्रेरणेच्या रूपात बसवायचा प्रयत्न करीत होते. कदाचित तूही त्याला बांधून ठेवण्यासाठी प्रतिभा व्हायचा प्रयत्न केला असशील... यामुळे गुरू दुभंगत होत केला असं मला कधीकधी वाटतं.

अब्बास : आदर्श असणं.. आदर्श जगणं हे समाजासाठी नेहमीच हितकारक असतं, पण माणसाचं मन चंचल असतं.. विशेष करून कलावंतांचं. त्याला या नीतिनियमात नेहमीच बांधून ठेवता येत नाही... तसा प्रयत्न झाला किंवा केला तर कदाचित तो माणूस म्हणून चांगला ठरेलही. पण कलावंत म्हणून त्याची गळचेपी होईल... सवाल मग हा पैदा होतो की, कलावंतासाठी

कला मोठी, की त्याचं समाजाच्या नीतिनियमाच्या चौकटीत वागणं?

प्रेरणा : अर्थात कलाच मोठी भाईजान... कारण ती इतरांचं मन समृद्ध, सुजाणकरते...

प्रतिभा : पण त्या कलावंताला आणि त्याच्याशी बांधल्या गेलेल्यांना मात्र वेदनेचा जळता निखाराच आजन्म पदरी बाळगावा लागतो.

अब्बास : *(विचारपूर्वक)* गुरूमध्ये एक प्रकारची व्हिक्टिमहूड प्रवृत्ती होती; त्यामुळे त्याला कधी तू कारण असणार, कधी प्रेरणा, कधी इंडस्ट्री, तर कधी प्रेक्षक... ज्यांनी त्याचा क्लासिक सिनेमा नाकारला. (दोघी त्याच्याकडे शून्य नजरेनं पाहात आहेत) गुरूला जाणण्याचा जन्मभराचा ध्यास संपत नाही हेच खरं... मेरी जहन में आज भी गुरू की आखरी रात जिंदा है... उसे भूल नही सकता...

**रहनेंको सदा दहारमें आता नहीं कोई**
**तुम जैसे गये जैसा जाता नहीं कोई**
**एक बार खुद मौतभी घबरा गई होगी**
**यूँ मौत को सीनेसे लगाता नहीं कोई**
**डरता हूँ कही खुश्क न हो जाय समुंदीं**
**राख अपनी कोई आ़प बहाता नहीं कोई**
**साकी से गिला था तुम्ही मयखानेसे शिकवा**
**अब झहरेसें भी प्यास बुझाता नहीं कोई**
**माना की उजालोंने तुम्हे दाग दिये थे**
**बेरात ढले शमा बुझाता नहीं कोई**

*(हळूहळू प्रकाश कमी होत जातो. गुरूवर प्रकाश येत जातो.)*


गुरू : ये निद्रे, ये. गेले तीन दिवस... तीन रात्री तुझी आराधना केल्यावर आता कुठे माझ्यावर प्रसन्न होत आहेस. *(ग्लास पाहात व घोट घेत)* तेही या व्हिस्की कांपोजच्या गोळ्यांच्या कॉकटेलच्या संगतीत. वा निद्रादेवी, तूही या गुरूप्रमाणे नशाबाज निघाली *(खदखदून हसत)* वा.. क्या बात है... क्या बात है? काय चमकदार कल्पना आहे.. आता. या क्षणी अब्बास हवा होता जवळ, त्यानं ही कल्पना टिपून घेतली असती आणि कुठेतरी लेखनात त्याचा वापर केला असता... *(दीर्घ सुस्कारा)* अब्बास, मेरे यार, वादा करके भी अबतक नही आया तू... *(घड्याळ पाहात)* सुबह होने को बस, कुछ पलों की देरी है... यार, तुझ्याविना इथं मी क्षणभरही समाधानानं जगू शकलो नाही. तिथं त्या जहन्नुमध्ये कसा जगेन? *(विचित्र कडवट हास्य)* जहन्नुम आणि जन्नत, आजवर कधी विचार केला नाही. पण या अस्वस्थ धुमसणाऱ्या छळवादी गुरूला का जन्नत मिळेल? या उण्यापुऱ्या

चाळीस वर्षाच्या जिंदगानीमध्ये इस बैचेन रूहने जो महसूस किया है... उससे जहन्नूम भी बदतर नही हो सकता... नाही... नाही, माझ्या वाट्याला येणार आहे तो फक्त काळा भिन्न अंधार... कधी न संपणारं काळोख पर्व. मला भीती वाटते त्या प्रवासाची.. पण, पण मला त्या प्रवासाला निघालं पाहिजे... नव्हे जाणं भाग आहे... मी.. मी.. ते आपल्या हातांनी ओढवून घेतलं आहे. बस्, बस्, बस्, आय ॲम फेड अप् वुईथ धिस लोनली लाईफ ॲण्ड माय... सेन्सिटिव्ह माईंड, *(क्षणभर थांबून)* विसरलास गुरू... या एकाकी जीवन अवस्थ, सेन्सिटिव्ह माईंडमधूनच कलेचा जन्म होतो... जितका प्रखर... जितका प्रखर अस्वस्थ आत्मा.. तेवढीच जिवंत, सर्वव्यापी आणि अजरामर कला. हँ... किती विचित्र बाब आहे नाही... या कलेसाठी. स्वत:ला आणि आपल्या माणसांना दुखवावं लागलं... रक्तबंबाळ करावं लागलं. मी - मी ते केलं... आणि कलावंत म्हणून ते गरजेचं होतं. पण पण माझा स्वर... माझी प्रेरणा; माझं कलाजीवन - माझी प्रतिभा... या दोघींना मात्र मी या जिंदगानीमध्येच जहन्नुमपेक्षा बदतर जिंदगी बहाल केली. मला तुम्हा दोघींची एकदा क्षमा मागायची आहे.. तेवढं राहूनच गेलं... आता आपल्या हातानं स्वत:चं जीवन संपवताना ती एक रुखरुख राहणार... पण या क्षणी तुम्ही दोघी मला भेटायला हव्या होतात. या क्षणी एका डोळ्यात प्रेरणा तरळते आहे, दुसऱ्या डोळ्यात प्रतिभा. त्या दोघी एकमेकांत कशा विरघळून जात एक होत आहेत... हा भ्रम तर नाही?... पण तो किती सुखद आहे. अफसोस... अब क्या फायदा इसका? *(डोळे पुन्हा पुसत)* आणि तो माझा मित्र अब्बास, त्याला तर मी वेळीअवेळी परेशान केलं... उद्या सकाळी मला मेलेलं जेव्हा तो पाहील, तेव्हा तो किती दु:खी होईल... माफ कर मित्रा... तुला आजवर दुसरं काय दिलं आहे? पुर्नजन्म असेल आणि मला पुन्हा मनुष्यजन्म मिळणार असेल तर तुझ्या पोटी जन्म हवा अब्बास... तुझी सेवा करून तुझ्या ऋणातून मुक्त होण्यासाठी. आज या अंतिम घडीला तूही बरोबर नाहीस... मेरा कोई अपना नही ... ठीक आहे.. हीच जर माझी नियती असेल.. तर कमॉन मि. डेथ. कमॉन.

*(अचानक तो थांबतो. तडफडत खाली कोसळतो.)*

**पडदा**

# प्रवासवर्णन



# १. चिंब चिंब चेरापुंजी

'खुबलेई'

जन्मभूमी केरळ, पण भारतीय प्रशासन सेवेमध्ये मेघालय केडर मिळालेले आता मेघालयाचे पर्यटन सचिव - त्यांनी निरोप देताना म्हटलं 'खूबलेई...'

हा शब्द कालपासून मेघालयात कानावर सतत पडत होता आणि रुंजी घालत होता. किती नादमर्यादा, संगीतामध्ये भिजलेला शब्द होता, जो खासी लोक अभिवादनासाठी वापरत. आम्ही अभावितपणे नमस्ते म्हटलं, की प्रतिपादन यायचं ते 'खूबलेई...'

मेघालयाची राजधानी असलेल्या शिलाँगमध्ये चर्च पाहताना पाद्रीबाबानं आशीर्वाद देतानाही हेच म्हटलं होतं, 'खूबलेई, - गॉड ब्लेस यू' या अर्थानं!

मेघालयाच्या पर्यटन सचिवांचा निरोप घेऊन आम्ही टॅक्सीनं निघालो होतो ते चेरापुंजी पाहण्यासाठी. त्यासाठी त्यांची शुभकामना होती. 'खूबलेई...'

वळणावळणाचा नागमोडी रस्ता, डोळ्यांना सुखावणारी चहूबाजूंची रेशमी हिरवळ. शिलाँगपेक्षा कमी उंचीवर चेरापुंजी असल्यामुळे काहीसा उताराचा रस्ता. प्रसन्न, खेळकर आणि चैतन्यमय हवा... त्यामुळे प्रवासाचा छान मूड....

आम्हाला पाहायचं होत जगातलं सर्वात जास्त भिजणारं गाव - चेरापुंजी. लहानपणी भूगोल अभ्यासताना पक्कं ध्यानात राहिलेलं गाव. दरवर्षी सरासरीने १२०६३ मिलिमीटर म्हणजे सुमारे ४८० इंच पाऊस पडणारं गाव.

मेघालयाच्या पर्यटन सचिवांनी दिलेल्या रंजक माहितीमुळे मनात उत्सुकता होती. केव्हा एकदा चेरापुंजी येईल असं झालं होतं!

"फ्रेंडस्", आमच्या सात आय. ए. एस. ऑफिसर्सच्या मसूरी प्रशिक्षणाचा भाग म्हणून भारत दर्शनासाठी उत्तर - पूर्व भागात प्रवास करणाऱ्या गटाला संबंधित पर्यटन सचिव म्हणाले, "मला हा प्रश्न अनेकजण विचारतात की, चेरापुंजीला कोणकोणते टूरिस्ट स्पॉट्स आहेत पाहण्याजोगे? मी असं म्हणेन की पूर्ण शहर. तिथली 'आगे हवा' आणि स्थानिक खासी माणसे - सारं काही पाहण्याजोगं आहे. मुख्य म्हणजे प्रवाशांनी पाहण्यासोबत महसूस करायचं असतं ते गाव, ती माणसं आणि त्यांचं

# १. चिंब चिंब चेरापुंजी

## 'खुबलेई'

जन्मभूमी केरळ, पण भारतीय प्रशासन सेवेमध्ये मेघालय केडर मिळालेले आता मेघालयाचे पर्यटन सचिव - त्यांनी निरोप देताना म्हटलं 'खूबलेई...'

हा शब्द कालपासून मेघालयात कानावर सतत पडत होता आणि रुंजी घालत होता. किती नादमर्यादा, संगीतामध्ये भिजलेला शब्द होता, जो खासी लोक अभिवादनासाठी वापरत. आम्ही अभावितपणे नमस्ते म्हटलं, की प्रतिपादन यायचं ते 'खूबलेई...'

मेघालयाची राजधानी असलेल्या शिलाँगमध्ये चर्च पाहताना पाद्रीबाबानं आशीर्वाद देतानाही हेच म्हटलं होतं, 'खूबलेई, - गॉड ब्लेस यू' या अर्थानं!

मेघालयाच्या पर्यटन सचिवांचा निरोप घेऊन आम्ही टॅक्सीनं निघालो होतो ते चेरापुंजी पाहण्यासाठी. त्यासाठी त्यांची शुभकामना होती. 'खूबलेई...'

वळणावळणाचा नागमोडी रस्ता, डोळ्यांना सुखावणारी चहूबाजूंची रेशमी हिरवळ. शिलाँगपेक्षा कमी उंचीवर चेरापुंजी असल्यामुळे काहीसा उताराचा रस्ता. प्रसन्न, खेळकर आणि चैतन्यमय हवा... त्यामुळे प्रवासाचा छान मूड....

आम्हाला पाहायचं होत जगातलं सर्वात जास्त भिजणारं गाव - चेरापुंजी. लहानपणी भूगोल अभ्यासताना पक्कं ध्यानात राहिलेलं गाव. दरवर्षी सरासरीने १२०६३ मिलिमीटर म्हणजे सुमारे ४८० इंच पाऊस पडणारं गाव.

मेघालयाच्या पर्यटन सचिवांनी दिलेल्या रंजक माहितीमुळे मनात उत्सुकता होती. केव्हा एकदा चेरापुंजी येईल असं झालं होतं!

"फ्रेंडस्", आमच्या सात आय. ए. एस. ऑफिसर्सच्या मसूरी प्रशिक्षणाचा भाग म्हणून भारत दर्शनासाठी उत्तर - पूर्व भागात प्रवास करणाऱ्या गटाला संबंधित पर्यटन सचिव म्हणाले, "मला हा प्रश्न अनेकजण विचारतात की, चेरापुंजीला कोणकोणते टूरिस्ट स्पॉट्स आहेत पाहण्याजोगे? मी असं म्हणेन की पूर्ण शहर. तिथली 'आगे हवा' आणि स्थानिक खासी माणसे - सारं काही पाहण्याजोगं आहे. मुख्य म्हणजे प्रवाशांनी पाहण्यासोबत महसूस करायचं असतं ते गाव, ती माणसं आणि त्यांचं

जगणं. आय होप, यू विल एंजॉय, चेरापुंजी बाय, ॲन ऑल टुगेदर डिफरंट एक्सपिरिअन्स.''

आमच्या सोबतीला वाटाड्या होता. शिलाँग शहर ज्या इस्ट खासी हिल डिस्ट्रिक्ट मुख्यालय आहे, त्या जिल्ह्याच्या कलेक्टर कचेरीमधला अन्न व नागरी पुरवठा विभागाचा सब-इन्स्पेक्टर जेटस्टार वारजी... खांसी जमातीचा, ख्रिश्चन, पन्नाशीच्या पुढंच असावा, पण उत्साही आणि बोलका. आमचे संभाषण झालं ते इंग्रजीतून. कारण मेघालयाची अधिकृत शासकीय भाषा इंग्रजीच आहे. आणि इथं बहुसंख्य ख्रिश्चन झालेले तरीही अंतर्बाह्य खासी गारो किंवा जेतीया या भूमिपुत्री आदिवासी जमातीचे.

''सर, दोन दिवसापूर्वीच चेरापुंजीला तुफान पाऊस झाला. त्यामुळे तुमच्या दुसऱ्या आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या ग्रुपला मी घेऊन आलो होतो. त्यांना काही पाहता आलं नाही. पण आज वातावरण स्वच्छ आहे. तुम्हाला धबधबा, गुंफा व पार्क पाहायला नक्कीच मिळतील. डोंट वरी!''

''आम्हाला ते सारं पाहायचं तर आहेच, पण इथला पाऊसही अनुभवायचा आहे...''

''सर - तुम्ही टूरिस्ट म्हणून बोलत आहात. जेव्हा सलग तुफान पाऊस पडतो, दिवस दिवस बाहेर पडता येत नाही. तेव्हा पाऊस हा भयप्रद व प्रलयकारी वाटतो. मी इथं तीन वर्षे गोडाऊन कीपर होतो. मी पावसाचं भयंकर रूप पाहिलंय.... आम्हाला त्याचं तुमच्याप्रमाणे टूरिस्ट म्हणून ॲट्रॅक्शन नाहीये.''

जेटस्टार आमच्या उचंबळून येणाऱ्या उत्साहावर विरजण टाकीत होता. क्षणभर मला त्याचा रागही आला. पण मग मनात विचार आला. दोन दिवसांसाठी प्रवासी म्हणून येणार, चेरापुंजीला ठीक आहे. पण जेव्हा पंधराशे- सोळाशे मिलीमीटर पाऊस अवघ्या चोवीस तासात पडतो, तेव्हा काय होत असेल इथल्या जनजीवनाचं? महाराष्ट्रात मी ज्या महसूल विभागात अनेक वर्ष काम केलं, तिथे चोवीस तासात जर ६५ मि. मी. पेक्षा जास्त पाऊस पडला, तर पूर परिस्थिती निर्माण होते, असं अधिकृत मानलं जातं. इथं त्याच्या दहापट पाऊस एका दिवसात अनेकवार पडतो. एप्रिल ते सप्टेंबर - ऑक्टोबरपर्यंत दरमहा ७०० ते ८०० मि. मी. पाऊस सरासरीने चेरापुंजीवर कोसळतो असं इंडिया मटिरॉलॉजिकल ऑब्जर्व्हेटर्स चेरापुंजी व अधिकृत माहितीपत्रक सांगतं, त्यामुळे जेटस्टार जे म्हणतोय, ती वस्तुस्थिती आहे.

पण तरीही मनातली चेरापुंजीबाबतची रोमँटिक कल्पना एवढ्या सहजासहजी कमी होणं शक्य नव्हतं!

आमची टॅक्सी जेव्हा चेरापुंजीला पोहोचली, तेव्हा सकाळचे अकरा वाजून गेले होते. बऱ्यापैकी ऊन जाणवत होतं! ''पण यावर जाऊ नका सर, इथं मोसम बदलायला

वेळ नाही लागत. केव्हाही पाऊस पडू शकतो.''

मी त्यावर एवढंच म्हणालो, ''खूबलेई..'' (गॉड ब्लेस यू)

तो माझ्याकडे खासी अभिवादनामुळे सानंद आश्चर्यानं व आत्मीयतेनं पाहातच राहिला..

चेरापुंजीचा पाच पन्नास - किलोमीटरचा टापू हा उघडा बोडका डोंगराळ टापू आहे. भरपूर पाऊस म्हणजे घनदाट जंगल, हिरवी-कंच वृक्षराजी आणि गर्द हिरव्या हिरवळीची शाल पांघरलेल्या पर्वतराशी... असं समीकरण माझ्या मनात घट्ट बसलेलं होतं! सात भगिनी राज्यात व त्यांच्या सर्वात लहान, अलीकडेच भाऊ बनलेला सिक्कीम राज्यातही गंगटोक, कोहिमा, दार्जिलिंग आणि शिलाँग ही शहरं पाहिल्यानंतर हा अनुभव सतत येत होता. पण त्याला अपवाद ठरला चेरापुंजीचा परिसर.

''त्याचं असं आहे सर, एकतर इथं लाईमस्टोन व कोळशाचे साठे भरपूर आहेत. आणि इतका धुवांधार पाऊस पडतो की, डोंगरदरीत, जमिनीत पाणी शिरतच नाही आणि त्यामुळे वृक्ष - झाडे मूळ धरू शकत नाहीत. इथं डोंगरावर छोटी छोटी झुडपं तेवढी दिसणार तुम्हाला.'' जेटस्टारचं स्पष्टीकरण पटण्यासारखं होतं.

तरीही प्रेमात पडावं असंच गाव आहे चेरापुंजी, किंवा असं म्हणा ना, आख्खं मेघालय. एक स्त्री पूजक लेखक म्हणून मला इथल्या खासी, गोरा व पैंतिश जमातीचा खऱ्या अर्थाने एक असणाऱ्या स्त्रिया भावल्या. कामाच्या जागी, दुकानात वा डोंगरदरीत सर्वत्र काम करताना स्त्रिया दिसतात. बुटक्या, अटकर बांध्याच्या, बसक्या नाकाच्या, पण खास मराठी सौंदर्य घेऊन आलेल्या आणि मुख्य म्हणजे श्रमातल्या शृंगाराचं लेणं ल्यालेल्या!

दिवसभर चेरापुंजी शहरातली पर्यटन स्थळं पाहताना, उभं आडवं शहर टॅक्सीनं पालथं घालत असताना इथं जाणवत होती ती स्त्री सत्ता. कारण इथल्या तिन्ही आदिवासी जमातींमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती आहे, इथली माणसं आईच्या नावानं ओळखली जातात व मालमत्ता आईकडून सर्वात धाकट्या मुलीकडे जाते व ती साऱ्यांचा सांभाळ करते. लग्नानंतर मुलं मुलीच्या घरी राहायला जातात. केरळमध्ये नायर जमातीमध्येही ही प्रथा सतराव्या - अठराव्या शतकापर्यंत चालू होती. ती आता जवळपास संपुष्टात आली आहे. पण इथं स्त्री-शक्तीचं दर्शन घरोघरी घडत होतं!

आम्ही सर्वांत प्रथम पाहिला तो 'नोह कलीकाई' धबधबा किंवा फॉल, तो कलीकाई नामक स्त्रीच्या नावे ओळखला जातो. चेरापुंजीपासून चार किलोमीटर अंतरावरचा हा 'फॉल' पाहणं हा एक दुर्मीळ समाधानाचा अनुभव आहे. पर्यटन विभागानं हा 'फॉल' पाहण्यासाठी एक सुरेख पॉईंट विकसित केला आहे. डोंगराच्या कडेला सुळक्यावर उभं राहून समोर अथांग पसरलेल्या खोल दरीत काटकोनातल्या डोंगरावरून प्रचंड वेगानं शुभ्र नितळ पाण्याचे लोट धबधब्याचं रूप धारण करीत

कोसळतात. त्यांचा तो आवाज अनादी, अपौरुष अशा वेदमंत्राप्रमाणं वाटतो आणि मनात निसर्गाविषयी पूज्यभाव निर्माण करतो.

तीन बाजूंनी उंच बोडके डोंगर व खोल-हजार-दीड हजार-फुटाची विस्तीर्ण दरी, छोट्या-बुटक्या झुडपांनी काळसर छटा असणारा हिरव्या रंगाचा साज चढवलेला. आणि तो शुभ्र नितळ पाण्याचा 'द नोह कलीकाई' धबधबा...

गरम चहाचे घुटके घेत मी किती वेळ तरी तो धबधबा आणि डोंगरदऱ्याचा आसमंत निरखीत राहतो. कानात जेटस्टारनं धबधब्याची सांगितलेली करुण कहाणी पुन्हा पुन्हा प्रतिध्वनित होतेय...

कलिकाई नावाची एक खासी स्त्री कुटुंबप्रमुख व 'ब्रेड अर्नर'. ती काम करणारी, तर तिचा नवरा घर सांभाळणारा व मुलांकडे पाहणारा. एक दिवस कलिकाई कामावरून घरी येते, तेव्हा तिचा नवरा प्रेमानं स्वागत करीत म्हणतो, "ये दमून आलीस. तुझ्यासाठी खास गरमागरम कढी केलीय." ती कढीचा स्वाद घेऊ लागते, अचानक त्यात तिला एक छोटी मानवी करंगळी (बोट) सापडते. ती दचकते व काहीशी भयभीत होते. आजूबाजूला पाहते. तिचा लाडका मुलगा दिसत नाही, तिचा हा दुसरा नवरा ज्याचा सावत्र मूल म्हणून नेहमी रागराग करायचा, ती त्याच्याबद्दल खोदून खोदून विचारते. तेव्हा तो अपराध कबूल करीत कबुली देतो की, "मला त्याचा राग होता, म्हणून मी त्याला मारलं. त्याचे तुकडे - तुकडे केले. व त्याच्या मांसाची ही करी - डिश बनवली. त्यात चुकून करंगळी राहून गेली..." आपण जे अन्न भक्षण केलं, ते आपल्या पोटच्या गोळ्याला मारून त्याच्या मांसापासून बनवलेलं होतं, हे जाणवताच ती बेभान झाली. नवऱ्याला दूषणं देत छाती बडवू लागली व ओक्साबोक्शी रडू लागली. त्या शोकात ती घरातून बाहेर आली, सैरावैरा धावत सुटली. आणि शोक असह्य झाल्यामुळे जेथून धबधबा सुरू होतो, तेथून तिनं खाली खोल दरीत, पाण्याच्या प्रवाहात स्वत:चा देह झोकून दिला व शेवट करून घेतला. 'नोह' म्हणजे उडी मारणे, त्याला तिचं नाव जोडून या धबधब्याचं तेव्हा 'सून खासी' भाषेत 'नोह कलीकाई' असं नाव पडलं.

ही मानवी क्रौयाची परिसीमा गाठणारी पाशवी वृत्ती. त्याच्या जोडीला मातेची असीम ममता व पुत्रवियोगानं जीवन झुगारून देण्याची स्त्री प्रवृत्ती. त्याची या अतीव सुंदर पर्यटन स्थळाशी कशी सांगड घालायची? करुण गीतं सुंदर वाटतात, असं जे होलीनं म्हटलंय, ते वेगळ्या अर्थानं इथं खरं वाटतंय. हा सुंदर परिसर या भयानक कहाणीच्या पार्श्वभूमीवर भीषण सुंदर वाटतोय..

आमची टॅक्सी आता 'मॅक्समाई' लेणीकडे धावत होती आणि जेटस्टारच्या रसवंतीला बहर आला होता. काल शिलाँगला मेघालयाचे राज्यपालही या लेण्यांबद्दल मन:पूर्वक बोलले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच केव्हजमध्ये सोडियम व्हेपर लॅम्पचे दिवे

अलीकडेच बसविण्यात आले होते. त्यांनी जे लेण्याबद्दल सांगितलं होतं, त्यामुळे एक काहीतरी नवा अनुभव मिळेल अशी अपेक्षा होती. आणि अपेक्षापूर्वीचा सुखद अनुभव 'मॅक्समाई केव्हज' पाहताना मिळाला. एका शब्दात हा अनुभव सांगायचं म्हटलं तर मी 'फँन्टॅस्टिक' हा शब्द वापरेन!

आपल्या मराठी माणसाच्या नजरेपुढे लेण्या म्हटलं की वेरूळ व अजिंठा येतं, तेथे प्रज्ञावंत कलावंतांनी डोंगर कोरून जे उत्तुंग शिल्प साकारलंय - विशेषत: कैलास लेणं व अजिंठ्याची रंगिला गुंफा, त्याला तोड नाही. पण 'मॅक्समाई' लेण्याचं वैशिष्ट्यं म्हणजे ती निसर्गनिर्मित आहे. हा निसर्ग किती महान कलावंत आहे, याचा साक्षात्कार इथं आम्हास झाला आणि मन भरून तृप्तावलो.

'मॅक्समाई' लेणी म्हणजे एक नागमोडी गुहा आहे - साधारणपणे २०० ते २५० मीटर लांबीची व मध्यावर दोन बाजूने विभाजित झालेली. लाईमस्टोनचा दगडांचा डोंगर, त्यातली ही गुहा. तिथे छतावर व दोन्ही बाजूला अनेक वर्षांच्या नैसर्गिकप्रक्रियेने व पावसामुळे नानाविध आकृतिबंध तयार झाले होते. कलावंत, चित्रकारांना त्यांच्या मन:चक्षू व प्रतिभा विलासाद्वारे त्यात अक्षरश: अगणित चित्रमालिका दिसाव्यात, एवढे मनोरम आकार व आकृतिबंध नैसर्गिकरीत्या त्यात तयार झाले होते. ते पाहताना माझं मन स्तिमित होतं होतं. मला त्यात गणपतीच्या अनेक आकृत्या व पानाफुलांचे आकार जाणवत होते.

गुहेमध्ये मेघालय पर्यटन विभागाने सोडियम व्हेपरचे विद्युत दिवे लावले होते. आमचं नशीब जोरावर होतं. आज ते चालू होते. पाऊस पडला की ते बंद व्हायचे. आज चेरापुंजीत सकाळपासून पाऊस नव्हता. म्हणून हळहळ करायची, की त्यामुळे काळोख्या गुहेत अद्भुत असं नैसर्गिक शिल्प पाहायला मिळालं म्हणून आनंद मानायचा? गुहेतल्या रोमांचक अनुभवामुळे आनंदाचं पारडं अर्थातच जड झालं होतं.

गुहेतून जाणं व दुसऱ्या तोंडातून बाहेर पडणं हा ट्रेकिंगचा आनंद मिळवून देणारा असा अनुभव होता. मुख्य म्हणजे गुहेत पावसाचं पाणी झिरपत असूनही कुठेही शेवाळलेलं नव्हतं. कारण वाहणारा थंडगार, आल्हाददायक चैतन्यमयी वारा.

गुहेतून एका मुखातून दुसऱ्या मुखात जाण्यासाठी रस्ता असा नव्हता. उंच-सखल भाग - दरी - डोंगराचा छोटा अनुभव देणारा. दोन उंचवटा जागेच्या मध्ये चार-पाच फुटांची खाई. त्यावरून जाण्यासाठी लवचीक पण मजबूत बांबू एकत्र करून टाकलेले व पायवाट तयार केलेली. त्यावरून जाताना बांबू वाकत होते. हरिद्वारच्या झुलत्या लक्ष्मण झुल्याची आठवण येत होती. अंधाऱ्या गुहेत पिवळ्या दिव्यात नैसर्गिक आकृतिबंध टणटण करीत मंदपणे पडणाऱ्या पाण्याच्या थेंबांच्या संगीताच्या साथीनं निरखताना अनोखी अनुभूती जाणवत होती. वेदांना भारतीय परंपरेत अपौरुषेय म्हटलं जातं, ते कितपत सत्य आहे. माहीत नाही. पण ही 'मॅक्समाई' नामक लेणी

खचितच अपौरुषेय आहे - माणसानं निर्माण न केलेली, तर नैसर्गिक प्रक्रियेतून साकारलेली. जगाचं माहीत नाही, पण भारतात तरी एकमेवद्वितीय, केवळ अद्भुत, फॅन्टॅस्टिक. या एका स्थळानं माझ्यातला भटका प्रवासी कितीतरी अनुभव व कलाश्रीमंत झाला होता!

वर आभाळात स्वच्छ ऊन झळाळत होतं. थोडा उत्साह जाणवत होता. पावसाची कोणतीही चिन्हं दिसत नव्हती. एकदम म्हणावंसं वाटलं, "सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय?"

आता मला पाऊस हवा होता. चेरापुंजीला येऊन पाऊस अनुभवायचा नाही, तर काय अनुभवायचं? त्यामुळे निरभ्र निळेशार आकाश पाहून मन निराशलं होतं!

"सर, आशा सोडू नका. इथं केव्हाही पाऊस पडू शकतो..." जेटस्टारचे हे शब्द दिलासा देत होते. मला आज पाऊस अनुभवायचा होता.... चेरापुंजीला पावसात भिजायचं होतं. क्या लिखा है मेरे नसीब में?

अचानक दार्जिलिंग भेटीतले कलेक्टर डॉ. आफताबचे शब्द आठवले "इथं टायगर हिल्सवरून काचनगंगाचं विहंगम दृश्य दिसतं. पण त्यासाठी नशीब सिकंदर हवं. ढगाळ वातावरणामुळे अनेकदा हे दिसत नाही. असं म्हटलं जातं की, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर दार्जिलिंगला एकूण सातवेळा आले, पण एकदाही त्यांना कांचनगंगा शिखराचं झळाळतं हिमदर्शन झालं नाही...."

इथं चेरापुंजीला आज मला पाऊस भेटेल काय? चिंब भिजत येईल का? सायंकाळी परतायचं आहे. थांबता येणार नाही. आणखी दोन-अडीच तास. आहेत. तोवर पाऊस मेहरबान होईल का? म्हणून बालकासारखा प्रश्न - "सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय?"

हे खरंच आहे की, भारत हा प्राचीन देश आहे व इथली सांस्कृतिक परंपरा कुणालाही हेवा वाटावी इतकी समृद्ध व वैविध्याने नटलेली आहे. त्यामुळे दंतकथांना तोटा नाही. अशीच एक दंतकथा आता अनुभवायची होती. पाहायची होती.

आमचा पुढला टप्पा होता. - 'कोह रामहाह' - हे स्थळ म्हणजे शंकू आकृतीचं पिशवीसारखं दगडाचं प्रचंड आकारमान. त्याला एक छानपैकी दंतकथा चिकटलेली.

कोह रामहाह म्हणजे चेरापुंजीचं एक आकर्षण आहे. जिथं डोंगर संपतो व खोल दरी व त्याला लागून विस्तीर्ण समतल भूभाग सुरू होतो, तेथे डोंगराच्या कडेला हा प्रचंड आकारमानाचा दगड आहे. एक मोठी बास्केट (पिशवी) - लांब, रुंद, खोल व वरच्या बाजूला शंकाकृती सुळका. जणू पिशवी उचलण्यासाठी असलेला बंदच. तो धरून राक्षस ही दगडाची पिशवी उचलू शकतील!

तो प्रचंड दगडाचा सुळका पाहताना डोळे विस्फारले गेले.

त्याच्या भोवती खासी जमातीची दंतकथा गुंफली गेली आहे. ती मनोवेधक

आहे. प्राचीन काळी एक महाकाय दैत्य माजला होता. तेव्हा त्याच्या त्रासापासून कशी सुटका करून घ्यावी, असा लोकांपुढे प्रश्न पडला. तेव्हा त्यांनी एक युक्ती योजली. त्या दैत्याला चांगल्या भोजनाचं आमिष दाखवलं. त्यातून त्याला लोखंडाचे अणकुचीदार तुकडे चारले, त्यामुळे आचके देत तो मरण पावला. त्याचा मृतदेह म्हणजे कोह रामहाहा हा दगडी सुळका होय!

हा शंकू आकृती - बास्केटसारखा दिसणारा सुळका - सुमारे शंभर फूट उंचीचा असावा. त्यावरून त्या महाकाय दैत्याची कल्पना करता येते.

इथे डोंगरराशी संपतात आणि खोल दरी व समतल भाग सुरू होतो. ही सध्याच्या बांगलादेशाची सीमा होय. एप्रिल महिन्यातही दूरवरून क्षितिजापर्यंत भिडलेलं पाणी दिसतं होतं. पावसाळ्यात सारा भूभाग जलमय होतो. उंचावरून खाली सुमारे चार हजार फूट खोलीवर असलेला क्षितिजापर्यंतचा जलमय झालेला भूभाग पाहताना मन थक्क होत होतं. बांगलादेशीय नागरिक दरवर्षीच पूर व वादळाला सामोरे जातात, त्याची इथून कल्पना येत होती.

टळटळीत दुपारही टळू लागली होती. चारेक तासांच्या भटकंतीनंतर भूक जाणवत होती. जेटस्टार आम्हाला 'ऑर्किड व्ह्यू' या हॉटेलमध्ये घेऊन गेला. आणि तेथे मेघालय पर्यटन विभागाच्या, माहिती पुस्तकात नसलेलं एक प्रेक्षणीय दृश्य पाहायला मिळालं. 'सेव्हन सिस्टर फॉल'

एका व्हॅलीपॉईंटवर हॉटेल 'ऑर्किड व्ह्यू' आहे. त्यांच्या काटकोनात असलेल्या डोंगरातून खालच्या विस्तीर्ण दरीमध्ये सात छोटे छोटे धबधबे (वॉटर फॉल) पडताना दिसले आणि भान हरवलं. एका ओळीत, ठरावीक अंतरात वर-खाली उंचीवरून कोसळणारे शुभ्र उदकाचे ते धबधबे पाहताना डोळे निवत होते. त्याला मोठं समर्पक नावही त्यांनी दिलं - 'सेव्हन सिस्टर्स फॉल'. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेश या सात राज्यांना 'सात बहिणी' (सेव्हन सिस्टर्स) म्हटलं जातं. त्यावरून या सात धबधब्यांना हे नाव दिलंय. आता उत्तर-पूर्व राज्यात १९७५ पासून सिक्कीमचा समावेश झालाय. गुवाहाटीला मराठी पत्रकार नितीन गोखलेनं असं म्हटलं होतं की, या सात बहिणींना आता एक छोटा भाऊ सिक्कीमच्या रूपानं लाभलाय. 'सेव्हन सिस्टर्स फॉल' महालात आठवा धबधबा दिसतोय का हे मी पाहात होतो. हा छोटा भाऊ रुसला, की सात बहिणींनी मिळून त्याला पिटाळलं? असा गमतीदार प्रश्न मनात येत होता...

यानंतर आम्ही पाहिला तो 'थंग खरंग' हा साडेपाच एकर पठारावरचा पार्क.. तिथे झाडे व दुर्मीळ वनस्पती होत्या. त्याला लागून खोल दरी होती व इथूनही बांगलादेश सीमा दिसत होती. निवांत - शांत जागा, प्रेमीजनांच्या कूजनासाठी आदर्श जागा. या बागेतून एक फेरफटका मारला. चेरापुंजीवासीयांसाठी सायंकाळी फिरण्यासाठी

ही एक छान जागा होती... बागेतील एका पाटीनं माझं लक्ष वेधून घेतलं. तो एक पर्यावरणवाद्यांसाठी व एकूणच माणूसजातीसाठी छान असा संदेश होता.

"A man does not plant trees for himself. He plants if for posterity."

आता परतीची वेळ झाली होती, पण आज आम्हांला पाऊस चकवा देणार असंच दिसत होतं! रवींद्रनाथ टागोरांप्रमाणे आम्ही येथे पावसाबाबत कमनशिबी ठरणार होतो.

मनात मागच्या आय. ए. एस. ऑफिसरचा जो ग्रुप पावसामुळे इतर काही न पाहता परत फिरला होता, त्यातील माझ्या एका सन्मित्राचे वाक्य पुन्हा पुन्हा आठवत होतं.

''काय तुफान पाऊस होता म्हणून सांगू! संतत धरलेली धार म्हणजे पाण्याचा आकाशातून जमिनीपर्यंत सरळसोट निर्माण झालेला वृक्षच जणू... एवढा प्रचंड मुसळधार पाऊस होता. जगातलं सर्वात भिजणारं गाव हा चेरापुंजीचा महिमा किती सार्थ आहे, हे त्यावेळी प्रत्ययास आलं...!''

दार्जिलिंगला सात वेळा जाऊनही जसं गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांना कांचनगंगा शिखराचं हिमशुभ्र दर्शन झालं नाही, तसंच आज चेरापुंजीला येऊनही आम्हास पाऊस भेटलाच नाही. तो अंगावर घेण्याचं व रंध्रारंध्रात मुरवून घेण्याचं स्वप्न अधुरंच राहिलं.

त्यासाठी मला पुन्हा चेरापुंजीला आलं पाहिजे. आणि हे सोरावगांवार - चेरापुंजीचं मूळ खासी नाव - तुझं आकर्षण मला तुझ्याकडे पुन्हा खेचून आणेलच. आणि ही शरणागती मला आवडणारी असेल.

तोवर -

'खूबलेई शिबून' Khublei shibun - अर्थात् 'थँक्यू यू व्हेरी मच अँड गॉड ब्लेस यू वुईथ बाऊंटीफुली शॉवर्स!'

०-०-०

# २. नायगरा : दि व्हॉईस ऑफ गॉड

"ही वाट दूर जाते स्वप्नामधील गांवा..."

नॉर्थ - ८१ या अमेरिकेच्या सर्वात लांब असलेल्या प्रशस्त व गुळगुळीत महामार्गावरून आमची कार ताशी शंभर किलोमीटर या वेगानं पोटातलं पाणी न ढळता धावत होती. मागील पंधरवड्यापासून न्यूयॉर्क राज्यातला प्रसिद्ध असणारा 'फॉल' - 'पानगळी' चा मौसम सुरू झाला होता. प्रत्यक्ष पानगळीला अवकाश होता, पण पानांचे बदलते रंग अफलातून जादूई करिश्मा दाखवत अक्षरश: सप्तरंगांची उधळण करीत होते! हिरवे, नारंगी, लालगर्द, पिवळे, निळे व काही प्रमाणात पोपटी रंगाची पाने अंगाखांद्यावर वागवीत दुतर्फा झाडे व झुडपे नजर बांधून ठेवीत होती. निसर्ग पूर्ण जल्लोषात आपली रंगपंचमी खेळत होता व पाहणाऱ्यांचे डोळे, नजर व मन सप्तरंगांची उधळण करीत आकंठ भिजवीत होता!

आज हवाही मोठी छान होती. अमेरिकेमध्ये हवेचं भारी कोडकौतुक. ज्या दिवशी स्वच्छ ऊन पडतं आणि थंडी कमी होते, तो दिवस अमेरिकेन माणूस रसिकतेनं भोगायला सदैव उत्सुक असतो. कारण वर्षाचे सहा ते आठ महिने शून्याच्या खाली तापमान, हाडं गोठवणारी थंडी व करडं, बर्फाळलेलं वातावरण असतं; त्यामुळे सूर्यप्रकाशाचे दिवस त्यांच्यासाठी दिलासा घेऊन येणारे असतात. त्यामुळे आजचा दिवस मोठा छान होता. छानपैकी स्वच्छ चकाकतं ऊन पडलं होतं आणि बोचरी थंडी अगदीच गुलाबी - भोगी थंडीत नाही तरी - सुसह्य आनंदी थंडीत परावर्तित झाली होती. आमचा अमेरिकेत न्यूजर्सीला राहणारा मूळचा भारतीय मित्र, जो खरा आम्हाला नायगरा दाखवण्यासाठी आला होता, त्याच्या कारनं आम्ही नायगराकडे जात होतो, तो म्हणाला,

'यू आर लकी! मागच्या महिन्यात मी आलो होतो, तेव्हा धुकं होतं. नायगरा पाहायची सारी मजा किरकिरी झाली. आज मात्र असं होणार नाही. यू विल गेट ए फँटॅस्टिक व्ह्यू ऑफ नायगरा फॉल..!"

"तथास्तु!" मनोमन ती म्हणालो, आणि मनाचा हा विश्वास खरा ठरणार याची

पूर्ण खात्री होती. कारण ज्या सिरॅक्यूस शहरात मी आठ दिवसापूर्वी आलो होतो एका अभ्यासक्रमासाठी, तेथे असह्य थंडी, धुकं, दोन वेळा किंचित पावसानं आसमंत 'फॉल' ऋतूकडे झुकल्याचं दिसत होतं. पण आज त्याचा मागमूसही नव्हता. स्वच्छ निळे आकाश, सौम्य ऊन आणि मस्त मानवणारी थंडी... आणि अनपेक्षितपणे रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी विविधरंगी पानांची निसर्गनामक कृष्ण खेळत असलेली रंगपंचमी...

"मी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात एकदा खास न्यूजर्सी ते नायगरा प्रवास करतो कारण, ती ही रंगाची उधळण पाहायला.... आणि नायगराची आसमंत व्यापणारी खर्जातील तान ऐकायला... दोन्ही गोष्टींचा माणसाला खऱ्या रसिकाला कधीच कंटाळा येणार नाही....."

मित्राच्या संभाषणातून माहिती झालं की, भारतासारख्या उष्ण प्रदेशात पानगळीचा ऋतू आला की, उष्म्यानं हिरवी पानं पिवळी होऊन वाळून पडतात. पण न्यूयॉर्क या अमेरिकेच्या थंड प्रदेशात हिरवी पानं एकदम पिवळी होत नाहीत, ती विविध रंग धारण करतात. नारिंगी, निळी, लालगर्द, गडद हिरवी आणि हलकी फिकट पिवळी... आणि मग गळून पडतात. हा पानांचा बदलत्या रंगांचा मोसम हा एक ते दीड महिना असतो, पण ऑक्टोबरचा पहिला पंधरवडा हा एकदम रंगारंग - अत्युच्च कोटीला पोहोचणारा... आणि नेमकं याच काळात नायगराला जात होतो आणि निसर्गाची मनसोक्त चाललेली रंगपंचमी पाहात, मनात साठवत होतो. डिजिटल कॅमेऱ्यात ती टिपायचा प्रयत्न करीत होतो...

कारमध्ये टेप, डीव्हीडी दोन्हींची सोय होती. मित्रानं टेप लावला आणि आशाचा नितळ स्वर निनादू लागला...

"ही वाट दूर जाते स्वप्नामधील गांवा..."

अभावितपणे मित्रानं आमच्या मनाची भावनाच व्यक्त करणारं गीत लावलं होतं. आमचं अमेरिकेला दोन महिन्यांसाठी येणं आणि आजचं हे पानांचे विविध रंग पाहात नायगराला जाणं स्वप्नवत वाटत होतं. नायगरा खरंच नाही का आमच्यासाठी एक स्वप्नातलं गाव होतं?

आजच्या माहितीच्या स्फोटाच्या जगात भारताच्या ताजमहालाप्रमाणे नायगरा धबधब्याबद्दल मनात असो-नसो, सतत कानी व नजरेस काही ना काही येतच असतं. पण 'जो बात तुझमें है, तेरी तसबीर में नहीं-' प्रमाणे प्रत्यक्ष पाहाणं व नायगरा अनुभवणं हेच खरं. इथं एरवी एक सुरेख काव्यप्रतिमा म्हणून व श्रीराम - लव, कुशाच्या संदर्भात सार्थ वाटणारी 'प्रत्यक्षाहुन प्रतिमा उत्कट' मिथ्या वाटत होती...

आता काही क्षणांतच नायगराला आम्ही पोहोचणार होतो. मन अधिरलं होतं. आणि नायगरावर ज्या असंख्य कविता आजवर नायगरा पाहून - अनुभवून लिहिल्या

गेल्या, त्यापैकी काही कविता काल मी इंटरनेटवर यासाठी खास तयार केलेल्या www.niagarapoetry.com या संकेतस्थळावर वाचल्या होत्या व ज्या आवडल्या त्याची प्रिंट काढली होती, ते कागद माझ्या हातात होते व मी अंजूला - माझ्या पत्नीला व मित्राला वाचून दाखवत होतो... आणि मनानं नायगरा नजरेसमोर आणायचा प्रयत्न करीत होतो. त्यात एक वेगळेच काव्यात्मक समाधान मिळत होते.

Splendour Supreme of Constant majesty
Of towering passion, Overpowering charm,
At last mine eyes behold thee as than art.
In all the lightness of thy moving & grace;
In all the whiteness of thy soaring spray;
In all the brightness of the might!

आधी बफेलो शहर, मग नायगरा शहरामधून कार जेव्हा एक दिमाखदार वळण घेऊन धावू लागली, तेव्हा अंजूनं बोट दाखवीत म्हटलं, ''ते काय आहे? वर आकाशात जाणारं धुकं, का दुसरं काही?''

मीही पाहू लागलो. समोर दोन तीनशे मीटर अंतरावर आकाशात धुक्याचे लोट जात होते. पण आजुबाजूला तर साफ होतं, हे धुकं नाही खचितच्.

''यू आर राइट!'' मित्रानं खुलासा केला, ''नायगरा धबधबा खाली वेगानं पडल्यावर जे पाण्याचे तुषारकण उठतात, ते आहेत. धुकं नाही...''

ओ माय गॉड! एवढ्या उंच आसमंतात पाण्याचे धुक्यासारखे वाटणारे दाट तुषारकण! कसा असेल नायगरा? मनाची अधीरता आता टिपेला पोहोचली होती.

गाडी पार्क करून सुमारे पंधरा मिनिटं चालल्यावर एकदम नायगरा धबधब्याचा थोडासा भाग दिसला. हिरव्या रंगाची झाक असलेलं पाणी शुभ्रधवल होत वेगानं खाली पडताना दिसत होतं. आणि ते थंड तुषारकण तोंडावर आले आणि किंचितशी हुडहुडी भरवून गेले...

आम्ही आता नायगरा नदीच्या अगदी जवळ होतो आणि आधी संथ असणारं पाणी वेग धारण करीत कड्याच्या टोकावरून वेगानं पडत होतं. आणि त्या प्रपाताचा धीरगंभीर, एकाच टिपेतला - खर्जातला म्हणता येईल असा गच्च दमदार आवाज संगीत लहरीप्रमाणे कानात रुंजी घालू लागला...

आज नायगरा पाहायला येणाऱ्या पर्यटकांची गर्दी जास्तच वाटत होती. पण लोखंडी कठड्याला रेलून मी भान हरपून तो निसर्गाचा अद्‌भुत नजारा अधाशाप्रमाणे पाहात होतो!

मी भानावर आलो ते मित्राच्या हाकेनं. त्यानं एक गाईड पाहिला होता, जो

आमच्या सोबत पुढील २-३ तास राहाणार होता! मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं, तसं खुलासा करताना मित्र म्हणाला,

"नायगराचा भूगोल व इतिहास फार रंजक आहे. तसंच आपल्याला नायगराचं सर्व दिशा, अंग व कोनातून तो दर्शन घडवेल!"

आणि खरंच, त्या गाईडच्यासह नायगरा पाहिला, तो केवळ अद्‌भुत, रोमांचकारी व डोळ्याचं पारणं फेडणारा अनुभव होता. तसंच नायगारा हे जगातलं एक महान आश्‍चर्य का मानलं जातं, याचा उलगडाही झाला आणि नायगरा डोळ्यासोबत मनातही उतरत गेला!

गाईड आम्हांला सर्वप्रथम धबधब्यांच्या अलीकडे नायगरा नदीचा प्रवाह पाहायला घेऊन गेला. नायगरा धबधब्याभोवती पर्यटकांची गर्दी असल्यामुळे तेथे हॉटेल्स, कॅसिनोसारखे व्यावसायिक बांधकामे होऊन परिसर सौंदर्याची हानी होऊ नये म्हणून ११० वर्षापूर्वी, म्हणजे १८९५ साली, न्यूयॉर्क राज्याने कायदा करून नायगरा धबधब्याचा परिसर आरक्षित करून तेथे 'नायगरा रिझर्वेशन पार्क'ची निर्मिती केली. त्याचा मुख्य उद्देश नायगरा धबधब्याचं नैसर्गिक सौंदर्य अबाधित राहावं आणि पर्यटकांना थेट नदी व धबधब्यापर्यंत निर्धोक अडथळ्याविना जाता यावं हा होता. तो आजही किती काटेकोरपणे जपला जातोय, हे मला जाणवलं होतं!

हे स्टेट पार्क 'गोट आयलंड' व 'थ्री सिस्टर्स' नावानं ओळखल्या जाणाऱ्या तीन छोटेखानी बेटावर विकसित झाले आहे. त्यामधून नायगरा नदी वाहते. त्याच्यावर बांधलेल्या पुलावरून जाताना नदीचं किंचित हिरवी व काळसर झाक असलेलं पाणी पाहून काही शेकडो मीटर अंतरावर त्याला प्रचंड वेग येऊन खोल दरीत पाणी फेकलं जाणार आहे, याची आधी धबधबा पाहिला नाही तर कल्पनाही येणार नाही. हा सारा पार्कचा परिसर मनमोहक हिरवळ, उंच वृक्षराजी व स्वच्छ. अंगात थंडी भुरवत आरामशीरपणे रपेट मारताना कमालीचं प्रसन्न वाटत होतं!

गाईडनं माहिती दिली की, इथं एकूण तीन धबधबे जवळजवळ आहेत, ज्यांना एकत्रितपणे गावाच्या नावावरून 'नायगरा फॉल्स' म्हटलं जातं! ती म्हणजे अमेरिकन फॉल, 'ब्रायडल व्हेल फॉल्स' (Bridal veil) आणि कॅनेडियन फॉल, ज्याला 'हॉर्स शू फॉल' ही म्हटलं जातं. हा तिसरा धबधबा कॅनडा देशाच्या हद्दीत आहे. नायगरा नदी ही दोन देशांची या भागातही सीमारेषा आहे. तिन्ही धबधबे एकत्रित खाली नदीतून बोटीनं पाहाताना त्याची भव्यता, त्याचं अवर्णनीय सौंदर्य आणि पाण्याचं नितांत सुंदर शुभ्रपण टिपायला दोन डोळे कमी पडतात. कॅमेऱ्याच्या प्रिंटवर उमटणारी क्षणचित्रं निर्जीव व केवळ भासमान वाटतात. नायगरा प्रत्यक्ष पाहाणं हाच एकमेव मार्ग आहे त्याचे सौंदर्य व भव्यता आकलण्याचा!

मित्र घाई करीत होता. म्हणत होता, "आधी आपण खाली नदीतून बोटीनं

नायगरा पाहू या. स्वच्छ ऊन आहे, आकाशही निरभ्र आहे... आज सर्वांगाने नायगरा दिसेल.''

आम्ही 'मेड ऑफ दि मिस्ट' (Maid of the Mist) या बोटीच्या प्रवासाची तिकिटे काढली आणि आम्ही प्रथम 'ऑब्झर्व्हेशन टॉवर' या प्रॉस्पेक्ट पॉईंट वरील इमारतीकडे गेलो. हा टॉवर धबधब्यापेक्षा उंचीवर आहे व फिकट हिरव्या पोपटी रंगाच्या कांचेचा आहे. मनात आलं, यातही अमेरिकनांची कलात्मकता दिसून येते. नायगरा नदीच्या पाण्याशी मिळताजुळता रंग काचमहल (टॉवर) चा ठेवला आहे. सूर्यप्रकाशात जेव्हा तो चमकतो, तेव्हा पांचूच्या रंगविभोर बेटाचं दर्शन झाल्याचा साक्षात्कार होतो. आज स्वच्छ उन्हानं तो दिमाखात चमकत होता. रात्री जेव्हा रोशणाई होईल, तेव्हा पुन्हा एकदा मघाशी निसर्गाची पानांच्या रंगाची रंगपंचमी पाहिली, तशी मानव निर्मित विद्युत रोशणाई पाहायला मिळेल, तेव्हा हा टॉवर, हा वेगानं कोसळणारा धबधबा दिसेल? कल्पनेनंही मन मोहरत होतं!

ऑब्झर्व्हेशन टॉवरवरून तिन्ही धबधबे अंतरावरून पण समग्रपणे दिसत होते! प्रचंड वेगानं घनगर्द आवाजात हुंकार देत तीन धबधबे खोल दरीत कोसळत होते. अमेरिका हद्दीमधील दोन्ही फॉलची उंची (खालून मोजली तर) वा खोली (वरून खाली मोजली तर) १८० फूट आहे, तर रुंदी १०६० फूट किंवा ३२० मीटर आहे. कॅनेडियन फॉलची उंची अंमळशी कमी म्हणजे १७० फूट (५४ मीटर) तर रुंदी दुपटीहून जादा म्हणजे २२०० फूट (६७५ मीटर) एवढी आहे. सुमारे १२,००० वर्षापूर्वी निर्माण झालेले हे तीन धबधबे तेव्हापासून अव्याहतपणे खळाळत, वेगानं धावत येत कड्यावरून बेगुमानपणे स्वत:ला खोल झोकून देत आहेत. आपल्याच आत्ममग्न मस्तीत ... पण पाहाणाऱ्याला अवर्णनीय आनंद देत! खाली वेगानं पडताना जे पाण्याचे तुषारकण वर येत होते, ते एवढे असंख्य होते की, त्याचा दाट धुक्यासारखा लोट झाला होता व तो अस्मानात झेपावत होता. ते अविरत पडणारं प्रचंड पाणी, तो एकसारखा गंभीर नाद आणि पडणाऱ्या पाण्याचं शुभ्रफेनिल सौंदर्य... केवळ अप्रतिम! हा नाद अनादी आहे, अर्मोसजेय आहे... हे स्वर मानवाचा नाही, देवाचा आहे.,

एकदम काल वाचलेली नायगराची आणखी एक कविता वाचली, त्याची सुरवातच मुळी "Here speaks the Voice of god let man be dumb / Nor with his vein aspirings hither come" अशी सार्थ होती. इथं या क्षणी नायगरा परिसरात दहा ते पंधरा हजार माणसे खचितच असतील. त्यांचा कोलाहलही चालू होताच. पण त्यावर मात करीत नायगरा एका विशिष्ट नादात आवाज करीत होता. तो, तो देवाचा तर आवाज नाही? माणसानं मूकपणे ऐकवा असा! कसलं अनाम, शब्दविहीन उत्कट खर्जातल्या स्वरात नायगरा गात होता; का देवाचा आवाज, देव

जर असेल तर, त्याचा आवाज यापेक्षा काही वेगळा असणार नाही असं क्षणभर वाटलं!

आता आम्ही रांगेतून 'मेड ऑफ दि मिस्ट' बोटीच्या प्रवासासाठी टॉवरमधील लिफ्ट मध्ये शिरलो. ती आम्हाला धबधब्याच्या पायथ्याशी नदीमध्ये घेऊन जाणार होती. सुमारे दहा ते पंधरा मजले खोल. आमचा लिफ्टमन एक हसऱ्या डोळ्याचा निग्रो होता. आम्हाला त्यानं 'आई'ये असं हिंदीत म्हणत स्वागत केले. तो बहुभाषी असावा. कारण तो जपानी, मेक्सिकन इत्यादींचेही त्यांच्या भाषेतील अभिवादनाचे शब्द उच्चारीत त्यांचं स्वागत करीत होता! लिफ्ट चालवणे हा त्याचा रोजचा व्यवसाय, पण किती प्रसन्नपणे काम करीत प्रवाशांना सुखावह ट्रीटमेंट देत होता. पर्यटन स्थळाचा आनंद अशा छोट्या छोट्या बाबींनी द्विगुणित होतो..

लिफ्ट थांबली. आम्ही बाहेर आलो. इथून नदी संथ होत धावत होती. किनारी धक्क्यावर पीअरवर एक तीन मजली बोट लागली होती. तीच सुप्रसिद्ध 'मेड ऑफ दि मिस्ट' बोट होय. धबधब्याजवळून जाताना उडणाऱ्या पाण्यानं अंग भिजू नये म्हणून प्रत्येकाला निळ्या रंगाचा प्लास्टिकचा ओव्हरकोट म्हणा वा गाऊन म्हणा, दिला जात होता. तो घालताना लहान मुलांप्रमाणे निर्मळ निहेंतुक हसू येत होतं! अंजूला तो निळा पोषाख छान दिसत होता. मी त्या ड्रेसमधल्या तिला कॅमेऱ्यात बंदिस्त केलं!

आम्ही बोटीवर कठड्याला रेलून उभे होतो. हातात कॅमेरा सज्ज होता. आणि बोट सुरू झाली. ती आम्हास तीनही धबधब्यांच्या जितकं जवळ जाता येणं शक्य होतं तितक्या जवळ घेऊन जाणार होती व तिन्ही धबधबे या टोकापासून त्या टोकापर्यंत दर्शविणार हेती. बोटीवर रेकॉर्डेड कॉमेंटरी ऐकवली जात होती.

प्रथम अमेरिकन फॉल, मग ब्रायडल व्हेल फॉल आणि शेवट सर्वात मोठा, महत्त्वाचा व भव्यतेचा कळस गाठलेला हॉर्स शू फॉल (कॅनेडियन फॉल) पाहाताना काही क्षण मूक होऊन तो निसर्गाचा चमत्कार पाहात होतो. मनात त्याचं सौंदर्य साठवीत होतो, तर मध्येच वाचेला न राहावून कंठ फुटत होता, व नायगरा फॉल किती सुंदर आहे, किती फँटॅस्टिक आहे, असं ठरावीक शब्द वापरून सांगायचा मोह आवरत नव्हता. 'विस्मयचकित होणं', 'आ वासणं', 'थक्क होणं', 'अवर्णनीय आनंदानं मन भरून येणं' हे एरवी वापरले जाणारे शब्दप्रयोगही किती अपुरे आहेत. हे जाणवत होतं. त्या पलीकडे प्रतीत होणारं आम्ही अनुभवत होतो. सर्वांगाला डोळे जणू फुटले आहेत, असं काहीसं वाटत होतं. यापूर्वी हा अद्‌भुत आरसपानी सौंदर्याचा अनुभव मधुबाला रुपेरी पडद्यावर पहाताना आला होता. आता तो सप्तरंगात पाहायला लवकरच मिळणार होता. 'मुघले आझम' हा सिनेमा येत्या दिवाळीला रंगीन होऊन प्रकाशित होणार होता. त्याची आठवण झाली. शुभ्र आरसपानी सौंदर्य रंगीत स्वरूपात कसं अवतरणार, हे आज रात्री नायगराची रोशणाई पाहाताना अनुभवता येणार होतं.

आणि भारतात दोन महिन्यांनी परतल्यावर टेक्नीकलर मधील 'मुघले आझम' मधील रंगीत मधुबाला पाहाताना प्रत्ययास येणार होतं! (नायगरा त्याच दिवशी रात्री रंगीन स्वरूपात पाहिला व भारतात आल्यावर पहिलं काम केले पुण्याला 'ई - स्कवेअर' मध्ये जाऊन 'मुघले आझम' पहाण्याचं, दोन्ही अनुभव रंगसंपृक्त. श्रीमंत. नजरेचं सार्थक करणारे, अविस्मरणीय)

चढत्या क्रमानं धबधब्याची रुंदी, भव्यता, पाण्याचे लोट व तेवढ्याच पटीनं सौंदर्य न्याहाळलं! वीस मिनिटांचा हा बोटीचा प्रवास एका अप्रतिम लावण्याचं सर्वांग सुंदर, विविध कोनातून दर्शन घडविणारा होता! नायगरा हा अमेरिकन्स व कॅनेडियनचा आवडता 'हनीमून स्पॉट' आहे. 'Love in the mist of Niagara falls' अशी जी जाहिरात केली जाते, ती इथं सार्थ वाटते! 'What could be more dramatic and romantic than having the majestic Niagara as the bafkground for your wedding or honey moon?'

ही माहिती पुस्तिकेतली जाहिरातीची ओळ मी नंतर परतल्यावर अंजूला दाखवली व म्हटलं,

"आपल्या लग्नाचं हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. एका अर्थानं आपली ही सिल्व्हर ज्युबिली ट्रिपच आहे..."

खरंच, आपल्या लग्नाला पंचवीस वर्षे झाली असली तरी नायगरा आमच्यातला 'रोमँटिक' मूड जागृत करीत होता. तर मग प्रेमकुंजन करणारे प्रेमीजन वा नवविवाहित किती मदभरे होत असतील?

आमच्या रसिक मित्रानं म्हटलं, 'वेळ असेल तर जाऊ या आपण इथल्या 'ए रोमँटिक वेडिंग चॅपेल' किंवा 'दि फॉल्स् वेडिंग चॅपेल' ला? ही दोन् हॉटेल्स आहेत, जिथं विवाह सोहळा संपन्न होतो व हॉटेलवाले हनीमूनची जय्यत तयारी करून देतात. अगदी हेलिकॉप्टर वा बलूनने उंचावरून नवविवाहित प्रेमी नायगरा पाहात रोमान्स करू शकतात!" त्याच्या उत्साहाला आवरत आम्ही नको म्हटलं. कारण तिथं जाऊन अमेरिकन पद्धतीचा विवाह सोहळा पाहाण्यापेक्षा तेवढा वेळ नायगराचं सौंदर्य डोळ्यांनी पिण्यात व मनातल्या रोमान्सनं रोमांचित होणं जास्त फायद्याचं होतं!

धबधब्याखालची नदी अमेरिकन व कॅनडा देशाच्या समाईक मालकीची. इथं नदीतून व्हिसा न घेता पाण्यातून पलीकडच्या किनाऱ्यापर्यंत बोटीनं जाण्याची मुभा होती, पण जमिनीवर पाऊल टाकणं शक्य नव्हतं. अर्थात अमेरिकन माणसाला व्हिसा लागत नाही कॅनडात जायला, पण किमानपक्षी पासपोर्ट हवा. तर आम्ही 'हॉर्स शू फॉल' पाहाण्यासाठी पाण्यातून कॅनडा हद्दीत प्रवेश केला आणि भिजत, अक्षरशः चिंब होत धबधबा पाहिला. आणि आमचं नशीब सिकंदर की, चक्क ऊन पडल्यामुळे विलोभनीय असं इंद्रधनुष्य त्यावेळी निर्माण झालेलं पाहिलं. ते धबधब्याचा छेद करीत

व उंच उठणाऱ्या तुषारकरणरूपी धुक्यामधून दोन्ही बाजूला धनुष्याप्रमाणे ताणत साकार झालं होतं. ते इंद्रधनुष्याचे सप्तरंग, धबधब्याच्या पाण्याचे शुभ्रफेनिल धवलकण, खाली खळाळणाऱ्या नायगरा नदीचं व काचेच्या ऑब्झर्वेशन टॉवरचं पाचूच्या रंगाचं देखणं दिमाखदार हिरवेपणा ल्यालेला रंग... वाटलं, जर कधी नायगराला बालकवी आले असते तर 'फुलराणी'लाही मागे सारणारी अप्रतिम निसर्ग कविता त्यांनी लिहिली असती. मी पडलो गद्यलेखक, त्यामुळे 'दि व्हाईस ऑफ गॉड' ही नायगरावर कविता लिहिणाऱ्या विलीस गेलॉर्ड क्लार्कच्या कवितेच्या ओळी त्या सौंदर्याची अनुभूती आत्म्यापर्यंत उतरावी म्हणून गुणगुणत राहीलो.

"These groaning rocks the Almighty's finger piled,
For ages here his painted bow has smiled,
Mocking the changes and the chance of time,
Eternal, beautiful, screne, sublime!"

"आय सॅल्यूट यू मि. क्लार्क! तुम्ही आमच्या बालकवीचे सख्खे भाऊ शोभता. किती वेचक शब्दात नायगराचं सौंदर्य तुम्ही शब्दबद्ध केलं आहे. Smiling painted bow.... अर्थात, स्मितहास्य करणारं इंद्रधनुष्य.. सिंपली ग्रेट!'' मी मनोमन त्या शब्दप्रभूला नमन केलं!

दर पंधरा मिनिटाला एक 'मेड ऑफ द मिस्ट' बोट दोन्ही देशांच्या किनाऱ्यावरून सुटते. आम्ही परतत असताना दोन बोटी नदीमध्ये जाताना दिसल्या. साऱ्या पर्यटकांच्या अंगावर निळा प्लास्टिकचा गाऊन... बोटीवर निळाई जणू पसरलेली. हिरव्या चमकत्या पाण्यावर तरंगत जाणारी निळी झालेली बोट आणि वर स्वच्छ निळं आकाश... मागे मागे जाणारा नायगरा धबधबा व त्याचं शुभ्रफेनिल पाणी.. अजूनही त्यावर पडलेलं इंद्रधनुष्य कायम होतं.. आसमंतावर सायंकाळ पसरत होती. आम्ही तृप्त होऊन मुक्तपणे परतत होतो.

पुन्हा गाईड सोबतीला होता. कॉफी घेत संभाषण चालू होतं. गाईडनं 'मेड ऑफ द मिस्ट' ची रोमांचक कहाणी सांगितली आणि नायगराच्या सौंदर्याला रहस्य व रोमांचाची ऊब मिळाली, आणि मनातला नायगरा अधिकच रसीला होत गेला!

"कोणे एके काळी या पृथ्वीतलावरील माणसे निसर्गाशी एकरूप होती. ती धरती, आकाश, चंद्र, सूर्य, ताऱ्यांशी बोलत होती. त्यांच्यासाठी पशू, पक्षी व वृक्षसंपदा बंधू-भगिनी व सगे सोयऱ्याप्रमाणे होती. 'थंडर' या नावानं ओळखली जाणारी, जणू देवदूताप्रमाणे असलेली जमात माणसांना एकात्मता सांगत होती. काय होतंय व काय होणार आहे हेही सांगत होती.

"पण माणसाची जात कृतघ्न. ती हळूहळू विसरत होती. पृथ्वी, आकाश, सूर्य, तारे व प्राणी माणसांशी अजूनही संभाषण करायची. पण माणसांची कर्णेंद्रिये जणू

बधिर झाली होती. ती त्यांचं गूज ऐकेनाशी झाली होती. ती 'थंडर' जगता- प्रती मूक-बधिर झाली हेती.

"त्या काळातली ही कहाणी आहे. जेव्हा माणसांनी शेवटची 'थंडर' वाणी ऐकली होती."

गाईडची कथनशैली मोठी रसाळ व रोचक होती. या प्रस्तावनेनंतर त्यानं कहाणी सांगितली, ती अशी :

*"कित्येक वर्षात माणसांनी 'थंडर' जगताची वाणी ऐकली नव्हती, त्या काळात नायगरा गावातली एक तरुणी उन्हाळ्यातील एके दुपारी एका झाडाखाली झोपली* होती. तेव्हा तिथून एक वृद्ध स्त्री जात होती. तिनं पाहिलं की, सापासारखं काहीतरी सरपटत त्या तरुणीच्या वस्त्रात शिरलं होतं. तरुणीला त्याचा पत्ताच नव्हता. कारण ती गाढ झोपेत होती.

पण त्या वृद्ध स्त्रीनं त्याकडे दुर्लक्ष केलं. तरुणीला न उठवता, तिला काही न सांगता ती निघून गेली.

काही वर्षांनी ती तरुणी विवाहबद्ध झाली. पण काही दिवसात तिचा नवरा अचानक वारला. तिनं त्यानंतर दोनदा विवाह केला, पण संसारसुख तिच्या नशिबात नसावं, दोन्ही नवरे लग्नानंतर काही दिवसातच अचानकपणे मृत्युमुखी पडले.

ती तरुणी घाबरली होती. काय करावं अन् काय करू नये याचा तिला बोध होत नव्हता! ती वृद्ध स्त्री तिला काय घडलं ते सांगून मदत करू शकली असती. कारण त्या सर्पासारख्या सरपटणाऱ्या प्राण्यामुळे ती तरुणी विषकन्या बनली होती. तिच्याशी संग होताच तिचे तिन्ही नवरे मृत्युमुखी पडले होते, पण तिला त्याची खबर नव्हती. त्या वृद्ध स्त्रीचं वर्तन हेच सांगत होत की, माणसं स्वार्थी आणि अविश्वासू बनली होती!

त्या तरुणीनं निराश होऊन स्वत:चा शेवट करायचं ठरवलं. तिनं नायगरा धबधब्यावरून उडी मारून प्राण द्यायचं ठरवून एके दिवशी उडी मारली, पण धबधब्याच्या पाण्यावरून खाली फेकली जाताना तिला जाणीव झाली की, ती हळुवार गतीनं धबधब्याच्या पायथ्याशी जात होती. जणू कुणीतरी तिला पकडून तिची गती मंद करीत होतं. कुणीतरी तिला धबधब्याच्या पाण्याच्या मागे ओढून घेतलं, अंधारामुळे कोण ते तिला कळतं नव्हतं.

काही वेळानं त्या अंधारात तिला दिसू लागलं. ती एका अंधाऱ्या गुहेत होती व सभोवती अनेक माणसं होती, ती सारी 'थंडर' जमातीची होती. त्यांनी तिला सांगितलं की, ते अदृश्य असतात. केवळ धबधब्याच्या मागे प्रकट होतात व इतरांना दिसतात. त्यांनी तिला तिच्या आत्महत्येच्याबाबत विचारलं. तेव्हा तिनं आपली करुण कहाणी सांगितली. तेव्हा एक 'थंडर' माणूस हसून म्हणाला,

''बेटा, आम्हाला माहीत आहे सारं काही. तुलाच ज्ञात नाही'' आणि त्यानं त्या दुपारी ती झोपली असताना तिच्या वस्त्रात कसा सर्प शिरला व ती कशी विषकन्या बनली हे सांगितलं, आणि आश्वस्त केलं की, तिला त्यांची जमात जादूई शक्तीनं बरं करेल....

थंडर जमातीच्या माणसांनी मंत्रोपचारानं व आपल्या अद्‌भुत शक्तीनं तिला बरं केलं. पूर्ववत केलं, आणि सांगितलं, 'जा आता आपल्या माणसांत, तू पूर्ण बरी झाली आहेस. जा, सुखात संसार कर! या पुढे तुला दुनिया 'मेड ऑफ दि मिस्ट' या नावानं ओळखेल!''

आमच्या गाईडनं कहाणी पूर्ण झाल्यावर खुलासा करीत म्हटलं, ''यू नो फ्रेंडस् 'मेड ऑफ दि मिस्ट' चा अर्थ दवबिंदूप्रमाणे अनेक छोटे जलकण एकत्र धुक्यासारखा पण काहीसा दाट लोट होय. धबधब्याचं पाणी खाली फेकलं जात असल्यामुळं जे तुषारकण दाट स्वरूपात वर येतात त्याचं निर्देशक आहे - 'मेड ऑफ द मिस्ट'.

या नावानं १८४६ पासून बोट चालते. ती प्रवाशांना धबधब्याच्या जास्तीत जास्त जवळ नेते, त्यांच्या मागे असलेल्या 'थंडर' ची वाणी ऐकण्यासाठी, पण त्या काळानंतर माणसे जास्तच स्वार्थी व अविश्वासू बनली आहेत व त्यांचे कान 'थंडर' जमातीची वाणी ऐकण्यास सक्षम राहिले नाहीत.

पण 'मेड ऑफ दि मिस्ट' ची कहाणी, बोटीनं धबधब्याच्या प्रपातापर्यंत जाणं हेच सूचित करत असतं की, माणसानं त्या काळाप्रमाणे निसर्ग, पृथ्वी व आकाशाशी तादात्म्य पावावं, म्हणजे त्यांचे आवाज ऐकता येतील! आणि जग किती तरी अधिक सुंदर होईल. या नायगराच्या सौंदर्याप्रमाणे...

आता अंधारून आलं होतं. पण नायगरादर्शन पूर्ण झालं नव्हतं. रात्रीची विद्युत रोशणाई अद्याप पाहायची होती! गाईडनं अशीही माहिती दिली की, २१ मे ते ४ सप्टेंबर पर्यंत दररोज रात्री १० वाजता आपल्याकडे दिवाळीत जशी आतषबाजी होते, तशी केली जाते, ती हा ऑक्टोबर महिना असल्यामुळे पाहाता येणार नव्हती, त्यामुळे काहीशी हळहळ वाटली. (पण त्यावेळी आम्हाला कुठे कल्पना होती की सिरॅक्यूस जवळच्या ओनांडोमा तळ्याच्या काठी २५ नोव्हेंबरला 'थॅक्स गिव्हींग' तारखेला आतषबाजी तळ्याकाठी पाहायला मिळेल!)

दिवसभर भटकून भूक लागली होती. आमचा मित्र आम्हांस 'कोहिनूर' या भारतीय पद्धतीच्या हॉटेलमध्ये जेवायला घेऊन गेला. तिथं पंजाबी पद्धतीचं चवदार भोजन मिळालं. वर 'डेझर्ट' म्हणून तांदळाची खीर! तृप्त मनानं आम्ही पुन्हा धबधब्याकडे वळलो.

सारा परिसर विद्युत रोशणाईनं झगमगून गेला होता. आम्ही थ्री सिस्टर्स बेटावरून धबधबा पहात होतो. दिवसाचे शुभ्रधवल पाणी कधी गुलाबी लाल, तर कधी

निळं - पिवळं, हिरवं होतं होतं. त्यात एक वेगळंच सौंदर्य जाणवत होतं, तेही डोळ्याचं पारणं फेडणारं होतं! 'आज धरती बनी है दुल्हन' ही एका फिल्मी गीताची ओळ आठवली. खरंच, हा नायगरा परिसर नववधूप्रमाणे शृंगारला होता. कलात्मकरीतीने अभिरुची संपन्न!

रात्रभर स्वप्नात व बंद डोंळ्याआडही नायगराची विविध रूपं आठवत होती. जणू मनोमन फ्लॅशबॅक स्वरूपात पुन्हा पुन्हा नायगरा पहात होतो, अनुभवत होतो. आजच्यासारखी निद्रावस्था क्वचितच सुखद वाटली असेल!

मला श्रीमंतीची वा पैशाची कधीच हौस नव्हती व नाहीय. पण नायगराला वाटत होतं; आपल्या खिशात भरभक्कम डॉलर्स असते तर हेलिकॉप्टरनं मी नायगरा परिसर फिरून पाहिला असता आणि उंचावरून लेक एरी (Lake Erie) व लेक ओंटॅरिओ (Lake Ontario) मधील नायगरा नदी व धबधबा पहिला असता...

खरं तर, केवळ नायगरा धबधबाच नाही तर 'दि ग्रेट लेक सिस्टीम' या नावानं ख्यातप्राप्त असलेला परिसर हे एक महान नैसर्गिक आश्चर्य आहे. त्याचा भूगोल व माहिती अत्यंत आश्चर्यकारक आहे.

खरं तर, नायगरा नदी ही खऱ्या अर्थाने नदी नाही. तशी ती तुलनात्मकरीत्या छोटा पाण्याचा प्रवाह आहे, जो दोन मोठ्या तळ्यांना जोडतो. ही तळी म्हणजे 'लेक एरी' व 'लेक ओंटॅरिओ'. लेक एरी ह्या गोड्या (फ्रेश) पाण्याच्या तळ्याचा परिसर सुमारे दहा मैलाचा आहे, त्याची लांबी २४१ मैल तर रुंदी ५७ मैल असून २१० फुटांपर्यंत त्याची खोली आहे. लेक ओंटॅरिओ ७५४० मैल परिसरात पसरलेला त्याची लांबी १९३ मैल व रुंदी ५३ मैल आहे. हे तळे एरीपेक्षी जास्त खोल आहे. त्याची महत्तम खोली ७७४ फूट आहे.

ही दोन तळी आणखी अशीच तीन महाप्रचंड तळी 'लेक सुपेरिअर', 'लेक हुरून' (Huron) व 'लेक मिशिगन' मिळून एक महान नैसर्गिक आश्चर्य म्हणून म्हणता येईल असा 'दि ग्रेट लेक सिस्टिम' हा जलप्रवाह (Mass of Water) तयार झाला आहे. ही तीन तळी तर एरी व ओंटॅरिओपेक्षाही प्रचंड मोठी आहेत. जगाचं एक पंचमांश गोडं 'फ्रेश' पाणी या 'दि ग्रेट लेक सिस्टीम' मध्ये साठवलं आहे, एवढं नमूद केलं तरी पुरेसं आहे.

वर मी लिहिलं आहे की, शब्दातून, वाणीतून किंवा छायाचित्रातून नायगरा धबधबा खऱ्या अर्थाने जाणवणार नाही. तो प्रत्यक्ष पाहून अनुभवायलाच हवा. तसंच काहीसं 'दि ग्रेट लेक सिस्टिम' चं म्हणता येईल. ही पांच महाप्रचंड तळी कशी पाहायची? त्यांचा प्रचंडपणा कसा अनुभवायचा? त्यासाठी हेलिकॉप्टरच हवं. पण - जेब जितनी चाहिये थी, भरी नहीं थी.

मला माझ्या एका मंत्र्याचा काही वर्षे निजी सचिव असलेल्या अधिकारी मित्राचं

बोलणं आठवलं. तो कन्याकुमारी व तीन सागरांचा संगम हेलिकॉप्टरनं पाहून आला होता. "मित्रा... या पदाचा खऱ्या अर्थानं आज फायदा झाला. हिंद महासागर, अरबी समुद्र व बंगालच्या खाडीचा त्रिवेणी संगम, खडकावरील विवेकानंदांचा पुतळा आणि सूर्यास्त हेलिकॉप्टरमधून पाहिला.... आणि डोळे धन्य झाले..."

मी अजून कन्याकुमारीला गेलो नाही, पण मित्राच्या लकाकत्या डोळ्यातून जो अद्भुत आनंद ओसंडत होता, तो पाहून खरंच सांगतो, मला त्याचा हेवा वाटला होता त्या क्षणी...

आणि आज अशा पद्धतीनं 'दि ग्रेट लेक सिस्टीम' पाहाता येत नाही म्हणून जीव हळहळत होता. बलूननं वरून धबधबा पाहाणं शक्य होतं, पण पंधरा दिवसापासून तो तांत्रिक कारणास्तव बंद होता! असो. जे पाहिलं नाही, त्याबद्दल हळहळण्यात काहीच अर्थ नव्हता. कारण जे पाहिलं, तेही अद्भुत स्वर्गलोकीचं लावण्य पाहिल्यासारखं होतं. ती तृप्ती, ते समाधान व तरीही पूर्णपणे ते नजरेत साठवून घेता येत नाही याची अतृप्ती मला नासवायची नव्हती. पण पंधरा दिवसातच मला कॅनडाच्या टोरँटो शहरात जाता आलं. तिचं सी. एन. या जगातील सर्वांत उंच टॉवरवरून लेक ओंटॅरिओचं सागरासारखं आकाशाला भिडलेलं पाणी व त्याची प्रचंडता पाहिली आणि अंशमात्रानं 'दि ग्रेट लेक सिस्टीम' पाहिल्याचं समाधान वाटलं!

०-०-०

# ३. हत्तींचा अनाथ आश्रम

जंगल म्हटलं की 'जंगल का कानून'प्रमाणे तिथं दुबळ्या, जखमी व स्वत:चं अन्न-पाणी मिळवू न शकणाऱ्या जनावरांना स्थान नसतं हे निसर्गाचं अमानुष असलं तरी रोकडं सत्य आहे.

पण कल्पना करा; एक हत्ती शिकाऱ्याच्या गोळीनं दोन्ही डोळ्यांनी अंध झाला आहे दुसरी एक हत्तीण जंगलात पेरलेल्या सुरुंगामुळे जखमी होऊन तिच्या चार पायांपैकी एक पाय चक्क फूट-दीड फूट कमी झाला आहे व तिला तीन पायावर प्रचंड शरीराचा भार वाहावा लागतो आहे. आणखी एक हत्ती आहे, दहा वर्षाचा झाला तरी त्याच्या घशात विकार झाल्यामुळे हत्तीचं अन्न - विविध झाडांची पाने व खाद्य त्याला खाता येत नाही. दूध व पाण्याखेरीज काही गिळता येत नाही. जंगलाचा कानून जर खरा असेल तर हे तिन्ही हत्ती काही दिवसही जंगलात जगू शकणार नाहीत. पण आज हे तिन्ही हत्ती सहीसलामत असून छानपैकी जगत आहेत.

कारण त्यांना लाभला आहे जगातला एकमेव असलेला अनाथ आश्रम, हत्तीचा अनाथ आश्रम. श्रीलंका देशात हे 'पिनावाल एलेफंट ऑर्फनेज' आहे ते मला श्रीलंका भेटीत पाहायला मिळालं आणि एक वेगळा अनुभव मला मिळाला. कोलंबो शहरापासून ऐंशी किलोमीटर अंतरावर हे रेल्वे स्टेशन आहे, तेथून दोन किलोमीटर अंतरावर हा पिनावालचा हत्तीचा अनाथ आश्रम 'माओया' या नदी-किनारी आहे. तो सुमारे पंचवीस एकर जमिनीवर वसला आहे. तिथे सध्या त्र्याहत्तर हत्ती आहेत. १९७५ साली अनाथ आश्रमाची सुरुवात झाली. जंगलात ज्या हत्तींना त्यांच्या माता नाहीत, अशा अनाथ हत्तींची रक्षा व्हावी व त्यांना नीट, शक्यतो नैसर्गिक वातावरणात जगता यावं म्हणून तो वसवला गेला आणि अनाथ हत्तींना आपलं एक हक्काचं, माणसांनी बनवलेलं, घर मिळालं!

हत्तींना अनाथ रूप कसं येत? एक कारण म्हणजे हत्तीच्या आईचा नैसर्गिक मृत्यू; दुसरं म्हणजे माणूसरूपी शिकाऱ्याचं होणारं आक्रमण. तिसरं कारण श्रीलंकेमध्ये जो लिटेचा स्वतंत्र होण्यासाठी सशस्त्र झगडा चालू होता, त्याचाही

परिणाम आहे.

आज हा हत्तींचा अनाथ आश्रम जगभरच्या पर्यटकांच्या आकर्षणाचं केद्र बनला आहे. जो पर्यटक श्रीलंकेला येतो, तो सहसा हा पिनावालाचा अनाथ आश्रम चुकवत नाही.

मी श्रीलंकेला पाऊल ठेवल्यापासून कँडीचं बुद्धाचा दात असलेलं दंत मंदिर व पिनवाला हत्ती अनाथ आश्रमाबाबत प्रत्येकाकडून ऐकलं होतं. त्यामुळं भल्या पहाटे टॅक्सीनं कोलंबोतून निघालो व सकाळी आठला पोहोचलो. सुट्टीचा दिवस नसूनही सुमारे पाच-सहा हजार पर्यटक जमा झाले होते.

ही सकाळची वेळ त्यांच्या खाण्याची होती. हत्तीपुढे नारळ, जॅकफ्रूट, कुंबक आदी झाडांची पाने व विशेष पशुखाद्य ठेवलं होतं तर छोट्या, एक ते तीन वर्षाच्या, हत्तींना बाटलीतून दूध पाजवलं जात होतं. आश्रमाचे प्रशिक्षित कर्मचारी दोन तीन लिटर दुधाच्या मोठ्या बाटल्या सोंड वर केलेल्या हत्तीच्या घशात उपडी करत होते व गटागटा आवाज करीत बाल हत्ती मजेत पीत होते. मीही मग एका हत्तीला जवळ जाऊन दूध पाजलं. त्यावेळची त्याच्या खोल मोठ्या डोळ्यातली तृप्ती पाहून आईने बाळाला दूध पाजल्यावर कशी वात्सल्याची अनुभूती होते, त्याचा प्रत्यय आला.

सकाळच्या खाण्यानंतर दहा ते बारा ही वेळ हत्तींच्या शाही स्नानाची. बांधलेले हत्ती मोकळे केले जातात व एका ओळीत साठ-सत्तर हत्ती मिरवणुकीने जथ्था करून जावे तसे - नदी किनारी निघतात, हेही दृश्य अनोखं व दुर्मीळ. आम्ही सारे पर्यटक त्यांच्या बाजू बाजूने त्यांना साथ देत नदी किनारी अर्ध्या तासाच्या वाटचालीने गेलो. सारे हत्ती शिस्तीत व रांगेत जात होते. ते नदीच्या पाण्यात शिरले व एकमेकांवर पाणी उडवत मनसोक्त खेळू लागले. दोन - तीनशे मीटरच्या क्षेत्रात नारळ व कुंबक अश्व ट्रॉपीकल रेन फॉरेस्टच्या हिरव्याकंच वृक्षराजीच्या पार्श्वभूमीवर चमकत्या सूर्य प्रकाशात, खळाळणाऱ्या लाटेत एका वेळी साठ सत्तर हत्ती जलक्रीडा करताना पाहून डोळ्याचं पारणं फिटलं होतं. त्यांची मस्ती, एकमेकांच्या अंगचटीला जाणं, सोंडेतून पाण्याची भली मोठी लाट सोडणं, पाण्यात लोळत अंग घासणं किंवा शांत पडून राहणं... सुमारे दोन तास ही जलक्रीडा आम्ही अनुभवली व परत हत्तींच्या निवासस्थानी आलो.

आता गाईडसह फिरून एक एक हत्तीची जन्मकहाणी ऐकू लागलो. त्यातून हा अनाथ आश्रम कसा आकारला आला याचं चित्र नजरेसमोर साकारलं. पर्यावरण संवर्धनाचं यापेक्षा अधिक चांगलं उदाहरण शोधूनही सापडणार नाही.

आम्हाला गाईडनं 'राजा' नावाचा दोन्ही डोळ्यांनी अंध असलेला हत्ती दाखवला. तो जन्मांध नव्हता, तर शिकाराच्या गोळीनं अंध झाल्याचा कर्मचाऱ्यांचा अंदाज आहे. सुदैवानं राजा त्यांना जंगलात जखमी अवस्थेत मरायला टेकलेला असताना सापडला

व तो इथं आणला गेला. आज तो स्वस्थ आहे. पण तो जगण्यासाठी पूर्णत: माणसांवर अवलंबून आहे. मुख्य म्हणजे माणसाप्रती कृतज्ञ आहे. गाईड मला म्हणाला, "सर, हा आमच्याशी बोलतो. त्याची गर्जना, त्याचा आवाज आम्हाला समजतो. जेव्हा भोजनानंतर त्याचं पोट भरते, तो आम्हाला 'थँक्यू' म्हणतो असं वाटतं."

मी हेलावून गेलो तो सामा ही हत्तीण तीन पायावर चालताना पाहून. ती स्नानासाठी आली होती व अवजड वजन पेलत चालताना होणारी तिची अवस्था पाहून मन कळवळत होतं. बहुधा ती जमिनीत पेरलेल्या सुरुंगामुळे आपल्या एका पायाचा काही भाग गमावून बसली असावी. तिला कृत्रिम पाय बसवायचा प्रयत्न झाला. पण तो सूट झाला नाही, पण आज ती सुरक्षित जगते आहे.

दुपार चढत होती. हत्तींच्या विश्रांतीची वेळ झाली होती. त्यामुळे आश्रम बंद करण्यात आला. आम्ही मधल्या काळात डोळे भरून चारपाच डझन हत्तीचे कळप मनसोक्त पाहून घेतले होते आणि मन भरल्या अवस्थेत अनाथ आश्रमाचा निरोप घेतला.

मानवी प्रज्ञा वादातीत आहे पण हत्तींच्या अनाथ आश्रमाची कल्पना सुचणं, असाहाय्य, जखमी व माताविरहित एक दोन वर्षाच्या हत्तींना सुरक्षित जगवण्यासाठी अधार देण्याचं सुचणं हे प्रज्ञेबरोबर करुणेचं व मानवी भूतदयेचं काम आहे. पिनावालचा हा हत्तींचा अनाथ आश्रम याचं साक्षात दर्शन आहे.

आज जगावर दहशतवादाची दाट छाया पसरली आहे. माणसं माणसाला धर्म, भाषेच्या नावाखाली मारत आहेत. भारत त्याचा गेले दोन दशके सामना करीत आहे. श्रीलंकेतही इलम लढ्याच्या निमित्तानं त्याचा अनुभव आला आहे. माणसाला सुरक्षित वाटेनासं झालं आहे. अशावेळी वनखात्याची माणसं, खरीखुरी भूतदयावादी माणसं अनाथ हत्तींना घर देत आहेत, सुरक्षितता आणि प्रेम माया देत आहेत. जगण्यावर आणि माणसाच्या माणुसकीवर श्रद्धा बळकट करणारी ही मानवी कृती विलक्षण बोलकी आहे.

जाताना मी प्रथम सामाच्या आखूड पायावरून गाईडच्या परवानगीने हात फिरवून मनोमन तिच्या त्या अवस्थेबद्दल ज्यानं ते दुष्कृत्य केलं त्याच्या वतीनं माफी मागितली. मग 'राजा'च्या अंध पण पाणीदार डोळ्यात डोकावून पाहिलं, त्यातली निर्मळता पाहून त्यानं मानवी क्रौर्याला केव्हाच माफ केलं आहे असं वाटलं. असं मन मोठं करून प्रत्येक माणसाला माफ करता आलं तर हे जग अधिक सुंदर होईल असं मनात आलं.

०-०-०

# ४. हे स्वतंत्रते भगवती!

हे स्वतंत्रते भगवती!

तू अमेरिकेची स्वातंत्र्यदेवता, तुला प्रत्यक्ष याची देही याची डोळा पाहिलं आणि ओठावर स्वातंत्र्यवीर सावरकरांचं स्तोत्र आलं, म्हणून तुला 'हे स्वतंत्रते भगवती' असं संबोधतोय!

प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी तुझ्याबद्दल खूप ऐकलं होतं, वाचलं होतं! व्हिडीओ व छायाचित्रं इंटरनेटवर पाहिली होती. पण कवि साहिर म्हणतो ते अगदी खरंय. 'जो बात तुझमें हैं, तेरी तस्वीरमें नहीं!''

न्यूयॉर्क शहराच्या हडसन नदीमधील 'लिबर्टी' बेटावर तुझा वास आहे. बॅटरी पार्कवरून बोटीनं तुझ्या भेटीला यावं लागतं. स्वातंत्र्य हे मानवी जीवनाचं सर्वोत्तम मूल्य आहे. ते म्हणूनच सहजासही लाभत नाही म्हणतात. तसंच तुझं दर्शनही मला पहिल्या दिवशी उशीर झाल्यामुळे व लिबर्टी बेटावर मर्यादित प्रवेश असल्यामुळे झालं नाही. पण जवळच्या उपनगराला मोफत बोट सेवा होती तिच्यातून फिरून तुला दुरून प्रथम पाहिलं. आमच्या घराण्यात दुरून मंदिराच्या कळस दिसला की देवाची धूळभेट झाली असं म्हणतात. तशी तुझी धूळभेट झाली. खरं तर धुकं व अंधारलेलं आभाळ यामुळे तुझी तेज:पुंज हरित प्रतिमा काहीशी काजळलेली वाटली. तो २००४ चा जॉर्ज बुशचा राष्ट्राध्यक्षपदाच्या दुसऱ्या टर्मच्या निवडणुकीचा काळ होता. आजचा बराक ओबामा तेव्हा जगाला अज्ञात होता. पण तुझं काजळलेलं रूप मनात दाटून राहिलं हे मात्र खरं!

दुसऱ्या दिवशी प्रसन्न होऊन आम्हास, तू भगवती, दर्शन दिलंस. स्वच्छ उन्ह व निळं-नितळ आभाळ होतं आणि त्या दीप्तीमय वातावरणात तू नुसती झळाळत होतीस. तुला पाहताना नजर स्तिमित होत होती. मन उचंबळून येतं होतं! एका विशाल लोकशाही देशाचा मी नागरिक, दुसऱ्या एका मोठ्या लोकशाहीवादी देशाच्या स्वातंत्र्याचं प्रतीक असलेली तुझी १५१ फूट शुद्ध तांब्यात घडवलेली सुबक व प्रतीकात्मक मूर्ती पाहताना आम्हा हिंदूंच्या कोणत्याही पूजनीय देवतेपेक्षा अधिक पवित्र व आश्वासक

वाटत होतीस.

ज्या फ्रेडरिक ऑगस्ट बॉर्थोल्डी या शिल्पकारानं तुझी मूर्ती घडवली, त्याला दमनाच्या शृंखलेतून मुक्त झालेली मानवता स्त्री प्रतिमेतून दाखवायची होती, जी त्यानं तुझ्या पायाशी असलेल्या मुक्त साखळ्यातून शिल्पबद्ध केली. तुझ्या उंचावलेल्या उजव्या हातातली जळती मशाल स्वातंत्र्याचं अखंड तेवणारं प्रतीक आहे. तुझ्या मुकुटातील सात किरणे हे सप्तसमुद्र आणि सप्तखंड अधोरेखित करून तू केवळ अमेरिकेची नव्हे तर जगाची स्वतंत्रदेवता आहेस, हेच शिल्पकाराला समस्त नागरिकांच्या मनावर बिंबवायचं होतं!

हे स्वतंत्रते भगवती! तुझी अमेरिका हा जगाचा 'मेल्टिंग पॉट' आहे, तिथं पृथ्वीतलावरील कुठल्याही रंग, धर्म व संस्कृतीचा माणूस गुणवत्ता व परिश्रमाच्या जोरावर मोठा प्रतिष्ठित होतो. जगातील अनेक रोगट देशांना आपल्या रक्तशुद्धतेचा व निर्भेळतेचा विकृत अभिमान आहे, पण तुझ्यामुळे अमेरिका त्यापासून कोसो दूर आहे. उलट तिला संकरतेचा व अभिसरणाचा अभिमान आहे. 'म्युटेशन' व 'इव्होल्युशन' या दोन क्रियांमधून भिन्न तत्त्वे एकरूप होतात, एकमेकात मिसळून जातात आणि इतरांना कमी वा वेगळी लेखणारी वृत्ती गळून पडते, हाच मानवी स्वातंत्र्याचा सारांश व निष्कर्ष आहे. तो तुझा कृपाप्रसाद आहे.

पण तरीही हे स्वातंत्र्यदेवते, मला तुझी पहिल्या दिवशीची धूसर काजळलेली प्रतिमा अबोध मनाला कुठेतरी भिडली होती त्याचा उलगडा मला नंतरच्या अमेरिकन प्रवासात झाला, जेव्हा मी अनेक काळी - कुपोषित - दरिद्री - निग्रो माणसं व त्यांचं भारतीय दलितांशी समांतर असं बहिष्कृत जीवन पाहिलं. एक वर्णभेदामुळे तर दुसरं रंगभेदामुळे समाजरचनेची बळी. त्या भेदाची काजळी तुझ्या रूपावर, तुझ्या मूर्तीवर तुझ्या अहंकारी श्वेतवर्णीय अमेरिकन बालकांनी चढवली होती. तुझ्या तेजाला कुठंतरी ग्रहण लागलं होतं!

वास्तविक स्वातंत्र्य, समता व बंधुभावाचा उद्घोष करणाऱ्या फ्रेंच जनतेची गुलामीची जुलमी प्रथा संपवणाऱ्या व नव्याने स्वतंत्र झालेल्या अमेरिकेला तुझा अप्रतिम पुतळा घडवून दिलेली अजोड व अनमोल भेट होती. त्यामुळेच तू जगाची स्वातंत्र्यदेवता बनली होतीस. पण भारतात जशी कायद्यानं अस्पृश्यता व जात जात नाही, अद्याप गेली नाही, तशीच तुझ्या देशात, हे भगवते, निग्रोंची मानहानी व गुलामी श्वेत अमेरिकन्सच्या मनातून, विचारातून कुठे गेली होती? म्हणून माझ्या संवेदनक्षम अबोध मनात तुझी काजळलेली प्रतिमा घर करून राहिली असावी.

पण २००९ साली नवी पहाट झाली आहे. हे स्वातंत्र्यदेवते, मला खात्री आहे, आज पुन्हा मी तुला दाट धुक्यात व काजळलेल्या आभाळात पाहिलं तरी तुझं मूळ तेजस्वी रूपच दिसेल. ते आता कधीच काजळी धरणार नाही. कारण आता तुझा एक

पुत्र तुझी जी मूल्यं आहेत, तुला घडविताना शिल्पकारानं जी स्वप्ने पाहिली होती, ती आता सत्यात साकारात आहे. कारण आज बराक हुसेन ओबामा हा तुझा तेजस्वी व 'अशक्य ते शक्य' करून दाखवणारा व तसा अमेरिकेतीलच नव्हे तर जगातील सर्वच पीडित, वंचित समाजाला आशावाद देणारा पुत्र अमेरिकेचा ४४ वा राष्ट्राध्यक्ष बनला आहे.

मला त्याच्यात व त्या माध्यमातून तुझ्या प्रतिमेत थोडा येशू ख्रिस्त दिसतो, थोडा पैगंबर भेटतो व खूप काही गौतम सापडतो. अब्राहम लिंकन, महात्मा गांधी, नेल्सन मंडेला आणि मार्टीन ल्युथर किंगचा थोडा थोडा भास होतो. नाही भगवते, नाही, हा माझ्या मनाचा खेळ नाही. ज्याचे वडील केनियाचे मुस्लीम आहेत, माता अमेरिकेची श्वेतवर्णीय ख्रिश्चन आहे व जो इंडोनेशियात वाढला, तो केवळ अमेरिकेतच सर्वोच्च पदावर पोहोचू शकतो. कारण त्या देशावर तुझी कृपादृष्टी आहे. एक भारतीय म्हणून हेवा वाटावा, पण वाटत नाही. कारण आमची कल्पना चावला, आमची सुनिता विल्यम्सला तुम्हीच आपलं करीत अंतराळी विहार करण्याची प्रेरणा दिलीत की, उद्याच्या, पुढच्या निवडणुकीत भारतवंशीय बॉबी जिंदाल रिपब्लिक पक्षाकडून राष्ट्राध्यक्ष पदाचा उमेदवार असेल अशी आतापासूनच तुझ्या देशात चर्चा सुरू झाली आहे ना? हा तुझा व तुझ्या देशाचा मोठेपणा आहे. कारण सारं जग तुझ्या देशात सामावलेलं आहे.

पण एक कळकळीचं मागणं आहे, हे अमेरिकेचे स्वातंत्र्य देवते, तुझ्या पायी. आजही तुझी अमेरिका जगात हुकूमशाहीला का साथ देते? का प्रचंड प्रमाणात शस्त्र, दारूगोळा व भयंकर विध्वंसकारी शस्त्रांची जगभर निर्यात करते? का विकृत उपभोगवाद व अतिरिक्त हाव आणि स्वार्थाची दीक्षा जगभरातील माणसांना श्रेष्ठ अमेरिकेन संस्कृतीच्या नावानं देते? हे - हे तुला पसंत आहे?

नाही ना? मग तुझ्या अमेरिकन बालकांना सुबुद्धी दे. आज एक ओबामा आहे. उद्या हजार होऊ देत. तरच जगात शांतता नांदेल व समृद्धी, सुखशांती येईल!

हे - हे तुझंही स्वप्न आहे ना?

तुझ्यावर शेकडो कवींनी गीतं रचली आहेत, गाणी गायली आहोत. तुझ्या उभारणीच्या वेळी चौथऱ्याच्या कामासाठी निधी संकलित करण्यसाठी इमा लाझारस हिनं तुझ्याबद्दल किती ठामपणे म्हटलं होतं की, तू मूकपणे गात आहेस.

"Give me your tired , your poor,
Your Huddled masses yearning to breathe free
I lift my lamp beside the golden door..

तुझ्या आणखी एका लेकराचं हे कवन पहा...''

"It is a women you see God has put in this place
To stamp out despair ... with love and hope to replace."


तुझ्या राष्ट्राध्यक्ष पुत्राला, बराक ओबामाला, तमाम मानवजातीला जे प्रेम व आशा वाटते, ते सार्थक करण्याचं सामर्थ्य तू दे.

हे स्वतंत्रते भगवती, ज्यांना आमच्या मराठी भाषेत महाकाव्य न लिहिणारे महाकवी म्हटलं जातं, त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशाच्या स्वतंत्रतेच्या देवतेचं हे सूक्त रचलं. त्यांच्या मनात भारतमाता होती, पण व्यापक अर्थानं ते कोणत्याही स्वातंत्र्यकांक्षी देशाचं मुक्तिगीत होऊ शकतं, जशी तूही केवळ अमेरिकेची Statue of Liberty न राहता सर्व मानवजातीची झालीस. म्हणून माझ्यासाठी तू त्यांच्या शब्दातली व अर्थातली 'स्वतंत्रते भगवती' आहेस.

मी तुला पुन्हा एकवार वंदन करतो. जय हो. जय हो!

o-o-o

# आत्मपर



# १. झपाटलेपण ते जाणतेपण

जरासं मागे वळून पाहताना असं वाटतं, की आज माझी जी ओळख आहे, माझं लेखक व प्रशासक म्हणून जे व्यक्तिमत्त्व आहे, त्याची जडणघडण काही प्रमाणात शाळकरी वयात व बरीचशी महाविद्यालयीन जीवनात झाली, मुख्य म्हणजे त्या काळातल्या विविध आंदोलनांच्या भारलेल्या वातावरणानं झाली! साठोत्तरी साहित्यानं, अधिक नेमकेपणानं सांगायचं तर, माणसाचं क्षुद्रत्व ताकदीनं दाखवणाऱ्या 'कोसला', 'वासूनाका' अशा अतिवास्तववादी साहित्यानं आणि प्रस्थापित, पांढरपेशी, सदाशिवपेठी साहित्याला हादरा देणाऱ्या बंडखोर, दलित व स्त्रीवादी साहित्यामुळे माझं साहित्यिक भान आरपार बदलून गेलं. नक्षलवादी चळवळ, जे. पीं.चं नवनिर्माण आंदोलन, महाराष्ट्राच्या जनमनावर कायमचा ओरखडा उठविणारा ७२ सालचा दुष्काळ, आणीबाणीचे दिवस आणि तरुणाईच्या जल्लोषाची युक्रांद चळवळ हे सारं आमच्या तरुण पिढीचं आयुष्य 'मनोहारी' करून गेलं.

मूल्यांच्या घसरणीच्या, प्रस्थापितांच्या मोडतोडीच्या त्या कालखंडात सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक घडामोडी, होणारे बदल आणि संदर्भाचे ताणेबाणे मी सहजतेनं टिपत गेलो. स्वातंत्र्योत्तर काळातल्या पहिल्या दोन दशकांतली तरुणांची पिढी, (जी आदर्शानं भारलेली आणि नवनिर्माणासाठी आसुसलेली, मूल्यांवर विश्वास ठेवणारी होती) आणि आजची नव्वदीनंतरची पोस्ट मंडल, पोस्ट लिबरलायझेशनच्या काळातली तरुणांची पिढी (जी भोगवादी, सामाजिकदृष्ट्या काळजी वाटावी इतपत आत्मकेंद्री आणि प्रतिगामी झाली आहे.) यांच्या मधल्या तरुण पिढीचा मी एक प्रतिनिधी आहे. त्या काळाचा मी प्रॉडक्ट आहे, मी स्वतःला भाग्यवान समजतो. कारण या काळात मराठी साहित्यात प्रस्थापित मूल्यांची प्रचंड मोडतोड (भाऊ पाध्येंसारख्या लेखकाच्या) महानगरीय संस्कृतीच्या साहित्यकृतीनं होत होती, तसंच दलित साहित्यातून विद्रोह, वेदना आणि माणुसकीच्या मूल्यांची पुनर्स्थापना होत होती. हा संक्रमणाचा व प्रचंड खळबळीचा कालखंड माझ्या साहित्यिक जडणघडणीला मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे.

अर्थात, लेखक होण्यासाठी उत्तम व अधाशी वाचक असणं ही पूर्वअट आहे. आईला वाचनाची आवड होती. तिला वाचनालयातून पुस्तकं आणून देण्याचं काम माझ्याकडे होतं. त्यामुळे पाचवी-सहावीपासून वाचनाची गोडी लागली. कुरुंदकरांच्या नांदेडात महाविद्यालयीन जीवन गेल्यामुळे वाचन चौफेर व मूलगामी होत गेलं. ललित साहित्याबरोबर समीक्षा, इतिहास, निबंध यांचंही वाचन होत गेलं. शाळेत असताना हिंदी भाषेच्या परीक्षा दिल्यामुळे व काही मित्रांमुळे हिंदी साहित्यविश्वाचं दालनही खुलं झालं, आणि मग अपरिहार्यपणे इंग्रजी साहित्याकडे वळलो. सांगायचं तात्पर्य काय, माझं वाचन, मी करिअरसाठी विज्ञान शाखेकडे गेलो तरी, साहित्याच्या विद्यार्थ्यापेक्षा अधिक समृद्ध व अद्ययावत् होतं, आजही आहे. मी साहित्यिक कसा आहे माहीत नाही, पण मी पट्टीचा वाचक आहे. अगदी प्रथम श्रेणीचा वाचक आहे, हे मी नि:संशयपणे सांगू शकतो.

लेखनाची सुरुवात बालवयात बालवाङ्मयापासून (पहिल्या काही प्रकाशित कथांमधील एक कथा 'साधना'च्या १९६५-६६ च्या दिवाळी अंकासाठी होती, असं आठवतं) झाली. मग सुहास शिरवळकर ज्या रहस्यकथा स्पर्धेतून पुढे आले, त्याच स्पर्धेत भाग घेऊन शंभर पानांच्या चार-सहा रहस्यकथा स्पर्धेतून १९७४-७५ साली लिहिल्या. त्यानंतर माझ्या लेखनाला नवे धुमारे फुटले. कथालेखन सुरू केलं. १९७० ते ८० च्या दशकातल्या तरुण - विद्यार्थी जीवनाचं (अर्थात मुंबई-पुणे ही महानगरं सोडून जो अप्रगत महाराष्ट्र होता, त्या महाराष्ट्राच्या विद्यार्थी जीवनाचं) दर्शन त्यातून घडतं. 'कथांजली' व 'अंतरीच्या गूढ गर्भी' मधील काही कथा आजही मला भावतात, त्या काळात घेऊन जातात आणि पुन:प्रत्ययाचा आनंद देतात.

'वर्तमानकाळाच्या समस्या आणि माणसाचं जगणं रेखाटणारा साहित्यिक' अशी आज माझी जी ओळख आहे, त्याची सुरुवात माझ्या एका अप्रकाशित (जिची प्रत हरवून गेली आहे) कादंबरीनं झाली. ती मी आणीबाणीनंतरच्या कालखंडावर लिहिली होती. एका मोठ्या प्रकाशकाला ती आवडलीही होती. पण काही कारणानं ती त्यांनी आश्वासन देऊनही छापली नाही. असो.

माझी पहिली प्रकाशित लघुकादंबरी 'सलोमी', माझं वेगळेपण अधोरेखित करणारी. रझिया पटेलच्या सिनेमाबंदी चळवळीच्या पार्श्वभूमीवरील, परभणी-नांदेड भागातल्या एका सुशिक्षित मुस्लीम बंडखोर तरुणीच्या पराभवाची व वाताहतीची कहाणी म्हणजे 'सलोमी'; त्यातच 'दौलत' नावाची दुसरी लघुकादंबरीही समाविष्ट आहे. मराठी दलित तरुण व निग्रो तरुणीची प्रेमकहाणी त्यात मी चितारली आहे. दोघेही आपापल्या समाजरचनेचे अनिवार्य बळी, पत्रमैत्री व प्रत्यक्ष भेटीतून ते एकत्र येतात, तेव्हा त्यांच्यात प्रेमभाव निर्माण होतो, त्याची ती कहाणी आहे.

'सलोमी', अफगाणिस्तानातील दहशतवादाचा पर्दाफाश करणारी ९०० पृष्ठांची

महाकादंबरी 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' आणि 'पाचवी शहाबानो' मिळून काही कथांमुळे 'मुस्लीम विषय हाताळणारा साहित्यिक' अशी माझी ओळख झाली आहे, ती मला महत्त्वाची वाटते. कारण भारतातील हिंदू समाजात मुस्लिमांविषयी प्रगाढ अज्ञान आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे संशयाची व फाळणीमुळे मुस्लिमांविषयी द्वेषाची भावना अनेक हिंदूंच्या मनात असते. त्यांचं जगणं, त्यांचे संघर्ष, त्यांचा धर्म व परंपरा आदीविषयी फारच कमी माहिती असते. परंतु मी मूळचा मराठवाड्याचा, जो निजामी राजवटीखाली काही शतकं होता, म्हणून माझा मुस्लीम समाजाशी जवळून संबंध आला आणि ऊर्दू साहित्याच्या वाचनामुळे त्याच्या अंतरंगातही डोकावता आलं. मागे कुरुंदकर व आता शेषराव मोरे यांच्यामुळे इस्लाम धर्म व परंपरांचा माझा अभ्यास होत गेला. त्यामुळे हा समाज समजून घेताना लिखाण घडत गेलं. पुन्हा प्रशासक म्हणून दंगली, साक्षरता अभियान आणि जातीय सलोखा आदी विषय हाताळताना मुस्लीम समाजाशी सातत्याने संवाद होत गेला, माझं मुस्लीम समाजाविषयीचं ललित लेखन, कथा व कादंबऱ्या हा त्याचाच परिणाम आहे.

आधी उपजिल्हाधिकारी व मागील पाच सहा वर्षांपासून आय.ए.एस. म्हणून जवळपास एक तृतीयांश महाराष्ट्रात विविध पदांवर काम करीत, पाणी टंचाई, दुष्काळ, महापूर, रोजगार हमी, नागरी प्रशासन, ग्रामीण विकास असे विषय हाताळताना, माझ्यातला संवेदक्षम लेखक आणि अभ्यासक त्यांच्याशी भिडत गेला. लेखनातली कल्पकता व माणसाच्या प्रश्नांमागची धग व वेदना समजून घेत भिडण्याच्या पद्धतीमुळे मला प्रशासकीय कामात बरंचसं यश मिळालं. लेखकाला विविध अनुभव प्रत्यक्ष वा अभ्यास-चिंतनातून घेता आले पाहिजेत. मात्र महसूल खात्याच्या आणि आय. ए. एस. च्या प्रशासकीय नोकरीमुळे जिवंत, थक्क करणारे अनुभव व मानवी प्रवृत्ती माझ्याकडे चालत आल्या. त्यांची कामं करताना व समस्या सोडवताना आलेले अनुभव मी टिपकागदाप्रमाणे टिपून ठेवले, त्यांचाही लिखाणासाठी उपयोग झाला, नगरपालिका कारभाराच्या काळ्या अंतरंगावर प्रकाश- झोत टाकणारी माझी 'अंधेरनगरी' ही कादंबरी किंवा तहानलेल्या महाराष्ट्राचा 'उदक' हा कथासंग्रह म्हणजे माझ्यातील प्रशासक व साहित्यिक यांचा (माझ्या मते) सुरेख संगम आहे.

माझी जडणघडण झाली ती सर्वआयामी शिक्षणामुळे. मी रसायनशास्त्राचा एम. एस्सी. पदवीधर. लातूरला प्रांताधिकारी असताना बहि:स्थ विद्यार्थी म्हणून एम. ए. (मराठी) प्रथमश्रेणीत केलं. माझी पहिली नोकरी बँकेतली. तिथे एम. कॉम.शी समकक्ष सी. ए. आय. बी. ची परीक्षा पास झालो होतो. म्हणजे मी कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखांचा पदव्युत्तर विद्यार्थी आहे. या खेरीज तीन वर्षांपूर्वी भारत शासनाच्या वतीने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, बंगलोर यथे एम. बी. ए. केलं. तेथे जागतिकीकरणासोबत शिक्षण, आरोग्य व दारिद्र्य या विषयांचाही अभ्यास केला.

मुख्य म्हणजे या सर्व क्षेत्रातील वैचारिक ग्रंथ व मासिकं मी सातत्याने वाचत असतो. मला ज्ञानशाखांचं आकर्षण आहे व त्यातलं किमान कळतं, माहीत असतं. याचा उपयोग मला प्रशासनात आणि लेखनातही होतो.

त्याचं एकच उदाहरण देतो. बालमजुरी किंवा बाल कामगार हा मला सतत अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. छोटी मुलं रेल्वेस्टेशनवर, हॉटेल व धाब्यांमध्ये काम करतात. जगण्यासाठी व गरीब आईबापाच्या संसाराला हातभार लावण्यासाठी त्यांना खेळ व शिक्षणाच्या कोवळ्या वयात बारा तास कामाला जुंपून घ्यावं लागतं. त्यांचं होणारं शोषण, त्याचं हरवणारं बालपण व अकाली प्रौढ होणं (हिंदी कवी अशोक चक्रधराच्या शब्दांत, 'बूढे बच्चे' होणे) हे माझ्यातल्या लेखकाला व माणसाला अस्वस्थ करायचं आणि प्रशासकाला आव्हान द्यायचं. मी अकोल्यात महानगरपालिका आयुक्त असताना 'नवजीवन' प्रकल्प कल्पकतेनं राबवून (ज्याची राष्ट्रीय बालहक्क आयोगाच्या अध्यक्ष मॅगसेसे पारितोषिक विजेत्या शांता सिन्हाजींनी प्रशंसा केली.) सहाशे बालकामगारांना शाळेत दाखल केलं. हा माझ्या सेवाकालखंडातला उत्कर्ष बिंदू आहे, असं मी मानतो. संधी मिळाली तेव्हा, आय. आय. एम. बंगलोरला एम. बी. ए. करताना बालकामगारांवर संशोधन करून मी प्रबंध सादर केला. त्यानंतर सांगलीला जिल्हा परिषदेवर काम करताना १०० टक्के मुलं शाळेत जातील व त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल यासाठी प्रयत्न केले. हे प्रशासकीय काम करीत असताना माझ्यातला लेखक सतत जागा होता. त्याला यात एक कादंबरी दिसत होती. ती मी नुकतीच लिहून पूर्ण केली आहे आणि लवकरच ती प्रकाशित होईल.

माझ्या जडणघडणीचं व जगण्याचं सूत्र थोडक्यात सांगायचं झालं तर, प्रशासक म्हणून ज्या ठिकाणी व ज्या पदावर नियुक्ती मिळेल, तिथं त्या त्या क्षेत्रात काही तरी मूलगामी काम करून समाज व देशाच्या विकासाला कणमात्र हातभार लावणं, आणि तत्त्वासाठी, नैतिकतेसाठी संघर्ष करताना आलेले अनुभव आणि त्यामागच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक वृत्ती यांच्या आधारे लेखन करणं हे आहे. एकाच वेळी मी प्रशासकही असतो व लेखकही असतो. कामाचा भाग म्हणून बेकायदेशीर झोपड्या तोडल्या आहेत, पण अधिकार वापरून त्यांचं पुनर्वसनही केलं आहे. अकोल्याला घरपट्टी वाढवली, टाकाऊ व आवश्यक नागरी सेवाही दिल्या आणि त्यावर आधारित कथाही लिहिल्या. माझी 'अग्निपथ' ही कथा रस्त्याच्या कामाचं राजकारण केलं जातं व चांगल्या अधिकाऱ्याला कसं बदनाम केलं जातं, यांचं चित्रण करते.

सदैव जागृत असणारं कुतूहल, चौकस वृत्ती व नवी-नवी माहिती मिळवण्याची जिज्ञासा हे माझं भांडवल आहे. संवेदनक्षम मन, विविध ज्ञान-शाखेतला संचार व अफाट वाचन यामुळे प्रश्न व समस्या यांचं आकलन होतं, यामुळे प्रशासक म्हणून काम करताना 'आऊट ऑफ बॉक्स' विचार करीत त्यांना भिडता येतं व त्या प्रश्नांचं

निराकरणही अधिक चांगलं करता येतं. दुसऱ्या बाजूनं, सतत जागा असणारा लेखक त्यातून कथाबीज टिपत असतो. माझी ही जडणघडण खऱ्या अर्थानं कॉलेज जीवनात सुरू झाली, आजही चालू आहे व कधीच संपणार नाही. जीवनातली कुरूपता, अंधाररूपी प्रश्न व समस्या टिपण्यासाठी लागणारी दृष्टी मला आहे, तशीच आदर्शाची व मांगल्याची आस असणारी नजरही लागली आहे. विदारक वास्तव टिपणारी, पण सिनिक वा पराभूत न होता, त्यावर मात करण्यासाठी संघर्ष करणारी आशावादी वृत्ती माझ्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनली आहे. अर्थात, त्याला माझ्या मध्यमवर्गीय मर्यादा जरूर आहेत, पण त्या मर्यादेतही चांगलं काम करता येतं, मूल्याधिष्ठित जीवन जगता येतं, हे काय कमी आहे?

"उपदेश म्हणून नाही, पण स्वानुभवानं (आजवर मी जे करीत आलो, त्या आधारे) सांगतो, कामासाठी भेटायला येणाऱ्या माणसांना कधी टाळू नकोस. कामासाठी येणाऱ्या प्रत्येक माणसाची एक समस्या असते. ती समस्या, त्याच्या जागी आपण आहोत असं समजून जाणून घे आणि सारी कल्पकता, अधिकार व कौशल्य ती समस्या सोडवण्यासाठी वापर. तू चांगला प्रशासक नक्कीच होशील!" पंचवीस वर्षांपूर्वी उपजिल्हाधिकारी म्हणून सुरू केलेल्या प्रशासकीय कारकिर्दीच्या प्रारंभी मला एका ज्येष्ठ प्रशासकानं दिलेला हा कानमंत्र.

"मला वाटतं लक्ष्मीकांत, आज मी मला मिळणाऱ्या पगाराइतकं काम नक्कीच केलं आहे. आता ऑफिसच्या बाहेर पडायला काहीच हरकत नाही." राज्यपालांच्या दौऱ्यासोबत तीन दिवस अष्टावधान बाळगत काम केल्यानंतर रात्री ८ वाजता कार्यालयात येऊन, पहाटे २ पर्यंत थांबून तीन दिवसांच्या साचलेल्या फाइली तपासून झाल्यावर घरी जाताना सांगत होते माझे पहिले प्रशासकीय गुरू, ज्येष्ठ आय. ए. एस. अधिकारी व्ही. पी. राजा. कार्यतत्परतेचा व प्रशासकीय नीतिमत्तेचा सर्वोच्च बिंदू म्हणावा असा तो प्रसंग मी अद्यापही विसरलेलो नाही!

हे दोन प्रसंग वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचे. आणि आता अलीकडच्या काळातले दोन प्रसंग.....

एक ज्येष्ठ मंत्री माझ्या कार्यालयास भेट देणार होते. काही कार्यक्रम नव्हता. पण माझ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला वाटलं की, ते बहुधा महिला बचत गटाचं काम पाहण्यासाठी येणार आहेत. म्हणून त्यानं एक महिला मेळावा आयोजित केला. माझं नाव महिला बचत गटाशी इतकं संलग्न झालं आहे. 'बचत गटांच्या माध्यमातून महिलांचं सक्षमीकरण' हे माझं मिशन झालं आहे." राज्य शासनाच्या सेवेचा राजीनामा देऊन एका खाजगी कंपनीत रुजू झालेले पुण्याचे माजी आयुक्त प्रभाकर करंदीकर मला एकदा गप्पा मारताना सांगत होते. त्यांचा सूर विनोदी व हलकाफुलका होता.

''पण मी भारावलेला केवळ सनदी अधिकारी की ध्येयानं झपाटलेला मिशनरीच?''

जालन्यामध्ये माहितीच्या अधिकाराचा काही व्यक्ति / संस्थांकडून दुरुपयोग केला जातो व अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल केलं जातं, अशा तक्रारी काही अधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांच्यापुढे केल्या. तेव्हा अण्णांनी त्यांच्या शेजारी बसलेल्या, अत्यंत प्रामाणिक व कार्यक्षम उपजिल्हाधिकारी असलेल्या (माऊली' नावानं ओळखल्या जाणाऱ्या) विजयकुमार फड यांच्याकडे बोट दाखवून म्हटलं, ''कुणाही व्यक्तीनं माहितीच्या अधिकाराखाली यांना ब्लॅकमेल करून दाखवावं.'' आरपार स्वच्छ अधिकाऱ्याला यापेक्षा मोठी दाद कोणती असू शकते?

लायसेन्स / परमिटराजच्या जमान्यात 'ब्यूरोक्रसी' किंवा नोकरशाही बदनाम झाली आणि आता 'खाऊजा'च्या (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) जमान्यात तिचं प्रयोजनच काय, असणार प्रश्न उपस्थित केला जातो. पण या देशात अनेक उपराष्ट्रं आहेत, इथे विविध धर्म, भाषा, परंपरा आहेत, लोकरंजनात गुंतलले पक्ष आणि आघाडीचं राजकारण आहे. त्यामुळे दीर्घकालीन विचार न करता राजकीय निर्णय घेतले जातात. अशा काळात भारतीय प्रशासकीय यंत्रणा कितीही कमकुवत व भ्रष्ट असली तरी (सैन्य आणि न्यायव्यवस्थेप्रमाणेच) देश एकसंध ठेवणारी ती एक महत्त्वाची यंत्रणा आहे. कारण लोकप्रतिनिधी व न्याय- व्यवस्था या दोघांनाही ती एकाच वेळी जबाबदार आहे. म्हणूनच ब्रिटिशांनी निर्माण केलेली आय. सी. एस. नामक यंत्रणा (अर्थात् बदलासह) सरदार पटेलांनी स्वातंत्र्योत्तर काळात कायम ठेवताना तिचा केलेला बचाव ब्यूरोक्रसीचं महत्त्व अधोरेखित करणारा आहे. वर उल्लेखलेल्या चार अधिकाऱ्यांचे प्रसंग व विचार हेच दर्शवतात, की 'अब भी बहोत जान बाकी है, इस बदनाम व्यवस्थामें!'

मी असं मुळीच म्हणत नाही, की ब्युरोक्रसीत सारं काही चांगलं व उजळ आहे. किंबहुना ब्रिटिशांनी उभी केलेली ही 'स्टील फ्रेम' आता गंजून गेली आहे. 'वाका' म्हणल्यावर चक्क 'रांगणारी' यंत्रणा असं स्वरूप तिला प्राप्त झालं आहे. महाराष्ट्रासह सर्वत्र ती राजकारणग्रस्त आणि प्रचंड भ्रष्टाचारी झाली आहे.

तरीही माझं ठाम मत आहे, की पेला पुरता खाली झालेला नाही. माझ्या दोन दशकांच्या प्रशासकीय कारकिर्दीच्या आधारे मी हे ठामपणे सांगू शकतो, की या यंत्रणेत अजूनही खूप काही चांगलं घडू शकतं, घडत आहे. महाराष्ट्रात या वर्षी साडेतीन हजार गावं हागणदारीमुक्त झाली. हे काम ग्रामसेवक, गटविकास अधिकारी आणि आय. ए. एस. श्रेणीतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांनीच झालं. त्याला सरपंच व गावकऱ्यांची साथ मिळाली हेही खरं. मी गतवर्षी सांगलीचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना भिलवडी व कुंडलसारखी वीस-वीस हजार लोकसंख्येची मोठी गावं निर्मल झाली. हे काम किती अवघड आहे, हे इतरांना नुसतं ऐकून कळणार

नाही. असो.

भास्कर मुंडे धुळ्यासारख्या जिल्ह्यात जिल्हाधिकारी म्हणून येतात, नदीजोड प्रकल्प कल्पकतेनं राबवतात. टी. चंद्रशेखर येतात आणि नागपूर, ठाणे शहरं कात टाकतात. चावलासारखा अधिकारी कर्नाटकमध्ये पूर्ण राज्याच्या जमिनीचं संगणकीकरण करून, कुणालाही कुठूनही जमिनीचा सातबारा उतारा क्षणार्धात देण्याची सोय करतो, ही कार्यक्षमता नाही?

आत्मस्तुतीचा दोष पत्करून मी माझंही उदाहरण देतो. अकोल्याला मी सिटी बस सेवा प्रकल्प (खाजगीकरणातून) म. न. पा. वर खर्चाचा बोजा न टाकात राबवला, जो आजही चालू आहे. त्यामुळे नागरिकांना अवघ्या दोन ते पाच रुपयांत शहरभर प्रवास करता येतो. आज राज्यात सर्वांत कमी कुपोषित सांगली जिल्हा आहे. तेथील (शून्य ते सहा वयोगटातील) दोन लाख बालकांचा मी अवघ्या पंधरा - पंधरा रुपयात आरोग्य विमा उतरवला. हजारांच्यावर रोगग्रस्त बालकांवर शस्त्रक्रिया केल्याने ती रोगमुक्त झाली. जिल्हा परिषदेच्या ४१० प्राथमिक शाळातून लोकवर्गणीतून हजारो संगणक बसवले. पहिली ते सातवीच्या वर्गांना सर्व विषयांच्या शैक्षणिक सीडीज पुरवल्या. पलूस, शिराळा व तासगाव तालुक्यांतील शंभर टक्के शाळा संगणकीकृत झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढली आहे. २००६ मध्ये माधव चव्हाणच्या 'प्रथम' या संस्थेने महाराष्ट्रभर जे सर्वेक्षण केलं, त्याचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. त्यात त्यांनी लेखन-वाचन क्षमता सर्वाधिक जास्त (माझ्या सी. ई. ओ. च्या कारकीर्दीच्या) सांगलीची असल्याचे नमूद केले आहे. सध्या राज्याचा क्रीडा संचालक म्हणून, आजवर झाला नाही असा एक उपक्रम राबवत आहे. २००८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीच्या भारतीय संघात अधिकाधिक महाराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश व्हावा, म्हणून राज्य शासनातर्फे (महाराष्ट्रात कुठेही होत नसलेली व आजवर भारतातही न झालेली) नऊ खेळांची प्रशिक्षण शिबिरं सुरू केली आहेत. त्यासाठी प्रायोजकत्व मिळवलं व क्रीडापीठाच्या कमाईतला एक कोटीचा निधी वापरला आहे. शासनावर कोणताही आर्थिक बोजा टाकलेला नाही. त्या स्पर्धेत भारताला मिळणाऱ्या पदकांत महाराष्ट्राचा भरीव वाटा असेल, असं माझं मन मला आजच ग्वाही देत आहे.

वाचकहो, तुम्हाला वाटत असेल, की मी 'ब्यूरोक्रमी'चं केवळ गुलाबी व अतिरंजित चित्र रेखाटत आहे. नाही, मी आतापर्यंत 'पेला काही अंशी भरलेला आहे', एवढाच म्हटलं आहे. विदारक वास्तव हे आहे की, पेला अर्ध्यापेक्षाही जास्त (ऐंशी, नव्वद टक्के) रिकामा झाला आहे. ही घसरण रोखली पाहिजे. ते काम प्रामुख्यानं राज्यकर्त्यांचं आहे. स्वप्रेरणेने उत्तम काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचं आहे.

पण आज तरी ते कठीण वाटतं. अशक्यप्राय नसलं तरी रोग बराच मुरलेला असल्याने सोपं नाही.

पण तरीही अशा विपरीत काळातही अंत:प्रेरणेने व ध्येयवादाने झपाटलेले बरेच अधिकारी व कर्मचारी (खास करून जि. प. शाळेत कुणाचाही पाठिंबा नसलेले, उलटपक्षी विपरीत परिस्थितीत असलेले बरेच शिक्षक) काम करीत आहेत. देश व समाजविकासात आपला खारीचा वाटा निष्ठेने उचलत आहेत, त्यांच्यासाठी प्रशासनाचा 'स्वधर्म' पाळत चालणं अग्निपथावरून चालण्यासारखंच आहे.

प्रशासनाचा 'स्वधर्म' कोणता? अंगीकृत काम चोखपणे बजावणं, ही सर्वमान्य व्याख्या झाली. पण भारतात कल्याणकारी राज्यव्यवस्था आहे. म्हणून तळागाळातल्या माणसांच्या विकासासाठी ध्येयधोरण राबवणं हा प्रशासकाचा 'स्वधर्म' आहे. या स्वभावधर्माला जागताना कल्पकता, प्रामाणिकपणा, 'पोलिटिकल बॉसेस' ना प्रसंगी 'नाही' म्हणण्याची हिंमत आणि तळागाळातल्या माणसांचं दु:ख जाणणारी संवेदनशीलता हवी.

मी वेळोवेळी अग्निपथावरून चालताना पाय पोळून घेतले आहेत. चांगुलपणावरचा विश्वास उडावा, असे अनेक कसोटीचे प्रसंग माझ्या वाट्याला आले आहेत. पण स्वत:वरचा विश्वास, आपण काही गैर केलं नाही याची सार्थ जाणीव आणि 'अच्छे के साथ (देर से सही, तकलीफ हो सही पर) हमेशा अच्छा होता है' यावरची डोळस श्रद्धा मला सिनिक होऊन देत नाही किंवा सुरक्षित कवचात स्वत:ला आक्रसून घेत केवळ 'नोकरी एके नोकरी' करू देत नाही.

दोन वर्षीपूर्वी 'अग्निपथ' नावाची कथा मी 'सत्याग्रही विचारधारा' च्या दिवाळी अंकात लिहिली होती. म.न.पा. आयुक्त म्हणून काम करताना आलेल्या स्वानुभवावर ती होती. शहराची प्रमुख नागरी समस्या म्हणजे रस्ते, ते पक्के बांधण्यासाठी पुरेसा निधी नव्हता. म्हणून, बांधा - अर्थसाहाय्य करा - हस्तांतरित करा' (बिल्ड, फायनान्स अँड ट्रान्स्फर) या नव्या पद्धतीनं महाराष्ट्रात प्रथमच काँक्रीटचे १६ प्रमुख रस्ते बांधताना मला ज्या अडीअडचणींना तोंड द्यावं लागलं. (त्यावर खरं तर कादंबरीच होऊ शकेल) त्याचा एक पैलू या कथेत साकारला होता. हा त्रास व अडथळा राजकारणातून होत होता. मी स्वत: भ्रष्टाचार केला नाही व इतरांना करू दिला नाही, म्हणून होत होता. पक्षीय राजकारणाचाही त्याला मोठा पदर होता. तथाकथित 'ब्लॅकमेलर' कम समाजसेवक, जिल्हास्तरीय मीडिया, नगरसेवकांपासून वरच्या स्तराचे राजकीय प्रतिनिधी आणि माझ्याच म. न. पा. चे काही कर्मचारी / अधिकारी या साऱ्यांशी मुकाबला करताना मला विपरीत अनुभव आले. त्या वेळी प्रशासकीय स्वधर्मावरील अढळ निष्ठेमुळेच मी अविचल राहिलो. तरीही प्रचंड त्रास झाला. दोन तीनदा चौकशी झाली. प्रत्येक वेळी 'क्लीनचीट' मिळाली, पण त्याची मोठी किंमत द्यावी लागली.

देशाचे पंतप्रधान म्हणतात, अधिकाऱ्यांनी निर्भयपणे काम केले पाहिजे. धाडसी

निर्णय घेतले पाहिजेत. चाकोरीबाहेर जाऊन काम केलं पाहिजे. पण त्याला 'सपोर्ट सिस्टिम' कुठे आहे? ती जाऊ दे. असं सरळ काम कुणाला हवं आहे? नागरिकांना हवं असतं; पण लोकप्रतिनिधी, तथाकथित समाजसेवक आणि मीडियाशी प्रशासकाला सामना करावा लागतो. माध्यमातला भ्रष्टाचार सर्वव्यापी झाल्यामुळे त्यांच्याकडून पाठिंबा तर सोडाच, अनेक चांगल्या व प्रामाणिक कर्मचारी / अधिकाऱ्यांना बदनाम केलं जातं. 'ट्रायल बाय मीडिया' हा अतिशय भयानक मानसिक खच्चीकरण करणारा प्रकार आहे.

जिल्हा परिषदेचं प्रमुख काम, मानवी विकास हे आहे. त्यासाठी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणी, महिला-बालकल्याण आणि महिला सक्षमीकरण असं सूत्र मांडून 'मानवी विकास निर्देशांकाच्या परिभाषेत बसवून' मी सांगली जि. प. चं स्वतंत्र महिला धोरण आखलं. विभागीय आयुक्त प्रभाकर करंदीकर यांनी त्याची तारीफ केली. पण श्रेयासाठी हपापलेल्या एका महिला सभापतीनं प्रचंड विरोध केला. 'लक्ष्मी' (आर्थिक सक्षमीकरण), 'सरस्वती' (शिक्षण व मानवी विकास) आणि 'दुर्गा' (महिला सबलीकरण) ही प्रतीकं, ग्रामीण महिलांना चटकन समजावं म्हणून सर्रास वापरतात. तिचा मी टीपीत वापर केला. म्हणून एका लोकप्रिय मासिकात माझी 'मनुवादी' म्हणून संभावना केली गेली आणि माझी जातही काढली गेली. तेव्हा 'युक्रांद' व 'साधना' अशा पुरोगामी संस्था - संघटनांशी नाळ असलेल्या माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल? झक मारली आणि या फंदात पडलो, असं वाटलं. विविध योजनांचा मेळ घालीत मी हे धोरण कल्पकतेनं व परिश्रमपूर्वक तयार केलं होतं. पण मनस्ताप व बदनामी वाट्यास आली. तरीही मी शांतपणे काम करीत राहिलो. दीड वर्षांच्या कालावधीत बचत गटांच्या माध्यमातून महिलांचं आर्थिक सक्षमीकरण आणि शिक्षण, हागणदारीमुक्ती व जलस्वराज्याच्या माध्यमातून मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविण्यात अंशमात्राने का होईना, यशस्वी झालो. प्रशासकाचा 'स्वधर्म' जपताना मी ठोस भूमिका घेतल्यामुळे, उपजिल्हाधिकारी पदावर असताना माझ्या सलग तीन बदल्या झाल्या होत्या. त्याचे तपशील देत नाही. पण बदली हे असं ब्रह्मास्त्र आहे, जे वापरून अडचणीच्या वाटणाऱ्या (कार्यक्षम व स्वच्छ) अधिकाऱ्यांना नामोहरम केलं जातं. वारंवार होणाऱ्या बदल्यामुळे मुलांच्या शिक्षणाचे व कुटुंबीयांचे हाल होतात ती किंमत मी मोजली आहे. एक तर स्वत:सोबत प्रत्येक बदलीच्या ठिकाणी कुटुंबीयाना फरफटत नेणं, नाही तर हवी ती जागा मिळवून', 'त्यांच्यात' सामील होऊन, मन मारून काम करणं, यांपैकी एक पर्याय स्वीकारावा लागतो. पहिला पर्याय मी आजवर स्वीकारला आहे

बहुसंख्य नोकरशहा मला व माझ्यासारख्यांना वेडा म्हणतात. त्यांचं साधं सरळ स्पष्टीकरण असतं - शेवटी आपण नोकर आहोत. निर्णय घेण्याचं व देशाची,

समाजाची काळजी घेण्याचं, वाहण्याचं काम लोकप्रतिनिधींकडे आहे. आपण का त्यासाठी तडफड करायची? असा प्रश्न विचारणारे हे विसरतात, की घटनेनं न्यायपालिका, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणा हे तीन स्तंभ राज्य-कारभारासाठी बनवले आहेत. अशोक स्तंभावरील तीन सिंहांप्रमाणे एकमेकांशी जोडले गेलेले, तरीही स्वतंत्र आणि परस्पर पूरक. शिवाय हे विसरता कामा नये, की प्रशासकीय अधिकारी सरकारी धोरणांशी बांधील आहेत, लोकप्रतिनिधींशी नव्हे. त्यामुळे, कायद्याच्या चौकटीत, त्यांचा योग्य अन्वयार्थ लावून विकास - प्रशासनाला गती देणं, हे प्रशासकाचं धोरण असलं पाहिजे. पण लक्षात कोण घेतो?

आज सर्व क्षेत्रात मूल्यांची घसरण होत आहे. प्रशासनही त्यापासून मुक्त नाही. प्रशासकांना चांगलं वेतन, बऱ्याच सोयीसुविधा दिल्या आहेत. मानसन्मान देणारी नोकरी आहे. पण अमर्याद अधिकार, भ्रष्टाचार करण्यासाठी अनेक संधी आणि इतर समाजघटकांचं दडपण यामुळे वरचे अधिकारीही भ्रष्ट होताना दिसतात. शिवाय, चांगलं काम करणाऱ्या प्रशासकांना मोठ्या प्रमाणात नामोहरम केलं जातं. त्यामुळे प्रचंड वेगाने घसरण चालू आहे. अशाही परिस्थितीत, स्वत:ची तत्त्वे व निष्ठा जपत, प्रशासकीय स्वधर्म पाळताना अग्निपथावरील वाटचाल मी माझ्या परीनं करीत आहे. निष्ठेने जगणाऱ्यांना दिलासा देणारी हरिवंशराय बच्चन यांची एक कविता -

**''तू न थमेगा कभी,**
**तू न मुडेगा कमी,**
**ले शपथ, ले शपथ**
**ले शपथ अग्निपथ,**
**अग्निपथ अग्निपथ''**

सवाल एकच आहे. हे अग्निपथाचं व्रत मला शेवटपर्यंत निभावता येईल का? माझा प्रशासकीय 'स्वधर्म' मला जपता येईल का?

गुजरातमधील दंगलींच्या पार्श्वभूमीवर, मुस्लीम समाजात स्वत:ची ओळख व अस्तित्व यांबद्दल निर्माण झालेला प्रश्न रेखाटणं आणि त्याचं उत्तर म्हणून त्या समाजाने मदरसा शिक्षणाकडे वळणं, हे सूचकतेनं सांगणारी माझी एक कथा आहे, 'उद्ध्वस्त, अस्वस्थ मनाचा शोध.' ती वाचून मालेगाव दंगलीत स्वत:चं घर जळताना पाहून पोळलेल्या एका मराठी मुस्लिमानं सुरेख मराठी हस्ताक्षरात मला लिहिलेलं पत्र ही माझ्या लेखनाला मिळालेली मोठी दाद आहे. ती कथा वाचून तो वाचक अक्षरश: रडला होता. तिच्यातली सच्चाई त्याला भिडली होती. मुस्लिमांच्या बदलत्या मानसिकतेचं अचूक निदान त्या कथेमध्ये मी केलं, असं त्या वाचकाच्या पत्रानं अधोरेखित झालं.

तीन वर्षांपूर्वी राजहंस प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या

कादंबरीतही (अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवर) मुस्लीम समाजातील एका वर्गात कुराण व हादिसचा हवाला देत वाढत जाणाऱ्या मूलतत्त्ववादाचं आणि त्यातून निर्माण होणाऱ्या 'तालिबानी' कट्टरतेचं दर्शन की घडवलं होतं. (त्याचं विस्तृत परीक्षण 'साधना'मध्ये अभिजित वैद्य यांनी केलं होतं.)

माझ्या आजवरच्या लिखाणात मुस्लीम मनाचा शोध घेत केलेल्या लेखनाचा वाटा बराच आहे. म्हणजे किती? माझी पहिली प्रकाशित कादंबरी मुस्लीम समाजातील 'सिनेमाबंदी' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आहे. माझ्या आगामी कथासंग्रहाचं नाव आहे 'पाचवी शहाबानो' त्यात प्रामुख्याने मराठवाड्यातील मुस्लीम समाजाच्या दयनीय स्थितीचं दर्शन घडविणाऱ्या कथा आहेत.

सध्या मी काश्मीर प्रश्नावरील कादंबरी लिहिण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्यातही काश्मिरी मुस्लीम मानसिकतेचा व सूफी परंपरेनं समृद्ध झालेल्या 'गंगाजमनी' किंवा 'मिलीजुली' परंपरेचा धागा महत्त्वाचा आहे. झालंच तर, मागेपुढे हैद्राबाद ते (व्हाया कारगिल - श्रीनगर) काबूल कंदाहार अशी माझ्या लेखनप्रवासाची वाटचाल होणार आहे.

एका अर्थानं मी 'मुस्लीम ऑबसेस्ड' आहे. मुस्लीम धर्म व समाज मला एक भारतीय म्हणून समजून घ्यायचा आहे, कारण पंधरा ते अठरा टक्के लोकसंख्या असलेल्या मुस्लीम समाजाला सहृदयतेनं समजून घेत, 'मिली-जुली' किंवा 'गंगाजमनी' संस्कृती विकसित केल्याशिवाय या देशाची सर्वांगीण प्रगती होऊ शकणार नाही, असं माझं ठाम मत आहे, म्हणून भारतीय मुस्लीम जीवनाचं माझ्या परीनं हिंदूंना - खास करून मराठी समाजाला - दर्शन घडवायचं आहे. माझ्या वाचनातही इस्लाम व मुस्लीम समाजावरील इंग्रजी 'फिक्शन' व 'नॉनफिक्शन'चा मोठा वाटा असतो व आहे. मुस्लिमांचा अर्थातच पुनर्जन्मावर विश्वास नसतो. पण हिंदू असल्यामुळे मी कधी कधी गमतीनं म्हणत असतो, 'मी नक्कीच मागच्या जन्मी मुस्लीम असणार.''

वाचकहो, आपल्याकडे बहुसंख्य लेखकांची भूमिका असते, की लेखन प्रतिभेनं स्फुरलं पाहिजे आणि 'स्पॉटॅनिअस फ्लो ऑफ इमोशन्स'' प्रमाणे ललित लेखन हे विनासायास, सहज, उत्स्फूर्त असायला हवं, पण इंग्रजी लेखनामध्ये ऑर्थर हेलीसारख्या, विषयाचा सांगोपांग अभ्यास व संशोधन करून ललित लेखन करणाऱ्या लेखकांची फार मोठी व समृद्ध परंपरा आहे. तिचा मी पाईक आहे. आज जगात माहितीचा परिस्फोट झाला असताना, वाचकांचा कल वैविध्यपूर्ण लिखाणाकडे वाढला आहे. त्यामुळे इंग्रजी पुस्तकांच्या मराठी अनुवादांची मोठी लाट आली आहे. मराठीतही 'नॉनफिक्शन' पुस्तकांचा खप वाढतो आहे. हे सारं काय दर्शवतं? आजचा वाचक केवळ सभोवतालच्या जीवनाचं दर्शनं घडविणाऱ्या लेखनात रस घेत नाही. त्याची भूक आणि जाणीव वाढती आहे. विविध विषयांवर वाचायला त्याला आवडतं. त्यामुळे

अभ्यास करून लिहिलेल्या लेखनाकडे वाचक बऱ्यापैकी आकृष्ट होत आहेत.

माझं लेखन अशा चोखंदळ व चाकोरीबाहेरचं वाचणाऱ्यांसाठी आहे. अर्थात् हे मी ठरवून करीत नाही. मुळातच मला चाकोरीतलं व हलकंफुलकं सुचत नाही. माझं वाचन अक्षरश: स्वैर व विविधांगी आहे. वाचताना मनोमन 'व्हिज्युअलायझेशन' करायची सवय स्वभावत: आहे; त्यामुळे मला 'जरा हटके' सुचतं, असं फार तर म्हणता येईल.

पण वाचकहो, येथे मला माझ्या वाचनाबद्दल आणि लेखक म्हणून माझ्या भूमिकेबद्दल बोलायचं आहे.

प्रथम वाचन व्यासंगाबद्दल : लेखक हा मूलत: चौफेर वाचक असावा लागतो, अशी माझी धारणा आहे. वाचनातून जे जीवनदर्शन घडत जातं, त्यामुळे इतरांना समजून घेण्याची जिज्ञासा तृप्त होत जाते. माणसाला स्वभावत: इतरांच्या जीवनात डोकावून पाहायला आवडत असतं. नातलग, मित्रमंडळी आणि व्यावसायिक संबंधांमुळे आपण अनेकांशी जोडले जातो. त्या सर्वांचं जीवन आपल्या नजरेसमोरून बऱ्यापैकी उलगडत जात असतं. पण त्यामुळे त्यांना त्यांच्या पूर्व अंतरंगांसह जाणता येतंच असं नाही. ललित लेखनातून त्याचा निर्माणकर्ता म्हणजे लेखक आपला अनुभव, प्रतिभा आणि व्यासंगाद्वारे त्या माणसांना अंतर्बाह्य स्वरूपात वाचकांपुढे पेश करतो, तेव्हा मात्र नवीन जीवन प्रत्ययास येतं आणि मग इतरांना समजून घेण्याची व जाणण्याची लेखकाची स्वाभाविक जिज्ञासा तृप्त होते. त्यातून जीवनाकडे पाहण्याची त्याची दृष्टी समृद्ध व सखोल होत जाते. ललित गद्य-पद्य लेखनासाठी लेखक / कवीला कथाबीज किंवा काव्यकल्पना सुचणं यासाठी प्रतिभा लागते, पण तिचं साहित्यकृतीत रूपांतर करताना तेवढं पुरेसं नसतं. जो जीवनानुभव वा जीवनदर्शन वाचकाला द्यायचं आहे, ते समाजापासून वेगळं किंवा समाजाशी नाळ तोडलेलं कधीच नसतं. माणसाचं वर्तन, त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया, तो ज्या समाजाचा घटक असतो त्या समाजाचा इतिहास, संस्कृती व परंपरा यांचा आविष्कार असतो. तो जाणल्याविना, अभ्यासल्याविना केलेलं लेखन समृद्ध व सखोल होत नाही.

जे लेखक हे सारे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ अभ्यास व चिंतन - मननाद्वारे जाणून घेऊन लेखन करतात, त्यांचं लेखन वाचकांच्या जाणिवेच्या व आकलनाच्या कक्षा रुंदावतं आणि त्यांना एक सकस जीवनानुभव देऊन जातं. मी स्वत:ला या प्रकारचा लेखक समजतो, किमानपक्षी माझा त्या दिशेने जाण्याचा प्रयत्न असतो.

'कृष्णार्पण वस्तू' ही कथा एक 'फॅन्ट्सी' स्वरूपाची अद्‌भुतरम्य कथा आहे. स्त्री ही पुरुषावर निखळ व सर्वस्वानं प्रेम करते. पुरुष मात्र हिशोबी व सावध प्रेम करतो. या सनातन मानवी प्रवृत्तीवर मला त्या कथेतून भाष्य करायचं होतं. त्यासाठी भारतीय परंपरेतल्या सावित्री-सत्यवान कथेशी समांतर, पण विरोधी कथानक मी रचलं. त्यात

माझा नायक यमाकडे त्याच्या मृत पत्नीला जिवंत करण्याची मागणी करतो आणि ती त्याला त्याच्या निम्म्या आयुष्यातल्या बदल्यात मिळेल, ही यमदेवाची अट मान्य करतो. पत्नी पुन्हा जिवंत होते, पण त्यांच्या संसाराचा सूर बदलतो. आपलं आयुष्य कमी झाल्याची जाणीव त्याला सतत अस्वस्थ करीत राहते. जीवनाची व अधिक जगण्याची त्याची लालसा उफाळून येते आणि मग त्याचं पत्नीवरचं प्रेम संपून जातं व नंतर तो तिचा द्वेष करू लागतो. ती त्याने दिलेल्या जीवनदानामुळे कृतज्ञ असते, पण त्याचं बदललेलं रूप तिला भयचकित करतं, व्याकूळ करतं. हे स्त्री-पुरुष प्रकृतिधर्माचं सनातन स्वभावदर्शन त्या कथेतून मांडताना (सावित्री-सत्यवान मिथक, पती-पत्नी प्रेमाची भारतीय परंपरा आणि जन्ममृत्यू - पुनर्जन्म - वरदान या कल्पना यांची एक भारतीय - एक हिंदू म्हणून असते तेवढी माहिती मला होती.) ज्या पद्धतीनं स्त्री-पुरुष स्वभावरचनेवर मला प्रकाश टाकायचा होता, त्यासाठी पुन्हा एकवार वाचन करून आजच्या काळाच्या संदर्भात ते सर्व समजून घेतलं. कथेचा दुसरा ड्राफ्ट करताना कथानकाच्या ओघात सहजतेनं येतील तेवढेच संदर्भ घेतले आणि एक 'फॅन्टसी' असलेली पण जीवनविषयक गंभीर भाष्य करणारी कथा जन्माला आली. त्या कथेसाठी मी स्त्री - प्रवृत्ती व पुरुष - प्रवृत्तीविषयी बरंच वाचन केलं. त्यामुळे माझी स्त्री - पुरुष मानसिकतेची जाण अधिक सखोल झाली. ते सारं समजून घेताना, स्वानुभवाशी, विचारांशी ताडताना वेगळाच बौद्धिक आनंद मिळाला. जे अभ्यासलं ते सारं लेखनात वापरलं नाही, तसं वापरायचंही नसतं. मात्र पात्रांची पार्श्वभूमी तयार करणं व त्यातून सहजतेनं कथानक घडवणं, हे लेखकाचं कौशल्य असतं. मला इथे एवढंच सांगायचं आहे, की कथानकाचा आशय व आवाका, पार्श्वभूमीवरील कथानकाशी एकजीव झालेल्या संदर्भामुळे वाढतो. त्यामुळे वाचकाला एक सकस जीवनानुभव देता येतो.

इस्लामी जीवनावर ललित लेखन करणं ही माझ्यासारख्या हिंदू लेखकासाठी कठीण नसली, तरी अवघड बाब जरूर होती, पण मुस्लीम समाजाशी असलेला संपर्क, उर्दू साहित्याचं वाचन आणि मुस्लीम समाजाबाबतच्या इंग्रजी ग्रंथांच्या अभ्यासामुळे माझी भूमिका तयार होत गेली. इस्लामी धर्माचं यथातथ्य दर्शन घडविण्यासाठी मात्र एवढं पुरेसं नव्हतं. त्यासाठी इस्लाम धर्माचा एकमेव ग्रंथ 'कुराणे शरीफ' आणि 'हादिस' चा अभ्यासही आवश्यक होता. इस्लामी रीतिरिवाज, परंपरा, स्त्री-पुरुषाचं समाजातलं स्थान, कुटुंबविषयक कायदे, पडदा / बुरखा पद्धत हे सारं (सामाजिक, कौटुंबिक व सांस्कृतिक जीवन) अभ्यासातून व त्याहून जादा, एक माणूस म्हणून जाणून घेऊन मी लेखन केलं. त्याचं वाचकांनी व जाणकारांनी बऱ्यापैकी स्वागतही केलं. शासकीय नोकरीची बंधनं आणि इस्लामविषयी काही भाष्य करणं, हा भलताच सेन्सेटिव्ह विषय असल्यामुळे मते रुचली नाहीत, तर 'आमच्या धार्मिक भावना

दुखावल्या गेल्या' अशी आरोळी ठोकण्याची (हिंदू- मुस्लीम-शिखांसह सर्व धर्मांत आणि जाती-जमातीत वाढत जाणारी) प्रवृत्ती पाहता नॉनफिक्शन स्वरूपाचं लिखाण मी आजवर केलं नाही. पण हा सारा अभ्यास ललित अंगानं मांडताना माझ्या प्रतिभेचा कस लागत गेला, त्यात मी बऱ्यापैकी यशस्वी होत गेलो.

'इन्किलाब विरुद्ध जिहाद' ही माझी आजवरची सर्वांत महत्त्वाची कलाकृती, तिच्यासाठी इस्लामसोबत मार्क्सवाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारण व शीतयुद्धाचाही अभ्यास करावा लागला. अफगाणिस्तानची पार्श्वभूमी असल्यामुळे त्या देशाचा इतिहास, भूगोल, तिथल्या परंपरा, सांस्कृतिक व कौटुंबिक जीवन आणि राजा झहीरशहापासून मुल्ला मोहमद उमरपर्यंतच्या नेत्यांमुळे त्या देशाच्या समाजजीवनावर झालेला परिणाम हे सारं अभ्यासून, त्या पार्श्वभूमीवर अफगाणी लोकांची सुख - दु:खं मी रेखाटली. त्या निमित्तानं एक देश मी केवळ वाचला नाही. तर अनुभवला, मनात मुरवला आणि मराठीत क्वचितच आढळणारा 'फॅक्ट' व 'फिक्शन'चं मिश्रण असणारा 'फॅक्शन' हा लेखनाचा फॉर्म यशस्वीपणे (अर्थात् लेखनाची मागणी व गरज म्हणून) हाताळला. हा सारा लेखनप्रवास माझ्यासाठी रोमहर्षक होता. एक माणूस म्हणून, एक लेखक म्हणून व एक अभ्यासक म्हणून मी त्यातून विकसित होत गेलो, समृद्ध होत गेलो.

आमचे एक प्रकाशक मित्र गमतीनं म्हणतात, "कुणाशीही बोलताना माझ्या डोक्यात त्या व्यक्तीचा अनुभव, व्यवसाय वा त्यांचा ज्या विषयाचा अभ्यास आहे, त्यावर पुस्तक होऊ शकेल का याचा विचार मी करीत असतो. आम्ही एका अर्थानं चांभारच, जसं त्याचं लक्ष वहाणेवर असतं, तसंच आम्हा प्रकाशकांचं विषयावर व पुस्तकावर." लेखकाचाही स्वभावधर्म असाच असावा, असं माझं मत आहे. निदान मी तरी तसा लेखक आहे. मागील दोन्ही लेखात मी महानगरपालिका आयुक्त असताना रस्तेबांधणीच्या वेळी झालेल्या राजकीय व पक्षीय त्रासाबद्दल थोडं लिहिलं होतं, भाष्यही केलं होतं. त्या कालखंडातून जाताना मी घरी पत्नी व मित्रांना सांगायचो, की हे अनुभव लेखनासाठी उपयुक्त आहेत. रस्त्याच्या पार्श्वभूमीवर 'अग्निपथ' नावाची कादंबरी मी लिहिणार आहे. कधी, ते माहीत नाही, पण डोक्यात ती फिट बसली आहे.

लेखकाला हरघडी आपल्यातला लेखक जागा ठेवून जगता आलं, तर नित्य नवीन काही सुचत जाईल. प्रत्यक्ष जीवनात काम करताना कितीही बिकट व आणीबाणीचा प्रसंग आला, तरी त्या वेळीही जाणवत राहतं, हा प्रसंग, ही माणसं यातून कथानक सुचतंय... मग कधी तरी त्याची कथा होते, अनेकदा ते कथाबीज लेखनासाठी योग्य नाही असं वाटतं. मग ते मी सोडून देतो. काही दिवसांनी त्या कथाबीजात वेगळी भर पडून नव्या स्वरूपात लेखन वा कथा जन्मते.

बऱ्याच वर्षापूर्वीचा - महापुराच्या वेळचा - एक प्रसंग लक्षात आहे. पालकमंत्री रात्री उशिरापर्यंत कामाचा आढावा घेत होते. शासनाच्या एका जी. आर. चा एक अर्थ लावून नजीकच्या पूरग्रस्त जिल्ह्याच्या जिल्ह्याधिकाऱ्यांनी मदत-वाटप केली होती. पण माझ्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी त्या अर्थाशी, (जी. आर. च्या इंटरप्रिटेशनशी) सहमत नव्हते. पालकमंत्री अतिशय समतोल बुद्धीचे, विचारी व व्यापक अर्थाने जाणकार. ते खेळकरपणे म्हणाले, "तुमच्या मताशी मी मंत्री म्हणून सहमत आहहे. पण मी आमदारही आहे. माझा मतदारसंघ जिल्ह्याच्या सीमारेषेवर आहे. तेथील कलेक्टरांनी याच जी. आर. च्या आधारे आपद्‌ग्रस्तांना आर्थिक मदत केली आहे. मलाही तशी मदत तुम्ही केलेली आवडेल." सुमारे अर्धा तास चर्चा झाली. पालकमंत्र्यांना मंत्री म्हणून राज्याचे हित पाहताना, अवाजवी मदत करणं बरोबर नाही हे पटत होतं, पण आमदार म्हणून अशी मदत मिळाली तर मतदारसंघात त्यांची लोकप्रियता वाढणार होती.... वास्तविक ते कलेक्टरांना आदेश देऊ शकले असते, पण त्यांच्या विचारी मनाला ते पटत नव्हतं. राजकीय नेता व नात्याने अशी मदत शेतकऱ्यांना मिळवून देणं, ही त्यांची राजकीय मजबुरी आम्हांला जाणवत होती. पण तरीही अत्यंत सुसंस्कृतपणे कलेक्टरांना ते सुचवीत होते. म्हणजे ते एकाच वेळी डबल रोल अदा करीत होते. मी त्यांच्याकडे बारकाईनं पाहात होतो. त्यांचा चेहरा व त्यांची देहबोली निरखत होतो. एका राजकारण्याचं अंतरंग अवचितपणे उमगत होतं, पण त्याचवेळी त्यांची सुसंस्कृतता आणि धोरणीपणाही जाणवत होता. त्या वेळी माझ्या डोक्यात कामाचे असंख्य विषय होते, पण त्या अवस्थेतही एक व्यक्तिचित्र मन:पटलावर साकारत होतं. त्याचा मी माझ्या एका कादंबरीत वापर करणार आहे.

वरील विवेचनाद्वारे मी माझ्या 'लेखनधर्माचं' मर्म उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. सूत्ररूपाने मला अभिप्रेत असलेला लेखनधर्म तीन गुणसूत्रांमध्ये मांडता येईल. पहिलं सूत्र :- जगत असताना, अनुभव घेत असताना, सजगतेनं कथाबीज टिपणं व माणसं, त्यांच्या लकबी, त्यांचं माणूसपण जाणून घेणं. दुसरं सूत्र : - जात, धर्म, गाव, व्यवसाय, वय इत्यादी सर्वच बाबींचा विचार करून त्यांसाठी संदर्भ हुडकून, ते सर्व अंतरंगात मुरवून घेऊन लिहिणं, तिसरं सूत्र :- लेखनासाठी विविधांगी वाचन व व्यासंग करणं. 'लेखनधर्मा'ची ही तीन गुणसूत्रं सर्वच साहित्यिकांना कमी अधिक प्रमाणात लागू पडत असतील, असं मला वाटतं.

शेवटी एकच सांगायचं आहे.... लेखकाच्या लेखनाचं प्रयोजन असतं तरी काय? माझ्या मते जीवनाचं, मानवी जीवनाचं दर्शन घडवणं. तो माणसापुढे आरसा धरतो आणि भाष्यही करतो. समग्र मानवी जीवन पकडणं हे टॉलस्टॉय, प्रेमचंद अशा प्रतिभावंतांनाच जमू शकेल. बाकी सारे जीवनाचे कवडसे पकडून दाखवतात. तेच लेखनाचं प्रयोजन आणि ध्येय असतं. निदान मी तरी तसं मानतो.

समाजात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना व विषयांवरच लिहायचा, काही तरी सांगायचा प्रयत्न मी करत आलो आहे. माणसाला सामाजिक जीवन जगताना, देश / राज्याचे नागरिक म्हणून वागताना निर्माण होणारे प्रश्न, विषय यांचं चिंतन मी करीत असतो. जगण्यातून व प्रशासकीय कामातून जे अनुभव येतात, त्यांच्या आधारे लिहीत असतो. एका अर्थाने मी आजच्या काळाचा, आजच्या समाजजीवनाचा निरीक्षक आहे व बखर लिहिणाऱ्या बखरकाराचा आजचा वारस आहे.. आजचा बखरकार म्हणजे रंजक पद्धतीनं, ललित अंगानं जीवनाचं गाणं गाणारा लेखक. तसा बनायचा प्रयत्न मी करीत आहे. माझी जीवनाची व्याख्या केवळ मध्यमवर्गीय जीवनच नाही, तर ग्रामीण महाराष्ट्र, प्रशासनापासून काश्मीर - अफगाणिस्तानपर्यंत आहे. त्यामुळे मला माझी ओळख (भविष्यकाळात) एक आंतरराष्ट्रीय दृष्टी व जाणीव असणारा साहित्यिक म्हणून झालेली आवडेल. त्यासाठी प्रयत्न करणं व माझ्या लेखनधर्माला अनुसरून वागणं एवढंच माझ्या हाती आहे.

o-o-o

# २. परभणी व कोल्हापूरचे दिवस

कोल्हापूरला जिल्हाधिकारी असताना मला अनेक वेळा करवीरनिवासी एक प्रश्न विचारायचे. "तुम्ही अनेक शहरात व जिल्ह्यात काम केलं आहे. तुम्हाला सर्वात कोणतं शहर / जिल्हा आवडला?" मी उत्तर द्यायचो, 'परभणी'. प्रश्नकर्त्यांचे डोळे विस्मयाने विस्फारायचे. ज्या गृहस्थानं पुणे, सातारा, सांगली कोल्हापूर व औरंगाबादसारख्या प्रगत शहरात काम केलं आहे, त्याचं आवडतं शहर परभणी म्हणजे भलतंच.. असा भाव त्या नजरेत असायचा. पुढे पुढे मी या प्रश्नाचं उत्तर देताना म्हणायचो, "अर्थात कोल्हापूर प्रथम क्रमांकावर. पण त्यानंतर वा बरोबरीचं परभणी.' त्यामुळे त्याचं थोडंसं समाधान जरूर व्हायचं. पण तरीही कलापूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूरच्या जोडीनं हा परभणी कसं बसवतो हा प्रश्न त्यांच्यासाठी अनुत्तरित राहायचा.

आता महाराष्ट्र शासनाचा सचिव म्हणून पदोन्नतीने, मुंबईमध्ये दादासाहेब फाळके चित्रनगरीत व्यवस्थापकीय संचालक म्हणून रुजू झालो आहे. कोल्हापूर सोडून दोन महिने झाले आहेत. या दोन महिन्यांत मला पदोपदी जाणवतंय की, कोल्हापूर माझ्या मनात किती रुजलंय. माझ्या प्रशासकीय कामाचं आजवरचं शिखर म्हणजे माझी कोल्हापूरची जिल्हाधिकारी पदाची कारकिर्द. 'पानी तेरा रंग कैसा? जिसमे मिलावो वैसा,' अशी माझी वृत्ती असल्यामुळे प्रत्येक शहरात व प्रत्येक पदावर काम करताना त्यात रंगून गेलो होतो. पण परभणी व कोल्हापूरमध्ये अंमळ जास्तच. परभणी सोडून जवळपास पंधरा-सोळा वर्षे झाली, तर कोल्हापूर सोडून दोनच महिने. पण माझ्या साहित्यिक, सांस्कृतिक व प्रशासकीय जीवनातले सोनेरी क्षण मला याच दोन शहरांनी दिले. ही दोन शहरं माझ्या अंतरंगात खोलवर रुजली आहेत व माझं आजचं व्यक्तिमत्त्व घडण्यामध्ये या दोन शहरांचा फार मोठा हात आहे. त्याचं नॉस्टेल्जिक स्मरण करीत, या दोन शहरांची ही माझी स्मरणचित्रे!

'जगात जर्मनी, भारतात परभणी' ही म्हण परभणीत का रूढ झाली, त्यामागे काही इतिहास वा प्रसंग-घटना आहे, हे कुणीच सांगू शकत नाही. पण परभणी म्हटलं की, "बनी तो बनी, नही तो परभणी" याच्या जोडीनं वरील म्हण प्रचलित आहे. 'बनी

तो बनी-' मी समजू शकतो. सुपीक जमीन, जमीनदारी व दीर्घकाळ निजामी अमलामुळे आराम व निवांतपणा हा इथला स्थायीभाव आहे. त्यामुळे ही उक्ती एका मर्यादेपर्यंत सार्थ आहे. पण 'जगात जर्मनी, भारतात परभणी'ची कारणमीमांसा लावता येत नाही. पण आज स्मरणरंजन करताना माझ्यापुरता अन्वयार्थ मी लावू शकतो. जगात कामासाठी जर्मनीसारखे अनेक युरोपीय देश, शहरे व अमेरिका सर्वोत्तम आहेत. मी तिथं गेलो नाही, की काम केलं नाही. मात्र महाराष्ट्रात मी जवळपास बारा शहरांत काम केलंय. कोल्हापूरचा अपवाद वगळता मला कामाचं पुरेपूर समाधान देणारं व माझ्या साहित्यिक-सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाला नवे पैलू पाडणारं परभणी, माझ्यासाठी भारतातलं (किंवा गेला पक्षी, महाराष्ट्रातलं तरी) सर्वोत्तम गाव आहे.

परभणीला मी सर्वाधिक म्हणजे साडेतीन वर्षे राहिलो. तिथं मी निवासी उपजिल्हाधिकारी (आर.डी.सी.) होतो. इथं माझी उपजिल्हाधिकारी श्रेणीतली कारकिर्द प्रौढ साक्षरता अभियानामुळे लखलखती, तर १९९५ साली संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्याध्यक्ष पदामुळे साहित्यिक कारकिर्द सुरू झाली. एक साहित्यिक कार्यकर्ता व दोन राज्य पारितोषिक विजेत्या पुस्तकांमुळे तसेच 'इन्किलाव विरुद्ध जिहादाच्या' लिखाणामुळे परभणी माझ्या साहित्यिक जीवनाचा एक मनोहारी व मनस्वी समाधान देणारा कालखंड ठरला, असं मला वाटतं.

१९९३-९४ या वर्षात परभणी जिल्ह्याच्या प्रौढ साक्षरता अभियानाचा मी प्रमुख समन्वयक होतो आणि अठरा ते पंचेचाळीस वयोगटातील सुमारे सव्वादोन लाख प्रौढ स्त्री-पुरुषांना साक्षर करण्याचे आव्हान होते. ते आम्ही यशस्वीपणे पेलले आणि ८५ टक्के प्रौढ, चांगल्या पद्धतीने लिहायला - वाचायला शिकले. पुण्याच्या कर्वे समाजविज्ञान संस्थेने इतर जिल्ह्यांत जसे पाच-दहा गावांत मूल्यमापन करतात तसे न करता, माझ्या आग्रहास्तव मूल्यमापनासाठी सुमारे दीडशे एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणले व तेवढ्याच म्हणजे दीडशे गावांची त्यांनी पाहणी करून चाचणी घेतली. ही गावे त्यांनी रँडम पद्धतीने निवडली होती; त्याचा हा निकाल होता. मी स्वत: आजही नम्रतेने, पण ठामपणे म्हणू शकतो की, परभणी जिल्ह्यातील साक्षरता - अभियान खऱ्या अर्थाने यशस्वी झाले. १९९१ च्या जनगणनेत परभणी जिल्ह्यातील स्त्रियांची साक्षरता ही अवघी ३४-३५ टक्के होती, ती २००१ च्या जनगणनेच्या वेळी राष्ट्रीय सरासरी इतकी (म्हणजे ६४ टक्के) वाढली, हे केवळ १९९३-९४ च्या प्रौढ साक्षरता अभियानाचे यश म्हटले पाहिजे. त्यासाठी ते पूर्ण वर्ष मी झोकून देऊन काम केले. व्यवस्थापन कौशल्य व कार्यक्षमतेची कसोटी पाहणाऱ्या या कामात मी यशस्वी झालो, ती जिद्द, कामाप्रती निष्ठा व 'आउट ऑफ बॉक्स' योजना व कार्यक्रमामुळे. मी आठवड्याचे तीन दिवस- सोमवार (बैठक व नियोजनासाठी), बुधवार (परभणी शहरासाठी) व शुक्रवार (प्रत्यक्ष साक्षरता वर्गाची पाहणी करणे व

शिक्षकांच्या गाठीभेटीसाठी); - माझी महसुलाची प्रशासकीय कामे सांभाळून देत होतो. तो माझ्यासाठी अक्षरश: मंतरलेला कालखंड होता.

हा वर्षभराचा कालखंड मोजक्या शब्दात मांडणं अवघड आहे. म्हणून काही थोडके प्रसंग कथन् करतो. असाच एक शुक्रवार. रात्री नऊ ते अकरा दरम्यान मी परभणी-गंगाखेड तालुक्यातील काही गावांत जाऊन तेथील प्रौढ साक्षरता वर्गांना भेट देत होतो. हायवेपासूनच्या एक आडवळणी गावात रात्री दहाच्या सुमारास पोहोचलो व सरपंचाला घेऊन पायी जाऊ लागलो. तोच समोरच्या दलित वस्तीपासून दोन प्रौढ महिला, पायांखालच्या वाटेवर बॅटरीचा प्रकाश मारीत येताना दिसल्या. त्या दोघी जिल्हा परिषदेच्या शिक्षिका होत्या व प्रौढ साक्षरता वर्ग आटोपून निघाल्या होत्या. त्यांना दोन किलोमीटर अंतरावर परभणीला जाणारी शेवटची बस मिळणार होती. मी त्यांची विचारपूस केली, तसं त्या म्हणाल्या, "सर, हे मोटिवेशन व कलेक्टर संधूसरांची प्रेरणा आहे. तुम्ही बाहेरचे, आमच्या जिल्ह्याच्या प्रौढ स्त्री-पुरुषांनी साक्षर व्हावं म्हणून एवढं करता, चक्क पदयात्रा काढता... मग आम्ही तर शिक्षक. शिकवणं आमचा पेशा. आम्ही शिकवणं यात कसलं नवल? उलट दलित वस्तीतल्या वर्गाच्या महिला वाचाय - लिहायला शिकल्या, त्याचं समाधान आहे..."

विचार करा; रात्री दहाची वेळ. आडवळणाचं, अंधारात बुडालेलं गाव, अशा वेळी नऊ ते दहा दरम्यान तेथे परभणीला राहणाऱ्या शिक्षिका, शाळा संपल्यावर पाचला न परतता, गावी थांबून साक्षरतेचे वर्ग घेतात व दलित स्त्रिया वाचताना पाहून समाधान पावतात... रात्री साडेदहाची शेवटची एस.टी., त्यासाठी दोन किलोमीटरची पायपीट करणं व रात्री अकराला परभणीला घरी पोहोचणं. मग जेवून झोपायला बारा वाजणार. पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता शाळेसाठी येणे... मला त्यासाठी प्रेरणा मानत होते, कर्ता-करविता समजत होते... यापेक्षा माझ्या कामाला अधिक दाद कोणती असू शकते? दुसऱ्या दिवशी माझ्याइतकाच या कामात रस घेणाऱ्या कलेक्टर संधू साहेबांना मी हा किस्सा सांगून म्हणालो, "सर, मार्क माय वर्डस्! आपलं हे अभियान यशस्वी होणार!" रमेश इंगळे जर परभणीला शिक्षक असते व या अभियानात सामील असते तर त्यांनी कशाप्रकारे कादंबरी लिहिली असती?

दुसरा प्रसंग. श्रावण महिना म्हणजे स्त्रियांचं माहेरी जाणं- खास करून नागपंचमीला. त्यामुळे साक्षरता वर्ग काही दिवस बंद पडायचा धोका होता. एका वाडीत (तिचं नाव मी विसरलो) मी व साक्षरता अभियान समितीच्या दोन कार्यकर्त्या- हेमा रसाळ व माधुरी क्षीरसागर- यांच्यासह गेलो होतो, तेव्हा ही अडचण समोर आली. त्या गावात महिलांचे दोन साक्षरता वर्ग सुरू होते. महिलांना मी आवाहन केलं की, यंदा साक्षर नागपंचमी साजरी करायची. त्यांनी 'म्हणजे काय करायचं?' असं

विचारलं तेव्हा मी उत्स्फूर्तपणे बोलून गेलो की, "यंदा माहेरी जायचं नाही व वर्ग चुकवायचे नाहीत. आता तुम्ही लिहू शकला तर चार ओळींचं पोस्टकार्ड आम्हांला लिहा की, आम्ही माहेरी न जाता साक्षरतेची नागपंचमी साजरी केली." त्यांनी 'हो' म्हटलं. त्यांना मी आमचा पत्ता लिहून शंभर पोस्टकार्डे पाठवून दिली आणि काय आश्चर्य, जवळपास ऐंशी पोस्टकार्डे उत्तरासह परत आली व त्यांनी मला, संधूंना भाऊ मानून पत्र लिहिलं, "आम्ही तुमच्या शब्दाला मान देऊन यंदा माहेरी गेलो नाही. आता श्रावणाच्या शेवटच्या सोमवारी तुम्ही आमच्या वाडीस या, महादेवाच्या मंदिरात तुमच्या समक्ष साक्षर नागपंचमी साजरी करू..." ही पत्रं वाचताना मन भरून आलं होतं. जर एखादं काम मनापासून करायचा प्रयत्न केला तर ग्रामीण जनता भरभरून प्रतिसाद देते. या साक्षरता अभियानानं प्रत्येक साक्षर प्रौढ स्त्री आमची राखी-बहीण झाली... हे भाग्य किती मोठं व कुण्या जन्मीचं म्हणायचं? साक्षरता अभियानाच्या यशाची ही पावती म्हणायची नाही?

हा आणखी एक प्रसंग. परभणी शहरात मुस्लीम बांधव-भगिनींसाठी आम्ही प्रौढ साक्षरतेचे वर्ग उर्दूमधून चालवत होतो. त्या निमित्तानं पंधरा ते वीस वयोगटातल्या, मॅट्रिक झालेल्या अनेक चुणचुणीत मुलींचा एक छान ग्रुप तयार झाला. जिद्दीनं त्या पर्दानशीन महिलांना सुरुवातीला घरोघरी जाऊन गोळा करीत व जीव तोडून शिकवत. 'हमें तो मुश्किलसे इल्म (विद्या) मिली है, वो बाटेंगे तो बढेगा।" अशी त्यांची त्या मागची प्रांजळ भावना होती. या वर्गास येणाऱ्या प्रौढ मुस्लीम स्त्रियांना मी त्यांचा 'हमदर्द' वाटायचो. इतका की, त्यातील काही माझ्यापुढे पर्दा पाळायच्या नाहीत. ही देखील माझ्या यशाची एक प्रकारे अनोखी पोचपावती होती! साक्षरता अभियानाचं काम संपल्यावर या शिक्षिकेचं काम करणाऱ्या मुलींशी संपर्क तुटला नाही, तरी कमी होत चालला. काही महिन्यांनी एके रविवारी दुपारी एकच्या सुमारास, माझ्या बंगल्यात एक तरुण मुस्लीम युवक ऑटो रिक्षातून आला व म्हणाला, "सर, आज मेरे बहनका निकाह है। आपने आनेका कबूल किया था। पर आप शायद भूल गये।" मी किंचित ओशाळला होत म्हणालो, "हां भाई, सचमुच मैं भूल गया।" त्याची बहीण मोठी चुणचुणीत व हुशार होती. तिचा साक्षरतेचा वर्ग खूप चांगला चालायचा. "लेकिन सर, वो कहती हैं, जब तक सर (म्हणजे मी) नही आयेंगे, निकाह नही होगा।" त्यामुळे मी ताबडतोब लग्नस्थळी गेलो, निकाह झाला. त्यानंतर जोडीनं पाया पडत ती नवऱ्याला म्हणाली, "मियां, सर मेरे बडे भाई है, उनके सामने निकाह हो गया, ये अच्छी बात है..." मी कृतकृत्य झालो होतो. कोण कुठली मुलगी! माझ्याशी समाज घडविण्याच्या, साक्षरतेच्या एका उदात्त कामाच्या निमित्तानं जोडली गेली होती. असं मी काय केलं होतं तिच्यासाठी की, तिनं मी येईपर्यंत निकाह समारंभ रोखून धरला? नंतर तिच्या नवऱ्याला बँकेच्या मार्फत कर्ज व शासकीय अनुदान देऊन धंद्यासाठी

ऑटोरिक्षा घेऊन दिली व त्यातून मी शहरभर फेरफटकाही मारला. आज हे तीन प्रसंग जेव्हा मी आठवतो तेव्हा वाटतं की, शासकीय काम करताना मी माणुसकी, प्रेम व जिव्हाळा पेरून माणसं जोडली. अशी शेकडो माणसं मला परभणीत भेटली, म्हणून माझ्या मनात परभणीचं विशेष स्थान आहे. आजही परभणीला जायचं कोणतंही निमित्त मी सोडत नाही. डिसेंबर २०११ मध्ये मला 'रावसाहेब जामकर स्मृति पुरस्कार' मिळाला. त्यानिमित्त गेलो होतो. तेव्हा जे पाच शिक्षक संपूर्ण साक्षरता अभियानात पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून माझ्यासोबत अहोरात्र धडपडले, त्यांनी एकत्र येऊन माझा शाल, श्रीफळ व पाच पुस्तके (प्रत्येकाने एक याप्रमाणे पाच) देऊन सत्कार केला. आणि आमच्या अभियानाच्या गप्पा रंगल्या... तो कालखंड तासाभरात पुन्हा जगून झाला आणि मन भरून आलं व कृतार्थही वाटलं!

वर्षभर झोकून देऊन केलेल्या प्रौढ साक्षरता अभियानाच्या कामामुळे माझ्या कार्यक्षमतेचा आणि व्यवस्थापन कौशल्याचा जसा कस लागला, तसंच एक राष्ट्रउभारणीचं उदात्त काम प्रौढांना साक्षर करण्यामुळे केल्याचं मनस्वी समाधान लाभलं. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन जेलमध्ये जाणं हे देशभक्तीचं लक्षण मानलं जायचं. पण आता स्वातंत्र्योत्तर काळात विकासकामं करणं, विविध लोककल्याणाची अभियानं योग्य पद्धतीनं राबवून नागरिकांना त्याचा लाभ मिळवून देणं, हे देशभक्तीचं व राष्ट्रउभारणीचं (Nation Building) काम आहे, अशी माझी प्रामाणिक भावना आहे. देशभर मूल्यघसरण व रसातळाला गेलेली कार्यसंस्कृती यामुळे शासकीय कामे नीटपणे होत नाहीत, हे खरं आहे. पण ती नीटपणे राबवणारे कितीतरी प्रशासक आहेत, त्याचं काम हे देशभक्तीचंच काम आहे व अशा 'अनसंग हिरो'मध्ये मला पण जागा आहे,. असं आत्मस्तुतीचा दोष पत्करूनही मी स्वाभिमानाने सांगेन. परभणीच्या माझ्या या प्रौढ साक्षरता अभियानाच्या कामानं, थोडेतरी समाज व देशऋण फेडीत मी कृतार्थ झालो आहे. आणि त्यामुळे जिल्हा परिषदेचे शिक्षक, त्यांना प्रेरित केलं तर, किती उत्तम काम करतात हे जाणवलं. खाजगी शिक्षकांपेक्षाही जिल्हा परिषदेचे शिक्षक अधिक कार्यक्षम व विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी मानणारे आहेत असं मला वाटतं!

परभणीच्या कालखंडात ६८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. त्याचा मी कार्याध्यक्ष होतो. हे संमेलन सर्वार्थाने यशस्वी झाले. या संमेलनात प्रथमच अध्यक्षीय भाषणावरचा परिसंवाद आम्ही घेतला. तसेच नावाप्रमाणे त्याला अखिल भारतीय स्वरूप देण्यासाठी 'समकालीन साहित्य और मेरी भाषा' ही, पाच प्रांतिक भाषेतील कवी व समीक्षक असलेल्या साहित्यिकांची वैशिष्ट्यपूर्ण परिचर्चा व आंतरभारती कविसंमेलन मी स्वतः पुढाकार घेऊन आयोजित केलं व हा कार्यक्रम कमालीचा यशस्वी झाला. संमेलनास आलेल्या सर्व साहित्यिकांनी त्याला मनापासून दाद दिली. हे साहित्य संमेलन खऱ्या अर्थाने माइलस्टोन ठरले. नंतरही अनेक ठिकाणी

संमेलने यशस्वीरीत्या झाली, तेही त्यांचेच संमेलन सर्वोत्तम झाल्याचे सांगतात. पण तटस्थपणे विचार केला तर शंकर सारडांनी आयोजित केलेले साताऱ्याचे संमेलन, यशवंतराव गडाख व अरुण शेवतेंच्या द्रष्टेपणातून भरलेले नगरचे संमेलन व आमचे परभणीचे संमेलन हीच खऱ्या अर्थाने वेगळ्या वाटा चोखाळणारी होती, असे म्हणता येईल.

संमेलन परभणीला मिळाल्यापासून ते संपन्न होईपर्यंतचे सहा - सात महिने हा माझ्या जीवनातला मंतरलेला कालखंड होता. मला समर्थ साथ दिली देवीदास कुलकर्णी या माझ्या समवयस्क मित्राने. तर स्वागताध्यक्ष म्हणून कै. रावसाहेब जामकरांचा पाठिंबा आणि वसंतराव पाटील व प्रभाकर पाठकांची मदत व मी-अशा पाच खांबी डोलाऱ्यावर संमेलने पेलले गेले. देवीदास कुलकर्णी व प्रभाकर पाठकांचं या निमित्ताने जुळलेले मैत्र, माझ्या जीवनातला अमोल ठेवा आहे. माणूस इतका निर्मळ, अजातशत्रू, प्रेमळ व निरागस असू शकतो, हे त्यांच्याकडे पाहिलं की पटतं. आजही माझ्या मनी त्यांचे प्रेमाचे स्थान अढळ आहे. किंबहुना, आमची त्रिमूर्ती परभणीत मशहूर झाली होती.

उद्घाटक म्हणून हिंदी कवी व समीक्षक अशोक वाजपेयी यांना बोलावण्याची आणि आंतरभारती (बहुभाषिक) परिसंसवाद व कविसंमेलन करण्याची कल्पना मला सुचली आणि ती मूर्तरूपात आणण्यासाठी प्रसिद्ध कवी व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांची मोलाची मदत झाली. ते नेमाडे-चित्रे पंथीय म्हणून प्रसिद्ध व साहित्य संमेलनापासून फटकून राहणारे. बाबा भांडसारख्या त्यांच्या मित्रांनी मला त्याबाबत सावध केलं होतं. पण पहिल्या भेटीतच आमचे सूर जुळले असं म्हणायला हरकत नाही. अशोक वाजपेयींना निमंत्रण देण्यासाठी दिल्ली प्रवास व जाता-येता झालेल्या आमच्या साहित्यिक गप्पा आजही माझ्या स्मरणात आहेत. त्यावेळी मी 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या अफगाणिस्थानच्या पार्श्वभूमीवरील आंतरराष्ट्रीय दहशतवाद व राजकारणाचा पर्दाफाश करणारी कादंबरी लिहीत होतो. पाटील हे अत्यंत चोखंदळ व अभ्यासू समीक्षक आणि भारतीय साहित्याचे मर्मग्राही विश्लेषक. त्यांना मी 'फ्री हँड' दिला होता, मात्र आम्ही चर्चा करूनच परिसंवाद व कविसंमेलनाची आखणी केली. आज माझा त्यांच्याशी फारसा संपर्क राहिला नाही. पण त्या काळातला स्नेहबंध ही माझ्या मर्मबंधातली ठेव आहे. संमेलनाची सुरुवात ग्रंथ-दिंडीने होते. आम्ही त्याला शोभायात्रेचे स्वरूप दिले. उघड्या पोलीस जीपमधून संमेलनाध्यक्ष नारायण सुर्वे व उद्घाटक अशोक वाजपेयींना पूर्ण शहरभर ग्रंथदिंडीसह लोकांचे सत्कार व हारतुरे घेत फिरवलं. प्रत्येक दुकानावर साहित्य गुढी उभारली होती. दोघांच्या गळ्यात किमान हजारभर हार पडले असतील. मोठमोठे साहित्यिक जीपसमोर नाचत होते, फुगड्या घालत होते. प्रत्येक चौकात पौवाडे, गाणी म्हटली जात होती. अशोक वाजपेयी तर

थक्क होऊन पाहात होते व तीन तासांची शोभायात्रा एन्जॉय करीत होते. सुमारे वीस हजार लोक त्यात सामील होते. परभणीचा हा रेकॉर्ड अबाधित राहील असं वाटतं. सायंकाळी माझ्यासमोर वाजपेयींनी त्यांच्या पत्नीला फोन लावला होता आणि शोभायात्रेचं वर्णन करताना त्यांना किती व कसं सांगू झालं होतं. हे मी का केलं? ग्रंथदिंडीला शोभायात्रेचं रूप का दिलं? माझी त्यामागची एक विशिष्ट भूमिका व विचारधारा होती. कलावंत व साहित्यिक ही समाजाची सर्वात मोठी अमूल्य ठेव असते. ते सर्व पिढीचे आयकॉन असतात - असावेत. पण आज भारतात राजकीय - नेत्यांना जो सन्मान मिळतो, तो चुकीचा नसला तरी त्यांच्यापेक्षाही कलावंत, साहित्यिक मोठे असतात हे समाजमनावर बिंबलं गेलं पाहिजे. मी नेहमी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या एका निबंधाचा हवाला माझ्या भाषणात देत असतो. ज्या देशात ग्रंथसत्ता, पर्यायाने ज्ञानसत्ता चालते तो देश ग्रंथकार म्हणूनच मोठा ठरतो. कुठल्याही देशाची ओळख व अस्मिता त्या देशाचे कलावंत, लेखक, खेळाडू व वैज्ञानिकांमुळे असते. ब्रिटनचं महत्त्व व महत्ता शेक्सपिअरमुळे आहे, तर भारताची अस्मिता ही प्रेमचंद, रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चट्टोपाध्याय, मेजर ध्यानचंद, लता मंगेशकर, भीमसेन जोशींमुळे आहे, असते. पण व्यवहारात त्याचं प्रतिबिंब उमटत नाही. त्याची समाजाला जाणीव व्हावी म्हणून मी शोभायात्रेला एवढे भव्य रूप दिले. या संमेलनाचे खरे हिरो नारायण सुर्वे - हा युग-प्रवर्तक कामगार कवी आहे हे मला ठसवायचे होते! ही शोभायात्रा माझ्या आठवणींचा एक मनोहारी ठेवा आहे व तो कायम राहील.

संमेलन हे केवळ आयोजन करणाऱ्या रावसाहेब जामकरांच्या शिक्षण संस्थेचे नव्हते, ते पूर्ण गावाचे असले पाहिजे, यासाठी मी अनेक उपक्रम योजले. अगदी ऑटोरिक्षावाल्यांचीही बैठक घेऊन रेल्वे स्टेशन व बसस्टँडवरून येणाऱ्या संमेलनाच्या प्रेक्षकांना अदबीने व फक्त दहा रुपयांत संमेलनस्थळी सोडावे हे त्यांच्याकडून मान्य करून घेतले. कॉलेजचे विद्यार्थी, महिला मंडळे, सर्व शाळा - कॉलेजचे शिक्षक, जिल्ह्यातील सर्व वाचनालयांचे ग्रंथपाल व जिल्ह्यातील सर्व लहान-मोठ्या साहित्यिकांना हे संमेलन आपले वाटावे यासाठी त्यांच्याशी पुन्हा पुन्हा संवाद साधला. अगदी कलेक्टर (संधूसाहेब हे स्वतः उर्दू शायर व साहित्यप्रेमी) पासून सर्व अधिकाऱ्यांना स्वागत मंडळाचे हजार रुपये भरून सभासद करून घेतले. ग्रंथ-दालन व प्रदर्शन हे संमेलनाचे प्रमुख आकर्षण असते, त्यांनाही आम्ही भोजनाचे पास दिले व निवास व्यवस्था केली.

हे सारं आम्हास एकदम सुचलं असं नाही. त्यासाठी पण मी एक दंडक घातला. दररोज सायंकाळी सात ते साडे-नऊ दहा, संमेलन कार्यालयात कार्यकारी समिती व साहित्यिकांनी जमायचं. गप्पा - गोष्टींतून नव्या कल्पना सुचायच्या, त्याची त्याच दिवशी अंमलबजावणी करायची. जवळपास चार महिने आम्ही पंचवीस-तीस जण

दररोज सायंकाळी एकत्र असायचो. चहा, गप्पा आणि संमेलन यशस्वी करण्यासाठी काय नवं केलं पाहिजे याचं दररोजचं 'ब्रेन स्टॉर्मिंग' सेशन... मला जर ते चार महिने पुन्हा जगता आले तर मी आनंदाने तयार होईन, एवढा तो कालखंड भारावलेल्या मन:स्थितीचा होता! संमेलन संपलं, साहित्य उत्सव संपला की पुढे त्या शहरात मरगळ येते. परगभणीत तसं होऊ नये म्हणून आम्ही दहा लाख रुपयांचा निधी वाचवला व 'अक्षर प्रतिष्ठा' नामक एक साहित्यिक संस्था स्थापून, पुढील काळात वर्षभर विविध साहित्यिक उपक्रम सुरू राहतील याची तरतूद केली. संमेलनाची ही सर्वांत मोठी उपलब्धी मी समजतो.

असा हा माझा परभरणीचा हा कालखंड, माझ्यासाठी मनात परभणी हे स्थान कायम व खरं आहे. इथंच माझी खऱ्या अर्थानं साहित्यिक कारकिर्द सुरू झाली. "अंधेरनगरी' ही लोकप्रिय कादंबरी व 'अंतरीच्या गूढगर्भी' हा कथासंग्रह इथं असतानाच प्रकाशित झाला व 'इन्किलाब विरुद्ध जिहाद'चं लेखनही इथंच निम्याहून अधिक पूर्ण झालं! त्याशिवाय डझनभरापेक्षाही जास्त जिवाभावाचे मित्र मिळाले. आर. डी. सी. म्हणून प्रशासकीय कामाचं समाधान मिळालं व इथूनच मी पदोन्नतीवर अप्पर जिल्हाधिकारी म्हणून औरंगाबदला गेलो. माझी 'प्रशासननामा' ही प्रशासकीय अनुभवावर आधारित कथा-कम-लेखमाला २००१ मध्ये दैनिक 'लोकमत'च्या रविवार पुरवणीत प्रसिद्ध झाली व ती आता पुस्तकरूपाने या वर्षी येत आहे, त्यातले तीन चतुर्थांश अनुभव, ज्यातून माझी प्रशासकीय कार्यक्षमता सिद्ध झाली, ते परभणीचेच आहेत हे मला नमूद करावेसे वाटते. म्हणूनच परभणी आजही माझ्या मनात घर करून आहे.,

परभणीनं जसं माझं व्यक्तिमत्त्व घडवलं व ते शहर जसं माझ्या भावविश्वाचा भाग बनला, तसंच - किंबहुना त्यापेक्षा अधिक माझं प्रशासकीय व सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व चौफेर फुलून आलं, ते हा लेख लिहिताना. कोल्हापूर हे शहर सोडून मला अवघे दोनच महिने झाले आहेत, अजूनही ते शहर सध्या मनात किती खोलवर रुजलं आहे, हे क्षणोक्षणी जाणवतं. माझी कलेक्टर म्हणून साडेतीन वर्षाची कोल्हापूरची कारकिर्द ही सर्वार्थानं माझ्या करिअरचा गौरीशंकर होता असं म्हटलं तर वावगं ठरू नये. प्रशासन, इ-गव्हर्नन्स, कला, क्रीडा, उद्योग, वित्तसेवा, शेती व संस्कृती या सर्वच क्षेत्रात मी नव्या नव्या योजना आखून जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यायचा मनापासून प्रयत्न केला आणि त्याद्वारे माझं भावविश्व समृद्ध झालं आणि करिअर कृतार्थ झालं.

कलेक्टर हा जिल्हा स्तरावर शासनाचा चेहरा आणि डिलिव्हरी सिस्टीम वा अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे. तो जिल्ह्याचा समन्वय अधिकारी म्हणून 'फर्स्ट अमंग इक्वल' असतो. ब्रिटिश काळापासून कलेक्टर पद असल्यामुळे त्याला पदाचे काही अंगभूत अधिकार प्राप्त आहेत. पण, त्यापलीकडे जाऊन लोकमानसाला असं

वाटतं की, त्याला सर्व अधिकार आहेत; राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, कृषीपासून पुरातत्त्व खात्यांपर्यंतच्या सर्व विभागांच्या कामाचा आढावा तो घेऊ शकतो. कोणत्याही विभागाची समस्या वा प्रश्न असो, मोर्चा, निवेदने, धरणे कलेक्टर कचेरीसमोरच होतात. त्यामुळे त्याला इतर विभागांना निर्देश देण्याचे अधिकार प्राप्त आहेत, हे या पदाचे फार मोठे सामर्थ्य आहे. याचा जो कल्पकतेने चांगल्या कामासाठी वापर करून घेतो, तो आपली कारकिर्द अक्षरश: गाजवतो. मलाही कोल्हापुरात साडेतीन वर्षे भरपूर कामे करता आली. त्याची यादी खूप मोठी आहे. मी पुढेमागे 'कोल्हापूरचे दिवस' नामक पुस्तक, तेथील माझ्या अनुभवाच्या आधारे लिहायच्या विचारात आहे. पण आज इथे, काही मोजक्या प्रसंगांची वा कामाची माहिती व त्यामुळे मी मनाने कसा समृद्ध झालो, हे देत आहे.

एक म्हणजे २००४-०५ मध्ये शासकीय सेवेत असताना, बेंगलोरला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये पब्लिक पॉलिसीमध्ये मी एमबीए केलं होतं, त्या ज्ञानाचा फायदा घेऊन इ-गव्हर्नन्सचे (जो आज पारदर्शी कामासाठी कळीचा मुद्दा झाला आहे) काही चाकोरीबाहेरचे उपक्रम राबवले. त्यातल्या तीन उपक्रमांची माहिती देत आहे, ज्यामुळे शासनाच्या जनकल्याण ध्येयाची चांगल्याप्रकारे पूर्तता मला करता आली व प्रभावी प्रशासन कसं असतं याचा अनुभव करवीरवासीयांना करून देता आला. स्त्रीभ्रूण हत्या ही आजची सर्वात महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. सोनोग्राफी करून लिंगनिदान करणे व गर्भपाताने स्त्रीभ्रूण नष्ट करणे हे सररास चालले आहे. 'मुलगी नको. मुलगाच हवा' हा समाजाचा हव्यास आणि पैशापुढे वैद्यकीय नीतिमत्ता किस झाडकी पत्ती, - अशा दोन अनिष्ट मानसिकतेची अभद्र युती झाली आहे. त्यावर माझा अक्षरश: क्रांतिकारी टेक्नोसॅवी उपाय म्हणजे, 'सेव्ह द बेबी गर्ल' हा उपक्रम होय. सर्व सोनोग्राफी केंद्रे मी ऑनलाइन केली व सायलेंट ऑबझर्व्हर (त्याचे नवे रूप म्हणजे ॲक्टिव्ह्ट्रॅकर) नामक मशीन, - ज्यामध्ये गर्भवती महिलेच्या प्रत्येक सोनोग्राफी टेस्टचे व्हिडिओ चित्रीकरण पकडले जाऊन साठवले जाते, - प्रत्येक सोनोग्राफी केंद्रास बसवली. त्यामुळे लिंगनिदान करणाऱ्या डॉक्टरवर करडी नजर राहून त्यांना रेड हॅंडेड पकडले जाणे शक्य झाले आहे. त्यामुळे एका वर्षांत कोल्हापूरचे मुलींचे प्रमाण दर हजार मुलांमागे ८३९ वरून ९०० वर गेले. त्याला नॅसकॉन, ई - इंडिया, महाराष्ट्र फाऊंडेशन असे डझनभर पुरस्कार मिळाले. टाइम्स ऑफ इंडियाचे 'सोशल इम्पॅक्ट अवॉर्ड' या उपक्रमासाठी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या हस्ते मिळाले. या देशातील राजस्थान, हरियाणा व मध्यप्रदेशामध्ये तो लागू झाला आहे. तर उत्तराखंड, गुजराथमध्ये नजीकच्या काळात होत आहे. मी स्त्रीपूजक आहे. म्हणून स्त्रीभ्रूण हत्या मला खुनापेक्षा कमी वाटत नाही. ही भयंकर अशी सामाजिक विकृती आहे. त्यावर मात करण्यासाठी प्रबोधन तर हवेच, पण ती दीर्घकालीन मतपरिवर्तनाची प्रक्रिया आहे. माझ्या मते हा

कायदा पालनासाठी असून, डॉक्टरांनी लिंगनिदान करून स्त्रीभ्रूण हत्या करू नये व केली तर ते पकडले जाऊन त्यांना त्यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी आहे.

डॉक्टरांना समजावणे, त्यांचे मन वळवण व त्यांना मोटिवेट करून सायलेंट ऑब्झर्व्हर बसवून घेण्यासाठी राजी करणे यासाठी मला माझा अधिकार, संवाद कौशल्य, नैतिक प्रभाव व नित्य पाठपुरावा करावा लागला, तो मी केला व त्याचे मला यशस्वी फळही मिळाले.

प्रत्येक माणसाला वाटत असतं की, आपण जीवनात येऊन काहीतरी समाजोपयोगी काम करावं. शासकीय सेवेत काम करताना अशी संधी क्वचित मिळते. मी धाडसानं, परिणामांची पर्वा न करता हे काम केलं. नव्हे, माझ्या हातून नियतीनं करून घेतलं, याचं समाधान आहे. दुसरं काम मी पुरवठा विभागात केलं. रेशन दुकानाचं धान्य गरिबांना मिळत नाही, ही तक्रार देशभर आहे. एक आकडेवारी असं सांगते, की, देशभर सुमारे साठ टक्के धान्याचा व केरोसिनचा काळा बाजार होतो. हे कलेक्टर म्हणून माझ्यापुढे आव्हान होतं. मी पुन्हा माझ्या प्रशासकीय प्रतिभेचा वापर करून इ-गव्हर्नसच्या माध्यमातून उत्तर शोधलं. ते म्हणजे रेशनच्या धान्याचा काळा बाजार रोखण्यासाठी 'एम - सप्लाय' तर केरोसिनसाठी 'व्ही. टी. एस. एस.'

'एम - सप्लाय' ही फार साधी पण अभिनव कल्पना आहे. आज देशात ७० टक्के नागरिकांकडे मोबाइल आहेत. मी काय केलं? प्रत्येक रेशन दुकानाचे जे ग्राहक - रेशनकार्ड होल्डर - होते. त्यातील ५० ग्राहकांचे मोबाइल क्रमांक जमा केले व माझ्या 'एस.एस. एस. ब्लास्टर' यंत्रणेला जोडले. जेव्हा दुकानदार धान्य सरकारी गोदामातून घेऊन जातो, त्याची तपशीलवार माहिती गावकऱ्यांना वा ग्राहकांना तत्काळ उघडकीस येते. पन्नासपैकी कोणीतरी माहिती देतो व दुकानदारास रंगेहाथ पकडले जाऊन शिक्षा होते. ही योजना कमालीची यशस्वी ठरली असून मागील दोन वर्षात जवळपास ९८ टक्के गावात १०० टक्के धान्य पोहोचले व गरिबांना स्वस्त दराने मिळाले. त्या गरीब नागरिकांचा भरल्यापोटी मला दररोज दुवा मिळतो अशी माझी श्रद्धा आहे व त्याचं मला अपार समाधान आहे.

केरोसिन हे गरिबांचं इंधन आहे, पण त्याचा किती मोठ्या प्रमाणात काळा-बाजार होतो ते सांगायला नको. कोल्हापूरही त्याला अपवाद नव्हतं. २००९ मध्ये मी गावोगावी केरोसिन पुरवठा करणाऱ्या सर्व खाजगी टँकर्सवर 'व्हेइकल ट्रेकिंग सिस्टिम' बसवली. त्यामुळे आम्हाला कार्यालयात बसून टँकर केव्हा, कोणत्या गावास गेला हे संगणकावर कळायचं. त्यामुळे 'काळा बाजार'ची थोडी जरी शंका आली की, लगेच संबंधित तालुक्याच्या तहसीलदार किंवा पोलीस अधिकाऱ्यांस फोन करून तो टँकर जप्त करायचा आम्ही हुकूम सोडायचो. यामुळे धाक निर्माण झाला. मग त्याच्यापुढे एक पाऊल जाऊन नवे सॉफ्टवेअर बनवले. तेव्हा केरोसिनचा टँकर ठरलेल्या रस्त्याने

निर्धारित गावी न जाता, अन्य ठिकाणी गेल्याचे संगणकावर कळायचे व एस. एम. एस. अलर्ट 'रूट डिव्हिएशन' यायचा. मग मोबाइलचा वापर करून विशेष सॉफ्टवेअर ऑपरेट केले, की टँकर जाम होईल. तो पुन सुरू करण्यासाठी आमचं सॉफ्टवेअर वापरावं लागतं. ही अक्षरशः क्रांतिकारी कल्पना होती. ती मी मॅग्नम ओपस या आयटी कंपनीच्या गिरीश लाड यांच्या मदतीने विकसित केली. यामुळे केरोसीनचा काळाबाजारही कोल्हापुरात जवळपास थांबला आहे. ह्या उपक्रमामागे महात्मा गांधींच्या विचारांची प्रेरणा होती. शेवटच्या गरीब माणसाचे अश्रू पुसणे हे शासनाचे काम आहे. माझ्या या दोन उपक्रमामुळे मी गरीबांची भूक मिटवू शकलो असं वाटतं. आज महाराष्ट्र शासनाने हे दोन्ही उपक्रम राज्यस्तरावर लागू केले आहेत. माझं आणखी एक सामाजिक उत्तरदायित्वाचे मिशन सफल झाले, असे मी समाधानाने म्हणू शकतो.

'बाल संकुल' ही कोल्हापूरची एक दिवसांपासून अठरा वर्षांपर्यंतच्या अनाथ मुलांचा सांभाळ करीत शिक्षण देणारी संस्था. कलेक्टर तिचे पदसिद्ध अध्यक्ष. साठ वर्षांपासून कोल्हापुरात सेवेचा एक आदर्श प्रस्थापित करणारी संस्था. संस्थेला तिची इमारत कमी पडत होती. दोन नव्या इमारती; ज्यांची किंमत सुमारे सव्वा दोन कोटी होती, बांधणे आवश्यक होते. त्यासाठी शासनाची कोणतीही अर्थसाहाय्याची योजना नव्हती. त्यामुळे मी दैनिक 'पुढारी'च्या मदतीने निधी संकलनाची मोहीम राबवली. लोकांनी 'बाल संकुलाचे' काम व माझी प्रामाणिक तळमळ, ध्यास व प्रतिमा पाहून भरघोस मदत केली व सुमारे पावणेदोन कोटी निधी-रोख व वस्तुरूपाने जमा झाला. एक इमारत पूर्ण झाली असून दुसरीचे काम चालू आहे व डिसेंबरअखेर तेही काम पूर्ण होईल. एवढे मोठे काम नागरिकांच्या दातृत्वावर विश्वास ठेवून सुरू केले व पार पडले. हा माझ्यासाठी एक फार मोठा मोलाचा अनुभव होता. त्यामुळे मी मानसिकदृष्ट्या अधिक उन्नत झालो, माझं सामाजिक भान अधिक दृढ झालं. मुख्य म्हणजे लोकांचा विश्वास मी कमावला. त्यांनी त्यामुळे मला प्रतिसाद दिला, त्यासाठी मी स्वतः दिलेली एकावन्न हजारांची देणगी आणि एका अनाथ मुलीचं कन्यादान करीत, कलेक्टरच्या बंगल्यावर पोलीस बँडसह तिचं विधिवत् लग्न लावलं. या दोन बाबींमुळे या कामी नागरिकांचे मला सहकार्य लाभले.


'ई-गव्हर्नन्स' व 'बाल संकुल' या दोन कामांमुळे गरिबांना त्यांचे हक्काचे धान्य व केरोसीन आणि अनाथ मुलांना हक्कांचे ऊबदार घर देऊ शकलो आणि गर्भातच मारल्या जाणाऱ्या मुलींना, हे सुंदर जग पाहण्याची संधी मोठ्या संख्येनं मी, 'सेव्ह द बेबी गर्ल' या उपक्रमामुळे देऊ शकलो. शासकीय अधिकाऱ्यांनी सामाजिक भान ठेवावं आणि जनतेची सेवा करावी, अशी अपेक्षा असते. मी ती पुरी करण्यात नक्कीच काही प्रमाणात यशस्वी झालो, असं मला वाटतं!

माझ्या आयुष्यातील परभणी व कोल्हापूरच्या सात वर्षांच्या कालखंडाचे व मी

केलेल्या काही कामांचे कथन अत्यंत संक्षिप्त स्वरूपात व किंचितही अतिशयोक्ती न करता केले आहे. मी सामाजिक बांधिलकी मानतो. मला जे शिक्षण, पद व अधिकार मिळाले आहेत त्याचा वापर करून जे शक्य आहे ते करावे, असा माझा स्वभावधर्म आहे. मी फार काही केले आहे असे नाही. केवळ माझ्या स्वधर्माचे पालन केले आहे. ते करताना माणुसकी आणि प्रामाणिकतेचे मूल्य शंभर टक्के पाळले आहे. पण मला त्याचे पुरेपूर मापही मिळाले आहे. मी लोकांसाठी जेव्हा कणभर केले तेव्हा लोकांनी मणभर प्रेम दिले. यापेक्षा अधिक काय हवं? मी जनतेच्या मिळालेल्या प्रेमामुळे धन्य तर आहेच, पण नम्र अधिक आहे. मी आत्मचरित्र लिहीन की नाही हे माहीत नाही. पण संधी मिळाली तर 'परभणी व कोल्हापूरचे दिवस' असं अनुभव-कथनपर जरूर लिहीन. कारण तिथं इतकं काही करता आलं व इतकी माणसं व संस्थांशी मी जोडला गेलो की, तो इतिहास हा एका छोट्या काळाचा व एका शहराचा दस्तऐवज ठरेल. पाहू या, काय होतं ते!

०-०-०

# प्रशासनपर लेख



# १. एका सेक्युलर रोडची अजीब दास्तान!

मराठवाड्यातील एक दुर्लक्षित तालुका. एकेकाळचं मराठवाड्याचं अंदमान. जिल्हा विभाजनानंतर अचानक त्या तालुक्याचं नशीब फळफळलं. इतर दोन मोठ्या तालुक्यांपैकी प्रांत ऑफिस कुठे करावे हे राजकीय स्पर्धेमुळे ठरवणे कठीण झाले. दोन्ही तालुक्यातील मातब्बर पुढाऱ्यांची इच्छा की, काही झालं तरी दुसऱ्या तालुक्याला प्रांत ऑफिस मिळू नये, त्यामुळे या तालुक्याला ते मध्यवर्ती असल्याकारणाने न मागताही प्रांत कार्यालय मिळाले. त्यापाठोपाठ उपपोलीस अधीक्षक व इतरही उपजिल्हा कार्यालये क्रमाने आली आणि तालुक्याच्या विकासाचा मार्ग प्रशस्त झाला.

चंद्रकांत हा तिथला खऱ्या अर्थानं पहिला प्रांतअधिकारी. तो येण्यापूर्वी चार-सहा महिने दुसऱ्या एका उपजिल्हाधिकाऱ्यांकडे त्याचा अतिरिक्त कार्यभार होता. चंद्रकांतचे हे पहिलेच पोस्टिंग. प्रशिक्षण कालावधीत व्ही. पी. राजा यांच्यासारख्या आदर्श कलेक्टरांच्या हाताखाली त्याने जे आत्मसात केले, ते प्रत्यक्षात उतरविण्याची त्याला इच्छा होती. मंत्री, पुढारी, अधिकाऱ्यांचे दौरे यापासून बराचसा मुक्त असलेला हा प्रांत-विभाग त्याला कामासाठी अत्यंत अनुकूल होता. जलद विकासाच्या उद्देशाने जिल्हा विभाजन व प्रांत कार्यालय निर्मिती झाली, त्याच्या पूर्ततेसाठी तिन्ही तालुके हिंडून, लोकनेते व नागरिकांना भेटून आपल्या तीन वर्षाच्या कालावधीत काय करता येईल हे चंद्रकांतने ठरवले. अंमलबजावणीसाठी ॲक्शन प्लॅन करून धडाक्यात तो राबवायला सुरुवात केली.

तालुका मुख्यालयाच्या गावी नगरपालिका असली तरी ते पंधरा-वीस हजार लोकवस्तीचं मोठं खेडंच होतं. पेठ व कसबा अशा दोन भागात त्याची विभागणी झालेली, मध्ये छोटी नदी. तिच्यावर एक छोटा फरशी पूल होता, पण तसे हे दोन भाग अलग पडलेले होते. दोन्ही भागात मातीचे - क्वचित कुठे गिट्टीचे रस्ते होते. सोलापूर-औरंगाबाद राजरस्त्याला जोडणारा एकमेव डांबरी रस्ता कसबा विभागला स्पर्शून जात होता. त्यामुळे धुळीचा, कच्चा व अरुंद रस्ता ही शहराची सर्वांत मोठी समस्या होती.

कसबा व पेठ भाग जोडणारा प्रमुख रस्ता आणि फरशी पुलाचे पक्क्या पुलात रूपांतर करण्याची योजना चंद्रकांतने आखली. आमदाराच्या स्थानिक विकास निधीतून या कामासाठी रक्कम मंजूर करून घेतली. बांधकाम विभागामार्फत ज्या दिवशी प्रत्यक्षात डांबरी रस्त्याचे काम सुरू झाले तेव्हा सगळ्या शहरात आंनदोत्सव साजरा केला गेला.

काम सुरू झाले, त्याच्या तिसऱ्याच दिवशी बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांतकडे आले, आणि म्हणाले,

"सर, एक समस्या उद्‌भवली आहे. नगरपालिका कार्यालयासमोर रस्त्याच्या मध्यभागी मारुतीचं एक छोटं, चौथऱ्यावरचं उघडं मंदिर आहे. ते हलवायला हिंदू समाजाचा विरोध आहे. त्यामुळे काम बंद पडलंय."

रस्त्याचं काम मंजूर करून घेताना चंद्रकांतने ही समस्या जाणून नगराध्यक्ष व इतर नेत्यांशी चर्चाही केली होती. त्यांनी रस्त्याचं काम होणार असेल तर मंदिर हलवता येईल असं आश्वासन दिलं होतं. पण प्रत्यक्षात ती वेळ आली तेव्हा नगराध्यक्ष मुंबईला काहीतरी ग्रँटचे काम काढून गेले. तर इतर काही नेते मंडळी मूग गिळून चूप होती. काही धार्मिक नेत्यांनी हिंदूंच्या भावना दुखावत असल्यामुळे मंदिर न हलवता तेथे वाहतूक बेट (आयलंड) करून रस्ता पुढे न्यावा अशी मागणी केली. आणि हिंदू समाजाची धार्मिक भावना फुलवीत काम बंद पाडलं.

चंद्रकांत तातडीने तेथे गेला. उपस्थित झालेल्या नेत्यांना म्हणाला, "हे पहा, रस्ता अत्यंत अरुंद आहे, त्यामुळे इथे वाहतूक बेट करणे शक्य नाही. रस्ता होईल तेवढा रुंद करण्याचा माझा प्रयत्न आहे. दुतर्फा असलेल्या दुकानांचे कट्टेही काढायला सुरुवात केली आहे."

"पण साहेब, हनुमान ही ग्रामदेवता आहे."

"तिचं मंदिर तर बाजारपेठेत आहे."

चंद्रकांत समोरच्या उघड्या कट्ट्यावरील शेंदूर फासलेल्या मूर्तीकडे बोट दाखवत म्हणाला,

"हे काय मंदिर आहे? हे पहा - इथे कुत्र्यामांजरांनी लघवी केल्याच्या खुणा दिसतात."

तावातावानं बोलणारा पुढारी नरमला.

"यापुढे आम्ही मंदिराच्या पावित्र्याची, रक्षणाची जबाबदारी घेऊ. त्यासाठी आम्ही हनुमान भक्त मंडळ स्थापन करू. पण काही झालं तरी हे मंदिर हलवायला आमचा ठाम विरोध आहे."

"जरा विचार करा, रस्त्याची शहराला केवढी गरज आहे! पावसाळ्यात अक्षरशः चिखलातून तुम्ही लोक जा-ये करता. नदीला जराही पूर आला की कसबा

व पेठेचा संपर्क तुटतो. अरुंद रस्त्यामुळे एक मोठा ट्रक आला की तासन्‌तास वाहतुक कोंडी होते. त्यामुळे आपला हा आग्रह अनुचित आहे. मी तुम्हाला पर्याय देतो. हे मंदिर नगरपालिका कार्यालयाच्या भिंतीला लागून असलेल्या कट्ट्यावर स्थलांतरित करू. हवं तर येथे तुम्ही छोटंसं मखर उभारून त्याला मंदिराचा आकार द्या. त्यासाठी मी मदत करीन, पण हे काम अडवणं योग्य होणार नाही.''

पण हिंदू समाजाची नेते मंडळी काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. त्यामुळे चर्चा वांझोटी ठरली.

चंद्रकांत आपल्या कार्यालयात येऊन बसला. आणि विचार करू लागला. 'अशा परिस्थितीत आपले राजासाहेब असते तर त्यांनी काय केले असते? कोणती नवी प्रशासकीय गुरुकिल्ली त्यांनी चालविली असती?''

चंद्रकांतनं स्वत:ला प्रश्न केला आणि बऱ्याच विचाराअंती त्याला उत्तर गवसत गेलं.

त्या रात्री त्याने पोलीस बंदोबस्तात दोन्हीबाजूंनी रस्ते कामासाठी म्हणून बंद केल्याचे दर्शवीत कुणाला कळू न देता ते रस्त्यावरचे उघडे मंदिर हटविले. साग्रसंगीत प्राणप्रतिष्ठा करीत ते नगर परिषद कार्यालयाच्या भिंतीबाहेरील कट्ट्यावर स्थलांतरित केले. त्यावर झटपट छोटे देवालय मखरासह बांधून काढले. या साऱ्याचं त्यानं आठवणीने व्हिडिओ शूटिंग करवून घेतले आणि एका पुजाऱ्याच्या हस्ते पूजा घडवून आणली. याची शहरवासीयांना यत्किंचितही चाहूल त्या रात्री लागली नाही. मंदिर स्थलांतरित करून तो रस्त्याचा भाग, यापुढे जवळपास शंभर मीटर, रात्रीतूनच डांबरी करून टाकला.

सकाळी शहरात हे वृत्त वाऱ्यासारखे पसरले. विरोध करणारी हिंदू नेते मंडळी संतप्त झाली होती. त्यांनी शहर बंद ठेवण्याचे जाहीर केले. एक मोर्चा काढला. प्रशासनाचा निषेध करणारं निवेदन दिले. मंदिर पुन्हा रस्त्याच्या मध्यभागी वाहतूक बेटासह उभारण्याचा पुनरुच्चार केला. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला.

चंद्रकांतने शांतपणे ते शक्य नाही, असे सांगितले.

तसा एक जहाल नेता आवेशाने म्हणाला,

"बरोबर आहे साहेब. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ म्हणतात ना? तुम्ही हिंदूंच्या बाबतीत असं वागणारच. पण हाच न्याय तुम्ही मुस्लिमांना लावणार का? कसब्यात मुस्लिमांनी रस्त्याचा एक चतुर्थांश भाग व्यापून मशिदीचा विस्तार केला आहे. तो आपण पाडणार का?''

"तेथेही हाच न्याय लावला जाईल.''

मोर्च्यातील हिंदूंचे त्या आश्वासनाने समाधान झाले नाही; पण त्याची बातमी मुस्लिमात हा हा म्हणता गेली.

तो शुक्रवार होता. दुपारच्या नमाजानंतर मौलवींनी आवाहन केले. मशिदीचा रस्त्यात येणारा तथाकथित भाग प्रशासनानं पाडायला प्राणपणाने मुस्लिमांनी विरोध करावा. रात्रीतून मंदिर हलविले तसा प्रकार होऊ म्हणून चोवीस तास मशिदीचे रक्षण करण्यासाठी पहारा बसविण्याचे ठरविले.

मराठवाडा हा एकेकाळी निजामाचा भाग होता. हैदराबादशी जवळचा संबंध आजही आहे. मार्गदर्शनासाठी येथील मुस्लीम समाज हैदराबादच्या मौलवीकडे व राजकीय नेत्यांकडे पाहात असतो. त्यांनी तातडीने शहरास भेट दिली आणि वातावरण तापत गेले.

पंधरा दिवसांनी रस्त्याचे काम कसब्यात पोचले. चंद्रकांतने प्रथम एकशे चव्वेचाळीस कलम लावीत बाहेरच्या पुढाऱ्यांना शहरबंदी केली. तापलेले वातावरण शांत करून शहरातील महत्त्वाच्या दोन्ही समाजांच्या नेत्यांची बैठक बोलावली.

"हा रस्ता तुम्हा सर्व शहरवासीयांसाठी आहे. मशिदीच्या अनधिकृत विस्तारामुळे अडथळा निर्माण झालेला आहे. हा विस्तारित भाग मोकळाच आहे. तेथे कोणतेही धार्मिक कार्य होत नाही. हा भाग पाडला तरी मूळ मशिदीला व त्याच्या पावित्र्याला धक्का पोहोचत नाही. तरी तुम्ही विचार करावा. मी आवाहन करतो की, आपण स्वत:हून रस्त्यामध्ये असलेला भाग पाडावा."

"ही आमच्या मजहबमध्ये ढवळाढवळ आहे, सर."

"हे पहा, हा धार्मिक प्रश्न नाही. रस्त्याच्या बांधकामाचा व त्यावरील अतिक्रमण दूर करण्याचा प्रश्न आहे. रस्ता होणारच हे लक्षात घ्या. रस्त्यामध्ये हिंदूंचे मंदिर होते, ते मी स्वत: हटवले आहे. तुमच्या मशिदीचा केवळ एक कोपरा रस्त्यात येत आहे, तो फक्त मागे घ्यायचा आहे. इथे मशीद हटविण्याचा प्रश्नच येत नाही. तेव्हा समजुतीनं घ्यावं, अशी इच्छा आहे. नाही तर प्रशासनाला कठोर व्हावं लागेल."

चंद्रकांतच्या बोलण्यात सडेतोडपणा कठोर निश्चय होता. हिंदूंचे मंदिर लोकांना न जुमानता हलविल्याचे ताजे उदाहरण समोर असल्यामुळे चंद्रकांत जे बोलतो ते करून दाखवेल अशी मुस्लिमांची खात्री झाली होती.

मुंबईत शिकून आलेला एक तरुण मुस्लीम नगरसेवक विचाराने डावीकडे झुकलेला होता. त्याने सर्वप्रथम 'मशिदचा रस्त्यात येणारा भाग काढून घ्यायला काही हरकत नाही' अशी उघड भूमिका चर्चेच्यावेळी घेतली. मग मुस्लिमांनी बरीच चर्चा करून आपणहून मशिदीचा भाग पडू असं कळवलं. त्याप्रमाणे कृतीही केली.

आठ दिवसात रस्ता रुंदीकरणासह आणि नदीवरील पुलासह पूर्ण झाला.

त्या घटनेला पंधरा वर्षे झाली असतील आता, पण अजूनही शहरवासी चंद्रकांतला विसरले नाहीत. हा रस्ता त्याच्या पहिल्या पोस्टिंगमधला विजयाचा टप्पा ठरला. तोही हिंदू-मुस्लिमांच्या जातीय तणावाच्या सवेदनक्षम संदर्भातला.

वाचकहो, "एका सर्वधर्मसमभाव रस्त्याची' ही कहाणी इनसायडरला प्रशासननाम्यातील एका महत्त्वाच्या प्रशासन कौशल्याची द्योतक वाटते. ते म्हणजे कायदा व सुव्यवस्था. त्यातील सर्वात ज्वालाग्रही पैलू म्हणजे धार्मिक व जातीय संघर्ष.

हा रस्ता व्हावा असं हिंदू-मुस्लीम समाजातील सर्वसामान्य नागरिकांना तीव्रतेनं वाटत होते. ती त्यांची भौतिक गरज होती. ती नेमकी हेरून चंद्रकांतने पावले उचलली. उपक्रम तडीस नेला. त्याने जे प्रशासनकौशल्य दाखवलं, त्याचे पैलू पाहण्यासारखे आहेत. हिंदू - मुस्लीम संघर्ष ही भारतीय प्रशावनापुढे कायम डोकेदुखी आहे. या संघर्षाला बगल देणेच बहुसंख्य प्रशासक श्रेयस्कर मानतात. हा संघर्ष चिघळला, दंगल पेटली, कोणी जखमी वा मृत झाले तर प्रशासकाची चौकशी व बदली अटळ असते, पण प्रश्न जास्तच पेटला आणि विधानसभेपर्यंत गेला तर संबंधित मंत्री चर्चेला उत्तर देताना सरळ त्याच्या निलंबनाची व खातेनिहाय चौकशीची घोषणा करतात. त्या संभाव्य भीतीमुळे कुठलाही प्रशासक असे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करतो.

चंद्रकांतने हे आव्हान यशस्वीपणे पेलले नसते तर नोकरीच्या प्रारंभीच त्याचे खच्चीकरण झाले असते., हिंदूंनी बंद पाळून निषेध केला तरी ते उघड्यावर शेंदूर फासलेल्या मारुतीचं तथाकथित मंदिर होतं, म्हणून एका मर्यादेपलीकडे हिंदू समाजाचा रोष गेला नाही. मशीद मात्र भव्य व भरभक्कम होती आणि बाहेरच्या नेत्यांमुळे व धर्मगुरूंमुळे वातावरण तापले होते. "मी दोन्ही धर्मांना समान तराजू लावतो व प्रशासन धर्मनिरपेक्ष व तटस्थ आहे." हे चंद्रकांतने केवळ बोलण्यातून नव्हे तर कृतीतून मुस्लीम समाजावर प्रभावीपणे बिंबविण्यात यश मिळवले. निमित्तमात्र तो डाव्या विचाराचा नगरसेवक ठरला, तरी मनोमन कुठेतरी मुस्लीम समाजमन रस्त्याच्या ऐहिक गरजेच्या निर्णयाप्रत येऊन ठेपले होते. त्याला चंद्रकांतने आवाहन केले, तेव्हा अनुकूल प्रतिसाद मिळाला.

या प्रश्नाचा एक जटिल पैलू म्हणजे अनधिकृतपणे रस्ते अडवून वा सार्वजनिक ठिकाणी मंदिर, मशिद, पुतळे वा मदरसा यासारखा धर्मसंस्था उभारण्याची वाढती प्रवृत्ती. साऱ्या समाजाची व प्रशासनातील धार्मिक वृत्तीच्या स्थानिक अधिकाऱ्यांची अशा धर्मस्थळांच्या बांधकामासाठी मूक संमती असल्यामुळे त्यांची उभारणी होते. प्रशासनासाठी ती कायमची डोकेदुखी ठरतात. ती पाडणे वा स्थलांतरित करणे हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असतो. शंभरपैकी नव्याण्णव प्रकरणात ही धार्मिक बांधकामे कायम राहतात. प्रस्तुत प्रकरणासारख्या एखाद्या ठिकाणी ती हटवली जातात. एरव्ही दंगली होतात, तणाव वाढतो.

सतत तीन टर्म निवडून येणाऱ्या मराठवाड्यातील एका आमदाराला निवडणुकीत जबर आव्हान निर्माण झाले. त्यावर यशस्वीपणे मात करून चवथ्यांदा निवडून

येण्याचा त्याने विक्रम केला. त्यासाठी त्याने अभिनव अशी 'पुतळा स्ट्रॅटेजी' वापरली. तो स्वत: मराठा. ती मते पक्की होती. विरोधी उमेदवार मागासवर्गीयात लोकप्रिय होता. त्यावर मात करण्यासाठी त्याने एक अफलातून उपाय शोधला. मतदारसंघात मातंग व दलितांची मते बरीच होती, त्यांना आपलंसं करण्यासाठी त्याने चक्क ठोक भावाने अण्णाभाऊ साठे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पाचपन्नास अर्धपुतळे बनवून घेतले आणि प्रत्येक गावात त्यांच्या वस्तीत जाऊन ते पुतळे भेट दिले. पुतळे देताना आश्वासन दिले, "मी निवडून आल्यावर चौथरा, भोवताली बगीचा व बांधकामासाठी आमदार फंडातून मदत करीन. तोवर तुम्ही कच्चा चौथरा उभारा व पुतळा बसवा."

त्याची ही 'पुतळा स्ट्रॅटेजी' यशस्वी ठरली व तो भरघोस मताने निवडून आला.

गणेशोत्सव, शिवजयंती, नवरात्र महोत्सव, आंबेडकर जयंती व आता वाढीस लागलेली अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव हे अनेक दिवस चालतात. महसूल व पोलीस प्रशासन वर्षातून किमान चार महिने तरी अशा महोत्सवाच्या बंदोबस्तात गुंतून पडलेले असतात. त्यासाठी समाजाला अप्रत्यक्षपणे फार मोठी किंमत मोजावी लागते.

वाचकहो, शहरातील तो रस्ता पूर्ण झाल्यावर त्याचा समारंभही स्थानिक आमदारांच्या हस्ते थाटात पार पडलाय, पण सुदैवानं त्या रस्त्याला कुणातरी देशभक्त पुढाऱ्याचे वा गेला बाजार दिवंगत नगराध्यक्ष - नगरसेवकाचे नाव देण्याचे कुणाला सुचले नाही. समारंभानंतर आमदार प्रांजळपणे म्हणाले, "या रस्त्याला एकच नाव सार्थ राहील. "सर्वधर्मसमभाव रस्ता किंवा सेक्युलर रोड....! बरोबर ना?" त्यांनी टाळीसाठी हात पुढे केला.

चंद्रकांत मात्र त्यांच्या कथनातील सत्यदर्शनानं घायाळ होत त्यांच्याकडे टाळीला प्रतिसाद न देता सुन्नपणे पाहातच राहिला.

वाचकहो, तुमचं काय मत आहे? त्या रोडला तुम्हीही 'सेक्युलर रोड' म्हणणार ना?

०-०-०

# २. हेचि फल काय मम तपाला?

"माफ करा सर, तुम्हाला अपरात्री फोन करून त्रास देत आहे, पण परवा जनसुनवाई कार्यक्रमात 'तुम्ही मला केव्हाही, कुणीही नागरिक फोननेसुद्धा खबर देऊ शकतो, त्याची मी दखल घेऊन कार्यवाही करीन.' असं निःसंदिग्धपणे सांगितले, ते खरं मानून आज मी फोन करतो आहे...''

रात्री अकराचा सुमार. चंद्रकांत पुस्तक वाचीत बेडवर पडला होता आणि फोनची घंटा वाजली. पलीकडे रिसीव्हरवर एका वृद्धाचा थरथरता आवाज होता. तो चंद्रकांतला 'जनसुनवाई' कार्यक्रमाचा संदर्भ देत काही बातमी देऊ इच्छित होता.

जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून त्यानं सूत्रं हाती घेतली तेव्हा आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी त्याला एकच ब्रीफ दिलं होतं - 'हर संभव पावलं उचल! आणि गल्फ वॉरमुळे उद्भवलेली व बरीचशी कृत्रिम असलेली रॉकेलटंचाई संपुष्टात आण. त्याचा होणारा काळाबाजार रोख. त्यासाठी तुला दोन महिन्यांची मुदत देत आहोत!''

एक आव्हान म्हणून त्यानं ही जबाबदारी स्वीकारली हेती, पण या शहरातील रॉकेलटंचाईची गुंतागुंत जेव्हा त्याच्या ध्यानात येऊ लागली तसा तो काही काळ सुन्न झाला होता. शहरात लोकसंख्येच्या मानानं मुबलक नव्हे पण पुरेसा म्हणता येईल एवढा रॉकेल पुरवठा होत असूनही, सतत रॉकेलटंचाईच्या बातम्या यायच्या. रॉकेलच्या हातगाड्यांपुढे, दुकानात रांगा लागाच्या. दर महिन्या - दोन महिन्याला विविध संघटनामार्फत मोर्चे निघायचे. निदर्शने व्हायची. शहरातील नगरसेवक, विविध जातिधर्मांच्या संघटना आणि पक्षप्रमुख रॉकेल प्रश्नात नको तेवढा रस घ्यायचे. जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून त्याला दररोज पन्नास-शंभर माणसे भेटत राहायची. एकूणच केरोसिन समस्येचा प्रश्न कॅन्सरच्या भाषेत सांगायचं झालं तर 'थर्ड स्टेजला' पोहोचलेला होता आणि कितीही कार्यक्षम अधिकारी असू दे, त्याचा इथं निश्चितपणे 'वॉटर्लू' व्हायचा - असा गेल्या पंधरा - वीस वर्षाचा इतिहास होता.

यात भर पडली ती इराकनं कुवेतचा कब्जा करून भडकवलेल्या गल्फ युद्धाची. भारताचा तेलपुरवठा विसकळीत झाल्यामुळे टंचाई वाढली होती. त्याचा परिणाम या

शहरावर अधिक झाला होता. मुळातच काळाबाजारवाले व राजकारणी धंदेवाईकांची भ्रष्ट युती व राकेल धंद्यातील प्रचंड 'ऑन मनी' मुळे नित्य टंचाई निर्माण करणे हा या युतीचा हातखंडा प्रयोग होता. त्या आगीत गल्फ वॉरच्या निमित्तानं अपुऱ्या रॉकेल पुरवठ्याचं तेल पडलं आणि रॉकेल टंचाईनं भीषण रूप धारण केलं!

या पार्श्वभूमीवर चंद्रकांतनं पदभार स्वीकारल्यावर तडफेनं कामास प्रारंभ केला. प्रथम स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ विक्रेत्यांच्या बैठका घेऊन त्यांना सूचना दिल्या व दररोज स्वत: हिंडून तपासणी करणं व अकस्मात धाडी घालणं सुरू केलं, पण टंचाईचे खरे सूत्रभार हे बडे रॉकेल एजंट आहेत हे त्याला माहीत होतं, पण ते स्वत: नामानिराळे राहून ते सब एजंट व किरकोळ विक्रेत्यांकडून काळाबाजार करतात हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य होतं आणि त्यामुळेच त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करता येत नव्हती व वेसण घालता येत नव्हती.

अचानक त्याला 'जनसुनवाई'ची कल्पना सुचली. राजस्थानमध्ये गावकरी एकत्र येऊन अधिकारी - पुढाऱ्यांना 'जनसुनवाई' च्या माध्यमातून जाब विचारतात, असं त्यानं वृत्तपत्रातून वाचलं होतं. या कल्पनेचा उपयोग करून घेण्याचं त्यानं ठरवलं आणि वार्ताहर परिषद घेऊन, रॉकेल टंचाई निवारणार्थ प्रशासनातर्फे पुढाकर घेत 'जनसुनवाई' कार्यक्रम घेण्याचं जाहीर केलं. शहरातील नागरिकांनी प्रश्न बंद पेटीत टाकावेत. काही गुप्त बातमी - रॉकेलच्या काळाबाजाराच्या संदर्भात असेल तर तीही या पेटीत टाकावी. कार्यक्रमातून त्यावर कार्यवाही करून सभेमध्ये अहवाल दिला जाईल, असं त्यानं जाहीर केलं.

'जनसुनवाई' चा कार्यक्रम अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाला. कारण बंद पेटीत नागरिकांनी ज्या खबरी दिल्या होत्या. त्याबाबत चंद्रकातनं कार्यवाही करून एक सबएजंट व तीन स्वस्त धान्य दुकानांवर धाडी घालून त्यांचा रॉकेलचा गैरव्यवहार उघडकीस आणला होता आणि त्यांचे परवाने रद्द केले होते. या 'जनसुनवाई' साठी तेल कंपन्यांचे जिल्हा प्रतिनिधी व शहरातील सर्व ठोक एजंट व सब एजंट यांना उपस्थित राहणे चंद्रकांतनं सक्तीचे केले होते. हेतू हाच की, त्यांना नागरिकांच्या रोषाची जाणीव व्हावी आणि त्यांनी स्वत:हून गैरव्यवहार थांबवावा!

आणि आज एक वृद्ध गृहस्थ फोनवर 'जनसुनवाई' चा संदर्भ देत काही बातमी देऊ इच्छित होता.

''माफीचा प्रश्न येतोच कुठे? उलट आपल्यासारखे जागरूक समाजहितैषी नागरिक आपणहून शासनाला मदत करू इच्छितात हे आमच्यासाठी चांगलेच आहे.'' चंद्रकांत मनापासून म्हणाला, ''मी तुमच्या बातमीवर पूर्ण विश्वास ठेवून योग्य ती कार्यवाही करीन!''

त्या वृद्धानं सांगितलेली बातमी ऐकताना चंद्रकांतला जाणवलं की, ती जर खरी

असेल व आपल्याला भक्कम पुरावा सापडला तर रॉकेल रॅकेटमधील 'बडी मछली' पकडता येईल. पहिले बाजीराव पेशव्यांनी दिल्लीवर स्वारी का करायची हे पटवून देताना जे सूत्र सांगितले ते तर सर्वकालीन सत्य आहे. ''मुळावर घाव घातला की फांद्या आपोआपच खाली पडतात.'' बाजीरावांचे हे प्रसिद्ध वाक्य रॉकेल टंचाई प्रकरणातही लागू पडणार होतं. काळा बाजार करणारा शहराचा 'केरोसिन किंग' जर पकडला गेला तर कृत्रिम टंचाईवर परिणामकारक मात करता येणार होती. शहरातील केरोसिन किंग बद्रीप्रसादनं प्रत्यक्षात वडगाव भागासाठी सब एजंट मानेंना रॉकेलचे टँकर न देता ते बाहेरगावी काळ्याबाजारात वळते केले होते, अशी बातमी त्या अनाम वृद्धानं देत पुढे म्हणलं, ''सर - आपण उद्याच मानेच्या ऑफिसवर धाड टाकली व गावात चौकशी केली तर कळेल की, मागील आठ दिवसात जेमतेम शे-पाचशे लिटर रॉकेल जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी वाटप केलं असेल. एवढेच!''

चंद्रकांतनं आपल्या पुरवठा निरीक्षकासह दुसऱ्या दिवशी सकाळीच वडगावला जाऊन मानेंच्या ऑफिसातील सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली. पंधरा दिवसापूर्वी दोन टँकर्सनं चोवीस हजार लिटर रॉकेल बद्रीप्रसादकडून त्याला प्राप्त झाल्याची व ती पुढील तीन दिवसात वडगाव सर्कलमधील चौतीस स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ विक्रेत्यांना वाटप केल्याच्या नोंदी होत्या. रेकॉर्ड एकदम आलबेल होतं, पण जेव्हा त्या ३४ दुकानदार व एजंटपैकी आठ - दहा जणांच्या गावी जाऊन तपासणी केली तेव्हा गावकऱ्यांनी गावात रॉकेल आलेच नाही असा जबाव लिहून दिला. तेव्हा किरकोळ विक्रेते व स्वस्त धान्य दुकानदारांनी कबूल केलं की, त्यांनी रॉकेल गावी आणलेच नाही आणि आपणावर प्रकरण शेकू नये म्हणून त्यांनी आपण रॉकेल विकत घेतलेच नाही असा जबाब दिला.

तूर्त चंद्रकांतनं त्यांचा खुलासा मान्य करून यापुढे असे प्रकार करणार नसल्याची हमी घेऊन व त्यांना प्रत्येकी पाचशे रुपयांचा दंड करून सोडून दिले. कारण त्याचं लक्ष होतं माने व बद्रीप्रसाद.

पूर्ण चौकशीअंती चंद्रकांतनं हे सिद्ध केलं की, मानेनं बद्रीप्रसादकडून विकत घेतलेलं रॉकेल वाटप न करता काळ्या बाजारात वळतं केलं. कलेक्टरांच्या आदेशानं मानेंचा रॉकेल परवाना निलंबित करण्यात आला. निलंबनाचे आदेश घेताना माने चंद्रकांतला स्पष्ट कबुली देत म्हणाला,

''सर, आजवर मला कोणी हात लावायची हिंमत केली नव्हती. पण एक सांगतो, जितका मी दोषी आहे. त्याच्या दसपट बद्रीप्रसाद दोषी आहे. पण तुम्हाला त्याच्याविरुद्ध पुरावा सापडणं शक्य नाही. कारण पाहुण्याहाती साप मारावा तसा माझ्या नावेच नव्हे, तर बऱ्याच सब एजंटच्या नावे तोच काळाबाजार करतो, अडकतो मात्र आम्ही.''

"मला त्याची तुम्ही मोडस ऑपरंडी - कार्यपद्धती सांगितली तर चौकशीच्या वेळी तुमचा सहानुभूतीने विचार करता येईल."

मधाचं बोट लावीत चंद्रकांतनं मानेला बोलतं करण्याचा प्रयत्न केला.

"सर, मी सहीपुरता साक्षर आहे. मला लिखापढी कळत नाही आणि हा बद्रीप्रसाद त्यात उस्ताद आहे." माने म्हणाला, "पण त्याच्यापर्यंत जर कुणी पोहोचू शकत असेल तर ते तुम्हीच. त्याला जरूर पकडा व शिक्षा करा सर!"

चंद्रकांत दिवसभर विचार करत होता तो बद्रीप्रसादचा! हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचा जिल्हा एजंट होता. त्यांच्या मार्केटिंग अधिकाऱ्यांशी बोलला, पण तो चंद्रकांतच्या ताकास तूर लावू देत नव्हता. तो बद्रीप्रसाद व इतर एजंटच्या 'रॅकेट'मध्ये सामील असणार.

माने प्रकरणाचा शहराच्या रॉकेल टंचाईवर काही प्रकाणात का होईना अनुकूल परिणाम झाला होता. सर्व ठोक एजंट सावध झाले होते. त्यांनी बऱ्याच प्रमाणात रॉकेलचा पुरवठा, काळाबाजार करणे कमी केले होते. शहरातील रॉकेल टंचाई जवळपास संपुष्टात आली होती. आयुक्तांनी त्याचं अभिनंदन केलं होतं पण चंद्रकांत समाधानी नव्हता. कारण ही तात्पुरती जीत होती. अजूनही 'बडी मछली' कायद्याच्या जाळ्यात गवसली नव्हती.

माने प्रकरणात त्याच्या इतकाच दोषी असलेला बद्रीप्रसाद अजूनही पुराव्याअभावी मोकळा होता. त्याचं रेकॉर्ड स्वच्छ होतं. त्यानं मानेला दोन टँकर्स दिल्याची कागदोपत्री नोंद होती व ते मिळाल्याबद्दल मानेची स्वाक्षरी होती.

"होय, ती सही माझी आहे, पण केवळ पाच हजार देऊन त्यांनी माझी सही घेतली व स्वत: त्यानं दोन टँकर्सचा काळाबाजार करून किमान पन्नास हजाराची चांदी केली असणार."

मानेचं हे वाक्य त्याला बोचत होतं आणि ब्रदीप्रसादला पकडून धडा शिकवल्याखेरीज खऱ्या अर्थानं या मोठ्या माशाला वेसण बसणार नव्हती की शहर व जिल्ह्यातील रॉकेल टंचाई संपणार नव्हती. पण बद्रीप्रसादविरुद्ध काही पुरावा सापडत नव्हता.

रात्री साडेदहाची वेळ. पुन्हा फोनची घंटी. तोच अज्ञात वृद्धाचा थरथरता स्वर.

"अभिनंदन सर, मी आजच गावाहून परत आलो व जुने पेपर्स वाचले, पण बद्रीप्रसाद खरा गुन्हेगार आहे, तो अजूनही मोकळाच आहे."

"होय, पण त्याच्याविरुद्ध काही पुरावा सापडत नाही. तुम्ही काही टीप्स देऊ शकाल का त्याच्या मोडस् ऑपरेंडीबाबत?"

"टीप नाही, पण एक प्रयत्न करून पाहावा असं वाटतं. तुम्ही त्याच्या बँकेचे रेकॉर्ड का तपासत नाही?"

पण त्यानं काय होणार आहे, हा प्रश्न होता. दुसऱ्या दिवशी कार्यालयीन

कामकाज करत असताना हा प्रश्न त्याच्या डोक्यात घोळत होता.

त्याच्या दालनात बद्रीप्रसादचा कार्यालयीन काम करणारा मुनीम आला. बद्रीप्रसादच्या नावे ठोक परवान्यासोबत किरकोळ परवानाही होता. त्यासाठी त्यांना पाच टँकर्सचे आदेश पाहिजे होते. ते नियमानुसार असल्यामुळे देण्यात काही अडचण नव्हती. पण चंद्रकांतनं मुनीमला बसवून घेत विचारलं, "सेठ, बद्रीप्रसादचं सारं काम तुम्हीच पाहता वाटतं? आय मीन इथलं? बँकेचं?"

"हो, मी त्यांच्या विश्वासातला आहे."

"आता किरकोळ एजंट म्हणून तुम्हाला पाच टँकर्सचा परवाना दिला आहे. पुढील तुमची प्रोसिजर काय आहे."

"सर, या पाच टँकर्सचे कंपनी भावाने जे पैसे होतात तेवढ्याचा डिमांड ड्राफ्ट काढायचा व तो डी. डी. कंपनीत जमा करून टँकर्स घ्यायचे."

मुनीमला हे सांगताना नवल वाटलं होतं. एवढा मोठा अधिकारी, त्याला ही साधी प्रोसिजर माहीत नाही?

"सर, हे पाहा या पाच टँकर्ससाठी डी. डी. काढण्याचं बँकेचं व्हाऊचर बनवलं आहे."

चंद्रकांतनं बँकेचं ते लाल रंगाचं व्हाऊचर हाती घेऊन पाहिलं. तिथे 'फॉर बद्रीप्रसाद अँड कंपनी!" असा रबर स्टँप मारलेला होता व तिथे मुनीमची झोकदार सही होती. अचानक त्याच्या मनात एक विचार चमकून गेला आणि तो चकित झाला. एकेकाळी बँकेत काम केलं असूनही हे आपल्या लक्षात येऊ नये?

"मुनीमजी, चला, आपण तुमच्या बँकेत जाऊ. माने प्रकरणात पैसे कोणी भरले हे व्हाऊचर्सच्या आधारे तपासून पाहू व खात्री करून घेऊ."

चंद्रकांतनं खडा टाकून पाहिला. तो अचूक लागला होता. क्षणार्धात मुनीमजी भीतीनं पांढराफटक पडला.

"स.... सर... आपण तर पूर्ण तपास केला आहे.. पुन्हा हे काय?"

"मनात शंका आली म्हणून. तिचं निरसन करून घ्यायचं एवढंच!"

"मला दुसरं एक अर्जंट काम आहे. जरा दुकानात जाऊन आलं पाहिजे." तो कसाबसा म्हणाला.

चंद्रकांतनं मनाशी विचार करून त्याला परवानगी दिली. बरोबर बारा वाजता बँकेत येण्याची सूचना केली. तो अक्षरशः धावतच दालनाबाहेर गेला.

चंद्रकांतला खात्री होती की, मुनीमजी आता बद्रीप्रसादकडे जातील व बँकेला फोन करून कदाचित डॉक्युमेंटस् दाखवू नयेत, असं कळवतील, बँकही 'व्यक्तिगत ग्राहकाची गोपनीयता जपण्याच्या" नावाखाली नाही म्हणेल... हे सारं घडलं तर नक्कीच माने प्रकरणाचा खरा सूत्रधार बद्रीप्रसाद आहे हे सिद्ध होईल व त्याच्याविरुद्ध

पुरावा सापडू शकेल.

तो कलेक्टरकडे गेला व त्यांना सारं कथन करून म्हणाला,

"सर, आपण बँकेच्या रिजनल मॅनेजरला बोलावून मला ते व्हाऊचर पाहण्याची परवानगी देण्याची सूचना करा. मला खात्री आहे, माझा अंदाज खोटा ठरणार नाही."

चंद्रकांत बँकेत पोहोचला तेव्हा तिथं बद्रीप्रसाद व मुनीमजी हजर होते, पण त्यांच्याशी न बोलता तो सरळ मॅनेजरच्या केबिनमध्ये गेला. त्यांना रिजनल मॅनेजरचा फोन आल्यामुळे त्यांनी व्हाऊचर काढून ठेवले होते. त्यावरून मानेंच्या नावाने दोन टँकर्सचे पैसे बद्रीप्रसादच्या मुनिमाने भरले होते व तो डी. डी. घेऊन मुनिमानेच रॉकेल कंपनीच्या कार्यालयात जाऊन रॉकेलचे भरलेले टँकर्स घेतले होते, हे आता कागदोपत्री सिद्ध होत होतं! कारण मानेच्या नावाने डी. डी. साठी व्हाऊचर्स भरताना मुनीमने नेहमीच्या सवयीने 'बद्रीप्रसाद अँड कंपनी' चा रबर स्टँप मारून आपली सही केली होती. तिथंच तो फसला होता.

चंद्रकांतनं रुद्रावतार धारण करताच मुनिमानं कबुली जबाब दिला. चंद्रकांत मग अधिक खोलात गेला व त्यानं एक वर्षाचे सर्व व्हाऊचर्स तपासले. तेव्हा अनेक किरकोळ आणि सब एजंटांच्या नावाने 'बद्रीप्रसाद अँड कंपनी' ने पैसे भरण्याचे व ते टँकर्स उचलल्याचे निष्पन्न झाले. एवढा भरभक्कम पुरावा हाती आल्यावर बद्रीप्रसादचा परवाना रद्द करताना काही अडचण आली नाही.

शहराच्या केरोसिन किंगचा रॉकेलचा ठोक व किरकोळ परवाना रद्द होणे ही धक्कादायक बातमी होती. त्याचा परिणाम जसा अपेक्षित होता तसाच दिसून आला. रॉकेल टंचाई संपुष्टात आली व प्रत्येक एजंट व विक्रेत्याकडे मुबलक रॉकेल मिळू लागले.

चंद्रकांतवर नागरिकांनी पत्र लिहून वा भेटून अभिनंदनाचा वर्षाव केला.

चंद्रकांतचं धाडसत्र अधिक वेगानं चालू राहिले. ते अर्थातच राजकारणी व एजंटाच्या अभद्र युतीस पचनी पाडणं शक्यच नव्हतं.

बद्रीप्रसादच्या प्रकरणानंतर तीनच महिन्यांनी चंद्रकांतची तडकाफडकी बदली करण्यात आली आणि काही काळातच "येरे माझ्या मागल्या" परिस्थिती आली.

चंद्रकांत बदलीच्या जागी रुजू होण्यासाठी जाताना इनसायडरपुढे आपलं मन मोकळं करताना म्हणाला,

"मित्रा, बदलीचं काही वाटत नाही, पण अवघ्या पाच महिन्यात बदली व्हावी - तीही कठोरपणे कर्तव्यपालन केलं म्हणून? ही तर चांगलं काम केलं म्हणून पनिशमेंट झाली. मी यातून काय अर्थ काढावा? आजवर बद्रीप्रसाद- सारख्यांशी समझोता करून सुखेनैव काम करणारे अनेक पुरवठा अधिकारी होऊन गेलेच की! मी हा जो काही अट्टाहास केला तो कशासाठी? ज्या गोरगरिबांची चूल त्याविना पेटत

नाही, ते रॉकेल त्यांना योग्य दरात नियमित मिळावे म्हणून ना? मग का नाही माझ्यामागे त्या जनतेचं किंवा माझ्या वरिष्ठाचं बळ उभं राहिलं? अजून माझी जिद्द कायम आहे. मी हिंमत नाही हरलो, पण असेच दोन-चार अनुभव पुढे आले तर कदाचित मीही प्रवाहपतित होण्याचा धोका आहेच ना? ती कोणाची हार असणार आहे? माझी, का प्रशासनाची?''

चंद्रकांतला दिलासा देण्यासाठी इनसायडरजवळ शब्द नव्हते, चंद्रकांत म्हणत होता, ''हेचि फल काय मम तपाला?''

इनसायडरनं या संदर्भात एक पत्र सर्व वृत्तपत्रांना पाठवलं, ते केवळ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील नेत्यांनी चालवलेल्या स्वतंत्र विचारसरणीच्या जिल्हापत्रात तेवढं छापून आलं. त्यात इनसायडरनी या प्रकरणाचा बोध काय हे सांगताना लिहिलं होतं,

''प्रत्येक प्रशासकानं आपलं काम चोख करावं हे अपेक्षित आहे. त्या-साठीच त्याला जनतेच्या करातून जमा होणाऱ्या पैशातून पगार व पर्क्स दिले जातात. चंद्रकांतनं फार काही जगावेगळं केलं असं मी म्हणणार नाही. त्यानं आपलं कर्तव्य चोख बजावलं. पण तोच त्याचा अपराध ठरावा व त्याची तडकाफडकी बदली व्हावी ही शोकांतिका म्हणायला हवी. पण त्याचे समाजमनाला भान आहे का?''

०-०-०

# ३. सामाजिक प्रबोधन व बहिष्कार समाज परिवर्तनाचे दुहेरी शस्त्र!

आता कुठे महिलांचा मोर्चा त्यांच्या कार्यालयासमोर आला होता, तो नेहमीप्रमाणे पोलिसांनी अडवला होता. त्याचं सभेत रूपांतर होऊन भाषणांना सुरुवात होणार होती. भाषणानंतर त्यांचं एक शिष्टमंडळ कलेक्टरांना भेटून निवेदन देणार होतं. दौऱ्यावर जाणारे कलेक्टर वेळ होत असल्यामुळे अस्वस्थ झाले होते. त्यांनी चंद्रकांतला बोलावून सांगितलं.

"चंद्रकांत, त्या तालुक्याची पाणीटंचाईची आजची बैठक माझ्यासाठी तेवढीच महत्त्वपूर्ण आहे आणि आजच्या मोर्चाचं शिष्टमंडळ भेटीस यायला आणखी तासभर तरी लागेल. आधीच मला निघायला उशीर झाला आहे, तेव्हा तू शिष्टमंडळाला भेटून त्याचं निवेदन स्वीकार."

"आपली तशी आज्ञा असेल तर त्याचं मी जरूर पालन करेन. पण मला असं वाटतं - आपण थांबावं व स्वत:च्या भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या महिलांच्या शिष्टमंडळाला भेटावं. ते मराठवाड्यातले सर्वात ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व सर्वमान्य गांधीवादी नेते आहेत. त्यांनी काल आपल्याला फोन करून पूर्वसूचनाही दिली आहे. महिलांवरील अत्याचाराचं, वासनाकांडाचं प्रकरण आहे. साऱ्या मराठवाड्यातून महिला नेत्या व कार्यकर्त्या आलेल्या आहेत, अशा वेळी जिल्हाधिकारी म्हणून आपणच शिष्टमंडळाला भेटणे योग्य राहील."

"आय नो, आय नो." कलेक्टर पुटपुटले.

"पण यू आल्सो नो दॅट आय ॲम स्टिकलर ऑफ डिसिप्लिन अँड क्रीपिंग द टाईम. मी समोरच्याकडून तीच अपेक्षा करतो. त्यांनी मला साडेअकराची वेळ दिली होती भेटीला. आता बारा वाजून गेले आहेत. या पुढारी मंडळींना टाईम मॅनेजमेंट नावाची गोष्ट कशाशी खातात हे माहीतच नाही."

चंद्रकांत म्हणाला, "तसं नाही सर, भाऊसाहेबांची इथं येणारी ट्रेन दीड तास लेट आणि म्हणून-"

"ओ. के. ओ. के. मला फक्त एवढंच म्हणायचं होतं, की तालुक्याची

पाणीटंचाईचा आढावा घेणारी मीटिंगसुद्धा तेवढीच महत्त्वाची आहे.''

''त्यासाठी मी आधी जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना वेळेवर जाण्याची विनंती केली आहे, त्याप्रमाणे ते गेले आहेत. आपण शिष्टमंडळाला भेटून निघालात तरी शेवटच्या सेशनला निश्चितच हजर राहू शकता.''

त्याच्या त्यांना कल्पना न देता केलेल्या काहीशा आगाऊ स्वरूपाच्या पण योग्य कृतीनं कलेक्टर निश्चिंत झाले.

''ठीक आहे, मी थांबतो आणि भाऊसाहेबांना भेटूनच जातो.''

आजचा महिलांचा मोर्चा नेहमीच्या आम मोर्चाप्रमाणे नव्हता. कारण त्यासाठी मराठवाड्यातील सर्व आठही जिल्ह्यातील महिला कार्यकर्त्या आल्या होत्या आणि मुख्य म्हणजे ज्या कारणासाठी तो मोर्चा होता, ते कारण सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचं, संवेदनाक्षम आणि स्त्रियांवरील निर्घृण जुलमी अत्याचाराचं होतं.

काही वर्षांपूर्वी गाजलेल्या जळगाव वासनाकांडाची आठवण व्हावी आणि अवघं समाजमन सुन्न आणि संतप्त व्हावं असं हे बलात्काराचं प्रकरणं होतं.

तीन आठवड्यांपूर्वी महाराष्ट्राच्या सर्व वृत्तपत्रात पहिल्यापानावर मोठ्या हेडलाईनमध्ये बातम्या आल्या होत्या.

''जळगाव वासनाकांडाची मराठवाड्यात पुनरावृत्ती!''

''दोन अश्राप बालिकांवर पाशवी बलात्कार!''

त्या दिवशी चंद्रकांतला शहरातील महिला पत्रकार प्रेमाताई पाटलांनी फोन करून खबर दिली, ''मी पोलीस स्टेशनवरून बोलतेय, सर! काल रात्री रेल्वे स्टेशनच्या गुडस् यार्डमध्ये दोन तरुण मुलींवर बलात्कार झाला. त्यांनी जी फिर्याद दिली आहे, तिच्यावरून बलात्कारी तीन व्यक्तींमध्ये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व एका पक्षाच्या विभागीय सचिवांचा मुलगा सामील असावा असा संशय आहे. पोलिसवाले त्यामुळे नीटपणे प्रकरण नोंदवून घेतील व त्या दोघींची वैद्यकीय तपसाणीला वेळेवर म्हणजे चोवीस तासांच्या आत पाठवतील याची प्रशासनानं काळजी घेतली पाहिजे. म्हणून फोन केला. स्त्रीशक्ती केंद्राच्या आम्ही चार-पाच महिला कार्यकर्त्या इथं जातीनं दिवसभर थांबून फॉलो अप करणार आहेत, तरी आपण लक्ष घालावं.''

चंद्रकांतनं कलेक्टरांना त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन खबर दिली. त्यांनी पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधला व सूचना दिली की, ''नीट फिर्याद नोंदवून घ्या. त्यासाठी महिला पोलिस व प्रेमाताई वगैरे महिला कार्यकर्त्यांचं सहकार्य घ्या. मुख्य म्हणजे त्यांना ताबडतोब वैद्यकीय तपासणीला पाठवा.''

''सर, आपण सिव्हिल सर्जनला पण फोन करून सांगा. वैद्यकीय तपासणी काटेकोर व्हावी म्हणून. कोर्टात काही महिन्यांनी जेव्हा बलात्काराचार खटला उभा राहतो, तेव्हा आरोपी सदोष वैद्यकीय तपासणी अहवालाच्या आधारे संशयाचा फायदा

घेऊन सुटतात. इथं प्राथमिक चौकशीप्रमाणे संशयित म्हणून प्रदीप जाधवचे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या लाडावलेल्या व माजलेल्या पुत्राचे नाव घेतले जात आहे. त्यामुळे डॉक्टरांवर राजकीय दडपण येण्याची शक्यता आहे, म्हणून त्यांना बोललं पाहिजे.''

कलेक्टरांनी सिव्हिल सर्जनला फोनने स्पष्ट कल्पना दिली. ''वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यावर डॉक्टरांचा अहवाल तुम्ही स्वत: नजरेखालून घाला आणि पूणे खात्री करून घ्या. तो अहवाल पोलिसांना देण्यापूर्वी मला समक्ष दाखवा.''

गतवर्षी शासनाच्या दलितमित्र पुरस्कार समारंभाच्या वेळी कलेक्टरांना एका कार्यकर्त्याने गौरवताना, ''दलित, मुस्लीम समाज व स्त्री जातीचे तारणहार व मसीहा' असं म्हटलं होतं. त्याची चंद्रकांतला आठवण झाली. त्याचा उल्लेख करून तो म्हणाला, ''सर, ते विशेषण नव्हतं तर वस्तुस्थिती होती व आहे. हे आज मला पुन्हा एकवार प्रत्ययास येत आहे.'

''चंद्रकांत, यामध्ये मी विशेष काही करतो आहे असे नाही. ते माझे कर्तव्य आहे, तसं त्यामागे एक फिलॉसॉफी आहे, ती तूही लक्षात ठेव.'' किंचित आत्ममग्न होत कलेक्टर म्हणाले,

''आपल्या देशात आर्थिक विषमतेपेक्षाही सामाजिक विषमता अधिक प्रखर आहे. त्याला हिंदू समाजातलं चातुर्वर्ण्य, खास करून दलितांबद्दलची तुच्छता, आणि उतरंडीची समाजरचना कारणीभूत आहे. या वर्गात मी भारतीय स्त्रीला बसवतो. तीही समाजरचनेची व त्याच्या अन्यायाची अनिवार्य बळी आहे. हे अत्याचार व शोषण निवडणुकीच्या राजकारणामुळे दिवसेंदिवस वाढत चाललंय. कारण मतांच्या राजकारणात जादा लोकसंख्येच्या जातीचे गट प्रबळ ठरतात व सत्तास्थानी येतात. ते आपल्या गट, जाती आणि त्यांच्या उच्चस्थानाला व आर्थिक हिंतसंबंधाला जपताना दलित व स्त्रीजातीला अधिकच दडपून ठेवण्याचं धोरण स्वीकारतात. त्यामुळे प्रशासनावर त्यांच्या रक्षणाची जबाबदारी आहे असं मी मानतो. तीच बाब अल्पसंख्याकांची आहे. त्याबाबतही मी संवेदनक्षम आहे म्हणून या वंचितांसाठी मी काही केलं असेल तर मी माझं कर्तव्यच आहे असं मी मानतो. जेव्हा या बलात्कारींना पोलीस तातडीने पकडून त्यांच्यावर खटला भरतील आणि त्यांना शिक्षा होईल, तेव्हाच मला समाधान वाटेल.''

बलात्कार झालेल्या दोघींपैकी एक अठरा-वीस वर्षांची तरुणी होती, तर दुसरी नुकतीच वयात आलेली पंधरासोळा वर्षांची किशोरी होती. त्या दोघी शेतमजूर होत्या. त्या इथल्या उरुसासाठी आल्या होत्या.

मुल्ला फारूख चिश्तीच्या नावाने भरणारा या शहराचा उरूस फार प्रसिद्ध आहे. त्यासाठी हिंदू - मुस्लीम दोघेही नवस बोलून त्या फकिराच्या नावे बकरी कापून 'कंदुरी'

करतात. तो नवसाला पावतो व मनोकामना पूर्ण करतो अशी श्रद्धा आहे.

"म्या-म्या, माजं आत्तेच्या मुलाशीच लगीन व्हावं, तेनं शहरात नटव्या बाईला तिथल्या शानशौकीला भुलूनशानी डोरलं बांदू नये म्हणूनशानी म्या नवस बोलला होता आन् कंदुरी केली होती."

त्या तरुणीची फिर्याद वाचताना चंद्रकांत विमनस्क झाला. तिचं विवाहाचं स्वप्न त्या निर्घृण बलात्कारानं भंगलं गेलं होतं. तिच्या आत्याचा मुलगाच काय, पण समाजातील कोणताही तरुण तिला या मागासलेल्या भागात स्वीकारणं शक्य नव्हतं. तिचा नवस व कंदुरी वाया गेली होती.

त्या दोघी इथं आल्यावर कंदुरीसाठी बकरं घेण्यासाठी व ते कापून देण्यासाठी जत्रेच्या जवळच असलेल्या खाटिक गल्लीत गेल्या होत्या. तिथं त्या दोघींना ते आरोपी तरुण भेटले. त्यांच्या शिकारी नजरेनं त्या दोघी परगावाहून उरुसासाठी आलेल्या आहेत हे हेरलं.

'आमी दोगी पयल्यांदाच इतकं दूर उरुसालं आलो व्हतो. त्यामुळे ते तिघे आम्हास्नी मदत करणाऱ्या भावापरमाणे वाटतले. तेंनी कंदुरीसाठी बकऱ्याचा सौदा जमवून दिला. मंग आमास्नी होटलात जेवायला चलण्याचा अग्रेव केला. आम्ही जलमात कंदी हॉटेलात जेवलो नव्हतो, मनुनशानी व्हय म्हनलं."

चंद्रकातला बासू भट्टाचार्यांच्या 'आस्था' या सिनेमाची आठवण झाली. त्यातील मध्यमवर्गीय नायिकेला पंचतारांकित हॉटेलच्या चकचकीत वातावरणाचा मोह पडतो व एका अनोळख्या माणसाला वातानुकूलित खोलीत देह देत त्या वातावरणाचा उपभोग घेते, हे पाहताना चंद्रकांतला धक्का बसला होता. काहीतरी असंभाव्य व अतर्क्य पाहात आहोत असं त्यावेळी त्याला वाटलं होतं. पण आज बासू किती सच्चा व काळाच्या पुढे होता हे जाणवून गेलं. खेडेगावात शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या मुलीला शहरातील उंची हॉटेलमध्ये जेवण व सिनेमाला जाणं याची भूल पडू शकते, नव्हे, त्यात असंभव असं काही नसतं हे प्रत्ययास येत होतं.

फिर्यादीमधील पुढील भाग म्हणजे गल्लाभरू हिंदी सिनेमात शोभणारा घटनाक्रम होता.

त्या दोघींना त्यांनी शहरातल्या बड्या हॉटेलात मटणाचं सामिष भोजन दिलं होतं. त्याचवेळी त्यांना माहीत नसलेलं पेयही थोडं पाजलं. "ते काय व्हतं माहीत नाय मला, पण तेची चव नाय आवडली पहिल्या झूट. पण तेंनी मोप आग्रव केला, म्हणूशान आम्ही दोघी गुमान ते पियेलो."

भोजनानंतर ते तिघे या दोघींना घेऊन सिटीलाईटमध्ये चित्रपटाला गेले. बी व सी ग्रेडचे मल्याळी व तामिळी व सेक्सी हिंदी व इंग्रजी सिनेमे तिथे दाखवण्यात येत. त्यासाठी ते टॉकिज कुविख्यात होतं. तिथं एक सॉफ्ट पोर्नोग्राफिक सिनेमा चालू होता.

सिनेमानंतर रात्री बारा वाजता त्या दोघींना रेल्वे स्टेशनावर सोडण्यासाठी ते गेले होते. ट्रेन आधीच निघून गेली होती. म्हणून रेल्वे गेस्ट हाऊसमध्ये चला म्हणून त्यांनी त्या दोघींना गुडस यार्डात नेलं व आळीपाळीने बलात्कार केला.

कलेक्टरांनी लक्ष घातल्यामुळे तपासाची चक्र वेगाने फिरू लागली. त्या तिघा संशयित आरोपींपैकी एकाला पकडण्यात पोलिसांना यश मिळालं. त्यांच्या जबानीतून हा सारा प्रकार प्रदीपनं (माजी जिल्हा अध्यक्षाच्या पुत्रानं) रचल्याचं निष्पन्न झालं. तो व त्याचा मित्र फरार झाले होते.

वृत्तपत्रांनी हे वासनाकांडाचं प्रकरण लावून धरल्यामुळे वातावरण चांगलंच तापलं होतं. पण आरोपी पकडले जात नव्हते. त्यामुळे पोलीस व जिल्हा प्रशासनावर टीका होत गेली. त्याची गांभीर्याने दखल घेत कलेक्टरांनी पोलीस अधीक्षकांना व पोलिस अधिकाऱ्यांना सांगितले.

"तुम्ही माजी अध्यक्षांना भेटून तपास करायचा प्रयत्न केला आहे. त्यांना आज पुन्हा भेटा व सक्त वॉर्निंग द्या की, जर तीन दिवसात प्रदीप आपणहून पोलिसांपुढे हजर झाला नाही तर त्याला पळून जाण्यास व फरार होण्यास मदत केली म्हणून तुम्हाला अटक केली जाईल. माझा होरा आहे की, हे तंत्र यशस्वी ठरेल."

कलेक्टरांची ही जालीम यात्रा लागू नडली. "प्रदीप पोलिसांना शरण येईल. त्याला दोन दिवसांची मुदत द्या." असं अध्यक्षांनी सांगितलं. त्यानुसार प्रदीप आज शरण यायला हवा होता. तो जर शिष्टमंडळाच्या भेटीपूर्वी पोलीस ठाण्यात हजर झाला तर संवेदनक्षम प्रशासनाचा पुरावाच देता आला असता.

पण तसं घडलं नाही. प्रदीप हजर होईपर्यंत त्याची वाच्यता करणंही गैर होतं. म्हणून कलेक्टरांनी शांतपणे महिलांच्या संतप्त भावनांना तोंड दिलं. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली आलेल्या शिष्टमंडळातील महिला एकामागून एक टीकेचे आसूड ओढत होत्या.

"प्रशासनाचा तोंडावळा तसेच मनोरचनाही पुरुषीच आहे. कलेक्टरसाहेब, त्याचं हे ज्वलंत उदाहरण आहे. आरोपी बलदंड पुढाऱ्याचा बिघडलेला मुलगा आहे व त्याला वाचविण्याचा खटाटोप चालू आहे, म्हणूनच अजूनही तो फरार आहे. फुले, कर्वे, आंबेडकरांच्या पुरोगामी राज्यात स्त्रीची अब्रू आज किती स्वस्त झाली आहे. त्यांचं सोयरसुतक आज कुणालाच नाही याचा मला तीव्र खेद वाटतो."

कलेक्टरांनी साऱ्यांचं बोलणं झाल्यावर उत्तर देताना म्हटलं. "तुमच्या संतप्त भावना मी समजू शकतो आणि झाला प्रकार निंद्यच आहे. त्याबाबत प्रशासन संवेदनशील जरूर आहे. आरोपी लवकरच पकडले जातील. आम्ही प्रशासकीय अधिकारीही सामाजिक कार्यकर्त्यांच्या भावनेनेच याकडे बघतोय."

औरंगाबादहून आलेल्या एका बोलभांड महिला कार्यकर्तीनं हेटाळणीच्या सुरात

म्हटले, "अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते? जस्ट इम्पॉसिबल. प्रशासन हे नेहमीच सत्ताधाऱ्याचं बटीक राहिलं आहे. अन्यायाकडे डोळेझाक करीत राहिलं आहे."

"तुमचं हे जनरल विधान असेल तर मला काही म्हणायचं नाही." कलेक्टर तरीही संयम बाळगून होते. पण आवाजाला थोडी धार चढली होती, "पण रोख आमच्याकडे असेल तर एवढंच म्हणेन, तुम्ही माहिती न घेता पूर्वग्रहदूषित नजरेतून पाहात व बोलत आहात. मोर्चा काढला, दोन तास कंठाळी भाषणं दिली, चार लेख पेपरात लिहिले म्हणजे झालं? या बलात्काराच्या रूटकॉजकडे आपण पाहता काय? त्याच्या निर्मूलनासाठी काही स्ट्रॅटेजी, लाँग टर्म प्लॅनिंग व प्रबोधनासाठी काही कार्यक्रम पण आखावा व अंमलात आणावा लागतो. याचा आपण विचार केला आहे?"

ती कार्यकर्ती अवाक् झाली. अधिकाराचा तोराच मिरवणारे अधिकारी तिने आजवर अनुभले असल्यामुळे कलेक्टरांचं विधान तिला चकित करून गेलं.

तेव्हा हस्तक्षेप करीत भाऊसाहेब म्हणाले,

"आम्ही विश्वास ठेवतो की, आपण जातीने लक्ष घालत आहात व आरोपी लवकरच पकडले जातील. पण त्याची ओळख परेड घेणाऱ्या अधिकाऱ्यांनाही योग्य त्या सूचना द्या. कोर्टातही प्रकरण नीट उभे राहील, याची काळजी घ्या, अशी समस्त महिला वर्गाच्या वतीने मी विनंती करतो."

"जरूर, भाऊसाहेब. मी तुम्हाला कलेक्टर म्हणून तसाच एक माणूस म्हणूनही शब्द, नव्हे वचन देतो. गेल्या आठवड्यात हे वासनाकांड घडल्यापासून मी विचार करतो आहेच. तरुण मुलामुलींमध्ये निकोप मैत्री नसणं आणि सेक्सकडे विकृत दृष्टीनं पाहणे हे अशा वाढत्या बलात्कारांचं मूळ कारण आहे. पुन्हा राँग मॅनहूडची कल्पना याच्यामागे आहे. आज आधुनिकतेच्या नावाखाली स्त्री देहाला सिनेमा, टि.व्ही. मधून फॅशनच्या नावाखाली ज्या पद्धतीने प्रदर्शित केलं जातं, त्यामुळे तिला 'ऑब्जेक्ट ऑफ डिजायर' वा अधिक ब्लंटली सांगायचं झालं, तर उपभोगाची वस्तू म्हणून पेश केलं जातं. तरुण कोवळी मनं त्यामुळे भ्रष्ट होत आहेत. या सामाजिक समस्येची व्यापकता किती आहे याची कल्पनाही करता येणार नाही, एवढं त्याचं भयानक रूप झालं आहे. शिक्षण, नोकरीमुळे स्त्री अधिक मुक्त होत आहे, तिचा सार्वजनिक जीवनात वावर वाढला आहे, पण पुरुषी मनोवृत्तीत फारसा पडक पडला नाहीये. उलट, या आधुनिकतेच्या विकृत कल्पनेमुळे आणि वाढत्या चंगळवादामुळे स्त्रीवर अन्याय वाढत आहेत, याचा समाजाने विचार करण्याची वेळ आली आहे."

"आपले निरीक्षण मार्मिक व अचूक आहे. पण यावर तुम्ही काय उपाय सुचवाल?" भाऊसाहेब कलेक्टरांच्या प्रतिपादनाने चांगलेच प्रभावित झालेले दिसत होते.

"मी इथल्या कॉलेजच्या उपप्राचार्यांशी बोललो आहे व काही दिवसांतच काही कॉलेज युवकयुवतींसाठी प्रबोधन शिबीर आयोजित करणार आहोत. त्यात निकोप मैत्री, स्त्री-पुरुष समानता आणि निरोगी नैसर्गिक लैंगिकता याबाबत व्याख्याने, चर्चा व दृकश्राव्य माध्यमाच्या आधारे नवा विचार देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

"दुसरी बाब असहकार, निषेध व पिकेटींगची. भाऊसाहेब, मी तुम्हाला गांधीमार्ग सांगावा एवढा मी मोठा खचितच नाही. असे प्रकार घडण्यामागे, खास करून सत्ता व संपत्ती असणाऱ्या वडिलांचे स्वत:चे सैल वर्तन आणि मुलांवर कळत नकळत केले जाणारे चुकीचे संस्कार आहेत. प्रस्तुत प्रकरणात काय घडले? माजी अध्यक्ष आपली सामाजिक प्रतिष्ठा व राजकीय प्रभावाचा त्याला वाचवण्यासाठी वापर करत आहेत, पण त्यात ते सफल होणार नाहीत हे नक्की. पण आजही ते समाजात जवळ माथ्याने कसे वावरू शकतात? आणि मुख्य म्हणजे लोकही त्यांना उद्घाटन, सत्कार सोहळ्याला का निमंत्रण देऊन बोलावतात? लोक त्यांच्या हस्ते पारितोषिक व हार-तुरे कसे घेतात? त्यात त्यांना संकोच, लज्जा का वाटत नाही? अशा बेजबाबदार समाजद्रोही माणसावर आपण सामाजिक बहिष्कार का नाही घालत? का नाही तुम्ही आज त्यांच्या घरावर मोर्चा नेत? भाऊसाहेब, हे सामाजिक बहिष्काराचं जालीम अस्त्र वापरायचं असेल तर तुमच्यासारख्या विवेकी व साधनशुचिता मानणाऱ्या गांधीवादी नेत्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. सामाजिक प्रबोधन आणि बहिष्कार या दुहेरी मार्गाने कार्यकर्ते, प्रशासन आणि लोकनेते यांनी मिळून काम केलं, तरच अत्याचाराला बळी पडणाऱ्या मायभगिनींना न्याय देऊ शकू."

हा प्रसंग इनसायडरला सांगताना चंद्रकांत म्हणाला, "मित्रा, प्रशासनात या कलेक्टरांसारखे सामाजिक विचार करणारे व त्यासाठी अधिकार वापरणारे प्रशासक वाढले तर स्त्री-अत्याचार निर्मूलन चळवळीत गुणात्मक फरक पडू शकतो, हे नक्की! पण आम्ही हाती एकवटलेले अधिकार व त्याच्या वापरातून उपभोगाच्या जीवनशैलीत रममाण झालेले बहुसंख्य अधिकारी आहेत. जो समाज आपल्या करातून आमचं पगारपाणी करतो, त्या समाजाचं आपण काही देणं लागतो याचा गांभीर्याने विचार आम्ही अधिकारीवर्ग केव्हा करणार? हा सवाल आजच्या घडीचा आहे. त्याचं उत्तर, दुर्दैवाने, आज तरी होकारार्थी देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे."

o-o-o

# ४. भ्रष्टाचाराचा बकासुर

“जस्ट ए मिनिट पाटील! हे प्रकरण जरा वेगळं आहे. ते इतर प्रकरणांसोबत जोडता येणार नाही.” चंद्रकांतनं विशेष भूमी संपादन अधिकाऱ्याच्या भरधाव सुटलेल्या गाडीला ब्रेक लावण्याच्या इराद्यानं म्हटलं.

विधी व न्याय खात्याच्या उपसचिव शिरूरे मॅडम त्रासिक मुद्रेनं म्हणाल्या, “पण या शहरातील इतर भूसंपादन प्रकरणात उच्च न्यायालयाचे, मागील महिन्यात आलेले दोन्ही निर्णय अभ्यासून आपण अपील करण्यात काही हशील होणार नाही, असा निर्णय घेतला आहे. मग या प्रकरणाचा अपवाद का?”

“कारण तो मूळ भूसंपादन निवाडा त्या जिल्ह्यात प्रांत अधिकारी असताना पाच वर्षांपूर्वी मीच केला होता.” शांतपणे चंद्रकांत म्हणाला, “आणि सिनियर डिव्हिजन जज्जपुढे जेव्हा ही केस वाढीव मोबदल्यासाठी आली होती, तेव्हा माझी दोन दिवस साक्ष झाली होती. जज्जसाहेबांनी माझ्या समवेत खुद्द स्थळ पाहणी पण केली होती.”

“त्याचा जजमेंटमध्ये उल्लेख आहे. संपादित जमीन ही शहरालगत असल्यामुळे त्यास अकृषित दराने प्रती स्क्वेअर फूट दराने त्यांनी मावेजा मंजूर केला! असं त्या अपीलाचं सार आहे.” शिरूरे मॅडम म्हणाल्या.

“त्या जज्जनी सारी प्रोसिजन फॉलो केली आहे. तरीही धडधडीत चुकीचे निष्कर्ष काढले आहेत मॅडम.” चंद्रकांत म्हणाला, “शहरापासून प्रस्तावित एम.आय.डी.सी. ची जागा बारा किलोमीटर. जमीन खडकाळ व नापीक आहेच. मीच दिलेला एकरी दहा हजार रुपयांचा दर तेव्हाही थोडा जास्त होता, असं गावकरी मला म्हणाले होते. त्याला जज्जनी त्याच्या शंभरपट मोबदला अकृषित दरानं दिला आहे. तिथे आजही एक घर वा दुकान नाही, मॅडम, हे जजमेंट साफ साफ वाईट हेतूनं - अल्टेरिअर मोटिव्हनं लिहिलेलं आहे. असं माझं मत आहे, हेन्स इट इज ए फिट केस फॉर अपील बिफोर हायकोर्ट!”

“ओ माय गॉड!” थक्क होत विस्मयानं शिरूरे मॅडम उद्‌गारल्या, “त्या जज्जची अपकीर्ती माझ्या कानावर आहे आणि तुम्ही म्हणता ते खरं मानते मी. आय

हॅव नो डाऊट अबाऊट युवर सिन्सिरिटी अँड इंटिग्रिटी. ओ. के., लेटअस टेक कॉशिअस डिसिजन. आपण अपील जरूर करू या.''

तो विशेष भूमी संपादन अधिकारी त्या निर्णयानं चांगलाच अस्वस्थ झाला होता. त्याला काहीतरी बोलायचं होतं. सांगायचं होतं. पण हिंमत होत नव्हती. तरीही धीर गोळा करून, चंद्रकांतच्या कानाशी लागत म्हणाला,

''सर, मी काही सांगावं असं नाही. पण यात बडे उच्चपदस्थ लोकप्रतिनिधी गुंतलेले आहेत. त्यांचं सारं काही ठरलं आहे. आजच्या मीटिंगमध्ये अपील करायचं नाही असं ठरलं की, तिकडे आठ दिवसात शासनाची कोर्टाच्या नियमाप्रमाणे वाढीव मोबदला अदा करायची परवानगी व निधी मिळणार आहे.''

''ते मला माहीत आहे, पाटील.''

''सर, जिल्हा प्रशासनावर व खास करून माझ्यावर माजी नगराध्यक्ष व आमदाराचा भारी दबाव आहे'' पाटील म्हणाले, ''तुम्ही स्वत:ची माहिती व ज्ञान उघडं केलं नसतं तर आमच्या शहरातील इतर प्रकरणांचा न्याय लावून यातही अपील करायचं नाही, असा निर्णय झाला असता, मॅडमही तयार होत्या. पण...''

''पाटील, प्लीज स्टॉप धिस.'' चंद्रकांतला प्रयत्न करूनही आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवता येत नव्हतं. ''आपण इथं शासनाचं हित पाहून निर्णय घ्यायला बसलो आहोत. या अपील न करण्याच्या निर्णयाचा शासनाला किती भुर्दंड बसणार आहे, माहित आहे? सुमारे सत्तर लाख रुपये... ते वाचतील आपण अपील केलं तर; आणि हायकोर्टात आपण जिंकू शकतो. सफिशिअंटली स्ट्राँग केस आहे आपली.''

''काय चाललंय तुम्ही दोघांत एवढं? आम्हाला तरी कळू द्या, उपायुक्त -साहेब,'' मॅडम हसत हसत म्हणाल्या, तसे पाटील चंद्रकांतपासून दूर झाले.

चंद्रकांत उद्वेगाने म्हणाला ''इट इज द सेम स्टोरी अगेन अँड अगेन. अॅज फार अॅज धिस डिस्ट्रिक्ट इज कन्सर्ड. तीच संबंधित जमीनमालक, वकील आणि जज्जची अभद्र युती; तेच अव्वाच्या सव्वा जमिनीचे दर वाढवून देणे आणि तेच आपण अपीलात जाऊ नये म्हणून दबाव आणणे... या प्रकरणातही हे सारं घडत आहे. जसं ते पाटीलना अॅप्रोच झाले व दबाव आणला, तसा माझ्यावरही तोच प्रयोग तेव्हा झाला. पण असफल.''

चंद्रकांत उपसचिव मॅडमना एवढं स्पष्टपणे सांगतील असं पाटीलांना वाटलं नव्हतं. पण त्यांना त्या दोघांच्या समान समाजहितैषी दृष्टिकोनाची व भूसंपादन प्रकरणामुळे न्याययंत्रणेत भ्रष्टाचाराच्या शिरलेल्या बकासुरी वृत्तीची चीड होती, त्याची कल्पना नव्हती. चंद्रकांतने उपायुक्त (पुनर्वसन व भूसंपादन) चा पदभार स्वीकारल्यापासून त्याच्या उपसचिव, विधी व न्याय आणि संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांसोबत होणाऱ्या प्रत्येक बैठकीत, प्रत्येक प्रकरणात तो खोलात जायला लागल्यापासून ज्या बाबी पुढे

येत होत्या, त्यावरून या विभागातील काही जिल्ह्यात भूसंपादनाच्या प्रकरणात सरकारचं आर्थिक दिवाळं काढण्याचं व बेसुमार, अवाजवी व अवाच्या सव्वा जमिनीची किंमत वाढवून देण्याचं एक पद्धतीशीर रॅकेट काही बुद्धिमान पण अनैतिक वकील, धंदेवाईक राजकारणी आणि मोहास बळी पडणारे व सवयीनं निर्ढावलेल्या काही न्यायाधीशांनी चालवलं असल्याचं आढळून आलं होतं!

प्रस्तुतचं प्रकरण त्याचं क्लासिक म्हणता येईल असं नमुनेदार उदाहरण होतं.

पाच वर्षांपूर्वी चंद्रकांत त्या जिल्ह्यात प्रांताधिकारी होता. तेव्हा या व्यापारी-उद्योजक शहरात एम. आय. डी. सी. निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्याचं महत्त्व ओळखून चंद्रकांतनं अवघ्या अकरा महिन्यात भूसंपादन कार्यवाही, जी सामान्यत: तीन वर्षांत पूर्ण व्हावी अशी कायद्याची कालमर्यादा आहे, केली होती. एम. आय. डी. सी. साठी रामवाडीची ती जमीन आदर्श होती. शहरापासून पंधरा किलोमीटर अंतरावर, मुख्य हमरस्त्यापासून चार किलोमीटर आत, सलग, खडकाळ, कठीण, शेतीसाठी निरुपयोगी, मात्र उद्योगधंद्यासाठी योग्य. चंद्रकांतनं परिसरातील जमीन खरेदी, विक्रीची माहिती संकलित करून बाजारभावापेक्षा थोडा अधिक भाव देऊन निवाडा केला. आणि शासनाने जमीन ताब्यात घेऊन तेथे एम. आय. डी. सी. निर्माण केली. आपण जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला जलदगतीने भूसंपादन निवाडा देऊन हातभार लावल्याचे समाधान चंद्रकांतला वाटत होते!

भूसंपादन कायद्यानुसार जर जमीनमालकाला भूसंपादन अधिकाऱ्याने दिलेली किंमत कमी वाटत असेल तर त्याला जिल्हा न्यायालयात किंमत वाढवून मिळावी म्हणून अपील करता येतं. त्यानुसार त्या प्रकरणी जमीनदारांनी अपील केलं व त्या न्यायाधीशानं ते मंजूर करून प्रती स्क्वेअर फूट चार रुपये दरानं एकरी एकलक्ष पस्तीस हजार मोबदला दिला, तो चंद्रकांतने दिलेल्या किमतीपेक्षा तेरा पट जास्त होता. अगदी शहरातही हा दर आजही नाही हे त्याला माहिती होतं. म्हणून त्यानं त्या प्रकरणाची अपीलाच्या निर्णयासाठी आलेली फाईल पाहताच अपीलाचा निर्णय घेतला होता.

मुख्य म्हणजे त्यानं गतवर्षी त्या न्यायाधीशापुढे दोन दिवस साक्ष दिली होती व समर्पकपणे जमीनदाराच्या वकीलाचं म्हणणं खोडून काढलं होतं व आपण दिलेली किंमत योग्य असल्याचं सांगितलं होतं.

पण न्यायाधीशांचे मध्ये मध्ये विचारले जाणारे गैरलागू प्रश्न ऐकून चंद्रकांतच्या मनानं धोक्याचा इशारा दिला. आपल्याप्रमाणे त्यांनाही तो माजी नगराध्यक्ष ॲप्रोच झाला तर नाही ना?

साक्षीच्या आदल्या दिवशी चंद्रकांत मुक्कामाला त्या रात्री मुख्यालयी आला होता. तेव्हा रात्री त्याला ते माजी नगराध्यक्ष भेटायला आले होते. त्या कुप्रसिद्ध गिरगावकर वकीलासह. जे केवळ भूसंपादनाच्या प्रकरणाचीच प्रॅक्टिस करत असत.

हे रॅकेट त्यांनीच विकसित केलेलं होतं.

"सर, तुम्ही इथे प्रांत असताना हा निवडा लिहिताना आम्ही टेन पर्सेंटची ऑफर दिली होती, ती तुम्ही नाकारली, पण इतरांकडील प्रकरणात आम्ही समान ऑफर देऊन इथेच मोबदला वाढवून घेतलाच की! आणि तुम्ही दिलेल्या निवाड्यात अपील करून न्यायाधीशांकडून हवी तेवढी वाढ घेतलीच. नुकसान तुमचंच झालं! आता तुम्ही साक्षीला आहात, तरी आमच्या वकीलांच्या प्रश्नांना सूचक होकारार्थी उत्तर द्या. बस्, तुमच्यावर काही आळ येणार नाही. कारण निर्णय कोर्टाचा असेल. तुम्हाला या सेवेसाठी वाढीव मोबदल्याच्या वन पर्सेंट देऊ. ती रक्कमही काही लाखापर्यंत आहे साहेब. विचार करा."

मनोमन चंद्रकांत ताठरला होता. माजी नगराध्यक्षाला तो कसा आहे, हे का माहीत नाही? तरीही त्यांची हिंमत कशी होते? हा प्रश्न होता. म्हणजेच या मधल्या काळात, मागच्या पाच वर्षात पुलाखालून खूप काही पाणी वाहून गेलं आहे. इथलं रॅकेट जोरात चाललं आहे.

चंद्रकांतनं अधिक माहिती काढून घ्यावी म्हणून काही प्रश्न विचारले, तेव्हा गिरगावकरांनी जो खुलासा केला, त्यामुळे तो चक्रावून गेला.

त्या... न्यायाधीशांनी साक्षीमध्ये जर चंद्रकांतने अनुकूल उत्तरं दिली नाहीत तर जजमेंटमध्ये वाढीव मोबदल्याचं शाब्दिक कसरत करीत समर्थन करण्यासाठी दुपटीनं मागणी केली हेती. म्हणून ते दोघे चंद्रकांतकडे वन पर्सेंटची ऑफर घेऊन आले होते!

साक्षीच्या वेळी चंद्रकातनं निरीक्षण केलं होतं की, ते न्यायाधीश कोऱ्या चेहऱ्यानं व निर्विकार नजरनं समोर भिंतीकडे पाहात आहेत. त्याला नजर देण्याचं टाळत आहेत. कारण तो प्रत्येक प्रश्नाची सविस्तर, सडेतोड, तरीही न्यायालयाची बेअदबी होऊ नये म्हणून नम्र भाषेत उत्तरे देत होता.

जेव्हा त्याची खात्री पटली की, न्यायाधीशही मॅनेज झाले आहेत, तेव्हा त्यानं त्याच्या मते ठेवणीतलं ब्रह्मास्त्र काढलं!

"युवर ऑनर, माझी विनंती राहील, मी जे साक्षीत सत्य प्रतिज्ञेवर सांगितले आहे, त्याची आपण समक्ष स्थळ पाहणी करावी. म्हणजे आपणास सत्य समजून येईल."

त्या न्यायाधीशांनी जेव्हा चंद्रकांतची ही मागणी मान्य केली, तेव्हा वाटलं, आपण अखेरीस जिंकलो, स्थळ पाहणी केल्यानंतर आपल्या निवाड्याची, दिलेल्या किमतीची त्यांना खात्री पटेल आणि वाढीव मोबदला जमीनदारांना मिळणार नाही.

पण आज दीड वर्षांनी अपिलाचा निर्णय घेण्यासाठी बैठकीत ती संचिका चाळताना चंद्रकांतला वाटलं, आपण फसवले गेले आहोत. त्याच्या समवेत न्यायाधीशांनी पाहणी केली खरी, पण स्थळ निरीक्षणात त्यांनी चक्क चुकीच्या नोंदी केल्या आहेत आणि जमिनीला एकरी दहा हजार रुपयाऐवजी अकृषित दर लावून चक्क सव्वा

लाखापेक्षा जास्त दर दिला आहे. त्यामुळे शासनाला सुमारे पाऊण कोटींचा फटका बसणार आहे.

त्यासाठी पुन्हा अपील होऊ नये म्हणून त्यांनी जिल्हा प्रशासनावर, पाटलावर दबाव तर आणला आहे, पण मॅडमलाही ते भेटले आहेत. त्यांना राजकारण्यांची प्रचंड भीती वाटते, हे चंद्रकातला माहीत आहे, प्रामाणिक व स्वच्छ असूनही अशा वेळी त्या मनाविरुद्ध निर्णय घेतात, हेही चंद्रकांतने अनुभवलं आहे.

तरीही आज चंद्रकांतनं त्यांना स्वानुभवानं त्या प्रकरणातले काळेबेरे सांगताच मॅडम त्याच्याशी अपिलाबाबत सहमत झाल्या. त्याचं एक कारण म्हणजे त्या न्यायाधीशांची अपकीर्ती. मॅडम त्याबाबत दोन तीन वेळा गंभीर होत बोलल्या होत्या, " 'न्याय विकत मिळतो' ही नागरिकांची भावना होणं भयावह आहे. कायद्याच्या राज्याला मग काय अर्थ उरतो? त्यासाठी असे न्यायमूर्ती जबाबदार आहेत, आपल्या वर्तणूक आणि भ्रष्टाचारानं त्याला ते खतपाणी घालतात. मला ही फार चिंतेची बाब वाटते."

त्या माजी नगराध्यक्ष व वकीलांच्या जोडीनं चंद्रकांतला समजवण्यासाठी यावेळी वेगळा मार्ग चोखाळला होता. यापूर्वी चंद्रकांत जिथं निवासी उपजिल्हाधिकारी होता, तेथील एका जुन्या सत्त्वशील लोकनेत्याला चंद्रकांत मानायचा, एका बड्या लोकप्रतिनिधींमार्फत गाठून त्यांनी चंद्रकांतला सांगावं असं विनवलं होतं. ते लोकनेते त्याला स्वच्छपणे कबुली देत म्हणाले, "मी त्यांचा शब्द टाळू शकत नाही. तुम्ही शक्य तेवढी मदत करा, एवढंच मी म्हणेन."

"साहेब, कधी नव्हे तो तुम्ही माझ्याजवळ शब्द टाकला आहे, पण हे प्रकारण मला पूर्ण माहीत आहे. मला वाटत नाही, मला त्यांना जी मदत हवी आहे ती करता येईल. तरीही तुमचा मान राहावा म्हणून त्यांना भेटेन आणि पाहीन काय करता येईल ते!"

चंद्रकांतनं मनात प्रचंड चीड असली तरी शांतपणे माजी नगरध्यक्षाचं ऐकून घेतलं. त्यांचं तेच म्हणणं आजही होतं. फक्त ऑफरची रक्कम दामदुप्पट केली होती! त्यानं एवढंच सांगितलं.

"मी अजूनही तसाच आहे, ही ऑफर मी ठोकरतो. पण उच्च न्यायालयाचे तुमच्या शहरातील इतर न्यायनिवाड्यातील ऑब्झर्व्हेशन पाहतो आणि पुन्हा एकवार प्रकरण तपासतो."

त्याचा हा संयम व शांतपणा केवळ त्या सत्शील लोकनेत्यांसाठी होता, ज्यांचा प्रामाणिकपणा आजच्या राजकीय जीवनात बऱ्याच अंशी अस्ताला गेलेला होता.

उपसचिव, विधी व न्याय उपायुक्त व पुनवर्सन व भूसंपादन आणि जिल्ह्याचे संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांची एक समिती असते. जमिनीचा वाढीव मोबदला

खालच्या कार्टाने भूसंपादन प्रकरणात वाढवून दिला असेल तर तो मान्य करून द्यायचा की हायकोर्टात अपील करायचं, त्याचा निर्णय घेत असते. प्रस्तुत प्रकरणी चंद्रकांतच्या आग्रही भूमिकेमुळे अपील न करण्याबाबत तिघांवरही सर्व प्रकारचे प्रचंड राजकीय व आर्थिक दबाव असूनही तो न जुमानता अपीलाचा निर्णय झाला.

भ्रष्टाचाराच्या विरुद्धची एक छोटी चकमक चंद्रकांतनं जिंकली होती.

"पण अंतिम लढाईत हारही होणार हे मला माहीत आहे मित्रा!" एकदा आत्मपरीक्षणाच्या मूडमध्ये असताना चंद्रकांत इनसायडरला म्हणाला,

"कारण भ्रष्टाचारापासून आज देशात कोणतं क्षेत्र मुक्त आहे? न्यायसंस्थेचा तरी का त्याला अपवाद असेल? काही न्यायमूर्ती आजही दीपस्तंभाप्रमाणे कार्यरत आहेत. इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा न्यायसंस्था, विशेषत: सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये बऱ्याच अंशी स्वच्छ, कणखर व घटनेप्रमाणे चालणारी आहेत, पण तालुका, जिल्हा आणि काही प्रमाणात उच्च न्यायालये किडली गेली आहेत."

"या प्रकरणाचा निकाल काय लागला?"

"तिथं मी न्यायमूर्तींना दोष द्यावा की नाही याबद्दल साशंक आहे. एकतर त्यांना प्रचंड कामाचे ओझं असतं. दुसरं म्हणजे सरकारी वकील योग्य रीतीने अभ्यास करून प्लीड करीत नाहीत. कारण त्यांना गप्प बसण्यासाठी व प्लीड न करण्यासाठी विरुद्ध पार्टीकडून फायदा होत असतो. मुळातच त्यांच्या नेमणुका पात्रतेपेक्षा राजकीय संबंधावरून होत असतात. त्यामुळे त्यांचं डोळ्यावर कातडं ओढून घेणं समजून येतं. जमीनदारांच्या नामांकित वकिलांनी त्या शहरातील इतर प्रकरणातील निकालांचा संदर्भ देताच उच्च न्यायालयानं खालच्या कोर्टाचा निकाल कायम केला. त्यासाठी सरकारी वकीलांनी माझ्या निरीक्षणाचा व धडधडीत चुकीच्या स्थळ पाहणीचा संदर्भ देत काहीही भाष्य केलं नाही हे उल्लेखनीय आहे. त्यामुळे अपीलाची छोटी चकमक मी जिंकलो. पण भ्रष्टाचारी मार्गानं अंतिम लढाईमध्ये मात्र ते विजयी झाले."

इनसायडरला ऐकताना एकामागून एक धक्के बसत होते. न्यायसंस्थेबद्दल सर्वसामान्य नागरिकांना असते तेवढीच माहिती त्यालाही होती. मात्र त्यातली विदारकता आणि किडलेपणाच्या व्यापकतेनं तो हादरून गेला होता. राहून राहून त्याला माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या व्याख्यानातलं एक वाक्य आठवत होतं, "हे कायद्याचं राज्य नाही, तर 'काय द्यायचं' राज्य आहे."

"मित्रा, मला खरंच कळत नाही, आय. ए. एस. दर्जाचे राज्य सेवेतले, क्लास वन अधिकारी, न्यायमूर्ती आणि उच्चपदस्थ सेना अधिकारी भ्रष्टाचार का करतात? त्यांचे वेतन, मिळणाऱ्या सुविधा आणि मानसन्मान उत्तम रीतीनं जगण्यासाठी मोअर दॅन सफिशिअंट असताना, का मोह होतो या वाममार्गाचा? त्याचं उच्चशिक्षण त्यांना विवेकी व विचारी न बनवता, विकारी व मोहवश का बनवतं? कितीही विचार केला

तरी मला या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर सापडत नाही.''

"मलाही त्याचं एकच ठोस उत्तर कदाचित देता येणार नाही. पण वाढता चंगळवाद आणि व्यापारीकरण हे एक कारण जरूर आहे. तसंच सार्वजनिक मानाच्या क्षेत्रातून आणि मतांच्या राजकारणामुळे झालेल्या पीछेहाटीतून, एक प्रकारची आत्मकेंद्री बनलेली नोकरपेशातील मध्यमवर्गीयांची मानसिकता आणि त्यामुळे पोकळी भरून काढण्यासाठी भोगाची भूल हे दुसरं एक कारण त्यामागे असावं,

"त्यावर मात करायची असेल तर विवेकाची सुरी धारदार बनवली पाहिजे. जी वाममार्गावर जाताना मला टोचणी देत घायाळ करून शकेल.'' चंद्रकांत म्हणाला, "हे काम कुणी करावं हा पुन्हा प्रश्नच आहे. अशावेळी एकच हाती उरतं. आपण आपल्यापुरतं विकारी न होता विवेकी राहावं, वागावं....''

इनसायडरनं चंद्रकांतचा हात स्नेहभरानं घट्ट दाबीत त्याला मूक संमती दिली.

०-०-०

# ५. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय नोकरशाही पांढरा हत्ती, की वेगवान अश्व?

ब्यूरॉक्रसीचे हे दुखणे आजचे नाही, स्वातंत्र्य मिळाल्यापासूनचे आहे. मंत्री व मंत्रिपरिषदेला स्वतंत्र व रास्त (Free and fair) सल्ला फाईलीवर नोटिंग करताना अभिप्रायाच्या स्वरूपात देणे हे सचिव व अन्य अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. पण त्याला किती प्रमाणात ते कर्तव्य पार पाडता येते? स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय प्रशासनाची जी दुरवस्था झाली, ब्रिटिश काळातील पोलादी स्टील फ्रेम गंजली, त्याचे हे एक प्रमुख कारण तर नाही?

ब्रिटिशांनी दीडशे वर्षांत विकसित केलेली अखिल भारतीय स्वरूपाची ब्यूरॉक्रसी, प्रांतिक सरकारमधील राज्यस्तरीय ब्यूरॉक्रसी, स्वातंत्र्योत्तर काळात तशीच ठेवायची की तिच्यात आमूलाग्र बदल करायचे की अमेरिकेसारखी राजकीय स्वरूपाची कमिटेड ब्यूरॉम्रसी भारतात आणायची हा प्रश्न भारतीय नेत्यांसमोर होता. महात्मा गांधी व पंडित नेहरूंचे मत ब्रिटिश काळातील दमनकारी नोकरशाहीविरुद्ध होते, पण त्या वेळी देशाचे गृहमंत्री व उपपंतप्रधान असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांनी, आहे ही प्रशासकीय यंत्रणा ब्यूरॉक्रसी - चालू राहावी यासाठी ठाम भूमिका घेतली. १० ऑक्टोबर १९४९ राजी कॉन्स्टिट्यूअंट असेंब्लीमध्ये त्यांनी जे भाषण केले, ते अत्यंत महत्त्वाचे व मूलगामी होते. आम्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांना लाल बहादुर शास्त्री ॲकॅडमी येथे प्रशिक्षणाच्या वेळी दिल्या जाणाऱ्या रीडिंग मटेरियलमध्ये हे भाषण प्रत्येक वेळी दिले जाते. ते वाचताना, अभ्यासताना व चर्चा करताना जाणवते, की सरदार पटेल हे केवढे द्रष्टे होते, केवढे काळाच्या पुढे जाऊन पाहणारे होते आणि खऱ्या अर्थाने परखड म्हणणारे होते. आज तसे राज्यकर्ते कुठे आहेत? आणि त्या भाषणात पटेलांनी जी अपेक्षा व्यक्त केली, तसे आपले काम घटनेच्या चौकटीत निष्पक्षपणे करणारे ताठ कण्याचे नोकरशहा तरी कुठे आहेत?

अधिल भारतीय सेवेची आवश्यकता व तिची अपरिहार्यता नमूद करताना पटेल म्हणाले होते, "I Wish to assure you that I have worked with them (Beaurocrates i.e. I.C.S. and I.P.C officers in particular) during this

difficult period (i.e. Transfer of power, partition and abolishing and integrating 550 princely states with Indian Union). I am speaking with a sense of heavey responsibility - and I must confess that in point of patriotism, in point of loyality, in point of sincerity and in point of ability you can not have a substitute. They are as good as ourselves, and to speak of them in disparaging terms in this house. in public, and to criticise them in the manner, is doing disservice to yourselves and to the country. This is (my) considered opinion." (टीप : कंसातील शब्द माझे आहे. वाचकांना संदर्भ समजावा म्हणून.)

आम्हा नोकरशहांची स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षातील वाटचालीतील हीच व्यथा आहे की, भारताने जी प्रगती केली त्यातील जो रास्त व न्याय्य वाटा इंडियन ब्यूरॉक्रसीने उचलला, तिची जाणीव जशी नेत्यांना नाही, तशीच भारतीय नागरिकांनाही नाही. पहिल्या अध्यायाची सुरुवात करतानाच मी नमूद केले होते की, शब्दकोशातली यच्चयावत दूषणे ब्यूरॉक्रसीला दिली जातात, त्यात सत्यांश जरूर आहे, पण जर खरेच ब्यूरॉक्रसी एवढी कुचकामी व बदनाम आहे, तर ती पूर्णत: रद्द करून नवा पर्याय भारतीय राज्यकर्त्यांनी तेव्हा का शोधला नाही? आणि आजही तसा विचार का केला जात नाही? तेव्हा सरदार पटेलांनी देशाची अखंडता व एकात्मता टिकवायची असेल तर अखिल भारतीय स्वरूपाची प्रशासन सेवा हवीच ही भूमिका ठामपणे घेतली होती. आणि ती त्यांच्या नैतिक प्रभावाने, अभ्यास व अनुभवसिद्ध मताने मान्य केली होती. पण नंतर पंडित नेहरू व शास्त्री यांनी 'आमची सर्वांत मोठी चूक म्हणजे आम्ही भारतीय नोकरशाहीमध्ये बदल केला नाही'' असे म्हटले तरी नेहरूंना आपल्या सतरा वर्षांच्या पंतप्रधानांच्या कारकिर्दीत ते सहज शक्य होते. त्यांना खरेच का ब्यूरॉक्रसीची उपयुक्तता व देशाच्या एकात्मतेसाठी तिची आवश्यकता पटत नव्हती? याचे आजही समाधानकारक उत्तर सापडत नाही. आज डॉ. मनमोहन सिंग भारताचे पंतप्रधान आहेत. त्यांनीच भारताला दुसरे (आर्थिक) स्वातंत्र्य १९९१ नंतर ज्या सुधारणा केल्या त्यामुळे - दिले असे मानले जाते. ब्यूरॉक्रसीमध्ये सुधारणा करण्याची भाषा बोलतात, ती पूर्णत: बदलण्याची नव्हे. मला वाटते - पटेल ते मनमोहनसिंग ही जी विचारधारा आहे, तिने भारतीय नोकरशाहीचे भारतीय प्रशासनासाठीचे महत्त्व ओळखले आहे.

**मग खरे दुखणे कुठे आहे?**

पण मी दुखण्याआधी त्याचा उपाय सांगतो. कदाचित हा काही वाचकांना उफराटा क्रम वाटेल, पण त्याचेही मी नंतर विवेचन करणार आहे. सरदार पटेलांनी त्या भाषणात खालीलप्रमाणे उद्गार काढले होते,

'I have seen people who express their opinion about the service

(i.e. I.C.S) as they used to talk in old fashion when 50 or 60 percent were British elements who dominated the service and our (Indian) members of the service had hardly any freedom to express their opinion and they were not independent. Today, my secretary can write a note opposite to my views, I have given that freedom to all my secretaries. I have told them. "If you do not give your honest opinion for fear that it will displease your minister, please then you had beetter to go, I bring another secretary," I will never be displeased over a frank expression of opinion. That is what the Britishers were doing with the Britishers."

पण तेव्हा काय परिस्थिती होती व आज काय आहे? पुन्हा सरदार पटेलांच्या त्या ऐतिहासिक भाषणातला हा उतारा पाहा.

"If you are premier, it would be your duty to allow your secretary or chief Secretary, or other services working under you to express their opinion without fear or fever. But I see a tendency today that in several provinces the service are set upon and told, " No, you are service man, you must carry out our orders." The Union will go - you will not have a united India, If you have not a good All India Servics which has the independece to speak out its mind. which has a sense of security that you will stand by them."

आता वाचकांच्या लक्षात आले असेल की मी उफराट्या क्रमाने आधी निदान, मग दुखणे का सांगितले. सरदार पटेल ज्या पद्धतीने नोकरशहांकडून कामाची, निर्भय व स्वतंत्र विचारांची अपेक्षा करीत होते, तसे त्या वेळी प्रांतिक व देशपातळीवरचे बहुसंख्य नेते वागत नव्हते. ब्यूरॉक्रसी ही केवळ आज्ञापालनासाठी आहे असे ते मानत होते. आणि आज तरी काय स्थिती आहे? सुज्ञास सांगणे न लगे.

सरदार पटेल व नेहरूंसारख्या नेत्यांमुळे स्वातंत्र्योत्तर पहिल्या दोन तीन दशकांत ब्यूरॉक्रसी ही खरेच निर्भीड व स्वतंत्र होती. आपले मत व विचार "Without fear of favour" नोंदवत होती व तिचा नेत्यांकडून आदरही केला जात होता, आजही राम प्रधानांसारखे जुने सनदी अधिकारी यशवंतराव चव्हाणांसारख्या जाणत्या नेत्याबद्दल, (ते जाऊनही अनेक वर्षे झाली तरी) भरभरून बोलत असतात, कारण त्यांनी प्रधानांसारख्या अधिकाऱ्यांना हे स्वातंत्र्य दिले होते. त्यांच्या अभ्यासू मताची ते कदर करीत होते, बूज राखीत होते. आजचे चित्र काही सन्माननीय अपवाद वगळता विपरीत आहे.

आजच्या ब्यूरॉक्रसीच्या ऱ्हासाचे, तिच्या कमी झालेल्या प्रभावाचे हे एक कारण नक्कीच आहे. आजही बऱ्याच प्रमाणात घटनेप्रमाणे वागणारे व उत्तम प्रशासन निर्भीडपणे देणारे अनेक 'अनसंग हीरो' आहेत, पण त्यांचे प्रमाण झपाट्याने कमी होत चालले आहे. प्रवाहाशी जुळवून घेण्यात व्यावहारिक शहाणपण मानणारे बहुसंख्य झाले आहेच. यावर उपाय शोधण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष वीरप्पा मोईली यांनी Administrative Reform commission च्या अहवालात अनेक मूलगामी उपाययोजना सुचवल्या आहेत, त्यांचा ऊहापोह मी योग्य वेळी करणार आहेच, पण आज तरी त्याबाबत काही निर्णय होत नाही असे चित्र आहे.

मागील काही अध्यायात आपण चाणक्य काळ, मोगल काळ, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ यातील भारताची आणि विस्तृत प्रमाणात ब्रिटिश काळातील प्रशासनव्यवस्थाही अभ्यासली. आता मला स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांतील भारतीय प्रशासन व्यवस्थेवर क्ष-किरण टाकून नेमके छायाचित्र वाचकांपुढे उभे करायचे आहे.

भारतीय नोकरशाहीचे मागील साठ वर्षांतील स्वरूप पाहण्यापूर्वी या साठ वर्षांतील प्रशासनाच्या संदर्भातील प्रमुख प्रभाव टाकणारे प्रवाह पाहणे आवश्यक आहे, ते खालीलप्रमाणे आहेत.

**एक : अस्थिर राजकीय परिस्थिती**

पंडित नेहरूंचा पंतप्रधानपदाचा कालखंड हा स्थिर राजकीय, एकपक्षीय (काँग्रेस) राजसत्तेचा व विकासाचा होता. पण १९६५ साली प्रथमच काँग्रेसचे बहुमत अत्यंत कमी झाले व १९६९ साली देशातील नऊ प्रांतांत संयुक्त विधायक दलाचे सरकार आले. राजकीय अस्थिरतेच्या काळाची ती सुरुवात होती. याच काळात सत्तेसाठी पक्षांतर करण्यास सुरुवात झाली. तसेच काँग्रेस पक्षातील अंतर्गत सत्तासंघर्ष या काळात चरमसीमेवर गेला. त्यातून व्ही. व्ही गिरी विरुद्ध संजीव रेड्डी अशी राष्ट्रपतिपदाची निवडणूक झाली आणि काँग्रेस पक्षात फूट पडली. पण नंतर १९७१ च्या युद्धात देदीप्यमान विजयामुळे व 'गरिबी हटाव' सारख्या घोषणा, बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे व 'आम आदमी' साठीचा वीसकलमी कार्यक्रम यामुळे इंदिरा गांधींनी काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळवून देत राजकीय स्थिरता दिली. पण वाढती महागाई, बेरोजगारी व असंतोष यामुळे सामाजिक अस्थिरता माजली, (ती आजतागायत कायम आहे) पुढे राजीव गांधींना बहुमत होते, तरीही ती कायम होती. कारण अनेक राज्यांत प्रादेशिक पक्षांची सत्ता आली होती व भारतीय जनता पक्ष प्रमुख विरोधी पक्ष म्हणून उदयास आला होता. व्ही. पी. सिंग ते मनमोहनसिंग (व्हाया अटलबिहारी वाजपेयी) यांचे पंतप्रधानपदाचे कालखंड हे राजकीय अस्थिरतेचे व आघाडी सरकारचे होते व आहेत. म्हणजे एकपक्षीय सत्तेची राजकीय स्थिरता भारतात १९८९ पासून नाही. त्यापूर्वीच्या १९६९ पासूनचा कालखंडही अस्थिरतेचाच होता,

पण प्रमाण तुलनेने कमी होते. इतकेच.

या राजकीय अस्थिरतेचा भारतीय प्रशासनावरही परिणाम झाला. अनेक प्रांतात एका नेत्याभोवती केंद्रित राजकीय पक्षाची सत्ता आल्यामुळे व केंद्रातील आघाडी सरकारांमुळे प्रशासकांची निष्पक्षता हळूहळू कमी होत गेली तसेच "Competitive populite politics" चा उदय व प्रसारही याच काळात झपाट्याने होत केला. त्यासाठी ब्यूरॉक्रसीचा बिनदिक्कत वापर सुरू झाला. त्या वेळी ठामपणे व नेटाने विरोध केला नाही त्यामुळे ही घसरण होणे अपरिहार्य होते!

**दोन : देशाच्या अखंडतेचा व एकात्मतेचा प्रश्न**

भारतीय घटनेच्या सरनाम्याप्रमाणे देशाचा कारभार चालत असला तरी देशाच्या एकात्मतेला व अखंडतेला असणारी भीती व चिंता वाढत चालली आहे. काश्मीर प्रश्न चिघळण्याला १९८९ पासूनच सुरुवात झाली. आजही काश्मीरचा प्रश्न देशाच्या एकात्मता व अखंडतेसाठी सर्वांत मोठा चिंतेचा विषय आहे. पंजाबच्या अतिरेक्यांनी खलिस्तानच्या मागणीसाठी केलेल्या दहशती कारवायांमुळे एक दशक भारताला अत्यंत विपरीत परिस्थितीमधून जावे लागले. आजही ईशान्येकडील राज्ये धगधगती आहेत. मुख्य म्हणजे देशाच्या सुमारे एक चतुर्थांशपेक्षा अधिक जिल्ह्यात नक्षलवादाने उग्र रूप धारण केले आहे. देशात हिंसाचार वाढला आहे. अतिरेकी धर्मवादाने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. मंडलवादामुळे जातीच्या अस्मिता टोकदार व धारदार झाल्या आहेत. बेरोजगारीमुळे अनेक राज्यात 'स्थानिक विरुद्ध परके' असा संघर्ष पेटत आहे. त्याद्वारे भाषिक अस्मिताही उफाळून आल्या असून त्याही विकृत रूप धारण करीत आहेत. या साऱ्यामुळे आज भारत देश सुप्त ज्वालामुखीच्या तोंडावर उभा आहे पण सुदैवाने भारतीय माणसांचा अंगभूत शहाणपणा व मध्यममार्गी प्रवृत्ती यामुळे अशा स्फोटक परिस्थितीतही भारताने लोकशाही टिकवून धरली आहे. साऱ्या जगाने विस्मयाने पाहावे असा हा लोकशाहीचा अपूर्व प्रयोग चालू आहे. त्यात अनेक दोष असले तरी मतपेटीतून राजकीय क्रांती व शांततापूर्ण सत्तांतर होत आहे. त्यामुळे देशाच्या कारभाराचा केंद्रबिंदू भारतीय माणूस बनला आहे. राजकीय पक्ष कितीही संघर्ष करीत असले तरी दर पाच वर्षांनी मतदारांपुढे निवडणुकीच्या माध्यमातून त्यांना जावे लागते व मतदारराजा काय करेल ही भीती असल्यामुळे लोकानुनय करणे त्यांना क्रमप्राप्त आहे. हे लोकशाहीसाठी चांगले आहे, पण लोकरंजन केवळ पुरेसे नाही तर लोकहितही तेवढेच महत्त्वाचे आणि त्याहून जादा देशहित महत्त्वाचे ही जाण नेत्यांपेक्षाही आम आदमीला जास्त आहे, असे मागील दहा-पंधरा वर्षांच्या घडामोडी पाहाता कुणाही अभ्यासकाला जाणवेल.

ही जाण राजकीय नेत्यांप्रमाणे प्रशासकांना - ब्यूरॉक्रसीला तेवढ्या प्रमाणात आहे का, हा लाखमोलाचा सवाल आहे. राजकीय नेत्यांना ती नसेल तर ते निवडणुकीत

पराभूत होतात, पण नोकरशाहांना काही होत नाही, त्यामुळे त्यांना ती जाण कमी आहे असे माझे निरीक्षण आहे. त्यांच्या अधोगतीचे व कमी होत चाललेल्या प्रभावाचे तेही एक कारण आहे.

**तीन : कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर झालेला प्रश्न**

भारतीय राज्यकर्त्यांनी ब्रिटिशांप्रमाणे कायदा व सुव्यवस्था हा राज्यकारभाराचा प्रथम प्राधान्याचा विषय न मानता, विकास हा कळीचा मुद्दा आहे म्हणून त्याला प्राधान्य दिले. प्रा. अमरेश्वर अवस्थी आणि प्रा. आनंद प्रकाश अवस्थी यांनी "Indian Administration" या विषयावरच्या आदर्श पाठ्यपुस्तक ठरलेल्या ग्रंथात हे नमूद केले आहे. (व ते मला तंतोतंत पटते) की जर भारताच्या इतिहासावर एक फिरता कटाक्ष टाकला तर हे दिसून येते की भारताचा सर्वात महत्त्वाचा विषय शांतता व सुव्यवस्था राखणे हा आहे. भारतासारख्या गरीब व विकसनशील देशामध्ये विकास हा कळीचा मुद्दा आहे, पण हेही तेवढेच खरे आहे की विकास शांततापूर्ण परिस्थितीतच संभवतो. भारताची जी राज्ये आज अविकसित आहेत. (उदा. बिहार, उत्तर प्रदेश) तेथे कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली नसल्यामुळे ती विकासात मागे पडली आहेत, हे अनेक अभ्यासकांचे मत आहे. प्रा. अवस्थी द्वयांनी हा प्रश्न नेमक्या शब्दांत खालीलप्रमाणे अधोरेखित केला आहे.

"No doubt, development in a poor and backward country like India is important, but it should not be forgotten that development is possible only in a peaceful atmosphere. The first and primary duty of any government is to preserve law and order in society, protect the innocent and punish the guilty. While both parliament as well as the state legislatures are busy making, amending and repealing laws and the existing laws are not observed in practice by the people. Muscle power is thriving and violence rules everywhere. The peaceful, law abiding and the quiet citizen is at loss to understand how he should cope with the problems. The law enforcement agency, namely, the police is demoralized, corrupt and find its jurisdiction too much extended and complex. political interference in law and order has made the problem worse."

प्रा. अवस्थी द्वयांनी शेवटच्या ओळीत पोलिसांबाबत जे विधान केले आहे, ते आय. ए. एस. सेवेलाही लागू आहे. कायदा-सुव्यवस्था सांभाळण्याची आणि शांतता राखण्याची जबाबदारी सक्षमतेने पार पाडण्यातील अडचणी प्रा. अवस्थींनी स्पष्टपणे नमूद केल्या आहेत. पण त्याची दुसरी बाजू म्हणजे जे अधिकार प्रशासकांना, खास

करून पोलिसांना, प्राप्त झाले आहेत, ते प्रभावीपणे वापरता येत नाहीत वा वापरले जात नाहीत. जोवर प्रशासकीय सेवा राजकीय नियंत्रणापासून अलग होणार नाही, जे अनेक प्रशासकीय सुधारणा समित्यांनी सुचवले आहे, तोवर भारतापुढील कायदा, सुव्यवस्था आणि शांतता राखण्याचा प्रश्न गंभीर राहील; पण हा प्रश्न न सुटण्यामागे जलद गतीने न होणारा विकास आणि वाढती बेरोजगारी हेही कारण आहे. हे एक दुष्टचक्र आहे. कायदा, सुव्यवस्था व शांतता नाही म्हणून विकास कमी किंवा नाही; आणि दुसऱ्या बाजूला विकास होत नाही म्हणून सामाजिक ताणतणाव व त्याची कायदा सुव्यवस्था मोडण्यात होणारी अपरिहार्य परिणती. म्हणजेच, एकाच वेळी हे दोन्ही प्रश्न तेवढ्याच सक्षमतेने हाताळण्याची गरज आहे. त्यासाठी नोकरशहांचा सुसंवाद व प्रत्येकाचे निश्चित होणारे कार्यक्षेत्र, जबाबदाऱ्या व अधिकारांच्या सीमारेषा ठरवणे आवश्यक आहे. ते होईल तो सुदिन!

**चार : वाढती ब्यूरॉक्रसी**

हा या साठ वर्षांतील एक महत्त्वाचा प्रवाह आहे. सुरुवातीच्या काळात 'राज्यांनी सर्व विकास करायचा' या सोव्हिएत युनियनच्या प्रभावाने अनेक सार्वजनिक उपक्रम व महामंडळांची निर्मिती झाली. अगदी हॉटेल्स व मॉडर्न बेकरीसारखे पावनिर्मितीचे कारखानेही सरकारने सुरू केले. तसेच विकासाच्या नव्या दिशा चोखाळताना नवी नवी खाती निर्माण करण्यात आली. त्यामुळे मंत्र्यांची संख्या वाढत गेली, तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची. देशात आय. ए. एस. अधिकाऱ्यांची संख्या हजारावरून पाच हजारांपर्यंत गेली आहे. आज केंद्रीय कर्मचाऱ्यांची संख्या चाळीस लाख आहे, तर महाराष्ट्रात ती सुमारे वीस - एकवीस लाख आहे. त्यामुळे त्यांचे वेतन भत्ते व इतर सुविधांवरचा खर्चही प्रचंड प्रमाणात वाढत आहे. दहा वर्षांपूर्वी लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगामुळे अनेक राज्यांची आर्थिक परिस्थिती खालावली हेती. पण मागील दशकातील आर्थिक प्रगतीमुळे ती बरीचशी रुळावर आली. आता पुन्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झाला आहे आणि प्रत्येक राज्यात तो लागू व्हावा यासाठी राज्य कर्मचाऱ्यांची आंदोलने सुरू झाली आहेत. तो लागू करणे अपरिहार्य आहे. अशातच जागतिक मंदीमुळे अर्थव्यवस्थेला बराच तडाखा बसला आहे. अशी मंदीने ग्रासलेली नाजूक अर्थव्यवस्था वेतनावरील हा वाढता खर्च कसा पेलवेल हा प्रश्न आहे.

वाढते वेतन आणि ढासळती कार्यक्षमता यामुळे सरकारी बाबूंना पांढरे हत्ती म्हणण्याची अलीकडे फॅशन आहे. ती बऱ्याच प्रमाणात रास्तही आहे. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांपेक्षा त्यांचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांचे हे कर्तव्य ठरते की हा वेतनावरील वाढता खर्च योग्य आहे हे कामाद्वारे पटवून द्यावे. जेव्हा खर्च होणाऱ्या पैशाचा पुरेपूर मोबदला उत्तम प्रशासन, उत्युच्च कार्याक्षमता आणि जनहिताचे रक्षण या माध्यमातून

दिला जाईल, तेव्हाच प्रशासक, कर्मचाऱ्यांना पांढरा हत्ती म्हणणे बंद होईल!पण पांढरा हत्ती म्हणण्याइतपत भारतीय नोकरशाही खरंच ढासळली आहे का? भारतीय ब्यूरॉक्रसी पांढरा हत्ती आहे की वेगवान धावणारा अश्व? की फार धीमा नाही, पण गतिमानही नाही असा बैल? या साठ वर्षांत तिने काय कमावले, काय गमावले याचा लेखाजोखा पुढील काही अध्यायातून मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

o-o-o

# ६. स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासनाची ६०वर्षे 'सिक्स थिंकिंग हॅट'च्या तंत्राद्वारे

"Of no country can it be said more truly than of India that Government is administration."

"Without the Civil Service, indeed, Government itself would be impossible..."

१९३० साली 'इंडियन कॉन्स्टिट्यूशन रिफॉर्म कमिशन'चे अध्यक्ष सायमन (तेच 'कु'प्रसिद्ध सायमन, ज्यांना 'चले जाव' म्हणताना लाठी हल्ल्यात लाला लजपतराय जखमी झाले व नंतर निधन पावले), यांनी आपल्या अहवालात ब्यूरॉक्रसी संदर्भात वरील दोन ठळक निरीक्षणे नोंदवली आहेत. आजही ती कालबाह्य झालेली नाहीत, उलट त्या काळापेक्षाही आज ती अधिक खरी वाटतात. त्याचे कारण सांगताना सायमन कमिशनने लिहून ठेवले आहे, "The Civil service of India, which in origin was little more than revenue collecting agency, gradually took upon itself a very wide range of duties. As work become specialized, new services has to be created... India looks to Government to do many things which in the west done by private enterprise."

मागील साठ वर्षांच्या भारतीय प्रशासनाच्या वाटचालीचा आढावा घ्यायचा झाला तर असं म्हणता येईल की, आम्ही भारतीयांनी सायमनचे वरील निरीक्षण, ('Government is administration' म्हणजेच नोकरशाही) कालबाह्य वा प्रशासनाचे एक अंग न करता तेच एकमेव अंग करण्याचा चंग बांधीत सर्व काही शासनानेच करायचे (कारण त्याला जनहित कळते) या पद्धतीने नोकरशाहीचा विस्तार केला आहे. हा विस्तार जसा संख्यात्मक आहे, तसा तो कामकाजाच्या संदर्भातही आहे. पण गुणवत्तेच्या संदर्भात?

स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासनाच्या साठ वर्षांच्या कालखंडाचा आढावा या अध्यायात आपण घेणार आहोत, तो एका अभिनव पद्धतीने - 'सिक्स थिंकिंग हॅट'

च्या तंत्राद्वारे! हे तंत्र एडवर्ड डी बोनो यांनी विकसित केले आहे. ते तंत्र प्रामुख्याने व्यवस्थापन विश्वात निर्णय घेण्यासाठी वापरले जाते. पण ते कोणत्याही विषयाबाबत निर्णय घेताना, निष्कर्ष काढताना वा विचार करताना वापरता येऊ शकते. किंबहुना आज मी त्याचा वापर स्वातंत्र्योत्तर काळातील ब्यूरॉक्रसीच्या कामकाजाच्या संदर्भात करणार आहे, ते खचितच उद्‌बोधक वाटेल!

पांढरी हॅट ही माहिती व आकडेवारी भर देत भूतकाळातील घटना पाहाते आणि वर्ज्य विषयाची संपूर्ण माहिती देते. तांबडी हॅट ही त्या विषयाच्या भावनेच्या अंगाने व इंट्यूशनच्या आधारे विचार करते, इतर लोक याकडे कसे पाहात असतील याचा मानसिक अंगाने विचार करते. काळी हॅट ही निराशावादी, संरक्षणात्मक पद्धतीने विचार करते. ती संबंधित विषयातील दोष नजरेस आणून देते व कच्चे दुवे तपासते. नवा विचार, संकल्पना या व्यवहार्य कशा नाहीत हे सांगते, तसेच भविष्यातील धोकेही कथन करते. पिवळी हॅट ही सकारात्मक विचार करते. ती आशावादी असते व वर्ण्य विषयाचे फायदे पाहाते, त्याचा मूल्यात्मक विचार करते. हिरवी हॅट म्हणजे सृजन किंवा 'क्रिएटिव्हिटी' - ती वर्ण्य विषयाबाबत 'आऊट ऑफ बॉक्स' विचार करीत, नवा विचार संकल्पना देत, जुन्या प्रश्नांची नवी निर्मितिक्षम उत्तरे शोधायचा प्रयत्न करते., शेवटची हॅट ही निळी हॅट आहे. ती बाकी पाच विचारांचा मेळ घालते. मीटिंगमध्ये वा परिसंवादामध्ये अध्यक्ष असणारी व्यक्ती निळी हॅट घालते. जेव्हा बाकी पाच हॅटसचे विचार थांबतात, तेव्हा निळी हॅट प्रथम हिरव्या हॅटला उत्तेजन देते, आणीबाणीच्या प्रसंगी काय करावे हा प्रश्न पडतो तेव्हा काळ्या हॅटला विचारून दोष जाणून घेते व पिवळ्या हॅटच्या मदतीने 'कॉंटिंजन्सी प्लॅन' निर्दोष बनवते.

भारतीय प्रशासन - प्रामुख्याने ब्यूरॉक्रसी - बाबत मतभिन्नता आहे. ती कितपत उपयुक्त आहे; ती खरंच लोकांची कामे करते की, केवळ कागदी घोडे नाचवते इथपासून, ती बंद करणे कसे योग्य आहे, असा मतामतांचा गलबला आजही चालू आहे. त्या साऱ्यांचा आढावा 'सिक्स थिंकिंग हॅटस्'द्वारे घेतला तर एकाच अध्यायात सर्व बाजू वाचकांना पाहता येतील आणि मग ते निळी हॅट घालून विचार करू लागतील.

### १. पांढरी हॅट काय म्हणते?

भारतीय प्रशासनाची स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल संख्यात्मक बाजूने पाहिली तर तिचे कार्य भरीव म्हणता येईल. त्याचप्रमाणे पंडित नेहरूंनी मिश्र अर्थव्यवस्था आणि सोविएत युनियनच्या प्रभावाने योजनाबद्ध विकासाचा मंत्र जपत 'सरकार सर्व काही करू शकतं' या श्रद्धेने व विश्वासाने अक्षरशः सर्वच क्षेत्रे आपल्या ताब्यात घेतली. अगदी हॉटेल चालवणे (आय. टी. डी. सी. व आपली एम. टी. डी. सी. ची 'हॉटेल्स, रिझॉर्टस् व विश्रामगृह') तसेच जनतेला ब्रेड (पाव) देण्यासाठी 'मॉडर्न

बेकरी' सरकारी क्षेत्रात सुरू करणे, कपडा मिल उभारणे ही सहज आठवणारी उदाहरणे. त्यामुळे नोकरशाहीचा विस्तार व अधिकाधिक वाढत गेला. आय. ए. एस. नामक प्राणी सर्वज्ञ असून तो बँकेचा चेअरमन, शेअर बाजाराचा अध्यक्ष, ऑर्डिनन्स फॅक्टरीचा प्रमुख, एवढेच काय 'फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट' चा डायरेक्टर म्हणून तेवढ्यात कार्यक्षमतेने काम करू शकतो, असे मानले जाऊ लागले.

१९२४ साली कमिशनच्या अहवालाप्रमाणे ब्रिटनशासित भारतात १३५० आय. सी. एस. होते, २००१ साली त्यात चारशे टक्क्यांनी वाढ झाली आहे. आज सुमारे साडेपाच हजार आय. ए. एस. अधिकारी कार्यरत आहेत. १९२४ साली ७२२ आय. पी. एस. अधिकारी होते, त्यांची वाढ स्वतंत्र भारतात आय. ए. एस. पेक्षा अधिक होत गेली असून सध्या त्यांची नेमकी संख्या उपलब्ध नसली तरी लक्षणीय आहे. १९२४ साली सर्व केंद्रीय सेवा अधिकाऱ्यांची संख्या ४२७८ होती, आज ती त्याच्या दहापट आहे. थोडक्यात, मागील साठ वर्षात ब्यूरॉक्रसीची संख्यात्मक तसेच कामाच्या संदर्भात विभागाच्या संदर्भात प्रचंड वाढ झाली आहे. वर्ग एक ते चार (किंवा अ-ब-क-ड- वर्गातील अधिकारी) आणि कर्मचारी वर्गांच्या संख्येतही सुमारे तीनशे पट वाढ झाली आहे. 'रायजिंग पिरॅमिड ऑफ ब्यूरॉक्रॅटस्' किंवा पार्किन्सनच्या कायद्याप्रमाणे दरवर्षी ५.७५ टक्के सरासरी वाढ अपेक्षित आहे. त्यानुसार भारत सरकारच्या केंद्रीय सेवेत तीनशे ते सव्वातीनशे टक्के वाढ गृहीत धरली होती. इथे तशी वाढ होण्यात केंद्र सरकार पूर्णपणे यशस्वी झाले आहे. आजवर वेतनवाढीसाठी सहा वेतन आयोग निर्माण करण्यात आले होते, त्यांच्या अहवालाप्रमाणे केंद्रीय कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे वाढत गेली.

१) पहिला वेतन आयोग (१९४६ - ४७) -
कर्मचाऱ्यांची संख्या १४.४५ लाख
२) दुसरा वेतन आयोग (१९५७ - ५९) -
कर्मचाऱ्यांची संख्या १४.४५ लाख
३) तिसरा वेतन आयोग (१९७० - ७३) -
कर्मचाऱ्यांची संख्या २९.८२ लाख
४) चौथा वेतन आयोग (१९८३ - ८७) -
कर्मचाऱ्यांची संख्या ३७.८७ लाख
५) पाचवा वेतन आयोग (१९९४ - ९७) -
कर्मचाऱ्यांची संख्या ३८.७० लाख
६) सहावा वेतन आयोग (२००३ - २००६) -
कर्मचाऱ्यांची संख्या ४१.७६ लाख

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, गट 'ड' म्हणजे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची

(उदा. चपराशी, मदतनीस व तत्सम पदावरील कर्मचारी) संख्या यामध्ये सुमारे ६० टक्के आहे. तर गट 'अ' श्रेणी अधिकाऱ्यांची संख्या अवघी तीन ते पाच टक्के आहे. कामाच्या संदर्भात वर्ग एक व दोन अधिकाऱ्यांची उत्पादकता व त्यांच्यावरील कामाचा ताण सर्वाधिक आहे. त्यांना खाजगी क्षेत्राप्रमाणे वेतन देणे योग्य आहे, कारण खाजगी क्षेत्राच्या वरिष्ठ व्यवस्थापकाच्या तुलनेत त्यांच्या कामाची व्याप्ती जबाबदारी आणि विविधता अधिक आहे. पण भारतामध्ये लोककल्याणकारी राज्य असल्यामुळे वेतनवाढ सर्वांना देणे अपरिहार्य आहे. तसे पहिले तर चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे वेतन फार आहे असे मुळीच नाही, पण त्यांची प्रचंड संख्या व त्यांच्या कामाची उत्पादकता यांचे प्रमाण व्यस्त आहे. ही कामे त्यांच्यावेतनावरील खर्चाच्या एक दशांश रकमेत ('आऊट सोर्स' करून) अधिक कार्यक्षमतेने करून घेता येणे शक्य आहे. पण संघटित कामगार क्षेत्राचे दबावाचे राजकारण आणि स्पर्धात्मक 'पॉप्युलिस्ट' राजकारणामुळे ते शक्य होत नाही.

महाराष्ट्राचा विचार केला तर साधारणपणे ३५० आय. ए. एस. तर ५०० च्या आसपास आय. पी. एस. अधिकारी आहेत. एकूण कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या १८ लाखांच्या आसपास आहे, त्यात प्रथमिक शिक्षकांचा वाटा ६० टक्क्यांहून थोडा अधिक आहे, पण प्राथमिक शिक्षण ही अत्यावश्यक सेवा आहे व सरकारवरच त्याची जबाबदारी आहे, त्यामुळे ही संख्या वगळता महाराष्ट्रात कर्मचाऱ्यांची संख्या पार्किसन लॉच्या सिद्धान्तापेक्षा निश्चितच मर्यादित आहे.

**२. काळी हॅट काय सांगते?**

गुरुचरण दास यांनी एका लेखात असे लिहिले आहे की, वरिष्ठ पदावर असलेला त्यांचा एक आय. ए. एस. अधिकारी त्यांना डोळ्यात पाणी आणून सांगत होता की, त्याच्या कॉलेजवयीन मुलाला त्याची लाज वाटते. त्यांची इच्छा होती की त्यांच्या मुलानेही प्रशासकीय सेवेत यावे, तेव्हा तो मुलगा ताडकन म्हणाला, "Dad, only corrupt, inefficient and negative people join I.A.S." गुरुचरण दास यांच्या मते हे मत दडपशाही व भ्रष्टाचार करणाऱ्या कार्यक्षम ब्यूरॉक्रसीवर झगझगीत प्रकाश टाकणारे आहे.

२३ जून २००१ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये "बाबू, समझो इशारे" या स्फुट लेखात उदारीकरणानंतर 'जनरॅलिस्ट' (Generalist) असणारी प्रशासकीय सेवा ही गतिमान व जागतिक बदलांशी जुळवून घेत विकास प्रशासन देण्यात फारशी यशस्वी ठरली नाही. त्यामुळे आय. ए. एस. सेवा बंद करावी का, हा प्रश्न अनेक स्तरांवर उमटायला सुरुवात झाली आहे. परमिट - कोटा - लायसेन्सच्या जमान्यात जो रुबाब प्रशासकाचा होता, तो आता राहिला नाही. नव्या बदलांशी जुळवून घेणे त्यांना जड जाते आहे, त्यामुळे विकास प्रक्रियेत ते अडसर ठरत आहेत, असा त्या

लेखांचा सूर होता.

खरे तर पंडित नेहरूंनाही ब्रिटिशांनी विकसित केलेली प्रशासकीय चौकट पसंत नव्हती. त्यांनी आपल्या आत्मचरित्रातही लिहून ठेवले आहे. "But of one thing I am quite sure, that no new order can be built up in India as long as the spirit of ICS pervades our administration and our public services. Therefore it seems to me quite essential that the ICS and similar services must disappear completely, as such, before we can start real work on a new order." पण त्यांनी किंवा त्यांच्या या मताशी सहमत असणाऱ्या इंदिरा गांधींनी या दिशेने काही प्रयत्न केले नाहीत. अर्थात, त्यांची ही मते चिंतनीय आहेत व वरिष्ठ पातळीवरील ब्यूरॉक्रसीबाबत प्रश्नचिन्हे निर्माण करणारी आहेत.

स्वातंत्र्यानंतर काही वर्षे जनतेने 'मायबाप' सरकार म्हणून प्रशासकांची हडेलहप्पी सहन केली, पण तळागाळापर्यंत लोकशाही रुजत गेल्यावर जनतेच्या विकासाच्या आकांक्षा वाढत गेल्या. संवेदनाहीन प्रशासन ते ओळखू शकत नसल्यामुळे जनतेची नाराजी वाढत चालली आहे. अधिकाराचे प्रशासनातले प्रचंड विकेंद्रीकरण, बेपर्वा वृत्ती आणि भ्रष्टाचारामुळे भारतीय प्रशासन बदनाम झाले आहे.

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी महाराष्ट्र सरकारच्या पाणीपुरवठा स्रोताच्या ५०० मीटर परिसरातील उपसाबंदीच्या निर्णयावर टीका करताना काही वर्षांपूर्वी "Birbals and Aesops in Mumbai!" या शीर्षकाचा परखड लेख लिहिला होता, त्यात त्यांनी अकबर - बिरबलाची कहाणी सांगून अधिकारी कसा भ्रष्टाचार करतात याचे मार्मिक विवेचन केले आहे. त्यांच्या लेखाच्या पहिल्या परिच्छेदाचा मी इथे स्वैरानुवाद देत आहे.

बादशहा अकबराने दरबारातील अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार कानी आल्यावर बिरबलापुढे उद्‌गार काढले, "हे साहजिक नाही का? Power corrupts, and absolute power corrupts absolutely." त्यावर बिरबल म्हणाला, "Corrupt official do not need power to be corrupt. They can invent power." आणि पाण्याच्या लाटा मोजताना नावाड्यांचा अडथळा होतो म्हणून नौकानयनावर बंदी घातली, तेव्हा नाविकांनी पैसे देऊन नावा सुरू केल्या, हे दाखवून देत बिरबलाने आपला मुद्दा बादशहाला पटवून दिला.

भारतीय नोकरशाही नागरिकांच्या नजरेतून कशी आहे याचे वर्णन करायचे झाले तर इंग्रजी भाषेतील A to Z अशी यच्चयावत विशेषणे लावता येतील, असे बखरीच्या पहिल्याच अध्यायात मी लिहिले होते. ती Arrogant, corrupt, discourtious, irresponsible and insensitive, manipulative, negative, torturous वगैरे

वगैरे आहे. त्यात गेल्या साठ वर्षांत तिळमात्रही बदल झालेला नाही.

म्हणून जितका तिचा विस्तार जास्त, तितकी दिरंगाई - लालफीतशाही व भ्रष्टाचार अधिक. तिचे अधिकार कमी झाल्याखेरीज जनतेला न्याय मिळणार नाही. ही सार्वत्रिक भावना आहे.

## ३. लाल हॅट काय सांगते?

तालुका स्तराचा विचार केला तर तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन व नगरपालिका ही कार्यालये प्रशासनाची 'कटिंग एज' आहेत. येथे जो अनुभव येतो, त्यावरून सरकारची बरी - वाईट प्रतिमा ठरत असते. ही कार्यालये म्हणजे सरकारचा चेहरा असे म्हटले जाते!

नागरिकांसाठी हा सरकारचा चेहरा कसा आहे? तो आहे विद्रूप, काळवंडलेला. लोकांची कामे असंख्य चकरा मारल्याखेरीज होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. वजन ठेवले की वेगाने फाईल हलते, ही लोकमानसात रुजलेली भावना आहे. खरे तर इथे राजकारण्यांना दोषही देता येत नाही. हे काम या अधिकार - कर्मचाऱ्यांचे असते. नियमाप्रमाणे एक तर काम करायचे असते किंवा स्वच्छपणे नाही म्हणून उत्तर द्यायचे असते. आणि कामासाठी जेव्हा लोक भेटतात तेव्हा ठरावीक उत्तर असते - 'पाहतो', 'पाहून करतो'; पण 'करून पाहतो व सांगतो' असे आश्वासक उत्तर मिळत नाही. हीच बाब जिल्हा, राज्य व केंद्र स्तरावर थोड्याफार फरकाने आहे. किंबहुना जसे वर जाल, तशी या अनुभवाची गडदता वाढत जाते. सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची ही मानसिकता कशी बनली असेल? हा राजेशाही सरंजामशाहीचा (फ्यूडल सिस्टिमचा) परिपाक आहे. लहरी व सर्वंकष सत्ताधीश राजा आणि त्याला खूश केले की आपल्या जहागिरीत मन चाहेल तसे वागण्यास मोकळिक असे समजून जनतेवर दडपशाही लादणारे जहागीरदार, सरंजाम, सरदार - शिलेदार. ही ती अनिष्ट परंपरा व इतिहास. पण स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक संसदीय लोकशाही आणि प्रजासत्ताक समाजवादी सेक्युलर जनहिताची कल्याणकारी राज्यव्यवस्था भारताने स्वीकारल्यानंतर नोकरशाहीने बदलायला हवे होते; पण ती बदलली नाही, उलट तिची हडेलहप्पी वाढत गेली. तिला चाप लावायचे वा अंकुश बसवायचे काम राज्यकर्त्यांचे होते; पण त्यांनीही ते केले नाही, का सोयिस्कररीत्या त्यांना आपल्या हितासाठी वापरताना लोकप्रतिनिधींनी सूट दिली? ते राजे - तर हे नोकरशहा त्यांचे जहागीरदार - सरदार. त्यांना सांभाळा, मग हवे तसे वागा असा यांचा कारभार. हा जनतेचा त्रागा नाही, तर फार मोठी सच्चाई आहे.

पण याची दुसरी एक बाजू आहे. अलीकडे अवेळी बरसणारा मान्सून व वारंवार धरणे भरल्यामुळे पाणी सोडणे भाग असल्यामुळे (फार मोठ्या भागात दरवर्षी) महापुराचे संकट ओढवते. त्याचा मुकाबला नोकरशाहीने अत्यंत समर्थपणे केल्याचे

दिसून आले आहे. लोकांचे जीव वाचवणे व त्यांच्या चीजवस्तूंची सुरक्षा राखणे या कामात ब्यूरॉक्रसीने जनतेच्या अपेक्षेला उतरत काम केले आहे. तसेच दुष्काळात एकेका जिल्ह्यात लाख-लाख मजूर रोजगार हमीच्या कामावर होते, ते सारे कर्तृत्व नोकरशाहीचे म्हटले पाहिजे. आज देशभर महिला बचत गटांचे विस्तृत जाळे विणले गेले आहे, त्याचे मोठे श्रेय विकासप्रशासन राबवणाऱ्या पंचायत राज यंत्रणेला आहे आणि निष्पक्ष निवडणुका घेण्याचे व शांततापूर्ण लोकेच्छेचे प्रतिबिंब पडलेले सरकार बदलण्याचे काम कोण करते? महसूल यंत्रणाच ना? प्रशासनात खूप 'अनसंग हीरोज' आहेत. त्यांची प्रसिद्धी होत नाही एवढेच. पण प्रत्येक स्तरावर असे असंख्य अनुभव जनतेला वेळोवेळी येत असतातच. महाराष्ट्रात गावेच्या गावे तंटामुक्त करणारे तलाठी व गावेच्या गावे निर्मल करणारे ग्रामसेवक व त्यांना प्रेरणा देणारे, 'लीड फ्रॉम द फ्रंट' नेतृत्व देणारे महसूल व जिल्हा परिषदेचे अधिकारी असंख्य आहेत. नागरिकांना सामावून घेत 'पीपल्स बजेट'ची संकल्पना मांडणारे माजी पुणे मनपा आयुक्त नितीन करीर, सोलापूर शहराची बंद पडत चाललेली शहर बस सेवा नफ्यात आणणारे आर. टी. ओ. मदने, जिल्हा परिषद सांगलीमध्ये महिला धोरण राबविणारे अस्मादिक, एकाच वेळी पाच लाख शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषी तंत्रज्ञान (पुस्तिकेच्या रूपाने) पोचवणारे कोल्हापूरचे अधीक्षक कृषी अधिकारी उमेश पाटील, प्राणांचे मोल देऊन हायवेचा दर्जा टिकवणारे बिहारचे सत्येन दुबे व पेट्रोलियम भेसळीचे रॅकेट उलगडणारे मंजुनाथ, प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणरारे व्ही. पी. राजा व अनिलकुमार लखिना, शाळाशाळांमध्ये संविधानाची उद्देशिका पोचवणारे खोब्रागडे, ठाणे शहर बदलणारे टी. चंद्रशेखर, कोकण रेल्वे व दिल्ली मेट्रोचे जनक श्रीधरन... किती उदाहरणे द्यावीत?

लाल टोपीचे मन सांगते की, पेला अर्ध्याहून जास्त खाली आहे, पण तो पूर्णपणे रिकामा नाही. शकील बदायुनीचे एक गीत आहे माणसाबद्दल - "ना मै भगवान हूं, ना मै शैतान हूं. दुनिया जो चाहे समझे, मै तो बस इन्सान हूं." नोकरशाही तशीच आहे - थोडी चांगली, पण जरा जास्त वाईट.

**४. पिवळी हॅट काय म्हणते?**

पंडित नेहरूंच्या अगदी विरुद्ध मत सरदार पटेलांचे होते. त्यांना ब्यूरॉक्रसी ही भारताच्या राज्यकारभारासाठी व विकास प्रशासनासाठी आवश्यक वाटत होती. १० ऑक्टोबर १९४९ रोजी कॉन्स्टिट्यूअंट असेंब्लीमध्ये भाषण करताना अनंतशयनम् अय्यंगार यांची नोकरशहांबद्दलची अशोभनीय टीका चुकीची आहे असे सांगत फाळणीनंतर निर्वासितांचे पुनर्वसन व कायदा - सुव्यवस्था राखण्याचे अवघड काम पूर्ण कार्यक्षमतेने तत्कालीन आय. सी. एस. अधिकाऱ्यांनी केल्याचे सांगून, देशाचा कारभार सुरळीत चालवण्यासाठी व देशाची एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी अखिल भारतीय सेवेची

आवश्यकता स्पष्टपणे बोलून दाखवली. त्यांच्या भाषणातला हा उतारा अत्यंत बोलता आहे -

'Even now, if you are not willing to keep them (I.C.S. and other Central services), find out your substitute and many of them will go; the best of them will go. I wish, to assure you that I have worked with them during the difficult period (of partition and communal riots) - I am speaking with a sense of heavy responsibility - and I must confess that in point of patriotism, in point of loyalty, in point of sincerity and in point of ability, you cannot have a substitute. They are as good as ourselves, and to speak of them in disparaging terms in this house, and to criticize them in the manner, is doing disservice to yourselves and to this country. This is (my) considered opinion.'

पिवळ्या हॅटचा ऊर हे वाचताना भरून येतो व तिला नोकरशहांचा अभिमान वाटतो, कारण लोकशाही व्यवस्थेत राज्यकर्ते बदलत असतात, धोरणे बदलत असतात. आज तर देशात व राज्यात आघाड्यांचे सरकार आहे. अशा वेळी देशकारभाराचा गाडा कमी-अधिक प्रमाणात का होईना सुरळित चालू आहे, त्याचे श्रेय ब्यूरॉक्रसीला दिले पाहिजे. नोकरशाहीची ही उजळ बाजूही नागरिकांनी लक्षात घेतली पाहिजे. देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हेही अर्थमंत्री होण्यापूर्वी बराच काळ वरिष्ठ दर्जाचे प्रशासक म्हणून कार्यरत होते, हे विसरून चालणार नाही. तसेच यशवंत सिन्हा व अजित जोगी हेही पूर्वाश्रमीचे आय.ए.एस. अधिकारीच होते. सध्याच्या लोकसभेच्या सभापती मीराकुमार यांनी दहा वर्षे भारतीय परराष्ट्र सेवेत घालवली आहेत. या उदाहरणांवरून हे सिद्ध नाही का होत, की अधिकाऱ्यांनी देशाच्या प्रगतीत आपला वाटा योग्य रीतीने उचलला आहे?

पिवळ्या हॅटला तेव्हा आणखी एक मोठा दिलासा मिळाला, जेव्हा भारताच्या तरुण पिढीचे 'आयकॉन' इन्फोसिसचे नारायण मूर्ती यांनी एका लेखात आय. ए. एस बद्दल प्रशंसनीय उद्‌गार काढले. त्या लेखातले नारायण मूर्तींचे हे मत पाहा -

"The character of the All India Services has changed in my lifetime, and in my view, the new entrants are far more representative of the aspirations of the 'inclusive growth' view. Bright and hard working. yet from families that know the meaning of hardship, these are the youngsters most likely to be able to administer from the heart, not just from the books. I have also seen a complete social

transformation in the composition of the services, a transformation, though painful, which has brought up people much more representative of diverstities in our society.'

भारतीय नोकरशाहीने या साठ वर्षांत भारताच्या प्रगतीमध्ये भरीव योगदान दिले आहे. ती अकार्यक्षम असती तर आजची ही प्रगती झालीच नसती, कारण 'डिलिव्हरी सिस्टिम' ही ब्यूरॉक्रसीच आहे. एकच उदाहरण यासाठी पुरेसे आहे - कर्नाटकमध्ये कुणालाही कोणत्याही गावचा सातबारा कुठूनही 'भूमी' योजनेअंतर्गत संगणकावर तत्काळ मिळू शकतो. त्याचे श्रेय चावला नामक एका आय.ए.एस. ऑफिसरचे आहे.

**५. हिरवी हॅट काय सांगते?**

देश, राज्य, जिल्हा व ग्राम प्रशासन हे मानवाच्या प्रगती व विकासासाठी करायचे असते, याचे भान ठेवीत काम करताना प्रशासनात 'क्रिएटिव्हिटी'ला भरपूर वाव आहे. अनेक प्रशासकांनी 'आऊट ऑफ बॉक्स' विचार करीत अनेक उपक्रम यशस्वी केले आहेत. १९८० च्या दशकात साताऱ्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी व्ही. पी. राजा व नगरचे जिल्हाधिकारी अनिलकुमार लखिना यांनी अडगळीत पडलेला 'अँडरसन मॅन्युअल' बाहेर काढला आणि कार्यालयाची पुनर्रचना केली, त्यामुळे प्रशासनात गतिमानता आली. टी. एन. शेषन यांनी 'आचारसंहिता' निर्माण करून निवडणूक प्रक्रिया बरीचशी शुद्ध व नियंत्रित करायचा प्रयत्न केला. मी स्वत: अकोल्यास आयुक्त असताना बीओटी तत्त्वावर सिटी बस सेवा - तीही मनपाला एक पैशाचा तोटा होणार नाही अशा पद्धतीने - सुरू केली. प्रशासकांना बरेच अधिकार असतात व चौकटीच्या आत बरीच लवचीकता असते. ती जाणून खूप काही घडविता येते!

पण हिरव्या हॅटला याचे दु:ख आहे की, अनेक प्रशासक अशी क्रिएटिव्हिटी दाखवत नाहीत, जोपासत नाहीत. त्यामुळे त्यांना याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

सार्वजनिक धोरण (public policy) हे राज्यकर्ते आखतात, त्या आखणीत वरिष्ठ प्रशासक भरीव योगदान देतात, पण कधी नाव होत नाही. महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पात 'मानवी विकास निर्देशांका'वर भर दिला आहे, त्यासाठी अनेक धोरणे आखली आहेत. त्यात अर्थमंत्र्यांची दूरदृष्टी व 'व्हिजन' असले तरी धोरणे आखताना अनेक सचिवांनी मदत केली आहे. ही प्रशासनातली अत्युच्च दर्जाची क्रिएटिव्हिटी - सृजनशीलता - आहे.

किरण बेदींचे उदाहरण देऊन हिरव्या हॅटला प्रशासनाबद्दल काय वाटते हे स्पष्ट करता येईल. जेव्हा त्यांना तिहार जेलचा कार्यभार दिला, तेव्हा साऱ्यांना वाटले की, शासनाने त्यांना कुजवले. पण किरण बेदींनी याही संधीचे सोने केले. तुरुंग प्रशासनात

भरीव बदल घडवून आणले, कैद्यांना सकारात्मकता शिकवण्यासाठी नानाविध उपाययोजना केल्या. उदा. योगाचे वर्ग, अभ्यास केंद्र आणि कारागीर प्रशिक्षण. त्यांना त्यामुळे मॅगसेसे पुरस्कार मिळाला. आज देशभरात तुरुंग प्रशासनात बरेच बदल झाले आहेत, त्याचे मोठे श्रेय किरण बेदी यांना दिले पाहिजे.

## ६. निळी हॅट काय सांगते?

स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांत भारतीय प्रशासनाच्या वाटचालीकडे पाच भिन्न हॅटस् घालून, त्यावर आपण क्ष-किरण टाकले आहेत. आता सहावी हॅट घालून पाहायचे आहे. प्रत्येक हॅट ही आपापल्या परीने खरी व बरीचशी वस्तुनिष्ठ आहे.

येथे मला 'राशोमन' या सिनेमाची आठवण येते. त्यात एकच घटना भिन्न भिन्न माणसांच्या कथनातून दाखवली आहे. तसेच या पाच हॅटस्च्या दृष्टिकोनाचे आहे. निळी हॅट घालून बघताना प्रत्येक हॅटचा दृष्टिकोन व त्यातली वास्तवता - तथ्यांश समजून घेऊन, त्यातून एकसंध चित्र निर्माण करायचे आहे. ते खरेच कठीण काम आहे. कारण पुन्हा येथे प्रत्येकाच्या विचारात या पाच हॅटस् डोकावतील आणि पुन्हा 'राशोमन' होईल.

निळी हॅट घालून ब्यूरॉक्रसी नेमकी कशी आहे, या साठ वर्षांत तिने काय योगदान भारतीय विकास प्रक्रियेत दिले, तिचे एकविसाव्या शतकात काय स्थान आहे, तिची उपयुक्तता उदारीकरणामुळे कमी झाली किंवा संपुष्टात आली आहे काय, यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. ते काम मी वाचकांवर सोडून देऊ इच्छितो. कारण मी एक प्रशासक आहे, त्यामुळे कदाचित वस्तुनिष्ठपणे निळी हॅट घालून पाच हॅटस्च्या दृष्टिकोनातून एकसंध व वास्तव चित्र निर्माण करू शकणार नाही.

वाचकहो, तुम्ही आता निळी हॅट घाला आणि तपासा भारतीय प्रशासन व्यवस्था.

०-०-०-

# ७. भारतीय प्रशासनाचे बदलते रूप!

पूनम मलिक आणि मोनिका दहिया. दोघींचे छायाचित्र पाहिले तर त्या टिपिकल हरियानवी बहू वाटतात. जाट प्रदेशाच्या असल्यामुळे त्यांचा डोक्यावरचा पदर ढळत नाही. दोघीही मोठ्या परंपरागत घरात वावरतात. विवाहित आणि सरंजामशाही व सगोत्र विवाहाची बंदी असलेल्या खाप जमातीच्या वर्गातल्या त्या आहेत.

पण आज दोघीही प्रकाशझोतात आहेत, कारण दोघीही २०१० च्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत, लवकरच त्या मसुरीला प्रशिक्षणासाठी जातील.

पूनम मलिक ही सोनपतची. सरकारी शाळेत शिकलेली आणि दूरशिक्षणाद्वारे एम. कॉम. झालेली. लग्नापूर्वीपासूनची तिची आय.ए.एस. व्हायची इच्छा. लग्नानंतर घरसंसार व हरियानवी कुटुंबमर्यादा सांभाळून तिसऱ्या प्रयत्नात ती यशस्वी झाली.

मोनिका दहियाच्या इच्छेसाठी सोनपतहून तिचा नवरा तिच्यासह दिल्लीत आला. ती चौथ्या प्रयत्नात उत्तीर्ण झाली, पण हा चार वर्षांचा प्रवास जिद्द व स्वप्रासह तिनं संघर्ष करीत पार केला आणि यशश्री खेचून आणली.

हे दुसरे एका शिपायाच्या मुलीचे - संदीप कौरचे उदाहरण घ्या. पंजाब राज्यामधील मोरिंडासारख्या मागास भागातून आलेली संदीप कौर. टीव्ही सीरियल 'उडान' पाहून (किरण बेदीच्या जीवनावरून प्रेरित झालेली दूरदर्शनची ही एक क्लासिक मालिका होती.) तिनेही आय.पी.एस. व्हायचे ठरवले आणि आज ती अखिल भारतीय रँकिंगमध्ये १३८ वी आली आहे व तिला तिच्या मनासारखा आय.पी.एस. विभाग मिळणार आहे. अनुसूचित जातीची व मागास भागातील एका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याची कन्या. तिला वडिलांनी कर्ज काढून शिकवले व तिनेही त्याचे चीज केले!

आता आपण आपल्या महाराष्ट्राकडे वळू या. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरीमधील शेळेवाडीचा कृष्णात पाटील हा कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगाही यु.पी.एस.सी.मध्ये उत्तीर्ण झालाय. महाबळेश्वरची राजलक्ष्मी कदम हे असेच लखलखते

उदाहरण. दुर्दम्य जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर तिनेही ही अवघड परीक्षा सर केली. नूल, ता. गडहिंग्लजची स्मिता पाटील घ्या किंवा शाहूवाडीमधील तुरुकवाडीचा श्रीधर पाटील घ्या. ग्रामीण परिसरातील बहुजन वर्गातील या साऱ्या मुलामुलींनी मोठे स्वप्न पाहिले आणि ते साकारले जिद्द, परिश्रम आणि आशावादाच्या बळावर. २०१० च्या यु.पी.एस.सी.मध्ये हे सारे उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्वांवर कळस चढवला आहे तो डॉ. फैजल शहा या कूपवाडा (काश्मीर) या दहशतवादाच्या छायेखाली सतत वावरणाऱ्या जिल्ह्यातील लौलब गावच्या तरुणाने. तो देशभरात प्रथम आला आहे व तोही पहिल्याच प्रयत्नात. अशान्त काश्मीर खोऱ्यात एक आशेचा किरण त्याने हजारो काश्मिरी तरुणांना दाखवला आहे. त्याची कहाणी ही नक्कीच देशभरच्या तरुणांसाठी त्याला 'आयकॉन' बनवणारी आहे. त्याचे वडील साधे शाळामास्तर. ते काही वर्षांपूर्वी दहशतवाद्यांच्या गोळीला बळी पडले. छोट्या फैजलसाठी हा मोठा आघात होता, पण त्याच्या आईने - मुबेना बेगमने न डगमगता खंबीरपणे संसार सावरला. मुलाबाळांसह ती श्रीनगरला येऊन राहिली. फैजल प्रथम एम.बी.बी.एस. डॉक्टर बनला व या वर्षी भारतात प्रथम क्रमांकाने पास होऊन आय.ए.एस. झाला.

वाचकहो, हा भारतीय प्रशासनाच्या बदलत्या स्वरूपाचा ताजा कलम आहे. बहुजन समाजातील, ज्यांना आपण ओ.बी.सी. म्हणू, त्या संवर्गातील तरुण-तरुणींचे प्रमाण भारतीय लोकसेवेत वाढत आहे, तसेच दलित समाजाचेही. एकेकाळी उच्चवर्णीयांची मिरासदारी असलेल्या भारतीय प्रशासन सेवेचा तोंडवळा सर्वार्थाने बदलत चालला आहे. अगदी मंत्रालयाचे उदाहरण पाहिले तरी पन्नास-साठच्या दशकात मंत्रालयीन कक्षअधिकारी, अवर सचिव यांसारखी सारी पदे कोकणातील उच्चवर्गीयांची असायची. आज मंत्रालयात खऱ्या अर्थाने महाराष्ट्र त्याच्या पूर्ण जातीय-वर्णीय समीकरणासह दृश्य स्वरूपात दिसून येतो. कोल्हापूर जिल्ह्यातले सहा डेस्क ऑफिसर - कक्षअधिकारी - 'यशदा'च्या प्रशिक्षणानंतर क्षेत्रीय अनुभवासाठी सध्या दीड महिना कोल्हापुरात आले आहेत. त्यांच्याशी झालेल्या चर्चेत हेच जाणवले की भारतीय प्रशासन, मग ते तहसीलदार - गटविकास अधिकारी व पोलीस निरीक्षक - उपअधीक्षकांचे वा मंत्रालयीन संवर्गाचे असो, अथवा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विभागांचे असो, फार मोठ्या प्रमाणात बदलले आहे. त्याचा तोंडवळा व अंतरंग दोन्हीही आता खऱ्या अर्थाने भारतीय - ग्रामीण, ओ.बी.सी., दलित आणि निमशहरी - शहरी असं बहुजिनसी झाले आहे. तेल्हारा, जिल्हा अकोला मधील एका छोट्या गावचा, बालपणी रोजगार हमीचे काम केलेला दलित समाजाचा एक तरुण जे.पी.डांगे - हे आज महाराष्ट्राचे मुख्य सचिव आहेत; त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दलित व बहुजन समाजाने - वर्णव्यवस्थेने व शैक्षणिक संधीच्या असमानतेने, शिक्षण व प्रतिष्ठा नाकारलेल्या गेलेल्या समाजानं

हार न मानता बुद्धिमत्ता, कठोर परिश्रम व असीम ध्येयवादाच्या जोरावर प्रशासनातील मोठी पदे केवळ गुणवत्तेच्या आणि अर्थातच आरक्षणाच्या बळावर पादाक्रांत करायला सुरुवात केली. त्याला मोठी गती मिळाली ती एकोणीसशे नव्वदच्या दशकापासून.

नव्वदचे दशक हे मंडल कमिशनच्या शिफारसी लागू करून ओबीसींना आरक्षण दिल्याचे व आर्थिक उदारीकरणाचे होते. त्यामुळे प्रशासकीय सेवेच्या संदर्भात दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे ओबीसींचा प्रशासनातला टक्का वाढत गेला. आर्थिक उदारीकरणामुळे उच्चवर्णीय तरुण वर्ग आय.टी. व एम.एन.सी.कडे वळला, परदेशी चालता होऊ लागला. (अर्थात तो आता परततोय व पुन्हा नव्या उमेदीने प्रशासकीय सेवेकडे एक आव्हान समजून येतोय.) यामुळे भारतीय प्रशासनाचा चेहरा व अंतरंग दोन्ही बदलायला सुरुवात झाली. आजही आय.ए.एस. व आय.पी.एस.चे आकर्षण मानाचे व प्रतिष्ठेचे पद मिळणाऱ्या सुविधा आणि 'जॉब सिक्युरिटी'मुळे नक्कीच आहे. पण त्याचबरोबर देश व समाज घडविण्याचे आव्हान (Challenge of Nation and Society Building) आणि आपल्या मागच्या पिढीची व समाजाची उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून जी अडवणूक व छळ, त्रास झाला, तो कमी व्हावा; त्या वंचित, उपेक्षित व पददलित समाजाचे आपण जे देणे लागतो ते त्यांच्यासाठी प्रो-ॲक्टिव्हली काम करून फेडावे व समाज सुधारावा म्हणून हे नवे अधिकारी प्रेरित होऊन प्रशासनात आले आहेत, येत आहेत. त्यामुळे प्रशासकीय अंमलबजावणी केंद्रबिंदू हा उपेक्षित समाजाच्या कल्याणाकडे सरकला तर नवल नाही.

शेळेवाडी, तालुका राधानगरी, जिल्हा कोल्हापूरचा कृष्णात शामराव पाटील याचा युपीएससीचा निकाल जाहीर होताच गावाने त्याचे जंगी स्वागत केले. तेव्हा ते मनापासून म्हणाला, ''मी जे केलं ते आईच्या कष्टातून. आम्हाला घरची थोडी आणि आजोळाकडून मिळालेली थोडी जमीन, पण आजोळच्या जमिनीतून निर्माण झालेल्या वादाने अनेक मार्ग दाखवले. न्यायालयात आईने घातलेले खेटे, तहसीलदारांच्या मनधरण्या, वकिलांच्या घराचा रस्ता हे पाहता मीही मोठा सनदी अधिकार होणार आणि ग्रामीण जनतेचा आवाज होणार हे पक्के ठरवले होते. परिस्थितीशी दोन हात करीत मी वाढलो. आज ग्रामीण भागातील अनेकांना उच्च पदावर जायचं आहे, पण मार्ग दिसत नाही. त्यांचा मी वाटाड्या होणार आहे.''

मी ग्रामीण जनतेचा आवाज (आणि आधारही) होणार या कृष्णात पाटीलच्या भावनेत बदलणाऱ्या भारतीय प्रशासनाचे भविष्य दडले आहे. आज सामान्य नागरिकांचा शेती, सिंचन, शासकीय कार्यालयातील विविध कामे व नागरी परवाने, कर यासाठी तलाठी ते जिल्हाधिकारी, ग्रामसेवक ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि स्वच्छता / कर निरीक्षक यांसारखे कर्मचारी ते मनपा आयुक्त अशा विविध शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी नित्य संबंध येतो, तेथे नागरिकांना भ्रष्टाचार,

दप्तर दिरंगाई आणि हडेलहप्पी यांच्याशी सामना करावा लागतो. अशा पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा कृष्णात पाटील, शिपायाची कन्या संदीप कौर किंवा हरियानवी बहू पूनम आणि मालिका, दहशतवादामुळे विकास कुंठित झालेल्या ग्रामीण काश्मीरमधील फैजल शहा यांसारखे युवक - युवती जेव्हा प्रशासकीय सेवेत येतील तेव्हा नक्कीच गुणात्मक फरक पडेल. या सर्वांना ग्रामीण भारताच्या समस्या, प्रश्न आणि प्रशासनातील अडवणूक चांगली माहीत आहे, त्यामुळे त्यांच्यापुढे कामासाठी गरीब ग्रामीण स्त्री-पुरुष येतील, तेव्हा त्यांचे प्रश्न, समस्या आणि त्यांचा आवाका उच्चवर्णीय शहरी अधिकाऱ्यांपेक्षा अधिक चांगल्या रीतीने व सहअनुभूतीने समजेल व जाणवेल आणि ते नागरिकांचे कामे तत्परतेने व भ्रष्टाचार न होता करतील, अशी आशा करायला हरकत नाही.

वाचकहो, मागील काही अध्यायात आपण अमेरिका व ब्रिटनच्या प्रशासकीय सेवा व सुधारणांचा परामर्श घेतला. या आजच्या अध्यायापासून भारतीय प्रशासनसेवेत घडत आलेल्या सुधारणांचा वेध आपण घेणार आहोत. त्याची सुरुवात प्रशासनाच्या बदलत्या चेहऱ्याने केली आहे. त्यासाठी २०१० च्या निकालाचे व फैजल शहा, कृष्णात पाटील, संदीप कौर आणि हरियानवी बहू पूनम मलिक व मोनिका दहियाचे निमित्त झाले आहे.

आपण थोडं कल्पनारंजन करू या.

काही वर्षांनी कलेक्टर झालेल्या हरियानाच्या पूनम मलिकच्या जिल्ह्यात खाप पंचायतीच्या ऑनर किलिंगचा प्रश्न येईल व सगोत्र विवाह करणाऱ्या जोडप्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाईल तेव्हा पूनम किती खंबीरपणे त्याविरुद्ध कार्यवाही करेल? त्याहीपेक्षा, करू शकेल का? ज्या वातावरणात राहून तिने आपले स्वप्न व आशावाद जपला आणि आय. ए. एस. चे ध्येय साध्य केले, त्यावरून ती इतरांपेक्षा अधिक खंबीरपणे व त्याचवेळी संवेदनशीलपणे हा प्रश्न हाताळू शकेल नाही का?

डॉ. फैजल शहाला उद्या जर काश्मीर केडर मिळाले तर तो जिल्हा दंडाधिकारी म्हणून, आयुक्त, सचिव म्हणून दहशतवादाचा प्रश्न कसा हाताळेल? आऊट ऑफ बॉक्स विचार करून काही नव्या मार्गाने विकास करीत दहशतवादी हत्यार तो बोथट करू शकेल? मला स्वतःला वाटते, का नाही? कृष्णात शामराव पाटलाने त्याला मिळालेल्या जमिनीच्या वादावरून तहसील कचेरी व न्ययालयाचे खेटे बालपणी घातले आहेत. त्यामुळे उद्या तो कलेक्टर म्हणून तलाठी व महसूल प्रशासनाने गरिबांना त्रास न देता त्यांची कामे करावीत म्हणून काही नवी योजना नाही का आणू शकणार?

हरियाणा-पंजाबमध्ये स्त्री-भ्रूण हत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. उद्या कलेक्टर झालेली मोनिका दहिया, पी. सी. पी. पी. एन. डी. टी. या भ्रूणहत्येला प्रतिबंध

करणाऱ्या कायद्याचं पालन करण्याची जबाबदारी असताना कशी वागेल? तिने राज्यात व सोनपतला जे वातावरण पाहिले आहे, स्त्री आहे म्हणून गर्भपात झालेले पाहिले आहेत, अशी मोनिका त्याच्या प्रतिबंधासाठी काही उपाययोजना करणार नाही का?

या सर्वांकडून मला आशा वाटते. त्यांच्या माध्यमातून देशापुढील व प्रशासनापुढील प्रश्नांचे निराकरण होण्यास नक्कीच सक्रिय व मोठा हातभार लागेल.

मी या तरुणांकडून फार मोठी अपेक्षा तर करीत नाही ना? नक्कीच नाही. मी काही उदाहरणे पाहिली, ऐकली आहेत. आज कोकण महसूल विभागाचे आयुक्त असलेले एस. एस. संधू महिला व अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत किती दक्ष असतात हे मी स्वत: त्यांच्याबरोबर काम करताना अनुभवले आहे. दोन वर्षांपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद म्हणून धुळ्याला काम करताना शैला ए. यांनी शिक्षणातील गुणवत्तेसाठी मनापासून काम केल्याचे मला माहीत आहे. हे दोन्ही अधिकारी ग्रामीण भारतातले - एक पंजाबचे तर दुसरी केरळची. त्यांची नाळ ग्रामीण प्रश्नांशी सहजतेने जुळून येते.

फार दूर कशाला, महाराष्ट्राच्या असंख्य अधिकाऱ्यांनी ज्यांच्यापासून स्फूर्ती घेत प्रशासनाची वाट चोखाळली, ते सध्याचे मालदीवचे उच्चायुक्त व भारतीय विदेश सेवेतील ज्येष्ठ सनदी अधिकारी ज्ञानेश्वर मुळे हे अब्दुललाट (जिल्हा कोल्हापूर) या छोट्या गावचे, गरीब घरातले. त्यांच्या उच्च पदाकडचा रोमहर्षक प्रवास त्यांनी 'आकाश, पंख आणि माती' या आत्मचरित्रात रेखाटला आहे. ते आज मालदीवला जे करीत आहेत त्याला तोड नाही. त्याखेरीज गावासाठी पण ते आत्मीयतेने काम करतात.

संधू, शैला आणि ज्ञानेश्वर मुळे ते तिघेही आपली ग्रामीण भागाची व गरिबीची नाळ विसरलेले नाहीत. त्यांचा जनसेवेचा निर्धार प्रशासकीय सत्ता व संपन्न आयुष्यातही कमी झालेला नाही. मी सुरुवातीला दिलेल्या उदाहरणांतील या वर्षी उत्तीर्ण झालेले व होऊ घातलेले प्रशासकीय अधिकारी पण संधू - शैला - ज्ञानेश्वराचीच वाट चोखाळतील व गरिबांचा आवाज व आधार होतील!

कोणत्याही देशाच्या प्रशासकीय सुधारणेची आद्य अट असते, त्यांची प्रशासन सेवा ही बहुजिनसी किंवा 'ऑल इन्क्लूजिव' सर्वसमावेशक असते. समजा, अमेरिकन प्रशासनात काळे अधिकारी नसतील तर नीग्रोंच्या समस्या कशा सुटतील? भारतातही दलित - ग्रामीण, बहुजन समाजाचे नानाविध प्रश्न व समस्या आहेत. इतर उच्चवर्णीय अधिकारी ते सोडवणार नाहीत असे नाही. पण त्यांच्यातील अधिकारी अधिक सखोलतेने, संवेदनशीलतेने व पोटतिडिकीने ते सोडवू शकतील. झालेल्या व होऊ घातलेल्या प्रशासकीय सुधारणा खऱ्या अर्थाने हे ध्येयप्रेरित व गरिबांचे सच्चे हमदर्द प्रतिनिधी असलेले तरुणच अंमलात आणू शकतील!

वाराणसीचा नारायणप्रसाद जयस्वाल याचाही जीवनप्रवास त्याच्या रिक्षा ओढणाऱ्या

वडिलांच्या प्रवासाएवढाच खडतर. आज तो आय. ए. एस. झाला आहे, त्यामागे एक वैयक्तिक प्रेरणा होती. वडिलांचा पाय जखमी झाला असता वैद्यकीय उपचारासाठी पैसे नसल्यामुळे जखम चिघळत होती. नारायणला आता साऱ्या वैद्यकीय सुविधा विनासायास घरबसल्या कलेक्टर म्हणून मिळतील. आता बापाचे म्हातारपण निवांत, सुखात जाईल. हा उमदा तरुण नियुक्तीने उद्या जेव्हा वैद्यकीय किंवा आरोग्य विभागात सचिव-उपसचिव म्हणून जाईल, तेव्हा तो नक्कीच वैद्यकीय सेवा ही गरिबांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न करील. तसेच वैद्यकीय विम्याच्या योजनांची अधिक उत्परतेने अंमलबजावणी करेल.

आज आर्थिक उदारीकरण आणि शासनाच्या बदलत्या धोरणामुळे पूर्वीची, प्रशासन म्हणजे 'मायबाप' सरकार ही प्रतिमा व भूमिका आमूलाग्र बदलली आहे. माहितीचा अधिकार, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शिक्षणाचा कायदा, भारत निर्माण, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, सर्वशिक्षण अभियान, बचत गटाची चळवळ असे अनेक उपक्रम आम आदमीच्या विकासासाठी सुरू झाले आहेत. त्यांच्या अंमलबजावणीची अंतिम जबाबदारी ही ब्यूरॉक्रसीवर, विशेषतः आय. ए. एस. वर - आहे. एक प्रकारे हे राष्ट्र निर्माणाचे काम आहे - अत्यंत आव्हानदायी व क्षमतेची कसोटी पाहणारे काम आहे. ते स्वीकारण्यासाठी ग्रामीण तरुण जिद्दीने पुढे येत आहेत. प्रसंगी त्यासाठी खाजगी लठ्ठ पगाराची नोकरी लाथाडत आहेत. यंदा चोविसावा आलेला अनुराग तिवारी हा उत्तर प्रदेशचा तरुण म्हणतो, "हा देश खऱ्या अर्थाने आय. ए. एस. मंडळी चालवतात. सिस्टिमच्या कमतरतेबाबत दूर अंतरावरून निष्फल टीका न करता त्यात सामील होऊन ती सुधारणे खरे आव्हानात्मक काम आहे. मी त्यासाठी इन्फोसिसच्या नोकरीवर पाणी सोडले." यंदाच्या परीक्षेत चमकलेली शायनामोल ए. ही यशस्वी तरुणी म्हणते,

"There is a rare charm to this (I.A.S. and allied services) job. There are jobs that pay more, but the satisfaction that one gets from being a part of the system which serves the people is peerless. The opportunity to interact with people and coming face to face with their problem is the primary attraction of the civill services."

सध्या मसुरीत प्रशिक्षण घेत असलेला कृपाशंकर यादव हा आपली ग्रामीण मुळे विसरत नाही. तसेच त्याचा प्रभावही दाखवून देत असतो. प्रशिक्षणात त्याला व इतर हिंदी भाषिकांना हिंदीमध्ये नोटस् मिळाव्यात म्हणून प्रयत्नशील असतो. प्रादेशिक भाषेत पेपर व मुलाखत देऊन येणाऱ्यांचे इंग्रजी सुधारावे म्हणून अशा प्रोबेशनर्ससाठी मसुरीमध्ये इंग्रजी भाषेचे व संभाषणाचे वर्ग सुरू करावेत यासाठीही आवाज उठवतो. तो ॲकॅडमीच्या वरिष्ठ आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या ग्रामीण विकासाच्या आकलनातील

पोकळपणा दाखवून देत म्हणतो, "Sometime I feel they have no idea what people in the village want. In many ways the civil Service is still a relic of the (British) raj."

पण काही वरिष्ठ व सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांच्या मते नागरी सेवेची गुणवत्ता दिवसेंदिवस घसरत आहे. कारण आरक्षणामुळे दुय्यम दर्जाचे अधिकारी सेवेत बहुसंख्येने येत आहोत. अर्थात अशा आक्षेपाकडे फारशा गंभीरपणे पाहण्याची गरज नाही. कारण ही वर्णदर्पयुक्त उच्चवर्णीयांची, अहंकाराला ठेच पोहोचल्यामुळे उमटणारी टिपिकल वैफल्यग्रस्त प्रतिक्रिया आहे. भारत हा केवळ उच्चवर्णीयांचा देश नाही, तर तो अठरापगड जातींचा व बहुधार्मिक, बहुभाषिक व बहुसंस्कृतींचा देश आहे. त्यांचे योग्य प्रतिबिंब प्रशासनात नसेल तर ते नागरिकांना न्याय देऊ शकणार नाही. आज प्रशासनाचे बदलते रूप म्हणूनच स्वागतार्ह आहे, पण एक आक्षेप विचारासाठी प्रवृत्त करणारा आहे. तो म्हणजे भारतीय प्रशासनात मोठा वर्ग हा उत्तर प्रदेश, बिहारचा व हिंदी भाषिकांचा आहे, कारण येथे खाजगी क्षेत्रात चांगल्या नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे, पण आपले परंपरागत जमीनदारी, मध्ययुगीन सरंजामी संस्कार घेऊन येणारे प्रतिगामी प्रकृतीचे हे युवक आहेत. ते मोठ्या प्रमाणावर जातीय, धर्मांध, पुरुषी मनोवृत्तीचे आहेत. ते केवळ सत्ता व पैशाच्या मागे असतात. हे माझे विधान नाही, तर मसुरीच्या लालबहादूर अकादमीमध्ये शिकवणाऱ्या वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यंचे निरीक्षण आहे. ते मला बरचेसे सत्य व चिंतनीय वाटते. यामुळे चांगल्या बदलणाऱ्या भारतीय प्रशासनाला वेगळे अनिष्ट वळण काही प्रमाणात लागणार तर नाही ना? हा खरा चिंतेचा प्रश्न आहे.

पण या नव्या प्रशासकांना सार्थ असा नवा रोल शोधून काढायचा आहे. तो बदलत्या परिस्थितीत क्रमप्राप्त झाला आहे. तो केवळ त्यांचा प्रश्न नाही तर शासनाचा आहे. कारण १९९० नंतर झालेल्या दोन प्रमुख बदलांमुळे हे निश्चित करणे गरजेचे झाले आहे.

हे दोन बदल असे नमूद करता येतील.

1. The irreversibility of reforms and the fact that Government now broadly needs to confine itself to the social sector, leaving rest to the market force.

2. Decentralization of the advent of a strong panchayati Raj System that at local level takes away a lot of responsibilities earlier vested with the bureaucracy.

या प्रशासनातील दोन आमूलाग्र बदलांमुळे प्रशासकांचा 'मायबाप' सरकारचा रोल जवळपास संपुष्टात आला आहे. त्यामुळे 'पांढरी (ॲम्बेसिडर) कार व लाल दिवा'


या प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पनेतून त्यांना बाहेर यावेच लागेल. नव्या शतकातील प्रशासकांचा बदललेला रोल कसा असेल? त्याबाबत यु. पी. एस. सी. चे चेअरमन लेफ्टनंट जनरल (सेवानिवृत्त) सुरिंदर नाथ म्हणतात. "There is realization that at this juncture we need candidates with the necessary intellectual and attitudinal caliber who can be facilitators. disseminators of information and agents of change. The new bureaucrat should be seen as a "Knowledge Manager" - a modern day trouble shooter who can take decisions after consulting every interest group, not autocratically as was being done yesterday."

आज मोठ्या कष्टाने, जिद्दीने व मेहनतीने प्रशासनात आलेल्या व येऊ घातलेल्या बहुजन समाजातील प्रशासकांपुढे सिस्टिम बदलण्याचे ध्येय आहे, कारण त्यांनी त्याचा त्रास भोगला आहे. त्यांना राष्ट्र व समाजउभारणीत योगदान द्यायचं आहे, कारण शासनाच्या ध्येयधोरणाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा ब्यूरॉक्रसी आहे हे त्याना चांगले माहीत आहे, पण आजची गुंतागुंतीची अर्थव्यवस्था, राजकीय अस्थिरता, आघाड्यांचे राजकारण आणि पॉप्युलिस्ट घोषणांमुळे बदलत्या परिस्थितीशी मिळवून घेत कसे काम करायचे हे त्यांना शिकता आले पाहिजे. तसेच वाढते शहरीकरण, तापमानातील बदल व त्याचे दुष्परिणाम, दहशतवाद, हिंसाचार, मोकाट भांडवलशाही आणि शोषणाची बदलती रूपे समजून घेत त्यांचा मुकाबला करण्यासाठी त्यांना नवीन कौशल्ये व मानसिकता आत्मसात करावी लागणार आहेत आणि मुख्य म्हणजे आज शासनाचा सामाजिक क्षेत्रात जो वाढता सहभाग आहे - मग ते शिक्षण असो, आरोग्य सेवा असो वा महिला बालकल्याण, क्रीडा व युवक कल्याण... त्यामुळे खऱ्या अर्थाने मानवी विकास होणार असल्यामुळे तेथे कल्पकता, जिद्द व बांधिलकीच्या भावनेतून काम करण्यात त्यांनी विशेष रस घेतला पाहिजे. दलित, आदिवासी व अल्पसंख्याक तसेच अपंग विभागात / मंत्रालयात काम करण्यासाठी त्यांनी तत्परतेने पुढे आले पाहिजे, तरच आज जातीय / प्रांतीय समीकरणाप्रमाणे बदललेला भारतीय प्रशासनाचा चेहरा अधिक प्रातिनिधिक व देशहिताचा होईल. खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी कारभारासाठी व नागरिकांच्या अपेक्षापूर्तीसाठी नागरी सेवेची यंत्रणा उपयुक्त सिद्ध होईल.

हे आव्हान स्वीकारायचे आहे मोनिका दहिया, पूनम मलिक, संदीप कौर, कृष्णात पाटील, फैजल शहा आदींनी. ते ज्या वर्गातून, ज्या कठोर परिश्रम आणि गुणवत्तेच्या जोरावर इथवर आले आहेत - खचितच ते बदललेल्या प्रशासनाला चांगला चेहरा व मन - सूरत. व सीरत - देऊ शकतील!

०-०-०

# ललित



# १. कलरफुल

जेव्हा जेव्हा मी 'नवरंग' सिनेमाची सप्तरंगाची उधळण करणारी गाणी टी. व्ही वर पाहातो, मला व्ही. शांतारामनी या सिनेमाची त्यांना कशी प्रेरणा मिळाली याची सांगितलेली कहाणी आठवते. 'दो आँखे बारह हाथ' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी बैलाशी झुंज देण्याचा शॉट चित्रित करताना त्यांच्या डोळ्याला इजा होऊन काही काळ अंधत्व आलं होतं व एकच रंग त्यांना कळत होता. अंधाराचा काळाकुट्ट रंग. त्यामुळे त्यांना नव्यानं रंगाचं अप्रूप जाणवत होतं. बरं होऊन पुन्हा दृष्टी येताच त्यांनी रंगांची विलोभनीय उधळण करणारा संगीतमय 'नवरंग' सिनेमा निर्माण केला. तो पहाताना त्यातील गीत-संगीत एवढीच रंगांची नजरेचं पारणं फेडणारी आतशबाजी आजही प्रेक्षकांना स्तिमित करते.

असाच निसर्गाच्या मनोवेधक रंगपंचमीचा अनुभव मला अमेरिकेत असताना सिरॅक्यूस (न्यूयॉर्क) ते नायगरा या सुपरहायवेवरून प्रवास करताना काही वर्षांपूर्वी ऑक्टोबर महिन्यात आला होता. हा तेथला पानगळीचा मोसम. विविध झाडांची पाने रंग बदलत गळून पडतात. हिरवी, लाल, पोपटी, निळी, राखाडी यासारख्या असंख्य रंगछटा हिमर्षावाच्या त्या गोठलेल्या मोसमात धारण करून झाडांना फिल्मी भाषेत सांगायचं झालं तर 'इस्टमनकलर' करतात. मैल न मैल दुतर्फा रंगीबेरंगी पानांची वृक्षसंपदा, भुरभुरणारा कापसासारखा हिमशुभ्र बर्फाचा पाऊस आणि काळे कुळकुळीत पण गुळगुळीत रस्ते... भन्नाट वेगानं पळणाऱ्या मोटारी, आणि आ वासलेली नजर आणि त्यात न सामावणारी ती केवळ अप्रतिम अशी रंगसंगती. ओठावर प्रश्न येतो, ही किमया करणारा 'ये कौन चित्रकार है?'

आपल्या सभोवती सर्वत्र रंगांची एक विलक्षण अशी दुनिया आहे. त्यामुळे मानवी जीवनही किती रंगतदार बनले आहे नाही? पशू, पक्षी, निसर्ग, वृक्ष - वेली, फुले, फळे, भाज्यांचे विविध रंग केवळ नजर तृप्त करीत नाहीत तर मन - मानसही. आणि माणसाने विज्ञानाच्या साहाय्याने रंग, पेंटस निर्माण करून एकेका रंगांच्या असंख्य छटा निर्माण केल्या आहेत. आणि इंटेरिअर डिझाईनमध्ये रंगसंगती ठरवणे

हा महत्त्वाचा घटक बनला आहे. विद्युत प्रकाशातही मानवी प्रज्ञेने रंग भरून विविध रंगांच्या दिव्यांची थक्क करणारी आतषबाजी केली आहे. जेव्हा आपण एखादा कारंजा पाहातो उदा. वृंदावन, पैठण - तिथं रात्री विद्युत प्रकाशात पाण्याचे आकर्षक रूपे धारण करीत उडणारे फव्वारे क्षणाक्षणाला बदलणाऱ्या रंगछटा दाखवतात, तेव्हा नजर थक्क होते व मन प्रमुदित होतं!

नुकताच अनिल अवचटांचा भाजीमंडई वरचा एक रंगीत आर्टपेपरवर मुद्रित केलेला रसभरीत लेख दिवाळी अंकात वाचला. गुलाबी गाजरं, हिरवीकंच कोथींबीर, लाल भोपळा, नारिंगी बीटस्, फ्राय केलेला तांबुस लसूण, कोल्हापूरचा पांढरा - तांबडा रस्सा डोळ्यासमोर नाचू लागले आणि केवळ रसनाच नाही तर पंचेंद्रिये - नजरेसह मनोमन तृप्त झाली. औरंगाबाद पुणे रस्त्यावर 'स्माईल स्टोन' या मोटेलमध्ये विविध खाद्यपदार्थांची रंगीत छायाचित्रे लावली आहेत, तेथील तांबुस भाजलेला डोसा, शुभ्र इडली, किंचित काळसर पिवळ्या रंगाचं सांबार, ब्राऊन फिल्टर कॉफी, सुवर्णरंगी चहाची चित्रे पाहून ते खाद्यपदार्थ खाण्याचा मोह होतो. ही किमया त्या पदार्थांच्या सदाबहार रंगांची आहे.

सकाळ्या तेजोमय सूर्योदय, सायंकाळचा संधिप्रकाश, पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशातलं निळं - सावळं आकाश, धुक्यानं वेढलेली हरित पर्वतराशी, ट्युलिपची टपोरी फुलं, (आठवा : सिलसिला सिनेमातलं गाणं - देखा एक ख्वाब तो...) ग्रीन हाऊस मधली जरबेरा व गुलाबांच्या असंख्य रंगछटेची फुलं, श्रावणात ऊन - पावसाच्या बाललीलासम खेळात फुलून आलेलं इंद्रधनुष्य, शुक्राची चांदणी, नायगाराचा फेनिल शुभ्रप्रपात... किती किती रंगछटा आठवाव्यात?

झालंच तर जी. ए. कुलकर्णींच्या कथा संग्रहातून जाणवणाऱ्या व मनमानसात घर करणाऱ्या रंगछटा : हिरवे रानवे, निळा सावळा, सांजशकुन इ. इ.; महानोरांच्या गीतातला कुसुंबी, ओला हिरवा रंग; साहिरच्या 'पर्वतों के पेडो पर' या गीतातला 'सुरमई उजाला' व' चंपई अंधेरा'; मंगेश पाडगांवकरांच्या 'श्रावणात घन निळा बरसला' मधील हळदीचे ऊन सारख्या रंगप्रतिमामधून हे सर्व भाषाप्रभू जो शब्दांचा रंगमहाल उभा करतात तो शांतपणे ऐकावा. त्यातील एक एक रंगप्रतिमा नजरेसमोर आणीत, चित्तामध्ये ठसवीत तिचा आस्वाद घ्या... वाहवा! क्या बात है... जीवन कसं गुलजार होऊन जातं!

मानवी रूपसौंदर्याला पण रंगांचं लोभस अस्तर असतंच. निळा सावळा कृष्ण, सस्यशामला द्रौपदी, तांबुस गोळ्या रंगांच्या युरोपियन ललना, ग. दि. मां. ची 'पावसाळी मेघापरी' सावळा रंग असणारी प्रिया, राजकपूरचे हसू आसूचे मिश्रण असणारे निळे डोळे, राखीचे कोल समुद्रासारखे घारे नेत्र, मीनाकुमारीचे नावाप्रमाणे असणारे काळेशार मीनाक्षी चक्षू, जयाप्रदाच्या सौंदर्याला दृष्ट लागू नये म्हणून

उगवलेला ओठाखालचा काळा ब्युटी स्पॉट उर्फ चामखीळ, स्मिता पाटीलचे भावसंपन्न काळे डोळे व सतेज सावळी कांती, प्युअर ब्लॅक डायमंड म्हणता येतील अशा टेनिस सम्राज्ञी व्हीनस भगिनी, सोनेरी केसांची ब्लाँड स्टेफी ग्राफ, हृतिक रोशनची दाढी केल्यावर दिसणारी गालावरची हिरवट त्वचा, माधुरी दीक्षितचा संगमरवरी गौरवर्ण ... साऱ्या रंगप्रतिमा सौंदर्याच्या - काही मंद, काही झगमगत्या. पण प्रत्येकाचे सौंदर्य वेगळे!

मानवी पोशाखाचं सौंदर्यही रंगासह नजरेत येतं. निळी गर्द रेशमी पैठणी, हिरवी काचोळी, 'चांदनी' फेम शुभ्रसतेज सलवार सूट, माधुरीचा 'हम आपके हे कौन' मधला हिरवा घागरा, यश चोप्राच्या सिनेमातल्या रूपसुंदर नायिकांच्या विविधरंगी शिफॉनच्या साड्या, पुरुषांची रफटफ जीन पँट, राजेंद्र कुमारची काळीगर्द शेरवानी, देवानंदच्या विविधरंगी टोप्या व स्कार्फ, ऋषी कपूरचे मस्त रंगीबेरंगी स्वेटर्स, निळू फुलेंचं स्टार्च केलेलं कडक पांढरं धोतर, 'तुघलक' मधील देखण्या अरुण सरनाईकच्या उघड्या मर्दानी देहावरील निकर, सचिन तेंडुलकराचा सेंचुरी मारल्यानंतर घामाने भिजलेला निळा टी शर्ट, ओशोंची पायघोळ भगवी कफनी, इंदिरा गांधीच्या गर्भश्रीमंत, केवळ त्यांनाच शोभतील अशा साड्या, रेखाचा 'उमराव जान' मधील घागरा, भगतसिंग राजगुरूंचा बसंती चोला, पी. चिदंबरम, अँटनीची शुभ्र लुंगी, अशोककुमार - रेहमानचा गर्द निळा गाऊन, प्रियांका चोप्राची 'दोस्ताना' मधली सुवर्ण रंगाची बिकिनी', 'जंजीर' मधला प्राणचा भडका तांबडा पठाणी ड्रेस... कितीतरी सौंदर्यप्रतिमा आठवतात. काहीचं सौंदर्य मादक, काहीचं भारदस्त घरंदाज, कुणाचं पुरुषी - मर्दानी तर कुणाचं घायाळ करणारं - तेही साजेशा रंगानं शतपटीनं खुलणारं!

खरंच, रंगांची भुलावण काही अजब आहे. रंग हा मानवी जीवनावर प्रभाव टाकणारा एक घटक आहे. माझी स्वतःची रंगाबद्दलची खास मतं, निरीक्षणं आहेत, ती येथे नोंदतो.

माझा सर्वात आवडता रंग आहे निळा. सागराची गहराई व आकाशाची अनंतता दाखवणारा व श्रीकृष्णाची कांती असलेला. तो अथांग शांततेचं मला प्रतीक वाटतो. हिरव्या रंगाच्या सर्व छटा मला लोभस वाटतात. कारण हा सृजनाचं, तारुण्याचं आणि नवनिर्माणाचं प्रतीक आहे. पेरल्यावर जे उगवतं ते हिरव्या रंगाचं रूप घेऊन येतं. काळी जमीन व बोडका डोंगर हिरव्या शालीनं पाऊस पडताच निसर्ग शृंगारतो. पिवळा व सुवर्ण रंग हा उत्साह व उन्माद, आवेग प्रगट करतो. तो जीवनात नसेल तर काय राम? तांबडा रंग हा लालसा व उग्र-मंगलतेचं भीषण सौंदर्य दाखवतो. त्यातली गुलाबी छटा प्रेम प्रकट करणारी म्हणून प्रिय! बालकांचे गोबरे गाल व तरुणींच्या ओठावरचे गुलाबपुष्प सारखेच लाघवी व मोहक आणि पांढरा रंग हा तर अभिजात सौंदर्य. असीम पावित्र्याचा रंग. सारे रंग या रंगात विलीन होणारे म्हणून हा सर्वश्रेष्ठ.

पांढऱ्या रंगाचं सौंदर्य, नजाकत व मन भारून टाकणारा देखणेपणा तुम्हाला मी कसा सांगू? 'चांदणी' मधील श्रीदेवीची शुभ्र शिफॉन साडी व तसाच स्लीवलेस ब्लाऊज किंवा पांढरा सलवार सूट पहा. यश चोप्रांनी तिचं अवखळ, बालसुलभ, संगमोत्सुक आणि समर्पणशील सौंदर्य शुभ्र वस्त्रात असं काही कॅमेऱ्याच्या साहाय्यानं खुलवलं आहे की, तो सिनेमा पहाणं हे परम नेत्र सुख आहे. दुसरं उदाहरण 'मदर इंडिया' नर्गिस दत्तचं, तिनं सिनेमा सोडल्यानंतर ती फक्त शुभ्र साड्या नेसायची व अत्यंत डिग्निटीनं वावरायची. जणू जिवंत मदर इंडिया.

आणि 'अशोक चक्रांकिता ध्वजा ही राष्ट्राची देवता.' असं ज्या तिरंग्याचं ग. दि. मां. नी वर्णन केलंय, त्या राष्ट्रध्वजाचा निळ्या अशोक स्तंभाभोवती मधला शुभ्र रंगाचा पट्टा. तो तुम्ही रवींद्रनाथ टागोर किंवा महात्मा गांधीच्या नजरेनं पाहा. त्यात तुम्हाला या महान भारत देशाचं पवित्र शुभ्र धवल दर्शन घडेल. 'जे जे उत्तम उदात्त उन्नत - महन्मधुर' आहे ते सारं या तिरंग्याच्या पांढऱ्या रंगात आहे. तीच भारताची खरी व अक्षय ओळख आहे. त्या तिरंग्याच्या चरणी शुभ्र कोमल पारिजातकाचीच फुलं अर्पण करून माझं रंगायन संपवतो!

o-o-o

# २. मैं जिंदगी का साथ निभाता चला गया

हर हंसी चीज का मैं तलबगार हूँ
रसका, फूलोंका, गीतोंका मैं बीमार हूँ

अमिताभ बच्चनच्या कारकिर्दीमधला एक मैलाचा दगड असलेला पण विस्मरणात गेलेल्या 'सौदागर' चित्रपटातलं हे रवींद्र जैन यांचं गीत मला आजही लक्षात आहे. कारण ते जीवनातील प्रत्येक सुंदर गोष्टीवर प्रेम करणाऱ्या रोमँटिक शायरचं मनोगत आहे. जो जीवनावर समरसून प्रेम करतो व जीवनाचं ध्येयच मुळी आनंदाचा शोध व आस्वाद आहे. अशा सर्वच जीवनवादी लोकांचं यापेक्षा वेगळं जगण्याचं तत्त्वज्ञान असू शकत नाही. माझंही असंच काहीसं जगण्याचं तत्त्वज्ञान आहे. मी माझ्या जीवनविषयक कल्पना, आस्था, अपेक्षा याबाबत सांगणार आहे. मी त्याला माझ्या जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणणार नाही, पण त्या स्तरावर पोहोचणारे माझे विचार मांडणार आहे. त्यासाठी हे गीत माझ्या जीवनविषयक दृष्टिकोनाचं एक प्रतीक वाटतं, म्हणून त्यापासून सुरुवात करतो.

होय. मी मूलत: रोमँटिक, सौंदर्यवादी आहे. माणसाला मिळालेलं जीवन हे आनंदासाठी आहे, इतरांच्या आनंदात विघ्न न आणता मनमुरादपणे जीवनाचा आनंद लुटावा, हे माझे एका अर्थाने तत्त्वज्ञान. 'खाना पीना मजा करना' या भौतिक सुखाच्या पलीकडे सुसंस्कृत व उच्चतर जाणीव असणाऱ्या सजग मनाच्या आनंदाच्या कल्पना वेगळ्या असतात. माझ्याशी अशा उच्चतर आनंदाच्या काही खास कल्पना आहेत. त्यामध्ये प्रथमत: निसर्ग, माणूस व वनसंपदा येतात. हे तर नितांत रमणीय विषय. सदा आनंद देणारे. त्याचा कधीही कंटाळा येणार नाही. पण माणसाला मन, मेंदू, विचार हास्य आणि अश्रू या पाच अनमोल देणग्या लाभल्यामुळे त्याच्या जोरावर माणसानं स्वर निर्मिले, संगीत रचले, शब्द विकसित केले व त्यातून साहित्य आले. इतर ललित कला आल्या. खोट्या व कृत्रिम असल्या तरी मानवी जीवनाचं कलात्मक दर्शन घडविणाऱ्या नाटक व सिनेमा या कला आल्या. हे सारे आपल्या आनंदाचे, उपभोगाचे विषय आहेत.

माझ्या या लेखमालेला तशी विषयाची सीमारेषा नव्हती. पण कलेच्या अंगानं

मानवी जीवनातला आनंद, करुणा आणि सहानुभूती या उच्चतर भावना आणि नैतिकतेच्या प्रखर संकल्पना, असा माझ्या लेखानाचा वर्षभराचा परीघ राहिला. पुस्तके, गाणी, कविता, साहित्य, निसर्ग आणि माणसं हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू राहिला. ज्यानं आपणास मनस्वी आनंद मिळाला तो वाचकांपर्यंत पोहोचवावा हा त्या मागचा उद्देश होता. तो कितपत सफल झाला हे वाचकांनी ठरवायचं आहे.

वरील गीताप्रमाणे मलाही सुंदरतेचं वेड आहे - आकर्षण आहे. त्यामध्ये नवरस, निसर्गाचा साक्षात्कार आणि गीत - संगीताचा समावेश आहे. एखादं अति-दु:खी गीतही वेगळ्या अर्थानं तरल, भावुक करतं. मन अधिक मानवी बनवतं. दु:खाची नशा चढवणारी गीतं, पुस्तकं व कथा-कविता त्यामुळेच मला मनस्वी भावतात.

निसर्गाची मी अनेक सुंदर रूपं पाहिली आहेत. दिवेआगरचा किंवा टायगर हिलचा सूर्योदय, नायगराची 'व्हाईस ऑफ दि गॉड' असलेली अनादी अनंत स्वरूपाची गाज किंवा पूर्ण भरलेला जायकवाडीचा विस्तीर्ण जलाशय....

एक दृश्य मी कधीच विसरू शकणार नाही. आम्ही अमेरिका प्रवासात लॉस एंजेलसहून लॉस वेगासला रात्री बसनं जात होतो. आत उबदार सुखद उष्णता होती. बाहेर संथपणे हिमवर्षा होत होती. दोन्ही बाजू पूर्णपणे शुभ्र बर्फानं झाकलेल्या. रात्रीचा निळा प्रकाश त्यावर पडून एक वेगळीच अपौरुषेय सौंदर्याची अनुभूती देत होता. मधून मधून गाव आलं की पथदिव्यामध्ये विविधरंगी रूपं ती शुभ्र हिमांकित धरा आम्हास दाखवत होती. जवळपास पाच तासाचा हा प्रवास एक अद्‌भुत नितांतरम्य सौंदर्याची अनुभूती देणारा होता. त्यामुळे मिळालेल्या आनंदाची मोजदाद कशी करायची? पुन्हा पुन्हा त्याच्या स्मृती मनात जागृत करीत पुन:प्रत्ययाचा आनंद लुटायचा. बस्.

गीत-संगीत व साहित्य हे तर माझे पंचप्राणच आहेत. माझे जीवनातले सुखद क्षण यामुळे अधिक समृद्ध बनले. तर दु:खाचे सावट वाचनानंदात, संगीताच्या सुरावटीत वितळून गेले. हा अनुभव मी अनेक वेळा घेतला आहे. पुन्हा एकाच जीवनात अनेक जीवनांचा अनुभव वाचताना आपण त्या नायकाच्या जागी स्वत:ला कल्पून त्याच्या जीवनातल्या अद्‌भुत, धाडसी व रोमहर्षक प्रसंगाशी समरस झालो की येतो, आणि साफल्याचे क्षण सापडतात! नीरस जीवनही टवटवीत बनतं.

म्हणून रवींद्र जैन म्हणतात ते खरं आहे, मलाही शब्दश: लागू आहे. मी प्रत्येक सुंदर बाबींचा चाहता आहे. त्यासाठी लुब्ध होणारा आहे. मी खरोखर फुलांचा (निसर्गाचा), गीतांचा आणि रसवैविध्याचा बीमार नाही, (कारण हा शब्द मला थोडासा खटकतो) तर शौकिन आहे, चांगल्या अर्थानं व्यसनी आहे. हे गीत मी जीवनाकडे कशा तऱ्हेने पाहातो याचं सुरेख प्रतीक आहे.

गदिमा, दुष्यंतकुमार, फैज अहमद फैज, शेलेंद्र आणि साहिर हे माझे गीत-

कवितेसाठी पंचप्राण आहेत. तसा मी हरतऱ्हेच्या काव्याचा व साहित्य प्रकाराचा मन:पूत वाचक आहे. पण आज मला माझ्या जगण्याचं जे तत्त्वज्ञान सांगायचं आहे, त्यासाठी हे शायर - कवी अधिक जवळचे आहेत एवढंच!

त्यातही 'मैं जिदगी का साथ निभाता चला गया - हक फिक्र को धुएँ में उडाता चला गया' या गीताची मोहिनी आजही कायम आहे. नांदेडला, मॅट्रिकला असताना मला वाटतं, लिबर्टी टॉकिजमध्ये हा सिनेमा सत्तरच्या दशकात केव्हातरी पाहिला होता. साहिरनं या गाण्याद्वारे सदैव मृत्यूच्या छायेत वावरणाऱ्या सैनिकांच्या जीवनाचं तत्त्वज्ञान उत्कटतेनं मांडलं आहे.

केवळ सैनिकच युद्धभूमीवर, सीमेवर लढतो असं नाही. सारी मानवजात ही जीवनाचं युद्ध खेळत असतेच. त्यामुळेच तुकोबानं म्हटलंय 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग.' आज दहशतवाद तुमच्या आमच्या दारापर्यंत आहे. त्याचा मुकाबला केला पाहिजे. त्यासाठी जिंदगीका साथ निभानाही पडेगा.

मलाही माझ्या प्रशासकीय जीवनात अनेकदा पराकोटीची हताशता, टोकापर्यंतची सिनिकता जाणवली आहे. चांगलं वागून, चांगलं न्यायाचं काम करूनही वारंवार बदली का पदरी येते? का बदनामी पदरी येते? का दुर्जनांची शक्ती सामान्य, मूक सज्जनांच्या चांगुलपणावर भारी पडते? असे प्रश्न मनास जेव्हा संत्रस्त करतात मी गुणगुणतो.

"जो मिल गया उसीको मुकद्दर समझ लिया
जो खो गया मैं उसको भुलाता चला गया."

माझ्या 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा पर्दाफाश करणाऱ्या कादंबरीला दोन मोठी पारितोषिके गटबाजीमुळे जवळपास एकमत होऊनही मिळाली नाहीत, हे जेव्हा हळहळत परीक्षक समितीच्या सदस्यांनीच सांगितलं, तेव्हा प्रचंड निराशा दाटून आली होती. पण 'जो खो गया' त्याला विसरायचं असतं व पुढे जीवनाची वाटचाल करायची असते.

सुख आणि दु:ख या निखळ सत्य बाबी नाहीत, तर व्यक्तिसापेक्ष भावना आहेत, त्यातही पुन्हा कमी अधिक तीव्रता असते. त्यामुळे दोन्हीकडे सम्यक दृष्टीने पाहाता आलं पाहिजे. 'गम और खुशी में फर्क न महसूस हो जहाँ, मैं दिलको उस मुकाम पे लाता चला गया' असं जेव्हा साहिर सांगतो, तेव्हा जीवनाच्या एका महान सत्याचा साक्षात्कार होतो.

हे मी मनानं मान्य केलं आहे, त्यामुळे जीवनात कटु प्रसंगाला मी मागे सारत पूर्णपणे विसरायचा प्रयत्न करतो. मी धर्मराजाएवढा नखशिखान्त उदार नाही, शत्रूला माफ करणारा नाही. पण बऱ्याच प्रमाणात मी माझ्याविरुद्ध जे अकारण वाईट वागले त्यांनाही माफी केलं आहे. तो कटुतेचा क्षण विसरून गेलो आहे. कारण साहिरचं या

गीतातलं तत्त्वज्ञान की, "जिंदगी का साथ निभाता चला गया."

मी स्वत: पूर्णपणे 'टी टोटलर' असलो तरी अस्सल मद्यपी माणसाचं मला अनिवार आकर्षण आहे. कारण ती निखळ - खरी माणसं असतात. माझ्या लेखी मनस्वी कलावंताचं व्यसन माफ आहे. या मदिराभक्तांना जीवनाचं खरं दर्शन घडतं असतं. ते असं आहे की, मानवी जीवन हे क्षणभंगुर स्वप्न आहे. जीवनाची स्वप्नवत् क्षणभंगुरता शैलेंद्रनं किती समर्पकपणे दर्शविली आहे. 'जिंदगी ख्वाब है, ख्वाब में झूट क्या और भला सच है क्या'. मला स्वत:ला विचार केला की दोन अर्थानं जीवन स्वप्न वाटतं. जीवनाची क्षणभंगुरता म्हणून त्याकडे जसं पाहाता येतं, तसंच हसत खेळत, सुरेल स्वप्नाप्रमाणे पण जीवन जगता येतं. आपण जे करतो, ते समरसून करावं आणि त्याचा आनंद घ्यावा म्हणजे सुखद लोभस स्वप्नाप्रमाणे जीवन छानपैकी व्यतीत होतं!

प्रत्येकाला स्वत:ची एक कर्मभूमी असते. लढण्यासाठी, जीवनसंघर्षासठी एक रणभूमी असते. ती कदाचित आपल्याला इच्छेप्रमाणे निवडता येतेच असे नाही, पण एकदा का ती मिळाली की तेथे घट्ट पाय रोवून लढायचं असतं. त्याशिवाय सत न गत असते. "जीना यहाँ मरना यहाँ. इसके सिवा जाना कहाँ" या जाणिवेनं काम केले आणि जीवनाची लढाई सर्वस्वानं लढली की म्हणता येते, "कल खेल में हम हो न हो। गर्दिश मे तारे रहेंगे जवाँ। भूलेंगे वो, भूलोगे तू. पर हम तुम्हारे रहेंगे सदा.' जीवनाशी अशी मैत्री मी प्रशासनरूपी समरभूमीत उतरल्यावर मनापासून केली आहे. त्यामुळे असेल कदाचित, मी बऱ्यापैकी यशस्वी आहे.

माणसाचं जीवन हे कधीच काळं किंवा पांढरं नसतं. ते विविध रंगानं बनलेलं इंद्रधनुष्य असते. त्यातही हिरव्या रंगाप्रमाणे सुजन घडवावं, लाल रंगाप्रमाणे मन:पूत जगावं, निळ्या रंगाप्रमाणे अथांग व्हावं. काळ्या रंगाप्रमाणे वाईटाचा सामना करावा आणि पिवळ्याप्रमाणे सकारात्मक विचार करावा, आणि सप्तरंगातून जसा शेवटी पांढरा रंग साकारतो. तसं जीवन शांत व पवित्र करावं. "थोडे गम हैं. थोडी खुशीयाँ. यही हैं, यही हैं रंगरूप, ये जीवन है." हेच खरं नाही का? आणि मनाला हेही बजावा की, "ये न सोचो, इसमें अपनी हार है की जीत है। उसे अपनालो, जो भी जीवन की रीत है." जीवनाची ही हार - जीतीच्या पलीकडची सुख - दु:खाच्या सीमारेषा पुसून टाकणारी रीत उमगली की जीवनाची वाटचाल सुकर होते!

आणखी एका सत्याचा आपल्याला कधी विसर पडता कामा नये. ते सत्य म्हणजे या जीवनसृष्टीचा मी म्हणजे एक लहानसा ठिपका आहे. एक ठिपका अनंत यात्रेच्या वाटचालीत पुसला जातो व त्याची जागा नवा ठिपका घेतो. मूळच्या ठिपक्याची नामोनिशाणी पण राहात नाही. त्यामुळे छोट्याशा जीवनात माणसानं किती रागलोभ करायचा? किती आपला क्षुद्र इगो कुरवाळायचा? किती लोकांना त्रास

द्यायचा? ही जाणीव मनात लख्ख असली की माणसाचं जीवन सहजतेनं बदलत जातं. मग 'जिंदगी कैसी हे पहेली' वाटत नाही. उलट, इतरांसाठी, आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी, 'सात रंग के सपने' बुनायचे - विणायचे असतात. हे विणकाम जमतं, त्याच्या अंगात नक्कीच सुखी माणसाचा सदरा असतो. तो तुम्हा आम्हा सर्वांना नक्कीच मिळू शकतो.

मी सीधा - सरळ, नेक माणूस आहे. कोट्यवधी माणसे अशीच असतात. त्यांचा मी प्रतिनिधी म्हणा ना. थोडासा लेखक, जरा विचार कराणारा आणि ते शब्दात मांडू शकणारा. मी आज माझं जे जीवनगाणं उलगडतोय, ते तुमचं पण आहे, असावं. जगताना आपण फक्त जगत असतो. पण मनात हे सारे विचार असले, ते रक्तात मुरले की जीवनप्रवास सुरेल होऊन जातो. हीच आहे जिंदादिली. म्हणून शेवटी एवढंच म्हणतो,

जिंदगी जिंदादिली का नाम हैं। मुर्दे क्या खाक जिया करते हैं?

o-o-o


द्यायचा? ही जाणीव मनात लख्ख असली की माणसाचं जीवन सहजतेनं बदलत जातं. मग 'जिंदगी कैसी हे पहेली' वाटत नाही. उलट, इतरांसाठी, आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी, 'सात रंग के सपने' बुनायचे - विणायचे असतात. हे विणकाम जमतं, त्याच्या अंगात नक्कीच सुखी माणसाचा सदरा असतो. तो तुम्हा आम्हा सर्वांना नक्कीच मिळू शकतो.

मी सीधा - सरळ, नेक माणूस आहे. कोट्यवधी माणसे अशीच असतात. त्यांचा मी प्रतिनिधी म्हणा ना. थोडासा लेखक, जरा विचार कराणारा आणि ते शब्दात मांडू शकणारा. मी आज माझं जे जीवनगाणं उलगडतोय, ते तुमचं पण आहे, असावं. जगताना आपण फक्त जगत असतो. पण मनात हे सारे विचार असले, ते रक्तात मुरले की जीवनप्रवास सुरेल होऊन जातो. हीच आहे जिंदादिली. म्हणून शेवटी एवढंच म्हणतो,

जिंदगी जिंदादिली का नाम हैं। मुर्दे क्या खाक जिया करते हैं?

०-०-०

# वैचारिक



# १. देवबंदचं दारुल उलुम

तीन महिन्यांपूर्वी उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीच्या वेळी मुजफ्फरनगरला माझ्यासोबत निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्त केलेले मध्यप्रदेश केडरचे सहकार आयुक्त प्रभात पाराशर याच्या सोबत त्यांच्या प्रधान सचिवांना भेटलो, तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितलं, "यू मस्ट सी देवबंद सेमेनरी." प्रशासनात काम करताना मुस्लीम प्रश्न हाताळावाच लागतो. त्यांचं सायकिक समजून घेण्यासाठी देवबंदी चळवळ माहीत असणं आवश्यक आहे. 'इट विल बी ॲन आय ओपनर फॉर यू... यू मस्ट गो."

देवबंद, उत्तर प्रदेशमधील सहारणपूर जिल्ह्यातील एक छोटसं तहसील मुख्यालयाचं गाव. जिथं आम्हाला विधानसभा निवडणुकीसाठी व मतमोजणीसाठी दोन टप्प्यात एक महिना राहायचं होतं. मुजफ्फरनगरपासून ते अवघ्या ४० कि. मी. अंतरावर होतं. अफगाणिस्तानवरील 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' ही कादंबरी लिहिताना मुस्लीम धर्माचा अभ्यास करत असताना देवबंदच्या दारुल उलूमचा संदर्भ विविध संदर्भग्रंथ व लेखांमधून यायचा. कैरोच्या अल अझरच्या तोडीचं हे केंद्र मानलं जातं. धर्मशिक्षण, प्रचार व प्रसाराचं जागतिक कीर्तीचं केंद्र म्हणून मुस्लीम जगतात देवबंदला मानाचं स्थान मिळालेलं आहे. ही एका अर्थाने विशाल अशी मदरसा (धर्म; शिक्षणाची शाळा) आहे. तसंच ते इस्लामचं विश्वविद्यालय व जागतिक अभ्यासकेंद्रही आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर परतताना देवबंदला जायचं मी ठरवलं होतं. त्याला मध्यप्रदेशच्या प्रधान सचिवांनी 'यू मस्ट गो' म्हणून पुष्टीच दिली होती.

प्रभात पाराशरनी बाहेर पडल्यावर सांगितलं. 'लक्ष्मीकांतजी, इनकी बिवी मुस्लीम हैं, और ये हमेशा हर जगा मस्जिद और मदरसे जाते रहते हैं. वो छोड दो, एक खास बात आहे, मॅडमच्या हातच्या नॉनव्हेज बिर्याणीची लज्जत काही और आहे."

माझ्यासोबत पाराशर देवबंदला आले नाहीत. निवडणुकीत माझ्या हाताखाली काम करणारा अब्दुल नावाचा एक नायब तहसीलदार देवबंदचा होता, त्याला घेऊन

मी रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास देवबंदला पोहोचलो आणि तेथे तीन तास घालवले. त्या तीन तासांत मला मुस्लीम समाजमन व धर्माबाबत बरंच काही कळलं. माझं मुस्लीम मनाचं आकलन काही प्रमाणात वाढलं, हे नक्की.

भारतातल्या कोणत्याही तालुका मुख्यालयाप्रमाणे असलेलं, अस्ताव्यस्त पसरलेलं व ग्रामीण बाज वागवणारं देवबंद हे गाव, नगरपालिका असल्याच्या कोणत्याही खुणा दिसू नयेत, इतकं धुळीनं भरलेलं व बरंचसं अस्वच्छ असलेलं गाव. पण गावाच्या एका बाजूस वसलेलं देवबंदचं 'दारुल उलुम' नजरेत येऊ लागलं आणि मग वेगळंच विश्व नजरेसमोर उलगडत गेलं. त्याची पहिली खूण म्हणजे स्वच्छता आणि पांढरा शुभ्र पठाणी ड्रेस वा पायजमा - कुडता आणि जाळीदार टोपी घातलेल्या दाढीधारी मुस्लिमाचं साम्राज्य. इथं स्त्रियांना पूर्णत: मज्जाव होता. दुरूनच भव्य संगमरवरी मशिदीचे घुमट दिसत होते. अत्यंत देखणे, कलात्मक व सकाळच्या कोवळ्या उन्हात चकाकणारे. अब्दुल्लानं माहिती दिली, "सर, अलीकडेच ही भव्य मशीद बांधून पूर्ण झाली आहे. आज इथं वार्षिक जलसा आहे."

दारुल उलुमच्या कार्यालयाच्या दोन-चार पदाधिकाऱ्यांनी आमचं स्वागत केलं. पूर्ण परिसराची एक चक्कर मारून पाहायची आहे, असं त्यांना मी सांगितलं. त्यांनी आनंदानं होकार दिला. मी महाराष्ट्रातून आलो आहे व माझा मुस्लीम धर्माचा अभ्यास आहे, मी मराठीतून कुराण व इंग्रजीतून हदिस वाचलं आहे, हे अब्दुल्लाकडून समजल्यावर त्यांना अधिकच आनंद झाल्याचं त्यांच्या चमकलेल्या नजरेवरून मला जाणवलं. त्यांनी मिरजच्या इस्लामिक केंद्राची आठवण काढली. तेव्हा मी त्यांना मागील दोन वर्ष सांगलीलाच जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत होतो त्या वेळी मिरजेच्या दर्ग्याला भेट दिल्याचं सांगितलं. पण तेथील उस्ताद अब्दुल करीम खाँ साहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणारा वार्षिक शास्त्रीय संगीताचा जलसा व सतारनिर्मिती केंद्राचा उल्लेख करताच त्यांचे चेहरे कोरे झाले. एकाच्या कपाळावरची नाराजीची आठी मी नजरेनं टिपली आणि लक्षात आलं की, प्युरिटन मुस्लिमांना संगीत निषिद्ध वाटतं. देवबंद व जिथं मी उभा होतो, त्या 'दारुल उलुम' या इस्लामिक मदरशामध्ये त्याचा उल्लेख करणं योग्य नव्हतं. त्यामुळे की काय, विषय बदलत त्यांना दारुल उलुमची स्थापना कोणत्या परिस्थितीत झाली हे विचारलं. तसं त्यांनी खुलून सविस्तरपणे सांगायला सुरुवात केली.

"सर, वो बडा पाक दिन था, जब इस मदरसे की नींव डाली गयी. तफसिरसे बतावू तो, तो जुमेरात याने गुरुवार का दिन था. तारीख थी पंधरा मोहरम १२८३ हिजरी याने की बीस मई १८६६. बस, एक उस्ताद थे और एक शागीर्द. इत्तेफाककी बात देखो, दोनोका, नाम मोहमद था. बडा पाक नाम. हजरत साब का जो है. पुरी अल्लाकी मेहेरबानी थी, इसलिए सौ सालमें ये दुनियाँ का सबसे बडा इस्लामिक सेंटर

बन गया. जिसे कुराणे - शरिफ, हादिस, सुनाह, शरिया और इस्लामके रास्ते का तरीका सिखना है, उनके लिए तो बस अब दुनियामें कैरोका अल अझर छोडे, तो देवबंद के सिवा और कौनसा सेंटर है?''

त्याचं म्हणणं शब्दश: खरं होतं. दर वर्षी येथे ७००० पेक्षा जास्त विद्यार्थी इस्लाम धर्मशास्त्र शिकण्यासाठी येतात आणि आजवरच्या दीडशे वर्षात एक लाखांपेक्षा जास्त तरुणांनी आठ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. भारत, पाकिस्तान, बांगला देशसह आशियातील अनेक शहरांच्या मशिदींमधील मौलवी व उलेमा हे मुख्यत: देवबंद प्रशिक्षित आहेत हे लक्षात घेण्यासारखं आहे.

काही वर्षापूर्वी एका कामाच्या निमित्ताने परभणी व अकोला येथील काही मदरशांना मी भेटी दिल्या होत्या. खास करून पल्स पोलिओ मोहिमेच्या संदर्भात मुस्लिमांच्या मनात जो संशय व भीती होती, ती त्यांच्या उलेमांच्या मदतीने दूर व्हावी म्हणून. पोलिओ ड्रॉप म्हणजे कुटुंब नियेजनाचं नवं साधन असा दुष्ट प्रचार व अफवा जोर धरून होती. त्याचं तिथं निराकरण करताना मी म्हटलं होतं की, ''आप तो इस्लाम के उलेमा है, पढे लिखे है, तुम्हाला 'इज्तेहादचं' तत्त्व (तर्क प्रमाणता) मी सांगायला नको.'' तेव्हा त्यांनी पूर्ण सहकार्य केलं आणि म्हटलं, ''सही है, हम देवबंदसे सिखकर आए है. बच्चोंको स्वस्थ रखना हमारा काम हैं. ये इस्लाम के यकिनन खिलाफ नहीं.''

देवबंदचा 'दारुल उलुम'चा मदरसा म्हणजे चार - पाच मोठ मोठ्या जुन्या पठडींच्या इमारती व मध्ये मोठी जागा. त्यांची जीर्णावस्था भिंतींचे पोपडे उडाल्यामुळे अधिकच जाणवत होती. मात्र त्याच्या काटकोनात एक भव्य, अक्षरश: नजर स्तिमित करणारी संगमरवरी मशिदीची इमारत मन वेधून घेत होती. तिथं जाऊ म्हटलं, तसं एक जण म्हणाला.

''सर, जायला काही हरकत नाही, आज मशिदीमध्ये वार्षिक जलसा चालू आहे. खूप गर्दी आहे.''

मघाशी मला नायब तहसीलदार अब्दुल्लाने सांगितलं होतं. ''काय स्वरूप आहे या जलशांचं?'' मी विचारलं.

''तुम्हाला आम्ही मघाशीच सांगितलं. इस्लामी धर्मशास्त्राचं हे सर्वात मोठं केंद्र आहे. ब्रिटिशांच्या जमान्यात मुस्लीम समाजावर इंग्रजी शिक्षा व तौर-तरीकांचा अनिष्ट प्रभाव पडून इस्लामी समाज भ्रष्ट होऊ नये व त्या वेळी मोडीत चाललेली मदरसा शिक्षणाची व्यवस्था पुनर्जीवित करावी म्हणून देवबंद 'दारुल उलुम' ची स्थापना झाली. इथल्या कुलगुरूंनी ('दारुल उलूम' च्या प्रमुखास व्हाईस चान्सेलर असं म्हटलं जातं. त्यांच्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या इंग्रजी पुस्तकात 'व्हाईस चान्सेलर' असंच संबोधन प्रत्येक वेळी आलेलं आहे. हे विशेष नोंद घेण्यालायक आहे.) गावोगावी मशिदीच्या

परिसरात व जवळ मुस्लीम मुलांना मोफत धर्मशिक्षण मिळावं म्हणून मदरसे स्थापायला उत्तेजन दिलं गेलं आणि आज भारत-पाकिस्तानमध्ये अनेक शहरे, गावात शेकडो मदरसे आहेत व गरीब विद्यार्थ्यांना खाण्यापिण्यासह निवासी शिक्षण दिलं जातं. भारतातील सुमारे आठ-नऊशे महत्त्वाच्या मदरशांची संलग्नता 'दारुल उलुम'ला आहे, दरवर्षी ते इथं जमतात आणि विचाराचं आदानप्रदान होऊन त्यांना शिक्षणबाबत मार्गदर्शन केलं जातं.

आम्ही त्या देखण्या मशिदीमध्ये शिरलो. सुमारे पाच हजार लोक बसतील एवढं मोठं सभागृह होतं. ते खचाखच भरलेलं होतं. स्टेजवर मुख्य मुफ्ती म्हणजेच व्हाईस चान्सलरचं समारोपाचं मार्गदर्शनपर भाषण सुरू असल्याची माहिती मला सोबत करणाऱ्यांनी दिली. ''मैं कुछ देर सुनना चाहूँगा. मुझे ठीकसे उर्दू जबान समझती है.'' मी म्हणालो. उत्सुकतेनं माहिती घेण्याच्या माझ्या स्वभावाचं त्यांना कौतुक वाटत होतं.

सुमारे वीस-पंचवीस मिनिटं मी इस्लामच्या सर्वांत मोठ्या शक्तिशाली व प्रभावी केंद्राच्या प्रमुखाचं धर्मप्रवचन ऐकत होतो. आधी त्यांनी धर्मशिक्षणाबाबत सांगितलं, मग ते जगाच्या सद्य:स्थितीकडे वळाले. त्यांचा आवाज तापत गेला आणि आपल्या प्रभावी अस्खलित भाषणात त्यांनी इस्लामचा सर्वांत मोठा शत्रू अमेरिका कसा आहे, त्यांची अमेरिकन व ईसाई संस्कृती (ख्रिश्चन धर्म) कशी पाक व नेक नाही, ती इस्लामला भ्रष्ट कशी करते, असं विवेचन ते करू लागले. त्यांनी दिलेलं स्पेनचं उदाहरण विचार करण्याजोगं होतं. ''जरा सोचो, जिस देशमें कई सदी इस्लामिक राज था, आज वहाँ क्या है? पुरा ईसाई कल्चर छा गया है.'' आणि मग पॅलेस्टाईन, अफगाणिस्तान, इराण व इराक प्रश्नांचा त्यांनी ऊहापोह केला.

काही महिन्यांपूर्वी पदच्युत अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशी दिली गेली. ते फाशीचं दृश्य टेलिव्हिजनवर दाखवलं गेलं. त्याची आठवण झाली. मुलायमसिंग यांच्या समाजवादी पक्षाने व डाव्यांनी अमेरिकेच्या विरुद्ध उत्तरप्रदेशामध्ये काढलेले मोर्चे यांचे स्मरण झाले आणि त्याचा संदर्भ व्हाईस चान्सलरच्या प्रवचनातील अमेरिकेच्या उल्लेखानं जुळत गेला.

हे खरं आहे की, अमेरिकेची उपभोगवादी, स्त्री-पुरुष संदर्भात मोकळी (पक्षी : स्वैर व फ्री सेक्सवाली) संस्कृती मुस्लीम धर्मसंस्कृतील निषिद्ध वाटते. पण असे वाटणारे ते एकटेच नाहीत. भारतातील धर्मप्रेमी हिंदूंनाही ती समाजविघातक वाटते. आज चोवीस घंटे केबल्सचा धुमाकूळ व अमेरिकन चॅनेल्स, रीरियल्स आणि सिनेमा, फॅशन टीव्हीद्वारे स्त्री - देहाचे प्रदर्शन करणारे शोज हे सर्व मुस्लीम समाजाला (जो मुळातच स्त्री देहाच्या प्रदर्शनाविरुद्ध आहे) हा अमेरिकन मोकळेपणा पथभ्रष्ट करणारा वाटतो. हा झाला सांस्कृतिक संदर्भ; पण अमेरिका आजच्या घडीला जगातली एकमेव

महासत्ता आहे. जागतिक राजकारणाची घडी अमेरिकन हितसंवर्धनाच्या चौकटीत बसण्यासाठी इतर देशात अतिक्रमण करण्याचा 'आम्हास अधिकार आहे' (जो इतरांनी वापरण्यास त्यांची हरकत असते.) असं मानीत अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराक यथे घुसखोरी करून पुकारलेलं 'वॉर अगेन्स्ट टेररिझम' इस्लाम केंद्रित आहे, असं जगभरचा बहुसंख्य मुस्लीम समाज मानतो, तेही अमेरिकाद्वेषाचे एक कारण आहे. खरं तर आज अनेक अमेरिकन विचारवंत 'व्हाय पीपल ऑल ओव्हर दि वर्ल्ड हेट अमेरिका?' असा प्रश्न उपस्थित करून अभ्यास करीत आहेत. पण लोकशाहीवादी अमेरिकन समाज वेगळा आणि जागतिक सत्ताकारण करणारं अमेरिकन सरकार वेगळं; तिथं कोणताही पक्ष-रिपब्लिकन किंवा डिमोक्रॅटिक - सत्तेवर आला तरी फारसा फरक पडत नाही. असो. या अमेरिकेबाबत वाटणाऱ्या अप्रीतीचं मूळ मुफ्तीच्या प्रवचनात उमटलं होतं.

मी मशिदीतून बाहेर पडलो आणि मदरसा काळजीपूर्वक फिरून पाहिला. तिथं दररोज ७५०० पेक्षा जास्त शिक्षण घेणारे विद्यार्थी व पूर्णवेळ काम करणारे सुमारे ५०० अधिकारी, कर्मचारी, व्यवस्थापक आणि धर्मगुरूंचा अखंड राबता असतो. सर्वांची मोफत राहण्याची, भोजन व शिक्षणाची सोय केली जाते. मुख्य म्हणजे 'दारुल उलुम' हे सारकारी अनुदान घेत नाही. सारा खर्च देणग्यांतून भागवला जातो. जवळचे शेतकरी व व्यापारी भोजनासाठी धान्य, गूळ, साखर, मीठ व मसाले देतात. तसेच देशातून व जगभरातून देणग्यांचा अखंड ओघ इथं वाहत असतो. संगरवरी भव्य मशिदीची निर्मितीही देणग्यातून झाली आहे, असं समजलं. त्यावरून मिळणाऱ्या देणग्यांचा अंदाज करता येतो.

''दारुल उलुम' चा भटारखानाही प्रचंड आहे. रोज सात-आठ हजार विद्यार्थ्यांचं जेवण तयार करणं सोपं नाही. जेवण साधंच असतं. अधून मधून व इस्लामी सणासुदीला सामिष व गोड जेवण दिलं जातं.

मला 'दारुल उलुम'मधून फिरताना प्रकर्षानं जाणवला तो साधेपणा. शुद्ध व साधं धार्मिक जीवन व चाकोरीबद्ध दिनक्रम. रोज सहा सात तास (दोन सत्रात) धर्मनिशिक्षण, त्यात पाच वेळा नमाज पढणं, दुपारी विश्रांती व अभ्यास. सायंकाळी थोडं खेळणं. तिथं सिनेमा, संगीत, टी. व्ही. ला स्थान नाही.

इस्लामी धर्मशास्त्राच्या शिक्षणात प्रामुख्याने पवित्र कुराण, हादीस आणि फिकह यांचा प्रामुख्याने समावेश असतो. त्यात पुढे पुढे अरबी काव्यशास्त्र, तफसिर, व्याकरण, सिंटॅक्स, लेक्सिकन आणि इतिहासाची भर पडली. वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि काही ग्रीक विज्ञानाचाही अभ्यासक्रमात समावेश केला गेला.

''दारुल उलुम''मधील आजचा प्रचलित अभ्यासक्रम हा आठ वर्षांचा आहे. मुल्ला निझामुद्दीन सहलवी यांनी अठराव्या शतकात (बाराव्या हिजरी शतकात) तयार

केलेला अभ्यासक्रम हा 'दरस ए निझामी' या नावाने ओळखला जातो. तोच 'दारुल उलुम'च्या अभ्यासक्रमाचा प्रमुख गाभा आहे. मला त्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाची इंग्रजी पुस्तिका दिली. त्यात प्रत्येक वर्षाचा अभ्यासक्रम दिला आहे, त्याचेही चार भाग आहेत, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदव्युत्तर शिक्षण, उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रही दिलं जातं. अलीकडे हिंदी, संगणक व काही प्रमाणात इंग्रजी भाषेच्या शिक्षणावर उत्तर प्रदेशामधील विविध मदरशांनी भर द्यायला सुरुवात केली आहे. मुझफ्फरनगर जिल्ह्यात बागवली येथे असाच एक मोठा (अर्थात देवबंदपेक्षा छोटा) मदरसा आहे. तेथे एक मतदान केंद्र होतं, ते मी कामाचा भाग म्हणून पाहायला गेलो होतो. तिथं त्यांनी मला हिंदी, भूगोलाची राज्य सरकारची पाठ्यपुस्तके शिकवली जात असल्याची माहिती दिली. त्यांची छोटेखानी संगणक प्रयोगशाळाही मी पाहिली. हे आधुनिक बदल विद्यार्थ्यांसाठी स्वागतार्ह आहेत, पण ही केवळ सुरुवात आहे. त्यांना खूप मोठी मजल मारण्याची आवश्यकता आहे.

बागवालीला तेथील मुफ्तीला मी जो प्रश्न विचारला होता, तो इथंही व्यवस्थापकांना विचारला, "आपला सारा भर धर्मशिक्षणावर आहे, त्याबद्दल मला काही म्हणायचं नाही. पण इथं शिकणारे सारेच काही मौलवी व उलेमा होत नाहीत. त्यांचं पुढे काय होणार? केवळ अरबी व उर्दू शिकून त्यांना नोकऱ्या मिळतील का? उद्योग व व्यापारउदीमासाठी स्थानिक भाषा व इंग्रजी यायला नको का? आधुनिक भाषा व शास्त्र मुस्लीम युवक शिकले नाहीत, तर ते सर्वच क्षेत्रात मागे पडणार नाहीत का? मुस्लीम समाजाची आजची गरिबी व अशिक्षितपणा किती जास्त आहे, हे राजेंद्र सच्चर समितीने दाखवून दिलं आहे. त्यावर काय तोडगा आहे आपल्याजवळ? इथलं 'दारुल उलुम' ही केवळ हिंदुस्थानातीलच (मुस्लीम लोक भारत न म्हणता बहुतेक वेळा हिंदुस्थान किंवा इंडियाच म्हणतात.) नाही तर पूर्ण आशियातील सर्वांत मोठी मदरसा आहे. आपणच मार्ग दाखवला पाहिजे."

माझ्या या प्रश्नाशी ते सहमत नव्हते, पण तरीही काहीसे अस्वस्थ नक्कीच झाले होते. प्रमुख अधिकारी माणसं जलशामध्ये व्यस्त होती. त्यामुळे त्यांच्याशी संवाद होणं शक्य नव्हतं आणि माझ्या सोबतची माणसं त्याबाबत उत्तर द्यायला असमर्थ होती की, अनुत्सुक होती हे कळत नव्हतं. तरीही मी त्यांना पुन्हा पुन्हा विचारलं, त्यानंतर जी माहिती मिळाली ती विचार करायला लावण्याजोगी होती.

दरवर्षी सहा-सात हजार विद्यार्थी धर्मशिक्षण संपवून बाहेर पडतात, त्यातले हजार-बाराशे विविध मशिदींमध्ये पुढील जीवनक्रम व्यतीत करतात. बाकीचे प्रपंचाकडे वळतात. काही मोजकेच शासकीय शिक्षणक्रमात प्रवेश घेतात व नोकरी मिळवतात. बाकीचे शेतीवाडी व छोटामोठा व्यापार करतात. जे जमीनदार व शहरी वातावरणात राहणारे आहेत, त्यांची मुलं प्रामुख्याने इंग्रजी शिक्षण घेतात आणि शैक्षणिक दरी

वाढत जाते. मूठभर श्रीमंत व मध्यमवर्गीय मुस्लीम समाज आधुनिक शिक्षण घेतो व इतर हिंदू-शीख समाजाप्रमाणे जीवन जगतो. पण तरीही त्यांची धर्माशी जोडलेली नाळ फारशी कमी होत नाही. त्याचं कारण इस्लाम हा केवळ पारलौकिक जीवनाची आस दाखवणारा धर्म नाही, तर तो त्या बरोबरच ऐहिक धर्म आहे. जीवनाची सर्व अंगं व्यापून टाकणारा आहे. त्यामुळे या समाजात अस्तिकता जवळपास पूर्ण आहे. इथं 'काफीर' शिक्का बसला की, संपलं. त्याला मग इस्लामी समाजजीवनात स्थान उरत नाही. महाराष्ट्रातल्या हमीद दलवाई व मुमताज रहिमतपुरे यांना त्यांच्या समाजानं कसं बहिष्कृत केलं होतं, हे सांगायला नको.

शिक्षणाच्या बाबतीत मुस्लिमांची अवस्था चिंताजनक आहे, हे मात्र पुन्हा एकदा मनावर ठसठशीतपणे बिबवलं गेलं. उर्दू - अरेबी शिक्षणामुळे व तेही परंपरागत मदरसा शिक्षणामुळे मुस्लीम युवकांसाठी आधुनिक ज्ञान-विज्ञानसंपन्न जीवनाची व नोकरी उद्योगांची दारं बंद होतात; कारण भारतात उत्तर प्रदेशामध्येच केवळ उर्दू दुसरी राज्यभाषा आहे. इतरत्र त्या त्या प्रदेशाच्या भाषेतच राज्य-कारभार चालतो. त्यामुळे नोकऱ्यांत मुस्लिमांचं प्रमाण कमी आहे. मी १९९४-९५ मध्ये परभणी जिल्ह्यात प्रौढ साक्षरता अभियानाचा मुख्य समन्वयक होतो. परभणी शहरात अशिक्षित मुस्लिमांसाठी आम्ही प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले होते. ते मराठीतून व्हावेत ही भूमिका मी मांडली होती, पण तेथील एक माजी नगराध्यक्ष व इंजिनिअर म्हणून सेवानिवृत्त झालेल्या विद्यमान नगरसेवकांनी माझा प्रस्ताव हाणून पाडून उर्दूमधून साक्षरतेचे वर्ग चालवावेत असा आग्रह धरला. त्यामुळे नाईलाजाने उर्दूमध्येच वर्ग सुरू झाले. त्या वेळी मला प्रश्न पडला होता, त्यांना कचेरीतल्या कामासाठी मराठीत अर्ज कसा करता येईल? मराठीतले रेशनकार्ड, रोजगार हमी कामाची हजेरी व पगार पट कसे वाचता येतील? मग अक्षर ओळख होऊनही (अर्थात उर्दूची) त्यांची कार्यात्मक साक्षरता शून्यच राहणार. माझ्या या प्रश्नाचं त्यांनी उत्तर दिलं नाही. त्यांची तशी इच्छाही नव्हती.

मात्र दक्षिण भारतात मुस्लीम तेथील स्थानिक भाषेत शिक्षण घेतात व लेखनही करतात. खास करून केरळचे उदाहरण आदर्श म्हणून देता येईल. भारतातला एक मोठा कादंबरीकार बशिर यांनी 'कायर' (दोरी) ही कादंबरी (ही एक महानतम कलाकृती आहे, असं डॉ. चंद्रकांत बांदिवडेकरांचं म्हणणं आहे.) मल्याळी भाषेत लिहिलेली आहे, केरळमध्ये मुस्लिमात मल्याळी शिक्षणाचं प्रमाण लक्षणीय आहे, त्यामुळे विविध धर्मगटातली समरसता निश्चितच अधिक आहे.

आता माझा दारुल उलुमचा फेरफटका पूर्ण झाला होता. व्यवस्थापकांनी मला त्यांच्या कार्यालयात जलपानासाठी नेलं, तिथे चहा-फराळ झाला. निवांतपणे थोड्या गप्पाटप्पा झाल्या, तेव्हा मी पुन्हा विचारलं, "माफ करना, कुछ साफ साफ पुछूं, तो बुरा नहीं मानोगे? और जबाब भी दोगे?"

त्यांना माझ्या दहशतवादाशी संबंधित प्रश्नांची कदाचित अपेक्षा नसावी. मी त्यांना अफगाणिस्तानचे तालिबान हे देवबंदच्या प्रेरणेने काम करतात व जिहादच्या नावाखाली दहशतवाद करतात, त्याबाबत त्यांचं म्हणणं काय आहे हे विचारलं. तेव्हा त्यांनी काहीसा बचावात्मक पवित्रा घेत उत्तर दिलं,

"सर, आपने यहाँ देखा है, यहाँ सिर्फ दिन की तालिम दी जाती है, हमें ये टेररिझम बिलकुल मंजूर नही है. इस्लाम का मतलबही शांती-अमन है. कुछ लोग बहक गये, कुछ बुरा काम किया तो मजहब को कैसे जिम्मेदार ये अमरिकी मानते है? वो भी निग्रोब्लॅकसे गैरबर्ताव करते है. इतका मतलब उनका देश और धरम थोडाही रेसिस्ट हो जाता है?"

माझ्यासोबत दिल्लीपर्यंत मला निरोप देण्यासाठी व नोयडात घर असल्यामुळे निवडणुकीचा श्रमपरिहार व्हावा म्हणून, रजा घेऊन माझ्या सोबत निवडणुकीसाठी असलेले अन्सारी नावाचे पोलिस सब-इन्स्पेक्टर होते. त्यांना देवबंदला ड्यूटीमुळे येता आलं नव्हतं, पण बागवाली मदरशात ते माझ्याबरोबर होते. तेही चार वर्षे बालपणी मदरशात शिकले होते. पुढे त्यांनी सातवीला सरकारी शाळेत प्रवेश घेऊन पदवीपर्यंत शिक्षण घेतलं. हेडकॉन्स्टेबल म्हणून नोकरीस लागले व आज ते सब-इन्स्पेक्टर आहेत; पण त्यांना मदरसा शिक्षण व आधुनिक शिक्षणाच्या दुहेरी अनुभवामुळे प्रगल्भता आलेली मला जाणवली. त्यांना मी दिल्लीच्या परतीच्या प्रवासात देवबंदच्या भेटीचा अहवाल कथन करीत हा मनातला प्रश्न विचारला, तेव्हा त्यांनी फार मार्मिक उत्तर दिलं.

"सर, देवबंदला व यु. पी. मध्ये मदरशांमध्ये केवळ धार्मिकच शिक्षण दिलं जातं. दहशतवादाचं शिक्षण दिलं जात नाही, हे मी पोलीस अधिकारी म्हणून ठामपणे सांगेन. पण जिहाद हा आत्म्याच्या शुद्धीसाठी असतो. मानवी विकासांवर मात करीत त्याला जिंकावं लागतं. त्यासाठी साधं, पवित्र - आजच्या आधुनिक जगाच्या तुलनेत मिळमिळीत - जीवन जगणं सुद्धा क्षणभंगुर आहे, आखिर पारलौकिक जीवन असीम आहे. तेथे सर्व आनंद आहे, हे मनात खोलवर बिंबवलं जातं आणि मानवी जीवनाकडे तुच्छतेनं वा उदासीनतेनं पहाणाऱ्या मुस्लीम मनात हे बहकलेले दहशतवादी दहशतवादाचे बीजारोपण करतात. त्यांचं प्रतिपादन साधं, सरळपणे प्रभावी असतं. "हमें वो जन्नतकी जिंदगी चाहिये, यहाँ क्या पडा है? इस जिंदगीमें हमें जिहाद करना है, वो भी इस्लामके दुश्मन के साथ. ये होली वॉर है. इसमे मारना और मरना दोनो जायज है. जिहादमें मरना शहीदी मौत के समान है, जो हमे जन्नतमें ले जायेगी." हे तत्त्वज्ञान प्राणघातक फिदाईन हमल्यामागचं आहे, असं माझं मत आहे."

माझ्या आगामी काश्मीरविषयक प्रश्नावरील कादंबरीसाठी मी बरंचसं संशोधन व अभ्यास करीत आहे. त्यामध्ये मला आत्मघातकी हल्ले - 'फिदाईन हमल्यानं' चांगलंच बुचकळ्यात टाकलं होतं. जेव्हा माणसं जिवावर उदार होऊन निर्भीडपणे

दहशतवादी कृत्ये करतात, तेव्हा त्यांना कसं रोखायचं? या मागची प्रेरणा काय आहे? व तिचा इस्लाम धर्माशी कसा संबंध येतो वा लावला जातो? त्यात कितपत तथ्य आहे? असे अनेक प्रश्न मला पडले होते.

आज अन्सारींच्या विश्लेषणानं त्यांचं एक वेगळं उत्तर मिळत होतं. त्याबाबत अधिक विचार करून माझं मत व दृष्टिकोन मला बनवला पाहिजे.

खरं तर १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यानंतर व शेवटच्या मोगल बादशहा बहादुरशहा जफरला रंगूनला कैद करून पाठवल्यानंतर मुस्लीम समाज सत्ताविहीन झाला होता व त्यांच्यापुढे अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला होता. त्यातून वाट काढण्यासाठी देवबंदच्या 'दारुल उलुम'चा जन्म झाला आणि मुस्लीम धर्मशास्त्राचं एक सर्वोच्च केंद्र म्हणून सारा देश व आशिया त्याकडे पाहात धर्मप्रेरणा घेऊ लागला व आजही घेत आहे. त्या दृष्टीने 'दारुल उलुम' देवबंदचं ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व निर्विवाद आहे.

हे ज्ञानकेंद्र म्हणूनही महत्त्वाचं आहे. इथं हजारो धर्मग्रंथ उत्तम कोरीव अक्षरात लिहिलेले आहेत. मला ग्रंथपालांनी औरंगजेबानं स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेल्या सुवर्णाक्षरातील कुराणाच्या प्रती दाखवल्या व ना. सं. इनामदारांनी पूर्ण न्याय दिलेली औरंगजेबावरची 'शहेनशहा' कादंबरी स्मरली. तसंच प्रभाकर पणशीकरांनी रंगवलेला बहारदार औरंगजेबही डोळ्यांसमोर आला. आता 'दारुल उलुम' आधुनिक तंत्रज्ञान वापरून पुस्तकं नीट जतन होतील अशी भव्य लायब्ररी बांधणार आहे. हा पुढाकार हे एक उत्तम प्रतीचं ज्ञानकेंद्र आहे हे अधोरेखित करतो.

तरीही मनात अजून काही प्रश्न होतेच. त्यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न फतव्यासंबंधीचा होता. इमरानावर तिच्या सासऱ्यांनी बलात्कार केला, म्हणून तिचा नवरा, तिचा मुलगा झाला. त्यामुळे तिनं सासऱ्यांशी निकाह करावा, हा फतवा मनात होताच. तसंच अलीकडे फोटोग्राफीवर बंदी घालणारा फतवाही देवबंदनं काढलेला आहे. ऐंशीच्या दशकातील सिनेमाबंदीचा फतवाही गाजला होता. या संदर्भात माहिती घेतली तेव्हा कळलं - मुस्लिमांना धर्माचे व जगण्याचे प्रश्न पडतात, तेव्हा ते 'दारुल उलुम'कडे जातात. ते धर्मशास्त्राप्रमाणे निवाडा देतात, त्यांनाच फतवा म्हटलं जातं. इथं कुराणे शरीफचं शब्दप्रामाण्य आणि हादिसच्या परंपरांचा आधार घेतला जातो. पण तर्कप्रामाण्याचं (इज्तेहाद) प्रमाण धर्मसुसंगत असलं, तरी त्यांची परंपरा क्षीण आहे. बदलत्या काळानुसार व आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या दुनियेत कालसुसंगत निवाडा करण्याचे अधिकार इज्तेहादच्या संकेतानं धर्मगुरूंना प्राप्त झाले आहेत. त्याचा आधार घेऊन देवबंदनं तस्लिमा नसरीनचा शिरच्छेद करण्याच्या फतव्याची निंदा केली आहे, हे उल्लेखनीय आहे. वेळोवेळी मुफ्ती व मौलवी-उलेमांनी काढलेल्या फतव्याचं संकलन लेखनबद्ध करण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र 'दारुल इफ्टा' नावाचा विभाग देवबंदला

काढला आहे व सुमारे एक लाख फतव्यांचं संकलन झाल्याची माहिती त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. तरीही काही फतव्यांमधली कट्टरता व तर्कशुद्धतेला दिलेली सोडचिठ्ठी अस्वस्थ करून जाते.

मला अन्सारींनी विमानतळावर सोडलं व ते 'खुदा हाफिज' करून निघून गेले. आता मी दारुल उलुमच्या प्रकाशन विभागानं दिलेली दोन पुस्तकं चाळू लागलो. मागील दीडशे वर्षांचा 'दारुल उलुम' देवबंदचा इंग्रजी इतिहासाचा तो ग्रंथ होता. त्याची प्रस्तावना व काही प्रकरणं विमानास उशीर असल्यामुळे विमानतळावरच वाट पाहताना वाचून झाली. विमानातही मी मधली-मधली प्रकरणं वाचून काढली आणि एका धर्मशिक्षणाच्या चळवळीचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक इतिहास उलगडत गेला.

तरीही एका दिवसाची, छे, काही तासांची भेट देवबंदी चळवळ जाणून घ्यायला पुरेसा नाही. शिवाय आपली इतर धार्मिक व आधुनिक म्हणून वेगळी तयार झालेली अनेक मतं व विचार पक्के झालेले. अशी पूर्वग्रह आधारित नजरेची मोजपट्टी घेऊन ही चळवळ पाहाणं कितपत बरोबर आहे? मुस्लीम मन, धर्मसंस्कार, परंपरा आणि आचार-विचारानं घडलं आहे. त्यांचे काही अस्तित्वाचे, ओळखीचे प्रश्न आहेत आणि अकरा सप्टेंबरनंतर प्रत्येक मुस्लिमाकडे संशयानं पाहिलं जात असताना, मुस्लीम मनाची अवस्था सहृदयतेनं समजून घेणंही महत्त्वाचं आहे. त्या भूमिकेत शिरून पहायला निखळ मानवतावादी व कलावंताचं मन हवं. मग 'दि रिलक्टंट फंडामेंटॉलिस्ट' या ताज्या कादंबरीच्या नायकांची व्यथा समजू शकते आणि मन भरून येऊ शकतं. असा सहृदयी हिंदू समाज जेव्हा मुस्लिमांच्या अनुभवास येईल, तेव्हा भारताचा धार्मिक विद्वेषाचा प्रश्न संपलेला असेल.

आणि असाच प्रयत्न देवबंदसारखा प्रतिष्ठित मदरसा करेल, तेव्हा सोन्याहून पिवळं होईल. हे नजीकच्या नाही, तरी भविष्यात नक्कीच संभवनीय आहे. बाबरी मस्जिद प्रकरण, अकरा सप्टेंबरची घटना व अलीकडचे पाकिस्तानमधील लाल मस्जिद प्रकरण यामुळे मुस्लीम वेगळा विचार करू लागले आहेत. त्यांच्यात सूक्ष्म पण दृढ बदल होत आहेत. त्याचा वेग आजमितीस बराच कमी आहे. पण तो जेव्हा वाढेल, तेव्हा तो एका सामाजिक चळवळीचं रूप घेईल हे निश्चित. त्यासाठी देवबंद चळवळ पुढाकार घेईल का? हा खरा लाखमोलाचा सवाल आहे.

मी मनानं व विचारानं शिणलो होतो. विमानात थंड गारव्यानं पापण्या जडावत होत्या. मी पुस्तक मिटलं. किंग फिशरच्या विमानात टी.व्ही. व म्युझिक चॅनल असतं, त्यातलं एक जुन्या हिंदी गाण्याचं आहे. ते मला आवडतं. ते मी सुरू केलं आणि गाणी ऐकत डोळे मिटले.

आणि माझा आवडता शायर साहिर लुधियानवीची कव्वाली सुरू झाली,

'ये इश्क इश्क है, इश्क, इश्क'

त्यातल्या काही ओळी फारच उद्‌बोधक व प्रभावी आहेत -

'अल्लाह और रसुल का फरमान इश्क है
यानी के कुराण इश्क है, हबीब इश्क है
गौतम और इसा का अरमान इश्क है."

हिंदू-मुस्लीम व इतर सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाचं सारच मुळी 'इश्क' आहे. कारण -

'क्यों की खुदा बंदेसे खुद करते है इश्क'

अशी मोहम्मद रफीच्या आवाजातली तार सप्तकात फिरणारी तान कानावर पडली आणि मी रोमांचित झालो. मीही त्या कव्वालीला ताल धरू लागलो.

'ये इश्क इश्क है, इश्क, इश्क'

आणि बंद नजरेसमोरून देवबंद दारुल उलुमचे कोवळे विद्यार्थी, तेथील मौलिक ग्रंथालय आणि देखणी भव्य संगमरवरी मशिदीचा इमारतीचा कोलाज फिरत होता. साहिरच्या ओळी त्या पार्श्वभूमीवर अधिकच अर्थपूर्ण वाटत होत्या.

'अल्लाह और रसुल का फरमन इश्क है,
यानी के कुराण इश्क है, हबीब इश्क है,
गौतम और इसाका अरमान इश्क है,
ये इश्क इश्क है, इश्क इश्क.'

०-०-०

# २. काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली!

साधारणपणे पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. १९९४-९५ साल असेल. तेव्हा परभणीला 'रोजा' या सिनेमाचा निमंत्रितांसाठी एक खास खेळ झाला होता. सिनेमा पहिल्यावर पत्रकारांनी मला प्रतिक्रिया विचारली असता मी उत्स्फूर्तपणे बोलून गेलो होतो.

'काश्मीर' हा भारताचा अविभाज्य भाग आहे. तो आपल्या 'गंगा - जमनी' संस्कृतीचा एक झगमगता रत्नजडीत हार आहे. भारतमातेचा मुकुटमणी आहे.'

हे आठवायचं कारण म्हणजे जम्मूमधील वैष्णोदेवीची यात्रा आटोपून आम्ही काश्मीरला आलो होतो. श्रीनगरच्या विमानतळावरून टॅक्सीनं 'दाल लेक' येथे आरक्षित केलेल्या 'गुलिस्तान' नामक शिकाऱ्याकडे जात असताना ड्रायव्हरनं टेप लावला होता, त्यावर 'रोजा' ची गाणी वाजत होती. 'क्या म्युझिक डायरेक्टर है साब. पूछो मत.' तो म्हणत होता. त्यावरून मला हा प्रसंग आठवला.

त्यानंतर केव्हा तरी 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवरील धार्मिक दहशतवादाचा वेध घेणाऱ्या कादंबरीचं लेखन चालू असताना काश्मीर समस्येवर कादंबरी लिहिण्याचं मला सुचलं. नुसतं सुचलं नाही, तर त्यानं पार झपाटून गेलो आणि या विषयाचा अभ्यास सुरू केला. काश्मीर संदर्भात सर्वप्रथम वाचलं ते शेषराव मोरे याचं 'काश्मीर - एक शापित नंदनवन' हे पुस्तक. तेव्हा माझी 'रोजा' सिनेमा पाहिल्यावरची ही प्रतिक्रिया मलाच काहीशी भाबडी व रोमँटिक - काव्यमय वाटली. कारण ज्या तत्त्वाच्या आधारे भारताची फाळणी झाली, त्या आधारे काश्मीर हे पाकिस्तानमध्ये जायला पाहिजे होतं, असं त्यावेळी अनेकांचं मत होतं, पण काश्मीरवर जेव्हा १९४८ साली हल्ला झाला व पाकिस्तानी सैन्य व कबिलेवाल्यांनी जे अत्याचार व लुटालूट केली, त्यामुळे महाराजा हरिसिंग व शेख अब्दुल्ला या दोघांनीही भारतासोबतच्या विलीनीकरणावर स्वाक्षरी केली आणि मग भारतानं सैन्य पाठवून काश्मीर खोरं मुक्त केलं. पण आज ज्याला आपण पाकव्याप्त काश्मीर (पाक ऑक्युपाइड काश्मीर) म्हणतो ते झेलमचं खोरं मुक्त करण्यापूर्वी युद्धबंदी पुकारून

एल. ओ. सी. (लाईन ऑफ कंट्रोल) ला मान्यता दिली. त्यानंतरच्या काश्मीर प्रश्नाचा इतिहास सर्वश्रुत आहे.

तरीही मला काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग वाटतो, त्यामागे देशप्रम ही एकच प्रबळ भावना नाही, ती तर आहेच. पण ज्याहून जादा 'काश्मीरियत' ही संकल्पना आहे आणि ती भारतीयतेशी मिळतीजुळती अशा 'गंगा - जमनी' संस्कृतीवर आधारित आहे. 'गंगा - जमनी' संस्कृती ही नामनिर्देशक नाही, तर एकत्र येऊन जेव्हा दोन नद्यांचा संगम होतो व पुढे ती एकच नदी म्हणून वाहते, त्या संगम संस्कृतीस 'गंगा - जमनी' संस्कृती म्हणता येईल. काश्मीरियत ही अशीच हिंदू - मुस्लीम - बौद्ध व शीख परंपरेतील सर्वमान्य तत्त्वे अंगीकारून सहअस्तित्वाची वाटचाल करताना विकसित झालेली संकल्पना आहे.

काश्मीरमध्ये दुसऱ्या सकाळी शंकराचार्यांचे मंदिर, मग हरी पर्वत आणि शेवटी हजरतबल या तिन्ही स्थळाचं दर्शन घेतलं. त्यावेळी मनात काश्मीरियतचे विचार तरळत होते. मला अचानक काश्मीर विद्यापीठाचे कुलगुरू व काश्मीर प्रश्नाचे अभ्यासक अमिताब मट्टू यांच्या एका लेखाचं स्मरण झालं. त्यांनी काश्मीरियतचे तत्त्वज्ञान विशद करताना लिहिलं होतं.

"There was a time when kashmir was the perfect embodiment of the idea of India - Hindus, Mulims, Sikhs and Christians living together in relative harmony. Growing up in Kashmir was to at - once celebrate diversity and take pride in common syncretic identity of Kashmiriyat. The Lord's prayer at Burn Hall School, the azaan at Syed Sahib's dargah and the bells of Shankaracharya temple, all signified a unity of purpose beyond the superficial differences.

११०० फूट उंचीच्या 'तख्त - ए - सुलेमान' डोंगरावर वसलेलं शंकाराचार्य मंदिर म्हणून आज ओळखलं जाणारं हे वास्तविक पुरातन शिवमंदिर आहे. इ. स. पूर्व ३१७ साली राज गोपदत्त यानं हे मंदिर बांधलं होतं. दहाव्या शतकात हिंदू धर्माच्या प्रचारासाठी इथं आदी शंकाराचार्य आले होते व मंदिरात काही काळ थांबले होते. तेव्हापासून हे शंकराचार्यांचं मंदिर म्हणून ओळखलं जातं. भूकंपामुळे मंदिरास तडे गेले होते, तेव्हा ज्याच्यापासून 'काश्मीरियत' चा प्रारंभ झाला असं स्थूलमानानं म्हणता येईल, त्या झैन उल अबिदिन या मुस्लीम राजानं त्याच्या जीर्णोद्धार केला. डोग्रा राजा गुलबसिंगांनी दगडी पायऱ्या बांधल्या व १९२५ साली मंदिरात प्रथम वीज आली.

मंदिराची प्रदक्षिणा करताना चारही बाजूनं श्रीनगर शहराचं विहंगम दृश्य दिसतं. समोर पसरलेला दाल व नगिना लेक व त्यावर तरंगणाऱ्या शिकारा बोटी दिसतात. दूर आभाळात भिडणाऱ्याचा व शुभ्र हिमराशी अंगाखांद्यावर बाळगणाऱ्या निळसर

पर्वतराशी डोळ्यांत भरतात. हा अद्‌भुत नजारा पाहताना भान हरपतं.

शंकीराचार्य मंदिरात आम्ही सुमारे तासभर होतो. एक प्रकारची समाधी लागली होती. पण आम्ही त्यातून बाहेर आलो तो गलक्याच्या आवाजानं. पाहिलं ते मंदिराच्या पहाऱ्यावर असलेल्या पोलिसांनी एका तरुणाच्या मुसक्या आवळून त्याला त्यांच्या चौकीत घेऊन जाताना. रस्त्यानं न येता डोंगर चढून, सुरक्षा रक्षकाचा डोळा चुकवून तो अतिरेकी मागील बाजूनं येत होता. ते पोलिसांनी हेरलं व मंदिराच्या आवारात तो प्रवेशताच झडप घालून त्याला पकडलं.

क्षणभर आम्ही सारे गंभीर झालो. अशांत काश्मीरची ती चुणूक होती. १९८९ पासून पाकिस्तानं दहशतवादाचा अवलंब करीत जे छुपं युद्ध पुकारलं होतं व त्यासाठी जहाल इस्लामाचं विष तरुण काश्मिरी युवकांत भिनवून त्यांचा गिनीपिगसारखा वापर करीत भारताला रक्तबंबाळ करण्याचं धोरण आखलं होतं, त्याची परिणती अवघं काश्मीर खोरं युद्धभूमी व सैनिकी कॅम्प होण्यात झाली होती. तरीही मागील दोन - तीन वर्षांपासून घुसखोरी कमी झाल्यामुळे पर्यटनाला बहर आला होता; पण काश्मीर सफर किती धोकादायक आहे व केव्हाही काहीपण होऊ शकतं याचं आम्हांला चांगलं प्रत्यंतर आलं होतं!

आज हिंदू व मुस्लिमांची सलगपणे प्रार्थना स्थळं पाहण्यामागे काश्मीरियतचा शोध घेण्याचा माझा प्रयत्न होता. पण या घटनेनं त्याच्यापुढे एक प्रश्नचिन्ह उभं केलं होतं!

· आमचं पुढील स्थलदर्शन होतं हरी पर्वताचं. हा मुघलकालीन डोंगरमाथ्यावर बांधलेला व स्थापत्यशास्त्राचं एक प्रगत सुघड रूप दाखवणारा किल्ला आहे. हे सुलतानाचं उन्हाळ्यातलं थंड हवेचं ठिकाण होतं. तेथे शारिका मंदिर आहे. देवी दुर्गामातेचं हे रूप आहे, असं हिंदू भाविक मानतात. त्याच्या खाली मखदुम साहेबाचा दर्गा होता. याचंही दर्शन घेतलं व बाहेर आलो आणि त्या उंच पर्वतावरून श्रीनगर शहराचा माहोल पाहू लागलो. डोंगराभोवती बदामाचे मळे होते. वसंत ऋतूमध्ये झाडं पुष्पभरित होतात तेव्हा कलासक्त बादशहा जहांगीर व त्याची लावण्यवती बेगम नूरजहां किती मधुर गूज त्या सुगंधी वातावरणात करीत असतील, या कल्पनेनंही रोमांचित व्हायला होत होतं!

आता आमची इनोव्हा गाडी श्रीनगर शहरातून जात होती. आमचा ड्रायव्हर काश्मिरी मुस्लीम होता. देखणा - रुबाबदार, पण अबोल. मी त्याच्या बाजूला बसलो होतो. त्याला बोलतं करायचा प्रयत्न करीत होतो. आमची गाडी लाल चौकातून शहराच्या मध्यभागातून जात असताना डाव्या बाजूच्या एका देखण्या हॉटेलकडे बोट दाखवीत हे एका हुरियत नेत्याचं आहे, असं त्यानं सांगितलं, तेव्हा मी चमकलो. पण ही संधी आहे त्याला बोलतं करण्याची, हे लक्षात घेऊन मी हुरियतच्या संदर्भात बोलू

लागलो, तेव्हा त्यानं स्पष्टपणे सांगितलं.

'हम आझाद काश्मीर चाहते है, न हमें पाकिस्तानसे लेना देना हैं; न तुम्हारे हिंदुस्थानसे.'

आपण सारे भारतीय काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग मानतो. कारण हा प्रदेश कश्यप ऋषीनं वसवला आहे ही आपली श्रद्धा आहे. कल्हणच्या 'राजतरंगिणी' ग्रंथात प्राचीन काश्मीरचा समृद्ध इतिहास कथन केला आहे. हिंदू व बौद्ध धर्माचा प्रभाव इथं जाणवतो. पण नंतर इथं इस्लाम आला. इतरत्र तो तलवारीच्या बळावर रुजला, इथं मात्र सूफी मुस्लीम संतांनी प्रेमानं मनपरिवर्तन करून एतद्देशीयांना इस्लाम धर्म स्वीकारायला प्रवृत्त केलं. पण भारताच्या फाळणीनंतर काश्मीर हा फाळणीचा अनिर्णित प्रश्न मानून व त्यावर आपला पूर्ण हक्क आहे असं समजून पाकिस्ताननं जी पद्धतशीरपणे - खास करून जनरल झियाच्या काळापासून विशेषत्वानं वाटचाल केली, त्यामुळे 'आझादी' चा तथाकथित लढा इस्लामच्या रंगात नहात सुरू झाला. आमच्या ड्रायव्हरचे हे स्पष्ट उद्‌गार त्याची प्रचिती देत होते.

दाल लेकच्या प्रवेशद्वारी त्यानं गाडी थांबवली, तेव्हा मी म्हणालो, 'अरे भाई, भूल गये क्या? हमे हजरतबल मस्जिद जाना है, चलो.' तसा त्याचा चेहरा खुललेला मी त्याच्या नकळत टिपला. कदाचित फार कमी प्रवासी - त्यात बहुसंख्य हिंदूच इथे जात असणार, मुस्लिमांचं हे गाढ श्रद्धा असलेलं उपासनास्थल आहे. ते मला पाहायचं होतं!

दाल लेकच्या पश्चिमेला व नूरजहानं रसिकतेनं निर्माण केलेल्या निशात बागेच्या समोर हजरतबल मस्जिद मोठ्या दिमाखात उभी होती. इस्लामी वास्तुशास्त्राची खूण सांगणारे डेरेदार घुमट आणि आकाशाचा वेध घेणाऱ्या मनोऱ्यांनी ही मस्जिद परिपूर्ण होती. सभोवतालची साधी पण नीटपणे जोपासलेली बाग, चिनार - देवदारची उंच वाढलेली झाडं, सुखद गारवा आणि पवित्र नीरव शांतता यानं परिसरामध्ये श्रद्धेचं रोपण झालं होतं!

हजरतबल मशिदीचं मुस्लिमांसाठी फार महत्त्व आहे; कारण इथं इस्लामचे धर्मसंस्थापक प्रेषित महंमद पैगंबरांचा पवित्र केस - मोई-ई-मुकद्दस - जतन करून ठेवलेला आहे. मला गतवर्षी श्रीलंकेत गेलो असताना कँडीला पाहिलेल्या बुद्धाच्या दंत मंदिराची आठवण झाली. धर्मसंस्थापकाच्या खुणा पूजनीय वाटण्याची ही वृत्ती खास आशियाई आहे. १६९९ मध्ये हा पवित्र केस इथं ठेवण्यात आला, असा इतिहास आहे. विशेष सांगण्याजोगी गोष्ट म्हणजे सध्याचं मशिदीचं संगमरवरी बांधकाम मुस्लीम औकाफ ट्रस्टच्या वतीने १९६८ ते १९७९ दरम्यान शेर ए - काश्मीर शेख अब्दुल्ला यांच्या पुढाकारानं व सक्रिय सहभागानं झालं. ही माहिती मला ड्रायव्हरनं दिली. तेव्हा मला १९७४ साली नांदेडला यशवंत महाविद्यालयात मी शिकत

असताना तिथे शेख अब्दुल्लांचं व्याख्यान झालं होतं, त्याची आठवण झाली. साडेसहा फुटांची सणसणीत उंची, भरदार बांधा, खास काश्मिरी देखणं रूप, फैज कॅप - शेरवानी असा टिपिकल पोषाख आणि धारदार प्रभावी हिंदी मिश्रित उर्दूमधलं वक्तृत्त्व. ते आपल्या ओजस्वी भाषणानं काश्मीर खोरं पेटवायचे म्हणे; ते वर्णन सार्थ वाटलं होतं मला त्यावेळी. मी ही माहिती ड्रायव्हरला दिली तेव्हा तो सुस्कारा सोडीत म्हणाला, 'वो जाने के बाद सब कुछ बिखर गया. काश....'

शेख अब्दुल्ला हे काश्मिरी अस्मिता, काश्मिरी ओळख, अर्थातच काश्मीरियतचे प्रतीक असल्याचे अनेक अभ्यासक मानतात. भारतात प्रत्येक राज्यात उपराष्ट्रवाद (Sub Nationalism) आहे, पण तो भारतीय राष्ट्रवादाचा (Indian Nationhood) भाग मानतात. शेख अब्दुल्लांनी मात्र काश्मीरची ओळख उपराष्ट्रवादापुरती न ठेवता ती स्वतंत्र राष्ट्रवादाकडे अथक परिश्रमांतून नेली.

त्यांच्यासाठी कश्मीरियत ही ऋषी - सूफी परंपरेच्या अभिव्यक्तीपेक्षा स्वतंत्र राष्ट्र संकल्पनेची होती, पण त्यांची व पयार्याने काश्मीरची अशी गोची झाली, की पाकिस्तान त्यांचं स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व मान्य करत नाही. (आज काश्मीर धगधगता ठेवण्यासाठी 'आझादी'चं नैतिक समर्थन ही त्याची स्ट्रॅटेजी आहे.) आणि पाक आक्रमणाला बळी पडू नये म्हणून भारतात नाईलाजानं विलिनीकरणाच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करून सामील होणं शेख अब्दुल्ला व महाराजा हरिसिंग यांना भाग पडलं. भारतीय सैन्यानं काश्मीरच्या रक्षणासाठी कारगिलसह चार युद्धांचा सामना करून आपलं रक्त सांडलं व परमोच्च बलिदान केलं, त्यामुळे भारतीय मानसिकता काश्मीर सोडायला कधीच तयार होणार नाही हे निर्विवाद. त्याचबरोबर काश्मीर हा कश्यप मुनी, बिल्हण, पातंजली व कल्हणची कर्मभूमी म्हणून; सम्राट अशोकाच्या साम्राज्याचा भाग म्हणून आणि हिमालय हा भारताचा पूजनीय उत्तर सीमेचा रखवालदार मानीत असल्यामुळे भारतीयांची काश्मीरशी भावनिक, सांस्कृतिक व धार्मिक नाळ जुळलेली आहे. इतिहासाचे काटे मागे फिरवता येत नाहीत, ही वस्तुस्थिती शेवटपर्यंत शेख अब्दुल्लांनी मान्य केली नाही व आज हुरियत नेते पण ती स्वीकारण्याच्या मन:स्थितीत नाहीत. मुख्य म्हणजे पाकिस्तानसाठी आजही काश्मीर 'अनफिनिशड् अजेंडा ऑफ पार्टिशन' आहे. प्रत्येक क्षेत्रात भारताशी बरोबरी करणे (Parity with India) या महत्त्वाकांक्षेनं पाकिस्तान पहिल्यापासून झपाटलेला आहे. भारतात हजार वर्षे राज्य केल्यामुळे स्वातंत्र्यपूर्व भारतात मुस्लीम हे किमान हिंदूंच्या बरोबरीचे असावेत असं मानणाऱ्या वृत्तीतून पुढे मोहंमद अली जिनांनी 'द्विराष्ट्रवाद' चा सिद्धान्त (Two Nation Theory) मांडला आणि भारताची फाळणी झाली. पण काश्मीर त्यांच्या १९४८ च्या आक्रमणाच्या आततायी निर्णयानं भारतात सामील झाला आणि हा प्रश्न न भरून येणाऱ्या जखमेप्रमाणे चिघळत गेला.

काश्मीर प्रश्नाचं एक गंभीर स्वरूप म्हणजे धोक्यात आलेली काश्मीरियत होय. काश्मीरियत ही काय संकल्पना आहे? ते तत्त्वज्ञान आहे की जगण्याची एक रीत आहे? काश्मीरच्या नागरिकांची भारताहून अलग - पाकिस्तानपेक्षा सर्वस्वी भिन्न अशी ओळख - आयडेंटिटी आहे का? या प्रश्नांचा विचार करणं आवश्यक आहे. आज तथाकथित 'आझादी' साठी 'जंग' छेडणाऱ्यांमुळे व जहाल धर्मवादाचा आश्रय घेत दहशतवाद हे राज्याचे नीतिधोरण (Instrument of State policy) म्हणून राबवत भारताला हजार जखमा करीत रक्तबंबाळ करण्याच्या पाकिस्तानच्या धोरणामुळे काश्मीरचे अभूतपूर्व वैशिष्ट्य असलेली काश्मीरियत धोक्यात आली आहे. १९९० च्या काळात काश्मीर खोऱ्यातून जवळपास सर्वच काश्मिरी हिंदू पंडितांना आपलं घर - गाव सोडून देशातच निर्वासित व्हावं लागल्यामुळे त्यांच्या सह अस्तित्वाविना काश्मीरियत कशी टिकेल? हा प्रश्न काश्मिरी मुस्लिमांतील सुजाण नागरिकांनाही पडलेला आहे.

काश्मीरियत म्हणजे नेमकं काय आहे? त्याला तडे गेले आहेत म्हणजे काय घडलं आहे - घडत आहे? या दोन जटिल प्रश्नांचा वेध घेण्यापूर्वी, क्षीण झाली असली तरी काश्मीरियत अद्यापही पंडित व काश्मिरी मुस्लिमांत आजही धगधगती आहे. त्याची आशेचा दीप मनात पेटवणारी काही उदाहरणे पाहू.

श्रीनगरचा टागोर हॉल काश्मिरी मुस्लिमांनी त्या संध्याकाळी खचाखच भरलेला. 'मौज कशिर' नावाचा हा गीत - संगीताचा कार्यक्रम होता. पण त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो १४ ते १६ वयोगटातील, काश्मीर खोऱ्याला अंतरलेल्या, काश्मिरी पंडितांच्या जम्मू व दिल्ली येथे निर्वासित म्हणून जगताना जन्मलेल्या मुलांचा तो कार्यक्रम होता. ही मुले लाल देड, नुरुद्दिन उर्फ नंद ऋषी, मेहजूर, अब्दुल आझाद, दीनानाथ नदीम व मोतीलाल साकी इत्यादींची काश्मिरी गीतं मनापासून गात होती आणि ऐकणारे काश्मिरी मुस्लीम श्रोते केवळ दादच देत नव्हते तर त्यांच्या डोळ्यांतून आसवं वाहत होती. त्यामागे एक खंत होती - शतकानुशतके बांधव असलेल्या व ज्यांच्या सहअस्तित्वाविना कमतरता वाटते त्या काश्मिरी पंडितांना खोऱ्यातून स्थलांतरित व्हावं लागलं होतं. ती रुखरुख व बोचणी त्या संध्याकाळी सांद्र झालेल्या नजरेतून तीव्रतेनं टपकत होती.

'सर्व चिनार व हिरवळ जळालीय
आम्ही आता कुठे एकमेका भेटू?
सर्व झऱ्यांना काटेरी कुंपणाचा विळखा पडलाय
आम्ही आता कुठे एकमेका भेटू?'

मोतीलाल साकीच्या या गीताचे शब्द कानी पडले आणि टागोर हॉलमधील सर्व काश्मिरी मुस्लीम भावविभोर झाले.

अरिफ बशीर या 'डेली खिदमत' च्या इंग्रजी दैनिकाच्या सहायक संपादक व लेखकानं वरील प्रसंग वर्णन करून जे स्फुट लिहिलं, त्याचा काही भाग मी खाली उद्धृत करीत आहे.

'आज टागोर हॉलमध्ये काश्मीरियत पुन्हा एकवार जिवंत झाली होती. सर्व प्रकारचा त्रास, मनस्ताप, घाणेरडं राजकारण आणि हिंसा - खून सोसूनही काश्मीर व काश्मिरी जिवंत आहेत. मागील दोन दशकांत काश्मीरियतला अनेक तडे गेले, ही कटू असली तरी वस्तुस्थिती आहे, पण आजच्या कोवळ्या निर्वासित पंडित मुलांच्या गीत-संगीतानं एक बाब निश्चितपणे काश्मिरी मानसावर ठळकपणे अधोरेखित केली आहे, ती म्हणजे पंडित आम्हांस पारखे झाले नाहीत. काश्मिरी भाषा व कश्मीरियत या संस्कृतीनं - जीवनशैलीनं पंडित व खोऱ्यातले मुस्लीम परंपरांशी रेशीमगाठींनं बांधले गेले आहेत. हे धागे सैलावले असले, तरी कधीच तुटणार नाहीत. या कार्यक्रमाच्या वेळी बारामुल्लाचे एक शिक्षक गुलाब नबी गनी यांनी जे म्हटलं, ते किती सार्थ आहे! 'चौं थ चू येटे, मगर झू चे तौरेर' (काश्मिरी वाक्य) अर्थात 'मुख इथं (काश्मिरी मुस्लिमाकडे) तर जीभ तेथे (काश्मिरी पंडिताकडे)' आहे. त्यामुळे आज जरी पंडित निर्वासित झाले असले व दोन जमातीत काही कटुता व गैरसमज असले तरी या दोन जमाती मन, भावना व संस्कृती - सहअस्तित्वानं एकमेकाशी बांधल्या गेल्या आहेत. ही काश्मीरियतच एक दिवस पंडितांना खोऱ्यात परत आणेल व काश्मीरी मुस्लीम त्यांचं मिठी मारून स्वागत करतील.'

हा एक साधा प्रसंग एका संध्याकाळचा, गीत संगीताचा, पण तो काश्मीरियतच्या संदर्भात जरा विस्ताराने सांगितला एवढंच.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीनगरमधून उमर अब्दुल्लाविरुद्ध किशनकुमार खोसा हा ५५ वर्षांचा काश्मिरी पंडित उभा ठाकला होता. त्याच्या शब्दांत सांगायचं झालं तर 'I have decided to revive the peaceful and harmonious environment of Kashmir. My sole strength is my intrinsic faith in kashmiriyat- an ideology that, inspite of violence, is still the way of life for us kashmiries. I also want to restore the values of peace, brotherhood and inter community bond.' किशनकुमारचं निवडणुकीत काय झालं हे सांगायला नको; पण जम्मूत निर्वासित म्हणून राहात असतानाही श्रीनगरमधून 'काश्मीरियत' साठी लढा देण्याचा त्यांचा निर्धार माझ्या मते महत्त्वाचा आहे.

आता काश्मीरियत ही संकल्पना, तत्त्वज्ञान किंवा जीवनशैली काय आहे हे पाहू या!

काश्मीरियत ही मूलत: काश्मीर लोकांची एतद्देशीय राष्ट्रवादी जाणीव, सामाईक स्वरूपाचं भान आणि सांस्कृतिक मूल्यांची प्रखर जाणीव असलेली सहअस्तित्वाची

जीवनशैली आहे. ती साधारणपणे १६ व्या शतकापासून क्रमशः विकसित होत दृढमूल झालेली पाहायला मिळते. तिची वैशिष्ट्यं धार्मिक व सांस्कृतिक सामंजस्य, आपल्या हिमालयाच्या डोंगराळ व निसर्ग सुंदर प्रदेशावरची प्रखर देशभक्ती आणि अभिमान ही आहेत.

खरं तर काश्मीर खोऱ्यामध्ये सांस्कृतिक, धार्मिक व प्रादेशिक विविधता आहे. इतिहासकाळात या भूभागात हिंदू शैव धर्म आणि बुद्ध धर्माचा प्रभाव होता. मध्ययुगात इस्लामचा प्रवेश झाला; पण तो तलवार गाजवणाऱ्या सुलतान बादशहामार्फत नाही तर सूफी संत - पीरांमार्फत प्रेम व शांतीचा संदेश घेऊन. महाराजा रणजितसिंगांनी जेव्हा काश्मीर जिकलं, तेव्हापासून, म्हणजे अठराव्या शतकापासून, इथं शीख धर्मही रुजला. थोडक्यात, काश्मीरमध्ये चारही धर्मांची वस्ती आहे. हिंदूसाठी काश्मीर कश्यप ऋषींनी काश्मीरची निर्मिती केली असल्याच्या श्रद्धेमुळे, अशोक- कनिष्कांपासून बौद्ध धर्माचा व्यापक प्रचार झाल्यामुळे बौद्धांसाठी, झैन उल अबिदिन व अकबरामुळे आणि हजरतबल मशिदीमुळे मुस्लिमांसाठी व महाराजा रणजितसिंगमुळे ही भूमी आपली मानणाऱ्या शिखांमुळे, काश्मीरची धार्मिक बहुविधता सिद्ध होते, पण सहअस्तित्वाची जीवनश्रद्धा चारही धर्मांत असल्यामुळे काश्मीरियतचे तत्त्वज्ञान सिद्ध झाले. कश्मीरियत म्हणजे देशभक्ती, बंधुभाव, देशीय संस्कृतीचा अभिमान आणि धार्मिक सहिष्णुता.

'The true meaning of Kashmiriyat' या लेखात विजय के. साझबाल म्हणतात की, काश्मीरियतचा विषय निघाला की मागे पडलेल्या रम्य भूतकाळाची स्मृती जागृत होते; किंवा सरळसरळ या संकल्पनेची धज्जी उडवली जाते. तरीसुद्धा आजही जेव्हा जम्मूच्या मुठी कॅम्पमध्ये पंडित मोईनुद्दीन आग्रे या मृत झालेल्या मुस्लिमाचं इस्लामी परंपरेनुसार दफन करतात किंवा श्रीनगरमध्ये जेव्हा एकट्यादुकट्यानं राहणाऱ्या पंडित किंवा पंडिताईनचे निधन होतं, तेव्हा मुस्लीम पुढे सरसावत विधिवत दहन करतात, तेव्हा त्यांच्या कृतीमधून कश्मीरियतचे संस्कार प्रकट होत असतात.

काश्मीरियतचा विकास कसा झाला? सर्वसाधारणपणे त्याला दोन बाबी कारणीभूत ठरल्या असे अभ्यासक मानतात. पहिला घटक हा दोन मुस्लीम राज्यकर्त्यांचा उदारमतवादी राज्यकारभार होय. दुसरा घटक म्हणजे काश्मीरी भाषेत मानवतावादी तत्त्वज्ञान सांगणारे दोन संत कवी - लाल देड आणि नुरुद्दीन उर्फ नंद ऋषी - व त्यांचं काश्मिरी भाषेतले काव्य होय.

काश्मीरमध्ये बुलबुल शहा या तुर्कस्थानच्या मुस्लीम सूफी संताचे सहदेवा या राजाच्या कालखंडात (तेराव्या शतकात) आगमन झाले. त्यानं शांततापूर्ण रीतीने धर्म-प्रसार केला. जुलमी राजवटीला कंटाळलेल्या अनेक हिंदू व बौद्ध धर्मीयांनी सूफी संतांचा साधेपणा, मानवतावाद व पवित्र जीवनव्रताकडे आकृष्ट होऊन इस्लामचा स्वीकार केला. काश्मीरचा पहिला मुस्लीम सुलतान म्हणजे शमशुद्दीन होय. त्यानंतर

अनेक मुसलमान राजवटी आल्या व गेल्या, त्यापैकी काहींनी, विशेषत्वाने सिकंदरने, जबरदस्तीनं धर्मप्रसार केला.

पण त्याचा मुलगा शाहीखान उर्फ झैन-उल-अबिदिन याचा कालखंड काश्मीरच्या इतिहासात शांतता, स्थैर्य व प्रगतीचा ठरला. त्याच्यावर लाल देड व प्रामुख्याने शेख नुरुद्दिनच्या काव्य व मानवतावादी, सहिष्णुतावादी तत्त्वज्ञानाचा गाढा प्रभाव होता. त्यामुळे त्याच्या काळात हिंदू पंडितांना समाजजीवनात मानाचं स्थान मिळालं व त्यांना धार्मिक स्वातंत्र्यही उपभोगता येऊ लागले. त्याच्यामुळे मुस्लिमांना ही जाणीव झाली, की समान सांस्कृतिक ओळख, मानवतावाद, सहअस्तित्व व उदारमतवादाच्या आधारे आपली धार्मिक ओळख जपत हिंदूशी बंधुभावानं जगता येतं, राहाता येतं. ही काश्मीरियतची सुरुवात म्हटली पाहिजे.

त्यानंतर एका शतकानंतर मुघल सम्राट अकबरानं काश्मीर प्रदेश जिंकून आपल्या साम्राज्याला जोडला. त्यानं १५८२ मध्ये 'दिने इलाही' ची (दिव्य धर्म) स्थापना केली. त्यात हिंदू व इस्लाम धर्मांतील सर्वोत्तम बाबींचा संगम साधला. त्यामुळे समाजजीवनात नैतिक व मानवतावादी मूल्य व पवित्र राहणीमानाची मुळं रुजली गेली. अकबराने मानवी मूल्यं, धार्मिक सहिष्णुता, बहुविधता व वैयक्तिक नीतिमत्तेचे नवे मानदंड प्रस्थापित केले. जेव्हा त्यानं काश्मीर जिंकले, 'दिने इलाही' च्या आधारे पुन्हा एकवार तिथे धार्मिक सद्भाव निर्माण झाला आणि काश्मीरियतला बळ मिळालं.

काश्मीरियतचे अभ्यासक विजय के. साझबाल यांच्या शब्दांत सांगायचं झालं तर - 'Due to Zain ul - Abidian and king jalal ud Din Akbar, Kashmiriyat has emerged as the identity of choice in kashmir. In its infancy, it was defined by three Characteristics : a benevolent and wise ruler who has a grand vision, a majority community (i.e. muslims) that willingly accommodated pluralism as socially enriching and kindness towards minorities as a worthy virtue, and a minority community (i.e. Hindu) that lived a life of dignity unknown in many parts of the world in the 16th century and even later.

Hence, kashmiriyat came to the be characterized and expressed by religious, caltural and social harmony in a land blessed by God as a paradise and where a confluence of Sufism. Shaivism, Buddism and sikhism in magnificent and naturally beautiful surroundings provided an ideal sense of brotherhood resilience and interdependency to fight physical isolation as the region used to be cut off from the rest of the world for nearly six months in a year. That sense of

fraternity and isolation has led to both pride and patriotism among Kashmiries and it has become fashionable to use kashmiriyat both as societal and political expressions.'

काश्मीरियत जीवनशैली विकसित होण्यामध्ये कारणीभूत ठरलेला दुसरा घटक म्हणजे तेथील संत - सूफी कवींची परंपरा व त्यांची काव्यरचना. त्यातही प्रामुख्याने प्रारंभीच्या काळात लाल देड व नुरुद्दीन यांचा काश्मिरी जनतेवर - हिंदू व मुस्लीम दोहोंवरही गाढ प्रभाव पडला आहे.

प्रसिद्ध पत्रकार व लेखक एम. जे. अकबर यांनी त्यांच्या Kashmir - Behind the vale' या पुस्तकाच्या एका प्रकरणात लाल देड व नुरुद्दीनच्या सूफी संत परंपरेचे वर्णन करून त्याद्वारे काश्मीरची स्वतंत्र ओळख व हिंदू-मुस्लीम बंधुभाव कसा निर्माण झाला याचं समर्पक कथन केले आहे.

लाल देड ही संत कवयित्री. हिने काश्मिरी भाषेला तिची स्वतंत्र ओळख करून दिल्याचे आता सर्वसामान्य झाले आहे. मराठीसाठी जसे ज्ञानेश्वर आद्य महत्त्वाचे, तसंच काश्मिरी भाषेसाठी लाल देड किंवा लल्लेश्वरी महत्त्वाची. काश्मिरी ही संस्कृतोद्भव प्राकृत भाषा म्हणून जन्मास आली. पण तिच्यावर इराणियन व इंडोजर्मनमधल्या दार्डिक (Dardic) भाषेचा बराचसा प्रभाव आहे. मार्को पोलोने काश्मिरी भाषेचा उल्लेख केला आहे. त्यावरून तिचे प्राचीनत्व लक्षात येतं. पण ही कधीही राज्यभाषा झाली नाही हे तिचं दुर्दैव! ती आज मोठ्या प्रमाणात बोली भाषाच राहिली आहे. ही भाषा संगीताला अत्यंत अनुकूल आहे. कारण तिच्यात कठीण शब्द नाहीत.

तरीही काश्मिरी माणसांनी प्रत्येक जनगणनेत आपली मातृभाषा म्हणून काश्मिरी भाषा उर्दूला बाजूस सारून नोंदली आहे. कारण ती त्यांच्यासाठी अस्मितेची बाब आहे. याला कारण आहे लाल देड व नुरुद्दिनचा जनमानसावरील काश्मिरी भाषेमार्फत पडलेला अमिट ठसा होय. जशी मराठीसाठी तुकोबाची वाणी सत्य आहे, तसंच लाल देड हिचे 'वाख' व नुरुद्दिनची 'श्रोक' (श्लोकाचा अपभ्रंश) मधून प्रकट केली. कविता काश्मिरी जनतेचा मानबिंदू आहे. त्यांच्या संस्कृतीची निशाणी आहे. काश्मीरियत संकल्पनेत या दोन संत कवींच्या काश्मिरी भक्तिकाव्याचा प्रभावी हिस्सा आहे.

लल्लेश्वरी उर्फ लाल देड ही संत कवियित्री श्रीनगरजवळच्या छोट्या पंडरेठन या गावात ब्राह्मण कुटुंबात १४ व्या शतकात जन्मास आली. तिचा बाराव्या वर्षी विवाह झाला; पण बावळट नवरा व कजाग सासूमुळे तिचा फार छळ झाला. तिनं असह्य होऊन घर सोडलं. तिला तिच्या सुदैवानं शाह हमादान हे सूफी संत भेटले व तिला आत्मसाक्षात्कार झाला. शाह हमादानमुळे तिच्या काव्यावर सूफी तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो. ज्याप्रमाणे गौतम बुद्धांनी आपल्या धर्म व तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी पाली ही सामान्यजनांची भाषा वापरली, तशीच लाल देडनं काश्मिरी भाषा वापरून

'वाख' काव्य प्रकारात प्रामुख्याने रचना करून लोकांना मानवतावाद व बंधुभाव शिकवला. तिच्या काव्यरचनेचा प्रधान उद्देश हा तत्त्वज्ञानात क्रांती करून ते सुलभ करणे व सांस्कृतिक परंपरेचं पुनरुज्जीवन करणे हा होता.

लाल देड ही तिच्या जीवन काळातच एक दंतकथा बनली होती. तिच्या प्रभावी काव्यरचनेनं व त्यातून मिळणाऱ्या आध्यात्मिक मार्गदर्शनानं हिंदू व मुस्लीम दोघेही तिच्याकडे आकृष्ट झाले. हिंदूंसाठी ती लल्लेश्वरी होती तर मुस्लीमांसाठी आरीफ लैला. तिचं काव्य माणसांच्या अंतरात्म्याला साद घालणारं होतं. तिला मंदिर-मशीद, पुजारी-मौलवी व रूढी-परंपरेचा तिटकारा होता. तिचा हा एक प्रसिद्ध वाख पहा -

'शिव चुई थाली थाली रोझन
मो झन हिंदू ला मुसलमान
युट ऐ चूक पान जनुन परझान व
सोय चाई साहिवास सती झनिये झन'

(शिव (शंकर) हा सर्वत्र राहातो. हिंदू व मुस्लिमांना विभाजित करू नका. बुद्धी वापरून स्वत:ला ओळखा. हाच ईश्वराला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.)

तिच्या काव्यात गूढ शैव तत्त्वज्ञान व इस्लामच्या सूफी विचारांचा सुरेख संगम दिसून येतो.

तिचा आजच्या काळातही क्रांतिकारी वाटणारा हा वाख जे. एल. कौल यांच्या भाषांतरित पुस्तकातून उद्धृत केला आहे -

'Idiol is of stone, temple is of stone
Above (temple) and below (idol) are one.
Which of them shall thou worship,
oh, foolish Pandit?
Cause thou the union of mind with soul.'

लाल देडच्या काव्य रचनांमुळे काश्मीरमध्ये एक प्रकारची वैचारिक क्रांती होऊन प्रबोधनाची पहाट उगवली. तिने बेकार रूढी परंपरा, आंधळ्या श्रद्धा आणि जातीचा अभिमान यावर कठोर प्रहार केले. ती तुकाराम, कबीर परंपरेतली भक्तीच्या परिघात क्रांतिशील कवयित्री होती. तिच्यामुळे काश्मिरी भाषा ही समृद्ध बनली आणि काश्मीरियतचा अतूट हिस्सा बनली.

सूफी संत नुरुद्दिन हा पहिला मुस्लीम संत होता, ज्याला ऋषी पद बहाल केलं गेलं आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी ऋषी-सूफी परंपरा काश्मिरात सुरू व समृद्ध झाली. तो लाल देडचा समकालीन नसला तरी तिच्या पाठोपाठ त्याची काव्यरचना जन्मास आली. असं म्हणतात की, लाल देडनं त्याला आपलं दूध पाजलं होतं. काश्मिरींची

अशी श्रद्धा आहे की, तिनं केवळ दूध पाजलं नाही, तर तत्त्वज्ञान पाजलं. लाल देडप्रमाणे हिंदू त्यांना सहजानंद या नावानं ओळखतात किंवा नंद ऋषी; तर मुसलमान त्याला शेख नुरुद्दिन म्हणून. त्याचा 'नूरनामा' हा काव्यसंग्रह काश्मिरी भाषेचा अमूल्य ठेवा आहे. त्याची समाधी चरारे शरीफला आहे. तेथे दरवर्षी मोठा उरूस भरतो व त्याला हिंदू-मुस्लीम दोघेही मोठ्या संख्येने जमतात व त्याची अजरामर काव्यगीतं गातात.

नंद ऋषी हा कमालीचं साधं जीवन जगला. खडबडीत वुलनचा फेरन हा पोशाख तो करायचा, पायात लाकडी खडाव व कोन असलेली, डोईस घट्ट बसणारी टोपी. आज आम काश्मिरी हाच पोशाख वापरतो. नुरुद्दिन फक्त जंगली पानांचं अन्न म्हणून सेवन करायचा. तो नित्य नियमानं नवीन झाडं व रोपं लावायचा.

त्यानं श्रोक या काव्य प्रकारात आपल्या रचना केल्या. त्याची व लाल देडची आध्यात्मिक व तात्त्विक दृष्टी व विचार समान होते. त्यानेही दोन्ही धर्मांत एकोपा व बंधुभाव राहावा अशीच शिकवण दिली.

त्याची ही काव्यरचना पाहा व तिचं तुकोबा - कबीराशी असलेलं साम्य व क्रांतदर्शित्व सहजतेनं ध्यानात येईल.

'For true workshop of God
Do not go to Shaikh or priest or Mullah;
Do not feed the cattle on poisonos leaves.
Do not shut yourself,
Up in mosques or forests;
Enter your own body,
Control your breath,
And commune with God.'

झैनुद्दीन अबिदिनचा बाप सिकंदर हा हिंदूद्वेष्टा होता. त्याच्या काळातच नंदऋषी उर्फ नुरुद्दिन होता. हिंदू - मुस्लीम हा धर्म भेदभाव त्याला साफ नामंजूर होता. त्यानं सिकंदरला विरोध करीत एक श्लोक लिहिला, तो असा आहे -

'आम्ही एकाच आई बापाचे आहोत.
तर मग हा भेद का?
आपण हिंदू व मुस्लीम एकत्रित
देवभक्ती करू या.
आपण या जगात भागीदार म्हणून आलोत,
सुख-दु:ख आपण एकत्रित भोगू या.'

लाल देड व नुरुद्दिनचा एवढा प्रभाव काश्मिरी जनतेवर आजही आहे की त्यांच्या बोलण्यात या दोघांच्या काव्यपंक्ती - ज्यांना सुभाषितांचे रूप आले आहे - आपलं म्हणणं सांगण्यासाठी वापरतात. जसं आपण तुकोबांचे 'असाध्य ते साध्य, कारण अभ्यास तुका म्हणे' किंवा 'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण' सारखे अभंग बोलताना वापरतो वा रामदासांच्या 'मनाच्या श्लोकांचा' आधार घेतो, तसंच काश्मिरी जनता सहजतेनं लाल देड व नुरुद्दिनच्या काव्यपंक्ती उच्चारते.

या दोन सूफी संतकवींची परंपरा ऋषी-सूफी परंपरा म्हणून ओळखली जाते. तिचे नेमके महत्त्व काय आहे हे विशद करताना नायला अली खान यांनी 'The culture of 'Kashmiriyat' in the land of sufi poetess Lalla Ded' या निबंधात म्हटलं आहे की,

'South Asian Islam finds its best expression in Kashmir's Rishi - Sufi order and its precious gift known in the valley and beyond as kashmiriyat, of which the kashmiri people are instantly proud. The defining features of Kashmiri Sufism are a belief in both the transcendence and immanence of God, Respect for other religion, emphasis on following the right path, developing mind's potential through mediation and absorption, love for idols of Gods and goddesses and contempt for the Mullah, the priest who teaches a ritulistic version of Islam.'

सारांशरूपानं सांगायचं झालं, तर कश्मीरियतचे तत्त्वज्ञान, जीवनशैली ही भक्ती-काव्याद्वारे सिद्ध झाली. तिला जीवनशैलीचे रूप जैनुद्दिन अबिदेन आणि सम्राट अकबराच्या सहिष्णु राजवटीने दिले. त्या काळात भारतात व जगभरही तलवारीच्या बळावर धर्मप्रसार करण्याची प्रवृत्ती आम होती, पण त्याला अपवाद काश्मीरवरील कारणामुळे ठरला. पुन्हा जम्मू-काश्मीरचं अलगत्व व वेगळेपण त्याच्या भौगोलिक परिस्थितीत आहे. आजही अत्याधुनिक दळणवळणाची साधनं असताना जम्मू-श्रीनगर रस्त्यावर होणाऱ्या बर्फवृष्टीमुळे आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस काश्मीरचा जगापासूनचा रस्त्याच्या मार्गाने असलेला संपर्क तुटतो. पुन्हा अनुपमेय असं निसर्ग सौंदर्य, गात्रन्‌गात्र गोठवून टाकणारी थंडी आणि दैनंदिन जगण्याची अविरत लढाई यामुळे तेथे सहिष्णुता व आध्यात्मिकता अधिक प्रमाणात आहे. या साऱ्याचा परिपाक म्हणजे त्यांची स्वतंत्र निर्माण झालेली ओळख. तीच काश्मीरियत होय!

या काश्मीरियतमुळे द्विराष्ट्रवाद काश्मीरला मंजूर नव्हता. जेव्हा पाकिस्ताननं १९४८ साली आक्रमणाद्वारे काश्मीर घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा काश्मिरी लोकांनी भारतात सामील होताना जराही खळबळ केली नाही. एका व्यापक अर्थानं काश्मीरियत

ही भारतीयतेचा भाग आहे; कारण भारतीय संस्कृती पण विविधतेमध्ये एकता जपणारी व धार्मिक सहिष्णुता व सहअस्तित्व मानणारी आहे. ईश्वर एक आहे व तो मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत, हा भारतीय हिंदू तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. त्यात लाल देड व नुरुद्दिननंही हेच तत्त्वज्ञान भक्तिकाव्याद्वारे मांडलं, जे आम काश्मिरी नागरिकांच्या मनात आजही घर करून आहे.

म्हणून मला माझ्या आठवड्याभराच्या काश्मीरच्या वास्तव्यात काश्मीरियतचा बोध होत होता आणि म्हणूनच जेव्हा नायला अली खान Kashmiriyat is a pototype for Hindustaniyat' असं म्हणतात ते सार्थ वाटतं. त्याचं सूत्ररूपानं कारण सांगताना त्यांनी म्हटलं आहे, 'Kashimir's deepest connection with Indian Nation is of course in the spiritual realm. Where else but in kashmir would you find Muslim prepared not so openly prehpas in the present milieu to claim their vedic and Buddist heritage through is unparalled rishi - sufi order anywhere is the world?

त्यामुळे तेव्हा 'रोजा' सिनेमा पाहून मी दिलेली प्रतिक्रिया आज मला अतिरंजित व रोमँटिक वाटत नाही. माझ्या मते कश्मीरियत हे भारतीयतेशी नातं सांगणारे तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे काश्मीर भारतापासून अलग राहू शकत नाही.

पण फाळणीपासून काश्मीर ही एक न सुटलेली समस्या आहे हे ही खरंच. त्याची प्रमुख कारणं म्हणजे शेख अब्दुल्लांनी स्वतंत्र काश्मीर देशाचं पाहिलेलं स्वप्न आणि पाकिस्तानची नीती, की काश्मीर हा फाळणीचा राहिलेला उर्वरित कार्यक्रम आहे. त्याचा परिपाक म्हणजे राहिलेला आजचा काश्मीर प्रश्न होय.

तो पाकिस्तानच्या बाजूनं सुटावा म्हणून पाकिस्तान एकाच वेळी अनेक आघाडीवर प्रयत्न करीत आहे. त्यातली एक आघाडी आहे काश्मीरियतवर प्रश्नचिन्हं लावणं व ती संपविण्याचा प्रयत्न करणं, त्यासाठी फाळणीप्रमाणे पुन्हा इस्लामचा सहारा घेत ऋषी - सूफी परंपरा नाकारणं, ती भारतीय बुद्धिवाद्यांनी गोंडस भाषेत रुजवायचा केलेला प्रयत्न आहे असं प्रतिपादन करीत त्या आडून त्यांना काश्मीर सोडायचा नाही अशी मांडणी करण्याची ते एकही संधी सोडत नाहीत. काश्मिरी मनात धर्मांधतेचे जहर भरवण्यात भारताच्या काही चुकीच्या धोरणांमुळे त्यांना बऱ्याच प्रमाणात यश आलं आहे. त्यातून हुरियत कॉन्फरन्सखाली स्वतंत्र काश्मीरची मागणी करीत अंतिमत: हा भूभाग पाकिस्तानला जोडणं ही पाकिस्तानची नीती ते अनुसरताना दिसतात.

त्याचा खंबीर मुकाबला जसा राजनैतिक - सामाईक व आंतरराष्ट्रीय कूटनीतीच्या आधारे भारत करीत आहे; तसाच तो काश्मीरियेतच्या आधारे करताना दिसत नाही. त्यामुळे आज काश्मीरियतवर हे प्रश्नचिन्ह लावलं जातंय; हे तत्त्वज्ञान हा काही काश्मिरी पंडितांचा काल्पनाविलास आहे, असे गोबेल्स नीतीप्रमाणे रेटून सांगितलं

आहे, त्याचा मुकाबला आपण करीत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

काश्मीरियत तत्त्वज्ञानाला विरोध करीत ती नाकारणे, किंबहुना तिचं काश्मीर जनमानसातलं अस्तित्वच नाकारणे यासाठी जसे जहाल इस्लामी प्रयत्न करतात, तसंच काश्मीर खोऱ्यातून विस्थापित झालेले कश्मिरी पंडितही करतात, ही दुहेरी शोकांतिका आहे.

जहाल इस्लामवादी कश्मीरियत ही सेक्युलॅरिझम व राष्ट्रीयता या दोन तत्त्वज्ञानाचा मिलाफ आहे, असं प्रतिपादन करीत इस्लामला ते दोन्हीही मंजूर नाही असं प्रतिपादन करतात. तसंच सूफी तत्त्वज्ञानही नाकारायचा प्रयत्न करतात. पण साठ वर्षांनंतरही बहुसंख्य काश्मिरी मुस्लिमांना पाकिस्तान आपला वाटत नाही, त्यांची भारताशी भावनिक नाळ जुडलेली आहे. शेख अब्दुल्लांच्या जमान्यापासून त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व व लोकप्रियतेमुळे त्यांच्या मनात स्वतंत्र काश्मीरचे स्वप्न रुजले होते; पण कश्यप मुनींपासूनची काश्मीरची हिंदू परंपरा, अशोक - कनिष्कामुळे रुजलेली बौद्ध परंपरा आणि लाल देड-नरुद्दिन यांची ऋषी-सूफी संत परंपरा या ऐतिहासिक सत्याकडे कसं दुर्लक्ष करता येईल? त्यामुळे काश्मिरियत ही हिंदुस्थानियत आहे हेच खरं!

संपत प्रकाश हे जम्मू आणि काश्मीर ट्रेड युनियन सेंटरचे अध्यक्ष व कामगार नेते, ज्यांना सारा प्रदेश मानतो. त्यांनी कश्मीरियतच्या तत्त्वज्ञानापलीकडे जात काही विचार मांडले आहेत; ते व्यवहारी व पटण्याजोगे आहेत. त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत बिसमिल्ला गिलानी यांनी 'दि ह्युमन राईटस् जर्नल ऑफ जम्मू काश्मीर' साठी घेतली होती. त्यात त्यांनी जी मार्मिक निरीक्षणे नोंदवली आहेत, ती सारांश रूपाने खालीलप्रमाणे मांडता येतील.

'१९४७ - ४८ साली पाकिस्तानी सैन्याचा मुकाबला करताना काश्मिरात एक लोकप्रिय घोषणा प्रत्येकाच्या ओठावर होती. 'हमलावर खबरदार, हम काश्मिरी है तैयार, कदम कदम लडेंगे हम.' त्यामुळे माझ्या मते जेव्हा पंडित व मुस्लीम एकत्रितपणे पुढं येत बाह्य संकटाचा मुकाबला करायला सज्ज राहातात, तेव्हा त्यांची कृती व भावना काश्मीरियत अधोरेखित करते! काश्मीरचे पंडित व मुस्लीम यांची जीवनशैली कमालीची समान आहे. दोघांचे लग्नविधी, पेहराव, खाद्यसंस्कृती सारखीच आहे. त्यांची काश्मिरी भाषा व इतिहास समान आहे. भारतात जशी हिंदू व मुस्लीम वस्ती मोठ्या प्रमाणात अलग असते, तशी काश्मिरात स्थिती नाही. हिंदू पंडित व काश्मिरी मुस्लिमांच्या घराच्या भिंती व सफरचंदांचे केशराचे मळे एकमेकाला खेटून असतात. इथे काश्मिरात दर्गा, मस्जिद व मंदिरांना दोन्ही धर्मीय समानतेनं आदर देतात. त्यामुळे हरी पर्वताच्या माथ्यावर शारिका देवीचं मंदिर आहे, तर त्याच्या खाली मखदूम साहिबाचा दर्गा आहे. काली मंदिर व शाह हमदमची मजार एकमेकाला लागून आहे. बाटमोलाचा दर्ग्याच्या उरुसात हिंदू व मुस्लीम दोघेही काही विशिष्ट काळात

मांसाहारी भोजन करीत नाहीत. मुघल बादशहा जहांगीरनं 'तख्त ई - जहांगिरी' या आत्मपर लेखात असं म्हटलं आहे, की तो जेव्हा जेव्हा काश्मीरला आला, त्याला पंडित व मुसलमान यांच्यात फरक करता आला नाही; कारण दोघांच्या जीवनशैलीत कमालीचं साम्य आहे. दोघांच्या लग्नविधीत फेरन हा पोशाख समान असतो; मेंदीची रात्र व लग्नगीते समान असतात. एवढेच नव्हे, तर त्यांची नावं पण समान आहेत. काश्मिरीतली मोख्त, झुन, रेहत, कालीज ही स्त्री- नामं दोन्ही धर्मांत प्रचलित आहेत. आता सुन्नी मुस्लिमांत अरबी नावांची पद्धत प्रचलित होताना दिसते, पण शिया मुस्लिमांत आजही ही नावे आढळतात. संकटसमयी दोन्ही धर्मीय बाबा ऋषीच्या दर्ग्यात श्रद्धेनं जातात. दोघांची आजही मखदूम साहीब दर्गा व हजरतबलवर श्रद्धा आहे. हीच आमची विरासत आहे. हीच आमची कश्मीरियत आहे.'

अलिकडेच डॉ. मनजित सिंग यांचा 'Kashmiriyat - The pluralist Sufi - Bhakti Rishi Culture' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या प्रकाशनाच्यावेळी बोलताना डॉ. फारुख अब्दुल्लांनी काश्मिरियतची व्याख्या अशी केली आहे -

'Kashmiriyat can be defined as the principle of harmony; a principle that is the essence of pluralistic culture of jammu and kashmir and one that should become the operating principle of the rest of country (India). If India has to survive as a Modern Nation, it has to keep on reinventing the principle of harmony and balance between groups and region.'

फारुक अब्दुल्लांनी त्यांच्या भाषणाद्वारे हेच अप्रत्यक्षपणे सूचित केलं आहे, की काश्मीरियतचे तत्त्वज्ञान पूर्ण भारतात पसरलं पाहिजे. हिंदू - मुस्लीम एकता व मनोमीलनाचा आधार काश्मीरियत व ऋषी - सूफी संत परंपरा होऊ शकते!

काश्मीर प्रश्नावर काश्मिरी जनतेच्या मनासारखा तोडगा काढायचा असेल तर काश्मीरियतच्या आधारे काढावा लागेल. जेव्हा त्यांना 'Kashmiriyat is a prototype of Hindustaniyat' हे पटेल, त्या दिवशी काश्मीर मनानं भारताशी एकरूप झालेला असेल. त्यासाठी राजकारणापेक्षाही संस्कृतिकरणाची कास आपणास धरावी लागेल.

पहलगाम, गुलमर्ग व श्रीनगरमध्ये भटकताना हिमालयाचं अनुपमेय सौंदर्य जाणवतं व भारतीय संस्कृतीमध्ये काश्मीर किती रुजलेला आहे याची हरघडी जाणीव होते. त्यामुळे काश्मीर हिंदुस्थानपासून अलग नाही हे सतत जाणवतं.

आणि इतका सुंदर प्रदेश - भूभाग भारतासाठी स्वर्गाहून कमी थोडाच आहे? तो आपण कसा सोडणार? पाकिस्तानात जाऊ देणार? भारताचे पंतप्रधान नरसिंहरावांनी म्हटल्याप्रमाणे काश्मीर प्रश्न एवढ्यापुरताच शिल्लक आहे की, पाकव्याप्त काश्मीर भारतात केव्हा व कसा येईल? आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकव्याप्त काश्मीर

कदाचित परत भारतात येणार नाही, पण हेही तितकंच खरं, की भारतातला आजचा जम्मू काश्मीर हा भाग पाकिस्तानला कदापिही दिला जाणार नाही. त्याबाबत भारतात शंभर टक्के एकमत आहे. सवाल एवढाच आहे, की काश्मीरचे भारताशी मनोमीलन केव्हा व कसे होणार? त्यासाठी कश्मीरियत आणि हिंदुस्थानियत एकरूप करावी लागेल; तीही कला - संस्कृती व धर्मसहिष्णुतेच्या आधारे. ते एक दिवस जरूर होणार आहे, एवढा दिलासा मला निश्चितपणे माझ्या काश्मीर सफरीत मिळाला.

हजरतबल हा आमच्या काश्मीर सफरीचा शेवटचा टप्पा होता. तिथून आम्ही सरळ श्रीनगर विमानतळावर जाणार होतो. ही मशीद पाहून बाहेर आलो व बगीच्यातून फेरफटका करताना समोर दिसणारं दाल लेक व त्या मागच्या निळसर हिमराशी अंगाखांद्यावर बाळगत दिमाखानं उभ्या असलेल्या गगनचुंबी हिमालय रांगा पाहताना काश्मीरबाबतची प्रसिद्ध काव्यपंक्ती आठवली. ती मी गुणगुणू लागलो -

'अगर फिरदौस बर रुई जमिन अस्त
हमी अस्त ओ हमी अस्त!'

आणि जाणवलं की माझ्यासोबत गेले तीन दिवस साथ देणारा आमचा हुरियतशी सख्यत्व बाळगणारा काश्मिरी ड्रायव्हरही त्याच फिरदोसच्या ओळी माझ्या सुरात सूर मिळवून म्हणत होता -

'जगात जर कुठे स्वर्ग आहे, तर तो इथेच आहे, इथेच आहे, इथेच आहे.'

त्याक्षणी त्याची काश्मिरियत व माझी हिंदुस्थानियत जणू एकरूप झाली होती. आम्ही एकरूप झालो होतो. काश्मीर व भारत एक झाला होता!

तथास्तु! आमेन!

o-o-o

# ३. लिंग असमानतेची विविध रुपे अर्थात लिंगभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी

नोबेल पारितोषक विजेते प्रो. अमर्त्य सेन हे आपणास माहीत आहेत, ते त्यांच्या मानवी स्पर्श असलेल्या आणि सामाजिक परिमाण देणाऱ्या अर्थशास्त्रीय संशोधन व लेखनासाठी. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातला बंगालचा विसाव्या शतकातला सर्वात भीषण दुष्काळ व झालेला मानवी मृत्यू हा केवळ अन्नधान्याची कमतरता यामुळे नसून तो मानवी क्रयशक्ती मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे उद्भवला होता, हे सप्रमाण संशोधनाने प्रसिद्ध केले आहे. प्रो. सेनचा भारतात अकॅडॅमिक जगतापलिकडे फारसा ज्ञान नसलेला पैलू म्हणजे स्त्री - पुरुष म्हणजेच लिंग असमानता आणि त्याचे आर्थिक तसेच सामाजिक परिणाम याबाबतचा, ज्याला सार्थपणे प्रज्ञामयी म्हणता येईल, अशा मूलभूत व ज्यांचे निष्कर्ष अक्षरश: हादरवून सोडतील अशा मौलिक संशोधनाचा होय! अलीकडेच त्यांनी हार्वर्ड विद्यापीठाच्या रॅडक्लिक इन्स्टिट्यूट मध्ये Many face of gender inequality विषयावर जे अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले आणि हिंदु वृत्तपत्र गटाच्या फ्रंटलाईन पाक्षिकाने प्रो. सेनच्या या व्याख्यानाची पूर्ण संहिता आपल्या नोव्हेंबरच्या अंकात कव्हर स्टोरी म्हणून प्रसिद्ध केली, ती समस्त भारतीयांसाठी डोळे उघडविणारी, किंबहुना त्यांच्या नेत्रांत झणझणीत अंजन घालणारी ठरावी एवढी महत्त्वपूर्ण आहे. पुरोगामी व लिंग समानतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व भविष्यातील प्रगतीशील भारताची स्वप्नं पाहाणाऱ्या विविध क्षेत्रातील नेते व कार्यकर्त्यांसाठी या लेखाचा व अमर्त्य सेनच्या या विषयावरील एकूणच अभ्यासाचा डोळस मागोवा घेणे महत्त्वाचे ठरेल. 'लिंगभेदाची अनेक रूपे' या विषयीचा त्यांच्या संशोधन व चिंतनाचा या व्याख्यानाच्या आधारे घेतलेला हा मागोवा.

अमर्त्य सेन आपल्या या तयार केलेल्या अभ्यासपूर्ण भाषणाची सुरुवात एका रोचक संदर्भाने करतात. १८७० मध्ये राणी व्हिक्टोरियानं तक्रारीच्या सुरात म्हटलं होतं, This mad wicked folly of womens rights. पुढे ती उतारवयात असंही म्हणते, 'आम्हाला पराभवाच्या शक्यतेच्या संदर्भात रस नाही. कारण ते अस्तित्वातच

नाही. (We are not interested in the possibilities of defeat, they don't exist.) एका शक्तिमान सम्राज्ञीबाबत ते वास्तव असलं तरी सामान्य जनाला, जे परिस्थितीनं पराभूत होतात, त्यासाठी ते खचितच लागू होत नाही. आणि प्रत्येक देश, जमात व वर्गातील स्त्रियांनाच प्रामुख्याने सर्व प्रकारच्या जगण्याच्या कठीण प्रसंगाला बळी पडावं लागतं, हे कटू असलं तरी विदारक स्वरूपाचं वास्तव आहे.

अपाण ज्या विषमपूर्ण जगात जगत आहोत त्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे स्त्री - पुरुषांची असमान जगण्याची दु:खं आणि ओझी होय. जी उघडपणे स्त्री विरुद्ध पक्षपाती आहेत. जगात जपान ते मोरोक्को, अमेरिका ते उझबेकिस्तान-पर्यंत सर्वत्र लिंगभेद व असमानता आहे. देश व सामाजातील लिंग असमानतेचे पैलू भिन्न, प्रसंगी सूक्ष्मतर स्वरूपाचे असतात. कारण ही देशातील आणि एकसंध अशी प्रक्रिया नाही, तर ती भिन्न तरीही परस्परसंबंधित अशा प्रश्नांची घट्ट गुंफलेली मालिका आहे.

**१. मृत्यू-दरातील असमानता (Mortality inequality)**

जगातील काही भागात लिंग असमानता ही जन्म व मृत्यू दराशी निगडित असून ती स्त्रीच्या संदर्भात पुरुषापेक्षा अधिक असलेल्या मृत्यूदराच्या निर्घृण रूपात दिसून येते आणि त्यामुळे एकूण लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण स्त्रीच्या तुलनेत वाढत आहे. हे प्रकर्षाने उत्तर आफ्रिका आणि आशिया, खास करून चीन व दक्षिण आशियाई देशात, त्यात भारताचा प्रमुख भाग आहे, हे दिसून येते.

**२. जन्म-दरातली असमानता (Natality inequality)**

जगातील अनेक पुरुषप्रधान समाजात मुलीपेक्षा मुलाला महत्त्व दिलं जातं. आपलं जन्माला येणार मूल हे मुलगी नसावी, मुलगा असावा ही तीव्र, प्रबळ इच्छा लिंग असमानतेचा एक प्रमुख घटक असून आजच्या तंत्रविज्ञानाच्या जमान्यात ती केवळ इच्छा न राहता गर्भजल परीक्षेच्या तंत्रामुळे स्त्रीलिंगी अपत्य जन्माला येण्यापूर्वीच नष्ट केली जाण्याचे प्रमाण वाढत आहे. हा प्रवाह प्रामुख्याने पूर्व आशियाई राष्ट्रे आणि चीन व दक्षिण कोरीया मध्ये दिसून येतो. सिंगापूर व तैवान मध्येही तो लक्षणीय रूपात विद्यमान आहे. मागील काही वर्षात भारतासह दक्षिण आशियाई राष्ट्रातही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गर्भावस्थेच स्त्रीलिंग निर्मूलनात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. प्रो. सेन या प्रक्रियेला उपहासानं 'हायटेक सेक्सीझम' म्हणतात.

**३. मूलभूत सुविधेची असमानता**

अनेक देशात जरी डेमोग्राफिक लक्षणे स्त्री विरुद्ध पक्षपाताची बाब दर्शवीत नसली तरी अनेक पद्धतीने तिच्याविरुद्धची लिंग असमानता समाजात विद्यमान आहे. तालिबान राजवटीतला अफगाणिस्थान हा जगाच्या पाठीवरचं एकमात्र असा देश होता, जिथं उघडपणे स्त्री शिक्षणावर बंदी प्रत्यक्षात आचरणात आणली गेली होती. आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडात असे अनेक देश आहेत, जेथे मुलींना

शाळेत जाऊन शिक्षणाची संधी मुलांच्या तुलनेत फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांना त्यांच्या नैसर्गिक गुणसंवर्धन व अर्थपूर्ण सामाजिक मान्यताप्राप्त क्षेत्रात सहभागी होण्याची पुरेशी संधी मिळत नाही. हेही लिंग असमानतेचे एक विदारक स्वरूप आहे.

**४. उच्च शिक्षणसंधीची असमानता**

जरी अनेक देशात पायाभूत प्राथमिक शिक्षण व आरोग्याबाबत फारशी लिंग-असमानता नसली तरी उच्च शिक्षणाच्या बाबतीत ती सार्वत्रिक आढळून येते. तेथे स्त्रियांची संख्या व टक्केवारी पुरुषांपेक्षा फार कमी आहे. हे युरोप व अमेरिकेतही दिसून येते, हे उल्लेखनीय आहे. याचं अगदी ठोकळेबाज रीतीनं कारणे देत समर्थन केलं जातं, म्हणजे स्त्री व पुरुषांची क्षेत्रं वा प्रांत ही वेगवेगळी आहेत. त्याला सर्वच देशात व काळात उघड वा छुपं समर्थन मिळताना दिसून येतं. १७६६ मध्ये रेव्हरंड जेम्स फोर्डीस 'Sermons to young women' मध्ये स्त्रियांना इशारा देत तथाकथित पुरुषी वृत्तीच्या (पक्षी - स्त्रीवादी विचारसरणीच्या) स्त्रियांपासून त्यांनी सावध राहावं असं बजावलं होतं. कारण स्त्री व पुरुषांची कार्यक्षेत्रे भिन्न आहेत. केवळ पुरुषांची कार्यक्षेत्रं म्हणजे युद्ध आणि त्या जोडीला व्यापार, राजकारण, अमूर्त तत्त्वज्ञान आणि बौद्धिक व शारीरिक शक्ती असं रेव्हरंड जेम्सचं प्रतिपादन होतं. ते शास्त्रीय दृष्टीने किती अतार्किक व भ्रामक आहे हे वेगळं सांगण्याची गरज नसली तरी आजही स्त्री व पुरुषांचे प्रांत वेगवेगळे म्हणून अनुभवास येणारी लिंग असमानता ठळकपणे विद्यमान आहे, हे नाकारता येणार नाही.

**५. व्यावसायिक असमानता**

रोजगार आणि वरच्या जबाबदारींच्या पदावरील पदोन्नती वा नियुक्तीच्या संदर्भात स्त्रियांना पदोपदी पुरुषांच्या तुलनेत त्यांच्या प्राप्तीसाठी अविरत झगडावं लागतं. जपानसारख्या लिंग समानतेच्या इतर सर्व बाबत अग्रेसर असणाऱ्या देशातही वरील पदोन्नतीच्या पदी स्त्रियांचं प्रमाण कमी दिसून येतं. ही व्यावसायिक असमानता हा लिंग असमानतेचा एक वरच्या स्तराचा पैलू आहे.

**६. मालकी हक्क असमानता (Ownership inequality)**

जगातील अनेक समाजात मालमत्तेच्या मालकीहक्काबाबत कमालीची असमानता दिसून येते. जमीन व घर या सारख्या मूलभूत गरजेच्या मालमत्तेच्याबाबत स्त्रीच्या वाट्यास नकारघंटाच आली आहे. त्यामुळे केवळ स्त्रीचा आवाजच दबला जात नाही, तर त्या अभावी ती आर्थिक, व्यापारी व सामाजिक क्षेत्रातही पुढे येऊ शकत नाही. ही असमानता जगात सर्वत्र आढळून येते. नियमाला अपवाद असतात, त्याप्रमाणे काही ठळक अपवाद आहेत. उदा. केरळमधील नायर जमातीत मातृसत्ताक कुटुंबसंस्थेमध्ये मालमत्तेचा अधिकार स्त्रियांना पूर्वापार मिळत आलेला आहे.

### ७. कौटुंबिक असमानता

हा लिंग असमानतेचा सर्वात खोल रुजलेला व आजही फारसा कमी न झालेला पैलू आहे. ज्या समाजात, जेथे वरकरणी लिंग असमानतेचे एकही लक्षण (उदा. जन्मदरातला फरक, मुलाला अग्रक्रम वा प्राधान्य देणे, शिक्षण व व्यवसाय / नोकरी) दिसत नसलं तरी तेथेही कौटुंबिक असमानता स्पष्ट जाणवते. स्त्रियांनाच घरकाम व मुलांची निगा याबाबींचे ओझे वाहावे लागते. अनेक ठिकाणी स्त्रियांना बाहेर नोकरी करून दिली जाते, पण घरकाम चुकत नाही. यात प्रामुख्याने पुरुषांनी बाहेर काम करावे व स्त्रीनं घरी, अशी कामाची विषमतामूलक वाटणी दिसून येते. त्यामुळे कौटुंबिक संबंधात स्त्रीच्या वाट्यास असमानता व दुय्यमत्व येते आणि नोकरी व कामाच्या जागीही दुय्यमत्वाची कामं व वागणूक मिळते. त्यामुळे स्त्रियांना ज्ञान आणि बाह्य जगताच्या माहितीपासून वंचित राहावं लागतं. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होत नाही.

या कौटुंबिक असमानतेचा पगडा समाजपुरुषमनावर किती जबर आहे, याचं एक बोलकं उदाहरण प्रो. सेन यांनी या लेखात दिलं आहे. १९७० साली जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्या प्रकाशित एका पुस्तिकेत उष्माकांची गरज या शीर्षकाखाली घरकाम करणाऱ्या स्त्रियांना कमी उष्मांक लागतात. कारण घरकामात शारीरिक हालचाली अत्यंत कमी असतात, असं नमूद केलं आहे. ते किती हास्यास्पद आणि स्त्रीविरुद्ध पक्षपाती आहे, हे वेगळं सांगायला नको. याप्रमाणे लिंग असमानतेचे विविध पैलू स्पष्ट करून प्रो. सेन यांनी असं प्रतिपादलं आहे की, लिंग असमानता निर्मूलन कोणत्याही एका ठोकळेबाज पद्धतीनं करता येणार नाही. काळाच्या ओघात असंही दिसून आलं आहे की, अनेक समाज व देशात एका प्रकारची लिंग असमानता कमी होऊन तिची जागा दुसऱ्या प्रकारच्या असमानतेनं घेतली आहे. भारताच्या २००१ च्या जनगणनेची आकडेवारी काळजीपूर्वक पाहिली तर ही धक्कादायक बाब दिसून येते. लिंग असमातनेचा फटका स्त्री व मुलींसोबत पुरुष व मुलांनाही बसतो, हेही समजून घेतले पाहिजे. या असमानतेने पुरुषांसाठीही काही प्रश्न निर्माण केले आहेत आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे विविध प्रकारची लिंग असमानता ही दुसऱ्या पद्धतीच्या लिंग असमानतेस खतपाणी घालतात. आणि प्रश्न आणि बिकट व गुंतागुंतीचा बनतो.

वर नमूद केलेल्या विविध प्रकारच्या लिंग असमानतेपैकी जन्म व मृत्यू दरातील असमानता हा प्रो. सेन यांच्या चिंता व चिंतनाचा प्रमुख विषय आहे. आणि त्यांचा भर हा भारतीय उपखंडावर आहे. भारत, श्रीलंका, पाकिस्तान व बांगलादेश मध्ये राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधानाचे पद महिला नेत्यांनी भूषविले असूनही हे देश (श्रीलंका वगळून) मृत्यूदराच्या विषमतेच्या संदर्भात जगात सर्वाधिक खालच्या स्तरावर आहेत.

आणि जन्मदर विषमतेमध्ये झपाट्याने मागील काही वर्षात वाढ होताना दिसून येते.

आरोग्य सुविधा, सकस व पुरेसा आहार आणि जगण्यासाठी लागणाऱ्या इतर अनुषंगिक बाबी पुरुषांच्या तुलनेत स्त्रीला कमी व असमान पद्धतीने मिळत असल्यामुळे त्यांच्या मृत्यूदर अधिक आहे, हे प्रो. सेन आकडेवारीने सप्रमाण प्रसिद्ध करतात. जगात प्रत्येक १०० पुरुषांमागे केवळ ९८ स्त्रिया आहेत. अपवाद आहे तो केवळ युरोप व उत्तर अमेरिकेचा, जिथे १०० पुरुषामागे १०५ स्त्रिया आहेत. स्त्रियांचे कमी प्रमाण व कमतरता आशिया व उत्तर आफ्रिकन देशात चिंताजनक आहे. प्रत्येक १०० पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण इजिप्त व इराण मध्ये ९७, बांगलादेश व तुर्कीमध्ये ९५, चीनमध्ये ९४ भारत व पाकिस्तानमध्ये ९३ व सौदी अरेबियामध्ये ८४ आहे. वास्तविक समान आरोग्यसुविधा व आहाराची उपलब्धता मिळाली तर स्त्रियांमधील मृत्यूचे प्रमाण प्रत्येक वयोगटासाठी पुरुषापेक्षा कमी असल्याचे शास्त्रज्ञांचे निरीक्षण आहे. अगदी गर्भातही मिसकॅरेजचे प्रमाण स्त्रीलिंगी गर्भात, पुरुषलिंगी गर्भापेक्षा कमी असते. तरीही हा निसर्गाचा भेदभाव म्हणाला पाहिजे की, जगात सर्वत्र मुलीपेक्षा जादा मुले गर्भधारण करतात व जन्मास येतात, तरीही जसजसे वय वाढत जाते, तसतसे वाढत्या वयोगटात पुरुषांच्या मृत्यूचे प्रमाण स्त्रीपेक्षा प्रत्येक गटात जादा आहे. युरोप व अमेरिकेत स्त्रिया अधिक असल्याचे हे कारण आहे. तेथे आरोग्य सुविधा आणि आहाराच्या बाबतीत लिंगसमानता आहे, म्हणून वरील सिद्धान्ताला पुष्टी मिळेल.

परंतु काही अपवाद वगळता, जगात बहुसंख्य देशात स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी प्रमाणात आहार व आरोग्य सुविधा (विशेषत: मुलींना) मिळत असल्यामुळे या लिंग पक्षपातामुळे स्त्रियांचा मृत्यूदर हा पुरुषांच्या मृत्यूदरापेक्षा कितीतरी जास्त आहे. यातूनच प्रो. सेन यांनी हरविलेल्या स्त्रिया (Missing Womens) ची कल्पना विकसित केली असून त्याचा उद्देश प्रत्यक्षात या देशात असलेल्या स्त्रिया व लिंग असमानता आरोग्य सुविधा व आहारात नसती तर किती स्त्रिया असू शकल्या असत्या याचा आवाका जाणून घेणे हा आहे. त्यासाठी सेन हे सबसहारन आफ्रिका (जेथे तुलनात्मकदृष्ट्या स्त्रीबाबत पक्षपात कमी प्रमाणात आहे.) जेथे स्त्री पुरुषांची टक्केवारी १.०२२ आहे, प्रमाण मानून त्या पार्श्वभूमीवर भारताची टक्केवारी ०.९३० आहे. म्हणजेच पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण नऊ टक्क्यांनी कमी आहे. १९८६ मध्ये या आधारे भारतात तीन कोटी सत्तर लाख स्त्रिया हरवलेल्या होत्या, तर चीनमध्ये चार कोटी चाळीस लाख. जगात एकूण दहा कोटी पेक्षा अधिक स्त्रिया याप्रमाणे हरवल्या गेल्या आहेत. हा मृत्यूदरातील लिंग असमानतेचा रोकडा पुरावा आहे.

याची काय कारणे आहेत? याबाबत दोन विचारप्रवाह विद्यमान आहेत. लिंग असमानता ही थेट आर्थिक स्वातंत्र्याशी वा अधिकाराशी निगडित आहे, तर दुसऱ्या विचारप्रवाहाप्रमाणे कुटुंबाला मुलाकडून मुलीपेक्षा अधिक आर्थिक लाभ होतो म्हणून

लिंग असमानता आहे. प्रो. सेन हे पहिल्या विचार प्रवाहाचे खंदे समर्थक आहेत. त्यांच्या मते स्त्रियांना जेव्हा अर्थवाही रोजगार उपलब्ध होतो, त्यांचे समाजातील स्थान उंचावते व त्या प्रमाणात त्यांच्या वाट्यास लिंग असमानता कमी प्रमाणात येते. तसेच स्त्री साक्षरता, शिक्षण आणि त्यांचे सामाजिक स्थान उंचावणाऱ्या इतर बाबींमुळे कुटुंबात स्त्रीला व तिच्या विचारांना महत्त्व प्राप्त होते. याचं नमुनेदार उदाहरण आहे केरळ राज्य, जे देशातील इतर राज्यांचा तुलनेत मृत्यूदराच्या बाबत अधिक लिंग समान आहे. तेथे जन्माच्या वेळी मुलींचे जगण्याचे प्रमाण ७६ टक्के आहे, तर पुरुषांचे ७० टक्के तेथे स्त्री - पुरुष लोकसंख्येचे प्रमाण १.०६ आहे, (२००१ च्या जनगणनेनुसार) जे युरोप व उत्तर अमेरिकेच्या १.०५ च्या तुलनेमध्ये अधिक आहे. याची कारणे देताना सेन तेथील स्त्रीच्या शंभर टक्के साक्षरतेकडे लक्ष वेधतात. तसेच तेथील जोडप्यांच्या जननक्षमतेत झपाट्याने होत असलेली घसरणही लक्षणीय आहे, जी चीनपेक्षाही (जेथे कठोर पद्धतीने कुटुंब नियोजन राबवले जाते) अधिक आहे. ती केवळ १.०७ ते १.०८ आहे, जी ब्रिटन व फ्रान्स एवढीच आहे व अमेरिकेपेक्षा अधिक आहे. अर्थात केरळ मॉडेल हे जसेच्या तसे अनुकरणीय नाही, हेही नमूद करायला सेन विसरत नाहीत. केरळची ही प्रगती काही खास बाबींमुळे अधिक आहे. तेथे बहुसंख्या असलेल्या नायर जमातीमध्ये स्त्रीसत्ताक कुटुंब व्यवस्था असल्यामुळे जमिनीची मालकी स्त्रियांकडे मोठ्या प्रमाणात आहे. केरळच्या लोकसंख्येत एक पंचमांश ख्रिश्चन आहेत, जे चवथ्या शतकापासून आलेले आहेत. त्यांच्यामुळे सामाजिक मोकळेपणा व जगाशी सर्वाधिक संपर्क केरळचा आलेला आहे. तसेच तेथील डाव्या चळवळीमुळे समानतेचा विचार दृढपणे रुजला गेला आहे. या कारणांमुळे केरळ हे सार्वत्रिक अनुकरणीय मॉडेल होऊ शकत नाही. तरी लिंग समानतेसाठी किमानपक्षी शंभर टक्के साक्षरता आणि स्त्रियांचे नोकऱ्यातील वाढते प्रमाण या केरळच्या दोन बाबी देशातील सर्व राज्यांनी स्वीकारल्या पाहिजेत, यावर दुमत असणार नाही. हरवलेल्या स्त्रिया या सिद्धान्ताच्या आधारे प्रो. सेन जन्म व मृत्यू दरातील असमानता ह्याच लिंग असमानतेच्या एकमेव पैलूवर केवळ लक्ष केंद्रित करीत नाहीत, तर त्यांच्या विभिन्न पैलूंचाही ताकदीने व प्रज्ञेने शोध घेतात. त्यांच्या मते या संदर्भात खालील चार बाबी महत्त्वाच्या आहेत.

**१. मुलींचे कुपोषण :**

जन्माच्या वेळी मुले व मुली सारख्याच प्रमाणात वाढ झालेली असतात, कारण निसर्ग हा याबाबत लिंगनिरपेक्ष आहे. पण जन्मानंतर मुला-मुलींना मिळणाऱ्या असमान सामाजिक वागणुकीमुळे मुलांच्या तुलनेत मुलींना कमी व निकृष्ट आहार मिळत जातो व त्यामुळे त्या अशक्त व कुपोषित होतात. प्रो. सेन यांनी १९८३ मध्ये स्वतः आपल्या सहकाऱ्यांसह केस स्टडी म्हणून दोन गावात सर्वेक्षण करून पाच वर्षाखालील

प्रत्येक मुलांचं वजन करून नोंदवलं होतं. त्यांना हे दिसून आलं की, जन्माच्या वेळी वजनात फारसा फरक नसला तरी पाच वर्षे होईपर्यंत मुला व मुलीच्या वजनात, जे आरोग्याचे व पोषणाचे एक प्रमुख लक्षण आहे, लक्षणीय फरक पडत जातो. आणि पुढेही वाढत्या वयात व्यस्त प्रमाणात स्त्री - पुरुषात हा फरक दिसून येतो. ज्याप्रमाणे कमी व निकृष्ट दर्जाचा मुलींना मिळणारा आहार हा लिंगभेदाचा एक प्रकार आहे, तसाच प्रकार वैद्यकीय सुविधांबाबतही, मुलीकडे कमी वा अजिबात लक्ष न देणे याद्वारेही, दिसून येतो, प्रो. सेन यांनी मुंबईतील दोन मोठ्या सार्वजनिक दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांचा अभ्यास केला असता त्यांना दिसून आलं की, तेथे येणाऱ्या स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक प्रमाणात आजारी होत्या. थोडक्यात मुलींचे व स्त्रियांचे होणारे पोषण हा लिंग असमानतेचा चिंताजनक पैलू आहे.

**२. मातेचे कुपोषण**

दक्षिण आशियामध्ये मातेच्या कुपोषणाची समस्या दिसून येते, बॉडी मास इंडेक्स आणि ॲनिमिक अवस्था लिंग असमानता दर्शवितात.

**३. अशक्त मुलांचा जन्म**

दक्षिण आशियामध्ये २१ टक्के बालके जन्माच्या वेळी वैद्यकीय परिभाषेत कमी वजनाची व अशक्त (Clinically underweight) जन्मास येतात. मातेच्या कुपोषणाशी याचा शास्त्रीय संबंध लावता येतो. सबसहारा आफ्रिकन देशात अशक्त मुलांच्या जन्माची टक्केवारी २० ते ४० आहे, तर दक्षिण आशियाई देशात ती त्याच्या दुप्पट म्हणजे ४० ते ६० टक्के एवढी आहे. थोडक्यात प्रतिकूल परिस्थितीत जन्म व पुढेही तसंच जगणं, हे या मुलांचे अटळ असं (अर्थात मानवनिर्मित) वास्तव म्हटलं पाहिजे.

**४. हृदयरोगांचे वाढते प्रमाण**

तिसऱ्या जगामध्ये सर्वात जास्त हृदयरोगांचे प्रमाण दक्षिण अशियाई देशात दिसून येते. वरील तिन्ही कारणे थोड्याफार फरकाने भारत व चीनमध्ये समान असूनही भारतात हृदयरोगांचे प्रमाण जादा आहे. ब्रिटिश डॉक्टर प्रो. डी. जे. पी. बेकर यांनी त्यांच्या संशोधनातून असं दाखवून दिलं आहे की, बालकांचे जन्मजात कमी असणारे वजन आणि हृदयरोगांचा जवळचा संबंध आहे. या संशोधनाचा आधार घेत प्रो. सेन असं प्रतिपादन करतात की हृदयरोग व इतर विकार यांचा मुलीचे व मातेचे कुपोषण व बालकांचे जन्मजात कमी वजन असणे या तीन घटकांची सांगड घालता येते. मुलीचा अपुरा आहार व आरोग्यसुविधांमुळे होणारे कुपोषण, पुढे जाऊन ती जेव्हा माता बनते, त्या मातेच्या कुपोषणात परावर्तित होते. त्यामुळे गर्भाचे अपुरे पोषण व बालकाच्या जन्माच्या वेळी वैद्यकीय कसोट्यांप्रमाणे धोकादायक कमी वजन या बाबी उद्भवतात. ही बालके जेव्हा मोठी होतात, तेव्हा हृदयरोगासोबत हायपर टेन्शन, मधुमेह ह्या विकारांना अधिक प्रमाणात बळी पडतात. लिंग असमानतेमधून स्त्रीविरुद्ध

पक्षपातानं जे दुर्लक्ष समाजात होतं, ते अंतिमत: जन्म व आरोग्यावर घातक परिणाम करीत सर्वांनाच त्रस्त करतं. त्यातून पुरुषही सुटत नाही. नव्हे, स्त्रीपेक्षा पुरुषात हृदयरोगाचे प्रमाण जास्त असल्यामुळे स्त्रीकडे गुन्ह्यासारखं होत असलेल्या दुर्लक्षाचा बदला पुरुषांना किती तरी अधिक प्रमाणावर भोगावा लागत आहे.

ही बाब कमी लेखणाऱ्या समाजपुरुषाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारं आहे. निसर्गाला लिंग असमानता मान्य नसून स्त्रीबाबत आहार व आरोग्य संदर्भात पक्षपात कराल, तर विपरीत परिणाम तुम्हालाच भोगावे लागतील, असाच जणू निसर्ग इशारा देतो आहे.

लिंग असमानतेच्या संदर्भातले लैकिक व नैसर्गिक सत्य रोखठोकपणे आपल्या लेखात मांडल्यानंतर प्रो. सेन त्यांच्या सामाजिक संदर्भाकडे वळत असं ठासून सांगतात की, स्त्रियांच्या अंगभूत सामर्थ्यांच्या विकासाला वाट मोकळी करून दिली, तर केवळ त्यांचा विकास व कल्याण होत नाही, तर एकूणच मनुष्यजमातीचा होतो. स्त्रियांच्या सर्वांगीण सक्षमीकरणामुळे स्त्री आणि पुरुष, मुले आणि मुली आणि एकूणच सर्वांच्याच जीवनात प्रगतीला चालना मिळते. अनेक शोधपाहण्यातून हे दिसून आलं आहे की, स्त्रीला अधिकार प्रदान ज्या प्रमाणात दिले जाते, त्याप्रमाणात मुलांकडे होणारे दुर्लक्ष, बालमृत्यू आणि कुपोषण कमी होते. जोडप्याच्या जननदरात घट येऊन लोकसंख्या वाढीवर नियंत्रण येतं आणि एकूणच सामाजिक सुरक्षा आणि सांमजस्य वृद्धिंगत होते.

स्त्रियांचा राजकीय व आर्थिक क्षेत्रातील सहभाग हा लिंगसमानतेसाठी साहाय्यक ठरतो. आर्थिक व व्यापारी क्षेत्रातही जेव्हा जेव्हा संधी मिळाली, तेव्हा तेव्हा पुरुषांच्या तुलनेत त्यांनी लक्षणीय यश मिळवल्याची अनेक उदाहरणे आहेत. प्रो. सेन बांगला देशातील ग्रामीण क्षेत्र आणि बांगला देश रूरल अडव्हान्समेंट कमिटी (आर. ए. सी.) चा खास उल्लेख करून तेथील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील उच्चपदस्थ तसेच वाढत्या प्रमाणात सहभागी होणाऱ्या कुटुंब नियोजन क्षेत्रातील मुस्लिम राष्ट्र असूनही प्रगती आश्चर्यकारक आहे. तेथील जननदर हा ६.१ वरून ३.० टक्क्यांवर आलेला आहे. तसेच भारतातही स्त्रीच्या सक्षमीकरणाच्या विविध उपाय योजनांमुळे स्त्रीची साक्षरता आणि तिचा आर्थिक व सामाजिक क्षेत्रात वाढता सहभाग दिसून येत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे स्त्रियांबाबत सामाजिक व आर्थिक भेदभाव कमी होत चालला असला तरी, लिंग असमानतेच्या एका वाढत्या कटू सत्याकडे प्रो. सेन लक्ष वेधतात. ते आहे जन्मदर असमानतेचे. त्यासाठी त्यांनी भारताच्या ताज्या २००१ च्या जनगणनेचा प्राथमिक आकडेवारीचा आधार घेऊन जे निष्कर्ष भारताच्या संदर्भात काढले आहेत, ते अत्यंत विदारक व धक्कादायक तर आहेतच, पण देशाच्या एका नव्या अदृश्य फाळणीचे द्योतक आहेत ही चिंतेची व जागरूकतेनं विचार करण्याची

बाब आहे.

भारताच्या २००१ च्या जनगणनेनुसार स्त्रीची पुरुषाच्या तुलनेली संख्या मागच्या दहा वर्षात काही प्रमाणात निश्चितपणे सुधारली आहे व त्या प्रमाणात हरवलेल्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. तरीही शून्य ते सहा वयोगटातील मुलींचे प्रमाण प्रत्येक शंभर मुलामागे १९९१ च्या जनगणनेनुसार ९४.५ वरून ९२.७ पर्यंत घसरलेले आहे. केरळचा उज्ज्वल अपवाद वगळता हे प्रमाण पंजाब, गुजराथ, हरियाना व महाराष्ट्रासारख्या संपन्न राज्यात अधिक वेगाने घसरलेले दिसून येते.

सर्व पुरावे व निरीक्षणे लक्षात घेता मुलींच्या मृत्यूदरात वाढ झालेली नाही, तर तिची मुलाच्या जन्माच्या तुलनेत घट झाले आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे गर्भजल परीक्षा वा लिंग ठरविण्याचे उपलब्ध असलेल्या तंत्राचा मुलींचा गर्भ पाडण्यात होत असलेला वाढता वापर आहे, हे प्रो. सेन खेदाने नमूद करतात. जरी भारताच्या संसदेने या तंत्रज्ञानाचा गर्भाचे लिंग ठरविण्यासाठी वापर करण्यावर बंदी आणणारा कायदा संमत केला असला तरी त्याची अंमलबजावणी फारशी होताना दिसून येत नाही. कारण खुद्द स्त्रियाच पुरावा देण्यास पुढे येत नाहीत. त्याचा बारकाईने अभ्यास करून प्रो. सेन जन्मदरातील लिंग असमानतेचे (Natal inequality) चे कारण म्हणून भारतीय मातांचा मुलीपेक्षा मुलाकडे (Male child preferance) असलेला ओढा हे देतात. यामुळे नजीकच्या काळात या प्रकारची लिंग असमानता फारशी कमी होण्याची लक्षणे नाहती. भारताच्या नियोजनकारांनी लिंग असमानतेच्या बदलत्या रूपाचे, म्हणजे मृत्यूदर असमानतेकडून जन्मदर असमानतेकडे परावर्तित होणाऱ्या लिंगभेदाकडे लक्ष देऊन योग्य त्या उपाययोजना करण्याची गरज आहे.

स्त्री शिक्षण व आर्थिक सशक्तीकरण हे जगभर सर्वत्र व रूढ झालेले उपाय जन्मदरातील असमानता नाहीशी होण्यासाठी फारसे उपयुक्त ठरताना दिसून येत नाहीत, हे पूर्व आशियायी राष्ट्रांकडे पाहिलं की स्पष्ट होतं. तेथे मोठ्या प्रमाणात स्त्री साक्षरता व आर्थिक स्वातंत्र्य असूनही४ ही लिंग असमानता कमी झालेली नाही. जगात प्रत्येक शंभर मुलामागे ९५ मुली जन्माला येण्याचे प्रमाण असताना, सिंगापूर व तैवान मध्ये मुलींच्या जन्माला येण्याचे प्रमाण ९२ आहे, दक्षिण कोरियामध्ये ८८ व चीनमध्ये ८६ आहे. तसेच एकूण स्त्रीचे पुरुषाच्या संख्येशी प्रमाण कोरियामध्ये ८८ व चीनमध्ये ८५ आहे. त्या तुलनेत २००१ च्या जनगणनेप्रमाणे भारतात स्त्रियांचे प्रमाण ९२.७ आहे, ते निश्चित उल्लेखनीय आहे, हे नमूद करायला प्रो. सेन विसरत नाहीत.

तरीही त्यांचा चिंतेचा विषय वेगळा आहे. जरी भारताची एकूण टक्केवारी पूर्व आशियाई देशाच्या तुलनेत बरीच समाधानकारक असली तरी काही प्रांतात स्त्रीचे प्रमाणात भारतही अत्यंत वेगाने लिंगसापेक्ष गर्भपात (Sex selective abortion)

म्हणजे स्त्रीलिंग बालकांची भ्रूणहत्येबाबत चीन व कोरीयाशी स्पर्धा करीत त्यांनाही मागे टाकणार आहे. त्याचे त्यांना देशाच्या अनेक राज्यात आकडेवारी पुरावे दिसून येतात.

वरील विवेचनाच्या आधारे प्रो. अमर्त्य सेन हे जन्माच्या वेळी व जन्मानंतरच्या मुलींच्या मृत्यूदराबाबत विद्यमान असलेल्या भारतातील लिंगभेदाकडे अंगुली निर्देशक करीत याबाबत भारताची एक अदृश्य फाळणी झाली असल्याचे धक्कादायक विधान करतात आणि शुद्ध शास्त्रीय पद्धतीने आकडेवारी देत ते प्रसिद्ध करतात.

जगात सर्वत्रच मुलीपेक्षा मुले जास्त प्रमाणात गर्भजल परीक्षा वा लिंग ओळखण्याच्या तंत्र मुलीच्या गर्भातील हत्येविनाही जन्मास येतात, म्हणून सेन विकसित औद्योगिक देशांच्या आकडेवारीचा आधार घेत आपल्या देशाच्या या नव्या अदृश्य फाळणीचा सिद्धान्त सप्रमाण प्रसिद्ध करतात. शून्य ते पाच वयोगटातील मुलींचे मुलांच्या तुलनेत टक्केवारीचे प्रमाण जर्मनीमध्ये ९४.८, इंग्लंड मध्ये ९५ व अमेरिकेमध्ये ९५.७ टक्के आहे. त्यापैकी जर्मनीमधील मुलींची ९४.८ टक्केवारी हे आदर्श प्रमाण समजनू त्याखाली जर टक्केवारी असेल तर त्या देशात व प्रांतात एक तर मुलींची भ्रूणहत्या होत असली पाहिजे वा अन्यपद्धतीची लिंग असमानता मोठ्या प्रमाणात असली पाहिजे, असे मानले पाहिजे. जर्मनीचे मुलींचे शून्य ते पाच वयोगटातील ९४.८ हे प्रमाण कसोटी म्हणून वापरले तर भारताचे ढोबळ मानाने दोन भागात विभाजन झाल्याचे दिसून येते. भारताच्या उत्तर व पश्चिम भागात मुलातील स्त्री - पुरुषाचे प्रमाण (Female-Male ratio of children) आदर्श प्रमाणाच्या बरेच खाली असल्याचा ताजा जनगणनेचा अहवाल सांगतो. त्यात पंजाब, हरियाना, दिल्ली व गुजराथ ही राज्ये आघाडीवर आहेत, जेथे हे प्रमाण ७९.३ ते ८७.८ असे आहे. आदर्श प्रमाणाच्या खाली मुलींची शून्य ते पाच वयोगटातील कमी संख्या असलेल्या राज्यांमध्ये हिमाचल प्रदेश, मध्यपद्रेश, राजस्थान, उत्तरप्रदेश महाराष्ट्र, जम्मू व काश्मिर आणि बिहार या उत्तर व पश्चिम भागातील प्रांताचा समावेश होतो. तर याच्याविरुद्ध दक्षिण व पूर्व भागातील राज्ये आहेत, जेथे मुलींचे प्रमाण शून्य ते पाच वयोगटातील आदर्श मानलेले प्रमाण ९४.८ पेक्षा जास्त आहे. त्यात केरळ, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल व आसामचा समावेश आहे. (जेथे हे प्रमाण ९६.३ ते ९६.६ असे आहे,) त्यांत ओरिसा, कर्नाटक आणि मेघालय, मिझोरम, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल आदी सात भगिनी राज्यांचाही समावेश आहे. तामिळनाडूचे प्रमाण जवळपास ९४ टक्के आहे; ही बोलकी आकडेवारी पहाता प्रो. सेन यांचा लिंगभेदावर आधारित भारताच्या जैविक लोकसंख्या फाळणीचा निष्कर्ष मान्य करणे भाग पडते. याला जोड आहे ती मुला-मुलीमधील मृत्यू दराच्या तफावतीची, जी वरीलप्रमाणे दोन भागात विभागली गेली आहे. स्त्री पुरुष बालकांच्या मृत्यूचे प्रमाण पश्चिम बंगाल व केरळ

मध्ये अनुक्रमे ०.९१ आणि ०.९३ आहे, तर दुसऱ्या भागातील राज्यांपैकी पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशमध्ये १.३० आहे. गुजराथ, बिहार व राजस्थानही याच भागात समाविष्ट आहेत.

उत्तर व पश्चिम प्रांतामध्ये स्पष्टपणे स्त्रीविरुद्ध जो पक्षपात दिसून येतो, तो पूर्व व दक्षिण प्रांतात दिसून येत नाही. ह्या फरकाचे कारण अर्थातच आर्थिक असू शकत नाही. कारण शून्य ते पाच वयोगटातील मुलींचे प्रमाण प्रमाणित कसोटीपेक्षा कमी असलेल्या भारतीय प्रांतात जसे श्रीमंत प्रांत (पंजाब व हरियाना) आहेत, तसेच गरीब प्रांत (मध्य प्रदेश व उत्तरप्रदेश) आहेत. वेगाने विकसित होणारे प्रांत (महाराष्ट्र व गुजराथ) जसे आहेत, तसेच अविकसित (बिहार व उत्तरप्रदेश) प्रांत आहेत.


थोडक्यात, निष्कर्ष काढायचा झाला तर भारताचे लिंगदराच्या संदर्भात दोन भाग झालेले आहेत. शिक्षण, आरोग्य व आर्थिक स्वावलंबन यामुळे दक्षिण राज्ये स्त्री - पुरुष जैविक समानतेच्या बाबत अग्रेसर आहेत, तर पूर्व राज्यांमध्ये मातृसत्ताक पद्धत आणि आधुनिक तंत्रज्ञान (जशी सोनोग्राफी) चा कमी प्रसार यामुळे तेथेही निरोगी लिंगदर आहे. मात्र पश्चिम राज्ये - जी आर्थिक व औद्योगिक दृष्टीने प्रगत आहेत, तेथे मानवी विकासाकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे आणि उघड किंवा छुपी जमीनदारी, सामंतवादी विचारधारा यामुळे तेथे शून्य ते सहा वयोगटातील मुलींचे प्रमाण चिंताजनक वाटण्याइतपत कमी झाले आहे. तर उत्तर राज्यांमध्ये कमी साक्षरता, सामंतवादी, धार्मिक व जातीयप्रवृत्तींचा प्रभाव यामुळे स्त्रीला दुय्यम लेखण्याची वृत्ती ही तुलनेने अधिक आहे त्याची परिणती स्त्रीचे घसरलेले प्रमाणात झाली आहे.

**ताजाकलम**

हा लेख २००२ चा आहे व त्याला 'आधार २००१ च्या जनगणनेचा होता. पण आता २०११ च्या जनगणनेचे आकडे जाहीर आहेत व भारताच्या एकूण चित्रात बदल झाला नाही, उलटपक्षी परिस्थिती अधिक गंभीर व चिंतेची झाली आहे. त्यामुळे अमर्त्य सेन यांचे प्रतिपादन व कारणमीमांसा यापुढे तरी राज्यकर्ते व समाजधुरीणांनी लक्षात घेणे आवश्यक आहे, एवढे मात्र खरे!

०-०-०

# आस्वाद (चित्रपट/नाटक)



# १.गिरीश कार्नाड -भारतीय रंगभूमीचा एक 'जायंट'

१.

## गिरीश कार्नाड - 'एक रेनेसन्स मॅन'

आधुनिक भारतीय रंगभूमी (National Theater) खऱ्या अर्थाने सिद्ध होण्यामध्ये मोहन राकेश व धर्मवीर भारती (हिंदी), विजय तेंडुलकर (मराठी), आणि बादल सरकार (बंगाली) या नाटककारांसोबत गिरीश कार्नाड (कन्नड) याचं योगदान सर्वाधिक महत्त्वाचं आहे. इतरांच्या तुलनेत गिरीश कार्नाडांची सर्वच नाटके इंग्रजीत व अनेक भारतीय भाषामध्ये भाषांतरित झाली व ती अनेक दिग्गजांनी रंगभूमीवरही सादर केली, त्यामुळे एका अर्थाने भारतीय इंग्रजी रंगभूमीचे त्यांना जनकत्व जाते, असे काही अभ्यासक मानतात. हा मुद्दा जरी विवाद्य असला तरी त्यानं कार्नाडांचं इंग्रजी रंगभूमीवरचं महत्त्व व दिलेलं योगदान अधोरेखित होतं, एवढं तरी निर्विवादपणे म्हणता येईल. ते एकाच वेळी नाटककार, नट, दिग्दर्शक, समीक्षक, अनुवादक व सांस्कृतिक प्रशासक अशा अष्टपैलू भूमिका समरसतेने व प्रभावीपणे बजावीत असल्यामुळे त्यांना कादितारु व मर्चंट यांनी समर्पकपणे 'Renaissance Man' असं संबोधलं आहे. त्यांचा प्रभाव हा सर्वदूर व सर्वभाषिक आहे. मराठीचं उदाहरण देऊन ते स्पष्ट करता येईल. विजया मेहतांनी त्यांची 'हयवदन' व 'नागमंडल' ही नाटकं दिग्दर्शित केली. 'आविष्कार' नं 'तुघलक' केलं. रिमा लागूला 'प्रतिबिंब' (Broken images) करावसं वाटलं. 'आसक्त' नं त्याचं बेंगलोर शहरावरचं आजचं ताजं नाटक पुण्याच्या पार्श्वभूमीवर 'उणे पुणे शहर एक' या नावानं केलं व कन्नडपेक्षाही त्याचा प्रयोग सरस झाल्याचा खुद्द कार्नाडच निर्वाळा देतात. त्यांच्या बहुतेक नाट्यसंहिता मराठीत अनुवादित होऊन प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचं आत्मचरित्रही मराठीत 'खेळता खेळता आयुष्य' या शीर्षकाखाली उमा कुलकर्णीनं अनुवादित करून कार्नाडांच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'आशय' नं त्यांचा काही महिन्यापूर्वी पुण्यात तीन दिवसाचा महोत्सव घडवून आणला त्यावेळी 'राजहंस' नं ते दिमाखात प्रसिद्ध केलं होतं. हा तीन दिवसाचा महोत्सव म्हणजे त्यांची

मुलाखत, 'ययाती' वरचा त्यांचा मास्टर क्लास, काही सिनेमा व काही नाटकांच्या चित्रफिती प्रदर्शन व त्यांच्या प्रकट मुलाखतीनं साजरा झाला होता. त्याला मी स्वत: उपस्थित होतो, आणि तीन दिवसात मराठी रंगभूमी व साहित्याचे Whos Who म्हणता येतील अशा अनेक प्रसिद्ध लेखक व कलावंतांनी हजेरी लावली होती. हे त्यांचे नाटककार म्हणून महत्त्व व प्रभाव स्पष्ट करायला पुरेसं आहे. त्यांच्या प्रत्येक नाटकाची इंग्रजीतून विपुल व विविध अंगानी साक्षेपी व चोखंदळ समीक्षा झाली आहे. १९९९ साली त्यांना ज्ञानपीठानं सन्मानित केलं गेलं, तेव्हा आपण सर्व मराठी जनांना हा मान वय, नाट्यकृती व संख्येने जास्त लेखन असलेल्या विजय तेंडुलकरांना मिळायला हवा होता, असं वाटलं होतं. त्यांना त्याच्या समकक्ष सरस्वती सन्मान मिळाला होता आणि असा प्रवाद आहे की, सरस्वती व ज्ञानपीठ सन्मानाच्या संचालकांमध्ये स्पर्धा व चुरस असल्यामुळे एकाला दोन्ही सन्मान मिळत नाहीत. खरे खोटे मी जाणकारांवर सोडतो. असो. खुद्द कर्नाडांनीही पण अशीच प्रतिक्रिया दिली होती. तरी कर्नाड त्या बहुमानास प्राप्त होते हे नि:संशय.

गिरीश कार्नाडांचं आधुनिक भारतीय नाटककार म्हणून महत्त्व कशासाठी आहे याचा विचार करता हे लक्षात येते की, ते ज्यावेळी लिहायला लागले १९६० च्या दशकात व त्यचं पाहिलं नाटक 'ययाती' हे १९६१ मध्ये आलं तोवर भारतीय रंगभूमीनं पूर्णपणे प्रोसेनियम नाट्यपद्धत स्वीकारली होती, मराठी-मध्ये विशेषत्वानं. पण कार्नाडांनी 'ययाती' ते 'बळी' या पन्नास वर्षाच्या नाट्यलेखन प्रवासात लोकरंगभूमीचा, कन्नडमधील यक्षगान नृत्यनाट्य परंपरेचा वापर करीत व पुराणे, मिथके व इतिहासातून कथाबीज निवडून, त्यांना आधुनिक संवेदनशीलतेची जोड देऊन एक संपन्न व अर्थगर्भ अस्सल भारतीय नाट्यकलेचा सुगंध प्रयोगातून दिला, त्याचमुळे जेव्हा त्यांची नाटके इतर भारतीय भाषा व इंग्रजीतून आली व जगातही अनेक ठिकाणी प्रयोगीत झाली, तेव्हा प्रेक्षकांना भारताच्या समृद्ध नाट्यपरंपरेचा नवा रसरशीत अनुभव आस्वादायला मिळाला. तेंडुलकरांसह इतर भारतीय नाटककरांच्या नाटकांचे विषय, पात्रे व समस्या या वर्तमानातल्या होत्या, प्रयोग प्रोसेनियम ते प्रायोगिक या सीमारेषेत होते. क्वचित प्रसंगी हबीब तन्वीर सारख्यांनी ही चौकट मोडली. तेंडुलकरांनी 'घाशीराम कोतवाल' मध्ये दशावतारी प्रयोगाला नवं वळणं दिलं, पण कर्नाडांनी हे सातत्यानं केलं, 'ययाती' 'अग्नीवर्षा' (अग्नीमत्तु मुळे) ही पौराणिक; 'हयवदन' 'नागमंडल' 'बळी' अशी मिथकप्रेरित नाटके; 'तुघलक' 'तलेदंडा' (रक्तकल्याण) आणि 'टिपूसुलतानची स्वप्ने' (टिपू सुलतान कंड कनसू) सारखी ऐतिहासिक नाटके भारतीय कन्नड लोकसंस्कृती व नृत्य-नाट्याच्या फॉर्मचा कल्पकतेने नव्या स्वरूपात वापर करून लिहिली. हे त्यांचे वेगळेपण भारतीय नाटककारात उठून दिसते, प्रकर्षाने जाणवते. अलीकडे त्यांनी 'वेडींग अल्बम' 'ब्रोकन इमेजेस' व 'उणेपुरे शहर एक' सारखी आजची नाटके

लिहिली, पण त्यातही नवी दृष्टी व प्रयोगशीलता दिसते. त्यामुळे गिरीश कार्नाड हे एक महत्त्वाचे भारतीय नाटककार आहेत. उणीपुरी १३ नाटके लिहूनही त्यांचा प्रभाव भारतभर जाणवतो, तसेच काही प्रमाणात जगभरही. ही त्यांच्या लेखनाची अपूर्व किमया म्हणली पाहिजे.

गिरीश कार्नाडांची मातृभाषा कोकणी, व महत्त्वाकांक्षा साहित्यात जागतिक कीर्ती मिळविण्याची असल्याने इंग्रजीत लेखन करण्याची महत्त्वकांक्षा असताना त्यांनी पाहिलं नाटके लिहिलं ते कानडीमध्ये 'ययाती' - जी त्यांची संस्कारित भाषा होती... Three Play या पुस्तकात author's introduction मध्ये त्यांनी स्वत: असं म्हणलं आहे की,

While still preparing for the Oxford trip, amidst the intense emotional turmoil, I found myself writing a play. This took me by surprise, for I had fancied myself a poet, had written poetry through my teens, and had trained myself to write in English, in preparation for the conquest of the west. But here I was writing a play and in Kannad, too, the language of my childhood. A greater surprise was the theme of the play, for it was taken from ancient Indian mythology from which I had believed myself alienated. ("Author's Introduction" Three Plays. 2-3)

आणि ऑक्सफर्डहून उच्च शिक्षण घेऊन भारतात परतताना त्यांच्या मनात भावी नाट्य कारकिर्दीची स्वप्ने होती. त्यावेळी भारतात नुकतीच नव्यानं सांस्कृतिक जीवनाला सुरुवात झाली होती. (सन १९६३) 'आर्थिक दृष्ट्या राष्ट्र डळमळत असलं तरी, सिनेमा, रंगभूमी, साहित्य, कलाजगतात एकामागे एक दरवाजे उघडत होते. त्यांच्यामागून अनंत हातांनी मला बोलवत असलेल्या असंख्य संधींची जाणीव नसतानाच मी भारतात जाऊन ठेपलो.' (खेळता खेळता आयुष्य (आत्मचरित्र) पृष्ठ १५५)

त्यानंतर दर दोन-चार वर्षांनी गिरीश कर्नाडांची एकपेक्षा एक सरस व नवा अपूर्व प्रयोगीय अनुभव देणारी नाटके कन्नड व भारतीय भाषात रंगभूमीवर येत राहिली. तो सिलसिला आजही कायम आहे.

आता त्यांच्या नाट्यकृतीचं साहित्यिक मर्म आणि प्रयोगात्मता मी एका लेखाच्या मर्यादेत संक्षेपाने मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यापूर्वी काही प्रारंभिक निरीक्षणे नोंदवणे योग्य राहील.

डॉ. कृष्णा सिंग यांनी 'Girish Karnad : A Man and Artist - Evolution of his dramatic Genius' मध्ये असं मत नोंदवलं आहे की, जेव्हा कार्नाडांनी लिखाणास १९६० च्या दशकाला प्रारंभ केला त्यावेळी ऑक्सफर्डमधील शैक्षणिक

वातावरणामुळे ते पाश्चात्त्य साहित्याच्या नवनिर्माणामुळे (Renaissance) मुळे प्रभावित झाले होते. त्यांच्या साहित्यिक जडणघडणीच्या काळात विविध प्रभाव त्यांना आकर्षित करून गेले होते. बालपणी शिरशी (कर्नाटक) मध्ये जशी त्यांनी नाटक कंपन्यांची प्रोसेनियम पद्धतीची नाटके पाहिली, तशीच यक्षगान परंपरेची नाटकेही पाहिली. त्यांना इब्सेन व जॉर्ज बर्नाड शॉ च्या नाटकांनीही प्रभावित केलं होतं. आणि कोणताही महत्त्वाचा नाटककार शेक्सपिअरच्या प्रभावातून कसा सुटेल? कार्नाडही त्याला अपवाद नव्हते. पण सर्वात कन्नड रंगभूमीचा खोल प्रभाव त्यांच्या मनात होता. आपल्या नाटकाच्या जडणघडणीबद्दल ते Thee plays च्या प्रस्तावनेत लिहितात,

My generation was the first to come of age after India became independent of British rule. It therefore had to face a situation in which tension implicit until then had come out in the open and demanded to be resolved without apologia or self justification, tensions between the cultural past of the country and its colonial past, between the attractions of Western modes of thought and our own traditions, and finally between the various visions of the future that opened up once the common cause of politicall freedom was achieved. This is the historical context that gave rise to my plays and those of my contemporaries. ("Author's Introduction" Three Plays.)

## दोन

## पुराणकथेचे आधुनिक अन्वयार्थ - 'ययाती' व 'अग्नीवर्षा'

गिरीश कर्नाडांचे पहिले नाटक म्हणजे 'ययाती.' त्याचं कथानक वि. स. खांडेकरांच्या 'ययाती' या गाजलेल्या कादंबरीमुळे मराठी रसिकांना परिचित आहे. त्यांनी ययाती व कच या दोघांद्वारे भोग व त्यागाचे द्वंद गांधीवादाच्या प्रभावामधून समर्थपणे मांडले होते. परंतु कार्नाडांची साहित्यिक संवेदनशीलता भिन्न आहे. ती अस्वस्थ करणारे प्रश्न विचारणारी आहे. ययातीचं वृद्धत्व पुरूने घेतल्यावर त्याच्या नवविवाहित पत्नीचा प्रश्न कार्नाडांना संत्रस्त करतो. जरी कथानक पुराणातलं सर्वपरिचित असलं तरी त्याला कर्नाडांनी आजच्या काळाशी सुसंगत असा नवा अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. आजच्या वर्तमानाची प्रस्तुतता ही ययाती-चित्रलेखाच्या संवादातून त्यांनी नेमकेपणाने मांडली आहे. चित्रलेखा हे या नाटकातले पात्र नाटकाला नवे आयाम देते. ती वृद्ध पुरूला पती म्हणून स्वीकारू शकत नाही व ययातीपुढे - सासऱ्यापुढे धीटपणे, म्हणते की, 'मी पुरूशी लग्न केलं ते तो तरुण आहे म्हणून व तो माझ्या पोटात भारताचा वंश पुढे नेण्यासाठी बीजारोपण करेल म्हणून, पण आता तो ती क्षमता गमावून बसला आहे. ज्यासाठी त्याच्याशी माझा विवाह झाला, त्यातलं

आता काही शिल्लक नाही. ते आता तुमच्या जवळ आहे.' ती नवतारुण्य पुन्हा प्राप्त झालेल्या ययातीकडे एक अधिकारसंपन्न पुरुष म्हणून पाहाते आहे व स्वत:ला त्याला समर्पित करू इच्छिते आहे. त्यामुळे हतबुद्ध झालेला ययाती तिच्या अशा पापी व निषिद्ध विचारांबद्दल निर्भर्त्सना करतो. पण तिचे विचार स्पष्ट असतात. ती म्हणते, 'तुम्ही पुरूचे तारुण्य परत करणार नाही की मला स्वीकारणार नाही. तुमच्या सर्व इच्छापूर्ती झाल्या, पण माझे काय? तुमच्याजवळ तारुण्य आहे, तर पुरूजवळ त्याग केल्याची भावना आहे, पण मी काय करू?' ही तिची धिटाई व स्पष्टवक्तेपणा हा आजच्या संदर्भात स्त्रीवादाला जवळ जाणारा आहे.

'ययाती'द्वारे कार्नाडांनी पुरुषप्रधान सत्ता व विचारसरणीवर झगझगीत प्रकाशझोत टाकला आहे. पुरुषांच्या लेखी स्त्रीचे दुय्यमत्व अधोरेखित करताना ययाती चित्रलेखेला प्रातिव्रत्याचा उपदेश करतो, त्याद्वारे हिंदू पुरुषाची दांभिकता व दुटप्पीपणावर ते मार्मिक टिप्पणी करतात. आणि कथेची पुनर्रचना आणि पात्रांवर आधुनिक स्त्रीच्या संवेदनशीलतेचे रोपण करून 'ययाती' ला एक आधुनिक परिमाण बहाल करतात. येथेच हे नाटक एक वेगळी कलात्मक उंची गाठते. ययातीमध्ये देवयानी, शर्मिष्ठा व दासी असलेली स्वर्णलताच्या वाट्यासही येणारे दुय्यमत्व ते रेखाटतात, मात्र चित्रलेखा धीटपणे प्रश्न उपस्थित करतो. ती आजच्या काळाच्या संदर्भात आधुनिक नसली तरी तिला स्वत:च्या शरीराच्या भुकेची जाणीव आहे व ते व्यक्त करण्याचे धाडस पण. तरीही तिला तत्कालीन पुरुषी वर्चस्वाच्या व स्त्री पावित्र्याच्या कर्मठ व लादलेल्या नीती-नियमांपुढे हार पत्करत आत्महत्त्या करावी लागते. थोडक्यात एका पुराणकथेची पुर्नबांधणी व मोडतोड करीत, आपल्या प्रतिभेने त्यात भर टाकीत कार्नाड स्त्रीची व्यथा ताकदीने मांडतात. Collected plays प्रस्तावनेत अपर्णा भार्गव धारवाडकर नेमकेपणानं ही स्त्री व्यथा मांडताना म्हणतात, The most remarkable feature of yayati..... is its quartet (Devyani, Sharmishtha, Swarnalata and specially chitralekha) of sentient articulate, embittered women, all of whom are subject in varying degrees to the whims of men, but succeed in subverting the male world through and assertion of their rights and previlges.'

या नाटकाकडे देवदत्त पटनाईक 'ययाती गंड' Complex या नजरेतून पहातात. ययाती कॉम्पलेक्स म्हणजे बापाने मुलाकडून त्यागाची अपेक्षा स्वसुखासाठी व स्वार्थासाठी करणे होय. भीष्म व राम हे पुरूप्रमाणे या गंडाचे शिकार म्हटले पाहिजेत. ग्रीक पुराणात इडिपस कॉम्पलेक्स आहे, त्याची ही विपरीत बाजू म्हटली पाहिजे. कार्नाड या नाटकाद्वारे बापाकडून मुलाकडे मागावयाच्या त्यागाच्या नैतिक अधिकारावर प्रश्नचिन्ह लावतात. कार्नाड स्वत: या संदर्भात म्हणतात की, Old age bring no

knowledge, no self realization, only the senselessness of a punishment meted out for an act in which he (Puru) had not been participated. कार्नाडांनी वयाच्या २२ व्या वर्षी म्हणजे १९६०-६१ मध्ये लिहिलेल्या या नाटकाचा इंग्रजी अनुवाद करताना २००८ मध्ये काही प्रमाणात पुर्नलेखन केले. म्हणजे इतरांप्रमाणे त्यांनाही या नाटकातील अनेक नाट्यपूर्ण शक्यता व त्याचे आधुनिक विश्लेषण पन्नास वर्षानंतरही आव्हान देत होते, यापेक्षा या नाटकाच्या अभिजात कालजयीपणाचा दुसरा कोणता पुरावा असून शकेल?

'ययाती' ची आजच्या काळातली प्रस्तुतता ही कार्नाडांनी जबाबदारीच्या संदर्भातून ययातीच्या मिथकाचा नवा अन्वयार्थ लावण्यात आहे. एका अभ्यासकाच्या मते "Karnad restructures the story as ironic drama of discontent, futility and death.' राजा असूनही ययाती शारीरिक सुखाच्या लालसेनं जसा राज्यधर्म आचरत नाही, तसंच आजचा माणूस उपभोगाच्या गर्तेत सापडला आहे, याची जाणीव वाचक प्रेक्षकांच्या मनावर होत जाते व नाटकाला आधुनिक परिमाण मिळतं, ते सार्वत्रिक व कालातीत बनत जाते.

पुराणकथेमधून बीज घेऊन त्याची कलात्मक पुर्नरचना करीत कार्नाडांनी सादर केलेलं दुसरं नाटक म्हणजे 'अग्नीवर्षा' (कन्नड अग्नीवर्षा मत्तूमाले किंवा इंग्रजी The fire and The Rain) होय. महाभारतातील वनपर्वामधील यवक्री (यवाकृता) चे उपकथानक या नाटकाचं कथाबीज आहे, पण त्याची कार्नाड त्यांच्या कलात्मक स्टाईलनं मोडतोड करीत त्यातून स्त्री-पुरुष संबंधाची आजची समस्या मांडतात. अपर्णा भार्गव धारवाडकरांनी कार्नाडांच्या Collected Play volume two च्या introduction मध्ये मार्मिकपणे असं नोंदवलं आहे की, 'Karnad reimagines the world of Hindu antiquity and context a story of passion, loss, and sacrifice in the context of vedic ritual; spiritual discipline (tapasya), social and ethical differences between human agents and interrelated forms of performance still close to their monents of origin. या नाटकातला 'अग्नी' हा शब्द वासना, संताप, सूडबुद्धी, मत्सर, विश्वासघात, हिंसा व मृत्यू सूचित करतो, तर 'वर्षा' हा शब्द स्व-बलिदान, करुणा, दैवी वरदान, क्षमा, पुनर्जीवन, व जीवनाचं महत्त्व अधोरेखित करतो. या नाटकाद्वारे कर्नाड हे सूज्ञपणा व बुद्धीविना ज्ञान, प्रामाणिकपणा - सचोटी विना सत्ता किती भयंकर आहे, हे त्रिकालबाधित सत्य मांडतात. यवाक्रीचं मिथक हेही प्रखरतेनं अधोरेखित करतं की, देवाकडून मानवाला वरदान म्हणून जी दैवी शक्ती मिळते तिचा दुरुपयोग किती विनाशकारी असतो.

या नाटकाचं कथानक थोडं गुंतागुतीचं आहे. ही कथा आहे रायभ्या व भारद्वाज या दोन कुटुंबाच्या सूड, खून व मत्सराची. अपवाद आहे तो नितीलाई या आदिवासी

मुलगी व तिची प्रेमी व रायभ्याचा धाकटा मुलगा अर्वसू यांच्या नि:स्वार्थ प्रेमाचा. कथानकाचा गाभा हा पावसासाठी सात वर्षे यज्ञ मांडण्याचा खटाटोप व दोन ऋषी कुटुंबाच्या संघर्षाचा आहे. या यज्ञाचा मुख्य पुजारी हा पर्वसू हा रायभ्याचा मोठा मुलगा आहे. खरं तर रूढी परंपरेप्रमाणे त्याच्या वडिलांनाच हा मान मिळायला हवा. कारण भारतात वृद्धत्व हे शहाणपणाशी जोडलं गेलं आहे. पण राजा त्याच्याऐवजी सात वर्षांचा दीर्घ काळ लक्षात घेऊन पर्वसूला नेमतो; पण त्यांचा चुलत भाऊ यवाक्री, जो भारद्वाजांचा मुलगा आहे तो, अपमानित होतो. कारण त्यानं दहा वर्षे दिव्य ज्ञानासाठी तप केलं आहे. पुन्हा त्याचा पर्वसूवर वैयक्तिक राग आहे. कारण त्याची प्रेमिका विशाखा, जिला त्यानं दिव्यज्ञान मिळवण्याच्या हेतूने रानात तप करण्यासाठी जताना सोडलं होतं, ती आता पर्वसूची पत्नी झाली आहे. तो तिच्या पुन्हा जीवनात येतो व पतीविना एकट्या विशाखाला तो सेड्यूस करतो. तिचा सासरा रायभ्या तिची निर्भर्त्सना करतो. पर्वसू एका रात्रीसाठी घरी आला असता त्याला हे समजते. तसेच वडिलांनी यज्ञात विघ्न यावं म्हणून ब्रह्मराक्षस निर्माण करून यवाक्रीला मारल्याचं समजल्यामुळे व पत्नीला त्रास दिल्यामुळे त्यांचा खून करतो, पण त्याचा धाकट्या भावावर अर्वसूवर आळ घालतो. इकडे अर्वसूचं आदिवासी कन्या नितीलाईंशी लग्न होऊ शकत नाही, तिला नाईलाजानं आपल्या जातीत वडिलांच्या इच्छेप्रमाणे लग्न करावं लागतं. तिचा नवऱ्याला संशय येतो व तो तिचा बळी घेतो. अर्वसूसाठी ही तिहेरी हानी आहे. एकतर प्रेमिका नितीलाईचा खून, दुसरा वडिलांचा तर तिसरा भावाच्या विश्वासघाताचा या गुंतागुंतीच्या कथानकातून कर्नाड आजच्या काळाचंच चित्र रेखाटतात, जेथे प्रेमापेक्षा स्वत:ची महत्त्वाकांक्षा महत्त्वाची मानणं, जेथे मानवी नाती जपण्याऐवजी आपली सत्ता, मोठेपणाला अग्रक्रम देणे ही आधुनिक कालखंडाची झालेली घसरण ते समर्थपणे या मिथकाच्या माध्यमातून चितारतात.

गिरीश कार्नाडांच्या या व एकूणच नाट्यसंसारात स्त्री पात्रांत भाव - भावनाचं ठसठशीत चित्रण येतं. नायिका जरी पुराणकाळ, मिथक वा इतिहासकालीन असली तरी तिच्याद्वारे कार्नाड मोठ्या ताकदीनं आजच्या आधुनिक स्त्रीचे प्रश्न उपस्थित करतात. 'अग्नीवर्षा' मध्ये विशाखा व नितीलाई ही दोन्ही पात्रं त्या दृष्टीने पाहाण्याजोगी आहेत. या दोघी समजूतदार व सुजाण आहेत; पण त्यांचे नवरे त्यांना समजून घेऊ शकत नाहीत, ही पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीची शोकांतिका तेव्हाही होती व आजही आहे. आज कितीही प्रेमविवाहाचा गवगवा असला तरी आजही भारतात बहुसंख्य विवाह दाखवून - घडवून आणलेले विवाह, ॲरेंज्ड मॅरेजेस असतात. त्याचे दुष्परिणाम प्रामुख्याने स्त्रीला भोगावे लागतात. विशाखाचं यवाक्रीवर प्रेम, पण तो गेल्यावर नाईलाजानं वडिलांनी निवडलेल्या पर्वसूच्या गळ्यात तिला माळ टाकावी लागते. दोघेही तिच्या मनाचा व शरीरभुकेचा जराही विचार करीत नाहीत. उलट तिच्या

विवाहबाह्य संबंधाचा धिक्कार करीत तिला छळतात. तर नितीलाईचं प्रेम असूनही अर्वसूशी ती आदिवासी असल्यामुळे आंतरजातीय विवाह निषिद्ध मानल्यामुळे होऊ शकत नाही. या नाटकात कार्नाडांनी प्रेमाचा त्रिकोण रंगवताना स्त्री तिच्या शरीरसुखासाठी प्रसंगी नैतिकतेची चौकट मोडते, हे धीटपणे, पण स्त्री पात्राला पूर्ण न्याय व सहानुभूती देत दाखवलं आहे. विशाखा धीटपणे तिच्या यवाक्रीशी असलेल्या विवाहबाह्य संबंधाची कबुली देत त्यासाठी कोणतीही शिक्षा भोगायची तयारी दाखवते. या स्त्री चित्रणाद्वारे कार्नाड आधुनिक स्त्रीचे विवाहासंदर्भातले प्रश्न नाट्यपूर्ण प्रसंगातून मांडतात. त्यामुळे पुराणकथेवरील नाटकही आधुनिक मनाला पटतं!

पुराणकथातून बीज घेऊन गिरीश कार्नाडांनी ययाती व अग्नीवर्षातून जो आदिम मानवी भावभावनांचा खेळ रंगवला आहे व त्यात प्रेम, वासना, अहंकार, सूड, अत्याचार व खून या सर्व स्खलनशील मानवी मनाचे विश्व ज्या ताकदीने उभे केले आहे, त्यामुळे ही नाटके मानवी जीवनाची विविध रंगानं रंगलेली प्रतीकं म्हणून येतात आणि ती वाचक - प्रेक्षकांच्या मनावर गारुड करतात.

## तीन

## मिथकाद्वारे मानवी मनाचं समग्र दर्शन

## 'हयवदन', 'नागमंडळ' व 'बळी' नाट्यत्रयी

कदाचित गिरीश कार्नाडांचं संस्कारक्षम बालपण शिरशीसारख्या छोट्या कर्नाटकामधील गावी गेलं असल्यामुळे त्यांच्यावर यक्षगान व एकूणच कानडी पारंपरिक एतद्देशीय नाट्य-गीत-संगीत परंपरेचा अमिट प्रभाव आहे. त्यांच्यातल्या नाटककाराला हे देशी नाट्यकलेचे फॉर्म जे नाट्य उभे करायचे आहे त्यासाठी प्रभावी वाटत असल्यामुळे त्यांनी नाट्यलेखनात त्याचा जाणीवपूर्वक डोळस वापर केला आहे. पुन्हा भारतीय परंपरेत रुजलेली मिथकंही नाटकासाठी वेधक नाट्यपूर्ण असल्याचे कर्नाडमधील कलावंत हेरतो. मिथके ही एका अर्थाने मानवी जीवन व प्रसंगांची सर्व अंगे म्हणजे प्रेम, युद्ध, वासना, द्वेष, मत्सर, भीती, विश्वासघात, सूड, क्रौर्य, करुणा आणि क्षमा अशा सर्व मानवी जीवनाशी निगडित भावभावनांचे प्रकटीकरण करणारी असतात. कार्नाडांसारख्या प्रतिभावंत नाटककारास त्याचे हे सामर्थ्य लक्षात आले नसेल तर नवल ते कसले? पुन्हा त्याची मोडमोड करीत पुनर्रचना करण्याचे व त्यात प्रसंगी भर घालण्याचे मुक्त स्वातंत्र्य असतेच. मिथके म्हणजे अद्‌भुतता, रोमांच, रोमहर्षकतेच्या अवगुंठनातून प्रकट होणारे मानवी जीवनाचे सत्य दर्शनच असते. त्यामुळे कार्नाडांनी मिथकांचा आधार घेत 'हयवदन', 'नागमंडळ' व 'बळी' या तीन भारतीय रंगभूमीचे वैभवशाली मानदंड ठरलेल्या नाटकांची रचना केली.

'हयवदन' हे कर्नाडांचे १९७० साली लिहिलेले क्रमाने तिसरे नाटक, जे त्यांच्या शैलीचे सर्वाधिक प्रतिनिधिक स्वरूपाचे मानले जाते. यामध्ये मिथकातून

उचललेले अद्‌भुत पण मानवी मनाची पूर्णत्वाची ओढ प्रखरतेने दर्शवणारे कथाबीज, त्यातील अनुस्यूत अद्‌भुतरम्यता, प्रातिनिधिक पात्रे, लोकरंगमंचाची मुखवटे, पडदे, बाहुल्या; कथेमधील कथा आणि काली, गणेश, रुद्र आदी देवतांच्या प्रतिमांचा जे नाटकातून सांगावयाचे आहे त्यासाठी कल्पकतेने वापर कार्नाडांनी केला आहे. 'हयवदन' चं बीज त्यांनी सोमदेवाच्या 'बृहद्‌कथा सरित्सागरा'तून घेतलं आहे, तर देवदत्त व कपिलचं प्रकरण वेताळ पंचविशीतून उचललं आहे. त्यांची मनोज्ञ व रंजक गुंफण करताना त्यांनी थॉमस मान यांच्या Transposed heads या कादंबरीचा, जी संस्कृत कथानकावरून बेतलेली आहे त्यातूनही प्रेरणा घेतली आहे. पण यातून जे नाटक सिद्ध झालं आहे ते केवळ अपूर्व व प्रभावी रंगमंचीय अविष्कार म्हणलं पाहिजे. घोड्याचं मुख असलेल्या माणसाची स्व-ओळखीसाठी धडपड करताना त्याचा पूर्ण घोडा होणं, हा कार्नाडांच्या प्रतिभेचा नव अविष्कार आहे. माणसाला स्वत:च्या अपूर्णतेची जाणीव खिन्न करीत असते. जेव्हा ती प्रखर असते, तेव्हा पूर्णत्वाचा शोध सुरू होतो. 'हयवदन' मध्ये तो गिरीश कार्नाडांनी गुंतागुंतीच्या नातेसंबंधातून प्रकट केला आहे

ही कथा आहे पद्मिनी या कणखर स्त्रीची व देवदत्त आणि कपिल या दोन मित्रांची तसेच तिघांच्या परस्पर संबंधांची. देवदत्त हा बुद्धिमान ब्राह्मण तर कपिल हा पिळदार शरीराचा लोहार. कार्नाडांनी देवदत्त हे ग्रीक प्रतीक अपोलोचं प्रतिरूप कल्पिलं आहे, जे बुद्धी, कला, संगीत, संयम व प्रमाणबद्धतेचं प्रतीक आहे. कपिल हा सहज आदिम प्रवृत्तीचा, अंत:प्रेरणेवर जगणारा, प्रबळ वासना असणारा. त्याला डायनोसिसचं प्रतिरूप केलं आहे. पद्मिनीचं जरी देवदत्तशी लग्न झालं असलं व त्याच्या बुद्धी व कलेची ओढ असली तरी कपिलचं पिळदार शरीरही तिला मोह पाडीत असतं, त्यातून कालिमातेपुढे हे दोन मित्र जेव्हा डोके छाटून अर्पण करतात व तिच्या आशीर्वादानं दोघांना जिवंत करताना ती डोक्याची अदलाबदल करते व कपिलचं शरीर पण देवदत्तचं डोकं असलेला पती म्हणून स्वीकारते. म्हणजे एकाचवेळी बौद्धिक कलात्मक सुख देवदत्तच्या बुद्धी व मनाद्वारे तर शरीरसुख कपिलच्या पिळदार शरीरामुळे मिळवायचा तिचा प्रयत्न असते, त्यातून तिची पूर्ण पुरुषाची ओढ पूर्णत्वास जाते. पण बुद्धीचा प्रभाव पडून शरीर जेव्हा कोमल होतं, तेव्हा कपिलचं शरीर देवदत्तचं होऊन जातं...आणि एक अपूर्व नाटकीय पेच दाखवत मानवी मनाची पूर्णत्वाची ओढ दाखवताना ती कशी असाध्य आहे हे कलात्मकतेनं प्रगट होते.

दोन डोक्यांची अदलाबदल दाखवताना गिरीश कार्नाड मुखवट्यांचा वापर करतात, ही देशी नाट्य परंपरेची देणगी आहे. ती नाट्यपूर्ण प्रसंग सहजतेने रंगमंचावर साकार करते. ही मुखवट्याची परंपरा यक्षगानमध्ये प्रकर्षाने असते. या नाटकात त्यांनी दोन बाहुल्यांना प्रसंगाची नाट्यमयता प्रभावी करण्यासाठी वापरले आहे. त्यांचे संभाषण पात्रांना ऐकू येत नाही, तर केवळ नाटक पाहाणाऱ्या प्रेक्षकांना ऐकू येते, हीही

रंगमंचीय पण देशी क्लृप्ती आहे.

हे नाटक विख्यात रंगकर्मी विजया मेहतांनी मराठी व जर्मनीत केलं होतं. नाटकाबद्दल आपल्या 'झिम्मा' या आत्मवृत्तात त्यांनी खालीलप्रमाणे विचार व्यक्त केले आहेत, ते फार मार्मिक व सटीक आहेत.

'गिरीशची मूळ संहिता मला आवडली होती. भारतीय पुराणातली एखादी मिथ निवडायची व ती वर्तमानाशी जोडून एक भेदक, रसरशीत अन् सोलीव असा नाट्यानुभव उभा करायचा, हे गिरीशच्या बऱ्याच नाटकाचं मर्म. व्यासंग, नाट्यलेखनाची सधन समज आणि शैली या गुणांमुळे गिरीशचं नाटक रंगमचांवर समर्थपणे उभं राहतं.' (पृष्ठ ३१९)

"अंधारात मस्तकांची अदलाबदल होते. पद्मिनी आता कुणाची पत्नी? देवदत्ताचं मस्तक धारण करणाऱ्या कपिलची? की कपिलचं मस्तक असलेल्या अशक्त दुर्बल देवदत्तची? डोकं हे माणसाचं सर्वात महत्त्वाचं इंद्रिय म्हणून पद्मिनी पतीचं (देवदत्तचं) मस्तक असलेल्या बलवान कपिलची बायको होते. जीवदान मिळालेले दोन्ही मित्र अपूर्णच राहतात. पद्मिनीचा संपूर्ण पुरुषाचा शोधही निष्फळ ठरतो."

"विषय शतकानुशतके महत्त्वाचा वाटणारा - पुरातन काळापासून युगापर्यंत अव्याहत चाललेला शोध - मानवाच्या पूर्णतेचा आणि तो न मिळाल्यानं वाटणाऱ्या असमाधानाचा. (पृष्ठ ३२०)"

एम. के. नाईक हे "From the horse's mouth : A study of Hayavadana (Dimensions of Indian English Literature) मध्ये म्हणतात, "Padmini's plight suggest women's in vain attempt to unite man as intellect and as flesh in order to further her creative purpose. But these two aspects of masculine personality are basically at war with each other and hence the attempt ends disastrously in distruction for woman and man."

दुसरे अभ्यासक आर. एस. शर्मा म्हणतात, "Padmini's predicament is a predicament of a modern, emancipated women in our society who is torn between two polarities, a women who loves her husband as well as someone else for two different aspect of their personalities."

"In socio-cultural level the play suggests that the Apollonian always asserts it and subdues the Dinyasian in our socio-cultural life."

'हयवदन' नंतर पाठोपाठ गिरीश कार्नाडांचे 'नागमंडल' हे मिथकावर आधारित नाटक आले. यात त्यांनी दोन मिथ-कथांची कौशल्याने सांगड घालीत नाटक रचले

आहे. पहिलं मिथक म्हणजे नागानं पुरुषाचं रूप घेऊन प्रेम करणं, तर दुसरं मिथक म्हणजे रात्रभर मंदिरात पापणीला पापणी न लावता जागून मृत्यू परतावता येतो. स्वत: कर्नाडांनी Author's introduction मध्ये असं म्हटलं आहे की, या नाटकातील राणीची स्थिती हे एकत्र संयुक्त कुटुंबातल्या तरुणीचं रूपक आहे. तिला नवरा दिवसा भिन्न रीतीने भेटत असतो, तर रात्री अगदी त्याच्याविरुद्ध. या नाटकातून पुरुषी इगो कसा स्त्री-पुरुष दोघांनाही कमकुवत बनवतो व कमीपणा आणतो हे प्रत्ययकारी रीतीने व्यक्त होते.

या नाटकाची कहाणी मोठी रंजक व स्त्री मनाच्या सुप्त भावना, अवांछित अव्यक्त वासना चितारणारी आहे. राणीचा नवरा अपण्णा हा तिला दिवसा तेही दुपारी भोजनाच्या वेळी भेटत असतो व सारी रात्र वेश्येकडे घालवीत असतो. बाकी तिचं चारित्र्य शुद्ध राहावं म्हणून जगापासून लपवण्यासाठी तिला घरात बंद करून ठेवीत असतो. नवऱ्याचं प्रेम मिळावं म्हणून शेजारची एक अंध स्त्री तिला दिव्य मुळी देते, पण त्याचा रस सांडल्यामुळे बिळातला नाग पितो व अपण्णाचं रूप धारण करून रात्री नवरा नसताना येऊन तिच्यावर प्रेम करतो - शरीरसंग करतो. त्यातून ती गर्भार राहते. अपण्णा त्यामुळे चिडतो. राणी आपलं पावित्र्य सिद्ध करताना म्हणते की, "मी केवळ तुम्हाला व नागाला स्पर्श केला आहे." नाग तिला न चावता तिच्या डोक्यावर फणा धरतो. या चमत्कारानं गावकरी तिला देवी मानू लागतात व अपण्णाही तिला स्वीकारतो. नाग मात्र तिचा विरह सहन न झाल्यामुळे तिच्याच केसाचा फास घेऊन मरतो. राणीच्या इच्छेला मान देत तिचा मुलगा त्याचे अंत्यकर्म करतो.

अशी ही कथा गिरीश कार्नाडांनी या नाटकात देशी रंगभूमीचा लवचीक फॉर्म वापरून मांडली आहे. तिचा विजया मेहतांनी मराठी व जर्मनीत प्रयोग केला, तो जबरदस्त रंगमंचाची जादुई मोहजालाप्रमाणे पसरणारा ठरला. आपल्या 'झिम्मा' या आत्मकथनात विजया मेहता 'नागमंडल' बद्दल खालीलप्रमाणे लिहितात, त्यातून नाटकाचं सामर्थ्य, तसंच त्यांच्या मते असलेल्या मर्यादा स्पष्ट होतात.

'नागमंडलाच्या' लिखाणात गिरीशनं बऱ्याच गमती जमती केल्या होत्या. त्याच्या नाट्यभानविषयी मला नेहमीच आदरमिश्रित कौतुक वाटत आलंय. रंगमंचावर जादुई क्षण साकारण्याची त्याची क्षमता 'नागमंडल' मध्ये ठायी ठायी डोकावत होती.

प्रयोग सुरू होतो. 'मी आज मरणार आहे. नाटकात मरतात तसं नाही तर खरंखुरं मरणार आहे', हे नटाचं पहिलंच वाक्य. सगळे प्रेक्षक या वाक्यानं अक्षरश: गारद. त्याच्या मरणाची कथा साधी. प्रयोगातील नटाचा वाईट अभिनय पाहून प्रेक्षकांना डुलक्या येतात. त्या सगळ्या डुलक्या एकत्र येऊन नटाला मरणाचा शाप देतात. या भन्नाट कल्पनेतून प्रेक्षक सावरताहेत तोच आपापली कामं आटपून दिव्यांच्या ज्योती गप्पा मारण्यासाठी एकत्र जमतात. घासतेलाची वात. गोड्या तेलाची, कंदिलाची,

समईची अशा वेगवेगळ्या वाती, या ज्योतींच्या कंपूत सामील होते 'कविता'; तिनं गाण्याला आपल्या भोवती शालीसारखं लपेटून घेतलंय. कित्येक वर्षं दोघी बिचाऱ्या एका म्हातारीच्या पोटात अडकून पडल्या होत्या. म्हातारीनं त्या दुसऱ्या कुणाला सांगितल्या नाहीत म्हणून त्यांना अस्तित्वच नाही. जिवंत होता यावं म्हणून दोघीही पळून आल्या आहेत. आणि गोष्ट सांगताहेत, गाणी गाताहेत. ती राणीची गोष्ट म्हणजे नागमंडल नाटक.

नागमंडलचा पिंड मला लोककथेचा वाटतो. वनौषधी, नाग, ग्रामपंचायतीनं नागपरीक्षेचं काढलेलं फर्मान या सगळ्या गोष्टी मला एखाद्या आदिम संस्कृतीतल्या वाटल्या.

माझ्याशी आणि भास्करशी चर्चा करताना गिरीशनं नागमंडलमधल्या दोन नाट्यबिंदूंचा आवर्जून उल्लेख केल्याचं आठवतंय. नाटकाच्या पहिल्याच वाक्यात आपल्याला मरणाचा शाप मिळाला असल्याचं नट सांगतो. हा मृत्यू शारीरिक नसून नटामधल्या ऊर्जेचा, सृजनशीलतेचा तो अपरिहार्य अंत आहे. गिरीशला अभिप्रेत असलेला हा पहिला नाट्यबिंदू. अपण्णा आणि राणी यांचं नातं हा दुसरा. त्या नात्यातून गिरीशला आजच्या मध्यमवर्गीय पती-पत्नीचा नातेसंबंध अधोरेखित करायचा होता. नवऱ्याचं बायकोकडे सततचं दुर्लक्ष आणि त्यामुळे दोघांमध्ये खेळत असलेले ताण. नागमंडलला वर्तमानाचा संदर्भ देण्याचा हा प्रयत्न मला फार क्षीण वाटला. ज्योती, नागराज, वनौषधी, कविता, बंदिस्त असलेली राणी व गर्दीत सृजनाच्या क्षयाची धास्ती किंवा मध्यमवर्गीय पती-पत्नीचं नातं हा आजच्या संदर्भातला आशय मांडणं मला जमलं नाही.''

मला मात्र वाटतं की, कार्नाड हे थेट न सांगता सूचकतेनं सुचवित बऱ्याच गोष्टी प्रेक्षकांच्या तर्क व कल्पना शक्तीवर सोडून देतात. 'नागमंडल' मध्ये राणीचं वर्तन असंच अनेक शक्यता सूचित करणारं आहे. खरंच तिला नवऱ्याचं रूप घेतलेला नागाचं प्रेम व रतीक्रीडा नवऱ्याची नाही हे कधी जाणवलं नसेल का? नागाचं अंत्यकर्म मुलाकडून ती का करून घेते? येथे राणीचं वर्तन हे निखळ नैतिकतेला बाजूस सारीत ते स्वीकारते, तरीही लोकांपुढे प्रेमी असल्यानं - डंख मारणार नाही ही खात्री असल्यामुळे नाग हातात घेते व आपल्या पातिव्रत्याचा निर्वाळा देत म्हणते की, ''मी नवरा व नागाखेरीज कुणाही पुरुषाला स्पर्श केला नाही.'' त्यामागे तिचं कपट व फसवणूक असते का? खचितच् नाही. कारण तिला फक्त संसारसुख हवं आहे, पण पुरुषप्रधान चौकटीत पतीपेक्षा अन्य माणसाकडून व्यभिचाराचा शिक्का मारून घेतल्याखेरीज मिळणार नसल्यामुळे व बंधन असल्यामुळे नागाचं पतीरूप ती स्वीकारते. ही तिची वैचारिक बंडखोरी खचितच नाही, पण ती एक निखळ मानवी कृती आहे. हे कार्नाडांनी कलात्मकतेनं मांडलं आहे, म्हणून 'नागमंडल' प्रेक्षकप्रिय इ. झालं, असं माझं मत

आहे.'

'बळी' हे गिरीश कार्नाडांचं मिथकावर आधारित तिसरं महत्त्वांचं नाटक. याचं कथाबीज त्यांनी तेराव्या शतकातील कवी जनाच्या 'यशोधारा चरिते'वरून घेतलं आहे. कार्नाडांच्या मते त्यांचे हे नाटक महात्मा गांधीच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला मानवंदना आहे, जी भारताच्या सांस्कृतिक व राजकीय अस्तित्वासाठी सर्वाधिक महत्त्वाची आहे. 'बळी' मध्ये प्रेम व हिंसेमधील द्वंद्व आहे. जैन धर्मात कोणत्याही प्रकारची हिंसा त्याज्य आहे. या उलट हिंदू धर्मासाठी मध्ये यज्ञयागात पशुबळीला महत्त्वाचे स्थान आहे व त्यांना यातील हिंसा मान्य आहे. त्याविरुद्ध जैन व बौद्ध धर्माने इतिहासात बंड केल्याचा दाखला आहे. प्रस्तुत नाटकाचा गाभा असलेल्या मिथकामध्ये प्रत्यक्ष हिंसेपेक्षाही प्रतीकात्मक हिंसेचा प्रश्न व त्यातून प्रकटणारी नैतिक समस्या अनुस्यूत आहे. 'यशोधारा चरित' मध्ये पिठाचा कोंबडा करून त्याचा प्रतीकात्मक बळी देण्याची घटना आहे. प्रत्यक्ष हिंसा नसली तरी याद्वारे होणारी प्रतीकात्मक हिंसाही एकप्रकारे हिंसाच आहे व ती अमानवी पशुवृत्तीची आहे. कार्नाडांच्या प्रतिभेला हे प्रतीकात्मक हिंसेचे रूपक आकर्षित करीत होते व त्यातून या नाटकाची निर्मिती झाली आणि त्याद्वारे प्रेम, मत्सर, इच्छा, विश्वासाघात व स्त्री-पुरुषाच्या नात्यातली हिंसा सुजाण तात्त्विक पातळीवर कार्नाडांनी 'बळी' मध्ये ताकदीनं मांडली आहे

या नाटकाचं कथानक थोडक्यात सांगायचं झालं तर, नाटकाची नायिका राणी ही जैन धर्मीय, पण विवाह हिंदू राजाशी झालेला. तिच्या प्रेमासाठी त्यानं जैन धर्म स्वीकारला खरा, पण त्यातली तत्त्वं त्यानं पूर्णपणे अंगीकारलेली नाहीत. राजमाता मात्र कट्टर हिंदू आहे व यज्ञातील पशुबळीवर पूर्ण विश्वास असलेली आहे. राणी सुमधुर आवाजावर मोहित होऊन हलक्या जातीच्या कुरूप माहुताशी शरीरसंबंध जोडते. पण जैन धर्म व अहिंसा स्वीकारलेल्या राजाला माहुताला मारणं शक्य नसतं, पण व्यभिचारामुळे देवतेचा होणारा कोप बळी दिल्याखेरीज शांत होणार नाही ही राजमातेची ठाम भावना असते. त्यामुळे पिठाचा कोंबडा करून त्याचा प्रतीकात्मक बळी देण्याचा निर्णय होतो. पण अचानक पिठाच्या कोंबड्यात प्राण येतो व तो खरा बळी ठरतो, जो जैन धर्माला निषिद्ध आहे व शेवटी राणीला बलिदान करावं लागतं. असं हे हिंसा-अहिंसेचं द्वंद्व या नाटकाचं कथासार म्हणता येईल.

हे हिंसा-अहिंसेचं द्वंद्व आजच्या काळात किती महत्त्वाचं आहे व अमर्याद हिंसेच्या कालखंडात महात्मा गांधीचे अहिंसेचे तत्त्वज्ञान मानवजातीसाठी किती महत्त्वाचे आहे हे वेगळे सांगायला नको आणि हिंसा ही कृतीत येण्यापूर्वी मनात निर्माण होते व प्रतीकात्मक हिंसेचा विचारही प्रत्यक्ष हिंसेइतकाच विनाशकारी असतो, हे या नाटकातून गिरीश कार्नाडांनी मोठ्या ताकदीनं मांडलं आहे.

तसंच राणी व तथाकथित खालच्या जातीच्या माहुताशी विवाहबाह्य संबंधाद्वारे

स्त्री, समाज, वर्ण व धर्माच्या भिन्नवर्गी द्वंद्वाचा संघर्ष या नाटकात दिसून येतो. तिचा हा व्यभिचार धर्म व पुरुषप्रधान वर्चस्वाला आव्हान देणारा ठरतो. पावित्र्य हे केवळ पुरुषप्रधान वर्चस्वानं रूढ झालेल्या नीतिकल्पनांच्या आधारे न ठरवता ते व्यक्तीच्या ज्ञान-अनुभव व नैतिक कल्पनेच्या आधारे जाणणे ही आपल्या विवेकवादाची कसोटी आहे, हे मोठ्या खुबीनं या नाटकाद्वारे प्रत्ययास येते.

सारांशरूपाने सांगायचं झालं तर 'हयवदन' 'नागमंडल' व 'बळी' या तीनही मिथक आधारित नाट्यकृतीतून गिरीश कार्नाडांनी आपल्या काळाचे नैतिक प्रश्न व स्त्री-पुरुष संबंधातील गुंतागुंत व्यक्त केली आहे. पुरुषाची बालपण ते किशोरपण व किशोरपणातून पुरुषत्वाकडे होणारी वाटचाल, स्त्रीकडे हाडामासाचं समान दर्जाचं माणूस म्हणून पाहात झाली तर स्त्रीची तेव्हा व आताही होणारी घुसमट कमी होऊ शकते, हे या नाटकातून कलात्मकतेनं अधोरेखित होतं!

## चार

## ऐतिहासिक नाटकातून उलगडणारं आजचं वर्तमान : 'तुघलक' 'टिपू सुलतानाची स्वप्ने' व 'रक्त कल्याण' नाट्य

गिरीश कार्नाडांनी 'ययाती' या पहिल्या नाटकानंतर दुसरं नाटक 'तुघलक' लिहिलं. त्यांच्या वाचण्यात योगायोगानं कीर्तीनाथ कुर्तकोटीचं कन्नड साहित्यावरचं पुस्तक त्या काळी वाचनात आलं व एका टिप्पणीनं ते विचारात पडते. कुर्तकोटींच्या मते ज्याप्रमाणे शेक्सपियर व ब्रेश्ट्नी दर्जेदार ऐतिहासिक नाटकं लिहिली, तशी भारतीय नाटककारांनी लिहिली नाहीत. या टिप्पणीनं गिरीश कार्नाडांना प्रेरणा मिळाली व ऐतिहासिक नाटक लिहावंसं वाटलं. त्यांना आपल्या 'खेळता खेळता आयुष्य' या आत्मचरित्रात नाट्यलेखनाची प्रेरणा व प्रक्रिया खालीलप्रमाणे कथन केली आहे.

'नडेदु बंद दारि' मधल्या कीर्तीनाथ कुर्तकोटींच्या प्रस्तावनेनं माझ्यासाठी दरवाजा उघडला, नवा परिप्रेक्ष्य (पर्सपेक्टिव्ह) दाखवून दिला. मला डिवचलं. तिथं त्यांनी कन्नड नाटकांवर केलेली टिप्पणी माझ्या नजरेला पडली. "...तरीही ऐतिहासिक विषय घेऊन त्याच्या संदर्भात सत्याचे नवे पदर शोधून काढायचा प्रयत्न कुणीही केलेला नाही. जुन्याचं पुनरुज्जीवन करण्याबरोबर जुन्याकडे नवेपणानं बघायची दृष्टी आपल्याकडे आली पाहिजे. इतिहासाचा कच्चा माल वापरून नव्या कलाकृती जन्मल्या पाहिजेत. इतर क्षेत्रांत शॉ-इब्सेन आदर्श झाले तसे आपल्याकडेही झाले पाहिजेत. 'सीझर ॲण्ड क्लिओपात्रा' आणि 'सेंट जोन' सारखी एक तरी कलाकृती कन्नड भाषेत निर्माण न होणं ही शोचनीय अवस्था म्हटली पाहिजे..."

हा लहानसा परिच्छेद मी वाचला आणि मला वाटलं, 'का नाही'? मला माझ्या वडिलांकडून इतिहासप्रेम वारशात मिळालं होतं. शिरसीमध्ये तेरा-चौदा वर्षांचा असताना

एच. जी. वेल्सचा 'द आउटलाइन ऑफ वर्ल्ड्स हिस्टरी' हा ग्रंथ वाचून मी उत्तेजित झालो होतो. मी का जगाचा इतिहास लिहू नये, असा विचार करत पाच-सहा वह्या भरून टिपणंही काढली होती. त्या वह्या अजूनही माझ्यापाशी आहेत. त्यामुळे नाटकीय कथावस्तूच्या शोधात इतिहासाची पुस्तकं वाचायची, ही काही फार मोठी समस्या नाही.

मी लगोलग लायब्ररी गाठली. भारताच्या इतिहासाचं एक सोपं पुस्तक हातात घेतलं. मोहेंजोदारोपासून सुरुवात केली. वाचत गेलो. मौर्य, यवन, हूण, गुप्त, पल्लव, चोळ या सगळ्यांना पचवत मी चौदाव्या शतकातल्या महम्मद तुघलकच्या कारकिर्दीपर्यंत येऊन पोहोचलो. तिथे मी शोधात असलेली सामग्री माझीच वाट पाहत होती; महम्मद तुघलकचा 'वेडा' कारभार!

अस्तित्ववादात देव हेही एक पात्र असतं. मानव आणि देव यामधला संबंध ही तिथे तपासलेली एक महत्त्वाची समस्या होती. महम्मद तुघलकाविषयी वाचत असताना त्याच्या जीवनातल्या दोन घटनांनी मला एकाएकी आकर्षित करून घेतलं.

एक, दिल्लीवर राज्य करणाऱ्या सगळ्या सुलतानांमध्ये तो अत्यंत प्रतिभावान असला तरी अखेरीस तो त्याच्या समकालिनांच्या नजरेत, भवितव्याच्या दृष्टीनं वेडाच मानला गेला.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यानं आपल्या राज्यकारभाराच्या काळात सुमारे पाच वर्षं सार्वजनिक प्रार्थना थांबवली होती. हे ज्या क्षणी वाचलं, त्या क्षणी मी रोमांचित झाल्याचं आजही मला आठवतं. त्यावेळी मी स्वत:ला नास्तिक मानत होतो. तुघलकाची चकित करणारी ही योजनाही त्याच्या नास्तिकतेतून आली आहे, असा मला तेव्हा विश्वास वाटला. पण त्याच्याविषयी जास्तीची माहिती मिळवू लागलो, तेव्हा त्याच्या मनातल्या धर्माविषयक घुसळणीतून ही घटना घडली असेल, असं मला जाणवू लागलं. देवावर विश्वास ठेवणं ही साधी गोष्ट नव्हती. ती एक कठीण तपस्या होती.''

कार्नाडांच्या मते 'तुघलक' ही ऐतिहासिक नाटकासाठी एक बहुआयामी नाट्यपूर्ण व्यक्तिरेखा होती. दिल्लीवर राज्य करणाऱ्या सुलतानातला हा सर्वांत बुद्धिमान तसंच सर्वात अयशस्वी सुलतानही. तो काळाच्या पुढं होता, पण त्याच्या कारकिर्दीचा शेवट रक्तपात व अराजकतेनं झाला. हे नाटक १९६४ मध्ये कार्नाडांनी लिहिलं. पंडित नेहरूंच्या मृत्यूला एक वर्ष झालं होतं. आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पहिल्या पंधरा वर्षातच नैतिक ऱ्हास व ज्या मूल्यांसाठी भारतीय स्वातंत्र्यलढा लढला गेला, त्यांची घसरण जाणवू लागली होती. नेहरू पण तुघलकप्रमाणे आदर्शवादी होते व काहीसे अव्यवहारी. त्यांच्या आदर्श योजनांचा गैरफायदा काँग्रेसजन घेताना दिसत होते. कार्नाडांचा नाट्यविषय कोणताही असला तरी त्याचा वर्तमानाशी व आजच्या प्रश्नांशी जोडण्याकडे स्वाभाविक कल होता, त्यामुळे 'तुघलक'द्वारे स्वातंत्र्योत्तर

काळातील मूल्यांची घसरण, आदर्शवादाबाबतचा भ्रमनिरास कार्नाडांना सूचित करायचा होता.

'मोहंमद बिन तुघलक' हे एक परस्परविरोधी भावना व विचार एकत्रित नांदत असणारं पात्र आहे. त्याच्यात एकीकडे आदर्शवाद तर दुसरीकडे व्यवहार-वाद होता. तो नंतर कमालीचा धूर्त व क्रूरकर्मी बनत गेला. कार्नाडांनी तुघलकाचे लोककल्याणकारी राजा ते क्रूरकर्मी राजा हे रूपांतर नाट्यपूर्ण रीतीने नाटकात दाखवले आहे.

तुघलक हा इतिहासात 'वेडा मोहम्मद' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामागे त्याचे दोन निर्णय कारणीभूत आहेत. एक म्हणजे राजधानी सर्व लोकांसकट दौलताबादला स्थलांतरित करणे व दुसरं म्हणजे तांब्याची नाणी चांदीऐवजी सुरू करणं. वडिलांनी नमाज पढताना मारल्यावर आपल्याला कोणी मारू नये म्हणून पाच वर्ष त्यानं नमाजावर बंदी घातली होती. इकडे मुस्लीम मानसाविरुद्ध जात हिंदूचा जिझिया कर रद्द केला होता. त्याचा सॉक्रेटिस व प्लेटोचा अभ्यास होता. तो परस्परविरोधी वृत्तीचा सुरेख नमुना होता. तो जरा हुशार व आदर्शवादी होता, तसाच तो मनस्वी व लहरी, चंचल होता. या नाटकाचा एक मध्यवर्ती धागा आहे विश्वासघाताचा. हा विश्वासघात जसा नातेसंबंधाचा आहे, तसाच तो ध्येयवाद, विश्वास व मैत्रीचा आहे. तसाच धर्माचा पण आहे. त्यामुळे तुघलक हा मानसिक दृष्ट्या कमालीचा अस्थिर व दुबळा क्रमशः होताना दिसतो व तो समाज, नातेवाईक व खुद्द देवापासूनही अलग होत जातो. ही अलगतेची (alienation) ची भावना आधुनिक काळातील साहित्याची एक महत्त्वाची थीम आहे. तिचा सुरेख वापर कार्नाडांनी करून या नाटकाला एक कलात्मक उंची बहाल केली आहे.

प्रतीकांचा वापर करून पात्रांना व कथानकाला खोली व उंची प्रदान करणे ही गिरीश कार्नाडांची खासियत आहे. या नाटकात ती विपुल प्रमाणात आहे. तुघलकाचा निद्रानाश हे त्याच्या मनातील अस्वस्थ घालमेलीचं प्रतीक आहे. रात्री चंद्रप्रकाशात हिंडणं, त्याचं वेडसरपण व्यक्त करतं. तो स्वत:ची झाडाशी तुलना करतो, ज्यांच्या फांद्या उंच व सर्व दूर पसरलेल्या असतात, पण मुळं जमिनीशी घट्ट रोवलेली असतात. तो एकदा बोलताना स्वत:ला चिखलातलं डुक्कर म्हणावून घेतो. जेव्हा नमाजावरची बंदी तो पाच वर्षांनी उठवतो तेव्हा त्याला शांत झोप लागते, कारण मनाला अपूर्वशी शांती प्रतीत होत असते. सारांशरूपानं सांगायचं झालं तर खुद्द तुघलक हेही एक प्रतीक रूप बनून येतं - दुभंग व्यक्तिमत्त्वाचं. काळाच्या पुढे जाऊन पाहाणाऱ्यांना समाज नेहमीच समजून न घेता वेडा म्हणतो. त्याचं तुघलक मूर्तिमंत उदाहरण व कालौघात प्रतीक झालेलं!

मराठीत 'सवाई माधवरांचा मृत्यू' सारखं नाटक सोडलं तर वर्तमानाशी धागा जुळवत व आजच्या काळाचं प्रतिबिंब उमटलेलं 'तुघलक' हे पाहिले भारतीय

ऐतिहासिक नाटक म्हटलं पाहिजे!

'टिपू सुलतानची स्वप्ने' हे नाटक तुघलक परंपरेतले दुसरं ऐतिहासिक नाटक. गिरीश कार्नाडांना नाटकासाठी एक ट्रिगर पॉईंट लागतो. 'तुघलक' साठी तो त्यात पाच वर्षे नमाजबंदी आणली होती या घटनेनं दिला होता, तर टिपू सुलतानाच्या लिखितस्वरूपात ठेवलेल्या त्याच्या स्वप्नांच्या नोंदीनं दिला व त्यातून हे नाटक साकार झालं. टिपू हे एक गुंतागुंतीचं ऐतिहासिक पात्र आहे. स्वत: कार्नाडांनी नाटक सादर होताना पत्रकार परिषदेमध्ये म्हटलं होतं की, तो एक विचारी व दूरदर्शी बादशहा होता. तो कर्नाटकाचा एक सर्वोत्तम दंतकथा व लोककथांचा विषय झालेला हिरो होता. पण त्याच्याबाबत बरेच गैरसमज समाज जीवनात दृढ आहेत व बरंचसं असत्य पण लिहिलं गेलं आहे. कार्नाडांनी त्या पत्रकात परिषदेमध्ये हेही आवर्जून सांगितलं की, टिपूचा बराचसा कालखंड हा युद्धात व घोड्यावर बसण्यात गेला, तरीही त्यानं आपल्या स्वप्नांच्या गुप्त नोंदी लिखित ठेवल्या होत्या. एक सर्जनशील कलावंत म्हणून कार्नाडांनी इतिहास व त्याची स्वप्न यांची संगती लावून हे नाटक रचलं.

गिरीश कार्नाडांनी या नाटकाद्वारे टिपूचं स्वप्नातून व्यक्त होणारं मानस व विचार आणि ब्रिटिशांशी त्याचा चाललेला अव्याहत लढा याचं काव्यात्म पातळीवर जाणारं द्वंद्व मांडलं आहे. अपर्णा भार्गव धारवाडकरांनी collected plays volume two च्या प्रास्ताविकात नाटकाचं मर्म नेमकेपणानं खालील शब्दात व्यक्त केलं आहे.

'The image in the play of polity in crisis, both because adversary, earns the same potential for application to contemporary problem that has made the history of Tughlaq and Taledanda. Karnad interlineates Textualised history with legend, lore and memory because all these modes of transmission are germane to the story of Tipu.'

कार्नाडांनी टिपूला नाटकात लोकांचा आवडता राजा, दंतकथा बनलेला महापराक्रमी योद्धा, प्रेमळ पिता, दूरदर्शी, स्वप्नाळू आणि त्याच वेळी धूर्त, कारस्थानी व सत्तेच्या राजकारणातला निपुण असलेला दाखवला आहे. गिरीश कार्नाडांच्या नाटकात हे नाटक एका विशेषासाठी इतर नाटकामध्ये उठून दिसते, ते म्हणजे यात ब्रिटिशांच्या वसाहतवादावर सटीक भाष्य आहे. पश्चिम विरुद्ध पूर्व, युरोप विरुद्ध युरोपियेतर, गोरे विरुद्ध काळे, वसाहतवादी विरुद्ध त्याचे बळी अशा विविध द्वंद्वांचं चित्रण कार्नाड या नाटकात ताकदीनं करतात. टिपूची शोकांतिका केवळ ब्रिटिशांनी त्याचं मैसूरचं साम्राज्य घेण्यात नाही, तर एका द्रष्ट्या व्हिजनरीच्या स्वप्नांच्या समाप्तीमध्ये होती. नाटकात कार्नाडांनी जी ब्रिटिश पात्रं रेखाटली ती वसाहतवाद्यांचे प्रतीक आहेत. ती तार्किक, धूर्त, निर्घृण व वंशवादी आहेत. ती 'डिव्हाईड अँड रूल' चा अवलंब

करणारी आहेत. हुसेन अली किरमाणी हा टिपूच्या मृत्यूनंतर त्याच्या आठवणी इंग्रजांसाठी लिहीत आहे, त्यातून हे नाटक उलगडत जाते. मृत्यूच्या छायेत टिपूला विजयाची स्वप्नं पडतात, ती नाटकातून दाखवताना त्याला एक वेगळे काव्यात्म परिमाण लाभले. ज्याप्रमाणे कर्ण व संभाजीला आधुनिक काळात न्याय देत त्यांना मराठी साहित्यांत नायकत्व बहाल झालं आहे, तसंच नायकत्व कार्नाडांनी या नाटकातून यशस्वीपणे टिपूबाबत केलं आहे. त्यातील ऐतिहासिक सत्य-असत्यता व त्याचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ सर्वसान्य होईलच असा नाही, तरीही एक रसरशीत नाट्यानुभव हे नाटक प्रभावीपणे देते हे निर्विवाद. आदर्श राजकारण्यांकडे भविष्यात पाहायची दूरदृष्टी असली तरी किलर इन्स्टिंक्ट नसेल व सभोवती खुजे-स्वार्थी व सत्तालोलुपी असतील तर अशा व्यक्तींची शोकांतिका अटळ असते, हे सार्वकालीन, विशेषत्वानं आजच्या वर्तमान भारतातील, राजकारणाचं सत्य यातून जोरकसपणे प्रत्ययास येतं!

इतिहासातून पात्रे व घटना घेऊन रचलेलं गिरीश कार्नाडांचं बाराव्या शतकातील क्रांतिकारी संत बसवण्णा, ज्यांनी लिंगायत धर्म म्हणा - पंथ म्हणा - स्थापना केली, त्यांच्या जीवन व विचारावर आधारित 'तलेदंडा' हे नाटक आहे. इतिहास व त्याची आजच्या वर्तमानातली प्रस्तुतता हा गिरीश कर्नाडांना सदैव आकर्षित करणारा विषय आहे. व 'तलेदंडा' हे त्याचं एक सुरेख उदाहरण. हे नाटक आलं १९९३ साली, जेव्हा भारतात मंडल कमिशन लागू झालं होतं व राम मंदिर आंदोलन सुरू झालं होतं (ज्याचं पर्यवसन पुढे बाबरी मशिदीच्या विध्वंसात झालं) आणि धार्मिक् उन्माद वाढत होता. या नाटकाच्या प्रस्तावनेत या भारताला भेडसावणाऱ्या घटनांचा उल्लेख करीत कार्नाड लिहितात, 'बसवण्णासारख्या विचारवंतांनी त्याकाळी उपस्थित केलेले प्रश्न आजही किती प्रस्तुत आहेत!' आज भारताला भेडसावणारा धार्मिक अतिरेकीवादाचा प्रश्न देशाचा पाया (एका अर्थाने the idea of india) कसा उद्‌ध्वस्त करीत आहे हे पाहिलं की (बसवण्णासारख्या) विचारवंतांनी शोधलेली उत्तरे दुर्लक्षित करणे वा झिडकावणे किती धोकादायक आहे हे लक्षात येतं! आजच्या जाती व धर्मभेदाच्या कुरूपतेकडे लक्ष वेधताना नाटककारांचा सामाजिक न्याय व दलितांबद्दलच्या प्राथमिक कळवळा व सहानुभूती नाटकातून प्रगट होते. या नाटकाद्वारे जातीभेदाची अमानवीय अमानुषता, व धार्मिक उन्माद व धर्म-राजकारणाची अभद्र युती अशा अनेक बाबींवर प्रकाशझोत टाकला असला तरी त्याची उत्तरं दिली नाहीत, असा काही टीकाकारांचा आक्षेप आहे, पण तो फारसा समर्पक नाही. कारण बसवण्णांचे विचार व कृती हे उत्तर मन व बुद्धीने निखळतेने आपलं समाजमन स्वीकारत नाही, ही शोकांतिक आहे म्हणूनच 'तलेदंडा' हे ऐतिहासिक नाटक आजच्या वर्तमान प्रश्नांशी जोडण्यात कार्नाड सर्वार्थाने यशस्वी झाले आहेत.

'तलेदंडा'चं कथानक सांगायचं झालं तर बाराव्या शतकातील बसवण्णा या समाजसुधारक संतांनी वर्णाश्रम व्यवस्था मानणाऱ्या सनातन धर्माविरुद्ध बंड पुकारीत लिंगायत धर्माची स्थापना केली. जातीनिर्मूलन, लिंगसमानता, मूर्ती-पूजेचा त्याग, ब्राह्मणी व्यवस्थेस नकार व संस्कृतऐवजी मातृ-बोली भाषा म्हणून कन्नडचा स्वीकार हा या धर्माचा गाभा होता. त्याला ब्राह्मण्यानं व रूढी-परंपरा मानणाऱ्या उच्चवर्णीयांनी विरोध केला नाही तर नवलं होतं! हा विरोध जेव्हा कलावती या ब्राह्मण कन्येचा चर्मकार समाजातील शीलवंताशी लग्न लावून देण्यात आलं तेव्हा तीव्र व हिंसक झाला व ही समाजसुधारणेची चळवळ रक्तपात व क्रौर्य-हिंसेमुळे थंडावली.

या नाटकातून गिरीश कार्नाडांनी कौशल्याने वर्णाश्रम धर्मात तथाकथित हीन जातीच्या माणसांना सामाजिक व्यवहारात उच्चवर्णीयांचं वर्चस्व मान्य केल्याखेरीज सरळपणे जगता येत नाही; राजा बिजालाची पण हीच व्यथा आहे की तो राज्यकर्ता असूनही ब्राह्मणी व्यवस्था त्याला हीन समजते- त्याची व्यथा या संवादातून अंगावर येते. ''दहा पिढ्यांपासून राजघराण्याशी वैवाहिक संबंध जोडला, ब्राह्मणांना लक्षावधी गायींची लाच दिली, जेणेकरून आम्हांस क्षत्रिय मानावं. पण आज माझी जात काय? तत्काळ उत्तर आले - न्हावी. जात ही माणसाच्या कातडीप्रमाणे केवळ शरीराला नव्हे तर अस्तित्वाला चिकटलेली असते. कातडी वरपासून खालीपर्यंत सोलून काढली तरी नवी कातडी आल्यावर पुन्हा तीच जात असते - न्हावी.'' हा प्रश्न घटनेने जाती निर्मूलन करूनही किती जिवंत आहे, नव्हे, पुन्हा तो किती उग्र, किती विकृत होत आहे, हे सांगणे नलगे. तो या नाटकात तीव्रतेनं मांडला आहे.

बसवण्णांच्या लिंगायत धर्मात सर्व हीन जातीचे जसे सामील झाले तसे उच्चवर्णीयही. या भक्तांना शरण म्हटलं जाऊ लागलं. शीलवती - गुणवंतांच्या विवाहानं वर्णाश्रम व्यवस्थेला धक्का बसल्याचा धोका लक्षात आल्यामुळे तीव्र रक्तरंजित विरोध होत ही चळवळ दडपण्यात वर्णवादी व्यवस्था यशस्वी झाली. कारण समाजसुधारणेची बसवण्णांची चळवळ अजून पुरती रुजली नव्हती. ब्राह्मण - चर्मकार विवाहाबाबत तीव्र विरोधाची शक्यता लक्षात घेऊन साशंकतेनं बसवण्णा म्हणाले होते, ''आतापर्यंत वैचारिक पातळीवर सुधारवाद होता. तो आता कृतीत येतोय. तो वर्णाश्रम धर्माला मोठा धक्का आहे. व या धर्माच्या असहिष्णु पाईकांना गेल्या दोन हजार वर्षात असे आव्हान दिले गेले नाही, त्यामुळे विरोधाचे किती जालीम जहर बाहेर येईल, किती विद्वेषाची आग भडकेल, हे सांगायची गरज नाही.'' पुढे असेही म्हणतात, ''या सुधाराबाबत कितीतरी पुढे जायचे आहे. या विवाहामुळे होणाऱ्या क्रांतीला आपण पुरेसे तयार नाही आहोत, आपण पुरेसे काम अद्याप केलेले नाही.''

वाय. सोमलता (Girish Karnad's Tale Danda : Painful Rite of

Passage) मध्ये 'तलेदंडा'चे महत्त्व अधोरेखित करताना म्हणतात की, या नाटकात समकालीन समाज व साहित्याचे अनुस्यूत असलेले नाते कार्नाडांनी नेमकेपणाने शोधले आहे. आधुनिकता व परंपरा, रूढीवाद व सुधारकीपणा, अध्यात्मिक व ऐहिक तसेच ध्येयवाद व व्यवहारवाद यातले द्वंद्व प्रकट करताना हिंदूधर्मातील जातिवादाचे समग्र रूप परिणामकारकतेने त्यांनी व्यक्त केले आहेत.

'तुघलक', 'टिपू सुलतानाची स्वप्ने' आणि 'तलेदंडा' या ऐतिहासिक नाटत्रयीतून इतिहासकालीन चरित्रनाटकाच्या माध्यामातून संघर्षपूर्ण नाट्यानुभव जिवंत करताना कार्नाडांनी त्याद्वारे भारताचे प्रश्न व समस्या मांडल्या आहेत. मूल्यांची घसरण व आदर्शवादी स्वप्नांची विफलता (तुघलक), वसाहतवादाचे बळी (टिपू) आणि जाती-धर्माचा उद्धार भारताच्या कल्पनेला (The Idea of India) कसा सुरुंग लावत आहे. (तलेदंडा) हे या नाटकातून कलात्मक तटस्थतेनं प्रेक्षक व वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करतं. त्यामुळे त्यांची ऐतिहासिक नाटके आधुनिक भारतीय रंगभूमीवर वेगळेपणा व समकालीन प्रस्तुततेमुळे महत्त्वाची मानदंडे ठरतात!

### एकविसाव्या शतकातील आजच्या काळाची नाटके : 'ब्रोकन इमेजेस', 'फ्लॉवर्स' 'वेडिंग अल्बम' आणि 'उणे पुरे शहर एक'

१९६१ साली लिहिलेल्या 'ययाती'पासून 'बळी' पर्यंतच्या नऊ नाटकातून २००३ पर्यंत गिरीश कर्नाडांनी पुराण, मिथके व इतिहासाचा आधार घेत नाट्यरचना केली. त्यामुळे आपल्या मुळांशी जात त्यांनी एतद्देशीय रंगभूमीला नवे आयाम दिले. पण त्याचबरोबर हाही प्रश्न उपस्थित होत होता की, कर्नाड हे आजच्या वर्तमानाच्या प्रश्नांना का भिडत नाहीत? कदाचित त्यांनाही हा प्रश्न मनोमन पडत असणार. हा खरा कलावंत - तोच जो सातत्याने विकसित होत जातो व प्रेक्षक / वाचकांना नवे काही देत जातो. पुराणकथा, मिथके व इतिहास अशा तीन 'जेनर' ची नाटक लिहिल्यानंतर २००४ साली दोन एकपात्री नाटके-मोनोलॉग लिहून कर्नाडांच्या नाट्यलेखनाचा नवा अध्याय सुरू झाला. प्रथमच त्यांनी इंग्रजीतून 'ब्रोकन इमेजेस' व 'फ्लॉवर्स' हे दोन मोनोलॉग्ज लिहिले व त्यानंतर 'वेडिंग आल्बम' व उणे पुरे शहर एक' ही नाटके आली. या चार नाटकात त्यांनी नाट्यलेखनाचे नवे प्रयोग तर केलेच पण नव्या आधुनिक प्रश्नांना ते सामोरे गेले व आपल्यातली नाट्यप्रतिभा अजूनही अक्षुण्ण आहे व प्रेक्षकांना अकल्पित सुखद धक्के देऊ शकते हे त्यांनी दाखवून दिलं!

२००४ साली रंगभूमीवर आलेलं व आजही गाजत असलेलं 'ब्रोकन इमेजेस' हा मोनोलॉग आहे, पण त्यात नव्या तंत्राचा नाट्यपूर्णतेसाठी केलेला वापर प्रयोगाला एक नवी झळाळी देऊन जातो. एक स्त्री टीव्हीवरील आपल्या प्रतिमेशी बोलत राहाते, अशी ही क्लृप्ती, पण ती केवळ टूम म्हणून येत नाही, तर नाट्यविषयाला पूर्ण न्याय

देत एक नवा नाटकीय फॉर्म घेऊन येते. म्हणून अभिनयाचा कस पाहणारी हे एकपात्री नाटक इंग्रजीत शबाना आझमी, कानडीमध्ये अरुंधती नाग तर मराठीत रीमानं सादर केलं, हे या नाटकाची गुणवत्ता सिद्ध करायला पुरेसं आहे.

'ब्रोकन इमेजेस' हे नाटक गिरीश कर्नाडांनी नेहमीच्या प्रथेविरुद्ध जात प्रथम कानडीमध्ये न लिहिता इंग्रजीत लिहिलं व त्याचा विषय पण भारतीय साहित्य-संस्कृतीमधलं भाषिक राजकारण. देशी भाषेतलं व्हर्नेक्युलर साहित्य व भारतीयांनी इंग्रजीत लिहिलेलं साहित्य हा न संपणारा वाद आहे, कारण इंग्रजीत दुय्यम लिहूनही 'लिटररी जाएंट' म्हणून मिरवता येतं; कारण आपली भारतीय मानसिकता. आज चेतन भगत व अमित त्रिपाठीसारखे लेखक त्यांचे साहित्य दुय्यम दर्जाचे असूनही लाखातला खप व कोटीतले मानधनामुळे साहित्यिक प्रस्थ झालेले आपण पाहात आहोत. या पार्श्वभूमीवर ज्यांची सर्व नाटके इंग्रजी व अनेक भारतीय भाषामधून भाषांतरित झालेली व रंगमंचावर गाजली, ते कार्नाड हा विषय घेतात तेव्हा त्यांच्यावर 'कोल्ह्याला द्राक्षे आंबट' म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. या नाटकाची नायिका जेव्हा कन्नडमध्ये लिहीत असते तेव्हा फारशी प्रकाशात नसते, पण जेव्हा मृत बहिणीची इंग्रजी कादंबरी स्वतःच्या नावाने छापते, तेव्हा ती साहित्यिक लिजंड बनते व एके दिवशी तिचं टी.व्ही. मधलं प्रतिबिंब, जे तिचं मन आहे - अल्टर इगो आहे - बोलू लागतं तेव्हा एक क्षुल्लक बौद्धिक चर्चा नाही, तर मंजुळा, तिची मृत बहीण व तिला सोडून गेलेला नवरा या तिघांच्या नात्यांची गुंतागुंतही प्रकट होते व एक रसरशीत नाट्यानुभव व तोही नव्या अभिनव तंत्ररचनेतून मिळतो, आणि पुन्हा एकदा कार्नाड रसिकांना अचंबित करतात.

'फ्लॉवर्स' हा त्यांचा २००४ मधलाच दुसरा मोनोलॉग आहे, त्याचं तंत्र नवं असलं तरी पुन्हा एक मिथकाचा त्यांनी आधार घेतला आहे. पण इथं स्त्रीऐवजी एक पुरुष केंद्रस्थानी आहे, हे वेगळेपण आहे. एक विवाहित पुजारी दिवसा शिवलिंगाची मनोभावे पूजा करीत असतो, तर रात्री गणिकेवर तीच फुले माळून तिला शृंगारित करून तिच्याशी संग करीत असतो. विशुद्ध देवभक्ती व तेवढीच उत्कट रतीक्रीडेची आसक्ती त्याच्या ठायी असते. एकदा प्रसादाच्या पेढ्यात केस निघतो, तेव्हा जाब विचारला असता पुजारी हा देवाचा शिवलिंगाचा केस आहे असं सांगतो. ते सिद्ध करण्याची पाळी येते, तेव्हा तो उत्कटतेने देवाची आराधना करतो व चमत्कार होत शिवलिंगावर लांब रेशमी केस येतात, जेव्हा तो केस काढायला जातो, शिवलिंगातून रक्त वाहू लागतं. आपण देवाला जखमी केलं व घोर पाप केलं या जाणिवेनं पुजारी स्वतःचं मस्तक देहापासून अलग करीत शिवलिंगाला अर्पण करतो. या नाटकातून भक्ती व प्रेमाचं द्वंद्व एकपात्री कथनातून उत्कटतेनं कार्नाडांनी साकार केलं आहे.

सुधा के अरोरांनी या दोन मोनोलॉगबद्दल मार्मिक निरीक्षण नोंदवत असं म्हटलं

आहे की, दोन्ही नाटके नाट्यपूर्ण असून त्यात द्वंद्व मांडलं आहे. 'ब्रोकन इमेजेस' मध्ये मौलिकता विरुद्ध चौर्यकर्म केलेलं साहित्य आणि इंग्रजीविरुद्ध देशी वाङ्मय तर 'फ्लॉवर्स'मध्ये प्रेम (स्त्री) विरुद्ध कर्तव्य (पुजारीपणा) असं द्वंद्व कार्नाडांनी रंगवलं आहे. या दोन नाटकाद्वारे त्यांनी आपली प्रयोगशीलता व आधुनिक रंगमंचीय नाटके आपण लिहू शकतो हे त्यांनी सिद्ध केलं आहे.

२००८ सालचं त्यांचं 'वेडिंग आल्बम' हे नाटक रंगभूमीवर आलं ते आजच्या काळातील कुटुंब व्यवस्थेवरचं सटीक भाष्य करणारं व कथानकापेक्षा एपिसोडिक पद्धतीनं अनेक पात्रांचं जीवननाट्य घडवणारं नाटक आहे. It gives humorous insight into the country's traditions and culture...explore the traditional Indian wedding in a globalized and technologically advanced India!

हे नाटक म्हणजे शहरी मध्यमवर्गीय सारस्वत ब्राह्मण नाडकर्णी कुटुंबाची धारवाड शहरातली कथा आहे. हेमा ही मोठी विवाहित मुलगी ऑस्ट्रेलियात नवऱ्यासह राहणारी; धाकट्या बहिणीच्या, विदुलाच्या लग्नासाठी धारवाडला आली आहे. तिचा भाऊ रोहित हा सॉफ्टवेअर इंजिनियर, प्रेमळ आई व स्वयंपाकीण राधाबाई व कुटुंबप्रमुख नाडकर्णी ही प्रमुख पात्रे. नऊ प्रसंगातून साकारलेलं हे नाटक प्रामुख्यानं स्त्री केंद्रित आहे व दोन भिन्न जग-पारंपरिक व आधुनिक (सायबरसह) जगात फिरणारं आहे. आधुनिक हिंदू समारंभामध्ये सेक्स, जात, रूढीवादी तसेच आधुनिक विचारांचा टकराव, नात्यातला स्वार्थीपणा, पावित्र्याच्या परंपरागत कल्पनेचा आग्रह, पैशाचं महत्त्व, आज्ञाधारकता, व अधिकार.... हे व असे असंख्य मानसिक व भावनिक ताणतणाव अनुभवायला येतात. त्याचंच हलक्याफुलक्या शैलीत कार्नाडांनी चित्रण केलं आहे. व्हिडीओवर लग्नाची सी. डी. पाठवणे, सायबर कॅफेमध्ये जाऊन मुलीनं पोर्नोग्राफी चित्र पाहाणे, टी. व्ही मालिकेत भडकपणा आणण्याचा आग्रह धरणे, एन. आर. आय. नवरा, त्याचा मुलीवर येणार ताण, वयात आलेल्या किशोर मुलाला विवाहित स्त्रीचं वाटणारं लैंगिक आकर्षण, विदुलाच्या जन्मदाखल्यात बापाऐवजी काकाचं नाव असल्याचं लग्नाच्या वेळी समजताच लग्नसंस्थेवर होणारे संशय व पावित्र्यावरून होणारे आघात... वाढता धर्मवाद, असे असंख्य स्नॅपशॉट्स कार्नाड प्रवाहीपणे नाटकात मांडतात. त्यानं प्रेक्षक अंतर्मुख होतो.

गिरीश कर्नाडांचं ताजं नाटक म्हणजे 'बेंडा कातू ऑन टोस्ट' हे बदलत्या महानगराचं व्यवच्छेदक चित्र होय. ते मराठी पुण्यावर बेतून 'उणे पुरे शहर एक' नावानं 'आसक्त' संस्थेनं सादर केलं व त्याच्या प्रयोगास सध्या तरुणवर्ग गर्दी करतो आहे. वेगानं बदलणाऱ्या शहरात ग्रामीण भागातील माणसे व त्यांचे व्यवसाय किनाऱ्यावरच असतात व त्यापेक्षा भिन्न जीवन असतं उच्चभ्रू शहरवासीयांचं. यातला विरोधाभास गडद करताना कार्नाड विविध भिन्नवर्गीय पात्रांद्वारे त्याची दाहकता दाखवतात. हे नवं

'ताजं नाटक वेगानं बदलणाऱ्या शहराचं वास्तव पण अंर्तमुख करणारं चित्रण करतं!

**उपसंहार**

असा हा गिरीश कार्नाडांचा पन्नास वर्षांचा नाट्यसंसार. मी प्रामुखाने त्यांच्या लिखित व प्रकाशित इंग्रजी - मराठीतील अनुवादित नाट्य-संहितांच्या पुस्तकांचा विवेचनासाठी आधार घेतला आहे. त्यांनी भारतीय रंगभूमीला दिलेले योगदान किती महत्त्वाचं आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होतं. तरीही समारोप करताना सूत्ररूपानं मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवतो.

१. पुराणकथा व मिथकांचा आधार घेऊन कर्नाडांनी जी नाटकं लिहिली, त्यामागे भारतीय रंगमंचाचा डोळस शोध होता व त्यामुळे पाश्चात्त्य प्रोसेनियम पलीकडेही समृद्ध अशी भारतीय परंपरेतून विकसित झालेली भारतीय / कन्नड रंगभूमी आहे, तिचा वापर करून आजचे आधुनिक प्रश्न समर्थपणे मांडता येतात. 'Discovering our roots for inventing truly Indian theater is the significant contribution of Girish Karnad.'

२. 'तुघलक', 'टिपू सुलतानाची स्वप्ने' व 'तलेदंडा' व 'बळी' या नाटकांद्वारे ऐतिहासिक नाटकाची सशक्त परंपरा कर्नाडांनी सुरू केली. त्यातील व्यामिश्रता व इतिहासातून वर्तमान प्रश्नांचा शोध कसा घेता येऊ शकतो याचा सुरेख वस्तुपाठ गिरीश कर्नाडांनी दिला आहे.

३. त्यांची नाटकं रंगमंचावर सादर करणं हे भारतीय रंगकर्मींसाठी सदैव आव्हान होतं. एवढी सकस व भारतीय परंपरेतली पण आधुनिक संवेदनशीलतेची नाटकं कर्नाडांची आहेत. विजया मेहता, अलेक पदमसी, अरुंधती नाग, सत्यदेव दुबे आदींना ती रंगभूमीवर आणावीशी वाटली व त्यांतून त्यांना नवा फॉर्म व आशय शोधता आला, ही किमया कर्नाडांच्या प्रतिभेची आहे.

४. एकविसाव्या शतकाच्या मध्यापासून गिरीश कर्नाडांच्या प्रतिभेने नवे वळण घेतले आहे. 'वेडिंग अल्बम' व 'फ्लॉवर्स' ही दोन मोनोलॉग फॉर्ममधली नाटके व त्यासाठी नव्या तंत्राचा वापर यामुळे त्यांच्यातली प्रतिभा अद्यापही टवटवीत आहे व नवे प्रयोग करणे हा त्यांचा साहित्यिक धर्म आहे याची पुन्हा खात्री पटते.

५. कार्नाडांनी सतत स्त्री प्रश्नांच्या, खास करून तिच्या लैंगिकतेचा, प्रेम व वासना, पुरुषसत्ताक समाजात तिची होणारी कुचंबणा, दुय्यमत्व व प्रसंगी निष्फळ ठरणारी बंडखोरी नाटकातून व्यक्त करताना आधुनिक स्त्रीवादाच्या परिप्रेक्ष्यात पुरोगामी भूमिका घेतली आहे व प्रेक्षकांना विचाराला प्रवृत्त केले आहे.

६. ऐतिहासिक नाटकातून आधुनिक भारतातील महत्त्वाचे प्रश्न, जसे की आदर्शवादाचा पराभव, मूल्यांची घसरण, निर्घृण सत्तासंघर्ष व सत्ता हेच साध्य व साधन मानणं, धार्मिक उन्माद, जातीय संघर्ष कार्नाडांनी प्रभावीपणे मांडले आहेत.

ऐतिहासिक घटना कोणते प्रश्न उपस्थित करतात व त्यातून कोणता विचार स्वीकारला पाहिजे, याकडे कलात्मकतेची कास न सोडताही कार्नाड अंगुलीनिर्देश करीत विचार करायला बाध्य करतात.

७. अलीकडची कार्नाडांची नाटके आजच्या भारताचे प्रश्न, बदल व त्यातून निर्माण होणारे प्रश्न दाखवतात. 'वेडिंग अल्बम' मध्ये हिंदू विवाहपद्धतीच्या अनुषंगाने धर्म, रूढी व मानवी नात्यांची बदलती रूपे त्यांनी दाखवली आहेत, तर 'उणे पुरे शहर एक' द्वारे छोटी शहरे जेव्हा वेगाने महानगरांची रूपे धारण करतात तेव्हा इथेही सीमेवर कसा ग्रामीण माणूस फेकला जातो व एका अर्थानं शहरातही झोपडपट्टीच्या रूपाने नवे गांवकूस कसे निर्माण होत आहे हे दाखवतात. 'ब्रोकन इमेजेस'द्वारे इंग्रजी विरुद्ध देशी भाषा व साहित्य व त्यातलं राजकारण दाखवतात. म्हणजेच त्यांच्या प्रतिभेनं नवं वळण घेतलं आहे व नवे विषय नव्या पद्धतीने ते प्रभावीपणे मांडताना दिसतात.

सारांश, 'ज्ञानपीठ' पुरस्कारानं सन्मानित झालेल्या गिरीश कार्नाडांनी कन्नड रंगभूमीबरोबर भारतीय रंगभूमी पण समृद्ध केली आहे.

०-०-०

# २. 'धग' - सुन्न करणारा प्रभाव!

गाण्याच्या प्रत्येक टप्प्यावर आणि कालखंडात कुणाही व्यक्तीला त्या वेळचे त्याचे मन, भावना व बुद्धीला वेगवेगळी नाटके, घटना, साहित्य व सिनेमा प्रभावित करीत असतात. हे मलाही तेवढंच लागू आहे.

सिनेमाचा विचार करायचा झाला, तर जेव्हा गुरुदत्त त्याच्या मृत्युपश्चात आठ-दहा वर्षांतच दंतकथा बनू लागला होता, त्या सत्तरीच्या दशकात, माझ्या नव्हाळीच्या किशोर कालखंडाच्या वयात 'प्यासा'ने मला वेडं केलं होतं. आजही हा चित्रपट मला तेवढाच भावतो; पण प्रभावाखाली न येता तटस्थतेने आज पाहता येतं! भावनाप्रधान कविमनाच्या नायकाची पैसा व यश हे मूल्य महत्त्वाचे मानणाऱ्या जगात होणारी रोमँटिक ट्रॅजेडी तेव्हा मनावर अमिट छाप सोडून गेली होती. आज मला 'प्यासा'पेक्षाही गुरूदत्त व त्याचं वैयक्तिक अप्राप्याचा ध्यास घेतलेलं जगणं जास्त प्रभावित करतं. ज्या सिनेमानं माझी सर्वप्रथम 'न्यू वेव्ह' सिनेमाशी ओळख करून दिली, तो श्याम बेनेगलचा 'अंकुर' मला महाविद्यालयीन जीवनात कमालीचा प्रभावित करून गेला होता. ग्रामीण भारतातील ऐतखाऊ व सुखलोलुप जमीनदारांकडून दलितांचं होणारं शोषण बेनेगलांनी अत्यंत प्रभावीपणे थेट मांडलं होतं. आज काळाच्या ओघात त्याचा प्रभाव निश्चितच कमी झाला आहे. अंगभूत स्त्रीसामर्थ्याचं दर्शन ताकदीनं घडविल्यामुळे जब्बार पटेलांचा 'उंबरठा' व महेश भटांचा 'अर्थ' मला काही काळ प्रभावित करून गेले होते. माझ्या ऐन तारुण्यातला प्रचंड प्रभाव पाडून गेलेला चित्रपट म्हणजे 'एक दूजे के लिए'. अतार्किक वाटावी एवढी प्रेमाची उत्कटता ज्या प्रभावीपणे या चित्रपटात के. बालचंदर यांनी चित्रित केली आहे, तिला आजही तोड नाही. माझ्या मते, हिंदी सिनेमाच्या संदर्भात प्रेमकथा मांडणारा हा सर्वोत्कृष्ट चित्रपट - अर्थात बॉलिवुड सिनेमाच्या चौकटीत आहे, हे माझं ठाम मत आहे.

पण कोणतेही गिमिक न वापरता जळजळत्या वास्तवाला भेटपणे भिडणारी कलाकृती - मग ती साहित्य असो वा सिनेमा - मला जास्त भावते. अलीकडच्या काळात मला प्रचंड प्रभावित करून गेलेला चित्रपट म्हणजे 'धग'. त्याबद्दल हे माझे

मुक्त, पण मनस्वी विचार.

आजवर थिएटरमध्ये रिलीज न झालेला शिवाजी लोटन पाटील दिग्दर्शित हा सिनेमा गेले वर्षभर विविध फेस्टिव्हल व आस्वादक शिबिरांत चर्चिला जात आहे. मी असाच तो फेस्टिव्हल व खास स्क्रिनिंगमध्ये दोन वेळा पाहिला. पहिल्यांदा पाहिला, तेव्हा किती तरी वेळ मी जळजळत्या वास्तवाच्या विदारक दर्शनानं सुन्न झालो होतो. दुसऱ्यांदा पाहिला. तेव्हाही तो प्रभाव तेवढाच उत्कट होता. त्यातील बारीकसारीक दृश्यमालिकांनी व मधूनच स्वाभाविकपणे होणाऱ्या 'ब्लॅक ह्युमर'मुळे प्रभाव अधिकच गडद होत होता.

मृत्यू हे माणसाच्या जीवनातलं एकमेव शाश्वत सत्य. मृत्यूनंतर माणसाचं काय होतं, हे न सुटलेलं कोडं आहे. त्यामुळे मृत्यूभोवती अनेक मिथकं रचली गेली व अंत्यसंस्काराचे कर्मकांड अस्तित्वात आढते. आणि ते पिढ्या दर पिढ्या घट्ट होत गेले. विशेषत: हिंदू धर्मात सरणावर प्रेत जाळण्याचा अंत्यसंस्कार मला जितका भीषण मोहक वाटतो, तेवढाच त्रासदायकही वाटतो. जस्ट इमॅजिन - जवळच्या माणसाच्या अंत्यसंस्कारात तुम्ही सामील आहात. तिरडी रचणे, त्यावर प्रेताला स्नान घालून व नूतन वस्त्रे घालून प्रेत तिरडीवर ठेवत ते करकचून बांधणे, स्मशानात लाकडाची विशिष्ट पद्धतीने चिंता रचणे, त्यावर प्रेत ठेवून प्रदक्षिणा घालणे; भरलेलं पाण्याचं मडकं मागे न पाहता फेकून देणे व ते मग फुटणे, तूप व केरोसिन टाकत अग्नी प्रज्वलित करणे आणि कवटी फुटण्याचा आवाज येईपर्यंत थांबणे... या साऱ्या प्रसंगांतून हिंदू समाजाची माणसं कधी ना कधी गेली असणारच. मीही गेलो आहे व प्रत्येक वेळी मला या कर्मकांडाचा प्रचंड त्रास झाला आहे. अशा वेळी जीवनाची क्षणभंगुरता - ज्याला 'स्मशानवैराग्य' हा शब्दप्रयोग योजला जातो - जाणवते... कदाचित या तपशीलवार, मन उदास - खिन्न व किळसवाणं करणाऱ्या कर्मकांडाचा तोच हेतू असावा का? मला माहीत नाही.

पण स्मशानात राहून सरण रचणं, त्यासाठी लाकडं फोडणं व त्यावरच उपजीविका करणाऱ्या माणसाचं हे भागधेय जेव्हा त्याला जातीच्या उतरंडीत कनिष्ठ जातीचं स्थान प्रदान करतं व त्यातून सुटकेचे सर्व मार्ग समाजव्यवस्था बंद करते, तेव्हा त्याचं जगणंही तेवढंच विदारक व भयानक शोषणाचं होऊन जातं.

अशाच एका स्मशानभूमीत चिता पेटविणारा श्रीपती व त्याच्या कुटुंबाची कथा 'धग'मध्ये अत्यंत संयमी, काटकसरीपणानं पण थेट अंगावर येईल अशा दाहकतेने मांडली आहे. बाबा भांड यांची 'दशक्रिया' ही कादंबरी किंवा प्रेमानंद गज्वींच्या 'किरवंत' नाटकापेक्षा हा सिनेमा खूप वेगळा, अधिक सखोल व प्रत्ययकारी आहे. कदाचित ही चित्रमाध्यमाची ताकद असेल; पण दोन तासांच्या अवधीत बॉलिवुड नियमांना फाटा देत तथाकथित 'रिलीफ' क्षणभरही देण्याचं पटकथाकार नितीन दीक्षित

व दिग्दर्शन शिवाजी लोटन पाटलानं टाळून विषयाचा आशय व प्रभाव जराही पातळ होऊ दिला नाही.

श्रीपतीचं घर स्मशानभूमीतच, गावकऱ्यांनी अंत्यविधी करण्यासाठी जागेसह दिलेलं. हाच त्याचा उपजीविकेचा पिढीजात व्यवसाय आहे. जेव्हा गावात माणसे मरतात, याची कमाई होते. प्रत्येक प्रेत जेव्हा जाळण्यासाठी त्याच्याकडे येतं, तेव्हा त्याची विधवा आई 'मृतात्म्याला शांती मिळो व आमचं पोट असंच भरो' असं विठ्ठलाला मागत राहते; ते ऐकताना अंगावर काटा येतो. पण त्याला, त्याची बायको यशोदाला आपला मुलगा कृष्णानं हा व्यवसाय पुढे चालवू नये, असंच वाटत असतं. त्यामुळे त्याला शाळेत घातलं आहे, पण तिथेही जात व व्यवसायावरून विद्यादान करणारे मास्तर जेव्हा बोलतात, तेव्हा कृष्णा ऊर्फ किस्ना त्याला ताड्कन 'उद्या तुम्हालाही मेल्यावर आमच्याकडे यावं लागेल, तेव्हा मीच तुम्हाला जाळणार आहे, हे लक्षात ठेवा' - असं बजावून बाहेर पडतो आणि त्याची शाळा सुटते. पण मनात धग पेटलेली की - 'मी काय वाट्टेल ते करीन; प्रसंगी हमाली करेन, पण हा स्मशानभूमीतला प्रेत जाळण्याचा धंदा करणार नाही.' पण सर्पदेशानं श्रीमतीचा अचानक मृत्यू होतो, तेव्हा त्याचा कुंभार मित्र मंग्या कुटुंबाला मदत करतो; मात्र तरुण विधवा यशोदावर त्याची नजर असते. त्याची जेव्हा किस्न्याला जाणीव होते, तेव्हा तो बापाचं काम करू लागतो, पण शाळेतही जिद्दीनं जाऊ लागतो व उसाच्या रसवंतीवरही पार्टटाईम काम करू लागतो. कारण मनात धग आहे की, लवकरात लवकर शिकून स्वावलंबी होऊन समाजाकडून हेटाळणीखेरीज काही न मिळणारा हा पिढीजात व्यवसाय सोडायचा... या आशावादी टप्प्यावर चित्रपट संपतो, तेव्हा सुन्न झालेला प्रेक्षक भानावर येतो... माझा हा दोन्ही वेळचा अनुभव आहे.

तद्दन खोट्या, चकाकत्या, गुळगुळीत फॉर्म्युलाप्रधान भारतीय - खास करून बॉलिवुड - सिनेमाची चाकोरी ओलांडत खऱ्या भारताची कहाणी कलात्मकतेचा आव न आणता सांगणारे सिनेमे हिंदी व अनेक भारतीय भाषांत अलीकडे येऊ लागले आहेत. 'धग' हा त्यातला एक अत्यंत उजवा व साठाव्या राष्ट्रीय पारितोषिकांत उत्कृष्ट दिग्दर्शक (शिवाजी पाटील), उत्कृष्ट अभिनेत्री (उषा जाधव) व उत्कृष्ट बालकलाकार (हंसराज जगताप), अशी तीन पारितोषिके पटकावून गुणवत्ता सिद्ध केलेला - मला प्रचंड प्रभावित करून गेला आहे.

मला 'धग' का प्रभावित करून गेला? - असा प्रश्न मी स्वत:ला विचारतो; तेव्हा पहिलं उत्तर येतं, ते म्हणजे याची सकस व अस्सल देशी कथा-पटकथा. दुसरं कारण - दिग्दर्शकानं मांडलेला प्रभावी जळजळता अनुभव. आणि तिसरं कारण - कलावंतांचा प्रभावी अभिनय न म्हणता मी असं म्हणेन की, भूमिका जगणं होतं ते - म्हणूनच हा सिनेमा केवळ प्रभावित करीत नाही; अस्वस्थ करतो व नकळत जातिव्यवस्थेवर

प्रभावी व नेमकं सहजतेनं भाष्य करतो...

मरण व अंत्यसंस्कार ही गंभीर बाब आहे; पण ज्यांचा हा पोटापाण्याचा व्यवसाय आहे, ते त्यातूनही जीवनाची छोटी छोटी सुखं कशी शोधतात, हे पाहिलं की जाणवतं - हा खरा एतद्देशीय 'ब्लॅक ह्यमुर' आहे, जो यापूर्वी 'गाभ्रीचा पाऊस' मध्येही आला होता. 'धग' मधला एक प्रसंग म्हणजे - प्रेताची राख झाल्यावर मेलेल्या माणसाचा एक दात सोन्याचा होता, हे लक्षात ठेवून राखेतून किस्ना हुडकून काढतोय... 'लई गुणाचं पोर' असं कौतुकभरल्या नजरेत पाहात आई त्याला प्रेमानं जवळ घेतेय. किंवा प्रेताला अग्नी दिल्यानंतर कवटी फुटेपर्यंत वाट पाहाताना चहा-पाण्यासाठी पन्नास रुपये दिले असताना लवकरच अल्लदपणे दगड मारून कवटी फुटल्याचा आवाज करीत नातेवाईकांना 'आता थांबू नका इथं, आत्मा तुम्हाला धरेल' अशी भीती घालून पिटाळून दिल्यावर पूर्ण कुटुंबानं चहा भुरकून पिणं किंवा कुणी तरी मेल्याची बातमी कळताच कमाईच्या आशेनं पूर्ण कुटुंबात चैतन्य संचारणं, पण मेलेला माणूस मुसलमान आहे व त्याला पुरलं जाणार आहे, हे कळताच उत्साह गळून पडणं... हे प्रसंग पाहताना अंगावर सर्रकन काटा येतो.

या चित्रपटाचा प्रभाव माझ्या मते, त्याच्या 'रॉनेस'मध्ये आहे. असंही माणसाचं जगणं मृत्यूच्या छायेत फुलत असतं, याची प्रत्ययकारी रीतीनं जाणीव 'धग' करून देतो!

हिंदू धर्मातले अंत्यविधीचे कर्मकांड असे भीषण व ओंगळ का आहेत हा प्रश्न मला नेहमीच सतावतो. पण त्यात जरापण बदल मागील शतकभरात झालेला नाही, हेही रोकडं वास्तव आहे. याचं कारण माझ्या मते असं असावं की, जवळच्या माणसाच्या मृत्यूनं माणूस आधीच दु:खी, विकल झालेला असतो. पुन्हा मनावर ठसलेल्या संस्कारानं मृत्यूनंतरच्या जीवनाची भीती कुठे तरी सुप्त मनात असते. अशावेळी मन, विवेक व बुद्धिवाद बाजूस सारतं व कर्मकांडाला शरण जातं... याच्या उलट इस्लाम व ख्रिस्ती धर्मात प्रेताला पुरलं जातं. ज्या मातीतून जन्म झाला त्या मातीशी - जणू मातेशी - या क्रियेत एकरूप होता येतं! ख्रिस्ती धर्मात शवपेटिकेत प्रेत ठेवून खड्ड्यात सोडलं जातं व प्रत्येकामार्फत एक-एक मूठ माती टाकली जाते. येथेही थोडेफार कर्मकांड आहे. पण ते सुसह्य व देखणे आहे. अशी सुसह्यता हिंदू धर्माच्या अंत्यविधीत का आणू नये? विद्युतदाहिनी हा चांगला पर्याय आहे, पण तो अजूनही बहुसंख्याकांच्या पचनी पडलेला दिसत नाही. मोठ्या नेत्यांच्या चंदनाच्या चितेवरील अंत्यविधीचे टीव्हीवरील थेट होणाऱ्या प्रक्षेपणामुळे त्यातले गांभीर्य कमी होतं. तेथेही 'शो-बिझ' प्रकार वाढताना दिसत आहे. ते मला मनस्वी खटकतं, हे मात्र मी स्पष्टपणे नमूद करतो. पुन्हा अनेक शहरांत - गावे सोडा - विद्युत वा डिझेल वाहिनीची सोयच नाही. असो.

मला 'धग' प्रभावित करून गेला तो माझ्या खऱ्याखुऱ्या भारतातील एका

सामाजिक प्रश्नाची अस्सल जाणीव दिली म्हणून. मानवी जगणं व दुःख - धगीचा एक अज्ञात पैलू शिवाजी पाटलांनी ताकदीनं मांडला. हा चित्रपट मनाला त्रस्त करतो. समंधाप्रमाणे मानगुटीवर बसतो. त्यामुळे मनोरंजनाची अपेक्षा करणाऱ्या भारतीय प्रेक्षकांना - जे बॉलिवुडी सिनेमाचे 'ॲडिक्ट' झाले आहेत, त्यांना कितपत पचेल, हा प्रश्नच आहे. पण सिनेमानं केवळ मनोरंजनच केलं पाहिजे असा काही नियम आहे का? पुन्हा प्रेम, रहस्य, हाणामारी व सेक्स म्हणजेच मनोरंजन? जे तुम्हाला दोन तास खिळवते, मेंदूचा भुगा करते... ते मनोरंजन नसेल, पण मनोवेधक तर आहे ना? रंजन हेच कला-साहित्याचं एकमात्र प्रयोजन मानायचं? तर मग शेक्सपिअरच्या ट्रॅजेडीज हद्दपार कराव्या लागतील. म्हणून प्रेक्षकांनी पण असे वेगळे प्रयोग - वेगळे विषय स्वीकारले पाहिजेत, पाहिले पाहिजेत...

'धग' ती जाणीव करून देतो. प्रेक्षकांच्या अभिरुचीला प्रश्नांकित करीत आव्हान देतो. हाच या सिनेमाचा 'यूएसपी' आहे. म्हणूनच त्याचा माझ्यावरील प्रभाव दीर्घकाळ टिकणारा असणार आहे.

-०-०-०-

# ३. गुरुदत्त

## 'परफेक्ट शॉट विरुद्ध इनपरफेक्ट लाईफ' या द्वंदात कातरत गेलेला कलावंत - गुरुदत्त

'Sometimes when I got too tired after work, I become silent and moody. Though my work is dear to me yet I feel I have nothing else in life to hold on to... The more I see life the more bitter I am becoming. And I have less faith in people and human nature.'

२२ फेब्रुवारी १९५८ सालचं पत्नी गीता दत्तला लिहिलेलं पत्र आज वाचताना वाटतं की, एव्हाना त्याची स्वनाशाकडे (self destruction) वाटचाल सुरू झाली असावी.

कारण याच काळाच्या मागेपुढे गीता व वहिदा रहेमान त्याच्या जीवनातून प्रत्यक्ष कदाचित नसतील, पण मनानं दूर जाऊ लागल्या होत्या वा गेल्या असाव्यात... गीता दत्तशी त्याचा प्रेमविवाह. पण दोघे एकत्रही राहू शकत नव्हते व दूर अलग जाऊनही त्यांना मनोस्वास्थ मिळत नसे. आणि त्याचं वहिदाचं नातं हे आजही गूढ, उदास पण मन हळवं करणाऱ्या मनस्वी प्रेमकवितेप्रमाणे आहे... थोडंसं कळतं असं वाटतं, पण बरचसं कळत नाही - अगम्य राहातं. त्याला दोघी हव्या होत्या, एकाच वेळी दोघी हव्या होत्या व एकीला सोडून दुसरी नको होती, असं माझं गुरुदत्तचं मन व व्यक्तिमत्त्व जाणताना त्याचे वर नमूद केल्याप्रमाणे विचार, त्याचे काही उद्‌गार व त्याच्यावर त्याचे जवळचे मित्र देवानंद व राज कपूरनं व्यक्त केलेली मते, अब्रार अल्वी या त्याच्या सिनेमाच्या पटकथाकार असलेल्या मित्राचं वहिदा संदर्भातलं सूचक मौन, व्ही. के. मूर्ती या कॅमेरामन मित्राची गुरूच्या मृत्यूनंतरची मुलाखत या साऱ्यांचा मानसशास्त्रीय पद्धतीने व त्याहून जास्त एक लेखक म्हणून गुरू नामक प्रतिभावंतालाही मोह पाडणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा मी शोध घेताना गवसलेलं माझ्यापुरतं हे कलात्मक सत्य आहे.

दुसरं कलात्मक सत्य मला गवसलेलं आहे की, त्याला जीवनाचं व स्वत:चंही

एक माणूस म्हणून एक कलावंत - फिल्ममेकर म्हणून अपूर्णत्व जाणवायचं. सिनेमाचा प्रत्येक सीन-प्रत्येक शॉट परिपूर्ण व्हावा असा त्याचा अट्टाहास असायचा; ते त्याला शक्य व्हायचं. कारण तो त्या सिनेमाचा दिग्दर्शक असायचा. सूत्रधार असायचा. पण माणसाच्या जीवनाचा सूत्रधार तर तो अज्ञात, वर बसलेला, जगन्नियंता आहे. माणसाच्या जीवनाची सूत्रं त्याच्या हाती आहेत व तो लहरी आहे. त्याची ॲबस्ट्रक्ट कृती मानवी जीवनात प्रचंड विरोधाभास, कमालीची विसंगती आणि अर्तक्यता ठासून भरवते. 'तीसरी कसम' मध्ये शैलेंद्रनं मोठ्या मार्मिकपणे यावर नेमकं भाष्य करीत त्या उपरवालाची लहरी मानसिकता या शब्दात व्यक्त केलीय. 'काहे बनाये तूने माटीके पुतले? धरती ये प्यारी प्यारी, चेहरे ये उजले! काहे रचाया तूने दुनिया का मेला? बोल ये क्या सुझी तुझको - काहे को प्रीत जगाई? तूने काहे को दुनिया बनाई?' गुरुदत्तला अपूर्ण, विसंगत जीवनाचा व अगम्य मानवी वर्तनाचा त्रास व्हायचा. त्याला सिनेमाच्या शॉटप्रमाणे जीवन पण परिपूर्ण व परफेक्टं हवं असायचं. पण ते शक्य नव्हतं, हे कटु सत्य त्याचं हटवादी मन मान्य करायला तयार नसायचं. त्यामुळे त्याच्या मनाची फरफट व्हायची. कदाचित वर नमूद केलेल्या पत्रात आपलं मन मोकळं करताना तो जीवनासंबंधी कसा कडवट बनत चालला होता याची स्वच्छ कबुली पत्नीपुढे दिली होती. एक काम सोडलं तर त्याला बांधून ठेवणारं व आनंदानं जगायला कारण ठरणारं १९५८ च्या आसपास काही उरलं नव्हतं. आणि त्यातचं 'कागज के फूल' हा त्याचा त्यांच्या मॅग्नम ओपस असणारा चित्रपट पडला आणि तो जो मनानं कोलमडला, त्यातून सावरला गेला नाही. तरी अब्रार अल्वी, देवानंद, व्ही. के. मूर्ती व जॉनी वॉकरसारख्या मित्रांमुळे काही वर्षे जगला, पण त्याला मैत्रीपेक्षाही प्रेम व स्त्री सोबतचं परस्परात सारं काही विसरून एक वेगळी दुनिया निर्माण करणारं गाढ तृप्त सहजीवन हवं होतं. ते देण्याची क्षमता त्याच्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या पत्नी गीता दत्त व प्रेमिका-सह कलाकार वहिदा रहेमानजवळ होती. पण गीता व त्याचं नातं म्हणजे एकत्र राहणं अशक्य व दूर होऊन अलग जगणं त्याहून मुश्किल असं होतं. तर वहिदाला कदाचित तो तिच्या एकटीचा हवा होता, पण तिला तसा गुरुदत्त मिळाला नाही व ती त्याच्या जीवनातून दूर झाली. तो पण दोघींचा पूर्णपणे झाला नाही, की त्या दोघी त्याला हव्या तशा प्रेम असूनही त्याच्या झाल्या नाहीत. त्यामुळे त्याची आत्मनाशाची वृत्ती बळावत गेली. पूर्वीपासून असणारा आत्महत्येचा विचार अधिकाधिक प्रिय होऊ लागला. इजा, बिजा व तिजा याप्रमाणे पूर्वी तीनदा त्याला त्यानं आत्महत्येचा प्रयत्न करूनही मृत्यूनं त्याला हुलकावणी दिली होती, पण चवथ्यांदा १० ऑक्टोबर १९६४ ला त्यानं मृत्यूला स्वत:च्या बाहुपाशात खेचून घट्ट पकडून ठेवलं व त्याच्या समवेत तो आनंदाच्या यात्रेसाठी निघून गेला...

कलावंत गुरुदत्त व त्याचे चित्रपट यावर भरभरून लिहिलं गेलं आहे, पण एक

माणूस म्हणून त्याच्या अनाकलनीय, ॲबस्ट्रॅक्ट चित्राप्रमाणे थोडसं समजणारं, पण खूपसं काही न कळणारं पण मनस्वी भावणाऱ्या - अक्षरश: पछाडणाऱ्या मनाबद्दल त्याच्या मृत्यूनंतर स्फुट लेखाखेरीज फारसं काही लिहिलं गेलं नाही.

मला या इथे लेखात त्याच्या अस्वस्थतेचा व त्याच्या कमालीच्या कॉम्प्लेक्स मनाचा तुकड्यातुकड्यानं त्यावर एक्सरेप्रमाणे सत्याचे, अनुभवाचे काही झोत टाकायचे आहेत व या तुकड्या-तुकड्या सत्याचा एक कॅलिडोस्कोप करता येतो का याचा मला इथं प्रयत्न करायचा आहे.

राज कपूर एकदा गुरुदत्तच्या संदर्भात वरकरणी गंमतीमध्ये एक फार मोलाचं विधान करून गेला होता. 'Gurudatta is so sensitive that he should carry a lable on his heart : Fragile, handle with care.' एका मर्यादेपर्यंत मित्र म्हणून त्याचं हृदय-त्याचं मन अब्रार अल्वी व व्ही. के. मूर्तीनं सांभाळलं; पण ज्या दोघीत तो अडकित्त्यातील दोन पात्यांमध्ये सुपारी जशी कातरली जाते, तसा तो गीता व वहिदाच्या प्रेम व नंतर दिलेल्या अंतरायात काचला गेला होता. सावळ्या-सलोन्या बांगला गीताचं सौंदर्य आणि वहिदाचं क्लासिक खानदानी मुस्लीम सौंदर्य. कुणीही व्यक्ती त्यापासून स्वत:चा बचाव करू शकला नसता. पण गुरूचं दुर्दैव की, ही दोन बेमिसाल सौंदर्य त्याच्या जीवनात आली व त्याचं हृदय पुन्हा पुन्हा भंग करून गेली. राज कपूरनं म्हणल्यामुळे त्याचं 'Fragile' व तीव्र संवेदनशील मन-हृदय त्यांनी जपायला हवं होतं - पण दोघीचं स्त्रीत्व व आत्मसन्मान प्रखर होता, त्यांना प्रेमात तडजोड करीत कदाचित दुसरीला सामावून घेणं ज्वलंत स्त्रीत्वामुळे शक्य झालं नसावं. वहिदा जीवनातून दूर झाली, तर गीता घर-संसार सोडून अलग राहू लागली. गुरुदत्त फ्लॅटमध्ये किंवा स्टुडिओमधील विसाव्याच्या बेडरूममध्ये एकाकी राहायचा. १९६३-६४ च्या काळात बहुतांश रात्री त्यानं एकट्यानं व्यतीत केल्या होत्या. त्या रात्रींनी त्याचं नि:शब्द धुमसणं, आक्रंदन आणि शून्यात स्वत:ला हरपून गेलेला गुरू किती वेळा पाहिला असेल? त्याही त्यामुळे उदास व खिन्न झाल्या असतील. त्यांनी पण का त्यानं मृत्यूला जवळ केल्यावर सुटकेचा श्वास टाकला असेल? त्याचं कोमल व वारंवार छिन्न भिन्न होणारं हृदय अखेरीस धडधण्याचं थांबून शांत झालं म्हणून का त्या एकाकी रात्रीचा तो सुटकेचा नि:श्वास होता?

व्ही. के. मूर्तीने जेव्हा बेंगलोरला कायम रहायला जायचं ठरवलं तेव्हा गुरुदत्त व त्याला अब्रारला म्हणाला होता, 'मी आता अनाथ, पोरका, एकाकी होणार. घरवाले नही हैं, गीता अलग झाली होती. आणि वहिदा जीवनातून निघून गेली होती, तुम बेंगलोर जा रहे हो. और अब्रार फिल्म लिखने के लिए मद्रास. क्या करू मैं?' गुरू जेवढा एकांती होता, तेवढाच लोकांती होता. त्याला त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रिया, मित्र, सहकारी कलावंत त्याच्यापासून अलग झालेले सहन व्हायचे नाहीत.

अब्रार हा त्याची मनातली स्पंदनं टिपणारा जणू टीपकागद होता. तसेच अल्टर इगो पण होता. आणि मूर्ती गुरूला परिपूर्णता जीवनात जी मिळत नव्हती ती सिनेमाच्या प्रत्येक फ्रेम व सीनमध्ये उतरविण्यासाठी गुरूला मदत करणारा कॅमेऱ्याचा जादूगार होता. 'वक्तने किया क्या हंसी सितम' सारखी छायाप्रकाशाचा कलात्मक खेळ दाखवणाऱ्या असंख्य चित्रचौकटी गुरू-मूर्तीनं निर्माण केल्या, त्यावेळी गुरूला प्रज्ञा व प्रतिभेनं आपण जीवनात नाही तर किमान सिनेमात परिपूर्णता आणू शकतो, असं कलात्मक समाधान कलावंत म्हणून अनेकदा मिळालं असणार. पण प्रत्यक्ष जीवनातील विरह, दुरावा, सामाजिक बंधनांचा होणारा कांच, कला व धंद्याचा न जपणारा मेळ, कलात्मकतेचा बळी देत कधी कधी काही प्रसंगात करावी लागणारी नकोशी वाटणारी व्यावसायिक तडजोड - या बाबींमुळे जे न्यूनत्व येत होतं, अपूर्णता वाटत होती, खोल असमाधान होत होतं, ते त्याला खटकायचं. तीव्रतेनं बोचायचं. प्रेमातील अपयशामुळे मनस्वी घायाळ होणं ही तर त्याची 'फितरत' होती. या साऱ्यामुळे पदोपदी जाणवणारी अपूर्णता गुरुदत्तला सहन होत नसे. Perfect shot versus imperfect life असं त्यांच आयुष्यभराचं द्वंद होतं, ते मृत्यूनंच संपेल असं तीन वेळा अयशस्वी आत्महत्याच्या प्रयत्नाच्या वेळी त्याला नक्कीच वाटलं असणार. पण त्यातून वाचल्यावर जगावं लागणारं जीवन त्याला अधिक असह्य वाटत असणार. त्याची परिणिती अखेर दारू व स्लीपिंग पिल्सच्या जहरी व जीवघेण्या कॉकटेलनं झाली आणि एक अस्वस्थ आत्मा अखेरीस दारू व निराशा जवळ केल्यामुळे पोखरलेल्या व अकालीच थकलेल्या जेमतेम चाळीस वर्षाच्या देहकुडीतून अलग झाला. अविनाशी आत्मा हे मिथ खरं असेल तर गुरूच्या आत्म्याला सद्गती खचितच मिळाली नसणार, तो अंतराळात अश्वत्थाम्याच्या चिरंतन चिघळणाऱ्या जखमेप्रमाणे आपली अस्वस्थता कुरवाळीत भटकत असणार व नंतर ज्या ज्या मनस्वी कलावंतांनी आत्महत्या केल्या वा दारू व बेदरकार वागण्यानं ओढवून स्वनाश घेतला, त्यांना त्यानं पछाडलं असणार...

देवानंद हा त्याचा जिवलग मित्र. त्याच्या मते गुरुदत्त हा melancholic होता. या शब्दाचा नेमका डिक्शनरी अर्थ आहे A feeling of sadness and being without hope आणि feeling / looking sad or making you feel sad असा होतो. देवच्या मते गुरूनं नेहमीच मानवी दुःख आणि निराशांनी भरलेले चित्रपट बनवले. तो अपयश - जीवनातील असो वा सिनेमातील असो - सहन करू शकत नसे. अशावेळी कासव जसा आपलं शरीर कवचाच्या आत ओढून घेतो, तसा गुरू जगापासून स्वत:ला आपल्या कोषात व स्वेच्छेने पत्करलेल्या एकटेपणात दडवून घ्यायचा. देवचं हे निरीक्षण अत्यंत मार्मिक व गुरूच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारं आहे. तो गुरूला अधिक चांगला जाणू शकत होता. कारण तो त्याच्या अगदी विरुद्ध स्वभावाचा म्हणजे स्वच्छंदतावादी व यशअपयश दोन्हीचा समानतेनं स्वीकार करणारा

'जिंदगीका साथ निभाता हुवा' चालणारा होता. सुरैय्याच्या प्रेमभंगानं तो काही गुरूप्रमाणे खचून गेला नाही की आयुष्याच्या उत्तरार्धात त्यानं १९८० ते २०१० या तीन दशकात त्याचे सातत्याने दोन डझनभर चित्रपट फ्लॉप झाले तरी त्याच्या मनाला निराशा स्पर्शून गेली नाही. हा नाही, पण पुढला चित्रपट हिट होईल हा त्याचा आशावाद शेवटपर्यंत कायम होता. 'Romancing with life!' असं त्याच्या रसील्या आत्मचरित्राचं मुळी नावच होतं. तो आयुष्यभर जीवनाशी रोमान्स करीत राहिला. त्याचा हा आशावाद थोडा जरी त्यानं जिवलग मित्र गुरूदत्तला दिला असता तर? - यात तसा काही अर्थ नाही. प्रत्येकाचं मन व भावना या वेगळ्याच मुशीतून तो निर्माता सिद्ध करीत असतो. त्यानं गुरूला अस्वस्थ, उदास, लहानसहान दु:ख - आघातांनी खचून जाणारं, व मुख्य म्हणजे या दु:ख - व्हिक्टीमहूडचं आकर्षण वाटणारं घडवलं, त्यात गुरूचा तरी काय इलाज होता?

गिरीश कार्नाडनं नसरीन मुन्न कबीर यांच्या 'गुरूदत्त-ए लाईफ इन सिनेमा'च्या निमित्तानं गुरुदत्तच्या व्यक्तिमत्त्वाचं वेगळं पण मर्मभेदी विवेचन केलं आहे. गुरू एकाच वेळी 'हॅम्लेट' व 'देवदास' सिंड्रोमनं पछाडलेला होता. 'हॅम्लेट' म्हणजे 'To be or not to be' चं चिरंतन द्वंद्व, तर देवदास सिंड्रोम म्हणजे कमालीचं तीव्र संवेदशील मन, आत्मनाशाची प्रबळ प्रेरणा आणि स्वत:वरचं प्रेम करणारं नारसिस्टिक व्यक्तिमत्त्व. गुरूला दोन्ही व्यक्तिमत्वांचे बरीच गुण चपखल बसतात. हे जर खरं असेल की वहिदा व त्याचा निकाह (पहिला लग्न विच्छेद न करता) होणार होता, तर त्यानं कच का खाल्ली व माघार घेतली,ज्यामुळे वहिदाचा तीव्र मनोभंग होऊन त्याच्यापासून अलग झाली... याचं उत्तर कदाचित अब्रार अल्वी देऊ शकला असता. पण त्यानं यावर आयुष्यभर सूचक मौन पाळालं. आणि वहिदानं 'डिग्निफाईड' मौन.

कार्नाडांच्या मते त्याच्या अनेक सिनेमात त्या सिनेमाचे नायक व देवदास सिंड्रोमनी त्या व्यक्तिरेखेला 'स्वदये'च्या (Self Pity) सीमारेषेपर्यंत नेलं आहे. १९६० नंतर कदाचित कार्नाडांच्या मते गुरूदत्तच्या प्रतिभेला ओहोटी लागली असावी व त्यात वैयक्तिक जीवनाचा पेचप्रसंगाचं सावट मनावर काळजी धरू लागलं होतं. याचवेळी सत्यजीत रे च्या नववास्तववादी, गाणे व ग्लॅमर विरहित सिनेमानं जगभर त्यांचं नाव झालं होतं. गुरूदत्तमध्ये अशी प्रतिभा असूनही त्याचे सिनेमे हिंदी असल्यामुळे व त्याला गीत - नृत्य व मित्रप्रेमापोटी जॉनी वॉकरसाठी प्रत्येक सिनेमात रोल निर्माण करून पेरलेल्या विनोदामुळे आपल्या सिनेमातली कलात्मकता झाकोळली जाते, याचं भान व वैषम्य असणार - त्याच्या मृत्यूनंतर 'प्यासा' व 'कागज के फूल' कल्ट क्लासिक सिनेमे म्हणून जगानं डोक्यावर घेतले, पण त्याच्या जिवंतपणी त्याला हे कलात्मक यशाचे समाधान खचितच लाभले नाही. खरं तर, त्यानं याचं वैषम्य वाटून घ्यायचं काहीच कारण नव्हतं. कारण हे दोन सिनेमे त्याच्या काही उणिवांसह थोर व

अजरामर ठरणारे बनलेच होते. पुन्हा भारतीय नृत्य-गीत शैलीशी (Narrative) फारकत घेत जागतिक सेन्सिबिलिटी (पक्षी : वेस्टर्न सेन्सिबिलिटी) अनुरूप सत्यजित रें नी चित्रपट बनवले होते, जे गुरूच्या प्रकृतीत बसणारे नव्हते. कारण तो उदय शंकरच्या तालमीत तयार झालेला नर्तक होता, त्याला संगीताचं उत्तम भान होतं आणि कॅमेऱ्याद्वारे कृष्णधवल छाया - प्रकाशाचा तर तो भारतातील सर्वश्रेष्ठ जादूगार होता. त्यानं आपली स्वत:ची स्वतंत्र चित्रशैली कुणाचंही अनुकरण न करता घडवली होती. पाश्चात्त्यांना त्यातील गीत-संगीत व भारतीय परंपराशी इमान राखणारी पात्रे असल्यामुळे गुरूच्या चित्रपटांची महती त्याच्या हयातीत जाणवली नाही. त्यानंही जाणीवपूर्वक आपले सिनेमे परदेशात प्रदर्शित करण्याचा खटाटोप केला नाही. पण तरीही रेंच्या तोडीची प्रतिभा असतानाही त्याची लहरीनुसार चित्रपट करण्याची पद्धत आणि काही केलेल्या तडजोडीनं त्याला रें प्रमाणे मान्यता मिळाली नाही. आणि त्याची त्याला मनोमन कुठेतरी खंत होती. दुखावलेपण होतं. वैयक्तिक अपयशासोबत हे कलात्मक अपयशानेही त्याला आत्मनाशाकडे खेचत नेलं असेल का?

वहिदा रहेमानचा 'गुरुजी आणि मी' हा गुरूवर त्याच्या मृत्यूनंतर लिहिलेला लेख मला गुरुदत्तच्या व्यक्तिमत्त्वातील त्याचं मृत्यूचं असणारं ऑबसेशनच्या संदर्भात महत्त्वाचा वाटतो. ती म्हणते 'त्यांचं मृत्यूवर का प्रेम होतं? मृत्यू त्यांना का जवळ करावासा वाटला? ईश्वरानं त्यांना सारं काही दिलं होतं, पण संतुष्टता दिली नव्हती. कदाचित त्यांना आयुष्यात जे मिळू शकलं नाही ते मृत्यूत शोधायचं असेल. असमाधानाची वेदना जाणवणार नाही असा एक शेवट, एक पूर्णत्व, एक तृप्ती त्यांना मृत्यूमध्ये शोधायची असेल.''

वहिदाला असंही मागे वळून पहाताना वाटलं की, गुरूला आत्मनाशापासून कोणी वाचवू शकलं नसतं. कारण त्याची जगण्याची इच्छाच हळूहळू संपत होती. आयुष्यात प्रत्येकाला सर्व काही हवसं वाटणारं मिळत नसतं, पण गुरूला ते मंजूर नसावं. त्याचा मृत्यू हा कदाचित अपघात असेल पण तो गुरुदत्तला हवासा होता हे मात्र नक्की. वहिदाला असंही वाटतं, जर या वेळी ते वाचले असते, तर त्याचं त्या नंतरचं जगणं हे मरण्यापेक्षा अधिक वेदनामय झालं नसतं, याची कोण हमी देऊ शकलं असतं?

असं हे मी आकळलेलं गुरुदत्तचं व्यक्तिमत्त्व, त्यांच्या मनातली वादळं आणि देवदास-हॅम्लेटचं मिश्रण असलेलं आत्मनाशी जीवन. ते मला साहिरनं त्याच्यासाठी लिहिलेला एक शेर व गीताच्या एक कडव्यातून बऱ्याच प्रमाणात साकारलं आहे असं वाटतं. साहिरचा शेर प्रथम. तो असा आहे,

'उभरेंगे एक बार अभी, दिलके खलबले
माना की दब गये हैं, गमे जिंदगीसे हम ।।

लो आज हमने तोॅड दिया, रिश्ता-ए-उम्मीद
लो अब कभी गिला न करेंगे, किसीसे हम ॥'

'प्यासा' मधील 'ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है?' असंच गुरुदत्तला उत्तरआयुष्यात वाटत आलं असणारं. त्याचं कारण होतं,

'हरेक जिस्म घायल, हरेक रुह प्यासी
निगाहोंमें उलझन, दिलों में उदासी
ये दुनिया हैं या आलम में बदहवासी
ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है?'

गुरूची अस्वस्थता पण अश्वत्थाम्याच्या चिरंतन चरत जाणाऱ्या जखमेसारखी अविनाशी आहे व ती सिंदबादच्या भुताप्रमाणे संवेदनक्षम माणसाच्या मानगुटीवर केव्हा बसेल हे कळणार नाही... पण आजच्या मुर्दाड शारीरमांद्याच्या उपभोगी दुनियेत असं पछाडणं कुणाच्या वाट्यास आलं तर किती बरं होईल!

०-०-०

## पूर्व प्रसिद्धी

* **कथासंग्रह**

१) कथांजली - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९८३
२) अंतरीच्या गूढगर्भी - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९५
३) पाणी! पाणी!! (मूळ नाव 'उदक') - साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८
४) नंबर वन - साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००८
५) सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी - मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३

* **कादंबऱ्या**

१) सलामी - अंजली पब्लिकेशिन्स, पुणे, १९८६
२) अंधेर नगरी - साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४
३) होते कुरुप वेडे - शब्दमेघ प्रकाशन, परभणी, १९९५
४) इन्किलाब विरुद्ध जिहाद - राजहंस प्रकाशन, पुणे, २००४
५) ऑक्टोपस - प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८
६) हरवलेले बालपण - मेहता पब्लिकेशन, पुणे २०१४

* **संकीर्ण**

१) बखर भारतीय प्रशासनाची - साधना प्रकाशन, पुणे, २०११
२) प्रशासननामा - मनोविकास प्रकाशन पुणे, २०१३
३) मराठवाडा मुक्तिसंग्राम (संपादित) - मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद १९९८
४) अविस्मरणीय कोल्हापूर (कॉफी टेबल बुक) - दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१३
५) दूरदर्शन हाजीर हो (बालनाट्य) - साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९६

* **इंग्रजी**

1) The Real Hero and other stories - Shavira Publication, Pune, 2008
2) Administration : Good to Greatress - Allied Publisher, Ambala, 2013
3) Charishmatic Kolhapur (Coffee Table Book) - Kolhapur Trust, Kolhapur, 2013

## लेखक परिचय

# लक्ष्मीकांत वसंत देशमुख



**शिक्षण :** एम.एस्सी., एम.ए. (मराठी साहित्य), एम.बी.ए., आयआयएम बेंगलोर

**प्रशासकीय कारकीर्द :** १९८३ उपजिल्हाधिकारी, २००२ मध्ये भारतीय प्रशासन सेवेमध्ये पदोन्नती, २००९ ते २०१२ जिल्हाधिकारी, कोल्हापूर; जून; २०१२ पासून व्यवस्थापकीय संचालक– महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

**पुरस्कार :** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी; अच्युत बन पुरस्कार, नांदेड; वाङ्मय चर्चा, बेळगाव; नगर वाचनालय कादंबरी पुरस्कार, अहमदनगर; राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार

**महत्त्वाचे पुरस्कार :** 'नॅसकॉम सोशल ऑनर पुरस्कार' (२०१०), मंथन २०११ दक्षिण आशियाई पुरस्कार

**प्रकाशित पुस्तके :**

**कादंबरी :** सलोमी, अंधेरनगरी, ऑक्टोपस, होते कुरूप वेडे, इन्किलाब विरुद्ध जिहाद

**कथासंग्रह :** कथांजली, अंतरीच्या गूढगर्भी, पाणी! पाणी!!, नंबर वन, अग्निपथ, सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी (राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार)

**संकीर्ण :** दूरदर्शन हाजीर हो! (बालनाट्य), मराठवाडा मुक्तिसंग्राम (संपादित), बखर भारतीय प्रशासनाची– प्रशासननामा (वैचारिक)

**इंग्रजी साहित्य :** The Real Hero & other stories

**सामाजिक कार्य :** अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष (१९९५), 'अक्षर प्रतिष्ठा'– परभणी या साहित्यविचार व्यासपीठाची स्थापना, कोल्हापूर येथे शाहू स्मारकाचे पुनरुज्जीवन व विस्तार, व्याख्यानमाला, साहित्यिक गोष्टी व जिल्हा संमेलनाचे आयोजन, 'अक्षर अयान' या नावाचा दिवाळी अंकाचे संपादन (२०१३), मराठवाडा साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून निवड.

'लक्षदीप' हा लक्ष्मीकांत देशमुख यांच्या निवडक साहित्याचा संपादित संग्रह. या संग्रहात त्यांच्या कथा, नाटक, आत्मपर, प्रवासवर्णन, प्रशासनविषयक, वैचारिक व आस्वादसमीक्षा या लेखनप्रकारांतील लेखनाचा समावेश केला आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या जीवनानुभवाच्या प्रकटीकरणासाठी विविध लेखनप्रकारांची रीत अवलंबिली आहे. कथात्म साहित्यप्रकारातून त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती केली आहे. अनेक नवे विषय त्यांच्या कथांमधून आविष्कृत झाले आहेत. समस्याप्रधान कथा म्हणून या कथेला विशेष महत्त्व आहे. खेळाडूंच्या संघर्षकथा, पाणीप्रश्न व स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या विषयांवर त्यांनी कथामालिका लिहिल्या. थीमबेस्ड कथा म्हणून त्या ओळखल्या जातात. त्यांच्या कादंबऱ्यांमधून विविध प्रकारची जाणीवसूत्रे व्यक्त झाली आहेत. बालमजुरांचे दाहक प्रश्न, राजकारण व मानवी जीवनाची विशिष्ट दर्शनबिंदूतून केलेली चित्रणे आहेत. त्यांच्या एकूण लेखनात मुस्लिम संस्कृतीचे जीवनरंग सहिष्णुतेच्या भावनेने समजून घेण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनविषयक लेखनातून भारतीय प्रशासनाची वाटचाल, तीमधील स्थित्यंतरे व स्वकथने साकारली आहेत. प्रवासवर्णन व कलामीमांसाविषयक लेखनातून देशमुखांच्या जिव्हाळ्याचे विषय व त्यासंबंधीचा त्यांचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.

विविध पातळ्यांवरील राजकारणाचा व समाजकारणाचा चित्रणफलक त्यांच्या सर्वच साहित्यात आहे. प्रशासनव्यवहारातील गुंत्यांचे विविधलक्ष्यी चित्रण हा त्यांच्या एकूण साहित्याचा विशेष आहे. ऐंशीनंतरच्या काळातील महाराष्ट्रीय समाजातील प्रशासकीय जीवनाचे वृत्तांत त्यांच्या साहित्यात आहेत. देशमुख यांच्या एकूण संवेदनशील स्वभावावर प्रशासकीय जीवनानुभवाचा व आदर्शवादी भूमिकेचा प्रभाव आहे.

– डॉ. रणधीर शिंदे

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.™
२५१ क, शनिवार पेठ, पुणे -४११०३०